# माध्यमिक पाठ्यक्रम

# २१३ - सामाजिक शास्त्र

## पुस्तक - २

पाठ्यक्रम समन्वयक
श्रीमती तरुण पुनिया
डॉ. चुन्नु प्रसाद
डॉ. अझमत नुरी

प्रकल्प समन्वयक
श्रीमती आसिमा सिंग

विद्याधनम् सर्वधनं प्रधानम्

राष्ट्रीय मुक्त विद्यालयी शिक्षा संस्थान
ए-२४-२५. इंस्टीटयूशनल एरिया, सेक्टर-६२, नोएडा-२०१ ३०९ (उ.प्र.)
Website: www.nios.ac.in, Toll Free No. 18001809393

एनआईओएस वाटरमार्क 80 जीएसएम पेपर पर मुद्रित।

© राष्ट्रीय मुक्त विद्यालयी शिक्षा संस्थान

मुद्रण : दिसंबर, 2013 (2,000 प्रतियाँ)

सचिव, राष्ट्रीय मुक्त विद्यालयी शिक्षा संस्थान, ए–24–25, इंस्टीट्यूशनल एरिया, सेक्टर–62, नोएडा–201309 द्वारा प्रकाशित एवं मैसर्स अरावली प्रिन्टर्स एण्ड पब्लिशर्स, (प्रा.) लि., डब्ल्यू–30, ओखला इंडस्ट्रियल एरिया, फेस–II, नई दिल्ली–110020 द्वारा मुद्रित

## राष्ट्रीय मुक्त विद्यालयीन शिक्षण संस्था सल्लागार समिती

**डॉ. सितांशु स. जेना**
चेअरमन
रा.मु.शा.सं., नवीन दिल्ली

**डॉ. कुलदीप अगरवाल**
निर्देशक (शैक्षणिक)
रा.मु.शा.सं., नवीन दिल्ली

**डॉ. वेंकटेश श्रीनिवासन**
साहायक प्रतिनिधी
UNFPA नवी दिल्ली

**श्रीमती गोपा विश्वास**
सह.संचालक (शैक्षणिक)
रा.मु.शा.सं., नवीन दिल्ली

**डॉ. सोनिया बहल**
सह. संचालक (शैक्षणिक)
रा.मु.शा.सं., नोईडा

## पाठ्यक्रम समिती अध्यक्ष

**प्रा. सी. एस्. आर. मूर्ति**
CIPOD, SIS जवाहरलाल नेहरू विद्यालय,नवी दिल्ली

### सदस्य

**प्रा. निविदीता मेनन**
प्राध्यापक
SIS, JNUनवी दिल्ली

**प्रा. मोहमद कुरेशी**
प्राध्यापक (भूगोल)
CSRD, SSS, INU नवी दिल्ली

**प्रा. नूर मोहमद**
निवृत्त प्राध्यापक
दिल्ली विद्यापीठ दिल्ली

**प्रा. सलील मिश्रा**
इतिहास विभाग SSS,
IGNOU नवी दिल्ली

**प्रा. अनिल सेठी**
DEESH,
NCERT नवी दिल्ली

**डॉ. कृष्ण मेनन**
प्रपाठक (राज्यशास्त्र) लेडी सीताराम
महाविद्यालय दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

**डॉ. बी. एल. गुप्ता**
निवृत्त उपप्राचार्य
दिल्ली प्रशासन दिल्ली

**श्रीमती अपर्णा पांडे**
व्याख्याती DEESH,
NCERT नवी दिल्ली

**कै. श्रीमती चित्रा श्रीवास्तव**
पदव्युत्तर प्राध्या. (इतिहास) सरदार
पटेल विद्या. लोधी कॉलनी,नवी दिल्ली

**डॉ. टी. एन्. गिरी**
विभागीय संचालक राष्ट्रीय मुक्त विद्या.
शिक्षणसंस्थान, पाटना

**श्री. विवेक सिंह**
एस्. ई. ओ. (ॲकॅडमिक) राष्ट्रीय
मुक्त विद्यालयशिक्षण संस्थान, नोईडा.

## संपादक मंडळ

**प्रा. जे. आय्. पांडे**
NCERT, निवृत्त प्राध्यापक
नवी दिल्ली

**श्री. भगवतिप्रसाद ध्यानी**
व्याख्याताशिक्षण संचालनालय,
दिल्ली प्रशासन

**डॉ. अनिता देवराज**
प्राचार्या डी.ए.व्ही. पब्लिक
स्कूल,वहादूरगड, हरियाना

**डॉ. बी. एल. गुप्ता**
निवृत्त उपप्राचार्य
दिल्ली प्रशासन, दिल्ली

**डॉ. टी. गीता**
सहाध्यायी प्राध्यापक, CIE
दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

**डॉ. एस् के. मोहापात्रा**
प्रपाठक (भूगोल)
IGNOU
नवी दिल्ली

**श्रीमती तरुण पुनिया**
शैक्षणिक अधिकारी (भूगोल)
रा.मु.वि.शि.संस्थान,
नोईडा, (उत्तर प्रदेश)

**डॉ. चुन्नु प्रसाद**
शैक्षणिक अधिकारी,राज्यशास्त्र
रा.मु.वि.शि.संस्थान,
नोईडा, (उत्तर प्रदेश)

**डॉ. अझमत नूरी**
शैक्षणिक अधिकारी,इतिहास
रा.मु.वि.शि.संस्थान,
नोईडा, (उत्तर प्रदेश)

**श्रीमती रिता ठोकचोम**
४/३३, ए. पहिला मजला,
विजय नगर,
दिल्ली

**श्रीमती उर्मिल महेंदू**
G १४६, एल्. वाय्.
कालनी पश्चिम विहार, दिल्ली

**श्रीमती एस्. के. अरोरा**
GH4/१९०, मीरा अपार्ट.
पश्चिम विहार, दिल्ली

**डॉ. आर्. के. श्रीवास्तव**
व्याख्याता SCERT, दिल्ली

## पाठ लेखक

**डॉ. अनिता देवराज**
प्राचार्या, डी. ए. व्ही.
वहादूरगड, हरियाणा

**डॉ. एस्. के. मोहपात्रा**
प्रपाठक (भूगोल)
IGNOU नवी दिल्ली

**डॉ. रामसहाय प्रसाद**
सहयोगी प्राध्यापक
डॉ. आंबेडकर महाविद्यालय,
दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

**डॉ. व्ही. एस्. नेगी**
सहयोगी प्राध्यापक
शहीद भगतसिंग महाविद्यालय,
दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

**डॉ. स्वाती रजपूत**
सहायक प्राध्यापक
शहीद भगतसिंग महाविद्यालय,
दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

**डॉ. अल्पना तापरिया**
TGT (समाजशास्त्र) DPS
इंदिरापूरमम गाझीयावाद

**डॉ. भुवन झा**
सहयोगी
दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

**श्री प्रेम ओझा**
TGT (समाजशास्त्र) द हेरिटेज
स्कूल, सेक्टर ६२, गुरगाव

**श्रीमती नसरीन रिझवी**
TGT (समाजशास्त्र)
DPS इंदिरापूरम् गाझियावाद

**डॉ. शालिन जैन**
सहायक प्राध्यापक S.G.T.B.
खालसा महाविद्यालय, दिल्ली

**श्रीमती समिता दास**
TGT (समाजशास्त्र) DPS
इंदिरापूरम् गाझियावाद

**श्री. चंदन श्रीवास्तव**
रिसर्च स्कॉलर, CIE
दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

**श्रीमती मनिया सुब्बा**
रिसर्च स्कॉलर, CIE
दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

## रेखाचित्र सल्लागार समिती

**प्रा. जे. आय. पांडे**
निवृत्त प्राध्यापक NCERT नवी दिल्ली

**डॉ. अनिता देवराज**
डी. ए. व्ही. पब्लिक स्कूल,वहादूरगड, हरियाणा

**डॉ. एस्. के. मोहपात्रा**
प्रपाठक (भूगोल) IGNOU नवी दिल्ली

**श्रीमती अशीमा सिंग** (प्रकल्प समन्वयक) (AEP)
रा.मु.वि.शि.संस्थान, नोईडा, (उत्तर प्रदेश)

**डॉ. जया** (राष्ट्रीय कार्यक्रम अधिकारी)
(UNFPA) ५५, लोधी इस्टेट नवी दिल्ली

**प्रवाह**
मेंटॉरिंग एजन्सी, C – 24b कालकाजी नवी दिल्ली

## समन्वयक

**श्रीमती तरुण पुनिया** (शैक्षणिक अधिकारी)
(भूगोल) रा.मु.वि.शि.संस्थान,नोईडा, (उ.प्र.)

**डॉ. चुन्नु प्रसाद** (शैक्षणिक अधिकारी)
(राज्यशास्त्र) रा.मु.वि.शि.संस्थान, नोईडा

**डॉ. अझमत नुरी** (शैक्षणिक अधिकारी)
(इतिहास) रा.मु.वि.शि.संस्थान, नोईडा

## मराठी भाषांतर

**प्रा. मानसिंग सदाशिव साळुंके**
माजी प्राध्यापकमॉडर्न कॉलेज पुणे ५

**डॉ. नीता मिलिंद बोकील** (सहध्यायी प्राध्यापिका)
हरिभाई व्ही. देसाई, महाविद्यालय, पुणे २

**श्री. अ. गं. कडेकर** (माजी प्राचार्य)
नेताजी सुभाषचंद्र बोस उच्च माध्य.विद्यालय,पुणे ६

## रेखाचित्रकार

**श्री. महेश शर्मा**
रेखाचित्रकार रा.मु.वि.शि.संस्थान,नोईडा, (उ.प्र.)

**श्री. रुपेश खरकवाल**
मुक्त रेखाचित्रकारनवी दिल्ली

**वेदिका एन्टरप्रायजेस**
टाईपसेट और डिझाईन, पुणे

# *Mukta Vidya Vani*



Mukta Vidya Vani is a pioneering initiative of the National Institute of Open Schooling (NIOS) for using Streaming Audio for educational purposes. This application of ICT will enhance accessibility as well as quality of programme delivery of NIOS Programmes. This is a rare accomplishment of NIOS as the first Open and Distance Learning Institute to start a two way interaction with its learners, using streaming audio and the internet.

Keeping in mind the fact that the transmission is done through the web, the NIOS website (www.nios.ac.in) has a link that will take any user to the Mukta Vidya Vani. Mukta Vidya Vani thus enables a two way communication with any audience that has access to an internet connection, from the studio at its Headquarters in NOIDA, where NIOS has set up a state-of-art studio, which will be used for this purpose as well as for recording educational audio programmes meant for NIOS learners, though others can also take advantage of this facility.

Mukta Vidya Vani is a modern interactive, participatory and cost effective programme, involving an academic perspective along with the technical responsibilities of production of audio and video programmes, which are one of the most important components of the multi channel package offered by the NIOS. These programmes will attempt to present the topic/ theme in a simple, interesting and engaging manner, so that the learners get a clear understanding and insight into the subject matter.

NIOS has launched a scheme to motivate the learners to participate in the Mukta Vidya Vani by sending their Audio CD's to the respective regional centre on various subjects such as-

1. Poetry / Shloka recitation
2. Story telling
3. Radio Drama
4. Music
5. Talks on various topic related to the NIOS curriculum including Painting, Vocational Subjects etc.
6. Quiz
7. Mathematics puzzles etc.



The selected CD can be webcast on Mukta Vidya Vani and the winner participant be rewarded suitably.

Learners may visit the NIOS website and participate in live programmes from 2pm to 5pm on all week days and from 10.30am to 12.30pm on Saturdays, Sundays and all Public Holidays. The Subject Experts in the Studio will respond to their telephonic queries during this time. A weekly schedule of the programmes for webcast is available on the NIOS website. The Studio telephone number are 0120-4626949 and Toll Free No. 1800-180-2543.

# अध्यक्षांचा संदेश

प्रिय विद्यार्थ्यांनो,

काळानुसार जशा जशा समाजाच्या साधारण गरजा आणि विशेषत: काही गटाच्या गरजा बदलत जातात, त्याचप्रमाणे महत्त्वाकांक्षाही बदलत जातात त्या पूर्ण करण्यासाठी त्याच्या पद्धती व तंत्रामध्ये त्याप्रमाणे बदल केले जातात. शिक्षण हे बदल करण्याचे उपकरण आहे. योग्य प्रकारचे शिक्षण योग्य वेळेला मिळाले तर समाजाच्या सकारात्मक दृष्टीकोन तयार होतो; नवीन व आधुनिक आव्हानाला तोंड देण्यास आपल्या वागणुकीत बदल होतो आणि कठीण प्रसंगाना तोंड देण्यासही धैर्य मिळते. हे नियमित अभ्यासक्रम नवीन बदल केल्याने हे धाडस परिणामकारकरित्या मिळविता येते. स्थिर अभ्यासक्रमाने कुठलेही उद्देश साध्य होत नाही कारण तो वर्तमानातील व्यक्तीगत व सामाजिक गरजा व महत्त्वाकांक्षा पूर्ण करू शकत नाही.

फक्त हा हेतू साध्य करण्याकरिता पूर्ण देशातील शिक्षण तज्ञ नियमित काळाने मुद्दाम भेटतात आणि त्या बदलांची नितांत गरज व आवश्यकता आहे त्यावर विचार करतात. ह्याच चर्चा व मसलतीचे परिणाम म्हणून राष्ट्रीय अभ्यासक्रमाची मांडणी बाहेर आली, ह्यामध्ये योग्य असा / आवश्यक असलेला व शिक्षणाच्या विविध पातळीवर म्हणजेच प्राथमिक, माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक पातळीवर सविस्तर प्रकारचे शिक्षण तयार झाले.

ही मांडणी आणि इतर राष्ट्रीय व सामाजिक संबंध लक्षात घेऊन आम्ही माध्यमिक पातळीवर सर्व विषयांचा प्रचलित अभ्यासक्रमात दुरुस्ती केली; व हा अभ्यासक्रम प्रचलित गरजांवर आधारित आहे. पाठ्यपुस्तक तयार करणे हा राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्थेचा महत्त्वाचा व आवश्यक कार्यक्रम आहे. आणि त्यामुळे मुक्त व दूर शिक्षण पद्धत ही देऊ केली आहे. म्हणूनच हे शैक्षणिक साहित्य वापरणाऱ्या मैत्रीपूर्ण व लवकर आत्मसात होईल अशी मनोरंजक व आकर्षक होईल याची आम्ही विशेष काळजी घेतली आहे.

हे सर्व साहित्य आकर्षक व तुमच्या गरजेप्रमाणे तयार करणाऱ्या सर्व तज्ञ व्यक्तींचे आभारी आहे. मला आशा आहे की हे साहित्य तुम्हाला आवडेल आणि तुम्ही ते आत्मसात कराल.

राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्थेच्या वतीने आपणास शुभेच्छा देते की तुमचे भावी आयुष्य उज्वल व यशस्वी होवो.

**डॉ. एस.एस.जेना**

अध्यक्ष (एनआयओएस)

# संचालकांचा अभिप्राय

प्रिय विद्यार्थ्यानों,

राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्थेची विद्यालयीन शाखा तुमच्या महत्त्वाच्या गरजा व आवश्यक तत्प्रमाणे नेहमीच नवीन कार्यक्रम आरण्याचा प्रयत्न करते. माध्यमिक पातळीवरील अभ्यासक्रमातील सर्व विषयांची उजळणी आम्ही करीत आहोत. देशातील इतर शैक्षणिक मंडळाच्या बरोबरीने हा अभ्यासक्रम आणण्यासाठी आम्ही शिक्षण मंडळाचा आणि विविध राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा सर्व विषयांसाठी सल्ला घेतला. राष्ट्रीय अभ्यासक्रम मांडणी ही राष्ट्र ीय सल्लागार मंडळाचे शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण विभागाने विकसित केली आहे व ती संदर्भग्रंथ म्हणून ठेवली आहे. बहुव्यापक व तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर आम्ही असा अभ्यासक्रम तयार केला आहे की जो कार्यक्रम आणि आपल्या जीवनातील विविध स्थितींशी संबंधीत व (सुलभ) साधा असेल. आपल्या देशातील प्रमुख शिक्षणतज्ञ यामधे गुंतलेले आहेत आणि त्यांच्या मार्गदर्शनानुसार आम्ही हा अभ्यासक्रम पुन्हा तयार करून अद्ययावत केला आहे.

ह्याचवेळी आम्ही शैक्षणिक साहित्याकडेही बघीतले. ह्या अभ्यासक्रमातून जुने व अप्रचलित माहिती काढून टाकली आहे आणि त्यामध्ये नवीन व समर्पक गोष्टी साहित्याचा समावेश केला आहे आणि हा अभ्यासक्रम आकर्षक व सगळ्यांना आवडेल असा तयार करण्यासाठी आम्ही प्रयत्न केला आहे.

मला आशा आहे की हे नवीन साहित्य, जे आता तुमच्या हातात आहे ते मनोरंजक आणि उत्तेजक असे वाटते. यामध्ये अधिक सुधारणा करण्यासाठी काही सूचना असतील तर त्या आनंदाने स्विकारल्या जातील.

तुमच्या सुखी व यशस्वी भविष्यासाठी माझ्या शुभेच्छा आहेत.

(डॉ. कुलदीप अगरवाल)
संचालक (शैक्षणिक)

# आपल्याशी हितगुज

**प्रिय विद्यार्थी मित्रहो**

नुकतेच तुम्ही तुमचे ध्येय मिळविण्यासाठी पहिली पायरी घतली आहे. पुष्कळदा सुरू कुठलीही सुरुवात करणे ही फार कठीण गोष्ट आहे. तरीही जेव्हा तुम्ही सुरुवात करता तेव्हा तुम्हाला तुमच्याबद्दलच (छान) चांगले वाटते आणि त्यात सुधारणा करून तुम्ही जितके उत्तम बनु शकता तितके उत्तम होता. ह्या तुमच्या व्यक्तीगत वाढीसाठी, तुमच्या असे लक्षात येईल की तिथे भरपूर माहिती, ज्ञान व हुशारी मिळविण्यासारखे खूप काही आहे, त्याच बरोबर तुमच्या स्वत:बद्दल, इतरांबद्दल, जीवनाबद्दल आणि ज्या गोष्टी तुमच्या आसपास आहेत त्याबद्दल पूर्ण ज्ञान मिळते. (परिचय होतो.) तर आनंदाने ह्या शिक्षणाच्या प्रवासाला आपण सुरुवात करू या.

पूर्ण जगामधे शिक्षण पद्धतीमधे एकूण प्रवेशामधे आणि उद्दिष्टांच्या दृष्टीने बरेच बदल होत आहेत. तुमच्या अधिक फायद्यासाठी ने जीवनकौशल्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने साहित्य अधिक संपन्न करण्याचा पुढाकार घेतला आहे. आम्ही, फक्त तुम्हाला शिक्षणाचे सामर्थ्य द्यायचे नाही तर पण तुमची व्यक्तीगत व सामाजिक पात्रतासुद्धा वाढवण्याची आमची दूरदृष्टी आहे. सर्व विषयांच्या माहितीबरोबरच तुम्हाला ताण व तणाव यांचा सुद्धा सामना करता आला पाहिजे. तुमच्यामधे बरोबर की चूक, चांगले की वाईट, ह्यातील फरक ओळखण्याची क्षमता असली पाहिजे आणि तसेच तुमच्या जीवनातील कारकिर्दीविषयी योग्य निर्णय घेण्याची क्षमता असावी. ही संस्था तुम्हाला आव्हानात्मक स्थितीशी सामना करण्याच्या कौशल्यासाठी तयार करण्याकरिता प्रयत्न करीत आहे आणि अशा संधी निर्माण करते की जेणे करून तुम्ही अशा स्थितीमध्ये तुमचे स्वत:चे व समाजाचे नुकसान न करता तर्कशुद्ध, संवेदनशील आणि सकारात्मक मार्गाने त्याला प्रतिसाद देऊ शकाल.

NIOS ने ह्याकरिता अशी पद्धत वापरली आहे की ज्यामुळे जीवनकौशल्ये कोणत्याही आधाराशिवाय कोणत्याही विषयाचे समाधान देऊ शकतात तुमच्यासारख्या राष्ट्रीय मुक्त विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी हे साहित्य आहे; हे "एक छापील शिक्षकच आहे;" हे तुमच्याच जीवनातील अनुभवाच्या आधारीत लिहिलेले आहे.

नुसते माहीत असणे पुरेसे नाही; ती माहिती उपयोगात आणली पाहिजे. नुसती इच्छा असणे पुरेसे नाही. आपण काही कारणे आवश्यक आहे.

हे अभ्यासाचे साहित्य वाचताना इतर अनेक कृतीही सापडतील ज्यामधे पाठाच्या मधे मधे अंतर्गत प्रश्नही असतील. ते प्रश्न सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करा. ह्या कृती तुम्हाला शिकण्याची व त्याचा सराव करण्याची संधी देण्याच्या दृष्टीने काळजीपूर्वक तयार केल्या आहेत. तुमचे शिक्षण अधिक चांगले होण्यासाठी व त्याचा विस्तार करण्यासाठी हे अंतर्गत प्रश्न तुम्हाला मदत करण्याचे यंत्र आहे. जीवन कौशल्ये ही अशी क्षमता आहे की ती प्रत्येकामध्ये असतेच; पण ती क्षमता वाढविण्यासाठी दक्षतेने सतत प्रयत्न केले पाहिजेत. ह्यातील पाठाचा अभ्यास करताना काही अधिक प्रयत्न न करतासुद्धा तुमच्या जीवन कौशल्याचा विकास होतो. आता तुम्ही पुढाकार घेणारे वाटसरू आहात आणि आमचा हा प्रयत्न यशस्वी करण्यात तुम्ही महत्त्वाची भूमिका करीत आहात.

आपल्यातील क्षमतेच्या सर्व गोष्टी केल्या तर, आपण स्वत:लाच चकीत करू.

प्रिय विद्यार्थ्यांनो, तुम्ही ह्या देशातील करोडो किशोरवयीन मुलांपैकी एक आहात. तुम्ही ह्या देशाचे भविष्य आहात. तुमच्यामधे अशी अंतर्गत क्षमता आहे की तुम्ही गर्दीमधे उभे रहाल आणि अधिक शोभून दिसाल. तुमच्या भूमिकेतील तुम्ही कशाची प्रशंसा कराल? पुढारीपणा / नेतृत्व संप्रेषण, कल्पकता, मनाची जागरुकता व लोकांशी तुमचे संबंध, ह्या सर्व क्षमतेमुळे तुम्ही सर्व गर्दीमधे उठून दिसता. म्हणूनच तुमच्या हातातील विषयाचा उच्च शिक्षीत होण्यासाठी खूप कष्ट करा. त्याचबरोबर तुमच्या व्यक्तीमत्वाच्या इतर बाबींचाही विकास करण्याचा प्रयत्न करा.

मला आशा आहे हे कि हे जीवनकौशल्याचे संपन्न साहित्य तुम्हाला बक्षिस देणारे आणि तुमच्या दैनंदिन जीवनात मदत करणारे असे वाटेल. हे जीवन कौशल्याचे संकलन करण्याचा उद्देश म्हणजे अनुकूल व सकारात्मक विचार करणे भावना व तुमच्यातील वागणूक ही हळूहळू तुमच्या मनात भरण्याचा आहे.

**अशीमा सिंग**
योजना समन्वयक
(किशोर शिक्षण योजना)
asheemasingh@nios.ac.in

# आपल्याशी हितगुज

**प्रिय विद्यार्थी मित्रांनो,**

माध्यमिक स्तरावरील सामाजिकशास्त्र या विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्थान आपले स्वागत करीत आहे. या अभ्यासक्रमाची दोन पुस्तके आहेत. पहिल्या पुस्तकामध्ये इतिहास व भूगोल हे विषय आहेत. तर दुसऱ्या पुस्तकामध्ये राज्यशास्त्र हा विषय आहे. समाजशास्त्रामध्ये मानवी समूहाचा अभ्यास केला जातो. मानवी समुहाची उत्क्रांति कशी झाली याची माहिती आपणास मिळते. जगभरातील मानवी संस्कृतींचा माहितीपट आपल्या समोर उलगडला जातो. या पुस्तकामध्ये प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन जगाची तसेच भारताची ही माहिती दिलेली आहे. भारतावर ब्रिटिश राजवटीचा झालेला परिणाम, त्यामुळे झालेले सामाजिक बदल आणि भारतीयांनी ब्रिटिश राजवटीला केलेला विरोध यासंबंधी तपशीलवार माहिती आपणास अभ्यासावयास मिळेल.

यानंतरच्या पाठातून आपणास भूगोल या विषयामधील सर्व संकल्पनांचा आणि माहितीचा परिचय करून दिला आहे. या पाठातून तुम्हला निसर्ग, पर्यावरण, साधनसंपत्तीचे स्त्रोत आणि मानवी उत्क्रांती यांच्यामधील परस्परसंबंधांचा उलगडा होईल. आपल्या जीवनकौशल्य पद्धती पर्यावरण संतुलन राखण्यास कशा उपयोगी पडतात याची माहिती आपणास मिळेल. पाठामध्येच आपल्यासाठी काही उपक्रम दिले आहेत. एखाद्या विषयाची माहिती गोळा करणे, एखाद्या घटनेचा सर्वांगीण अभ्यास करणे, समस्यांची उकल करणे यासारखे उपक्रम दिलेले आहेत. हे उपक्रम विषय अधिक चांगल्या तऱ्हेने समजावा यासाठी उपयुक्त आहेत. तसेच आपली वैचारिक पातळी उंचविणे, संपर्क कौशल्य वाढविणे आणि यासारखी अनेक कौशल्ये विकसित करण्यासाठीसुद्धा उपक्रमांचा उपयोग होईल. हे उपक्रम समजावून घ्या आणि ते पार पाडण्यासाठी पुरेसा वेळ काढा. ज्यायोगे आपले अनुभवविश्व आणि आयुष्य समृद्ध होण्याला मदत होईल.

हे पुस्तक आपल्याला केवळ परीक्षेसाठीच उपयोगी पडणार नसून ते आपल्याला आदर्श नागरिक बनण्यासाठीसुद्धा उपयुक्त ठरेल.

या पुस्तकाबाबतीत काही अडचण आली किंवा कोणतीही शंका आली तरी त्यावाबत आमच्याशी आवश्य संपर्क साधा. अभ्यासक्रमाबाबतच्या आपल्या प्रतिसादाची आम्ही वाट पाहत आहोत.

**श्रीमती तरुण पुनिया**
शैक्षणिक अधिकारी (भूगोल)
राष्ट्रीय मुक्त विद्यालय
शिक्षण संस्थान, नोईडा (उत्तर प्रदेश)

**डॉ. चुन्नु प्रसाद**
शैक्षणिक अधिकारी (राज्यशास्त्र)
राष्ट्रीय मुक्त विद्यालय
शिक्षण संस्थान, नोईडा (उत्तर प्रदेश)

**डॉ. अझमत नूरी**
शैक्षणिक अधिकारी (इतिहास)
राष्ट्रीय मुक्त विद्यालय
शिक्षण संस्थान, नोईडा (उत्तर प्रदेश)

# पाठयपुस्तक कसे वापराल ?

अभिनंदन, तुम्ही स्वत:च शिकण्याचे आव्हान स्विकारले आहे. प्रत्येक पायरीला NIOS तुमच्या बरोबर आहे आणि तज्ञाच्या गटाच्या मदतीने हे साहित्य तुम्हाला लक्षात ठेऊन इग्लीशमधे विकसित केले आहे. ह्या पुस्तकाचे स्वरूप स्वतंत्रपणे अभ्यास करण्याकरिता तयार केले आहे. ह्या पुस्तकाचे स्वरुप स्वतंत्रपणे अभ्यास करण्याकरिता तयार केले आहे. ह्यामधील दिलेल्या सूचना तुम्ही जर पाळल्यात तर ह्यामधून तुम्हाला जास्तीत जास्त चांगले ज्ञान मिळेल व ह्यामधे वापरलेले समर्पक व ठळक मुख्य मुद्दे तुम्हाला योग्य मार्गदर्शन करतील.

**शिर्षक :** ह्यामध्ये कशाचा समावेश केला आहे त्याची माहिती देईल ते वाचा. (त्याचे वाचन करा.)

**ओळख :** हे तुम्हाला त्या पाठाची ओळख करून देईल आणि ह्या पाठाचा आधीच्या पाठाशी काय संबंध असेल ते सांगेल.

**उद्दिष्टे :** हा पाठ वाचल्यानंतर ते तुमच्या शिकण्याचा काय परिणाम होईल याचे विधान असते. तुम्ही तो परिणाम मिळविणे अपेक्षित आहे म्हणून ते वाचा आणि तपासा की तो परिणाम तुम्ही मिळवला आहे.

**शब्दकोश :** तयार संदर्भ मिळविण्यासाठी

**नोट्स टिपण :** प्रत्येक पानावर कडेच्या समासामधे मोकळी जागा ठेवली आहे, त्यामध्ये तुम्ही महत्त्वाचे मुद्दे लिहून ठेवू शकता किंवा टिपण तयार करू शकता.

**आता आपण करू या :** ह्या साहित्याची कल्पना नीट समजावण्यासाठी काही विशिष्ठ कृती दिल्या आहेत.

**आता आपण ऐकू या :** काही ऐकण्याच्या कृती ह्यामध्ये दिल्या आहेत. त्या तुमची ऐकण्याची क्षमता विकसीत करण्यासाठी दिल्या आहेत.

**आतर आपण बोलू या :** ही कृती तुमचे संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी दिली आहे. सूचना दिलेल्या सूचनेप्रमाणे प्रामाणिकपणे ह्याचा सराव करा.

**अंतर्गत प्रश्न :** खूप लहान उत्तरे असलेले, स्वत:च तपासण्यासारखे प्रश्न ह्याच्या प्रत्येक भागात विचारले आहेत, पाठाच्या शेवटी ह्या प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. तुमची प्रगती तपासून घेण्यासाठी याची मदत होईल. ते प्रश्न तुम्ही सोडवा. यशस्वीपणे ते पूर्ण केले तर तुम्हाला ठरविता येईल की पुढच्या पाठाकडे वळायचे की पुन्हा तोच पाठ परत शिकायचा.

**आता आपण व्याकरण शिकूया :** भाषा शिकण्याचा प्रमुख व महत्त्वाचा भाग म्हणजे व्याकरण हे आवश्यक ती माहिती देतानाच तुमची क्षमता वाढविण्यास ही उपयोगी ठरते.

**आता आपण लिहू या :** तुमचे लिखाणाचे कौशल्य अधिक उत्कृष्ट होण्यास हे लिहिणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक पाठाच्या प्रत्येक मुद्यामुळे (प्रश्नोत्तरामुळे) लिहिण्याची संधी तुम्हाला मिळते. परिणामकारक व सर्वबाजूने लिहिण्याचे कौशल्य साधण्यासाठी लिखाणाच्या कृतीचा सराव करा.

**तुम्ही काय शिकलात? :** ह्यामध्ये पाठातील सर्व महत्त्वाच्या मुद्द्यांचा सारांश दिला असतो. ह्याची उजळणी करण्यास आणि सारांश तयार करण्यास मदत होईल. तुम्ही त्यामध्ये तुमचे स्वत:चे मुद्दे घातलेत तर त्याचे स्वागतच होईल.

तुम्हाला हे माहित आहे का ?

**चाचणी परीक्षेचे प्रश्न :** हे दिर्घ व लघु प्रकारचे प्रश्न असून ते तुम्हाला पाठातील प्रकरण समजून घेण्यास व त्याचा सराव करण्याची संधी देते.

**तुम्हाला माहीत आहे काय? :** ह्या चौकोनी रकान्यात ठळकपणे या विषयाची अतिरिक्त माहिती दिलेली असते. हे चौकोनी रकाने फार महत्त्वाचे असून त्याकडे विशेष लक्ष द्यावे. ते तुमचे मूल्यांकन करण्यासाठी नसून तुमचे सामान्य ज्ञान वाढविण्यासाठी उपयुक्त आहेत.

**उत्तरे :** तुम्ही तुमच्या प्रश्नांची उत्तरे किती बरोबर लिहिली आहेत हे माहीत करण्यासाठी ह्या उत्तरांचा उपयोग होतो.

**वेब साईट :** ह्या वेबसाईटमुळे तुमच्या शिक्षणात वाढ करण्यास मदत होते. आवश्यक ती माहिती त्या पाठाच्या विषयात समाविष्ट केली असते, आणि तुम्ही आणखी जास्त माहिती मिळविण्यासाठी याचा संदर्भ घेऊ शकता.

# अभ्यासघटक

## १

**विभाग - १**

**जग आणि भारत-समग्र इतिहास मानवी समाजाची उत्क्रांती**

१ प्राचीन जग

२ मध्ययुगीन जग

३ आधुनिक जग - १

४ आधुनिक जग - २

५ भारताच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक घटकांवर ब्रिटिश राजवटीचे परिणाम (१७५७-१९५७)

६ वसाहतकालीन भारतातील धार्मिक व सामाजिक चळवळी

७ ब्रिटिश राजवटीला जनतेचा विरोध

८ भारतीय राष्ट्रीय चळवळ

**विभाग - २**

**भारत नैसर्गिक पर्यावरण, साधन संपत्ती आणि प्रगती**

९ भारताची प्राकृतिक रचना

१० हवामान

११ जैव विविधता

१२ भारतीय शेती

१३ वाहतूक व संदेशवहन

१४ लोकसंख्या : आपली सर्वोच्च संपदा

## २

**विभाग - ३**

**सद्यस्थितीतील कार्यरत लोकशाही**

१५ भारतातील संविधानात्मक मूल्ये आणि राजकीय व्यवस्था

१६ मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये

१७ भारत-कल्याणकारी राज्य

१८ स्थानिक सरकार व त्यांचे प्रशासन

१९ राज्य शासन व्यवस्था

२० केंद्रशासन

२१ राजकीय पक्ष आणि दबाव गट

२२ लोकशाही प्रक्रियेतील जनतेचा सहभाग

**विभाग- ४**

**सद्यस्थितीतील भारत-समस्या आणि उद्दिष्टे**

२३ भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने

२४ राष्ट्रीय एकात्मता आणि धर्मनिरपेक्षवाद

२५ सामाजिक, आर्थिक विकास आणि दुर्बल गटांचे सवलीकरण

२६ पर्यावरणाचा ऱ्हास आणि आपत्ती व्यवस्थापन

२७ शांतता आणि सुरक्षा

# अनुक्रमणिका


**विभाग - ३ सद्यस्थितीतील कार्यरत लोकशाही**

| पाठ क्र. | पाठाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|
| १५ | भारतातील संविधानात्मक मूल्ये आणि राजकीय व्यवस्था | १ |
| १६ | मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये | २३ |
| १७ | भारत-कल्याणकारी राज्य | ४३ |
| १८ | स्थानिक सरकार व त्यांचे प्रशासन | ५६ |
| १९ | राज्य शासन व्यवस्था | ७९ |
| २० | केंद्रशासन | ९४ |
| २१ | राजकीय पक्ष आणि दबाव गट | १२० |
| २२ | लोकशाही प्रक्रियेतील जनतेचा सहभाग | १४४ |

**विभाग - ४ सद्यस्थितीतील भारत-समस्या आणि उद्दिष्टे**

| पाठ क्र. | पाठाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|
| २३ | भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने | १६५ |
| २४ | राष्ट्रीय एकात्मता आणि धर्मनिरपेक्षवाद | १९१ |
| २५ | सामाजिक, आर्थिक विकास आणि दुर्बल गटांचे सबलीकरण | २०८ |
| २६ | पर्यावरणाचा ऱ्हास आणि आपत्ती व्यवस्थापन | २३२ |
| २७ | शांतता आणि सुरक्षा | २४८ |

# *Awards Won by NIOS*

Several projects have been implemented by the NIOS to tap the potential of Information and Communication Technology (ICT) for promoting of Open and Distance Learning (ODL) system. The Ni-On project of NIOS won the National Award for e-governance and Department of Information and Technology, Govt. of India. In further recognition of its On-line initiatives and best ICT practices, the NIOS received the following awards:

## NIOS WINS National Award for e-Governance 2008-09



Silver icon for Excellence in Government Process Re-engineering, Instituted by Government of India Department of Administrative Reforms and Public Grievances & Department of Information Technology.

## NIOS receives NCPEDP MPHASIS Universal Design Awards 2012




National Institute of Open Schooling (NIOS) has been awarded THE NCPEDP - MPHASIS UNIVERSAL DESIGN AWARDS 2012 instituted by National Centre for Promotion of Employment for Disabled People. The award was given by **Sh. Mukul Wasnik, Hon'ble Minister for Social Justice and Empowerment, Govt. of India** on 14th August, 2012. NIOS has been selected for its remarkable work done for the learners with disabilities through ICT by making its web portal www.nios.ac.in completely accessible for such learners.

## The Manthan Award South Asia & Asia Pacific 2012




The Manthan Award South Asia & Asia Pacific 2012 to recognize the best ICT practices in e-Content and Creativity instituted by Digital Empowerment Foundation in partnership with World Summit Award, Department of Information Technology, Govt. of India, and various other stakeholders like civil society members, media and other similar organisations engaged in promoting digital content inclusiveness in the whole of South Asian & Asia Pacific nation states for development. The award was conferred during **9th Manthan Award Gala South Asia & Asia Pacific 2012 at India Habitat Centre on 1st Dec. 2012.**

१५

# भारतातील संविधानात्मक मूल्ये आणि राजकीय व्यवस्था

शिलाँगमधील एक शाळेत इ. १९ वीमध्ये शिकणाऱ्या मोनाने तिला अनेक दिवसांपासून पहलेला एक प्रश्न आपल्या शिक्षकांना विचारला. तिने विचारले, "सर, वृत्तपत्रांमध्ये आणि टी. व्ही.वरील बातम्यांमध्ये अमेरिकेच्या राष्ट्रपतींचा उल्लेख अनेकदा होतो पण अमेरिकेच्या पंतप्रधानांचा मात्र नाही. असे का?" शिक्षक त्यावर म्हणाले, "तू अगदी योग्यरित्या तो फरक हेरला आहेस. असे असण्याचे कारण हे आहे की अमेरिकेचे सरकार त्यांच्या स्वत:च्या घटनेवर आधारलेले आहे. एखाद्या देशातील राजकीय संस्था निर्माण करणे आणि कार्यरत करवून घेणे या संदर्भातील तरतुदी त्या देशाचे संविधान करत असते. वस्तुत: एखाद्या देशाच्या राजकीय व्यवस्थेच्या सर्व बाजूंची व्याख्या संविधानातच करते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे संविधान काही अशी घटनात्मक मूल्ये धारण करते जी त्या देशाच्या राजकीय व्यवस्थेचा गाभा बनतात. ही मूल्ये केवळ शासनालाच नव्हे तर नागरिक आणि समाजालासुद्धा मार्गदर्शन करतात." मोनाप्रमाणेच तुम्हालासुद्धा भारतीय संविधानाविषयी आणि राजकीय व्यवस्थेविषयी प्रश्न असू शकतील जसे की, संविधानातील मूल्ये कोणती? भारतीय राजकीय व्यवस्थेचे स्वरूप काय? भारताला संघराज्यात्मक पद्धती का म्हटले जाते? येथे संसदीय शासनपद्धती आहे असे का म्हणतात? इ. आपण या प्रश्नांची या पाठात चर्चा करू.

## उद्दिष्टे :

हा पाठ वाचून झाल्यावर तुम्हाला खालील गोष्टी लक्षात येतील.

- संविधान ही एक जिवंत संहिता आणि मूलभूत कायदा कशी आहे याचे स्पष्टीकरण करणे.
- घटनेच्या सरनाम्याचे विश्लेषण करून त्यातील गाभातत्त्वे कोणती हे निश्चित करणे.
- भारतीय घटनेची गाभाभूत घटनात्मक मूल्ये जी घटनेच्या वैशिष्ट्यातून व्यक्त झाली आहेत त्यांची योग्यता ओळखणे.
- भारतीय संघराज्य पद्धती आणि संसदीय शासनपद्धती यांच्या स्वरूपाचे परीक्षण करणे.

## १५.१ भारताचे संविधान

आपण भारतीय संविधानासंदर्भातील चर्चेने सुरुवात करुया पण त्याआधी एक प्रश्नाचे उत्तर द्यायला हवे. संविधान (राज्यघटना) या संज्ञेचा अर्थ काय?

### १५.१.१ संविधानाचा / राज्यघटनेचा अर्थ

संविधान ही संज्ञा तुम्ही अनेकदा ऐकली असेल. ती अनेक संदर्भात वापरली जाते जसे एखाद्या राज्याचे वा राष्ट्राचे संविधान, एखाद्या संघटनेचे संविधान, एखाद्या क्रीडा संस्थेचे संविधान, बिर्नसरकारी संघटना (NGO) चे संविधान, एखाद्या कंपनीचे संविधान इ. म्हणजे या संज्ञेचा सर्व संदर्भामध्ये समान अर्थ होतो का? नाही. सर्व सामान्यत: संविधान म्हणजे नियमांचा संच, ज्याने एखाद्या संघटनेच्या, संस्थेच्या किंवा कंपनीच्या रचनेची व कारभारची व्याख्या व नियमन केले जाते. राज्य किंवा राष्ट्राच्या संदर्भात मात्र जेव्हा या संज्ञेचा उपयोग करतात तेव्हा संविधान हे मूलभूत तत्त्वांचा, प्राथमिक नियमांचा आणि प्रस्थापित संकेतांचा (म्हणजे मानक / दाखले) संच ठरते. राज्यासंदर्भातील विविध पैलूंचा निर्देश, व्याख्या आणि नियमन संविधान करते. राज्याच्या कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ आणि न्यायव्यवस्ता या तीन घटकांखाली येणाऱ्या सर्व प्रमुख संस्थांची संरचना, अधिकार, आणि कार्ये संविधान ठरवते. नागरिकांचे हक्क आणि स्वातंत्र्य त्याचप्रमाणे नागरिकांमधील परस्परसंबंध आणि त्यांचे राज्य आणि शासनाचे संबंध संविधानच सुनिश्चित करते.

संविधान लिखित किंवा अलिखित असू शकते, पण त्यात त्या भूप्रदेशाचा मूलभूत कायदा समाविष्ट असतो. ते सर्वोच्च आणि अंतिम अधिसत्ता असते. त्याच्याशी विसंगत कोणतीही कृती वा निर्णय हा घटनाबाह्य आणि बेकायदेशीर ठरतो. अधिसत्तेचा दुरुपयोग टाळण्यासाठी संविधान शासनाच्या अधिकारांवर मर्यादा घालते. ते एक स्थितीशास्त्र नव्हे तर जिवंत संहिता ठरते. कारण बदलत्या परिस्थितीशी जुळून घेण्यासाठी त्यात आवश्यक तेव्हा घटनादुरुस्ती करावी लागते. त्यातील लवचिकतेमुळे त्याला जनतेच्या बदलत्या आकांक्षा, काळाच्या गरजा आणि सामाजिक बदलांशी जुळवून घेणे शक्य होते.


**? तुम्हास हे माहित आहे का ?**

इतर लोकशाही राष्ट्रांपेक्षा वेगळी अशी ब्रिटनची राज्यघटना / संविधान अलिखित म्हणून ओळखले जाते. ते बहुतांशी, अलिखित आणि संहितीकरण न झालेले आहे. अमेरिकन किंवा भारतीय संविधानाप्रमाणे ते संपूर्णपणे लिहिले गेले नाही. ही दोन्ही संविधाने लिखित संविधाने आहेत.

### १५.१.२ भारतीय संविधान

तुम्ही भारतीय संविधानाचा दस्ताऐवज पहिला आहे का? तुम्हाला मुखपृष्ठावर दाखवलेले चित्र ओळखता आले? तुम्ही ते पाहिले असेल किंवा तशी संधी मिळाली तर तुम्हाला पटेल की तो एक प्रदीर्घ दस्ताऐवज आहे. वस्तुत: भारतीय संविधान हे सर्वात प्रदीर्घ असे लिखित संविधान आहे. ते एका प्रतिनिधीक संस्थेने तयार केले. जीला संविधान समिती / घटनासमिती म्हणतात. त्यातील बहुतांश सदस्य स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होते. त्यांना आदरपूर्वक, 'संविधानकर्ते' असे म्हणतात. घटना

निर्मितीच्या प्रक्रियेवर पुढील घटकांचा मोठा प्रभाव होता. (अ) प्रदीघ स्वातंत्र्य लढ्यातून उद्‌भवलेल्या आकांक्षा (ब) ब्रिटिश राजवटीत घडलेले घटनात्मक आणि राजकीय बदल (क) गांधीवाद या नावाने प्रसिद्ध असणाऱ्या महात्मा गांधींच्या कल्पना आणि विचार. (ड) राष्ट्राचा सामाजिक सांस्कृतिक युगधर्म इ) इतर लोकशाही देशांमधील संविधानाच्या कार्यपद्धतीचा अनुभव २६ जानेवारी १९५० रोजी संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली आणि तेव्हापासून हा दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा होतो.




आकृती १५.१

## तुम्हास हे माहित आहे का ?

घटनासमितीने ९ डिसेंबर १९४६ पासून घटना बनविण्यास प्रारंभ केला. डॉ. राजेंद्र प्रसाद यांची ११ डिसेंबर १९४६ रोजी अध्यक्ष म्हणून निवड झाली. डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकरांची मसुदा समितीच्या अध्यक्षपदी निवड झाली. घटनासमितीचे कामकाज २ वर्षे ११ महिने १८ दिवसांच्या काळात पार पडले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटनानिर्मिती पूर्ण झाली आणि घटना समितीने भारतीय संविधानाचा मसुदा मंजूर केला.

भारतीय संविधान भारतीय राज्यव्यवस्थेच्या मूलभूत उद्दिष्टांसह सर्व पैलूंचा अर्थ स्पष्ट करते. त्यात पुढील संदर्भात तरतुदी आहेत. अ) भारतात समाविष्ट असणारे भूप्रदेश ब) नागरिकत्व क) मूलभूत हक्क ड) मार्गदर्शक तत्वे आणि मूलभूत कर्तव्ये इ) केंद्र, राज्य आणि स्थानिक शासनसंस्थांची संरचना आणि कार्यपद्धती फ) राज्यव्यवस्थेचे इतर अनेक पैलू. भारत हे एक सार्वभौम, लोकशाही, समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून घोषित केले आहे. सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी, त्याचप्रमाणे नागरिक आणि राज्याचे संबंध निर्धारित करण्यासाठीच्या तरतुदी त्यात आहेत.

## उपक्रम १५.१

ग्रंथालयात अथवा इंटरनेटवर भारतीय संविधानाची प्रत पहा. तुमच्या जवळपास एखादी स्वयंसेवी संस्था क्रीडा संघटना, विद्यार्थी संघटना, शिक्षक संघटना अथवा इतर सामाजिक / सांस्कृतिक संस्था शोधा. त्यांच्याकडे त्यांच्या घटनेची मागणी करून ती पहा.

यातील एखादी घटना आणि भारतीय राज्यघटना यांची तुलना करा. त्यातील फरकांसंदर्भात थोडक्यात लिहा.

## पाठ्यांशावरील प्रश्न १५.१

१. संविधानाचा अर्थ काय?

**२. गाळलेल्या जागा भरा.**

१) भारतीय संविधान हे ............. संविधान आहे.



टिपा



२) भारतीय संविधान ............... ने तयार केले.

३) भारतीय संविधान हे जिवंत संहिता आहे कारण त्यात ................ करावी लागते.

४) २६ जानेवारी हा ............ म्हणून दावर्षी साजरा करतात. कारण संविधान ................ रोजी लागू झाले.

## १५.२ संविधानात्मक मूल्ये :

कोणत्याही देशाचे संविधान हे अनेक उद्दिष्टांची पूर्तता करते. नागरिक म्हणून ज्या प्रकारच्या राष्ट्रात राहण्याची आपण आकांक्षा करतो त्याची पायाभूत आदर्श मूल्ये ते ठरवून देते. विशिष्ट समजूती असणाऱ्या विविध समुदायांचे मिळून असे बहुधा एक राष्ट्र बनते, त्या सर्वांचे सर्वच बावतीत एकमत होईल असे नाही. संविधान हा एकमत झालेली तत्त्वे, नियम आणि प्रक्रियांचा संच असतो. यातूनच सामाजिक वाटचालींचा आणि राष्ट्रीय शासनाचा आधार तयार होतो. केवळ शासनप्रकार नव्हे तर राष्ट्रीय आदर्शांचाही यात समावेश होतो. भारतीय संविधानाची काही विशिष्ट गाभा मूल्ये आहेत. जी घटनेचा आत्मा विविध कलमे तसेच तरतुदींमधून व्यक्त करतात. पण तुम्हाला मूल्य या शब्दाचा अर्थ माहीत आहे का? कदाचित तुम्ही लगेचच उत्तर द्याल की, सत्य अहिंसा, शांतता, सहकार्य, प्रामाणिकपणा, आदर आणि प्रेमळपणा ही मूल्ये आहेत. अशी आणखीही अनेक सांगता येतील. सामान्य माणसाच्या भाषेत सांगायचे तर मानवी समाजाच्या अस्तित्वासाठी बाळगण्याजोगे आणि पालन करण्याजोगे जे काही असते ते म्हणजे मूल्य, भारतीय संविधानात अशी सर्व मूल्ये आहेत, ती वैश्विक, मानवी आणि आधुनिक काळाची लोकशाही मूल्ये आहेत.

### उपक्रम १५.२

खालील दिलेल्या शबदांची यादी वाचा. त्यापैकी ज्यांना तुम्ही स्वत:साठी मूल्य मानता असे सहा शब्द निवडून ते दिलेल्या रकान्यात लिहा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रेरणा | ज्ञान | साहस | मैत्री | प्रेम | सृजनशीलता |
| आनंद | यश | उत्साह | झोपणे | संपत्ती | महत्त्वाकांक्षा |
| स्फूर्ती | प्रसिद्धी | शांतता | सौंदर्य | आवड / ध्येय | |

**घटनात्मकमूल्ये आणि भारतीय राज्य व्यवस्था**

| | |
|---|---|
| १) | ४) |
| २) | ५) |
| ३) | ६) |

या सहापैकी तुम्हाला भावणारी दोन सर्वोच्च मूल्य निवडा आणि ती निवडली याची दोन कारणे लिहा.

**माझे सर्वोच्च मूल्य :** ______________________

**कारणे**

१ : ______________________

२ : ______________________

तुमचे मूल्य तुमचा विचार आणि वर्तमानवर प्रभाव टाकते असे तुम्हाला वाटते का? उदाहरणार्थ अहिंसेवर विश्वास असणारी व्यक्ती आपल्या कृतीत अहिंसक असण्याचा प्रयत्न नेहमी करते.

### १५.२.१ संविधानात्मक मूल्ये आणि घटनेचा सरनामा :

या साहित्याच्या सुरुवातीला छापलेला भारतीय राज्यघटनेचा सरनामा वाचलात? वर नमूद केल्याप्रमाणे संविधानात्मक मूल्य संपूर्ण घटनेत व्यक्त होतातच पण सरनाम्यातून घटनेची मूलभूत तत्त्वे आणि पायाभूत तत्त्वज्ञान अभिव्यक्त होते. कोणत्याही घटनेचा सरनामा तिच्या मार्गदर्शक तत्त्वांचा परिचय करून देणारं संक्षिप्त विधान असते. सरनाम्यात व्यक्त केलेली मूल्ये संविधानाची उद्दिष्टे आहेत. ती पुढीलप्रमाणे : सार्वभौमत्व, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, भारतीय राज्याचे प्रजासत्ताक स्वरूप, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवी प्रतिष्ठा, आणि भारताची एकता आणि एकात्मता. या मूल्यांची आपण चर्चा करूया.

१. **सार्वभौमत्व :** तुम्ही सरनामा वाचला असेल. त्यात भारत हे सार्वभौम, समाजवादी धर्म निरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक राज्य असे घोषित केले आहे. सार्वभौम असणे म्हणजे संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य आणि सर्वोच्च अधिसत्ता असणे होय. अर्थात भारत हा अंतर्गतदृष्ट्या शक्तीशाली आणि बाह्य दृष्टीने नियंत्रणमुक्त आहे. कोणत्याही परकीय (व्यक्ती किंवा राष्ट्र च्या हस्तक्षेपाशिवाय भारत स्वत:चे निर्णय गेऊ शकतो आणि त्यास कोणतेही अंतर्गत आव्हान नाही. आंतरराष्ट्रीय समुदायात यामुळे आपल्याला एका राष्ट्राचा दर्जा आणि प्रतिष्ठा प्राप्त होते. संविधानाने सार्वभौमत्व कोणापाशी आहे याचा स्पष्ट निर्देश केला नसला तरी ‘आम्ही भारताचे लोक’ ... हा सरनाम्यातील उल्लेख हे दर्शवतो की सार्वभौमत्व भारतीय जनतेत आहे. याचाच अर्थ असा की घटनात्मक संस्था आणि शासनाच्या शाखांचे अधिकार जनतेकडून मिळवण्यात आलेले आहेत.

२. **समाजवाद :** पारंपारिक भारतीय समाजात सामाजिक आणि आर्थिक विषमता अंतर्भूत होत्या हे तुम्हाला माहीत असेल. यामुळेच सर्व विषमतांचा अंत करून सामाजिक बदल आणि परिवर्तन घडवून आणण्याचे उद्दिष्ट असणारे समाजवादाचे मूल्य घटनेत आणि संविधानाने शासनव्यवस्था तसेच जनतेला सर्व क्षेत्रात नियोजित आणि शिस्तबद्ध सामाजिक विकास घडवून आणण्याचे निर्देश दिले आहेत. सत्ता आरि संपत्तीचे केंद्रीकरण टाळण्यास सूचित केले आहे. मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वांच्या प्रमाणात विषमता दूर करण्यासंबंधीच्या विशिष्ट तरतुदी आहेत.

टिपा

**तुम्हास हे माहित आहे का ?**

मार्गदर्शक तत्त्वांमधील पुढील तरतुदी समाजवादाचा पुरस्कार करतात.

कलम ३८(२) नुसार राज्य प्रामुख्याने व्यक्तीव्यक्तीतील, घराघरांतील, वेगवेगळ्या ठिकाणी राहणाऱ्या, वेगवेगळ्या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींच्या उत्पन्नातील आणि दर्जा, सुविधा, संधी यांतील विषमता नष्ट करण्याचा कसोशीने प्रयत्न करेल.

कलम ३९ नुसार (अ) स्त्रीपुरुष नागरिक आपल्या उपजीवीकेची पुरेशी साधने मिळवू शकतील असे योग्य राज्यशासन अनुसरेल. (ब) राज्यातर्फे भौतिक साधन संपत्तीची मालकी व नियंत्राचे धोरण अशाप्रकारे आखले जाईल की त्यामुळे लोककल्याणाला ते उपयुक्त ठरेल. (क) अर्थ व्यवस्थेच्या कार्यवाहीतून संपत्ती व उत्पादनाच्या साधनांचे केंद्रीकरण होणार नाही याची राज्यशासन दक्षता येईल.

३) प्रत्ये स्त्रीपुरुषाला समान कामासाठी समान वेतन दिले जाईल, असे धोरण राज्यशासन अनुसरेल.

३. **धर्मनिरपेक्ष :** भारतात जगातले बहुतेक सर्व प्रमुख धर्म नांदतात असे जेव्हा कोणी म्हणतो तेव्हा आपण संतुष्ट होतो. या बहुलतेच्या एक वा दोनापेक्षा अधिक अनेक) संदर्भात धर्म निरपेक्षता हे एक श्रेष्ठ संविधानात्मक मूल्य मानले जाते. त्याचा अर्थ हा की आपला देश कोणत्याही एका धर्माच्या किंवा धार्मिक समजुतींच्या आधारे चालत नाही. असे असले तरी भारतीय राज्य हे धर्मविरोधी नाही. सर्व नागरिकांना धर्म प्रचार, प्रसार आणि पालनाचा अधिकार दिलेला आहे. त्याचप्रमाणे राज्याला स्वत:चा असा धर्म नाही. धर्माधारित भेदभावास संविधानाने मज्जाव केला आहे.

४. **लोकशाही :** लोकशाही हे सरनाम्यात मूल्य म्हणून व्यक्त होते. शासनप्रकार म्हणून सत्ता ही लोकांकडून येते. देशाचे शासन जनता निवडते आणि हे निर्वाचित प्रतिनिधी जनतेप्रती उत्तरदायी असतात. भारतीय जनता त्यांना विविध पातळ्यांवर सरकारचे घटक होण्यासाठी प्रौढ मताधिकार पद्धतीने (म्हणजे एक माणूस एम मत) निवडते. लोकशाहीमुळे समाजात स्थैर्य आणि सातत्यपूर्ण विकास घडून येतो त्याचप्रमाणे शांततामय राजकीय बदल घडतात. लोकशाही एकावाजूला मतभेद व दुसऱ्या बाजूला सहिष्णूतेला प्रोत्साहन देते. कायद्याचे राज्य नागरिकाचा अदेय असा मूलभूत अधिकार, न्यायालयीन स्वातंत्र्य, मुक्त आणि निर्भय निवडणूका, वृत्तपत्र स्वातंत्र्य इ. महत्त्वाच्या तत्त्वांवर लोकशाही आधारीत आहे.

५. **प्रजासत्ताक :** भारत हे केवळ एक लोकशाही राष्ट्र नव्हे तर एक प्रजासत्ताक आहे. प्रजासत्ताकाचे सर्वात महत्त्वाचे प्रतिक म्हणजे राष्ट्रप्रमुखांचे पद ' राष्ट्रपती. यांची निवड राजेशाहीप्रमाणे वंशपरंपरेने नव्हे तर निवडणुकीने होते. या मूल्याने लोकशाही अधिक बळकट होते कारण कोणताही भारतीय नागरिक राष्ट्राच्या प्रमुखपदी निवड होण्यास पात्र ठरू शकतो. या तरतूदीतून राजकीय समतेचा संदेश जातो.

६. **न्याय :** केवळ लोकशाही व्यवस्थेत राहणे म्हणजे सर्वांना न्याय मिळाला असे नाही. तुमच्या लक्षात आले असेलच. अशी अनेक प्रकरणे तुम्ही पाहिली असतील जिथे सामाजिक आर्थिकच नव्हे तर राजकीय न्यायही नाकारला गेला. म्हणूनच घटनाकारांनी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाचा संविधानात्मक मूल्य म्हणून समावेश केला. भारतीय नागरिकांना दिलेल्या राजकीय स्वातंत्र्याचा उपयोग सामाजिक आर्थिक न्यायावर आधारलेली नवीन सामाजिक व्यवस्था निर्माण करण्यात झाला पाहिजे यावरही भर देण्यात आला. प्रत्येक नागरिकाला न्याय मिळावयास हवा. हे न्याय आणि समताधिष्ठीत समाजाचे मूल्य घटनेच्या सर्वोच्च मूल्यांपैकी एक आहे.

७. **स्वातंत्र्य :** सरनाम्यात विचार, अभिव्यक्ती, विश्वास, धर्म आणि पूर्जाऊर्जेचे स्वातंत्र्य मूलभूत मूल्य मानले आहे. सर्व समुदायांच्या प्रत्येक सदस्याला याबात शाश्वती द्यायला हवी. हे करण्याचे कारण असे की स्वतंत्र आणि नागरी अस्तित्वास आवश्यक असणारे किमान हक्क असल्याशिवाय लोकशाही व्यवस्थेचे स्वप्न साकार होत नाही.

८. **समता :** इतर सर्व मूल्यांइतकेच समता हे महत्त्वाचे मूल्य आहे. प्रत्येक नागरिकाला त्याच्या सर्वोच्च प्रगतीसाठी संधी आणि दर्जाची समता घटनेने बहाल केली आहे. मानव म्हणून प्रत्येकाला प्रतिष्ठेचं स्वत्व आहे, याचा उपभोग घेण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या विषमतेला मज्जाव आहे. सरनाम्यात विशेषत्वाने उल्लेखीलेले समतेचे मूल्य म्हणूनच विशेष महत्त्वाचे आहे.

९. **बंधुता :** सर्व भारतीयांच्या बंधुभावाचा पुरस्कार करणारे बंधुत्वाचे मूल्य सरनाम्यात नमूद केलेले आहे. बंधुतेशिवाय भारतासारखा बहुलताप्रधान समान विभागला गेल्यासारखा आहे. त्यामुळे स्वातंत्र्य, न्याय आणि समतेच्या मूल्यांना अर्थ येण्यासाठी बंधुतेच्या मूल्यावर सरनामा विशेष भर देतो. केवळ समाजाच्या विविध स्तरांमधील अस्पृश्यतेचे निराकरण करून बंधुत्व येणार नाही तर सर्व प्रकारच्या सांप्रदायिक, पर्याय अश्या भारताच्या एकतेच्या आड येणाऱ्या भेदभावात्मक भावनांचे निराकरण केल्याने ते साध्य होईल.

१०. **व्यक्तीची प्रतिष्ठा :** बंधुत्वाचा पुरस्कार व्यक्तीला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा प्रस्थापित केल्याशिवाय लोकशाही कार्य करू शकत नाही. त्यामुळे लोकशाही प्रक्रियांमध्ये सर्व व्यक्तींचा समान सहभाग शक्य होतो.

११. **राष्ट्रीय एकता आणि एकात्मता :** वर पाहिल्याप्रमाणे बंधुत्वाचे मूल्य आणखी एका महत्त्वपूर्ण मूल्याचा पुरस्कार करते ते म्हणजे, राष्ट्रीय एकता आणि एकात्मता राष्ट्राचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी हे आवश्यक आहे. त्यामुळे देशाच्या सर्व रहिवाश्यामध्ये एकता जोपासण्यावर भर दिला गेला आहे. राष्ट्रीय एकता आणि एकात्मतेचे रक्षण आणि संगोपन सर्व नागरिकांनी कर्तव्यभावनेने करावे अशी संविधानाची अपेक्षा आहे.

१२. **आंतरराष्ट्रीय शांती आणि न्याय आंतरराष्ट्रीय व्यवस्था :** हे मूल्य सरनाम्यात नसले तरी घटनेच्या इतर तरतुदींमधून प्रदर्शित होते. भारतीय संविधान राज्याला (अ) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेचा पुरस्कार करणे. (ब) राष्ट्रराष्ट्रांमध्ये न्याय्य आणि सन्मानपूर्ण संबंध प्रस्थापित करणे (क) आंतरराष्ट्रीय कायदा आणि करारासंबंधी आदर वाढवणे. (ड)

वाटाघाटींनी आंतरराष्ट्रीय कलह सोडवणे; यासंबंधी निर्देश देते. भारताच्या हितासाठी या मूल्यांचे रक्षण केले जावे. शांती आणि न्याय्य आंतरराष्ट्रीय व्यवस्था भारताच्या विकासास पूरक ठरेल.

१३. **मूलभूत कर्तव्ये :** आपल्या संविधानाने नागरिकांसाठी काही कर्तव्ये सूचित केली आहेत. ही कर्तव्ये नागरिकांनी पाळावयाची आहेत मात्र ती मूलभूत हक्कांप्रमाणे न्यायालयात प्रविष्ट होऊ शकत नाहीत. पण नागरिकांनी त्याचे पालन करणे अपेक्षित मूलभूत कर्तव्याचे विशेष महत्त्व आहे कारण त्यातून देशभक्ती, राष्ट्रवाद, मानवतावाद, पर्यावरणवाद लिंगसमभाव, वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सा, वैयक्तीक व सामूहिक उत्कृष्ट गुणांचे प्रगटीकरण होते.

## पाठ्यांशावरील प्रश्न १५.२

१. मूल्य या संज्ञेचा अर्थ काय?


२. सरनाम्यात आलेली दोन महत्त्वपूर्ण संविधानात्मक मूल्ये कोणती? तुम्ही ही मूल्ये महत्त्वपूर्ण का मानता?

३. ब स्तंभातील विधानांबरोवर अ स्तंभातील मूल्ये / उद्दिष्ट्ये यांच्या योग्य जोड्या लावा.

| अ मूल्ये / उद्दिष्टे | ब विधान |
|---|---|
| १) सार्वभौमत्व | अ) सर्व प्रकारची विषमता संपवण्यासाठी सामाजिक बदलांचा पुरस्कार |
| २) समाजवाद | ब) लोकांचे, लोकांकडून, लोकांसाठीचे राज्य |
| ३) धर्मनिरपेक्षतावाद | क) कोणत्याही भेदभावाशिवाय समान वागणूक |
| ४) लोकशाही | ड) राष्ट्राची प्रमुख ही निर्वाचित व्यक्ती असते. |
| ५) समता | इ) धर्मपालन प्रचार आणि आचाराचे स्वातंत्र्य |
| ६) स्वातंत्र्य | फ) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा आणि राष्ट्रांमध्ये सन्मानपूर्ण संबंध |
| ७) बंधुता | ग) संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य आणि सर्वोच्च अधिसत्ता |
| ८) आंतरराष्ट्रीय शांतता व न्याय आंतरराष्ट्रीय व्यवस्था | ह) विचार, अभिव्यक्ती आणि स्वातंत्र्य |
| ९) प्रजासत्ताक | ई) सामुदायिक बंधुभाव |

## उपक्रम १५.३

संविधानात्मक मूल्ये किंवा उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली आहेत याबाबत पाच लोकांची मते गोळा करा. ह्या व्यक्ती तुमचे वर्गमित्र, परिवाराचे सदस्य अथवा आजूबाजूचे सामाजिक कार्यकर्तेही असू शकतात. पुढील तक्त्याच्या एका स्तंभात संविधानात्मक मूल्ये / उद्दिष्टे नमूद केली आहेत.





प्रत्येकासंदर्भात जे काही साध्य करण्यात आले आहे. त्या मतानुसार दहापैकी गुण प्रत्येक व्यक्तीने द्यायचे आहेत.

| क्र. | संविधानात्मक मूल्ये / उद्दिष्ट | किती प्रमाणात साध्य झाले १० पैकी गुण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | व्यक्ती १ | व्यक्ती २ | व्यक्ती ३ | व्यक्ती ४ | व्यक्ती ५ |
| १ | सामाजिकआर्थिक न्याय | | | | | |
| २ | विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य | | | | | |
| ३ | दर्जा आणि संधीची समानता | | | | | |
| ४ | राष्ट्रीय एकता आणि एकात्मता | | | | | |
| ५ | अस्पृश्यता निराकरण | | | | | |
| ६ | आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा | | | | | |
| ७ | प्रौढ मताधिकार | | | | | |
| ८ | भारतीय जनतास्थित सार्वभौमत्व | | | | | |
| ९ | न्याययंत्रणेचे स्वातंत्र्य | | | | | |

मिळालेल्या प्रतिक्रियांच्या आधारे कोणती उद्दिष्ट्ये / मूल्ये सर्वात अधिक व कोणती सर्वात कमी प्रमाणात साध्य झालीत ते शोधून काढा. त्याची कारणे शोधाण्याचा प्रयत्न करा.

### १५.२.२ संविधानाची मूल्ये आणि महत्त्वाची ठळक वैशिष्ट्ये :

उल्लेखित घटनेच्या सरनाम्यात समाविष्ट झालेल्या मूल्यांवरील चर्चेतून हे स्पष्ट होते की, भारतीय लोकशाहीच्या यशस्वी वाटचालीसाठी आवश्यक असणारी ही मह्वाची मूल्ये या सरनाम्यात सांगण्यात आली आहेत. या मूल्यांच्या महत्त्वाच्या बाबतचे तुमचे मत अधिक दृढ होते. जेव्हा भारतीय घटनेची सर्व वैशिष्ट्ये हा सरनामा व्यक्त करतो.

राज्य घटनेची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. **लिखित संविधान :** आधी नमूद केल्याप्रमाणे भारतीय संविधान हे सर्वात प्रदीर्घ असे लिखित संविधान आहे. त्यात एक सरनामा, ३९५ कलमे, २२ भाग, १२ परिशिष्टे आणि ५ पुरवण्या समाविष्ट आहेत. राजकीय व्यवस्थेचे स्वरूप आणि सरकारच्या शाखांची संरचना आणि कार्ये ठरवणाऱ्या मूलभूत कायद्यांची ती संहिता आहे. एक लोकशाही राष्ट्र म्हणून भारताची दृष्टी त्यातून व्यक्त होते. त्यात नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये सांगितली गेली आहेत. त्याचबरोबर संविधानात्मक मूल्येदेखील प्रदर्शित झाली आहेत.

२. **परिदृढता आणि परिवर्तनशीलतेचे अनोखे मिश्रण :** एखाद्या लिखित संहितेत बदल घडवून आणणे सोपे नसते हे आपल्याला दैनंदिन आयुष्यात लक्षात येते. सामान्यत: लिखित

घटना या परिदृढ असतात. त्यांच्यात वारंवार बदल करणे सोपे नसते. घटनादुरुस्तीसाठी संविधानात विशिष्ट प्रक्रिया ठरवून दिलेली आहे. ब्रिटनसारख्या अलिखित घटनेत घटनादुरुस्ती सामान्य कायदानिर्मिती प्रक्रियाद्वारे घडते. ब्रिटिश संविधान हे परिवर्तनशील आहे. अमेरिकेसारख्या लिखित संविधानात बदल घडवणे कठीण असते. ती परिदृढ राज्यघटना आहे. भारतीय राज्यघटना मात्र ब्रिटिश घटनेप्रमाणे परिवर्तनशील अथवा अमेरिकन संविधानाप्रमाणे परिदृढ नाही. त्यातून सातत्य आणि बदलाचा प्रत्यय येतो. भारतीय राज्यघटनेत घटनादुरुस्ती करण्याच्या तीन पद्धती आहेत. त्यातील काही तरतुदी, संसदेच्या साध्या बहुमताने तर काही तरतुदी विशेष बहुमताने दुरुस्त करता येतात. काही घटनादुरुस्तींसाठी मात्र संसदेच्या विशेष बहुमतासह घटकराज्यांची मंजूरी लागते.


३. **मूलभूत अधिकार आणि कर्तव्य :** तुम्ही मूलभूत हक्क या संज्ञेशी सुपरिचित असालच. बऱ्याचदा वृत्तपत्रांमध्ये वा टी. व्ही. वर हा उल्लेख येतो. भारतीय संविधानाने त्यांच्या स्वतंत्र प्रकरणात समावेश केला आहे. ज्याचा उल्लेख बऱ्याचदा राज्यघटनेचा विवेक असा केला जातो. मूलभूत अधिकार हे मनमानी आणि सर्वकष सत्तावापरापासून नागरिकांचे रक्षण करतात. संविधान सर्व व्यक्तींना राज्याविरुद्ध तसेच इतर व्यक्तींविरुद्ध अधिकारांची शाश्वती देते. संविधान अल्पसंख्यांना बहुसंख्याकांविरुद्ध अधिकार देते. याव्यतिरिक्त राज्यघटनेत काही तरतूदी आहेत. ज्या मूलभूत कर्तव्ये निर्देशित करतात, ती मूलभूत अधिकारांप्रमाणे न्यायालयप्रविष्ट नाहीत. या मूल्यांमधून घटनेतील मूलभूत तत्वे व्यक्त होतात.

४. **मार्गदर्शक तत्वे :** मूलभूत अधिकारांबरोबरच राज्यघटनेत राज्याच्या धोरणाच मार्गदर्शक तत्वे असाही एक भाग आहे. हे भारतीय संविधानाचे अनोखे वैशिष्ट्\य आहे. व्यापक सामाजिर्कआर्थिक सुधारणा आणि जनतेतील दारिद्र्य कमी करण्यासाठी तसेच सामाजिक भेदभाव दूर करण्यासाठी, राज्याने कायदे व संस्था निर्माण कऱ्यासाठी राज्याला ती मार्गदर्शन करतात. ह्या तरतुदी एका कल्याणकारी राज्याच्या स्थापनेसाठी कटिबद्ध आहेत, हे तुम्ही भारत एक कल्याणकारी राज्य या पाठात शिकालच.

५. **एकात्म न्यायव्यवस्था :** भारतीय संविधानाने अमेरिकेसारख्या संघराज्यात्मक देशांपेक्षा वेगळी अशी एकात्म न्यायव्यवस्था निर्माण केली आहे. सार्वोच्च न्यायालय राष्ट्रीय पातळीवर, उच्च न्यायालये राज्य पातळीवर आणि दुय्यम न्यायालये जिल्हावस्थानिक पातळीवर असली तरी न्यायालयांची एकच उतरण आहे. त्यात सर्वोच्च स्थानी सर्वोच्च न्यायालय आहे. सर्व नागरिकांना समान पद्धतीने न्याय मिळावा म्हणून ही एकसंघ न्यायव्यवस्था उभारली आहे. त्याउपरही घटनात्मक तरतुदी न्यायालयीन स्वातंत्र्य सुनिश्चित करतात. न्यायव्यवस्था ही कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाच्या प्रभावापासून मुक्त आहे.

६. **एकेरी नागरिकत्व :** भारतीय संविधानात एकेरी नागरिकत्वाची तरतूद आहे. तुम्हाला त्याचा अर्थ माहीत आहे? त्याचा अर्थ असा आहे की प्रत्येक भारतीय हा भारतात कोठेही जन्माला असला किंवा निवास करत असला तरी तो भारताचाच नागरिक आहे.

७. **प्रौढ मताधिकार :** समता आणि न्याय ही मूल्ये आणखीन एका घटनात्मक वैशिष्ट्यातून झळकतात. प्रत्येक भारतीयाला एका विशिष्ट वयाला पोहोचल्यानंतर (सध्या १८ वर्षे)





मताधिकार प्राप्त होतो. धर्म, वंश, जात, लिंग, कुळ जन्मस्थान यासारख्या निकषांवर कोणताही भेदभाव करता येत नाही. याला प्रौढ मताधिकार म्हणतात.

८. **संघराज्य पद्धती आणि संसदीय शासनपद्धती :** भारतीय संविधानाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते संघराज्य पद्धत आणि संसदीय शासनपद्धतीचा अवलंब करते. आपण त्याची विस्ताराने चर्चा करू. एका गोष्टीची दखल घेणे गरजेचे आहे की संघराज्य पद्धतीतून राष्ट्राची एकता आणि एकात्मता यासारखी घटनात्मक मूल्ये तर सत्तेचे विक्रेंद्रीकररासारखे महत्त्वाचे मूल्य दिसून येते. संसदीय शासनपद्धतीतून लोकांमध्ये जबावदारी आणि सार्व भौमत्व असल्याचे दिसते. त्याचे भागातत्वच हे आहे की कार्यकारी मंडळ हे लोकप्रतिनिधींनी मिळून बनलेल्या कायदेमंडळाला जबावदार असते.

## पाठ्यांशावरील प्रश्न १५.३

१. भारतीय संविधानाची मुख्य वैशिष्ट्ये कोणती?

२. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अंतर्भूत असलेली घटनात्मक मूल्ये कोणती?

३. भारतीय न्यायव्यवस्थेला एकात्म न्यायव्यवस्था का म्हणतात?

४. एकेरी नागरिकत्वाचा अर्थ काय?

## १५.३ भारतातील संघराज्य पद्धती :

आपण पाहिले असेल की जेव्हाही भारतीय राज्यव्यवस्थेचे स्वरूप, रचना किंवा प्रक्रियांची चर्चा होते तेव्हा भारत हे संघराज्य आहे असे म्हटले जाते. जगात सर्वसाधारणपणे दोन प्रकारची राज्ये आहेत. संपूर्ण देशासाठी एकच शासन असणारी राज्ये, ती राज्ये एकात्म राज्ये म्हणून ओळखली जातात. उदा. UK हे एकात्म राज्य आहे. या व्यतिरिक्त संयुक्त संस्थाने (US) किंवा कॅनडा सारख्या देशांमध्ये दोन स्तरांवर सरकारे असतात. केंद्र आणि राज्य या व्यतिरिक्त संघराज्य पद्धतीत आणखी तीन वैशिष्ट्ये असावी लागतात. (१) लिखित संविधान (२) केंद्रीय आणि राज्यसरकारांमध्ये सत्ता विभाजन (३) न्यायालयाचे घटनेचा अन्वयार्थ लावण्याबावत सर्वोच्च स्थान. भारतीय संघराज्यात ही वैशिष्ट्ये आहेत पण काही फरकही आहेत. त्यांची पाहणी करू या.

### १५.३.१ भारतीय संघ राज्य पद्धतीचे गुणधर्म :

१. **द्विस्तरीय सरकार :** भारतीय घटनेने शासनाचे दोन स्तर निर्माण केले हे तुम्हाला माहीत असेल. पूर्ण देशासाठी एक असे संघसरकार (केंद्रसरकार) आणि सर्व घटकराज्यांसाठी राज्यसरकारे याखेरीज तुम्ही तिसऱ्या स्तराबद्दलही ऐकले असेल. स्थानिक पातळीवर नागरी व ग्रामीण शासन या व्यवस्थेचा तिसरा स्तर मानले जाते. पण घटनात्मकदृष्ट्या भारतीय व्यवस्था द्वितीय आहे. स्थानिक शासनसंस्थांना घटनेद्वारा वेगळे अधिकार मिळत नाहीत कारण त्या संबंधित राज्यसरकारांच्या अखत्यारित येतात.







२. **सत्तेचे विभाजन :** इतर संघराज्यांप्रमाणेच संघ व राज्यसरकारांचा स्वतंत्र घटनात्मक दर्जा आणि कार्यक्षेत्र आहे. घटनेत दोन्ही सरकारांच्या अधिकारांचा स्पष्ट उल्लेख आहे. जेणेकरून त्यांनी आपापले अधिकार आपल्या कक्षेत वापरावे आणि कोणीही आपल्या मर्यादा ओलांडून दुसऱ्याच्या कृतींवर अतिक्रमण करू नये. या विभाजनाचा उल्लेख तीन सूचीमध्ये केलेला आहे. संधी सूची, राज्य सूची आणि समवर्ती सूची संघसूचीत राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचे, संरक्षण, रेल्वे यासारखे ९७ विषय आहेत. राज्यसूचीत स्थानिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असे सामाजिक स्वास्थ, पोलिसयंत्रणा, स्थानिक शासनसंस्था, इ. ६६ विषय आहेत. समवर्ती सूचीत शिक्षण, वीज, कामगार संघटना, सामाजिर्कआर्थिक नियोजनासारखे ४७ विषय आहेत. या सूचीवर दोन्ही सरकारांचे समवर्ती अधिकारक्षेत्र आहे. या तिन्ही याद्यांव्यतिरिक्तच्या सर्व विषयांसंबंधी संघसरकारला अधिकार घटना देते. यालाच शेषाधिकार अधिकार म्हणतात. सत्ताविभाजनासंबंधीचे वाट घटनात्मक तरतुदींच्या आधारावर न्यायव्यवस्था सोडवते.

३. **लिखित घटना :** भारताकडे लिखित स्वरूपांची व सर्वोच्च अशी राज्यघटना आहे. दोन्ही सरकारांसाठी तो अधिकारस्रोत आहे. राज्य व संघसरकार त्याच्या अधिकारक्षेत्रात स्वतंत्र आहेत. घटनेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिची परिदृढता. ती जरी अमेरिकन घटनेइतकी परिदृढ नसली तरी फार परिवर्तनीयही नाही. त्यात या दोहोंचा मिलाफ आहे.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

अमेरिकन राज्यघटनेत २१ जून १७८८ पासून केवळ २७ घटनादुरुस्त्या झाल्या आहेत तर भारतीय घटनेत २६ जानेवारी १९५० ते २०१३ या काळात ९८ घटनादुरुस्ती झाल्या आहेत.

४. **न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य :** घटनेचा अन्वयार्थ लावण्यासाठी व तीचे पावित्र्य जपण्यासाठी स्वतंत्र न्यायव्यवस्था हे भारतीय संघराज्याचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. संघ व राज्यांमधील विवाद सोडवण्याचे मूळ अधिकारक्षेत्र सर्वोच्च न्यायालयाचे आहे. घटनात्मक तरतुदींशी विसंगत कायदा ते घटनाबाह्य ठरवू शकते. सत्ताविभाजनासंदर्भातील संघ व राज्य सरकारांमधील घटनात्मक व कायदेशीर खटल्यांचा निकालसुद्धा सर्वोच्च न्यायालय देऊ शकते.

### १५.३.२ प्रबळ केंद्र असणारी भारतीय संघराज्य व्यवस्था :

वरील तरतुदी पाहिल्यावर भारतीय संघराज्यात, संघराज्य पद्धतीची सर्व वैशिष्ट्ये आहेत असे दिसून येते. पण "भारताचे स्वरूप संघराज्याचे पण आता केंद्रीय स्वरूपाचा आहे." हे विधान तुम्ही ऐकले आहे का? भारतीय संघराज्यपद्धतीत प्रबल केंद्रसरकार आहे. स्वातंत्र्याच्या वेळेची परिस्थिती आणि सामाजिक राजकीय संदर्भ लक्षात घेऊन हे जाणीवपूर्वक करण्यात आले होते. भारत हा खंडात्मक पैलू असलेला विस्तीर्ण देश आहेच तसेच अनेक विविधता व सामाजिक बहुलतासुद्धा तेथे आहे. घटनाकारांना असे वाटले की विविधता आणि बहुलता सामावून घेणारी संघराज्यात्मक घटना निर्माण करायला हवी. पण स्वातंत्र्याच्या वेळी भारतासमोर एकता व एकात्मता टिकवण्याचे आणि सामाजिक, आर्थिक, राजकीय परिवर्तन घडवण्याचे आव्हान होते. त्यावेळी भारत केवळ ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या प्रांतामध्येच

टिपा

नव्हे तर ५०० हून अधिक संस्थानांमध्ये विभागलेला होता ज्यांना भारतातील राज्यांमध्ये विलीन करायचे होते. किंवा नवीन राज्ये निर्माण करायची होती. त्यामुळे संघसरकारकडे तसे अधिकार असणे आवश्यक होते.

वस्तुत: केंद्रसरकार हे हेतुपुरस्सर प्रबळ बनविण्यात आले आहे. राष्ट्रीय ऐक्याबरोबरच घटनाकारांना असे वाटले की देशाच्या सामाजिक आर्थिक समस्या राज्यांच्या सहकार्याने एका प्रबळ केंद्रशासनाने हाताळल्या पाहिजेत. दारिद्र्य, निरक्षरता, सामाजिक विषमता आणि संपत्तीची विषमता या काही समस्या होत्या. ज्यांच्यासाठी एकत्रित नियोजन आणि संचलनाची आवश्यकता होती. थोडक्यात एकता आणि विकासाच्या विचारातून घटनाकारांनी प्रबळ केंद्रसरकार निर्माण केले. त्यासंबंधीच्या महत्त्वाच्या तरतुदी पाहुया.

१. घटनेचे पहिले कलम भारतीय संघराज्याचा वेगळेपणा खुणावते. त्यात भारत हा राज्यांचा संघ असेल असे म्हटले आहे. घटनेत कुठेही संघराज्य असा उल्लेख नाही. केंद्रशासनाकडे भारतीय भूप्रदेशावरील एककेंद्री सत्ता आहे. भारतीय राज्याचे अस्तित्व आणि त्याची प्रादेशिक एकात्मता संसदेच्या हाती आहे. संसदेला प्रस्तुत घटकराज्यांतून काही भूप्रदेश वेगळा करून किंवा दोनपेक्षा अधिक राज्ये एकत्र करून नवीन राज्य निर्माण करता येते. तसेच संसद प्रस्तुत राज्यांच्या सीमा अथवा नावेसुद्धा बदलू शकते. मात्र घटनेने काही सुरक्षा तरतुदी केल्या आहेत. केंद्रसरकारने त्यासाठी संबंधित घटकराज्याच्या विधीमंडळाची संमती प्राप्त करणे गरजेचे आहे.

### ? तुम्हास हे माहित आहे का ?

स्वातंत्र्यानंतर अनेक नवीन राज्ये निर्माण केली गेली. सन २000-0१ मध्ये अस्तित्वात असलेल्या राज्यांचे दुभाजन करून तीन नवीन राज्ये निर्माण झाली; मध्यप्रदेशातून छत्तीसगढ, बिहारमधून झारखंड आणि उत्तर प्रदेशातून उत्तराखंड यामागे अनेक कारणे होती. या प्रदेशांमधील मंद विकासदर त्यापैकी एक होय.

२. सत्ताविभाजन हे केंद्रसरकारच्या बाजूने आहे. संघसूचित सर्व कळीचे विषय आहेत. त्याचबरोबर समवर्ती सूचीबाबत घटनेने संघसरकारला प्राधान्य दिले आहे. समवर्ती सूचीतील विषयांवर केंद्र व राज्यसरकारच्या कायद्यात कलह झाल्यास केंद्राचा कायदा परिणामकारक ठरतो. गरज पडल्यास संसद राज्यसूचीतील विषयावरही कायदे करू शकते. राज्यसभेने हा प्रस्ताव पारित करावा लागतो.

३. संघराज्यपद्धतीत दुहेरी न्यायसंस्था अभिप्रेत असते. परंतु भारतात सर्वोच्च न्यायालय शिखरस्थानी असलेली एकात्म न्यायसंस्था आहे.

४. कोणत्याही प्रकारची (राष्ट्रीय, अंतर्गत, आर्थिक) आणीबाणी लागू केली असता. केंद्रसरकार अत्यंत शक्तीशाली बनते. आणिबाणी संघराज्यीय व्यवस्थेचे अतिकेंद्रीत व्यवस्थेत रुपांतर करते. या अवस्थेत संसदेला राज्यसूचीतील विषयांवर कायदे करण्याचे अधिकार प्राप्त होतात. याव्यतिरिक्त कोणत्याही राज्यात वा एखाद्या प्रदेशात अशांतता पसरल्यास केंद्रसरकारला त्या राज्यात / प्रदेशात केंद्रीय दल नियुक्त करता येते.

५. तुम्ही "राज्यपातळीवरील शासन" या पाठात शिकाल की राज्याचे राज्यपाल भारताच्या राष्ट्रपतींद्वारे नियुक्त होतात. म्हणजेच केंद्रसरकारद्वारा त्यांना राज्यात घटनात्मक पेचप्रसंग उभा राहिल्यास राष्ट्रपती राजवटीची शिफारस करण्याचे अधिकार असतात. त्या परिस्थितीत राज्याचे मंत्रीमंडळ बरखास्त होऊन राज्यपाल हे राष्ट्रपतींचे प्रतिनिधी म्हणून राज्यकारभार चालवतात. राज्य विधीमंहळ विसर्जित किंवा स्थगित केले जाते. एरवीसुद्धा राज्य विधीमंडळाने संमत केलेले निघेयक राष्ट्रपतींच्या संमतीसाठी राखून ठेवण्याचा राज्यपालांना अधिकार असतो. यातून केंद्राला राज्याची विधेयके प्रलंबित करण्याचा तसेच त्यांची तपासणी करण्याचा वा नाकारण्याचा अवसर मिळतो.

६. केंद्रशासनाकडे अत्यंत परिणामकारक वित्तीय अधिकार व जबाबदाऱ्या असतात. प्रथमत:, महसूल निर्माण करणारे विषय केंद्राच्या नियंत्रणात असतात. केंद्राकडून मिळणाऱ्या आर्थिक अनुदान व सहकार्यावर राज्ये विसंबून असतात. भारताने स्वातंत्र्यानंतर, जलद आर्थिक विकास आणि प्रगतीचे साधन म्हणून नियोजनाचा स्वीकार केला. यामुळेसुद्धा निर्णयप्रक्रियेचे केंद्रीकरण झाले.

७. केंद्राचे कार्यकारी अधिकार राज्यांहून वरचढ आहेत. केंद्रसरकार राज्यांना सूचना देऊ शकते. भारतात एकसंघ प्रशासन व्यवस्था आहे. भारतीय लोकसेवा संपूर्ण देशासाठी सामाजिक आहेत. त्यातून निवडलेले अधिकारी राज्य प्रशासनात कार्य करतात. त्यामुळे जिल्हाधिकारी वा पोलिस आयुक्त हे केंद्राच्या नियंत्ररात असतात. राज्य त्यांच्यावर शिस्तभंगाची वा बरखास्तीची कारवाई करू शकत नाही.

वरील चर्चेतून हे स्पष्ट होते की केंद्राच्या बाजूला ही व्यवस्था झुकते. राज्यांना केंद्राशी सहकार्य करावे लागते. यातूनच हा वाद उत्पन्न झाला की भारतीय घटनेचे स्वरूप संघराज्यात्म परंतु आत्मकेंद्रिय आहे. घटनात्मक तज्ञ तिला संघ राज्य सदृश्य किंवा अर्ध संघराज्य व्यवस्था असे संबोधतात.

**उपक्रम १५.४**

पुस्तकांतून किंवा इंटरनेटवरून भारताच्या राज्यांची यादी मिळवा आणि त्यांचे निर्मितीवर्ष शोधा.

### १५.३.३ राज्यांसाठी अधिक स्वायत्ततेची मागणी :

भारतीय संघराज्याचा गेल्या सहा दशकांचा इतिहास पाहता असे लक्षात येते की केंद्रीत संघराज्य व्यवस्थेमुळे राज्य व केंद्रातील संबंध नेहमी सलोख्याचे राहिले नाहीत. देशाच्या व राज्याच्या कारभारात अधिक भूमिकेची राज्यांची इच्छा स्वाभाविक आहे, त्यामुळेच राज्यांनी वेळोवेळी अधिक अधिकार आणि स्वायत्तता मागितली आहे. यावर तोडगा काढण्यासाठी प्रशासकीय सुधारणा आयोग्य, सरकारिया आयोग व इतर अनेक आयोगांची नेमणूक केंद्राने केली. सर्वात शेवटचा आयोग सन २०१० मार्च मधील केंद्र राज्य संबंध आयोग होता.

सर्व आयोगांच्या महत्वाच्या शिफारसींचे मर्म हेच सांगते की घटनेच्या मूळ स्वरूपात बदल करणे आवश्यक आहे. कायम स्वरूपाची आंतरराज्य मंडळ गरजेचे आहे. मागास प्रदेश वा क्षेत्रासंबंधी केंद्र

व राज्याला कळकळ असणे आवश्यक आहे. या मागास क्षेत्रांचे आर्थिक विकासाचे कार्य हाती घेतल्यास विभक्ततावादी प्रवृत्तींना आळा घालता येईल. केंद्र व राज्यातले मतभेद परस्पर चर्चेतून सोडवले जावेत. राज्यांकडे अधिक निधी असावा या मागणीला जोर चढला आहे. केंद्र राज्य संबंध सुधारण्यासाठी आर्थिक उदरीकरण आणि घटनात्मक दुरुस्ती सुचविण्यात आल्या आहेत.

## उपक्रम १५.५

गेल्या पाच वर्षांपासून सध्याच्या एका राज्याचा एका प्रदेशातून एका स्वतंत्र राज्याच्या निर्मितीसाठी आंदोलन सुरू आहे. ते राज्य ओळखा आणि या मागणीमागची कारणे शोधा. त्या प्रदेशाच्या राजकीय नेत्यांनी उचललेले एक मोठे पाऊल कोणते? सप्टेंबर २०११ दरम्यान.

## पाठ्यांशावरील प्रश्न १५.४

१. संघराज्यपद्धतीची प्रमुख वैशिष्ट्ये कोणती?

२. "भारताचे स्वरूप संघराज्याचे पण आत्म केंद्रीय आहे." असे का म्हणतात याची दोन कारणे सांगा.

३. घत्तीसगढ, झारखंड आणि उत्तराखंड ही राज्ये २000-0१ मध्ये निर्माण झाली. ती कोणत्या राज्यांतून? त्यामागची कारणे सांगा.

## १५.४ भारतातील संसदीय शासनपद्धती :

केंद्र व राज्य पातळीवरील संसदीय शासनपद्धत हे भारतीय राज्यव्यवस्थेचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. शासनपद्धती दोन प्रकारच्या असतात. अध्यक्षीय आणि संसदीय अध्यक्षीय पद्धतीत शासनाच्या तीन्ही संस्था स्वतंत्र असतात. कार्यकारी व कायदेमंडळात घट्ट नाते नसते. USA मध्ये अध्यक्षीय शासन आहे. परंतु संसदीय पद्धतीत कायदे व कार्यकारी मंडळात दृढ नाते असते. भारतीय घटनाकारांनी ब्रिटिश नमुना स्विकारला. कारण १९४७ पर्यंतची भारतातील यंत्रणा ही ब्रिटिश संसदीय शासनपद्धतीप्रमाणेच होती. भारतात. संसदीय व्यवस्था केंद्र व राज्य या दोन्ही स्तरावर आहे. भारतीय व्यवस्थेत संसदीय पद्धतीची सर्व वैशिष्ट्ये आहे. (१) कायदे व कार्यकारीमंडळाचे दृढ संबंध (२) कार्यकारी मंडळाची कायदेमंडळाप्रति जबावदारी (३) कार्यकारी मंडळात राज्याचे प्रमुख हे नामधारी आणि पंतप्रधान व मंत्रीमंडळ हे खरे कार्यकारी

### १. कायदे व कार्यकारी मंडळाचे दृढ संबंध :

भारतात कायदे व कार्यकारीमंडळ म्हणजे संसद आणि पंतप्रधान व मंत्रीमंडळात दृढ संबंध आहेत. बहुमतप्राप्त पक्ष / आघाडीचा नेताच पंतप्रधान होऊ शकतो. मंत्रीमंडळाचे सर्व सदस्य संसद सदस्य असावे लागतात. केवळ मंत्रीमंडळाच्याच सल्याने राष्ट्रपती दोन्ही सभागृहांचे अधिवेशन बोलवू शकतात तसेच लोकसभा विसर्जित करू शकतात. संसदेचे सर्व निर्वाचित



**लोकसभागृह**

सदस्य राष्ट्रपतींच्या निवडीत भाग घेतात, तसेच दोन्ही सभागृंहानी महाभियोग प्रस्ताव पारित केल्यासच त्यानां पदावरून काढता येते.

२. **कार्यकारीमंडळाची कायदेमंडळाप्रती जबाबदारी :** कार्यकारी मंडळ सामुहिकरित्या लोकसभेस जबावदार असते. म्हणजेच प्रत्येक मंत्र्याची जवाबदारी ही संपूर्ण मंत्रीपरिषदेची जबाबदारी असते. ती राज्यसभेप्रतीसुद्धा जबाबदार असते. दोन्ही सभागृहांना त्यांच्या नियंत्रणाचे अधिकार असतात. प्रश्न व उपप्रश्न विचारणे ् योजना, उपक्रम आणि कारभारासंबंधी याद्वारे ते केले जाते. ते सरकारी प्रस्तावांवर चर्चा करतात. तसेच कारभारावर टीका करतात. स्थगत प्रस्ताव वा लक्षवेधी सूचना मांडतात. मंत्रीपरिषदेचे कोणतेच विधेयक सभागृहाच्या मंजुरीशिवाय कायद्यात रुपांतरीत होत नाही. वार्षिक अंदाजपत्रकसुद्धा संसद पारित करते. वस्तुत: मंत्रीपरिषदेचा कार्यकाळ लोकसभेवर अवलंबून असतो. लोकसभेत अविश्वासदर्शक ठराव संमत झाल्यास परिषदेला राजीनामा द्यावा लागतो.

३. **नामधारी व वास्तविक कार्यकारी** भारतात कार्यकारी मंडळाचे दोन भाग आहेत. नामधारी व वास्तविक राष्ट्रप्रमुख म्हणजे राष्ट्रपती हे नामधारी व औपचारिक कार्यकारी असतात. तत्वत: घटनेने सर्व कार्यकारी अधिकार राष्ट्रतींच्या स्वाधीन केले आहेत. पण प्रत्यक्षात ते यांचा वापर करत नाहीत, ते पंतप्रधान व मंत्रीपरिषद वापरते. परिषद आणि तीच प्रमुख ् पंतप्रधान हे वास्तविक कार्यकारी आहेत. राष्ट्रपती त्यांच्या सल्ल्याशिवाय कृती करू शकत नाहीत.

४. **पंतप्रधानंवास्तविक कार्यकारी :** पंतप्रधान हे संसंदीय कार्यकारीमंडळाचे प्रमुख घटक आहेत. मंत्रीपरीषदेचे सर्व सदस्य पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपतीद्वारे नेमले जातात. खातेवाटप हा पंतप्रधानांचा विशेषाधिकार असतो ते परिषदेच्या बैठकांना संबोधित करतात

तसेच परिषद आणि राष्ट्रपतींमधला दुवा असतात. पंतप्रधान कोणत्याही मंत्र्याला काढू शकतात. त्यांचा राजीनामा म्हणजे संपूर्ण मंत्रीपरिषदेचा राजीनामा असतो.

भारतीय संसदीय पद्धत बरीच समाधानकारकरित्या चालली आहे. राज्यातील शासनव्यवस्था केंद्रीय पद्धतीवरच आधारित आहेत. कार्यकारीमंडळात राज्यपाल आणि मंत्रीमंडळ असते. ज्याचे प्रमुख मुख्यमंत्री असतात. राज्यपाल राज्याचे प्रमुख असतात तर मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ वास्तविक कार्यकारी असतात. द्विगृही विधीमंडळा (विधानसभा व विधानपरिषद) हे काहीच राज्यात आहे बहुतांश राज्यात एकगृही (विधानसभा) विधीमंडळ आहे.

## पाठ्यांशावरील प्रश्न १५.५

१. संसदीय पद्धतीत कार्यकारी व कायदेमंडळात कोणत्या प्रकारे संबंध असतात?

२. भारताचे राष्ट्रपती केवळ नामधारी प्रमुख का आहेत?

३. सामुहिक जबाबदारी म्हणजे काय?

४. मंत्रीमंडळावर संसदेच्या दोन्ही सभागृहांचे नियंत्रण कसे असते?

## आपण काय शिकलो?

- संविधान म्हणजे मूलभूत तत्वांचा, नियमांचा आणि प्रस्थापित संकेतांचा असा संच जो राज्याच्या मुख्य संस्थाची म्हणजे कायदे, कार्यकारी व न्यायमंडळांची व्याख्या नियमन व नियंत्रण करतो. त्यात या संस्थाचे अधिकार व कार्ये, नागरिकांचे हक्क व स्वातंत्र्य, तसेच व्यक्ती व राज्यातील संबंधाचे विवेचन असते.

- भारतीय घटना तीन प्रस्थापित केलेल्या व्यवस्थेची मूलभूत उद्दिष्टे स्पष्ट करते. तिने भारतात एका सार्वभौम, लोकशाही, समाजवादी, धर्मनिरपेक्ष गणराज्याची निर्मिती केली. त्यात सामाजिक बदल घडवून आरण्याच्या तसेच व्यक्ती व राज्यातील संबंध ठरवण्याच्या तरतुदी आहेत.

- प्रत्येक राष्ट्राची जनता अनेक उद्दिष्टे साध्य करते. ती आदर्श घालून देते तसेच नागरिक ज्या प्रकारच्या राष्ट्रात राहू इच्छितात त्याची पायाभरणी करते. शासन व समाजाला वाटचाल करण्यासाठी ज्या तत्त्वांची, नियमांची व प्रक्रियांची गरज असते त्या एकवाक्यता असणाऱ्या तत्त्व, नियम व प्रक्रियांचा संच म्हणून घटना काम करते. यात केवळ शासन प्रकाराचाच नव्हे तर समान आदर्शाचाही समावेश होतो. भारतीय घटनेचीही काही गाभामूल्ये आहेत.

- संविधानात्मक मूल्ये संपूर्ण भारतीय घटनेत दिसून येतात. पण तीचा सरनामा तिची मूलभूत मूल्ये आणि पायाभूत तत्त्वज्ञान धारण करतो. ती म्हणजे सार्वभौमत्व, समाजवाद, धर्म निरपेक्षता, लोकशाही, गणराज्याचे स्वरूप, न्याय, स्वातंत्र्य, समजा, बंधुता, मानवी प्रतिष्ठा आणि राष्ट्रीय एकता व एकात्मता.

- ❖ संविधानात्मक मूल्ये घटनेच्या ठळक वैशिष्ट्यातूनही झळकतात. जसे; लिखित घटना, परिवर्तनशीलता व परिदृढतेचा अनोखा मिलाफ, मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे, मूभलत कर्तव्ये, एकात्म न्यायव्यवस्था, एकेरी नागरिकत्व, प्रौढ मताधिकार, संघराज्यपद्धती, संसदीय शासनव्यवस्था.
- ❖ भारत हे संघराज्य आहे. त्यात लिखित घटना आहे, शासनाचे दोन स्तर आहे; केंद्र व राज्य, केंद्र व राज्यात अधिकारविभाजन तसेच स्वतंत्र न्यायसंस्था आहे. पण हे प्रवळ केंद्र असणारे संघराज्य आहे. घटनेनेच केंद्राला राज्यांहून सशक्त बनवले आहे.
- ❖ भारतात केंद्र व राज्यपातळीवर संसदीय व्यवस्था आहे. राष्ट्रपती हे राष्ट्रप्रमुख व नामधारी कार्यकारी आहेत. पंतप्रधान व मंत्रीपरिद वास्तविक कार्यकारी आहेत. कार्यकारी व कायदेमंडळात दृढ संबंध आहेत व मंत्रीमंडळ सामुहिकरित्या संसदेला जबाबदार आहे.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

**१. थोडक्यात उत्तरे द्या.**

१) सरनामा म्हणजे काय?

२) संविधान म्हणजे काय?

३) भारतीय संविधान कोणी निर्माण केले?

४) प्रौढ मताधिकाराचा अर्थ काय?

**२. उत्तरे द्या.**

१) संविधानाचे महत्त्व स्पष्ट करा.

२) सरनाम्यातील प्रमुख संविधानात्मक मुल्ये कोणती?

३) भारतीय घटनेची ठळक वैशिष्ट्ये कोणती?

४) भारतीय घटनेची कोणतीही तीन संघराज्यात्मक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

५) भारतीय घटना परिवर्तनीय व परिदृढ आहे. कशावरून?

६) भारत स्वरूपाचे संघराज्यात्मक पण चरित्राने केंद्रीय आहे असे का म्हणतात?

७) भारतीय संसदीय शासनव्यवस्थेची चिकित्सा करा.

८) तुमच्या भागात / प्रदेशात होणाऱ्या प्रजासत्ताक दिन समारोहात तुम्ही सहभागी / प्रेक्षक म्हणून सहभागी झाला आहात का? असल्यास त्या समारोहाची ठळक वैशिष्ट्ये सांगा.

९) खाली एका सौदी अरेबियन आणि भारतीय नागरिकाचा संवाद आहे. सौदी नागरिकाचे मुद्दे खाली दिले आहेत. पण भारतीय नागरिकाची उत्तरे दोनदा आली नाहीत म्हणून जागा रिक्त

आहे. या पाठाच्या आधारे आणि सामान्य ज्ञानाच्या आधारे तो संवाद पूर्ण करा. (SA म्हणजे सौदी अरेबिया आणि १ म्हणजे भारतीय)

अ) **SA :** आमच्या देशात परंपरागत राजा राज्य करतो. आम्ही तो बदलू शकत नाही. आमच्याकडे राजेशाही शासन आहे.

**I :** ________________________________

ब) **SA :** आमच्याकडे सौदी अरेबियात, तुमच्यासारखी व्यवस्था नाही कारण आमच्याकडे राजकीय पक्ष नाहीत, निवडणूका नाहीत आणि शासननिर्मितीत लोकांना काही अधिकार नाही. खुद्द प्रसारमाध्यमेसुद्धा राजाला न आवडणारी एखादी गोष्ट दाखवू शकत नाहीत.

**I :** ________________________________

क) **SA :** आमच्या देशात एकच धर्म आहे त्यामुळे, धर्माचे स्वातंत्र्य नाही. प्रत्येक नागरिक मुस्लिमच असावा लागतो.

**I :** ________________________________

ड) **SA :** होय, मुस्लिमेतरांना त्यांचा धर्म पाळण्याची मुभा आहे पण व्यक्तीगत स्वरूपात सार्वनिक नाही.

**I :** ________________________________

ई) **SA :** माझ्या देशात, लिंगाच्या आधारे भेदभाव होतो. स्त्रीयांना पुरुषांसमान मानत नाहीत. त्यांना अनेक वंधनांचा सामना करावा लागतो. एका पुरुषाची साक्ष दोन स्त्रीयांच साक्षीबरोबर मानतात.

**I :** ________________________________

## भारतीयांची मते

१. स्वातंत्र्यानंतर भारतात कोणत्याच राजाने राज्य केले नाही. उलटपक्षी आमच्याकडे जनतेने अप्रत्यक्षरित्या निवडलेले राष्ट्रपती आहेत. भारत हे संसदीय लोकशाही ज्यात लोकप्रतिनिधी म्हणून राजकीय पक्ष मोठी भूमिका बजावतात असे गणराज्य / प्रजासत्ताक आहे.

२. याबाबतीत आम्ही भाग्यवान आहोत. आम्हाला संघटना, पक्ष स्थापनेचा अधिकार आहे. प्रत्येक भारतीय नागरिकाला निवडणूक लढवण्याचा व मताधिकार आहे. याखेरीज प्रसारमाध्यमे त्यांची मते मांडण्यास स्वतंत्र आहेत. जरी भारत हा बहुसांस्कृतिक, बहुभाषिक व बहुधर्मीय देश असला तरी

३. पण आम्ही धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहोत. राष्ट्राला स्वत:चा धर्म नाही प्रत्येक नागरिकाला धर्म स्वातंत्र्य त्या घटनादत्त अधिकार आहे. हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन आणि इतरांना धर्म पालनाचे स्वातंत्र्य आहे.

४. हे विचित्र आहे. आमची घटना कोणताही धर्म स्विकारण्याचा, पाळण्याचा व प्रसार करण्याचा सार्वजनिक स्वरूपाचा अधिकार देते.

५. भारतात घटनेने लिंगभावसमानता मानली आहे, अर्थात वास्तवात आम्हाला बराच पल्ला गाठायचा आहे. स्त्रीयांना क्षेत्रात समान अधिकार आहेत. त्या सर्व प्रकारच्या उद्योर्गव्यवसायात आहेत. त्यांना आरक्षणाचाही लाभ देण्यात आला आहे.

## पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे

### १५.१

१. एखाद्या राज्य वा राष्ट्रसंदर्भात विचार करताना राज्यघटनेचा अर्थ मूलभूत तत्त्वे, नियम आणि प्रस्थापित संकेतांचा संच असा होतो. संविधान राज्याच्या अनेक पैलूंचा निर्देश तसेच त्याचे नियमन, कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ व न्यायमंडळ या राज्याच्या तीन शाखांखाली येणाऱ्या महत्त्वाच्या संस्थांचे अधिकार व कार्ये स्पष्ट करते. त्याचबरोबर नागरिकांचे अधिकार व स्वातंत्र्य तसेच त्यांचे राज्याशी व शासनाशी असणारे संबंध विशद करते.

२. १) सर्वात प्रदीर्घ    २) घटना समिती

३) अद्ययावत ठेवण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे दुरुस्ती करावी लागते.


४) प्रजासत्ताक दिन, २६ जानेवारी १९५0

### १५.२

१. मूल्य म्हणजे ते जे मानवी समाजाच्या अस्तित्वासाठी अत्यावश्यक किंवा धारण करण्याजोगे असते.

२. सरनाम्यात उद्धृत केलेली मूल्ये घटनेची उद्दिष्टे आहेत. ती अशी : सार्वभौमत्व, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, भारताचे प्रजासत्ताक स्वरूप, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, मानवी प्रतिष्ठा आणि राष्ट्रीय एकता व एकात्मता

३. १) ग,
२) अ,
३) ई,
४) ब,
५) क,
६) ह,
७) ई,
८) फ,
९) ड





## १५.३

१. १) लिखित संविधान, २) परिवर्तनीयता आणि परिदृढतेचा अनोखा मिलाफ, ३) मूलभूत हक्क आणि कर्तव्ये, ४) मार्गदर्शक तत्वे, ५) एकात्म न्यायव्यवस्था, ६) एकेरी नागरिकत्व, ७) प्रौढ मताधिकार, ८) संघराज्य पद्धत आणि संसदीय शासनपद्धत.

२. सामाजिक ˆ आर्थिक समता, सामाजिक भेदाभेदांचे निराकरण, आंतरराष्ट्रीय शांतता.

३. राष्ट्रीय पातळीवर सर्वोच्च न्यायलय, राज्यपातळीवर उच्च न्यायालय आणि जिल्हा व निम्न पातळीवर कनिष्ठ न्यायालये असली तरी भातरता एकेरी न्यायव्यवस्था आहे. या उतरणीच्या सर्वोच्च स्थानी सर्वोच्च न्यायालय आहे.

४. याचा अर्थ प्रत्येक भारतीय हा भारताचा नागरिक आहे, त्याच्या जन्मस्थानाचा त्यात संबंध नाही.

## १५.४

१. १) केंद्र व राज्य पातळीवर द्विस्तरीय शासन,

२) अधिकार विभाजन केंद्र व राज्य यांच्यात,

३) लिखित संविधान,

४) न्यायव्यवस्थेचे सर्वोच्च स्थान.

२. १) केंद्रसरकारची भारतीय भूप्रदेशावर एकहाती सत्ता आहे. भारतीय राज्याचे अस्तित्त्व आणि प्रादेशिक एकात्मता संसदेच्या हातात आहे. २) सत्ताविभाजन केंद्राच्या बाजूने आहे. संघसूचीत सर्व कळीचे विषय आहे. ३) सर्वोच्च न्यायालय उच्चतम स्थानी असलेली एकात्म न्यायव्यवस्था भारतात आहे. ४) तीनपैकी कोणतीही आणीबाणी लागू केली असता संघसरकार प्रबळ होते. ५) कोणत्याही आणीबाणीच्यावेळी केंद्रसरकार सर्वशक्तीशाली ठरते व भारत हा जणू एक केंद्रीय देश बनतो. ६) घटनात्मक तरतुदींनुसार केंद्राचे कार्यकारी अधिकार राज्यांपेक्षा श्रेष्ठ आहेत.

३. प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी आवश्यक ती माहिती, पुस्तके, मासिक किंवा इंटरनेटवरून जमा करा.

## १५.५

१. पंतप्रधान प्रमुखस्थानी असलेले कार्यकारीमंडळ आणि संसद म्हणजे कायदेमंडळ यांच्यात दृढ संबंध असतात. मंत्रीपरिषद सामूहिकरित्या संसदेला जबाबदार असते. लोकसभेने मंत्रीमंडळाविरुद्ध अविश्वास ठराव पारित केल्यास त्यांना राजीनामा द्यावा लागतो.

२. राष्ट्रप्रमुख असणारे राष्ट्रपती हे औपचारिक व नाममात्र कार्यकारी असतात. तत्त्वत: घटनेने सर्व कार्यकारी अधिकार राष्ट्रपतींच्या स्वाधीन केले आहेत. पण प्रत्यक्षात ते त्यांचा वापर करीत नाहीत. पंतप्रधान व मंत्रीमंडळ यांचा वापर करतात. पंतप्रधान व मंत्रीमडळ खरे कार्य

टिपा

कारी आहेत राष्ट्रपती मंत्रीमंडळाच्या सल्ल्याशिवाय कृती करू शकत नाहीत. राष्ट्रपतींची निवड संसद सदस्यांच्या समावेश असलेल्या निर्वाचन मंडळामधून होते. संसदेने महाभियोग पारित केल्यास राष्ट्रपतींना पद सोडावे लागते.

३. याचा अर्थ प्रत्येक मंत्र्याची जाबाबदारी ही संपूर्ण मंत्रीमंळाची जबाबदारी असते. एका मंत्रालयावरील टीकेसाठी ही संपूर्ण मंत्रीमंडळ जबाबदार असते.

४. सरकारी धोरणे, उपक्रम व कारभारावर प्रश्न विचारून हे केले जाते. त्यांना स्थगत प्रस्ताव तसेच लक्षवेधी सूचना मांडता येतात. संसदेच्या संमतीशिवाय मंत्रीमंडळाने सादर केलेला कोणतेही विधेयक कायद्यात रुपांतरीत होऊ शकत नाही. वार्षिक अंदाजपत्रकसुद्धा संसद संमत करते.

# १६

# मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये

अलिकडच्या काळात शिक्षणाचा हक्क, माहितीचा अधिकार शांततेचा अधिकार वारंवार वापरला जातो. अनेक वेळा आपल्यालाही अधिकार आणि हक्क आहे, याची जाणीव होत असते. तसेच तुम्हाला कोणीतरी किंवा तुमच्या शिक्षकांनी हेही सांगितलेले असेल की समाजात वावरताना किंवा राष्ट्राच्या आणि मानवतेच्या दृष्टीने काही कर्तव्याचे पालन करावे लागते. परंतु हक्कांबरोबर कर्तव्याचेही पालन करावे लागते याचा विचार केलेला आहे का? कदाचित नसेलही. तुमच्यामधला प्रत्येक जण व्यक्तीगत स्वातंत्र्याचा हक्क मिळवित असतो. लोकशाही राष्ट्रात तर प्रत्येक नागरिकाला हक्काची हमी दिलेली आहे. त्यांनाच आपण मूलभूत हक्क म्हणतो परंतु भारतीय राज्य घटनेत प्रत्येक नागरिकाने आपल्या कर्तव्याचे पालन करणे हेही अपेक्षित आहे. त्यांनाच आपण मूलभूत कर्तव्ये म्हणतो. सदरच्या प्रकरणामध्ये मूलभूत हक्क आणि कर्तव्ये यांची माहिती आहे.

## उद्दिष्टे :

प्रस्तूत पाठ अभ्यासानंतर पुढील गोष्टींची माहिती होईल.

- हक्क आणि कर्तव्य यांचा अर्थ आणि दैनंदिन जीवनातील गरज आणि महत्त्व यांचे चिकित्सक मूल्यमापन
- भारतीय घटनेने दिलेले मूलभूत हक्क त्यांचे महत्व आणि त्यांच्या अपेक्षा व बंधने यांचे परिक्षण
- नुकत्याच समाविष्ठ केलेल्या शिक्षणाचा हक्क याची माहिती
- मूलभूत हक्क व मानवी हक्क यांची तुलना
- मूलभूत हक्कांचा भंग झाल्यास घटनात्मक न्याय मिळविण्यासाठी करावी लागणारी प्रक्रिया आणि
- मूलभूत कर्तव्ये त्यांचे महत्त्व आणि उत्तमप्रकारे त्याचे कायद्याने पालन करण्याची प्रत्येक नागरिकाची जबाबदारी

## १६.१ हक्क आणि कर्तव्ये अर्थ आणि महत्त्व

हक्कांबाबत आपण नेहमीच चर्चा करतो. परंतु हक्क म्हणजे काय? हक्क हे लोकांशी सुसंवाद साधण्याचे नियम असतात. याबाबत समाजात वावरताना काही मर्यादा व बंधनेही असतात. उदा. प्रत्येकाला जगण्याचा अधिकार आहे. याचा अर्थ दुसऱ्याला मारण्याचे स्वातंत्र्य आहे असे नाही. हक्कांची सरळ व्याख्या करता येईल की प्रत्येकाला स्वत:च्या विकासाचा समाजमान्य दिलेला हक्क आहे. स्वातंत्र्य हे कायदेशीर समाजमान्य आणि नैतिक तत्त्वानुसार आहे हे प्रदान करताना त्यामध्ये कायदेशीर चौकट, सामाजिक परिस्थिती आणि नैतिक सिद्धांत आहे. हक्क हे नागरिकांना दिलेले समाजाच्या आणि संस्कृतीचे भक्कम आधार आहेत.

परंतु खऱ्या अर्थाने हक्क हे व्यक्तिगत कर्तव्याचा भाग आहे. कर्तव्य कोणसाठी तरी करण्याची अपेक्षा आहे. मुलांची काळजी घेणे हे पालकाचे कर्तव्य आहे. पालकांसाठी काही करण्याचे तुमचेही कर्तव्य आहे. मुलांना शिकविणे हे शिक्षकाचे कर्तव्य आहे. उत्तमपणे जगण्यासाठी हक्क आणि कर्तव्य ही रथाची दोन चाके आहेत. हक्क आणि कर्तव्ये एकमेकांच्या हातात हात घालून जातात त्यामुळेच आपले जीवन सुरळीत चालते. आपल्यासाठी दुसरे काय करतात ते हक्क तर कर्तव्ये म्हणजे आपण दुसऱ्यासाठी काय करू शकतो ते. हक्कांवर काही बंधने आहेत. दुसऱ्यांच्या हक्कांचा आपण किती सन्मान करतो यावर अवलंबून आहे. म्हणजेच हक्कांमध्ये कर्तव्याची जबाबदारी आहे. सार्वजनिक वाहतूक, आरोग्यसेवा यांचा जसा आपल्याला लाभ मिळाला पाहिजे तसा दुसऱ्यांनाही मिळाला पाहिजे. व्यक्तीगत स्वातंत्र्याचा हक्क आहे. तशी इतरांच्या बाबतीतील हक्कांची पायमल्ली होणार नाही याची काळजी घेणे हे आपले कर्तव्य आहे.

### उपक्रम १६.१

खालील चौकटीमध्ये तुमचे कुटुंब, मित्र व शेजारी याबाबतची हक्क व कर्तव्ये लिहा.

**माझी कर्तव्ये**

| माझे कुटुंब | माझा मित्र | माझे शेजारी |
|---|---|---|
| १) | १) | १) |
| २) | २) | २) |

**माझे हक्क**

| माझे कुटुंब | माझे मित्रपरिवार | माझे शेजारी |
|---|---|---|
| १) | १) | १) |
| २) | २) | २) |

तुमचे हक्क आणि कर्तव्ये यामध्ये काय फरक आहे? ते परस्परांशी संबंधित आहेत असे वाटते का? आणि कसे?

## १६.२ मूलभूत हक्क :

प्रत्येकाच्या व्यक्तिगत विकासासाठी हक्क मिळविता येतात. या हक्कांची मोठी यादीच आहे. समाजासाठी काही हक्क घटनेमध्ये महत्त्वाचे म्हणून समाविष्ठ केलेले आहेत. त्यांना आपण मूलभूत हक्क म्हणतो. यांना मूलभूत हक्क म्हणतो ते दोन कारणांनी एक म्हणजे तो हक्कांना घटनेने हमी दिलेली आहे आणि दुसरे म्हणजे त्याबावत न्याय मागता येतो. कोर्टामार्फत न्याय हक्क म्हणजे या हक्कांची पायमल्ली होत असल्यास या बावत न्यायालयातून दाद मागता येते. या हक्कांवर शासनाने मर्यादा घातल्या तर कोर्टा कडून त्याला थांबविता येईल घटनेच्या तिसऱ्या भागात यांचा उल्लेख आहे.

**घटनेने दिलेले सहा प्रमुख हक्क पुढीलप्रमाणे :**

१) समानतेचा हक्क

२) स्वातंत्र्याचा हक्क

३) पिळवणुकीविरुद्ध हक्क

४) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क

५) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क

६) घटनात्मक उपायांचा हक्क

सर्व मूलभूत हक्क सर्वमान्य असले तरी घटनेने काही अपेक्षा आणि मर्यादा घातलेल्या आहेत.

### ? तुम्हास हे माहित आहे का ?

मूळात घटनेने सात हक्क प्रदान केलेले होते. वरील सहा हक्कांमध्ये संपत्तीचा हक्क दिलेला होता. परंतु या हक्कामुळे संपत्तीच्या वाटपाबावत अनेक समस्या निर्माण झाल्या. संपत्तीचे समान वाटप आणि समाजवाद या उद्दिष्टांमुळे हा हक्क काढून टाकण्यात आला. सन १९७८ च्या ४४ व्या घटना दुरुस्तीने हा हक्क काढून टाकण्यात आला. या घटना दुरुस्तीमुळे संपत्ती मिळवावयाची नाही असा नाही किंवा तिचे हस्तांतरण करायचे नाही असा नसून नागरीकांना तो हक्क आहे परंतु तो कायदेशीर हक्क असून मूलभूत हक्क असणार नाही.

### १६.२.१ समानतेचा हक्क :

आपल्यासारख्या समाजामध्ये समानतेचा हक्क अतिशय महत्त्वाचा आहे. या हक्कामुळे कायद्याने सर्व जण समान आहेत. त्यासाठी पाच तरतुदी आहेत. कलम क्र. १४ ते १८ अन्वये कायद्याने सर्व व्यक्ती समान आहेत. त्यानुसार भारताच्या सर्व व्यक्तींना संरक्षण मिळते. कोणत्याही व्यक्तीचा धर्म, जात, वंश किंवा लिंगभेद किंवा जन्मस्थानावरून भेदभाव करता येणार नाही.

१. **कायद्याने समतेचा हक्क :** कायद्यानुसार नागरिकांना समान हक्कांची हमी दिलेली आहे. कायद्यापेक्षा व्यक्ती वरचढ नाही. दोन भिन्न व्यक्तिंनी जर सारख्याच प्रकारचा गुन्हा केलेला असेल तर त्यांना सारखीच शिक्षा मिळते.

२. **धर्म, वंश, जात, लिंगभेद, जन्म स्थान याबाबत भेदभाव करता येणार नाही :** यामुळे सामाजिक समता येण्यास मदत होईल. कोणत्याही दुकानातील प्रवेश, उपहारगृहातील प्रवेश असो किंवा विहिरीवर पाणी भरणे असेल, रस्त्यांचा किंवा तलावांचा वापर भेदभाव न करता वापर करता येईल. असे असले तरी स्त्रीया आणि मुले यांबाबत काही तरतुदी केलेल्या आहेत.

३. **सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्यांची समान संधी :** सार्वजनिक क्षेत्रातील नोकरीची संधी देशातील कोणती व्यक्ती मिळवू शकते. त्यामध्ये भेदभाव करता येणार नाही. गुणवत्ता आणि पात्रता या निकषावर नोकरी मिळविता येईल. परंतु त्याला काही अपवाद आहेत. उमेदवार अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती अथवा इतर मागासवर्गीय असेल तर त्यांना राखीव जागांची तरतूद आहे.




**आकृती १६.१ : स्त्रीपुरुष भेदभाव नसलेले कार्यालय**

४. **अस्पृश्यतेचे उच्चाटन :** कोणत्याही परिस्थितीमध्ये अस्पृश्यता आढळून आल्यास शिक्षापात्र गुन्हा ठरू शकतो. जाती किंवा व्यवसायामुळे ज्यांच्याकडे खालच्या नजरेने पाहिले जात

होते. अशा हजारो भारतीयांचे स्थान उंचावण्यासाठी ही तरतूद आहे. घटनेमध्ये तरतूद करूनही अनेक वर्षापासून सामाजिक चालीरिती चालू आहेत. रुग्णाची जेव्हा नर्स काळजी घेते किंवा आई बाळाची स्वच्छता करते किंवा एखादी महिला शौचालय. मग स्वच्छता करणे हे खालच्या दर्जाचे काम आहे असे का बोलतात?

5. **पदांचा दर्जा रद्द करणे :** ब्रिटिश राजवटीमध्ये सर, राय बहादूर अशा पदव्या दिल्या जात असत. परंतु त्या आता रद्द करण्यात आलेल्या आहेत. राष्ट्रपती नागरी आणि लष्करी सन्मानासाठी काही पदे बहाल करतात उदा. भारत रत्न, पद्म विभूषण, पद्मभूषण, पद्मश्री असे सन्मान आहेत. लष्करामध्ये वीर चक्र, परमवीरचक्र अशोक चक्र इत्यादी ही सर्व पदे नसून गौरव आहे. शैक्षणिक किंवा लष्कर सेवेतील सन्मान त्या व्यक्तीच्या नावाचा असतो.



**भारत रत्न, पद्म विभूषण, परमवीर चक्र, वीर चक्र, अशोक चक्र**

**आकृती १६.२ : नागरी आणि लष्करी सन्मान**

**उपक्रम १६.२**

किमान पाच वर्ग मित्र किंवा घरातील प्रौढ व्यक्तीची मते आजमविण्यासाठी पुढील प्रश्न विचारून माहिती जमा करा.

१) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी राखीव जागा ठेवणे योग्य आहे का?

२) अनुसूचित जातीच्या व्यक्तीकडून दिलेले पाणी अजूनही नाकारले जाते असे दिसून येते का?

३) कायद्यापुढे सर्वजण समान आहेत हे प्रत्यक्षात दिसून येते का?

सोबतच्या सारणीमध्ये मिळालेली माहिती भरा आणि त्यावरून अनुमान काढा. या प्रश्नांवर तुमचे मत काय?

| प्रश्न | प्रतिसाद | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | पहिली व्यक्ती | दुसरी व्यक्ती | तिसरी व्यक्ती | चौथी व्यक्ती | पाचवी व्यक्ती |
| प्रश्न १ | | | | | |
| प्रश्न २ | | | | | |
| प्रश्न ३ | | | | | |

## पाठ्यांशावरील प्रश्न १६.१

१. हक्क आणि कर्तव्य म्हणजे काय? ती परस्परांशी संबंधित कशी आहेत?

२. खालीलपैकी कोणता समानतेचा हक्क निर्देशित करीत नाहीत आणि का?

१) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी आरक्षण हे फक्त जातीच्या निकषावर केले जाते.

२) भ्रष्टाचाराचा आरोप असणाऱ्या केंद्रीय मंत्र्यांना कोर्टामध्ये हजर राहण्याची सवलत दिली जाते.

३) सार्वजनिक ठिकाणी सर्वांना प्रवेश दिला जातो.

४) नोकऱ्यांसाठी धर्म ही पात्रता आहे.

५) राय बहादूर सोहन सिंग हे लोक सभेच्या निवडणुकीतील उमेदवार आहेत.

३. खालीलपैकी कोणती विधाने अस्पृश्यतेशी संबंधित नाहीत.

१) पवित्र ठिकाणी दलित आणि इतरांना भिन्न प्रवेशद्वारे आहेत.

२) दलित व्यक्तीला जिममध्ये प्रवेश नाकारणे.

३) दलित लोक इतरांप्रमाणेच हातपंपावर पाणी भरतात.

४) दलित वधुला विवाहादिवशी वधुचा वेश परिधान करायला नाकारणे.

### १६.२.२ स्वातंत्र्याचा हक्क

प्रत्येक सजीवाला स्वतंत्रपणे जगण्याचा हक्क आहे या विधानाशी आपण सहमत असाल. मनुष्याला तर तो हक्क हवाच असतो. तुम्हालाही तो आवश्यक वाटतो. घटनेने सर्व नागरिकांना ते प्रदान केलेले असून ते घटनेच्या १९.२२ या कलमामध्ये समाविष्ट आहेत. खालील चार प्रकारामध्ये त्यांचे वर्गीकरण केलेले आहे.

१. **स्वातंत्र्याचे सहा प्रकार :** घटनेच्या १९ व्या कलमात असलेले सहा प्रकारचे स्वातंत्र्य

अ) भाषण स्वातंत्र्य

ब) शांततेच्या मार्गाने नि:शस्त्रपणे एकत्र जमा होण्याचे स्वातंत्र

क) संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य

ड) भारतात कोठेही मुक्तपणे हिंडण्याचे स्वातंत्र

इ) देशातील कोणत्याही भागामध्ये स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य

फ) देशातील कोणत्याही भागात कोणताही व्यवसाय किंवा व्यापार करण्याचे स्वातंत्र्य

लोकशाही उत्तमप्रकारे टिकण्यासाठी ही स्वातंत्र्ये प्रदान केलेली आहेत. परंतु घटनेमध्येही काही माफक बंधनेही घातलेली आहेत.

१. राष्ट्राचे सार्वभौमत्व, एकता, सुरक्षितता, अन्य राष्ट्रांशी मैत्रीचे असलेले संबंध, सार्व जनिकशिस्त, नैतिकता, न्यायालयाचा मान राखण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. परंतु त्यावर टीका किंवा टिपण्णी केली तर तो गुन्हा ठरू शकतो.

२. राष्ट्रीय एकात्मता व अखंडता टिकवून लोकांनी शांततेच्या मार्गाने आणि नि:शस्त्र एकत्र येण्याची बंधने पाळावीत.

३. संघटना स्थापन करण्याचा हक्क आहे परंतु भारताची अखंडता व सार्वभौमत्व टिकविण्यासाठी, जनहीत व नैतिकतेची बंधने पाळावीत.

४. भारताच्या कोणत्याही भागात मुक्तपणे फिरता येईल तसेच वास्तव्य करता येईल परंतु सर्वसामान्य माणूस किंवा अनुसूचित जमाती यांच्या हिताला बाधा येणार नाही असे बंधन आहे.

५. सर्वसामान्य व्यक्तीच्या हितासाठी देशामध्ये कोठेही व्यापार किंवा व्यवसाय करता येईल. व्यावसायिक किंवा तांत्रिक शिक्षणाची गरज भासल्यास शासन त्या व्यवसायांना परवानगी देईल.

२. **निर्दोषत्व सिद्ध करण्याचा हक्क :** घटनेच्या विसाव्या कलमामध्ये निर्दोषत्व सिद्ध करण्याचा हक्क दिलेला आहे. कायद्यातील तरतुदीपेक्षा अधिक शिक्षा देता येत नाही. एकदा गुन्हा सिद्ध झाल्यानंतर पुर्न्हात्यासाठी त्याच गुन्ह्यासाठी त्याविरुद्ध त्याला किंवा तिला साक्षिदार म्हणून खटला चालू ठेवता येणार नाही.

३. **जीवनसुरक्षा आणि व्यक्तीगत स्वातंत्र्य :** घटनेच्या एकविसाव्या कलमानुसार कायदेशीर प्रक्रीयेशिवाय कोणाचेही जीवन किंवा स्वातंत्र्य हिरावून घेता येणार नाही.

४. **अटक किंवा डांबून ठेवण्याविरुद्ध संरक्षण :** घटनेच्या बावीसाव्या कलमानुसर एखाद्या व्यक्तिला अटक झाली तर कोणत्या कारणासाठी अटक झाली याची माहिती संबंधिताला द्यावी

लागते. यासाठी कयदेतज्ञाचा सल्ला घेवून किंवा अटक झालेल्या व्यक्तीला २४ तासांचे आत नजीकच्या कोर्टामध्ये सिद्ध करावे लागते किंवा अटकपूर्व सूटकेसाठी कायद्याची मदत होते. परंतु तीन महिन्याच्या मुदतीपूर्वी ती केस कोर्टामध्ये दाखल करावी लागते.

## तुम्हास हे माहित आहे का ?

१. मर्यादित बंधनाच्या नावाखाली जर सरकारने कायद्याचा गैरवापर केला तर काय घडेल? योग्य अयोग्य कोण ठरविल? घटनेनुसार अशा परिस्थितीमध्ये सरकार ठरवू शकत नाही ते कोर्टच ठरविते.

२. मूलभूत हक्कांपैकी फक्त काहीच हक्क परकीय नागरीकाला आहेत. उदा. कायद्याने सर्व व्यक्ती समान आहेत आणि प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्य आहे. हे स्वातंत्र्य परकिय नागरीकालाही आहे परंतु बाकी अन्य मूलभूत हक्क फक्त भारतीय नागरिकालाच आहेत.

## पाठ्यांशावरील प्रश्न १६.२

१. भारतीय राज्यघटनेने कोणती स्वातंत्र्य दिलेली आहेत?

२. खालील उदाहरणांमध्ये कोणत्या स्वातंत्र्याचा भंग झालेला आहे?

१) कोणत्याही एखाद्या पक्षाच्या नेत्याला राज्याच्या सीमेमधून प्रवेश करायला विनाकारण सरकारने घातलेली बंदी.

२) कामगारांना संघटना स्थापन करण्यास किंवा त्याच्या मागण्यांसाठी परवानगी नाकारणे.

३) लोकांना त्यांच्या राज्यातून अन्यत्र कोठेही जाण्याची सक्ती करणे.


४) चर्मकाराच्या मुलाने मिठाईचे दुकान खेड्यात उघडण्यास मज्जाव  करणे.

५) सार्वजनिक सभा घेण्यासाठी पक्षाला परवानगी नाकारणे.

३. नागरीकाला निर्दोषत्व सिद्ध करण्यासाठी घटनेमध्ये कोण कोणत्या तरतूदी आहे? जीवन संरक्षण आणि व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि अटकेसाठी रक्षणाच्या कोणत्या तरतुदी आहेत?

## उपक्रम १६.३

खाली दिलेली घटनात्मक स्वातंत्र्य आणि त्यावर सरकारने लावलेली बंधने पहा. स्वातंत्र्य आणि मर्या दित बंधने याच्या जोड्या लावा. आपणास ते सुयोग्य वाटते का? त्याविषयी आपले मत व्यक्त करा.





**मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये**

| स्वातंत्र्य | मर्यादित बंधन |
|---|---|
| १) भाषण स्वातंत्र्य | अ) व्यक्तीच्या हिंडर्णेफिरणे यावर मर्यादा / हिंसक जमावाला रोखणे. |
| २) संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य | ब) जुगार, देह विक्री, अमली पदार्थ विक्री या व्यवसायावर बंदी |
| ३) नि:शस्त्र शांततेच्या मार्गाने एकत्र येणे. | क) विमानतळाच्या अगदी जवळ घरबांधणीस परवाना नसणे. |
| ४) भारताच्या कोणत्याही भागात मुक्तपणे संचार करणे. | ड) सार्वजनिक शांततेचा भंग करणारी, लोकांना चिथावनी देणशरी वक्तव्ये करण्यावर बंधने |
| ५) भारताच्या कोणत्याही भागात स्थायिक होणे. | इ) दहशदवादी संघटनांना मदत करणाऱ्या संघटनांवर बंदी |
| ६) देशातील कोणत्याही भागात व्यवसाय किंवा व्यापार करणे. | फ) निशस्त्र आणि शांततेच्या मार्गाने सहभाग घेणे. |

### १६.२.३ पिळवणूकीविरुद्ध हक्क

आपल्या समाजामध्ये कोणकोणत्या प्रकारे समाजाची पिळवणूक होते. हे माहीत आहे काय? आपण पाहिलेले असेलच की चहावाल्याकडे लहान मुलगा चहा देण्याचे काम करतो किंवा श्रीमंतांच्या घरी गरीब मनुष्य घरकाम करीत असतो. भारतीय समाजामध्ये पिढान्पिढ्या असे चालू आहे. त्यामुळेच पिळवणूक विरुद्ध कायद्याची घटनेमध्ये तरतूद केलेली आहे. घटनेच्या २३ व्या व २४ व्या कलमामध्ये पिळवणूकी विरुद्धचा हक्क ही हमी दिलेली आहे. त्यामध्ये दोन तरतुदी पुढीलप्रमाणे

१. **माणसांची विक्री करणे आणि गुलाम म्हणून कामाची सक्ती करणे ः** कायद्याने माणसाची विक्री करून त्याला कामाला ठेवणे हा शिक्षेस पात्र गुन्हा आहे.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

१. **माणसाचा व्यापार :** मालाप्रमाणे माणसाची खरेदी विक्री करणे. त्यामध्ये प्रामुख्याने तरुण स्त्रीया, मुली, इतकेच नव्हे तर त्यामध्ये मुलांचाही समावेश असतो.

२. **भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्वकाळात जमीनदार लोक :** गरीब आणि खालच्या थरातील लोकांना विना मोबदला राबवून घेत. सक्तीने कामाला लावले जात असे.

३. **बाल कामगारांना कारखान्यात किंवा अन्य कामाला ठेवण्यास प्रतिबंध :** वयाच्या चौदा वर्षाखालील मुलांना कारखान्यात किंवा खाणीमध्ये तसेच धोकादायक ठिकाणी कामावर ठेवणे यावर बंदीच्या घटनात्मक तरतुदी आहेत. या हक्कांवर प्रकाश टाकणारी ही समस्या

आहे. जर मुले ही समाजाची संपत्ती असेल तर त्यांना त्याचे बालपण जगू द्या. शिक्षण घेवू द्यात. कायद्यामध्ये तरतूद असूनही हे बालकामगारांचे हे चित्र आजही प्रत्यक्षात पहावयास मिळते. अशा प्रकारच्या समस्येवर सामाजिक मन तयार करणे गरजेचे आहे.



**आकृती १६.३ : धोकादायक स्थितीमध्ये काम करणारी मुले**

**उपक्रम १६.४**

गोनू आणि सोनू अनुक्रमे ९ आणि ११ वयाची झारखंडाच्या एका खेड्यामधील मुले. वडिलांनी उत्तरप्रदेशातील फिरोजबाद येथे दोन-दोन हजार रुपयांना बांगड्याच्या कारखानदारांना विकली. त्यांच्यासारखीच अनेक मुले अत्यंत वाईट परिस्थितीमध्ये काम करीत होती. खायला पुरेसे अन्नही दिले जात नव्हते. त्यांची पुरेशी झोपही होवू दिली जात नव्हती. त्यामुळे ती आजारी पडत. त्यांना मारहाण करून सक्तीने त्यांच्याकडून काम करून घेतले जाई. ही मुले १८ ते २० तास काम करीत. त्यामधून काही मुले पळून दुसऱ्या शहरात जाऊन एक तर भिक्षा मागत किंवा चोऱ्या करीत किंवा हलक्या दर्जाची कामे करीत. आपल्या आईवडिलांना भेटण्याची इच्छा असूनही ते भेटू शकत नसत.

वर दिलेल्या परिस्थितीवरून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. कोणत्या मूलभूत हक्कांची पायमल्ली वरील स्थितीमध्ये आढळते?

२. आईवडिलांनी मुलांची केलेली विक्री आणि कामाच्या स्थितीवर कोणती कार्यवाही करणे अपेक्षित आहे?

३. पिळवणूकीपासून अशा मुलांच्या बचावासाठी कोणते उपाय सूचवाल?

सोनू आणि गोनूच्या भूमिकेत जावून या मुलांना अनेक तास बांगड्याच्या कारखान्यात काम करावे लागे या परिस्थितीतून त्यांना बाहेर काढण्यासाठी कशी मदत कराल?

## १६.२.४ धर्मस्वातंत्र्याचा हक्क

घटनेच्या संविधानामध्ये सर्व भारतीयांना ज्यांच्या त्यांच्या धर्माप्रमाणे प्रथा पाळण्याचा तसेच प्रार्थना करण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. भारत हे बहुधर्मियांचे राष्ट्र आहे, त्यामध्ये हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन आणि इतर अनेक धर्मिय गुण्यागोविंदाने राहतात. त्यामुळे घटनेने भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे असे जाहीर केलेले आहे. भारताचा स्वतंत्र असा धर्म नाही. त्यामुळे आपापल्या मनाप्रमाणे प्रत्येकाला धर्म स्वातंत्र्याचा हक्क आहे. हाच हक्क व न्याय परकीय नागरीकांनाही आहे. घटनेच्या कलम २५ ते २८ यामध्ये खालील तरतूदी केलेल्या आहेत.

१. **सदविवेक बुद्धीने धर्माचरण व धर्माचा प्रसार करण्याचा हक्क** : प्रत्येकाला शांततेच्या मार्गाने धर्माचे पालन व धर्माचा प्रचार करण्याचा समान हक्क आहे. तसेच धर्मांतर करण्यासाठी कोणीतरी बळजबरी किंवा अमिष दाखविता येणार नाही. बेकायदेशीर केलेल्या अमानुषपणे धर्मांतरास बंदी आहे. मनुष्य आणि प्राणी यांच्या बळीवर कायद्याने बंदी आहे. पतीच्या निधनानंतर तिला सक्तीने किंवा स्वेच्छेने सती जाता येणार नाही. पतीच्या निधनानंतर तिला पुन:र्विवाह करण्यासाठी किंवा केशवपन करण्यास सक्ती करता येणार नाही किंवा तिने फक्त पांढरेच कपडे घालावेत असे बंधन करता येणार नाही किंवा धर्माच्या नावाखाली सक्ती करता येणार नाही. वरील बाबींशिवाय समतेसाठी शासनाला सामाजिक शिस्त नैतिकता व आरोग्यासाठी बंधन घालण्याचा अधिकार आहे.

२. **धार्मिक कार्य करण्याचे स्वातंत्र्य** : प्रत्येक धर्मियांना शांततेच्या मार्गाने धर्मदाय संस्था स्थापन करण्याचा हक्क आहे. त्यासाठी धार्मिक कार्ये करता येतील. संस्थेला स्वत:ची स्थायी संपत्ती ठेवता येईल व कायद्याने त्याचे रक्षण करता येईल.

३. **धार्मिक कर सवलती** : धर्माच्या नावाखाली स्थापन झालेल्या संस्थांनी केलेल्या खर्चावरील करामध्ये कोणत्याही धर्माला सवलत दिली जाईल.

४. **शिक्षण संस्थांमधील धार्मिक प्रार्थनेचे स्वातंत्र्य** : सरकारी अनुदान किंवा शासनाने चालविलेल्या शिक्षणसंस्थांमध्ये धार्मिक शिक्षण देण्यास परवानगी नसते. परंतु धर्मादाय संस्था म्हणून स्थापन झालेल्या संस्थेमध्ये धार्मिक कार्यामध्ये भाग घेण्याची सक्ती केली जाणार नाही. अल्प संख्यांकांच्या शाळांमधून असे धार्मिक कार्यक्रम घेतले जात असतील तर त्यामध्ये सहभागी होण्यासाठी पालकांची सम्मती आवश्यक आहे.

## पाठ्यांशावरील प्रश्न १६.३

१. पिळवणूकी विरुद्ध हक्क ह्या मूलभूत हक्काची उद्दिष्टे कोणती?

२. पुढील विधानांसाठी संज्ञा लिहा.

अ) विनामूल्य काम करण्याची एखाद्या व्यक्तीला सक्ती करणे.

ब) माणसाची खरेदी किंवा विक्री करणे.

३. तुमच्या आजुबाजूला पिळवणूक होत असलेल्या कोणत्याही चार स्थिती लिहा.

### १६.२.५ सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क :

भारत हे जगातील लोकशाही प्रधान राष्ट्र असून त्यामध्ये सांस्कृती, भाषा, लिपी, धर्म यामध्ये विविधता आहे. परंतु अल्पसंख्याकांनाही आपल्या जीवनपद्धतीचा समान हक्क आहे. त्यामुळे त्यांनाही भाषिक, सांस्कृतिक, धार्मिक समान हक्क असून बहुसंख्यांकांच्या हक्कांमुळे आपल्याला डावलले जात आहे असे भासू नये. प्रत्येकाला आपल्या संस्कृतीचा भाषेचा अभिमान वाटावा. सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क याची मूलभूत अधिकार या प्रकरणामध्ये चर्चा केलेली आहे. घटनेच्या २९ आणि ३0 या कलमामध्येही तरतूद केलेली आहे.

१. **अल्पसंख्यांकांच्या हक्काचे रक्षण :** अल्पसंख्यांकांची स्वतंत्र भाषा असते. त्याची लिपी व संस्कृती असून त्याच्या रक्षणाचा हक्क आहे. धर्म, वंश, जात, भाषा या नावाखाली शासकीय अनुदान घेणाऱ्या शिक्षणसंस्थांमध्ये कोणत्याही नागरिकास प्रवेश घेण्यास नाकारता येणार नाही.

२. **अल्पसंख्यांकांना शिक्षणसंस्था स्थापन करण्याचा हक्क** ः सर्व अल्पसंख्यांकांना धर्माच्या आणि भाषेच्या नावाखाली त्यांच्या निवडीप्रमाणे शिक्षणसंस्था स्थापन करण्याचा हक्क आहे. कोणत्याही शिक्षणसंस्थेची मालमत्ता ताब्यात घेताना या कायद्यांचा व कलमांचा शिक्षण संस्थांना आधार आहे. अल्पसंख्यांकाच्या धार्मिक किंवा भाषिक कारणांमुळे एखाद्या शिक्षण संस्थेला अनुदानापासून वंचित ठेवता येणार नाही.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

अल्पसंख्यांक याचा अर्थ राष्ट्रीय पातळीवरील अल्पसंख्यांक असा नसून राज्यांतीलही अल्पसंख्यांक असू शकतात. पंजाबमध्ये शिख धर्मीय हे अल्पसंख्याक नसतील परंतु दिल्ली, राजस्थान, हरयाना किंवा अन्य राज्यांमध्ये अल्पसंख्यांक असू शकतील. त्याचप्रमाणे तेलगु, कन्नड, बंगाली भाषिक लोक अन्य राज्यांमध्ये मूळ राज्य सोडून अन्यत्र अल्पसंख्यांक असू शकतील. वरील प्रमाणे परिस्थिती असणारे आंध्र, कर्नाटक किंवा पश्चिम बंगाल हे एक उदाहरण आहे.

### १६.२.६ संविधानात्मक उपायांचा हक्क

मूलभूत हक्कांना कायद्याचे संरक्षण असून त्याची हमी आहे. या हक्कांची कोणी पायमल्ली केली तर त्याविरुद्ध कोर्टाकडून दाद मागता येते. प्रत्यक्षामध्ये दैनंदिन जीवनात घडत नाही. या हक्कांवर गदा येवू शकत नाही. मूलभूत हक्कांच्या रक्षणासाठी कायदेशीर तरतूद असून घटनेच्या कलम ३२ मध्ये त्याचा समावेश आहे. मूलभूत हक्क कोणी डावलण्याचा प्रयत्न केला तर त्याविरुद्ध न्यायालयामध्ये दाद मागता येते. अगदी सर्वोच्च न्यायालयातही जाता येते.

### १६.२.७ शिक्षणाचा हक्क :

८६ व्या घटना दुरुस्तीनुसार सन २००२ मध्ये २१ व्या कलमामधील दुरुस्ती करण्यात आली. वय वर्षे ६ ते १४ या गटातील मुलांना सक्तीचे आणि मोफत शिक्षणाच्या हक्काची तरतूद असून ही मूलभूत अधिकार आहे. यामुळे देशातील निरक्षरतेचे उच्चाटन व्हावे, हा मुख्य हेतू होता. सन २००९ पर्यंत हा हक्क निरर्थकच होता. परंतु जेव्हा त्याचे कायद्यामध्ये रुपांतर झाले तेव्हा वयोगट ६ ते १४ वर्षे या वयातील मुलांना शाळाबाह्य असली तरी शाळेत जाणे बंधनकारक असून दर्जेदार शिक्षण मिळण्याचा त्यांचा हक्क आहे.

### पाठ्यांशावरील प्रश्न १६.४

१. घटनेने सांस्कृतिक व शैक्षणिक हमी दिलेल्या तरतुदी कोणत्या?

२. तमीळ, कन्नड आणि तेलगु भाषिक दिल्लीमध्ये रहात असतील तर त्यांच्या भाषा आणि संस्कृतीचे रक्षणासाठी त्यांना काय करता येईल?

३. खालीलपैकी कोणत्या परिस्थितीमध्ये शैक्षणिक आणि सांस्कृतिक हक्कांचे रक्षण केलेले नाही?

अ) एक विशिष्ट भाषेचे जतन

ब) अल्पसंख्यांकांना अनुदानास भेदभाव न करणे.

क) आपल्या इच्छेप्रमाणे शिक्षणसंस्था स्थापन करणे.

ड) बहुसंख्यांच्या मुलांना अल्पसंख्यांकांच्या शाळेत प्रवेश दिला पाहिजे.

४. संविधानात्मक उपाय हा सर्वात मोठा मूलभूत हक्क आहे? या विधानाशी आपण सहमत आहात काय? या विधानाचे समर्थन करा.

## १६.३ मूलभूत हक्क म्हणजेच मानवी हक्क :

प्रत्येक नागरिकाला मूलभूत हक्क आवश्यक असतात. हे आत्ताच आपण पाहिलेले आहे. आपणास माहित आहेच की माणसे सतत न्यायासाठी संघर्ष करीत असतात. पिळवणूक असो किंवा सभोवतालच्या विषमतेबद्दल असो, माणसाच्या दर्जासाठी आणि उत्तमपणे जगण्यासाठी सतत धडपड चालू असते. मानवी हक्क हा जगभरच सध्या चर्चेला घेतला जाणारा विषय असून त्यामध्ये अनेक बाबींचा समावेश आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्व साधारण सभेने १९४८ ला मानवी हक्काचा स्वीकार केला. त्याचे पावित्र्य जागतिक मानवी हक्क म्हणून नंतर अभ्यासता येईल. त्यापैकी काही हक्क : कायद्यासमोर सर्व जण समान आहेत, भेदभाव विरुद्धचा हक्क, जीवनाचा हक्क, स्वातंत्र्य आणि व्यक्तिगत सुरक्षा, मुक्तपणे संचाराचा हक्क, शिक्षणाचा हक्क, विवाह व कुटुंब हक्क, वैचारिक हक्क, विवेक आणि धर्म शांततेच्या मार्गाने एकत्र जमण्याचा आणि संघटना स्थापन करण्याचा हक्क, सांस्कृतिक जीवनात सहभागी होण्याचा हक्क इत्यादीवरील सर्व हक्कांचे निरीक्षण केल्यास मानवी हक्कांना किती महत्त्व आहे हे लक्षात येईल.

भारतीय राज्य घटनेतील मूलभूत हक्क या भागामध्ये अनेक ठिकाणी मानवी हक्क आढळून येतील. मानवी हक्काचे महत्त्व लक्षात घेवून राष्ट्रीय मानव हक्क आयोगाची स्थापना १९९३ मध्ये भारत सरकारने स्थापना केली. त्याचा लाभ प्रत्येक नागरीकाला घेता येईल.

**तुम्हास हे माहित आहे का ?**

मानवी हक्क हे जगत् मान्य मूलभूत व निरपेक्ष आहेत. हे सर्वव्यापी आहेत कारण ते सर्व मानवी समाजासाठी आहेत. ते मूलभूत आहेत कारण त्याबाबत तडजोड नाही. ते निरपेक्ष आहेत. कारण ते मूलभूत व प्रत्यक्ष जीवनाशी संबंधित आहेत.

## मूलभूत कर्तव्ये :

आपले मूलभूत हक्क पाहिल्यानंतर तुमच्याही लक्षात येईल की हक्कांबरोबरच समाजाच्याही काही आपेक्षा आहेत. यालाच कर्तव्य म्हणतात. त्यापैकी काहींचा समावेश हा भारतीय घटनेमध्ये केलेला आहे. मूळ घटना २६ जाने १९५0 रोजी कार्यान्वीत झाली. त्यामध्ये नागरिकांच्या कर्तव्यांचा समावेश नव्हता. स्वेच्छेने लोकांनी कर्तव्याचे पालन करावे अशी अपेक्षा होती. परंतु अपेक्षेप्रमाणे घडले नाही. त्यामुळे घटनेच्या चौथ्या भागात कलम ५१ मध्ये १९७६ मध्ये १0 कर्तव्यांचा समावेश करण्यात आला. ही ४२ वी घटना दुरस्ती होय. मूलभूत हक्कांना जसे संविधानात्मक पाठबळ असते तसे मूलभूत कर्तव्यांना नसते. म्हणजेच मूलभूत कर्तव्यांचे पालन केले नाही तरी त्याबद्दल कोणत्याही नागरिकास शिक्षा होत नाही. भारतीय राज्यघटनेतील दहा कर्तव्ये पुढीलप्रमाणे ः

१. घटनेचा, त्यातील तत्त्वांचा, आदर्शांचा, राष्ट्रीय ध्वजाचा तसेच राष्ट्रगीताचा मान राखावा.

२. स्वातंत्र्य संग्रामातील उदात्त आदर्शांचा मनापासून स्वीकार करावा.

३. राष्ट्रीय सार्वभौम, एकता व अखंडता यांचे रक्षण करावे.

४. राष्ट्राच्या रक्षणासाठी गरज भासेल तेव्हा स्वत: होवून सहभागी व्हावे.

५. सर्व भारतीयातील राष्ट्रीय ऐक्य व बंधूभाव निर्माण होण्यासाठी प्राधान्य द्यावे. स्त्रीयांना समान दर्जा दिला जावा.

६. देशाच्या मौल्यवान वारशाचे अखंड संस्कृतीचे रक्षण करावे.

७. देशातील वने, सरोवरे, नद्या, वन्य प्राणी या नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करावे त्यांची गुणवत्ता सुधारावी.

८. वैज्ञानिक दृष्टिकोन व मानवतावादी दृष्टीकोनाचा विकास व्हावा.

९. राष्ट्रीय संपदांचे रक्षण करावे व शांततेचा भंग होणार नाही याची काळजी घ्यावी.

१0. व्यक्तीगत आणि सार्वजनिक क्षेत्रामध्ये अतिउत्तम सेवाकरावी.

वरील बाबींशिवाय शिक्षणाचा हक्क २००९ चा कायदा याचाही समावेश केलेला आहे. वय वर्षे ६ ते १४ या वयोगटातील मुलांना शिक्षणाची संधी दिलेली आहे.

### १६.३.१ मूलभूत कर्तव्याचे स्वरूप :

वरील कर्तव्ये ही अलिखित जीवन पद्धती आहे. त्याबाबत न्यायालयात दाद मागता येत नाही. त्यातील काही तर अस्पष्ट आहेत. उदा. सर्वसामान्यांना "सांस्कृतिक एकता" म्हणजे काय, किंवा समृद्ध वारसा, मानवतावाद, विविध क्षेत्रातील पारंगतता इत्यादी लक्षात येणार नाही. त्या संज्ञेचा सोपा अर्थ लावला तरच लोकांना त्या कर्तव्याचे महत्त्व समजेल. सध्याच्या असलेल्या यादीध्ये वेळोवेळी दुरुस्त्या आवश्यक आहेत. सोप्या भाषेत व प्रत्यक्ष जीवनाशी संबंधित अर्थाने कर्तव्याचे पालन करणे यासारख्या कर्तव्याची दुरुस्ती अपेक्षित आहे. शक्यतो त्यावर न्याय मागता यावा असे स्वरूप असावे.

### तुम्हास हे माहित आहे का ?

१. मुलांचे संगोपन व वृद्धांची काळजी ही बाब १९७७ संघराज्याच्या घटनेमध्ये मूलभूत कर्तव्य म्हणून समाविष्ट केलेली आहे.

२. मुलांचे शिक्षण, सार्वजनिक कल्याणामध्ये ढवळाढवळ न करणे, कर भरणे, कामाचा अधिकार या गोष्टी जपानच्या घटनेमध्ये आहेत

### पाठ्यांशावरील प्रश्न १६.५

१. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व साधारण सभेने कोणत्या मानवी हक्क संबंधी कागदपत्रांना मंजूरी दिली?

२. कोणतेही चार मूलभूत हक्क हे मानवी हक्क असल्याची उदाहरणे द्या.

३. सोबतच्या चित्रांचे निरीक्षण करून मूलभूत कर्तव्याशी असलेल्या संबंधाची यादी तयार करा.



अ) पर्णहिन वृक्ष, पडलेले वृक्ष, मृत प्राणी इत्यादी

ब) प्राचीन अवशेष

क) मिरवणूकीच्या बॅनरवर इन्कलाब, झिंदाबाद भारत माता की जय, हिन्दुस्थान अमर रहे.

ड) सरहद्दीचे रक्षण करणारे गस्तीवरील सैनिक

ई) विविध धर्मियांचे प्रार्थनास्थळ

४. स्वातंत्र्यदिनी प्रतिज्ञा घेत असताना कोणती चार मूलभूत कर्तव्ये पार पाडणे बंधनकारक असते, ती चार कर्तव्ये का महत्त्वाची असतात?

## आपण काय शिकलो?

- देशाच्या, समाजाच्या आणि व्यक्तीगत विकासासाठी हक्कांचे पालन करावे लागते. कर्तव्य म्हणजे दुसऱ्याने केलेली अपेक्षा असते. त्याची अनेक कारणे असतील. नैतिक असो किंवा कायदेशीर बंधने असोत. हक्क आणि कर्तव्ये परस्परावलंबीत असतात.

- समाजाची ओळख ही सर्व हक्कांनी होते, देशाची ओळख घटनेतील मोजक्या हक्कांने होते त्यांचा संदर्भ पावित्र्य म्हणून केला जातो त्यांना मूलभूत हक्क म्हणतात.

- घटनेने सहा मूलभूत हक्कांची हमी भारतीय नागरिकांना दिलेली आहे.

  १) समतेचा हक्क २) स्वातंत्र्याचा हक्क

  ३) पिळवणुकी विरुद्ध हक्क ४) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क

  ५) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क ५) संविधानात्मक हक्क

  वरील सर्व हक्क हे विश्वव्यापी असून त्याला काही अपवाद व बंधने आहेत.

- सन १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्वसाधारण सभेने विविध प्रकारच्या मानवी हक्कांना मान्यता दिलेली असून जागतिक हक्क म्हणून त्यांचा स्वीकार केलेला आहे. भारतीय घटनेने त्यातील मूलभूत हक्क म्हणून स्वीकारलेली आहेत. ती राबविणे हे भारत सरकारची जवाबदारी आहे. मानवी हक्क हे मूलभूत हक्कामध्ये येत नसून राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये त्यांचा समावेश होतो.

- घटनेच्या ४ थ्या भागामध्ये कलम ५१ अ हा भाग १९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्तीमध्ये दहा मूलभूत कर्तव्याचा समावेश केलेला आहे. मूलभूत हक्कांबावत जसा न्याय मागता येतो तसा मूलभूत कर्तव्य भंग केल्यावर न्याय मागता येत नाही. त्यामुळे कर्तव्य पालन न केल्यास त्याला शिक्षा देता येत नाही.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. दैनंदिन जीवनातील मूलभूत हक्कांचे महत्त्व लिहा. आपल्या जीवनामध्ये अगदी महत्त्वाचे मूलभूत हक्क कोणते? का?

२. भारतीय घटनेने प्रदान केलेल्या सहा मूलभूत हक्कांची माहिती लिहा.

३. शिक्षणाच्या हक्कांमुळे भारतातील निरक्षरता नष्ट होईल असे वाटते का? स्पष्ट करा

४. धार्मिक स्वातंत्र्याच्या प्रमुख तरतुदी लिहा.

५. स्वातंत्र्याच्या हक्कांवर लावलेले तीन निर्बंध कोणते? या बंधनांच्या समर्थनार्थ तुमचे मत लिहा. तुमच्या उत्तराच्या पुष्ट्यर्थ माहिती लिहा.

६. भारतीय राज्य घटनेमध्ये मूलभूत हक्कांमध्येच मानवी हक्काचे प्रतिबिंब आहे. आपण या विधानाशी सहमत आहात काय?

७. घटनेधील कोणत्या मूलभूत कर्तव्यांची यादी आहे? त्यापैकी कोणती कर्तव्ये अधिक महत्त्वाची आहेत? आणि का?

८. खालील विधानांचे वाचन करून अचूक विधाने शोधा व चुकीची विधाने दुरूस्त करून लिहा.

१) शासनाच्या परवानगीशिवाय त्याला किंवा तिला धर्म बदलता येत नाही.

२) सर्व शासकीय किंवा शासकीय अनुदानातील शाळांमध्ये धर्माचे शिक्षण दिले जाते.

३) खाजगी शाळामध्ये धार्मिक प्रार्थनेसाठी सक्ती केली जाणार नाही.

४) निधर्मी राज्य म्हणून ओळख असलेल्या भारतीय शाळेत एखाद्या धर्माला विशेष हक्क दिला जाणे.

५) धार्मिक स्थळांच्या देखभालीसाठी शासनाकडून कर लावला जाणे.

६) राष्ट्राच्या विकास कामात अडथळा ठरणाऱ्या ठिकाणी धार्मिक स्थळांचे बांधकाम करणे.

९. सोबतच्या अ या घटकाशी ब या घटकाच्या जोड्या लावा.

| घटक अ | घटक ब |
|---|---|
| अ) घटनेने मत व्यक्त करण्याचा दिलेला स्वातंत्र्य | १) इतरांना वापरास बंदी घालता येणार नाही. |
| ब) धर्माची निवड करण्याचा जर हक्क असेल तर | २) नियमांचे पालन व शिस्त पालन करण्याचे कर्तव्य |

| | |
|---|---|
| क) सार्वजनिक बाग विहिर तलावाचा वापर करण्याचा हक्क असेल तर | ३) आपल्याला मारण्याचा किंवा जखमी करण्याचा इतरांना हक्क नाही. |
| ड) जीवन जगण्याचा हक्क आपल्याला असेल तर | ४) इतरांना धर्माप्रमाणे वागण्यास आपली मान्यता असणे हे कर्तव्य |
| ई) आपणास शिकविण्याचा हक्क असेल तर | ५) इतरांच्या भावनांची कदर करणे स्वत: आणि इतरांनी पालन करावे. |

**प्रकल्प :**

आपल्या जवळपासच्या ठिकाणाच्या स्थळास भेट द्या व १४ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या भिकारी किंवा स्वच्छतेची कामे करणारी कचरा वेचणारी ३/४ मुले शोधा. या कामात कोणत्या कारणांनी ते आले याची माहिती घ्या.

| अ.नं. | मुलाचे नाव | वेगळ्या परिस्थितीमध्ये येण्याचे त्यांना मदत करू शकतो? | मी कोणत्या स्वरूपाची कारण येण्याचा हक्क |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |

## पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे

**१६.१**

१. स्वत:च्या विकासासाठी समाजाने दिलेला हक्क आहे. कर्तव्य म्हणजे कोणीतरी काही करण्याची केलेल्या अपेक्षा आहे. हक्क आणि कर्तव्ये या बावी परस्परांशी सहसंबंधित असतात. हक्क आणि कर्तव्ये ही बरोबरीने असतात तेव्हा ती परस्परांना पुरक असतात. हक्क म्हणजे जेव्हा आपण इतरांकडून काहीतरी अपेक्षा करतो आणि कर्तव्य म्हणजे इतरांसाठी आपण काहीतरी करीत असतो. त्यामुळे बंधने असतात. दुसऱ्यांच्या हक्कांचा आदर केलेला असतो. त्यामुळे हक्क म्हणजे कर्तव्याची बंधनेच असतात.

२.

१) कारण राखीव जागांची तरदूद म्हणजे जातीभेद नव्हे.

२) कायद्याच्या दृष्टीने सर्वजण समान असतात. व्यक्तीच्या दर्जामध्ये कोणत्याही स्वरूपात भेद करता येत नाही.

४) कोणत्याही परिस्थितीमध्ये धर्मानुसार नोकरी देता येणार नाही.

५) राय बहादूर यांना त्यांच्या नावाचा वापर करता येणार नाही. सोहन सिंग नावाचा वापर करावा लागेल कारण भारतीय घटनेने ही पदे रद्द केलेली आहेत.

३. दलितांना सार्वजनिक हातपंपाचा वापर करून पाणी भरता येईल.

## १६.२

१. अ) भाषण स्वातंत्र्याचा हक्क ब) नि:शस्त्रपणे शांततेच्या मार्गाने एकत्र येण्याचा हक्क. क) संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य ड) देशातील कोणत्याही भागात मुक्तपणे फिरण्याचे स्वातंत्र्य. ई) देशातील कोणत्याही भागात स्थायिक होण्याचे स्वातंत्र, फ) देशातील कोठेही कोणताही व्यवसाय धंदा व्यापार करता येण्याचे स्वातंत्र्य

२. १) देशात कोठेही मुक्तपणे हिंडण्याचे स्वातंत्र्य

२) संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य

३) भारतात कोठेही स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य

४) कोणताही व्यवसाय व्यापार किंवा धंदा सुरू करण्याचे स्वातंत्र्य

५) नि:शस्त्रपणे शांततेने एकत्र जमा होण्याचे स्वातंत्र्य

३. घटनेचे कलम २0, कलम २१, कलम २२

## १६.३

१. भारतीय समाजात पिळवणूकीच्या इतिहासाची परंपरा आहे. त्या विरुद्ध घटनेमध्ये त्याबाबतची तरतुदी केलेली आहे.

२. अ) भिकारी

ब) माणसांचा व्यापार

३. तुमचे अनुभव लिहा.

## १६.४

१. घटनेच्या २९ व ३0 या कलमांमध्ये मुख्यत: अल्पसंख्यांकाच्या हिताच्या हक्कांचे रक्षण असून अल्पसंख्यांकांना शिक्षण संस्था स्थापन करण्याचा व चालविण्याचा हक्क आहे.







२. अल्पसंख्यांकाची ओळख म्हणजे त्यांची स्वतंत्र भाषा, स्वतंत्र लिपी, संस्कृती असते त्याचे रक्षण करण्याचा हक्क आहे.


३. बहुसंख्यांकांना अल्पसंख्यांकाच्या शाळेत प्रवेश दिला जाणे आवश्यक आहे.

४. दैनंदिन जीवनामध्ये मूलभूत हक्कांची पायमल्ली होणाऱ्या घटना घडत आहेत. त्यामुळे घटनेमधील व तरतुदींवर बंधने घालता येणार नाहीत. मुलभूत हक्कांसाठी कायदेशीर दाद मागता येते. यालाच संविधानात्मक हक्क म्हणतात.

**१६.५**

१. 'मानव हक्क' चा स्वीकार १९४८ मध्ये राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिली. मानवी हक्कांना जगत मान्यता मिळाली.

२. समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, धार्मिक व सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क



टिपा

# १७

# भारत - कल्याणकारी राज्य

रामकृष्णन आणि त्याचा मित्र अब्दूल चेन्नईवरून नवी दिल्लीच्या स्टेशनला आले. टॅक्सी करण्यासाठी रस्ता ओलांडताना रामकृष्णनला सायकल रिक्शाने धडक दिली. उपचारासाठी तातडीने सरकारी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. डॉ. निर्मल त्यांचेवर उपचार करीत होत्या. चिंताग्रस्त अब्दुलने रामकृष्णनच्या चुलत्यांना तसेच आपल्याही घरी ही घटना कळविली. तासाभरातच डॉ. निर्मलांनी रामकृष्णनची प्रकृती ठिक आहे. मोठी जखम नाही त्यामुळे काळजीचे कारण नाही असे अब्दुलला सांगितले.

रामकृष्णनचे चुलते नंतर आले आणि रामकृष्णनचा डिसचार्ज घेतला. अब्दुलच्या लक्षात आले की डॉ. निर्मलांनी किरकोळ औषधांचे पैसे घेतले. परंतु उपचाराचे घेतले नाहीत. अब्दुलने रामकृष्णच्या चुलत्यांना विचारले की हे असे कसे शक्य आहे? भारत हे कल्याणकारी राज्य आहे. त्यामुळे ही सगळी सरकारची जबाबदारी असते. कल्याणकारी राज्य म्हणजे काय? या प्रश्नाचे अब्दुलला उत्तर मिळाले.

वर्तमानपत्र वाचताना किंवा टी. व्ही पाहताना तुम्हालाही हा प्रश्न पडला असेल. भारत हे कल्याणकारी राष्ट्र असून राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचा येथे संबंध आहे. अब्दुलला पडलेल्या पडलेल्या प्रश्नासारखे तुम्हालाही अनेक प्रश्न निर्माण झालेले असतील. पाठ्य अभ्यासावरून भारत हे कल्याणकारी राष्ट्र आहे असे लक्षात आलेले असेल.

## उद्दिष्टे :

पाठ्य अभ्यासानंतर पुढील गोष्टी साध्य होतील.

- कल्याणकारी राष्ट्राचा अर्थ समजणे आणि भारत हे कशाप्रकारे कल्याणकारी राष्ट्र आहे हे स्पष्ट होणे.
- भारतीय राज्यघटनेमध्ये राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये कोणत्या बाबींचा समावेश केला याची कल्पना येईल.
- कल्याणकारी राज्य म्हणून भारतीय राज्य घटनेतील मार्गदर्शक तत्त्वांचे महत्त्व
- मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण करणे.

- ❖ मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्व यातील फरक स्पष्ट करणे आणि
- ❖ मार्गदर्शक तत्त्वांचा कल्याणकारी राज्यासाठी केलेल्या उपायांचे परीक्षण करणे.

## १७.१ कल्याणकारी राज्य म्हणजे काय?

मूळ प्रश्नाचे उत्तर म्हणजे अब्दुलला निर्माण झालेल्या गरजेमध्ये आहे. भारत कल्याणकारी राज्य आहे हे आपण पाहिले. जगातील इतर अनेक देश कल्याणकारी राज्य म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. मग इतरांचा उल्लेख का केला जात नाही? कल्याणकारी राज्य म्हणजे काय? लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी सरकार महत्त्वाची भूमिका निभावते. कल्याणकारी राज्य म्हणजे तर सर्वांना समान संधी आणि समान संपत्तीच्या वाट्याचे तत्त्व आहे. सर्व सामान्य व्यक्तीला आवश्यक असणाऱ्या जीवनावश्यक गरजांची पूर्तता करणे याच तत्वांचा अवलंब करणे हे शासनाचे कर्तव्य ठरते. स्वातंत्र्यापूर्वी भारतामध्ये या तत्त्वाचा अवलंब केला जात नव्हता. ब्रिटिश राजवटीमध्ये जनतेच्या कल्याणामध्ये रस नव्हता. ब्रिटिश वसाहतवादी सरकार त्यांचीच काळजी घेत होते. भारतीय लोकांमध्ये त्यांना विशेष रस नव्हता.

भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी अनेक आव्हाने होती. सामाजिक आणि आर्थिक दरी निर्माण झालेली होती. भारतीय आर्थिक स्थिती अत्यंत दयनीय होती. अनेक सामाजिक समस्या होत्या. सामाजिक विषमता होती. स्त्रीया, दलित तसेच मुलांचे जीवन असह्य होते. घटनाकारांना या प्रश्नांची जाणीव झाली व त्यातूनच कल्याणकारी राज्य ही संकल्पना आली. भारतीय घटनेच्या संविधानात सार्व भौम, प्रजासत्ताक, निधर्म, लोकशाही राष्ट्र म्हणून उल्लेख आहे. घटनेमध्ये यासाठी विस्तृत तरतुदी केलेल्या असून त्यामधून सामाजिक आणि आर्थिक कल्याण प्रस्थापित व्हावे त्यासाठी मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्व यांच्या तरतुदी केल्या आहेत.

भारतीय राज्य घटनेच्या मूलभूत हक्क भाग ३ मध्ये नागरी स्वातंत्र्य आणि मूलभूत हक्क यांची हमी देण्यात आलेली आहे. हा नागरी स्वातंत्र्याचा हक्क भारतीय प्रदेशात लागू आहे. कायद्याने समानतेचा हक्क, भाषण स्वातंत्र्य, शांततेच्या मार्गाने संघटित होण्याचे स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, संविधानात्मक हक्क घटनेने दिले आहेत. परंतु हे सर्व पुरेसे नाही. भारतीय नागरीकांना आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी समान संधीची गरज आहे. राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या चौथ्या भागामध्ये घटनेमध्ये तरतूद केलेली आहे.

## पाठ्यांशावरील प्रश्न १७.१

१. कल्याणकारी राज्य म्हणजे काय?

२. भारतासाठी कल्याणकारी राज्य ही कल्पना घटनाकारांनी का मांडली?

३. सामाजिक विषमता असणाऱ्या भारतीय समाजातील कोणत्याही दोन घटकांची नावे लिहा.

## १७.२ राज्याची मार्गदर्शक तत्त्वे :

मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये हा भाग आपण पाहिलेला आहे. भारतीय घटनेमध्ये राजकीय हक्कांची तरतूद केलेली आहे. सामाजिक आणि आर्थिक हक्क मिळाल्याशिवाय भारतात खऱ्या अर्थाने लोकशाही असल्याचे दृष्टीक्षेपात येणार नाही. शतकभर वर्षे परकीयांनी राज्य केल्यानंतर खालावलेला सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी मर्यादा येतात. अशा स्थितीमध्ये मूलभूत हक्कांमध्ये आर्थिक आणि सामाजिक अधिकारांचे स्वातंत्र्य प्रदान करताना मर्यादा येतात. परंतु त्या हक्कांना विशेष महत्त्व आहे. त्याचा समावेश घटनेच्या चौथ्या भागात राज्याची मार्गदर्शक तत्त्वे या प्रकरणात आहेत.

### १७.२.१ वैशिष्ट्ये :

घटनेमध्ये केंद्रशासन आणि राज्यशासन यांना राज्याची मार्गदर्शकतत्त्व दिलेली आहेत. कोणत्याही राज्यातील न्याय आणि धोरण ठरविताना या मार्ग दर्शक तत्त्वांचे पालन करावे लागते. भारतीय घटनेनुसार या तरतूदी कायद्याने न्याय मागता न येणाऱ्या असल्या तरी कायद्याने त्यावर सक्ती करता येत नाही. परंतु राष्ट्रीय पातळीचा विचार करता या तत्त्वांचा अवलंब करावा लागतो. केंद्रशासनाला आणि राज्यशासनाला कायदा करताना देशातील समाज अशा अर्थी विचार करावा लागतो. या तत्त्वांचा प्रामुख्याने आयर्लंडची घटना आणि गांधीजींच्या तत्त्वांचा संदर्भ घेतलेला आहे.

सर्व नागरिकांना उत्तम जीवन लाभावे, सामाजिक आणि आर्थिक समानता यावी याच हेतूने ही तत्त्व दिलेली आहेत. भारतामध्ये आर्थिक व सामाजिक लोकशाही यावी हाच प्रमुख हेतू आहे. ही तत्त्वे राबविली की नाही यावर लक्ष देण्याचे काम जनतेचे आहे. सर्व प्रशासकीय यंत्रणांना हेच मार्गदर्शक तत्त्व असते. न्यायव्यवस्थेला देखील मनामध्ये ही संकल्पना ठेवूनच प्रकरणांचा निकाल द्यावा लागतो.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

- ❖ घटनेच्या कलम ३६ ते ५१ यामध्ये राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये समावेश आहे.
- ❖ बेचाळीसावी घटना दुरुस्ती झाली त्यामध्ये नव्या मार्गदर्शक तत्त्वाचा समावेश आहे. देशातील वने आणि वन्य प्राणी यांची रक्षणाची व त्याच्या विकासाची जबावदारी राज्यांवर दिलेली आहे.

## पाठ्यांशावरील प्रश्न १७२

**१. रिकाम्या जागा भरा.**

अ) राज्यांच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये उद्दिष्ट, भारत हे ......... राज्य असे आहे.

ब) कायदा आणि धोरण ठरविताना भारत ...... राज्य आहे या तत्त्वाचा अवलंब केलेला आहे.

टिपा

क) घटनेतील मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश हे ........ देशाच्या घटनेचे अनुकरण केले आहे.

ड) मार्गदर्शक तत्त्वांचा ........... शी संबंध आहे.

२. मार्गदर्शक तत्त्वांचा भारतीय राज्यघटनेमध्ये समावेश नसता तर राज्यघटनेचे मूळ तत्त्व अपयशी ठरले असते असे आपणास वाटते का? कारण लिहा.

## १७.२.२ मार्गदर्शक तत्त्वाचे प्रकार :

घटनेमधील मार्गदर्शक तत्त्वांचे निरीक्षण केल्यास असे लक्षात येईल की ती भिन्नभिन्न प्रकारची आहेत. काही तत्त्व सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी आहेत. काही तत्त्वे गांधीजींच्या तत्त्वांशी संबंधित आहेत. तर काही परकीय धोरणांशी संबंधित आहेत. घटनेमध्ये जरी स्वतंत्र मथळ्याची नसली तर सोयीसाठी आपल्याला त्यांचे वर्गीकरण करता येईल.

- सामाजिक आणि आर्थिक विकासाची तत्त्वे
- गांधीजींच्या विचारांची तत्त्वे
- आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेची तत्त्वे
- इतर संकीर्ण तत्त्वे

### अ) सामाजिक व आर्थिक विकासाची तत्त्वे :

भारतात सामाजिक आणि आर्थिक लोकशाही खऱ्या अर्थाने निर्माण होण्यासाठी काही तत्त्व दिलेली आहेत. अजूनही भारतात सामाजिक आणि आर्थिक विषमता आहे. समानतेच्या संदर्भातील तत्त्व पुढीलप्रमाणे



**आकृती १७.१**

१. जीवनावश्यक बाबींची समानतेची खात्री देणे.

२. जीवनावश्यक आवश्यक त्या वस्तूंचा पुरवठा करण्याची हमी.

टिपा

३. काही मोजक्याच लोकांच्या हाती संपत्ती जाणार नाही. याची काळजी घेणे.

४. स्त्री आणि पुरुष यांना समान कामासाठी समान वेतन.

५. वय वर्षे १४ पर्यंत सक्तीचे आणि मोफत शिक्षणाची कार्यवाही करणे.

६. कारखान्यातील कामगारांचा प्रशासनामध्ये समावेश करून घेणे.

७. बालकांची पिळवणूक होणार नाही यासाठी बंधने घालणे. आर्थिक हेतूसाठी स्त्रीपुरुष किंवा मुलांचे त्यांचे वय व क्षमता यापेक्षा अधिक कामाची सक्ती करू नये.

८. राज्यांनी अ) कामाचा अधिकार ब) शिक्षणाचा अधिकार क) बेकारी सोडविण्यासाठी तसेच, वार्धक्य, आजारपण, अपंगत्व या बाबींकडे लक्ष द्यावे.

९. मानवी दृष्टीकोनातून सुरक्षेची हमी द्यावी त्यांच्या कामाचे स्वरूप बाळंतपणाच्या सवलती इ. च्या तरतुदी कराव्यात.

### उपक्रम १७.१

खालील घटनेचे वाचन करून दिलेले कार्य करा.

एका कंपनीमध्ये स्त्रीपुरुष दोघेही एकत्र काम करतात. त्यांचे दोघांचे काम तेच आणि वेळही तिच होती. मालक मात्र स्त्रीला कमी व पुरुषाला जास्त पगार देत असे.

❖ सदरच्या बाबींमध्ये कोणते मार्गदर्शक तत्त्व अवलंब केलेले नाही?

________________________________________

________________________________________

________________________________________

❖ कल्याणकारी राज्य या तत्त्वाच्या विरुद्ध असलेल्या घटनेचे पत्र संपादक, राष्ट्रीय दैनिक यांना लिहा.

संपादकांना पत्र

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## ब) गांधीजींच्या विचारांची तत्त्वे :

अहिंसेचा मार्ग गांधीजीच्या विचारात आहे. स्वराज (स्वयंशीस्त) सर्वोदय (सर्वांच्या स्वास्थासाठी) स्वावलंबन (स्वत:ची कामे स्वत:करणे) यांचा समावेश गांधीजींच्या तत्त्वामध्ये आहे. स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये गांधीजी अग्रस्थानी होते. गांधीजीची तत्त्वे आणि कृती हे केवळ स्वातंत्र्य मिळविण्यासाठी नव्हे तर भारतीय घटनेमध्येसुद्धा समावेश आहे. गांधीजींच्या विचारसरणीचा समावेश पुढील मार्गदर्श क तत्त्वांमध्ये दिसून येतो.

१. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाला आर्थिक आणि शैक्षणिक संधी देणे विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना संधी देणे.

२. ग्रामपंचायतींची स्थापना करावी. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून त्यांना सक्षम करण्यासाठी त्यांना सत्ता आणि अधिकार देणे.

३. दारुबंदी करण्यासाठी राज्यांनी प्रयत्न करावेत तसेच अवकारी वस्तूंवर निर्बंध घालावेत.

४. घरगुती उद्योगांना राज्यांनी प्रोत्साहन द्यावे.

५. प्राण्यांची गुणवत्ता सुधारावी. गायी, वासरे तसेच दुभत्या जनावरांची हत्या थांबवावी व कत्तलकारखान्यांवर बंदी घालावी.

### उपक्रम १७.२

१. घटनेप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ३३% राखीव जागांची तरतूद करण्यात आलेली आहे. एखाद्या नजीकच्या खेड्यात जावून ग्रामपंचायत किंवा नगर पालिकेतील कार्यालयात जावून वर दिलेल्या तरतूदींचा अवलंब केला की नाही याचा पडताळा घ्या व खालील सारणी पूर्ण करा.

| एकूण ग्रामपंचायत सदस्यांची<br>नगरपालिका सदस्य संख्या | स्त्री प्रतिनिधींची संख्या |
|---|---|
| | |

२. कोणत्याही दोन स्त्री सदस्यांशी चर्चा करून सोबतची सारणी पूर्ण करा.

| | निवडून आलेले प्रतिनिधी क्र. १ | निवडून आलेले प्रतिनिधी क्र. २ |
|---|---|---|
| तुमच्या क्षेत्रामध्ये ३ विधायक झालेले बदल | १<br>२<br>३ | १<br>२<br>३ |

| | | |
|---|---|---|
| काम करीत असताना कोणत्यही ३ आव्हानांचा सामना करावा लागला. | १<br>२<br>३ | १<br>२<br>३ |

### क) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षेशी संबंधित तत्त्वे :

घटनाकारांनी आंतरराष्ट्रीय धोरणांसाठी काही मार्गदर्शक तत्त्व दिलेली आहेत.

१. राज्यांनी आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यांना प्राधान्य द्यावे.

२. इतर राष्ट्रांशी संबंध सन्मानपूर्वक राखण्याचा प्रयत्न करावा.

३. आंतरराष्ट्रीय कायदा आणि करारांचा सन्मान वाढवावा.

४. आंतरराष्ट्रीय तंटे चर्चेतून मिटविण्यासाठी पोत्साहन द्यावे.

### ड) इतर संकीर्ण तत्त्व :

१. पर्यावरणाचे रक्षण करणे तसेच त्याची गुणवत्ता वाढविणे, वनांची सुरक्षितता तसेच वन्य प्राण्याचे रक्षण करणे.

२. ऐतिहासिक वास्तू आणि ठिकाणे तसेच राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या गोष्टी यांचे रक्षण करून त्याची योग्य देखभाल ठेवण्याचा प्रयत्न करणे.

३. देशातील सर्व नागरिकांना समान कायदा असावा.

४. न्यायमंडळ आणि कार्यकारी मंडळ स्वतंत्र असावीत.

### पाठ्यांशावरील प्रश्न १७.३

१. राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचे प्रमुख प्रकार कोणते ते लिहा.

२. खालील सारणीतील नमुन्याप्रमाणे तत्त्व आणि त्यापुढे तत्त्वाचे वर्गीकरण लिहा.

| मार्गदर्शक तत्त्व | तत्त्वांचे वर्गीकरण |
|---|---|
| अ राज्याने सर्वांना जीवनासाठी पुरेशी आर्थिक साधने देणे | सामाजिक व आर्थिक समानतेला प्रोत्साहन देणे. |
| ब न्याय मंडळ व कार्यकारी मंडळ स्वतंत्र ठेवण्याचा प्रयत्न करणे. | |

| | | |
|---|---|---|
| क | राज्यांनी इतर राष्ट्रांशी संबंध सन्मानपूर्वक राखण्याचा प्रयत्न करणे. | |
| ड | ग्रामपंचायती स्थापन करण्याचा राज्यांनी पुढाकार घ्यावा. | |
| इ | स्त्री व पुरुषांना समान कामासाठी समान वेतन असावे. | |
| फ | ग्रामीण भागात कुटिरोद्योग सुरू करण्याचा प्रयत्न करावा. | |

## १७.३ राज्याची मार्गदर्शक तत्त्व आणि मूलभूत हक्क :

राज्याच्या कल्याणासाठी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वाची आपण माहिती घेतली याच प्रमाणे मूलभूत अधिकारही आहेत. परंतु दोन्हीमध्ये काही फरक आहे.

एक म्हणजे मार्गदर्शक तत्त्वांना न्याय मागता येत नाही आणि राज्यांनी ती राबवावीत अशी कायदेशीर तरतूद नाही. मूलभूत हक्कांबावत मात्र न्याय मागता येतो. मूलभूत हक्क कोणत्याही नागरीकाला नाकारता येत नाही. त्यांना उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाचे रक्षण आहे.


दुसरे म्हणजे मार्गदर्शक तत्त्व ही दिशा देणारी आहेत. राज्याच्या कल्याणासाठी ही मार्गदर्शक तत्त्वे आहेत. मात्र मूलभूत हक्क घटनेने दिलेले असून प्रत्येक नागरिकाच्या हक्कांच्या रक्षणाची हमी दिलेली आहे.

तिसरे म्हणजे घटनेमध्ये मूलभूत हक्कांच्या नंतर मार्गदर्शक तत्त्व दिलेली आहेत. याचाच अर्थ मूलभूत हक्क हे मार्गदर्शक तत्त्वांच्यापेक्षाही महत्त्वाचे आहेत.

जरी मूलभूत हक्काप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वांना स्थान नसले तरी त्यांना महत्त्व कमी आहे असे समजता येणार नाही. मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करणे ही अभिमानास्पद आणि राज्याची लोकप्रियतेची बाब आहे. आपणास माहीत आहे की ही बाब म्हणजे लोकशाहीचा पाया आहे. त्यामुळे मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्व दोन्हीची उद्दिष्टे सारखीच आहे. हे लक्षात येईल. तो परस्पर विरोधी नसून ती परस्परांना पुरक आहेत. मूलभूत हक्कांमुळे राजकीय लोकशाहीची हमी मिळते तर मार्गदर्शक तत्त्वामुळे सामाजिक आणि आर्थिक लोकशाही प्रस्थापित होते. लोकांच्या जागृतीवर मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब असतो. लोकांसाठी मोठ्या उत्साहाने ही तत्त्व अवलंबली जातात. लोकांचे हित सरकारला डावलता येत नाही. राज्यामध्ये मार्गदर्शक तत्त्व राबविण्याचे धोरण अवलंबीले तर तुम्हाला चांगलेच म्हणतील.

### ? तुम्हास हे माहित आहे का ?

जयपूरनजीकच्या खेड्यात शहजादखान आणि सीमा धनू यांनी बालपंचायत नावाचा तरुणांचा संघ स्थापन केला. राजस्थानमधील सामाजिक विकास झाल्याचे एक नमुनेदार उदाहरण आहे. या तरुण गटाने विविध कामात भाग घेतला. उदा. स्वच्छता, शिक्षणाचा अधिकार, मुलींचे अधिकार त्यांच्या गावाप्रमाणे आजूबाजूच्या खेड्यातही काम केले. बालमजूर बंदीसाठी प्रयत्न





केले. कुटुंबातील कामाला जाणारी मुले शाळेत जावू लागली. शहजादने राजस्थानच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेतली व मुलांच्या स्थितीची माहिती दिली. हे नमुनेदार उदाहरण आहे. एखाद्याच्या कामामुळे शासनाकडून समाजासाठी काही करता येते. तुम्हालाही असे करता येईल.

## १७.४ राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वाची अंमल बजावणी

मार्गदर्शक तत्त्वांची कार्यवाही राज्य सरकार किंवा केंद्रसरकार अंमलबजावणी करते का याची उत्सुकता तुम्हाला लागलेली असेल. भारतात सर्व शिक्षा अभियान हा केंद्रसरकारच्या उपक्रम प्रत्येक राज्यात राबविला गेला आहे हे ऐकलेले आहे का? शिक्षणाचा अधिकार कायदा २००९ ला लोकसभेने मंजूर केलेला आहे. हा राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वाचा भाग आहे.

बिहारमध्यप्रदेश या सारख्या राज्यांधील स्थानिक स्वराज्यसंस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवलेल्या आहेत. अशी उदाहरणे पाहिली तर प्रत्यक्षात ही मार्गदर्शक तत्त्वे पाळण्याचे बंधन नसतानाही राज्यसरकारनेच याची कार्यवाही केलेली आहे. राबविलेली काही मार्गदर्शक तत्त्वे पुढीलप्रमाणे

❖ किमान वेतनाची कार्यवाही सर्वच नोकरीच्या क्षेत्रामध्ये केलेली आहे.

❖ स्त्रीपुरुषांना समान कामाचे समान वेतन दिले जाते.

❖ ग्रामीण रोजगारसंधीसाठी विविध कार्यक्रम राबविले जात आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (MGNREGA) आणि सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना यापैकीच आहेत.

❖ पंचायत राजला संविधानात्मक दर्जा दिलेला आहे. ग्राम पातळीवर कार्यवाहीसाठी ग्रामपंचायतीची स्थापना केलेली आहे.

❖ ८६ वी घटना दुरुस्तीमध्ये मोफत आणि सक्तीचे शिक्षण आणि शिक्षणाचा हक्क हा कायदा सन २००९ मध्ये मंजूर झाला असून तयानुसार मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा मूलभूत हक्क मिळालेला आहे.

❖ मुलांचे पिळवणूकीपासून संरक्षण करण्यासाठी निरनिराळे कायदे केलेले आहेत.

❖ गरीब व मागासलेल्या वर्गासाठी तसेच अनुसूचित जाती जमातीच्या लोकांच्या कल्याणासाठी योजना आखलेल्या आहेत संसदेतील आणि विधानसभेतील काही जागा राखीव ठेवलेल्या आहेत.

❖ स्त्रीयांच्या पिळवणूकीला पायबंद घालण्यासाठी कायदा केलेला असून त्यांच्या कल्याणाच्या योजना सुरू केलेल्या आहेत.

❖ बेचाळीसावी घटना दुरुस्त करून पर्यावरण रक्षण व सुधारणा करून वने व वन्यप्राणी यांचे रक्षणासाठी कायदा केलेला आहे. विशेष मोहिमा म्हणून व्याघ्र, गेंडा, हत्ती प्रकल्प राबवून नव्याने अशी मार्गदर्शक तत्त्व वाढविलेली आहेत. न्यायमंडळ व कार्यकारी मंडळ एकमेकांपासून वेगळे केलेले आहेत.

- ❖ घरगुती उद्योग उभारलेले आहेत आणि त्यावरील कर सवलती दिलेल्या आहेत.
- ❖ आपले परकीय धोरण हे आंतरराष्ट्रीय शांततेच्या व सुरक्षिततेच्या तत्त्वावर तसेच राष्ट्राराष्ट्रांमधील संबंध सन्माननीय स्वरूपाचे राखलेले आहेत.
- ❖ भारत सरकारचा नेहमीच जागतिक शांततेसाठी पाठींबा राहील.

वरील सर्व बाबींमध्ये मार्गदर्शक तत्त्वे राबविण्याचे धोरण केंद्र; राज्य तसेच स्थानिक पातळीवर राबवित आहेत. अनेक कामे केलेली आहेत. परंतु देशात दारिद्र्य, बेकारी, अनारोग्य, निरक्षरता अशा समस्या आजही आहेत. यामधून जीवनमानाचा दर्जा सुधारला आहे हे शासनाच्या कामाचे फलित त्यात दिसून येते. काही आव्हाने आहेत. मार्गदर्शक तत्त्वांना प्रतिसाद मिळणे आवश्यक आहे.

## उपक्रम १७.३

तुमच्या राज्यामध्ये केंद्र किंवा राज्यसरकारच्या राबविल्या जाणाऱ्या लोककल्याणकारी चार योजना लिहा. सदरची माहिती वर्तमानपत्र, इंटरनेटवरून किंवा शिक्षकांच्याकडून चर्चेतून मिळवा.

| अ. क्र. | कार्यक्रम | कोणत्या काळात योजना राबविली | राज्य / केंद्र सरकारची योजना |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |

## पाठ्यांशावरील प्रश्न १७.४

१. पुढील घटना दुरुस्तीची नावे लिहा.

अ) वय वर्ष ६ ते १४ मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार

ब) पर्यावरण रक्षण आणि गुणवत्ता सुधारणा तसेच वने व वन्यप्राणी रक्षण

२. पुढील घटना कोणत्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये बसतात त्यावर शासनाला काय कार्यवाही करता येईल.

| घटना | मार्गदर्शक तत्त्व |
|---|---|
| अ) दहा वर्षाचा मुलगा कमी पगारावर हॉटेलमध्ये भांडी घासण्याचे काम करतो. | |
| ब) आठ वर्षाच्या मुलीला शाळेत प्रवेश दिलेला नाही. | |
| क) मद्यार्क व घातक आमली पदार्थ विक्रीसाठी मदत करणे. | |
| ड) ऐतिहासिक वास्तूच्या सुरक्षेची काळजी घेतलेली नाही. | |

## आपण काय शिकलो?

- कल्याणकारी राज्य म्हणजे नागरीकांच्या आर्थिक व सामाजिक सुरक्षेची काळजी घेण्याची महत्त्वाची भूमिका आहे. कल्याणकारी राज्य की संकल्पना समान संधी, संपत्तीचे समान वाटप आणि सर्वसामान्य माणसाला जीवनावश्यक बाबींचा अत्यावश्यक पुरवठा.
- लोकांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी घटनेती मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश केलेला आहे.
- मार्गदर्शक तत्त्वांना कायदेशीर सत्ती नाही.
- देशाचा राज्यकारभार पहाताना केंद्र आणि राज्य सरकारच्या दृष्टीने ही तत्त्व राबविणे संपूर्ण देशासाठी समाजासाठी कायदे करण्याचे तत्त्व असावे.
- मार्गदर्शक तत्त्व राबवीताना त्यांच्या प्राधान्यक्रम ठरवावा लागतो.

  अ) सामाजिक व आर्थिक समानता     ब) गांधीजीच्या विचारांची तत्त्वे

  क) आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षिततेची तत्त्व     ड) संकीर्ण तत्त्व
- मार्गदर्शक तत्त्व ही मूलभूत हक्कांपेक्षा भिन्न असली तरी एकमेकांना पुरक आहेत.
- राज्याच्या कल्याणासाठी केंद्र आणि राज्य सरकार विविध मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करीत असते.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. कल्याणकारी राज्य म्हणजे काय? भारतीय राज्य घटनाकारांनी कल्याणकारी राज्य या बाबींचा समावेश का केलेला असेल?

टिपा

२. कल्याणकारी राज्य या संकल्पनेचा उद्देश कोणता?

३. राज्याची मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत हक्क ही भिन्न कशी आहेत?

४. राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये गांधीजीची तत्त्वे कोठे आढळतात?

५. सामाजिक आणि आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांचा कशाप्रमाणे उपयोग होतो.

६. भारत आणि पाकिस्तान दरम्यान सचिव पातळीवर अणुशक्ती व शांततेच्या धोरणाबाबत झालेली चर्चा ही राज्याच्या कोणत्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आहे?

७. प्रत्यक्ष राबविलेल्या कोणत्याही तीन मार्गदर्शक तत्त्वाचे वर्णन करा.

पुढील गोष्ट वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

दहा वर्षाचा भोलू शहरात आला. त्याचे तेथे काळजी घेणारे कोणीच नव्हते म्हणून तो रस्त्यावरचा कचरा उचलण्याचे काम करी. रात्री तो एका दवाखान्याच्या बाहेर फूटपाथवर राहायचा. शाळेत जात नसे. दिवसभर गोळा केलेला कागद, प्लॅस्टिक, दवाखान्याचा कचरा अशा घातक वस्तू विकून दिवसभरात २० रुपये मिळत टाकून दिलेल्या अन्नावर त्याची गुजरान होत असे त्याला दुसरा पर्याय नव्हता.

अ) भोलूच्या या परिस्थितीसाठी कोणत्याही दोन कारणाची शक्यता लिहा.

ब) भोलूसारखी स्थिती असणाऱ्या मुलांबाबत दोन मार्गदर्शक तत्त्वे लिहा.

क) मित्रांबरोबर भोलूच्या स्थितीची चर्चा करा आणि ती दूर करण्यासाठी कोणतेही दोन उपाय सूचवा.

## पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे

### १७.१

१. नागरिकाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीच्या रक्षणासाठी शासनाची सामाजिक कल्याणाची जबाबदारी असते. समानतेचे तत्त्व समान संपत्तीवाटपाचे तत्त्व हा पाया आहे.

२. भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी अनेक समस्या व आव्हाने होती. सामाजिक विषमता असमता, स्त्रिया दलित, मुले यांच्या मूलभूत समस्या होत्या. घटनाकारांना याची जाणीव होती. म्हणूनच भारत कल्याणकारी राज्य ही गोष्ट उचलून धरली, .

३. स्त्रिया आणि दलित

### १७.२

१. अ) कल्याण

ब) केंद्र व राज्य सरकार

क) आयर्लंड

ड) सामाजिक व आर्थिक हक्क

२. होय. राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचा प्रमुख उद्देश हा नागरिकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत सुधारणा होवून उत्तम जीवनमान जगता यावे यासाठी आहे. म्हणजेच आर्थिक आणि सामाजिक लोकशाही प्रस्थापित करणे.

**१७.३**

१. राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येते.

अ) सामाजिक व आर्थिक समानतेची तत्त्वे

ब) गांधीजींच्या विचारांची तत्त्वे

क) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेशी संबंधित तत्त्वे

ड) संकीर्ण तत्त्वे

२. अ) सामाजिक व आर्थिक समानतेची तत्त्वे

ब) संकीर्ण तत्त्वे

क) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेशी संबंधित तत्त्व

ड) गांधीजींच्या विचारांची तत्त्वे

ई) सामाजिक व आर्थिक समानतेची तत्त्वे

फ) गांधीजींच्या विचारांची तत्त्वे

**१७.४**

१. अ) शेहाऐंशीवी घटना दुरस्ती

ब) बेचाळीसावी घटना दुरुस्ती

२. अ) पिळवणूकीपासून मुलांचे व युवकांचे रक्षण

ब) वयाच्या १४ वर्षापर्यंत मुलांचे सक्तीचे व मोफत शिक्षण ही राज्याने यासाठी उचललेली पावले.

क)मद्यार्क व अमली पदार्थांच्या सेवनावर बंदी यासाठी केलेले प्रयत्न

ड)ऐतिहासिक वास्तूची निगा व रक्षणाची कार्यवाही करणे.

टिपा

# १८


# स्थानिक सरकार व त्यांचे प्रशासन

रामफल खेडे सोडून उदर निर्वाहासाठी शहरात आला. याला नोकरी मिळताच त्याचे कुटुंबीयही आले. आठ वर्षाच्या काळानंतर तो व त्याचा मुलगा विजय गावी आले. गावातील नवीन बांधलेली प्राथमिक शाळा त्याला संरक्षण भिंत, हॉलिवॉलचे मैदान गावची विंधन विहिर, सभोवताली बाग हे सगळ बदललं ते रामफल गाव सोडून गेल्यानंतर, विजयने आपला चुलतभाऊ उच्च वर्णीयांच्या मुलांसोबत खेळताना पाहीला. हे त्याला आश्चर्याचे होते. कारण या आधी गरीब व अस्पृश्य मुलांना उच्चवर्णीयांबरोबर खेळण्यास मज्जाव होता. हे असं कसं घडल याबाबत उत्सुकता होती. तो जेव्हा आपल्या शिक्षकांना भेटला तेव्हा विजयने त्यांना या मागचं कारण विचारलं. हा जो बदल दिसतो तो ग्रामपंचायतीचे नवीन निवडून आलेले सरपंच व उपसरपंच आणि त्यांना प्रशासनाने दिलेली साथ यामुळेच बदल झाला. आपली एक चुलती सुद्धा ग्रामपंचायत सदस्य आहे. याचेही त्याले बरे वाटले. त्याला स्थानिक शासन ग्रामपंचायत आणि त्यांचे काम याबद्दल अधिक माहिती मिळवावयाची होती. सदरच्या पाठात शिक्षकाने दिलेल्या माहितीची चर्चा आहे.

## उद्दिष्टे :

सदरच्या पाठ अभ्यासानंतर पुढील गोष्टी समजतील.

- खेडे व शहरातील स्थानिक शासनातील लोकांच्या प्रयत्नांनी लोकशाहीस बळकटी देणे.
- ग्रामीण व नागरी स्थानिक सरकारची गरज
- भारतातील स्थानिक शासनाची रचना व कार्य (ग्रामीण व नागरी)
- ७३ वी व ७४ वी घटना दुरुस्ती व महिला सबलीकरणासाठी प्रयत्न
- विविध पातळीवर आवश्यकतेनुसार अधिकाऱ्याचे महत्त्व उत्तम प्रशासनासाठी स्थानिक सरकारमधील प्रतिनिधींचे महत्त्व
- दैनंदिन जीवनामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाचे महत्त्व





## स्थानिक सरकार व त्यांचे प्रशासन

### १८.१ स्थानिक शासन

ग्रामपंचायतीला स्थानिक शासन का म्हणतात. असा प्रश्न विजयने आपल्या शिक्षकांना विचारला. भारतामध्ये संघराज्य शासन आहे. केंद्रसरकार हे मध्यवर्ती असून राज्य सरकार हे राज्य पातळीवर काम करते. या शासन व्यवस्थेबरोबरच ग्रामीण आणि नागरी भागात काम करणाऱ्या शासकीय व्यवस्थेला स्थानिक सरकार म्हणतात. ही त्रिस्तरीय शासन व्यवस्था असून विकासासाठी सामाजिक न्याय मिळावा यासाठी तसेच प्रशासनाचे विकेंद्रीकरण करण्याचा त्यामागे हेतू आहे. स्थानिक प्रशासन हे उत्तम प्रशासन समजले जाते कारण लोकांचा थेट प्रशासनाशी संबंध असतो. प्रशासनात स्थानिक लोकांचा सहभाग असतो, समस्याही स्थानिक असतात, त्यामुळे स्थानिक परिस्थितीमधून उपाय योजले जातात. स्थानिकांकडून स्थानिकांसाठी चालविलेले स्थानिक सरकार. लोकांसमोरच सर्व बाबी असल्याने लोकांचे त्यावर सतत लक्ष असते. दैनंदिन गोष्टी नजरेसमोरच असल्याने स्थानिक नागरिकांना सेवा द्यावा लागतात.

भारतात फार प्राचीन काळापासून समाजावर आधारित असणाऱ्या भारतातील काही संस्था काम करीत होत्या हे विजय तुला माहीत असेल असे शिक्षक म्हणाले, यालाच पंचायत किंवा बिरादारी अथवा अन्य नावाने ओळखले जाते. वयस्कर जाणकार याच्याकडे नेतृत्व दिले जाई आणि गावातील समस्या सोडविण्याचा प्रयत्न असे. सिनेमातून किंवा टी. व्ही च्या सिरिअलमधून गावातील लोकांच्या समस्या पंचायत ऐकून घेते व त्या सोडविल्या जातात. असे प्रेमचंद यांच्या 'पंच परमेश्वर' या कथानकामध्ये पंचायतीचे काम दिसून येते. आजही फार पूर्वीपासून चालत आलेली प्रथा खेड्यात चालू आहे. त्याचे महत्त्व लक्षात घेवून शासनाने समाजाच्या हितासाठी ही पद्दती चालू ठेवली आहे.

#### १८.१.१ ग्रामीण आणि नागरी स्थानिक शासन :

स्थानिक सरकार हे फक्त ग्रामीण भागातच असते असे नसून शहरामध्येही नागरी लोकांसाठी अशा प्रकारचे स्थानिक शासन काम करते. फरक असतो तो फक्त ग्रामीण भागात स्थानिक शासन व्यवस्था छोटी असते कारण लोकसंख्या कमी असते. परंतु शहराचे क्षेत्र मोठे असते तसेच लोकसंख्याही जास्त असते. म्हणून ग्रामीण आणि नागरी स्थानिक शासन असे समजले जाते. ग्रामीण शासन व्यवस्थेला पंचायत राज म्हणतात. नागरी स्थानिक शासन व्यवस्था तीन प्रकारची आहे. महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायत. पंचायतराज पद्धती आणि नागरी स्थानिक शासन यांची कार्य पद्धती यामध्ये सन १९९२ ला ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती करून बदल घडवून आणला.

### १८.२ पंचायत राज व्यवस्था :


पंचायत राज व्यवस्था ही पूर्वी ते एक न्यायालयच होते. स्थानिक वादविवाद आणि विविध समस्या पंचायतीमध्ये मांडल्या जात. त्या निर्णयाचा सर्वांनी सन्मानपूर्वक स्वीकार करावा लागत असे. या कार्यपद्धतीवर महात्मा गांधींचा पूर्ण विश्वास होता. घटनाकारांनीही या पद्धतीचा स्वीकार केला आणि राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये त्याचा समावेश केला. देशाच्या घटनेमध्ये राज्यांनी ग्रामपंचायतही स्थापन करण्यास पुढाकार घेतला जावा व सक्षमीकरण करून अधिकार प्रदान करावेत व स्थानिक सरकार चालवावे असे सूचित करण्यात आलेले आहे.




आकृती १८.१

सध्याची पंचायत राज व्यवस्था ही पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात सामुहिक विकास कार्यक्रम या नावाने सुरू झाली. स्थानिक पातळीवरील विकास महत्त्वाचा बनला त्या दृष्टीने एक उच्चाधिकार समिती बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आली. या मेहता समितीने सन १९५७ मध्ये अभ्यासपूर्ण अहवाल सादर केला. या समितीच्या शिफारशीनुसार ग्रामीण स्वराज्य सरकारची त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था स्वीकारली गेली. ग्रामपंचायत ही खेड्याच्या पातळीवर, पंचायत समिती हा गट पातळीवर (मध्यमपातळी) तर जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद अशी त्रिस्तरीय रचना सूचविली. सन १९९८ राष्ट्रीय विकास समितीनेही अशीच रचना सूचविली. ग्राम पातळी ही सर्वात खालची आणि जिल्हा हा सर्वात वरच्या पातळीवर अशी रचनेची शिफारस केली. तथापी सन १९९२ या वर्षी घटनेची ७३ वी दुरुस्तीनुसार सध्याची पंचायतराज पद्धतीने जागा घेतली. ही त्रिस्तरीय पद्धती अनेक

राज्यांनी स्वीकारली. यामध्ये ग्रामीण, मध्यम पातळी व जिल्हा पातळी ही त्रिस्तरीय रचना आहे. परंतु ज्या राज्याची लोकसंख्या २० लाखापेक्षा कमी आहे तेथे ग्रामीण आणि जिल्हा पातळी अशा दोन पद्धती मध्ये प्रशासन व्यवस्था आहे.




**आकृती १८.२ : पंचायत राजपद्धतीची त्रिस्तरिय रचना**

### १८.२.१ ७३ वी घटना दुरुस्ती सन १९९२

७३ व्या घटना दुरुस्तीने (सन १९९२) ने संघराज्य लोकशाहीचे नवीन पर्व सुरू झाले. व पंचायतराज ला (PRI) घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. त्याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे

१. त्रिस्तरीय रचनेची स्थापना : ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांची स्थापना केली.

२. दर पाच वर्षांनी निवडणूका

३. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्या लोकसंख्येनुसार राखीव जागा.

४. स्त्रीयांसाठी राखीव जागांचे प्रमाण एक तृतीयांश पेक्षा कमी नसावे.

५. पंचायतराजसाठी राज्य आर्थिक आयोगाने काही आर्थिक शिफारशी सूचविलेल्या आहेत.

६. पंचायत राजच्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना केली.

७. जिल्ह्याच्या विकासाचा आराखडा करण्यासाठी जिल्हा नियोजन मंडळाची स्थापना केली.

८. आर्थिक विकास व सामाजिक न्यायाच्या कार्यवाहीसाठी योजना तयार करून त्याच्या कार्य वाहीसाठी २९ विषयांची यादी घटनेच्या ११ व्या परिशिष्टामध्ये दिलेली आहे.

९. ग्राम पातळीवर ग्रामसभेला निर्णयाचे अधिकार देण्यात आलेले आहेत

१०. पंचायत राज व्यवस्थेवर महिला आणि अनुसूचित जातीचे चक्रीय पद्धतीने पद देणे.

गटनेच्या ७३ व्या कलमानुसार पंचायत राज व्यवस्थेला कार्यवाहीसाठी अधिकार दिलेले आहेत. त्यामध्ये जबाबदारी अधिकाराशी निगडीत आहे.

अ) आर्थिक विकास आणि सामाजिक न्यायासाठी आराखडा तयार करणे.

ब) आर्थिक विकास व सामाजिक न्यायाच्या योजना त्यांच्यासाठी राबविणे.

### तुम्हास हे माहित आहे का ?

७३ वी घटना दुरुस्ती जवळजवळ सर्वच राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशात लागू झाली त्याला फक्त जम्मू कश्मीर, दिल्ली आणि उत्तरांचल यांचा अपवाद आहे. देशातील सर्वच राज्ये व केंद्रशासित प्रदेशात स्थानिक समितीच्या निवडणूका होतात. देशातील ३, ३२, २७८ ग्रामपंचायती, ६0२२ मध्यम स्तर तर ५३५ जिल्हा परिषदांचा त्यामध्ये समावेश आहे. निवडून आलेल्या सदस्यांची एकूण संख्या २९.२ लक्ष इतकी आहे. जगातील सर्वाधिक प्रतिनिधित्व करणारी संख्या दिसून येते.

### पाठ्यांशावरील प्रश्न १८.१

१. स्थानिक शासन व्याख्या लिहा. स्थानिक शासनाच्या गरजेचे दोन मुद्दे लिहा.

२. पंचायत राज व्यवस्थेची प्राचीन व्यवस्था कशी होती. त्याची माहिती लिहा.

३. तुमचे घर जेथे आहे तेथील स्थानिक शासन व्यवस्थेची नावे व माहिती लिहा.

४. स्थानिक शासन व्यवस्था असलेल्या ठिकाणी जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी कोणत्या सुविधा पुरविल्या जातात.

५. पंचायत राज पद्धती मध्ये सन १९९२ या वर्षी ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार कसा बदल झाला?

### उपक्रम १८.१

खालील विधानांची चर्चा तुमचे शिक्षक, घरातील मोठ्या व्यक्ती, शेजारी किंवा तुमच्या मित्रांशी करा.

१. तुम्ही ग्रामीण भागात किंवा नगरात अथवा शहरामध्ये रहात असाल तेथील स्थानिक सरकारची रचना कशी असते ते लिहा.

२. संबंधित संस्थेमधील पदाधिकाऱ्यांची पदे व संख्या शोधा.

### १८.२.२ ग्रामपंचायत, रचना, कार्य व उत्पन्नाचे मार्ग :

#### अ) रचना :

पंचायत राज पद्धतीमधील ग्रामपंचायत हे मूळ आहे. खेडयामध्ये ग्रामपंचायत असते. ग्रामपंचायतीच्या अध्यक्षांना सरपंच किंवा मुखिया म्हणतात. त्याखालोखाल उपसरपंच हे पद असते आणि काही सदस्य असतात ग्रामपंचायत कायद्याला प्रत्येक राज्याने त्याला मंजूरी दिलेली आहे. त्यामुळे प्रत्येक राज्यामध्ये

ही व्यवस्था राबविण्यात विविधता दिसते. परंतु सर्वसाधारणपणे कार्य पद्धतीपुढीलप्रमाणे आढळून येते.

### अ) ग्रामसभा ः

संबंधित खेड्यात राहणारे सर्व प्रौढ नागरिक हे ग्राम सभेचे सदस्य असतात. (वय वर्षे १८ पेक्षा अधिक) ग्रामपंचायतीसाठी ते कायदेमंडळ म्हणून समजले जाते. वर्षातून किमान दोन ग्रामसभा होतात. पहिल्या ग्रामसभेत ग्रामपंचायतीचे बजेट (अंदाजपत्रक) सादर केले जाते. दुसऱ्या सभेमध्ये ग्रामपंचायतीचा अहवाल सादर केला जातो. ग्रामसभेचे मुख्य कार्य म्हणजे वार्षिक लेखे त्यावरील चर्चा, प्रशासकीय अहवाल, कर तरतुदी सार्वजनिक सेवा, स्वयंरोजगार योजना इत्यादी. ग्रामसभेतून अध्यक्षाची निवड होते. राज्य सरकार ग्रामपंचायतीच्या कामकाजाची खात्री करून घेते.



आकृती १८.३ : ग्रामसभा

### ग्रामपंचायत :

ही कार्यकारी समिती ग्रामसभेचे आयोजन करते. स्थानिक शासन व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. गुप्त मतदान पद्धतीने ग्रामसभेतून ग्रामपंचायत सदस्यांची निवड करते. अनेक ग्रामपंचायतीमध्ये पंचांची संख्या ५ ते ९ असते. प्रत्येक पंचायतीमध्ये एक तृतीयांश संख्या पंचायत सदस्य महिला उमेदवारांसाठी राखीव असतात. काही राज्यांमध्ये ही संख्या त्यापेक्षा अधिक आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्यासाठीही राखीव जागा असतात. सरपंचांची निवड ही तेथील मतदारांकडून होते.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमध्येही सरपंच हे पद महिला सदस्यांसाठी राखीव असते. सरपंच सभेचे निमंत्रण देतात आणि त्या सभेचे ते अध्यक्ष असतात. महिन्यातून किमान एक सभेचे आयोजन

टिपा

करवे लागते. विशेष सभा विनंतीपासून तीन दिवसात घ्यावी लागते. पंचायतीचे रेकॉर्ड सरपंचांना सांभाळावे लागते. विशेष कार्यक्रमाचे आयोजनही करावे लागते. उपसरपंच हे पंचायतीमधील सदस्य असून यांचाही कार्यकाल ५ वर्षांचा असतो.

### ब) ग्रामपंचायत कार्य :

ग्रामपंचायतीबद्दल अधिक माहिती मिळविण्यासाठी आणि ग्रामपंचायतीत होणारा पैशाचा पुरवठा याबाबत शिक्षकांकडून अधिक माहिती मिळविण्यासाठी विजय अगदी उत्सुक झालेला होता. शिक्षक सर्व माहिती सविस्तररित्या देतात. ग्रामपंचायतीची सर्व कामे समाज हितासाठी आणि खेड्याच्या विकासासाठी असतात. खेड्याच्या गरजा भागविण्यासाठी महत्त्वाची कामे करावी लागतात. पिण्याचे पाणी, रस्ते, गटारांची व्यवस्था, गावाची स्वच्छता, रस्त्यावरील दिवे, दवाखाना इत्यादी व्यवस्था करावी लागते. ही कामे अत्यावश्यक असतात. काही कामे ही ऐच्छिक असतात. प्रत्यक्षात ग्रामपंचायतीकडे असलेल्या पैशावरच अवलंबून असतात. वृक्षारोपण, जनावरांसाठी कृत्रिम रेतन केंद्र, मैदानांचा विकास, ग्रंथालय इत्यादी कामे ऐच्छिक असतात. वरील कामांशिवाय राज्यशासन किंवा केंद्राकडून आलेल्या आदेशानुसार कामे करावी लागतात. खेड्यातील प्रत्येक नागरीकांची काही जबावदारी असते. प्रत्येकाने आपले घर स्वच्छ ठेवावे. पाणी वाया घालवू नये. वृक्षांची लागवड करावी. इत्यादी कामांची जबावदारी ही प्रत्येकाची आहे.

### क) ग्रामपंचायतीचे उत्पन्नाचे मार्ग :

विविध कामांसाठी उत्पन्नाचे साधन आवश्यक असते. जरी काही बाबी अत्यावश्यक किंवा विकासाची कामे असली तरी पैशा हा आवश्यक असतो. उत्तम कामासाठी पुरेसा निधी खर्च करावा लागतो. काही प्रमाणात अनुदान मिळत असले तरी उत्पन्नाचे साधन म्हणून राज्यसरकार हे ग्रामपंचायतीला कर संकलन करण्यास मान्यता देते.

१. संपत्ती, भूमी, माल व जनावरे यावरील कर

२. पंचायतीच्या विविध इमारतींचे भाडे उदा. मंगल कार्यालय

३. काही प्रकारच्या दंडातून आलेली रक्कम

४. राज्य किंवा केंद्र सरकारकडून आलेले अनुदान


५. जमिनीच्या शेतसाऱ्यातून राज्य शासनाकडे जमा केलेल्या रकमेपैकी हिस्सा.

६. सार्वजनिक कारणांसाठी ग्रामस्थांकडून जमा झालेल्या देणग्या

### उपक्रम १८.२

तुमच्या सारख्या तरुणांचा सहभाग झाल्याने समाजात काही बदल होईल असा कधी विचार केलेला आहे का?

खालील परिच्छेदातील एका तरुणाचे अनुभव वाचा.





त्रेचाळीस वयाच्या विमला देवी या सुंदरगावच्या सरपंच आहेत. त्यांचे शिक्षण जेमतेम सहावीपर्यंत झालेले. सरपंच झाल्यानंतर गावाच्या विकासकामांना पुढाकार घेतला. रस्ते बांधणे, गटारांची व्यवस्था, बागा किंवा शेतीबद्दल तसेच आरोग्याच्या सुविधांबात जाणीव निर्माण केली. कौटुंबिक कलह मिटविण्यासाठी महत्त्वाची भूमिका घेतली. पुरुषांचाच मक्ता असणारे रबरी शिक्क्याचे सरपंच पद नको होते. पण तिच्या गावात विधायक बदल घडवून आणल्याने तिचा आत्मविश्वास वाढला.

वरील परिच्छेदातील अनुभवावरून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. कोणत्या घटना दुरुस्तीमुळे विमला देवीला हे काम करता आले?

२. महिला सबलीकरणावर घटना दुरुस्तीचा परिणाम झाला असे वाटते का?

३. तुम्हास भेडसवणाऱ्या कोणत्याही दोन सामाजिक समस्या लिहा.

४. तुम्ही ज्या समाजात राहता तेथील कोणत्या सकारात्मक बाबी मित्राच्या सहाय्याने करता येतील याची यादी करा.

## १८.२.३ पंचायत समिती रचना आणि कार्यपद्धती :

### अ) रचना :

पंचायत समिती ही पंचायत राज्यव्यवस्थेमधील मधली रचना आहे. त्याचा विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या नावांनी उल्लेख केला जातो. प्रत्येक राज्याने कायद्याची मंजूरी घेतलेली असल्याने त्यामध्ये विविधता आढळते. गट म्हणूनच त्याची कार्यपद्धती आहे. पंचायत समितीमध्ये खालील सदस्य असतात.

- त्या गटातील सर्व सरपंच किंवा ग्रामपंचायतीचे अध्यक्ष
- त्या गटातील खासदार, आमदार
- थेट निवडून आलेले सदस्य
- गटातील निवून आलेले जिल्हा परिषद सदस्य
- ह्या गटातील संबंधित अधिकारी

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

अनेक गटांची मिळून पंचायत समिती तयार होते. गटामध्ये अनेक ग्रामपंचायती असतात. या गटांना विविध राज्यात वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते. आंध्रप्रदेशात मंडळ प्रजा परिषद, आसाममध्ये अंचलिक पंचायत, गुजरातमध्ये तालुका पंचायत, कर्नाटक मध्ये मंडळ पंचायत, मध्यप्रदेश जनपद पंचायत, तामिळनाडू पंचायत, युनिअन कौंसील, उत्तरप्रदेश क्षेत्र समिती यापैकी पंचायत समिती नाव सर्वसामान्यपणे वापरले जाते.

सर्वच राज्यांमध्ये पंचायत समितीचा कार्यकाल हा पाच वर्षाचा असतो. पहिल्याच सभेमध्ये अध्यक्ष आणि उपाध्यक्षाची निवड होते. अध्यक्षपदी एकूण पंचायत समितीपैकी १/३ पंचायतींचे अध्यक्षपद महिलांसाठी राखीव ठेवले जाते. त्याचप्रमाणे अनुसूचित जातीमधील सदस्यांसाठीसुद्धा अध्यक्षपद राखून ठेवले जाते. अध्यक्षपदाचा कार्यकाल हा पंचायत समितीच्या कार्यकाल इतकाच असतो. अध्यक्षपदावरून दूर करण्यासाठी २/३ सदस्यांचा विरोध लागतो. वर्षभरामध्ये किमान सहा सभा घ्याव्या लागतात. दोन सभांमधील अंतर दोन महिन्यांपेक्षा अधिक असता कामा नये. सर्वसाधारण आणि विशेष सभा असे दोन प्रकार असतात. सभेची तारीख अध्यक्ष ठरवितात परंतु त्यांच्या अनुपस्थितीमध्ये उपाध्यक्ष हे सभेचे अध्यक्षपदी असतात. मुख्य प्रशासकीय अधिकारी म्हणून B.D.O. काम करतात.

### ब) पंचायत समितीची कामे :

पंचायत समितीची अनेक कामे असून त्यापैकी पुढीलप्रमाणे शेती, भूमिसुधारणा, जलसंधारण, सामाजिक वनीकरण, तांत्रिक व व्यवसायिक शिक्षण इत्यादी. या कामांशिवाय राज्य व केंद्रसरकारची विशेष अनुदान, अर्थ सहाय्य मिळणाऱ्या योजना तसेच कार्य क्षेत्रामध्ये विकासाच्या विविध योजना राबवाव्या लागतात.

(अ) पिण्याच्या पाण्याची तरतूद करणे.

(ब) ग्रामीण रस्ते बांधणी आणि दुरुस्ती

(क) बाजारपेठांची नियमावली करणे

(ड) सुधारित बियाणे, खते, औषधे, औजारे.यांची तरतूद करणे.

(ई) घरगुती उद्योग, हातमाग, हस्तकला, पारंपारिक कला, कलाकुसर या व्यवसायांना चालना देणे.

(फ) अनुसूचित जाती, जमाती इतर मागासवर्गीय यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणे.

(ग) स्वयंरोजगार योजनेला चालना देणे.

### क) उत्पन्नाचे मार्ग :

उत्पन्नाचा प्रमुख मार्ग म्हणजे राज्यसरकारकडून आलेले अर्थ सहाय्य या शिवाय शेतसाऱ्यापैकी ठरलेल्या टक्केवारीप्रमाणे तसेच कर रुपाने पैसा उपलब्ध होतो.

## १८.२.४ जिल्हा परिषद रचना कार्यपद्धती :

### अ) रचना :

पंचायत राज पद्धतीमध्ये जिल्हा परिषद ही सर्वोच्च आहे. जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी जिल्हापरिषद असते. जिल्हा परिषदेचा कार्यकाल ५ वर्षांचा असतो. जिल्हा परिषदेचे काही सदस्य थेट निवडून आलेले असतात. पंचायत समितीचे अध्यक्ष हे जिल्हापरिषदेचे पदसिद्ध सदस्य असतात. त्या जिल्ह्यातील लोकसभा सदस्य, विधानसभा सदस्य हे जिल्हापरिषदेचे सदस्य असतात. थेट निवडून आलेल्या सदस्यांमधून

जिल्हापरिषद अध्यक्षांची निवड होते. महिला सदस्य १/३ पेक्षा कमी नसावेत. त्याबरोबरच अनुसूचित जाती अनुसूचित जमाती यांच्याही राखीव जागा असतात.




**आकृती १८.४ : जिल्हा परिषद लातूर**

### ब) जिल्हा परिषदेची कामे :

विविध राज्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात फरक असला तरी सर्व साधारणपणे त्यांची कामे खालीलप्रमाणे

१. खेड्यातील लोकांना विविध सेवा आणि संधी देणे, जिल्ह्याच्या विकासासाठी नियोजन व कार्यवाही करणे.

२. शेतकऱ्यांना सुधारित बियाणांचा पुरवठा करणे, कृषि तंत्रमानाची माहिती देणे, लघुपाटबंधारे योजना, पाझरतलाव बांधणे, चरावू कुरणांची देखभाल करणे इ.

३. ग्रामीण भागात शाळा चालविणे, प्रौढ साक्षरता कार्यक्रम राबविणे, ग्रंथालये चालविणे इ.

४. प्राथमिक आरोग्यकेंद्र, दवाखाने सुरू करणे, वस्तीवरील सेवासाठी फिरते दवाखाने, साथीच्या रोगांसाठी लसी करण, कुटुंब कल्याणकारी योजनांचे मार्गदर्शन करणे.

५. अनुसूचित जाती जमातीया विकासासाठी कार्यक्रम राबविणे, आश्रमशाळा सुरू करणे, अनुसूचित जातीच्या मुलांसाठी मोफत वसतीगृह सुरू करणे.

६. घरगुती उद्योग, हस्तकला, कृषि उत्पादन आधारित प्रक्रिया उद्योग, दुग्ध प्रक्रिया व पशुधन विकास कार्यक्रम राबविणे रोजगाराच्या योजनांची कार्यवाही करणे.

७. रस्ते बांधणे, शाळा बांधणे, सार्वजनिक मालमत्तेची काळजी घेणे इ.

### क) जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाची साधने :

जिल्हा परिषदेची विविध कामे आपण पाहिलीत. प्रत्यक्षात काम करताना आर्थिक गरज असते. त्यासाठी पुढील जमेच्या बाजू आहेत.

१. जिल्हा परिषदेने सूचविलेले कर, परवाना फी, बाजार कर इ.

२. शेतसाऱ्यातून जमा झालेल्या रक्कमेपैकी जिल्हा परिषदेचा हिस्सा

३. जिल्हा परिषदेच्या मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्न

४. राज्य व केंद्र सरकारकडून मिळणारे अनुदान

५. विकास योजनांसाठी राज्य सरकारने दिलेला निधी

### पाठ्यांशावरील प्रश्न १८.२

१. ग्रामपांयतीची रचना कशी असते? ग्रामसभेचे महत्त्व लिहा.

२. ग्रामपंचायतीच्या कामांची यादी करा. कोणती कामे अत्यावश्यक असतात? स्थानिक सरकारची कोणती कामे अनैच्छिक असतात असे तुम्हास वाटते? उत्तर होय असल्यास का?

३. ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाचे मार्ग कोणते?

४. पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांच्या कामाचा वार्षिक आराखडा तयार करा.

५. ग्रामपंचायत मधील महिलांच्या राखीव जागांच्या संदर्भात वर्तमानपत्रामध्ये आलेल्या किंवा इंटरनेटच्या माध्यमातून किंवा शिक्षक, जेष्ठ मित्र, वर्गमित्र यांचेकडून माहिती मिळवा. कोणत्या राज्यांमध्ये महिला पंचायत सदस्यांची संख्या एक तृतीयांशपेक्षाही अधिक आहे याची यादी करा.


## १८.३ नागरी स्थानिक सरकार :

पंचायत राजबद्दल विजयला मिळालेल्या माहितीची त्याने स्तुती केली. विजय खेड्यातून ज्या शहरामध्ये आला त्या शहराच्या स्थानिक सरकार बद्दल शिक्षकांनी माहिती विचारली. नागरी भागातही अशी रचना असते का? शिक्षक म्हणाले होय. ग्रामीण भागासाठी जशी पंचायत राज व्यवस्था असते तशी नागरीभागामध्ये स्थानिक शासन व्यवस्था असते. नागरी भाग तीन प्रकारचे असतात.

अ) महानगरपालिका मोठ्या लोकसंख्येच्या शहरी भागासाठी.

ब) नगरपालिका ´ लहान शहरासाठी

क) नगर पंचायत ´ उपनगरी भाग



टिपा

पंचायत राज व्यवस्था आणि नागरी स्थानिक शासन यामध्ये खूप फरक असतो. पंचायत राज व्यवस्थेमध्ये एकमेकांशी नाते असते परंतु नागरी स्थानिक शासन हे स्वतंत्र असते. एकाच राज्यामध्ये तीन प्रकारच्या व्यवस्था असू शकतात. महानगरपालिका, नगर पालिका, नगरपंचायत त्यांचा परस्परांशी संबंधही नसतो.

ब्रिटिश वसाहत काळामध्ये देशातील पहिली महानगरपालिका सन १६८८ मध्ये मद्रास (सध्या चेन्नई) येथे स्थापन झाली, त्यानंतर कलकत्ता (कोलकाता) बॉम्बे (मुंबई) येथे स्थापन झाली. प्रारंभी या नगरपालिका स्थापन करण्याचे कारण म्हणजे सांडपाणी व्यवस्था व साथीच्या रोगनियंत्रणासाठी स्थापन करण्याचा हेतू होता. पाणीपुरवठा सांडपाणी व्यवस्था इत्यादी कामे ही केली जात. परंतु त्यांना आवश्यक तेवढे अधिकार आणि अर्थसहाय्य नव्हते. प्रारंभी अनेक सदस्य स्वीकृत होते. आपल्या राष्ट्रीय नेत्यांनाही संघटनेच्या दृष्टीने राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे वाटले. पैशाशिवाय सर्व गोष्टी निष्फळ होत्या. ब्रिटिश राजवटीमध्ये अनेक बदल करण्यात आले. हळूहळू काही अधिकार आणि अर्थ सहाय्य पुरवठा करण्यात आला.

स्वातंत्र्यानंतर चार प्रकारच्या नागरी स्थानिक व्यवस्था कार्यान्वीत करण्यात आल्या. (१) महानगरपालिका (२) नगरपालिका (३) नगर परिषद (४) सूचित केलेली समिती. घटनेच्या ७४ व्या घटनादुरुस्ती (१९९२) नुसार नागरी स्थानिक शासनात अमूलाग्र बदल करण्यात आला.

सध्या तीन प्रकारच्या स्थानिक सरकार कार्यान्वीत आहेत. (अ) महानगरपालिका मोठ्या शहरासाठी (ब) नगरपालिका छोट्या शहरासाठी (क) नगरपरिषद म्हणजे ग्रामीण भागाचे शहरीकरण होत असलेले उपनागरी क्षेत्र

## १८.३.१ ७४ वी घटना दुरुस्ती (सन १९९२)

७४ व्या घटना दुरुस्ती सन १९९२ नुसार महत्त्वाचे बदल करण्यात आले ते खालील प्रमाणे

- नागरी विभागासाठी स्थानिक व्यवस्थापन देशातील सर्व राज्यांमध्ये असेल (महानगरपालिका, नगरपालिका, नगर पंचायत)
- समिती याचा अर्थ घटनेप्रमाणे नगर पालिकाच्या क्षेत्रातील लोकांच्या समस्यांसाठी स्थानिकांचा तळातील शेवटच्या व्यक्तीपासूनचा सहभाग
- राज्य निवडणूक आयोगाकडून नियमितपणे निवडणूका घेणे.
- नगरपालिका शासन बरखास्तीपासून सहा महिन्यापेक्षा अधिक कार्यकाल लांबवू शकणार नाही.
- वंचित घटक (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय घटक) आणि महिलांसाठी पुरेशा प्रमाणात राखीव जागांचे प्रमाण असेल.
- राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अधिकार, कार्यात्मक जबाबदारी, नगरपालिका आणि वार्ड समितीवर सोपविण्यात आलेली आहे.

❖ राज्य आर्थिक आयोग, दर पाच वर्षांनी आर्थिक स्थितीची पहाणी करते व त्यावर गरजेनुसार सूचना करेल.

❖ जिल्हा नियोजन मंडळाचे कार्यक्षेत्र जिल्हा पातळीवर असून महानगर नियोजन मंडळ हे त्या महानगराच्या क्षेत्रामध्ये असेल त्यांची जबाबदारी विकास आराखडा तयार करण्याची तसेच एकत्रिकरणाची असते.

### १८.३.२ महानगरपालिका :

#### अ) रचना :

राज्याच्या घटनेनुसार मोठ्या शहरासाठी महानगरपालिकेची तरतूद आहे. महानगर पालिकेचे मंडळ ५ वर्षाकरीता निवडून आलेले असते. निवडून आलेले सदस्यांपैकी, एकाला महापौर म्हणून निवडून देतात. महापौर हा शहराचा प्रथम नागरिक असतो. ७४ व्या घटनादुरुस्ती नुसार एकूण सदस्यांच्या १/३ महिलांचे प्रमाण असणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर दुर्बल घटकांच्या राखीव जागा लोकसंख्येच्या प्रमाणात असतात. अनुसूचित जाती जमातीमध्येही १/३ जागांचे महिला आरक्षण असते. महानगरपालिका बरखास्त होताच सहा महिन्यात निवडणूका घ्याव्या लागतात. महानगरपालिकेचे आयुक्त हे राज्य शासनाचे पद असून ते प्रमुख कार्यकारी अधिकारी म्हणून काम पहातात. देशाची राजधानी दिल्ली येथील आयुक्त पदावर केंद्रसरकारकडून नेमणूक होते.




**आकृती १८.५ : महानगर पालिका**

## ब) महानगरपालिकेचे कार्य :

**महानगरपालिकेची कामे खालीलप्रमाणे :**

१. **आरोग्य आणि स्वच्छता :** शहराची स्वच्छता, कचऱ्याचे व्यवस्थापन, दवाखाना, लसीकरण योजना, भेसळ प्रतिवंध इत्यादी.

२. **विद्युत व पाणीपुरवठा :** रस्त्यावरील प्रकाश, सुरक्षित पाणी पुरवठा, बांधकाम रचना पाणी पुरवण्यासाठी प्रसंग टँकरची व्यवस्था इत्यादी.

३. **शैक्षणिक :** प्राथमिक शिक्षण सुविधा, शालेय पोषण आहार इत्यादी.

४. **सार्वजनिक बांधकाम :** त्यांची निगा, रस्त्यांचे नाम फलक, घरबांधकामाचे नियम, बाजार पेठ, हॉटेल, उपहार गृहे, अतिक्रमणे दूर करणे, धोकादायक इमारती नष्ट करणे इत्यादी.

५. **संकीर्ण कार्य :** जन्ममृत्यू नोंदी ठेवणे, मैदाने करणे, स्मशानभूमी, वाहनतळ सुविधा इत्यादी.

६. **ऐच्छिक कामे :**

१) करमणूक, बागा, प्रेक्षालये

२) सांस्कृतिक ॅ संगीत, नाटक, रंगकाम, ग्रंथालये, संग्रहालये इत्यादी.

३) क्रीडा – मैदाने सुविधा सुविधा, खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करणे.

४) जनकल्याणकारी सेवा ॅ सार्वजनिक सभागृहे, सार्वजनिक वितरणसेवा, कुटुंब कल्याणकारी योजना, अनुसूचित जातींजमाती तसेच मागासलेल्या वर्गासाठी योजना.

## क) महापौरांची कामे

महापौर महानगरपालिकेचे प्रमुख असतात त्यांची कामे पुढील प्रमाणे ॅ

- महानगरपालिकेच्या सभेचे अध्यक्ष स्थान भूषविणे व सभेतील शिस्त सांभाळणे.
- राज्य सरकार आणि महानगरपालिका यांचा दुवा म्हणून काम पहाणे.
- शहरामध्ये येणाऱ्या परदेशी पाहुण्यांचे स्वागत करणे.

## ड) महानगर पालिकेच्या उत्पन्नाची साधने :

पंचायत राज पद्धतीप्रमाणेच विकासासाठी आणि कल्याणासाठी अर्थसहाय्याची गरज असते. त्यासाठी आर्थिक तरतुदी करणे आवश्यक असते. उत्पन्नाची साधने पुढीलप्रमाणे

- **करापासून उत्पन्न :** महानगरपालिका विविध बाबींवर कर लावणे. घरपट्टी, करमणुक कर, जाहिरात फलक कर, नोंदणी कर, इमारत आराखडा फी इ.
- **इतर फी :** पाणीपुरठा, वीज, गटार योजना, परवाना फी, प्रवेश कर, जकात कर (L.B.T) इत्यादी.

- **अनुदान :** राज्य आणि केंद्र सरकार विविध विकास योजनांसाठी अर्थ सहाय्य करते.
- **भाडे :** महानगरपालिकेच्या काही स्थावर मालमत्तेपासून कर मिळतो. दुकाने, टपऱ्या, सार्व जनिक ठिकाणे, मंगल कार्यालये, यात्रा, विवाह, प्रदर्शने इत्यादी.

### १८.३.३ नगरपालिका :

#### अ) रचना :

मोठी लोकसंख्या नसलेले शहर म्हणजे नगरपालिका. नगरपालिका त्या शहराच्या समस्या सोडविण्याचा आणि विकास करण्याचा प्रयत्न करते. ७४ वी घटना दुरुस्तीने नगरपालिकेला शहराची सर्व बंधने पाळावी लागतात. नगरसेवकांची निवडणूक पाच वर्षासाठी झालेली असते. राज्य निवडणुक आयोगाचे नियमानुसार पाचवर्षाचा कार्यकाल असतो. परंतु कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी नगरपालिका बरखास्त झालेली असेल तर सहा महिन्यात निवडणूक घ्यावी लागते. नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून नगराध्यक्ष निवडून आलेल्या सदस्यांतून निवडून दिलेले असतात. नगरसेवकांचे बहुमत जोपर्यंत आहे तोपर्यंत पदावर राहू शकतात. नगरपालिकेचे मुख्याधिकारी राज्य शासनाकडून नियुक्त केलेले असतात. त्याच्यावर दैनंदिन कामकाज आणि प्रशासनाची जबाबदारी असते. आरोग्य अधिकारी, कर पर्यवेक्षक, सिव्हील इंजिनिअर हे प्रमुख अधिकारी कार्यरत असतात.

#### ब) नगरपालिकेची कामे :

नगरपालिकेची कामे खालीलप्रमाणे

१. **आरोग्य आणि स्वच्छता :** नगरातील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, आरोग्यास घातक असलेल्या पदार्थांच्या विक्रीस बंदी, भेसळ प्रतिबंध रुग्णालयांची देखभाल इ.

२. **वीज आणि पाणी पुरवठा :** वीज व स्वच्छ पाणी पुरवठा, पाण्याच्या टाक्यांची देखभाल प्रसंगी टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे.

३. **शिक्षण :** प्राथमिक शाळा सुरु करणे, चालविणे तसेच ग्रंथालये चालविणे.

४. **जन्ममृत्यू नोंदी :** नगरातील जर्न्ममृत्यूच्या नोंदी ठेवून त्यांचे दाखले देणे.

५. **सार्वजनिक काम** : पक्के रस्ते करणे, त्याची देखभाल दुरुस्ती, विवाहकार्यालये, सार्वजनिक हॉल, सार्वजनिक सुविधा इत्यादी.

#### क) उत्पन्नांचे मागे :

पैशाशिवाय कामे होऊ शकत नाहीत. नगरपालिकेच्या उत्पन्नाचे मार्ग पुढीलप्रमाणे

- **कर :** मालमत्तेवरील कर, वाहने, करमणूक, जाहिरात इत्यादी.
- **भाडे शुल्क :** पाणीपट्टी, गटार व्यवस्था, परवाना फी, सार्वजनिक सभागृहाचे भाडे, मंगलकार्या लयाचे भाडे, दुकानांचे भाडे इत्यादी.
- राज्य सरकारकडून मिळालेले अनुदान.

❖ **दंड :** करचुकविणारे, कायदा मोडणारे, अतिक्रमणे इ. पासून दंडाची रक्कम प्राप्त होते.

### १८.३.४ नगर पंचायत

नगरपंचायत म्हणजे ३0,000 ते १00,000 लोकसंख्या असलेल्या नागरी वस्तीला नगर पंचायत म्हणतात. त्याला काही अपवाद आहेत. (पूर्वीच्या नगर पंचायती ५000 पेक्षा अधिक व २0,000 पेक्षा कमी लोकसंख्येला नगरपंचायत म्हणून समजले जात असे.) अध्यक्ष आणि वार्ड सदस्यांनी मिळून नगरपंचायत होते. दहा सदस्य वार्डातून निवडून आलेले व तीन सदस्य स्वीकृत असतात. नगरपालिका प्रमाणेच नगर पंचायतीची जबाबदारी असते. (अ) स्वच्छता, कचरा व्यवस्थापन (ब) पाणी पुरवठा (क) रस्त्यावर प्रकाश दिवे, पार्किंग व्यवस्था जनसुविधाकेंद्र (ड) आगनियंत्रक योजना (ई) जन्म मृत्यू नोंद इत्यादी कामे असतात. नगरपंचायतीच्या उत्पन्नाच्या बाबी म्हणजे घरपट्टी, पाणी पट्टी, प्रवेश कर, परवाना फी, इमारत प्लॅन मंजूरी, मंगलकार्यालयाचे भाडे इतर इमारतींचे भाडे, राज्य सरकारकडून आलेले अनुदान इ. उत्पन्नाच्या बाबी असतात.

### पाठ्यांशावरील प्रश्न १८.३

१. सन १९९२ च्या ७४ व्या घटनादुरुस्तीपूर्वी नागरी स्थानिक सरकार किती प्रकारच्या होत्या? घटना दुरुस्तीने काय बदल झाला?

२. महानगरपालिकेचे कामे कोणती? त्यातील ती कामे महत्त्वाची का असतात?

३. महानगरपालिकेचे उत्पन्नाचे मार्ग कोणते?

४. नागरी स्थानिक समितीही विविध सेवेस जबाबदार असते. तसेच नागरिकांचीही जबाबदारी असते असे तुम्हास वाटते का? कोणती जबाबदारी?

### उपक्रम १८.३

महानगरपालिका नगर पालिका आणि नगर पंचायत यातील पदाधिकाऱ्यांची यादी तयार करा. तुम्हाला कोणीच भेटले नाही तर त्यांची नावे लिहा आणि तुम्ही भेटण्याचा हेतू स्पष्ट सांगा.

## १८.४ जिल्हा प्रशासन

विजय हा इयत्ता ९ वीचा शहरातल्या शाळेतला विद्यार्थी. जिल्हा प्रशासनाची शिक्षकांनी माहिती सांगण्याचा प्रयत्न केला. कारण ग्रामीण व नागरी स्थानिक शासनाबद्दलची माहिती त्याला मिळालेलीच होती. जिल्ह्याची प्रशासकीय यंत्रणा प्रत्येक जिल्ह्यात असते. प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या स्थानिक शासन पद्धतीशी संबंध असतो. तसाच प्रशासन आणि विकासाशी संबंध असतो. प्रत्येक जिल्ह्याचे उपविभाग किंवा गट किंवा तालुके असतात. या अधिकाऱ्याची जिल्हा प्रशासनात त्यांची मदत होते. जिल्हा कार्यालय हे महत्त्वाचे असते. तेथे जिल्हा दंडाधिकारी, सुप्रिटेंडेंट ऑफ पोलिस, जिल्हा शिक्षण अधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी, जिल्हा वन अधिकारी इत्यादी अधिकारी जिल्ह्याच्या ठिकाणी असतात.

## १८.४.१ जिल्हाधिकारी

जिल्हा दंडाधिकारी हा जिल्ह्याचा प्रमुख प्रशासन अधिकारी असतो. यांनाच डेप्युटी कमिशनर, जिल्हा कलेक्टर किंवा उपायुक्त असे ओळखले जाते. हे भारतीय प्रशासन सेवा (I A S) असतात. जिल्हा प्रशासनाची जबाबादारी, राज्य व केंद्र शासनाच्या योजना राबविणे ही जबावदारी असते. स्वातंत्र्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडे केवळ महसूल जमा करणे आणि कायदा व सुव्यवस्था राखणे ही जबाबदारी नसून कल्याणकारी योजना सामाजिक व आर्थिक विकासाच्या योजना राबविणे ही कामे आहेत.

जिल्हा हा घटक फार पूर्वीपासूनच महत्त्वाचा आहे. ब्रिटिश वसाहत काळापासून त्यांच्याकडे जिल्ह्याचा महसूल व कायदा आणि सुव्यवस्था राखणे ही जबावदारी होती. परंतु अलिकडे प्रशासनामध्ये विकेंद्रीकरण झाल्याने जिल्हा प्रशासनाला विविध भूमिकेतून काम करावे लागते. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांना महत्त्वाचे अधिकार आणि कार्यवाही ही राज्य शासनाच्या वतीने करावी लागते.

**महत्त्वाची कार्ये :**

१. जिल्ह्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्था व शांतता राखणे

२. केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांची व कार्यक्रमांची कार्यवाही करणे.

३. राज्यसरकार आणि जिल्हा पातळीवरील कार्यालये यातील दुवा साधणे

४. शिक्षण, आरोग्य, भूमि नियोजन, पोलिस कारागृह, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्राचा समन्वय साधणे

५. आणीवाणीच्या काळात तसेच आपत्ती काळात उपाय योजने.

६. निर्भय वातावरणामध्ये विविध निवडणुका घेणे. त्यामध्ये लोकसभा, विधानसभा, पंचायतसमिती, जिल्हापरिषद, नगरपालिका इ. चा समावेश असतो.

७. विविध प्रकारचे महसूल व करांचे संकलन

८. न्यायालयाची भूमिका पार पाडणे, तंट्याबाबत निर्णय देणे. किंबहुना त्यावर दंड लावणे.

९.. लोकांची गाऱ्हाणी ऐकून घेणे व त्यावर तडजोड करणे.

## १४.४.२ विभागीय अधिकारी (उपजिल्हाधिकारी)

उत्तम प्रशासनासाठी जिल्ह्याचे लहान विभाग केले जातात. त्याला उपविभाग म्हणतात. जरी जिल्ह्याचा उपविभाग अधिकाऱ्याला, उपविभागीय अधिकारी म्हणतात. जिल्हाधिकाऱ्यांना उपविभागीय अधिकाऱ्याकडून मदत होते. तसेच जिल्हाधिकाऱ्याचा प्रतिनिधी असतो. उपविभागीय अधिकारी भारतीय प्रशासनसेवा (I A S) दर्जाचा अधिकारी असतो. भूमीचे रेकॉर्ड ठेवणे. महसूल जमा करणे ही जबावदारी असते. संरक्षण हत्यारांना बाळगण्याची परवानगी देणे. (बंदुक, पिस्तूल), वाहन चालविणे, परवाने, रहिवाशी दाखले, अनुसूचित जाती जमाती, इतर मागासवर्गीय प्रमाणपत्रे देणे इत्यादी.

## १४.४.३ गट विकास अधिकार (B D O) :

गट हे प्रशासनातील अंतीम टप्प्यातील प्रशासन आहे. गटाचे अधिकारी म्हणजे B.D.O. हे राज्य सेवा आयोगातील निवडीतून आलेले अधिकारी असून गटातील कामकाज पाहिले जाते. मध्यम स्तर प्रशासन

आणि पंचायत राज पद्धतीतील दुवा असतो. पंचायत समितीचा सेक्रेटरी म्हणून भूमिका असून बैठकींचे रेकॉर्ड ठेवणे. बजेट तयार करणे. विकासाच्या योजनांची प्रत्यक्ष कार्यवाही करणे इत्यादी.

### उपक्रम १८.४

जिल्हाधिकाऱ्यांच्या कामाची यादी दिलेली आहे ती प्राधान्य क्रमाने लावा कमी किंवा अधिक महत्त्वाची तुम्हाला का वाटतात.

| कार्य | प्राधान्य क्रम. १ ते १० |
|---|---|
| १) जिल्ह्यामध्ये सिनेमागृह बांधणे | |
| २) रस्ते सुधारणा | |
| ३) आरोग्य सेवेत सुधारणा | |
| ४) अनुसूचित जातींचमाती, इतर मागासवर्गीयांसाठी विकासाच्या नव्या योजना | |
| ५) नगरपालिकेच्या कार्यालयाचे नूतनीकरण | |
| ६) नगर पालिकांच्या दवाखान्यात अन्य अधिकाऱ्याच्या नेमणूका करणे. | |
| ७) मतदार याद्यांचे नूतनीकरण | |
| ८) गटारव्यवस्था सुधारणे | |
| ९) नगर पालिकेच्या शाळेत नवीन शिक्षकांची भरती | |
| १०) आग, दुष्काळ यासारख्या समस्यांवर तज्ञ व्यक्तीला सल्लागार म्हणून घेणे. | |

**टीप :** प्राधान्य क्रम देताना त्याचे कारण द्या.

## १८.५ संधी आणि आव्हाने

वरील माहितीवरून ग्रामीण आणि नागरी स्थानिक व्यवस्थेमध्ये निर्णय घेताना सर्व नागरिकांना संधी मिळते. या व्यवस्थेमुळे नागरिकांना राजकीय शिक्षण मिळते. नेतृत्त्वाचे प्रशिक्षण मिळते. लोकांचा सहभाग असल्याने लोकांना आपले प्रश्न मांडता येतात. कारण व्यवस्थापन त्यांच्यासमोरच असते. चर्चा किंवा प्रत्यक्ष पुढाकार घेवून उपाय सूचविता येतात. स्त्रियांना प्रामुख्याने मोठी संधी मिळते. महिला राखीव जागा असल्याने महिलांची संख्या वाढली त्यामुळे महिला सबलीकरणातून आपल्यातील गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळते.

दुसऱ्या बाजूला स्थानिक शासन व्यवस्थेला अनेक आव्हाने स्वीकारावी लागत आहेत. लोकांच्या समोरच प्रशासन असल्याने लोकांच्या आपेक्षा वाढतात. त्यांची पूर्तता करताना स्थानिक शासन व्यवस्थेला काही मर्यादा येतात. हे सर्व काम म्हणजे आव्हान असते. पण उपाय मात्र मर्यादित असतात. यातून भांडणे वादावादी निर्माण होतात. या राजकीय प्रक्रियेमध्ये दारिद्र्य, निरक्षरता, सामाजिक असमानता, राजकीय गुन्हेगारी यामुळे काम करताना अडथळे येतात. जातीयवाद ही सुद्धा एक समस्या आहे. भ्रष्टाचार, वशीलेबाजी याचेही मोठे आव्हान आहे.

## पाठ्यांशावरील प्रश्न १८.४

१. जिल्हा प्रशासनाचे कार्याचे परिक्षण करा.

२. जिल्ह्याधिकाऱ्यांची प्रमुख कामे लिहा.

३. नागरिकांना स्थानिक शासन व्यवस्थेत कोणती संधी मिळते? स्थानिक व्यवस्थेमध्ये कोणती आव्हाने आहेत?

## आपण काय शिकलो?

❖ स्थानिक स्वराज्य संस्था ही त्रिस्तरिय रचना आहे. पहिला स्तर म्हणजे केंद्र सरकार, दुसरा स्तर म्हणजे राज्यशासन स्थानिक शासन व्यवस्थेमध्ये ग्रामीण आणि नागरी स्थानिक शासन असे प्रकार पडतात. पंचायत राज व्यवस्था ही ग्रामीण भागासाठी तर महानगर पालिका, नगर पालिका, नगर पंचायत नागरी भागाचे प्रशासन चालविते.

❖ जरी ग्रामपंचायत ही रचना राज्य सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वावर अवलंबून असली तरी घटनेच्या ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीमध्ये सन १९९२ मध्ये घटनात्मक दर्जा प्राप्त झालेली आहे.

❖ घटना दुरुस्ती हा राज्य सरकारला केलेला हुकूम असून स्थानिक सरकार परिणामकारक व सातत्यपूर्ण कार्यवाही होते की नाही हेही पाहिले जाते. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, दुर्बल घटक यांना राखीव जागा असून, राखीव जागांमुळे महिला सबलीकरणाची संधी मिळालेली आहे.

❖ पंचायत राज पद्धती ही त्रिस्तरीय रचना असून ग्रामपंचायत ही खेड्याच पातळीवर, पंचायत समिती मध्यम व गट पातळीवर तर जिल्हा परिषद जिल्हा पातळीवर काम पहाते. समाजाच्या कल्याणासाठी व सामाजिक व आर्थिक विकासासाठी त्यांच्या क्षेत्रामध्ये काम पाहिले जाते. त्यांच्याकडून मूलभूत सुविधा पुरविल्या जातात, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, दवाखाने, पक्के रस्ते, प्राथमिक शाळा, जुन्या इमारती आणि स्थानिक गरजांची पूर्तता केली जाते.

❖ नागरी भागात मोठ्या लोकवस्तीसाठी महानगरपालिका, त्यापेक्षा लहान नागरी वस्ती असेल तर नगरपालिका कामकाज पहाते. नगर पंचायती या नगरपालिकेपेक्षा लहान असणाऱ्या

प्रशासकीय व्यवस्था असते. १९९२ ची ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार अनुसूचित जाती अनुसूचित जमाती आणि दुर्बल घटक व महिलांसाठी राखीव जागा आहेत.

❖ स्थानिक सरकार मूलभूत सुविधा पुरविते. परिसर विकास, विकासाची कामे तसेच कल्याणकारी योजना स्थानिक सरकारकडून राबविल्या जातात.

❖ ग्रामीण आणि नागरी प्रशासन लोकांच्या समोरच असतात आणि त्यांचे कामकाज लोकशाहीच्या खऱ्या अर्थाने मूळाशीच असते. निर्णयामध्ये जनसहभाग असतो. अनेक समस्या आणि आव्हाने असतात. त्यापैकी जाती व्यवस्था, भ्रष्टाचार, अर्थसहाय्याची गरज इत्यादी.

❖ जिल्ह्याच्या प्रमुख स्थानी जिल्हादंडाधिकारी असतात नियमित कामकाज बरोबरच कायदा सुव्यवस्ता राखणे, करसंकलन, विकासाच्या योजना राबविणे. ही देखील कामे करावी लागतात. राज्य शासन व केंद्रशासनाच्या विकासाच्या आणि कल्याणाच्या कार्यक्रमाची कार्यवाही त्यांना करावी लागते.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. स्थानिक शासन का महत्त्वाचे असते? आपले मत व्यक्त करा.

२. पंचायतराज व्यवस्थेची रचना व कार्याचे परीक्षण करा.

३. नागरी स्थानिक व्यवस्थेची रचना व कार्य स्पष्ट करा.

४. सन १९९२ च्या घटना दुरुस्ती कलम ७३ व ७४ मुळे पंचायतराज व नागरी स्थानिक सरकार यामध्ये कोणकोणते बदल झाले?

५. सन १९९२ च्या घटना दुरुस्ती कलम ७३ व ७४ च्या नुसार महिला सबलीकरणामध्ये खऱ्या अर्थाने बदल झाला असे वाटते का? स्पष्ट करा.

६. विधवा व तिची दोन मुले खेड्यामध्ये घरकाम करीत. तिला तिच्या मुलांना शाळेत घालावयाचे होते. परंतु ती तसे करू शकत नव्हती. सरपंच तिच्या मुलांच्या शिक्षणाची हमी देतील का? कोणत्या मार्गाने ती मुले सर्वांबरोबर शिक्षण घेतील?

## पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे

### १८.१

१. स्थानिक सरकार म्हणजे स्थानिक लोकांचे, स्थानिक लोकांनी चालविलेले आणि स्थानिक लोकांसाठी चालविले सरकार.

स्थानिक शासनामध्ये सर्वसामान्य माणसांना व्यासपीठ मिळते. प्रत्यक्ष सहभाग घेवून विकासाच्या कामात हातभार लागतो. स्थानिक पातळीवर न्याय मिळतो.

लोकांना समस्या सोडविण्यासाठी संधी मिळते. प्रश्न स्थानिक असतात. तसेच स्थानिक परिस्थितीमध्ये उपायही स्थानिक असतात. स्थानिक शासन म्हणजे मूळ प्रशासन होय.

२. पंचायत राज व्यवस्था ही प्राचीन काळापासून आपल्याकडे होती. तिला विविध नावांनी ओळखतात. पंचायत किंवा बिरादारी गावातील नेता हा प्रमुख असतो. ७३ व्या घटना दुरुस्तीमुळे पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक स्वरूप प्राप्त झाले त्यामुळे निवडून आलेल्या प्रतिनिधीमार्फत स्थानिक सरकार बनते.

३. आपल्या परिसरातील स्थानिक शासन व्यवस्थेतील नावे मिळवा.

४. स्थानिक शासनाकडून पाणी पुरवठा, गटारे व्यवस्था, इ. कामे होतात. जीवन मानाच्या दर्जा वर त्याचा विविध प्रकारे परिणाम होतो.

५.

अ) पंचायत राज व्यवस्था ही त्रिस्तरीय रचना आहे.

ब) जिल्ह्याच्या विकासाच्या योजना, जिल्हा नियोजन मंडळ करते.

क) ग्राम पातळीवर ग्रामसभा ही सर्वात मोठी निर्णायक सभा असते.

ड) स्थानिक शासनामध्ये अनुसूचित जाती अनुसूचित जमाती महिला राखीव जागा यामुळे निर्णयामधील त्यांचा सहभाग असल्याने त्यांचे सबलीकरण झाले.

ई) राज्य वित्त आयोग आणि राज्य निवडणूक आयोग यांची स्थापना केली.

## १८.२

१. ग्रामपंचायत ही पंचायत राज व्यवस्थेमधील अगदी तळातील व्यवस्था आहे. या पंचायतीमध्ये १/३ जागा महिलांसाठी राखीव असतात. अनुसूचित जाती अनुसूचित जमाती यांच्यासाठी राखीव जागा असतात. सरपंच थेट निवडून आलेले असतात. पंचायतीमध्ये पंच (ग्रामपंचायत सदस्य) असतात. उपसरपंच हे सदस्यातून निवडून आलेले असतात.

२. ग्रामपंचायतीची कार्ये

१) सुरक्षित पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

२) रस्ते तयार करणे

३) सांडपाणी व्यवस्था करणे.

ऐच्छिक कामे ही ग्रामपंचायतीकडे जर पैशाची तरतूद असेल तरच केली जातात. वृक्षारोपण कृत्रिम रेतन केंद्र, मैदाने तयार करणे ग्रंथालय व्यवस्था इत्यादी.

३. ग्रामपंचायतीची उत्पन्नाची साधने

१) स्थावरमालमत्ता कर, भूमी, माल, जनावरे

२) विवाहकार्यालय अथवा इमारती भाडे

३) विविध प्रकारचे लावलेले दंड

४) शेतसाऱ्याच्या जमा झालेल्या रक्कमेपैकी राज्यसरकारकडून आलेली रक्कम

५) ग्रामस्थांकडून आलेली देणगी

६) राज्य व केंद्रसरकारची अनुदाने

४. विविध प्रकारची माहिती जमा करा आणि उत्तर लिहा.

५. प्रश्नामध्ये उत्तरांच्या समावेश आहे.

**१८.३**

१. स्वातंत्र्यानंतर चार प्रकारच्या नागरी स्थानिक व्यवस्था निर्माण झाल्या.

१) महानरपालिका २) नगरपालिका ३) नगरपरिषद ४) सूचित समिती

परंतु सन १९९२ ला ७४ वी घटना दुरुस्ती झाली आणि नागरी स्थानिक शासन व्यवस्थेमध्ये महत्त्वाचे बदल झाले. (अ) महानगरपालिका (मोठी लोकसंख्या) (ब) नगरपालिका (लहान शहर) (क) नगर पंचायत (निमशहरी भाग)

२. नागरीकांच्या जीवन पद्धतीमध्ये गुणवत्ता सुधारणा, आरोग्य, पाणीपुरवठा, वीज, इत्यादी. प्रत्येकाला आपले शहर स्वच्छ असावे असे वाटले पाहिजे. दवाखाने, स्वच्छ पाणी पुरवठा नागरीकांच्या जीवनाचा दर्जा सुधारला पाहिजे.

३. १) विविध कर, घरपट्टी, करमणूक कर, होर्डिंग, बॅनर्स भाडे

२) राज्य व केंद्र सरकारची अनुदाने

३) मालमत्ता कर, दुकाने, टपऱ्या, सार्वजनिक हॉल इ.

४) प्रवेश कर, वीज, पाणीपट्टी इ.

४. नागरी स्थानिक सरकारची जबाबादारी पार पाडताना लोकांनी सहकार्य करावे. प्रत्यक्ष माहिती घेवून उत्तर लिहा.

**१८.४**

१. जिल्हाधिकारी हे जिल्ह्याचे प्रमुख असतात, जिल्हा प्रशासन अधिकारी, सुप्रिटेंडेट ऑफ पोलिस, जिल्हा शिक्षणाधिकारी, जिल्हा कृषि अधिकारी उपविभागीय अधिकारी इत्यादी.

❖ उपविभागीय अधिकारी (S.D.O.) : जिल्हाधिकाऱ्यांना प्रशासनामध्ये उपविभागीय अधिकारी मदत करीत असतात. तसेच त्याचे प्रतिनिधित्व करीत असतात. भूमिचे रेकॉर्ड ठेवणे, महसूल जमा करणे. रहिवाशी दाखले, जातीचे दाखले देणे इ. कामे असतात.

❖ गट विकास अधिकारी (B.D.O.) : त्रिस्तरिय व्यवस्थेमध्ये B.D.O. हे पंचायतराज समितीचे सेक्रेटरी म्हणून काम पाहतात. मिटिंगचे रेकॉर्ड ठेवणे, बजेट करणे, विकास योजनांचे समन्वय करणे इ. कामे असतात.

२. जिल्हाधिकाऱ्यांची कामे पुढीलप्रमाणे :

१) कायदा आणि सुव्यवस्था राखणे.

२) राज्य व केंद्र शासनाच्या योजना राबविणे

३) राज्य सरकार आणि जिल्ह्याची विविध कार्यालये यांचा समन्वय साधणे


४) शिक्षण, आरोग्य, भूमि व्यवस्थापन, पोलिस, कारागृह, सांस्कृतिक इ. विभागाच्या कार्यालयांशी समन्वय साधणे.

५) स्वच्छ व निर्भयपणे निवडणूका घेणे. उदा. लोकसभा, विधानसभा, पंचायत समिती, जिल्हा परिषद, महानगरपालिका इ.

३. स्थानिक व्यवस्थापन म्हणजे नागरिकांना राजकीय प्रशिक्षणच असते. त्यांच्यातील नेतृत्वाला संधी असते. जेव्हा नागरिकांचा सहभाग असतो तेव्हा एकदा प्रश्न मांडणे, मग तो आपल्यासाठी किंवा इतरांच्या हितासाठी असो. स्थानिक शासन व्यवस्थेमध्ये लोकांच्या समोरचे प्रश्न असतात. शासकीय व्यवस्था त्यांच्या समोरच असते. थेट किंवा माध्यमांद्वारे उपाय सूचविणे सोपे जाते. स्थानिक शासन व्यवस्थापनेत स्त्रीयांना सहभागाची मोठी संधी मिळते.

**परिणामकारक कार्यवाहीसाठी आव्हाने :**

लोकांच्या समोरच शासन व्यवस्था असते तो लोकशाही मार्ग असतो परंतु लोकांच्या अपेक्षांची पूर्तता अनेक अडथळयांमुळे होत नाही. दारिद्र्य, निरक्षरता, सामाजिक असमानता राजकारणातील गुन्हेगारी इत्यादी. जातीयता, विशिष्ट मतप्रणाली, वाढता भ्रष्टाचार, वशिलेबाजी ही आव्हाने आहेत.





# १९

# राज्य शासन व्यवस्था

भारत हे संघराज्य असून केंद्रशासन आणि राज्य शासन या दोन पातळीवर देशाचा कारभार चालतो. प्रत्येक नागरिकाचा दोन्ही पातळीवर संबंध असतो. राज्य आणि केंद्र शासनाचे नियर्मकानुन पाळावे लागतात. त्यासाठी आपल्याला दोन्ही पातळीवर न्याय मागता येतो. शासनाचे तीन पातळीवर काम चालते. कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ, न्याय मंडळ, हे केंद्र आणि राज्याच्या ठिकाणी असते. सदरच्या प्रकरणामध्ये आपण प्रामुख्याने राज्य पातळीवरील शासन व्यवस्था पाहणार आहोत.

## उद्दिष्टे :

सदरचा पाठ अभ्यासानंतर पुढील गोष्टी माहित होतील.

- ❖ राज्यपाल नेमणूक, अधिकार व दर्जा याचे स्पष्टीकरण
- ❖ राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांचे संबंध. राज्य सरकारमध्ये मुख्यमंत्री हे प्रमुख असतात. त्यांचे अधिकार आणि भूमिका.
- ❖ मंत्रीपरिषद रचना व अधिकार
- ❖ विधानसभा रचना व अधिकार
- ❖ उच्च न्यायालय रचना व कार्यक्षेत्र, दुय्यम न्यायालय कामकाज
- ❖ राज्य सरकारची गरज व नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरील परिणाम

## १९.१ राज्यपाल

भारतीय राज्य पद्धतीमध्ये घटनेला महत्त्व असून भारताने लोकशाही पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. राज्य व केंद्र शासन व्यवस्थेमध्ये सारख्याच पद्धतीने धोरणे राबविली जातात. राज्यपातळीवर राज्यपालांना घटनेने अधिकार दिलेले आहेत. परंतु प्रत्यक्ष कार्यकारी अधिकार मंत्रिमंडळ आणि मुख्यमंत्र्यांना दिलेले आहेत.




आकृती १९.१ : राजभवन अहमदाबाद

### १९.१.१ नेमणूक :

राज्याच्या राज्यपालाची नेमणूक भारताच्या राष्ट्रपतींकडून होते. राज्यपालांसाठी खालील पात्रता आवश्यक असते.

१. भारताचा नागरिक असावा.

२. त्यांचे किमान वय ३५ वर्षे असावे.

३. कार्यकाळात कोठेही नोकरीमध्ये असता कामा नये.

जर ती व्यक्ती लोकसभा, राज्यसभा किंवा केंद्रीय मंत्रीमंडळ किंवा राज्यमंडळात असेल तर त्यांना त्या पदांचा राजीनामा द्यावा लागतो. राज्यपालांची नेमणूक ५ वर्षांसाठी असून राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत पदावर असतात म्हणजेच मुदतीपूर्वी राष्ट्रपती त्यांचा राजीनामा मागू शकतात परंतु राष्ट्रपती, राज्यपालांची नेमणूक किंवा पदावरून दूर करताना राष्ट्रपती व पंतप्रधानांशी सल्ला मसलत करतात.

### उपक्रम १९.१

प्रत्येक राज्याला राज्यपाल असले तरी काही वेळा दोन राज्यांची जबाबदारी एक राज्यपालांवर दिलेली असते. राज्यपालांनी राजीनामा दिल्यास शेजारील राज्याच्या राज्यपालांवर ही जबाबदारी टाकलेली

असते. अनेक वेळा अशी स्थिती निर्माण झालेली आहे. शिक्षक, मित्र किंवा वर्तमान पत्रातील माहितीवरून किंवा इंटरनेटवरून माहिती मिळवा की जेथे एकाच व्यक्तीवर दोन राज्याची राज्यपाल म्हणून जबाबदारी सोपविलेली आहे.

### १९.१.२ राज्यपालांचे अधिकार :

प्रत्येक पदाच्या काही जबावदाऱ्या व अधिकार असतात. घटनेचा प्रमुख म्हणून राज्याची जबावदारी घटनेने दिलेली आहे. राज्यपालांचे अधिकार : (अ) कार्यकारी अधिकार (ब) विधीविषयक अधिकार (क) आर्थिक अधिकार (ड) विवेक अधिकार

#### अ) कार्यकारी अधिकार :

भारतीय राज्य घटनेने संपूर्णपणे राज्याच्या घटनेचे अधिकार दिलेले आहेत. मुख्यमंत्री, मंत्री परिषद यांना सल्ला देणे, मुख्यमंत्र्यांची नेमणूक करणे आणि मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने मंत्री मंडळाची नेमणूक करणे. राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष, राज्य निवडणूक आयुक्त, राज्य अर्थ आयोगाचे आयुक्त, महाआधिवक्ता यांच्या नेमणूका राजपालांकडून केल्या जातात. हाय कोर्टाचे न्यायाधिशांच्या नेमणूका करताना राष्ट्रपती, राज्यपालांशी सल्लामसलत करतात. राज्यपालांचे अधिकार नामधारी असतात. मुख्यमंत्रीची नेमणूक करीत असले तरी विधानसभेतील बहुमतवाल्या पक्षाच्या नेत्याची नेमणूक केली जाते. मंत्रीमंडळाची नेमणूक राज्यपाल करीत असले तरी मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानेच मंत्रीमंडळ तयार होते. कार्यकारी अधिकाराचा वापर मुख्यमंत्री व मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानेच होतो.

#### ब) विधिविधयक अधिकार :

राज्यपाल हा राज्य विधी मंडळाचा घटक असतो. त्यामुळे विधीविषयक अधिकार दिलेले असतात. विधीमंडळ अधिवेशन बोलविण्याचा, स्थगित करण्याचा अधिकार असतो. प्रत्येक अधिवेशाचे अभिभाषण करणे तसेच दोन्ही सभागृहाचे एकत्र अधिवेशन बोलवू शकतो. निवडून आलेला एक ॲंग्लो इंडियन सदस्याची विधानसभेवर नियुक्ती करण्याचा अधिकार असतो. द्विगृही सभागृह असले तर विधान परिषदेच्या एक षष्ठांश सदस्यांची नेमणूक करू शकतो. हे सर्व कामकाज मंत्रीपरिषद आणि मुख्यमंत्र्याच्या सल्ल्याने होते. विधानसभेत एखादे विधेयक पास झाले तरी राज्यपालांची सही झाल्याशिवाय कायद्यात रुपांतर होत नाही.

#### क) आर्थिक अधिकार :

प्रत्येक वर्षी शासनाचे अंदाजपत्रक सादर होते. अंदाजपत्रक हे वित्त विभागाकडून सादर होत असले तरी ते राज्यपालाच्या वतीने सादर होते. आकस्मित निधीवरीही राज्यपालांचे नियंत्रण असते.

#### ड) विवेकाधिकार :

राज्यमंडळाच्या सल्ल्यानुसार राज्यपाल कारभार करतात. म्हणजेच राज्यपालांना स्वतंत्र अधिकार नसतो. परंतु घटनेनुसार विशिष्ट परिस्थितीमध्ये राज्य मंत्री मंडळाचा सल्ला न घेता राज्यपाल

स्वत:चा अधिकार वापरतात. मुख्यमंत्री पदासाठी स्वत:च्या निर्णयाने बहुमत नसतानाही एखाद्या पक्षाला निमंत्रण देवू शकतात. राज्यपाल हे केंद्र व राज्य शासनाचा दुवा असतात. विधानसभेत एखादे विधेयक मंजूर होवूनही राष्ट्रपतींच्या विचारार्थ परत पाठविता येते. तसेच राज्य शासनाचे काम घटनेप्रमाणे चालत नसेल तर राज्यपाल राष्ट्रपतीकडे तसा अहवाल सादर करतात. कलम ३५६ अन्वये राज्यामध्ये राष्ट्रपती राजवट लागू शकते. मंत्रीमंडळ, विधानसभा बरखास्त होऊ शकते. अशा आणिबाणीच्या परिस्थितीमध्ये राज्यपाल राष्ट्रपतींच्या वतीने कामकाज पाहतात.

### १९.१.३ राज्यपाल आणि मंत्रीमंडळ यांचे संबंध :

राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्रीमंडळ मिळून कार्यकारी मंडळ तयार होते. सर्वसामान्यपणे राज्यपाल सल्ल्याच्या भूमिकेतून अधिकार वापरतात. एकदा मुख्यमंत्री पदावर विराजमान झाले की राज्यपालाचे कामकाज सर्वसाधारण होते. बहुमतवाल्या पक्षाच्या नेत्याला बोलावून मुख्यमंत्री पद देवून अन्य मंत्रीमंडळ नेमणूक राज्यपालांकडून होते. बहुमत हे एका पक्षाचे अथवा अनेक पक्षाचे किंवा स्वतंत्र पक्षाचे सदस्य निवडून आलेले असले तरी राज्यपाल त्यांच्या अधिकारामध्ये निर्णय घेवू शकतात. राज्यपालांचा विश्वास असेपर्यंत मंत्रीपदी असू शकतात. प्रत्यक्षात विधानसभेमध्ये बहुमत असल्याशिवाय मंत्रीपदी असू शकत नाहीत. राष्ट्रपती राजवट असेल तर मात्र मंत्रिमंडळ, मुख्यमंत्री सर्व बरखास्त होवू शकतात.

मुख्यमंत्री राज्यपालांना मंत्रीमंडळाचे निर्णय कळवीतात. प्रशासनाची आवश्यक ती माहिती देतात. मंत्री म्हणून स्वत: निर्णय घेतला असेल तर राज्यपाल, मुख्यमंत्र्यांना अशी बाब मंत्रीपरीषदेमध्ये मांडण्यास सांगतात. राज्यपाल हे पद नामधारी असते. प्रत्यक्षात मंत्रीमंडळ व त्याचे प्रमुख मुख्यमंत्री यांच्याकडेच अधिकार असतात. परंतु राज्यपाल फक्त घटनेचे नामधारी प्रमुख असतात असे म्हणता येत नाही. विशिष्ट परिस्थितीमध्ये राज्यपालांना त्यांचे अधिकार परिणामकारक राबविता येतात. जेव्हा राजकीय अस्थिरता असते. त्या काळात प्रामुख्याने आपले अधिकार वापरता येतात. जेव्हा केंद्रशासन राज्यशासनाकडे काही मार्गदर्शन करते. तेव्हा राज्यपालांना परिणामकारकरित्या धोरण राबवावे लागते. विशिष्ट परिस्थितीमध्ये स्वत:चे अधिकार वापरून राज्यपाल आपले प्रत्यक्षरूप दाखवू शकतात.

### पाठ्यांशावरील प्रश्न १९.१

**१. खालील अचूक विधानासमोर बरोबर ( ✓) ची खूण करा.**

१) राज्यपाल .......


(अ) निवडणूक (ब) नेमणूक (क) नामनिर्देशन (ड) निवड

२) राज्यपाल पदासाठी किमान वयाची अट ........

(अ) १८ वर्षे (ब) २३ वर्षे (क) ३० वर्षे (ड) ३५ वर्षे

३) राज्यपालांचा कार्यकाल ..........

(अ) २ वर्षे (ब) ५ वर्षे (क) ६ वर्षे (ड) आयुष्य भर



टिपा

## २. खालील विधाने चूक की बरोबर लिहा.

१) राज्यपाल हे मुख्यमंत्री व अन्य मंत्र्यांची नेमणूक करतात. बरोबर / चूक

२) राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांची नेमणूक मंत्रीमंडळाच्या सल्ल्याने राज्यपाल करतात. बरोबर / चूक

३) राज्यपाल हे विधानसभेचा अविभाज्य घटक आहेत. बरोबर / चूक

४) विधानसभेत मंजूर झालेल्या विधेयकाला राज्यपालांच्या सहमतीची आवश्यकता नसते. बरोबर / चूक

५) अर्थ विषयक बील विधानसभेत राज्यपालाच्या शिफारशीशिवाय सादर करता येते. बरोबर / चूक

३. एका राज्याच्या मुख्यमंत्री व काही मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचा ठपका लोकायुक्ताने ठेवला. मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी सुरू झाली. अशा परिस्थितीमध्ये राज्यपालांनी राष्ट्रपतींकडे अहवाल पाठविला की राज्य सरकार हे घटनेप्रमाणे चालत नसून राष्ट्रपतींनी त्या राज्यावर राष्ट्रपती राजवट लागू करावी. राज्यपाल आपला कोणता अधिकार वापरतील ? राज्यपालांना अशा प्रकारचे अधिकार दिल्याबद्दल आपल्याला काय वाटते.

## १९.२ मुख्यमंत्री आणि मंत्रीमंडळ

### १९.२.१ नियुक्ती

या आधी आपण पाहिलेले आहे की राज्याचे प्रमुख, मुख्यमंत्री आणि मंत्रीमंडळ राज्य चालवित असतात. मुख्यमंत्र्यांची नेमणूक, मंत्र्यांची नेमणूक राज्यपालांकडून होते. मुख्यमंत्र्यांचा कार्यकाल ५ वर्षांचा असतो. परंतु विधानसभेतील सदस्यांच्या बहुमतावर कार्यकाल ठरतो. मुख्यमंत्री किंवा मंत्री सभागृहाचे सदस्य नसतील तर एका तरी सभागृहाचे सदस्यत्व नेमणूक झाल्यापासून सहा महिन्यात मिळवावे लागते. मंत्र्यांवरील जबाबदारी (खातेवाटप) मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने राज्यपाल करतात.

### १९.२.२ मुख्यमंत्र्यंचे आणि मंत्र्याचे कामकाज :

मुख्यमंत्री हे राज्यातील विविध बाबींना जबाबदार असतात. जर चांगल्या घटना घडल्या तर त्यांची स्तुती केली जाते. मात्र वाईट घटना घडल्यास त्याच्यांवर टिका केली जाते. याचे कारण ते राज्याचे प्रमुख असतात. त्यांची कामे पुढीलप्रमाणे.

- मंत्र्यांच्या नेमणूका करताना खातेवाटप करताना राज्यपालांना सल्ला देणे.
- मंत्रीमंडळांची सभा घेणे, विविध खात्याच्या मंत्र्यांचा समन्वय साधणे
- राज्याचे धोरण ठरविणे विविध विधेयकांना सभागृहाची मान्यता घेणे.
- मंत्री परिषद आणि राज्यपाल यांच्याशी समन्वय साधणे.
- प्रशासनातील निर्णय मंत्री आणि प्रशासन यांना कळविणे, विधेयक सभागृहात मांडण्यापूर्वी राज्यपालांची अनुमती घेणे.

❖ मंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयांची राज्यपालावरोबर सकारात्मक चर्चा करणे.

### १९.२.३ मुख्यमंत्री स्थान :

मुख्यमंत्री प्रत्यक्ष राज्याचे कार्यकारी प्रमुख असतात. राज्याचे धोरण ठरवून मंत्र्यांना धोरण राबविण्याचे मार्गदर्शन करतात. राज्याच्या धोरणांची अंमलबजावनी करतात. एकाच पक्षाची राजकीय सत्ता असल्यास प्रभाव अधिक असतो परंतु विविध पक्ष मिळवून सरकार तयार झालेले असेल तर समविचारी पक्षाचा सतत दबाव असतो व त्यामुळे बहुमत टिकविण्याची जबाबदारी वाढते.

### उपक्रम १९.२

जेव्हा राजकीय पक्षाला निर्णायक बहुमत नसते तेव्हा अन्य राजकीय पक्षांची तसेच स्वतंत्र निवडून आलेल्या सदस्यांची बहुमतासाठी मदत घेतली जाते. असे युती सरकार होते. किंवहुना निवडणूकांपूर्वी मित्र पक्षाच्या सहकार्याने एकत्र येवून निवडणूका लढविल्या जातात जर विजय झाला तर युती सरकार स्थापन होते.

काही बाबी लक्षात आल्यानंतर खालील गोष्टी करा.

१. सध्या अस्तीत्त्वात असलेल्या दोन राज्यांत युती सरकार असल्याची उदाहरणे द्या. कोणत्या पक्षांनी संयुक्त सरकार स्थापन केलेले आहे त्याची नावे लिहा.

२. निवडणुकांपूर्वी एकत्र येवून लढाई जिंकून सरकार स्थापन केलेल्या राज्यांचे उदाहरण द्या.

### पाठ्यांशावरील प्रश्न १९.२

**१. चूक की बरोबर विधाने ओळखा.**

१) मंत्री मंडळाची बैठक राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली होते. बरोबर / चूक

२) मुख्यमंत्री हे राज्यपाल व मंत्री यांचा दुवा असतो. बरोबर / चूक

३) राज्यपाल हे मंत्र्यांच्या बाबतीतील गोष्ट मुख्यमंत्र्यांना विचारतात. बरोबर / चूक

४) राज्यांमध्ये राज्यपाल हे प्रत्यक्ष शासनाचे प्रमुख असतात. बरोबर / चूक

५) मंत्री मंडळातील मंत्र्यांनी घेतलेल्या निर्णय मंत्रीमंडळामध्ये निर्णय घेण्यासाठी राज्यपाल मुख्यमंत्र्यांना विचारणा करतात. बरोबर / चूक

**२. सोबतची घटना पहा.**

राज्याच्या मुख्यमंत्र्यांविरुद्ध गंभीर भ्रष्टाचाराचे आरोप ठेवलेले प्रसारमाध्यमांनी मुख्यमंत्र्यांविरुद्ध भरपूर पुरावे जमा केले. सदर प्रकरणी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) राज्यपाल राष्ट्रपतींच्याकडे सदर प्रकरणाचा अहवाल पाठवून राष्ट्रपती राजवटीबद्दल शिफारस करतील का?

२) निवडून आलेल्या प्रतिनिधीने भ्रष्टाचार करणे या कारणावरून त्यांना पदावरून दूर करता येईल का? गटनेत दुरुस्ती करण्यासाठी जनतेला मागणी करता येईल का?

३) लोकशाही पद्धतीने सरकार निवडून आलेले असल्याने लोकशाही टिकविण्याचा सरकार प्रयत्न करील का?

## १९.३ विधान सभा

प्रत्येक राज्यात विधानसभा असते. कर्नाटक विधानसभेचे सोबत चित्र आहे. अनेक राज्यात द्विगृही सभागृह असते. तर काही राज्यात एकच सभागृह असते. राज्यपाल हे सभागृहाचे अविभाज्य घटक असतात. विधानपरिषदेला वरीष्ठ सभागृह म्हणतात. तर विधानसभेला कनिष्ठ सभागृह म्हणतात. बिहार, जर्मूकश्मीर, कर्नाटक, महाराष्ट्र, उत्तर प्रदेशात द्विगृही सभागृह आहेत. उरलेल्या २३ राज्यांमध्ये द्विसभागृह नाहीत.



**आकृती १९.२ : विधानसभा : विधान सौधा (बंगलुरु)**

### १९.३.१ विधानसभा रचना

द्विसभागृह असतानाही विधानसभा ही अधिक महत्त्वाची असते. भारतीय राज्यघटनेप्रमाणे विधानसभा सभागृह सदस्यांची संख्या ५00 पेक्षा कमी व ६0 पेक्षा अधिक असते. परंतु गोवा, सक्कीम, मिझोरम राज्यातील सभागृहामध्ये ६0 पेक्षा कमी संख्या आहे. अनुसूचित जाती अनुसूचित जमाती यांच्यासाठीही राखीव जागा असतात. सभागृहामध्ये जर अँग्लो इंडिअन निवडून आलेला सदस्य नसेल तर एका

सदस्याला स्वीकृत सदस्य म्हणून राज्यपाल नियुक्ती करतात. आमदार (विधानसभा सदस्य) हे प्रौढ मतदारातून निवडून आलेले असतात. त्यांची पात्रता पुढील प्रमाणे.

- तो भारतीय नागरिक असावा.
- २५ वर्षापेक्षा कमी वय नसावे.
- त्यांचे मतदारांच्या यादीमध्ये नाव असावे.
- त्याने कोठेही शासकीय नोकरी करता कामा नये.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

**प्रौढ मतदार म्हणजे काय?** ज्या स्त्रीपुरुषांचे किमान वय ´ १८ वर्ष त्याला मतदानाचा हक्क असतो. कोणत्याही वंश, जात, धर्म किंवा स्त्री पुरुष जन्मस्थान या आधारे भेदभाव करता येणार नाही.

विधानसभा सदस्यांचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो परंतु राज्यपाल हे मुख्यमंत्र्याच्या सल्ल्यानुसार सभागृह बरखास्त करू शकतात. सरकार निलंबन किंवा बरखास्तीनंतर तेथे राष्ट्रपती राजवट लागू होते. राष्ट्रीय आपत्ती काळात विधानसभेचा कार्यकाल जास्तीत जास्त एका वेळी एक वर्षाच्या कालावधीची मुदत वाढ मिळू शकते.

### १९.३.२ विधान परिषद

राज्याचे वरिष्ठ सभागृह किंवा विधान परिषद या सभागृहामध्ये राज्याच्या विधान परिषदेमध्ये, विधानसभेच्या सदस्यांच्या एक तृतीयांश पेक्षा अधिक संख्या नसावी. परंतु ही संख्या ४० पेक्षाही कमी असता कामा नये. जम्मू–काश्मीरच्या सभागृहामध्ये ही संख्या ३६ आहे. हा अपवाद आहे. विधान परिषद सदस्य अप्रत्यक्ष निवडणूकीतून किंवा नियुक्तीने आलेले असतात.

**विधानपरिषद रचना**

- एक तृतीयांश सदस्य स्थानिक सरकार म्हणजेच नगर पालिका, जिल्हा परिषदातून निवडून आलेले असतात.
- एकतृतीयांश सदस्य हे विधानसभेतून निवडून आलेल्या सदस्यातून निवडून आलेले असतात.
- एक बारांश सदस्य पदवीधर मतदारांतून निवडून आलेले असतात.
- एक बारांश सदस्य शिक्षक मतदार संघातून निवडून आलेले असतात किमान तीन वर्षांचा शिक्षक म्हणून अनुभव आवश्यक व माध्यमिक शाळेच्या वरच्या वर्गांना अध्यापन केलेले असले पाहिजे.
- एक षष्ठांश सदस्यांची राज्यपालांकडून नियुक्ती होते.

विधान परिषद हे कायम सभागृह असून ते कधीही बरखास्त होत नाही. सदस्यांचा नियुक्तीचा कालावधी सहा वर्षाचा असतो. सभागृहातील १/३ सदस्य दर दोन वर्षांनी निवृत्त होतात. निवृत्त होणाऱ्या सदस्य पुनर्निवडणुकीस पात्र असतात. विधानसभा सदस्यांच्या पात्रतेप्रमाणेच विधानसभा सदस्यांची पात्रता असते. परंतु विधान परिषद सदस्यांची वयोमर्यादा ३० वर्ष (विधानसभा सदस्य मर्यादा २५ वर्षे)

विधानपरिषद सभागृहाची वर्षातून किमान दोन अधिवेशन होतात व दोन अधिवेशनामध्ये सहा महिन्यापेक्षा अधिक कार्यकाल जाता कामा नये, विधान सभा व विधान परिषद सदस्य हे निवडणूक अधिकारी सभापती, अध्यक्ष उपाध्यक्षांना निवडून देतात. दोनही सभागृहाचे अध्यक्ष आपआपल्या सभागृहाचे कामकाज, शिस्त व आदेश पालन करून चालवितात.

### १९.३.३ विधानसभा कामकाज

विधानसभेचे कामकाज खालील प्रमाणे होते.

अ) **कायदेमंडळ :** सभागृहास कायदे करण्याचा अधिकार आहे. सर्व कायदे येथे मंजूर व्हावे लागतात. सभागृह द्विगृही असले तरी कोणत्याही सभागृहामध्ये विधेयक सादर केले जाते. जे बील विधानसभेमध्ये मंजूर केले जाते. ते बील विधान परिषदेत मंजूरीसाठी पाठविले जाते ते बील मंजूर होते किंवा काही शिफारशीने पुन्हा विधानसभेत पुन:विचारार्थ पाठविले जाते. दुरुस्ती करून बील पुन्हा विधानसभेत मंजूर झाल्यास पुन्हा ते दोन्ही सभागृहामध्ये मंजूर आहे. असे समजले जाते. अर्थ विधेयक विधानसभेत मंजूर झाल्यावर विधान परिषदेत मंजूरीसाठी पाठविले जाते. जर एखादे बिल शिफारशीसाठी पाठविलेले आणि ते १४ दिवसामध्ये परत आले नाही तर विधान परिषद ते बील नामंजूर होवूनही विधान परिषदेतहे बील मंजूर झालेले आहे, असे समजले जाते. विधानसभेतील मंजूर बील राज्यपालाकडे पाठविले जाते. राज्यपाल विलास संमत्ती देतात किंवा पुनर्विचारार्थ विधशनसभेकडे पाठवितात.

ब) **कार्यकारीमंडळावरील नियंत्रण :** राज्य विधानसभेचे कार्यकारी मंडळावर नियंत्रण असते. मंत्रीमंडळ हे विधानसभेच्या कामकाजाला सामुहिकरित्या जबाबदार असते. सभागृहावरील विश्वास टिकविण्यासाठी ते कार्यालयात असतात. विधान सभेवर अविश्वास मंजूर झालेला असल्यास मंत्रीमंडळ बरखास्त होते. सभागृहातील प्रश्नांना किंवा उपप्रश्नांना उत्तर देण्याची सरकारी जबाबदारी असते. सभेचे कामकाज स्थगित झाल्यास पुन्हा सभेची सूचना काढून सभा बोलविली जाते.

क) **मतदानाचा अधिकार :** भारताच्या राष्ट्रपतींच्या निवडणूकेचेवेळी विधानसभा सदस्यांना मताधिकार असतो. तसेच विधानपरिषद सदस्यांना निवडून देण्याचा मताधिकार असतो.

ड) **घटना दुरुस्ती अधिकार :** घटना दुरुस्तीचेवेळी सभागृहामध्ये पुरेसे संख्याबळ असावे लागते. दोन्ही सभागृह सदस्यांच्या संख्येच्या किमान पन्नास टक्के संख्याबळ घटना दुरुस्तीसाठी असावे लागते.

## १९.४ राज्य सरकारचा नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम :

राज्यसरकारच्या धोरणांचा आणि योजनांचा परिणाम जनतेच्या दैनंदिन जीवनावर कळत नकळत परिणाम होतो. राज्याच्या जनतेच्या कल्याणाच्या योजना राबविल्या जातात. अनेक वेळा केंद्रसरकारच्या योजना राज्यसरकार राबवित असते.

आंध्रप्रदेश आणि राजस्थानमध्ये शाळाबाह्य मुलांनी शाळेत यावे यासाठी काही योजना राबविलेल्या आहेत. काही आव्हानात्मक कामे करावी लागतात. कर्णबधीर, दृष्टीहीन, शारीरिक अपंग, मानसिक अपंगत्व असणाऱ्या मुलांसाठी शिक्षणाची व्यवस्था करणे आणि शाळेमध्ये येतील असे पाहणे. हसतखेळत शिक्षण, शिक्षणात कॉम्प्युटरचा समावेश असावा. केंद्रशासनाची शालेय पोषण आहार योजना, उत्तर प्रदेशात तर ९५००० प्राथमिक शाळांत योजना सुरू झाली. सदर योजनेसाठी सरपंचावर जबाबदारी टाकण्यात आली. राज्य सरकारच्या वतीने गहू, तांदूळ, भाजीपाला, सोयाबीन आणि डाळीचा त्यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य सरकारने शालेय आरोग्य व स्वच्छता यावर भर दिलेला आहे. मुलांना स्वच्छतेचे समजून त्यांच्यामध्ये शालेय स्तरावरच आरोग्याचे धडे दिले जातात त्यांना स्वच्छता दूत म्हणतात. स्वच्छता अभियान, केंद्रसरकारचा कार्यक्रम महाराष्ट्र राबवित आहे. नागालँडमध्ये शैक्षणिक, आरोग्य व वीज याबाबात सामाजिक शिक्षण म्हणून शासनाने जबावदारी घेतलेली आहे.

### तुम्हास हे माहित आहे का ?

नागालँड सार्वजनिक संस्था कायदा (२) २००२ प्राथमिक शिक्षण संस्था व सेवा नियमावली १५ एप्रिल २००२ च्या कायद्याअन्वये प्राथमिक शिक्षणाचे सामाजिकरण करण्यात आले.

नागालँडचे प्रमुख सचिवांचा मोठा वाटा असून नागा जीवन पद्धती हा आधार घेवून प्राथमिक शिक्षणामध्ये नागासंस्कृतीचा समावेश आहे. २००१ मध्ये मुख्य सचिवांनी शासनाला योजना समजावून सांगितली. नागा संस्कृतीला प्राधान्य दिले. मोरॉंग (मिटिंग हॉल) ही शिक्षणासाठी जागा उपलब्ध झाली व त्यामध्ये सर्वजण सहभागी होवू लागले व सन २००२ पासून सर्वत्र प्राथमिक शाळा सुरू झाल्या.

### पाठ्यांशावरील प्रश्न १९.३

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. द्विगृही सभागृह व्यवस्था ही कोणत्या तीन राज्यामध्ये आहे?

२. विधान सभेत एखादे विधेयक मंजूर होवून विधान परिषदेत पाठविले व तेथून १४ दिवसात परत आले नाही तर काय परिस्थिती निर्माण होते?

३. सर्वसाधारण विधेयक मंजूरीसाठी विधान परिषदेला किती कालावधी दिला जातो?

४. मंत्रीमंडळावर विधानसभेचे नियंत्रण असते ते दोन उदाहरणासह लिहा.

५. विधान सभेला निवडणूकीचे असलेले दोन अधिकार लिहा.

## १९.५ उच्च न्यायालय आणि दुय्यम न्यायालय :

उच्च न्यायालयाच्या बाबतीत आपणास माहिती असेल. घटनेप्रमाणे प्रत्येक राज्यात उच्च न्यायालय असते. एखाद्या हायकोर्टाकडे दोन राज्यांचे कार्यक्षेत्र असू शकते. उदा. गुवाहाटीचे उच्च न्यायालय आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेश, नागालँड मिझोरम, मणीपूर, त्रिपूरा या राज्यांसाठी आहे. केंद्रशासित प्रदेशासाठी नजीकच्या राज्याचे उच्च न्यायालयाकडे कार्यक्षेत्र सोपविलेले असते.



**आकृती १९.३ : गुवाहाटी उच्च न्यायालय**

### १९.५.१ उच्च न्यायालयाची रचना :

प्रत्येक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि इतर न्यायाधीश असतात. न्यायाधीशाची संख्या राष्ट्रपती ठरवितात. त्यामध्ये वेळोवेळी बदल होतो. उच्च न्यायालयातील न्यायाधिशांची संख्या सर्व त्र सारखी नसते. राष्ट्रपती मुख्य न्यायाधिशांची नेमणूक करताना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिशांबरोबर चर्चा करतात तसेच इतर न्यायाधिशांची नेमणूक करताना उच्च न्यायालयाचे न्यायाधिशांशी चर्चा करीत असतात. राज्याच्या राज्यपालांचे बरोबरच उच्च न्यायालयातील अन्य न्यायाधिशांचे नेमणूकीचेवेळी सल्ला मसलत केली जाते. न्यायाधिशांच्या बदल्या या भारताचे मुख्य न्यायाधिशांचा सल्ला घेवून राष्ट्र पती निर्णय घेतात.

टिपा

**उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची पात्रता.**

१. भारताचा नागरिक असावा.

२. देशातील कोणत्याही न्यायालयात किमान १० वर्षे न्यायाधिश म्हणून काम केलेले असतावे. किंवा

३. कोणत्याही उच्च न्यायालयात वकील म्हणून किमान १० वर्षे सलग काम केलेले असावे.

उच्च न्यायाधिशांच्या सेवेची ६५ वर्षे वयाची पर्यंत मर्यादा असते. परंतु स्वच्छेने राजिनामा देता येतो. अक्षम म्हणून किंवा गैरप्रकार केल्यास किंवा पदावरून दूर करण्याची प्रक्रिया लोकसभेत पूर्ण झाल्यास पदावरून दूर करता येते. लोकसभा ही न्यायाधिशांचे पगार व मानधन ठरविते. निवृत्तीनंतर न्यायाधिशांना सर्वोच्च न्यायालयात किंवा ज्या उच्च न्यायालयात न्यायाधिश म्हणून काम केलेले नाही अशा ठिकाणी वकिली करता येते.

### १९.५.२ हायकोर्ट कार्यक्षेत्र

संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेश हे कार्यक्षेत्र असते. हायकोर्टामध्ये मूळ प्रकरण किंवा अपिल करता येते. मूलभूत अधिकारावरील भंग किंवा कायदेशीर हक्क डावललेल्या प्रकरणे थेट मुख्य न्यायालयात दाखल करता येतात. व्यक्तीगत हक्कांसाठी न्याय मागता येतो. निवडणूकीतील थेट आव्हान असणारी (विधानसभा, विधानपरिषद) प्रकरणे दाखल करता येतात.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयात मूलभूत हक्कांचा भंग झाल्यास हमी देण्याचे कामी न्यायालयात दाद मागता येते.

दुय्यम कोर्टामध्ये झालेल्या निकालावर अपिल करण्याचे हक्क असून उच्च न्यायालयामध्ये प्रकरण दाखल करता येते. दिवाणी न्याय प्रकरणे, जिल्हा न्यायालयांचे निकाल, गुन्हेगारी प्रकरणे, सेशन कोर्टात ७ वर्षापेक्षा अधिक काळाची शिक्षा झालेली प्रकरणे दाखल करता येतात. मरेपर्यंत शिक्षेचा खालच्या कोर्टाने दिलेल्या निर्णयाची प्रकरणे, उच्च न्यायालयात दाखल करता येतात. दुय्यम न्यायालयांवर उच्च न्यायालयाचे लक्ष असते. उच्च न्यायालयाचे निकाल खालच्या कोर्टांना बंधनकारक असतात. कोर्टाचा अवमान केल्यास शिक्षा देण्याचा अधिकार उच्च न्यायालयास असतो.

### १९.५.३ दुय्यम न्यायालय किंवा खालचे न्यायालय

**दुय्यम न्यायालय**

| दिवाणी न्यायालय<br>Civil Court | गुन्हेगारी न्यायालय<br>Criminal Court | महसूल न्यायालय<br>Reeinue Court |
|---|---|---|

जिल्हा न्यायालय किंवा उपविभागातील स्तरावील न्यायालय, दुय्यम न्यायालय असे समजले जाते. जिल्हा किंवा सत्र न्यायालय प्रत्येक जिल्ह्यात असते. न्यायालयामध्ये असणारी रचना पुढीलप्रमाणे

दुय्यम न्यायालयात नागरी प्रकरणे, गुन्हेगारी प्रकरणे, महसूल प्रकरणे हाताळली जातात.

- **नागरी प्रकरणे (Civil Cases)** : मालमत्तेसंबंधी तंटा असल्यास न्यायासाठी प्रकरण दाखल करता येते. करारभंग, घटस्फोट, जमीनदार व कूळ अशी प्रकरणे येथे दाखल करता येतात.
- **गुन्हेगारी प्रकरणे** : दरोडे, चोरी, बलात्कार, खिसे कापू, खून याबाबतची प्रकरणे येथे दाखल करता येतात. राज्याच्या वतीने ही प्रकरणे पोलिस दाखल करतात. गुन्हेगाराला कोर्टा कडून शिक्षा ठोठावली जाते.
- **महसूल कोर्ट** : राज्यपातळीवर महसूल प्रकरण दाखल केले जाते. आयुक्त, कलेक्टर, तहसिलदार, नायबतहसिलदार यांचे कार्यालय हे कोर्ट समजले जाते. सर्वच राज्यांमध्ये महसूल न्यायालय नसते. आंध्रप्रदेश गुजरात, महाराष्ट्र राज्यात महसूल कोर्ट आहे. हरियाना, पंजाब, हिमाचल प्रदेश जम्मू काश्मीर हे महसूल कोर्टाऐवजी अर्थ खात्याचे आयुक्त हे कामकाज पाहतात.

## पाठ्यांशावरील प्रश्न १९.४

१. **रिकाम्या जाभा भरा.**

अ) गुवाहटी उच्च न्यायालयात ईशान्येकडील ............ राज्याचे कामकाज चाले.

ब) उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांची नेमणूक ........ कडून ........ च्या सल्ल्याने होते.

क) उच्च न्यायालयाकडे ........... व .......... हे कार्यक्षेत्र असते.

ड) दुय्यम न्यायालयाचे (१) ............ (२) .......... (३) ......... प्रकार आहेत.

२. राज्याच्या उच्च न्यायालयाचे मुख्य व इतर न्यायाधिशाची नावे मिळवा. महिला न्यायाधीश किती आहेत? कदाचित ,एकही नसेल. अशा परिस्थितीचे कारण लिहा.

## आपण काय शिकलो?

- भारत हा संघराज्य पद्धतीचा देश आहे. घटक राज्य आणि केंद्रशासीत व्यवस्था आहे. दोन्ही ठिकाणी सरकार असून संसदीय पद्धतीने राज्यव्यवस्था चालते.

- राज्याचे राज्यपाल, राज्याचे प्रमुख असतात. राज्यपालांची नेमणूक राष्ट्रपती करतात. घटनेप्रमाणे कार्यकारी अधिकार, विधी आणि आर्थिक अधिकारा बरोबरच विवेक अधिकार असतात. मात्र विवेक अधिकार सोडला तर सर्व अधिकार मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानेच वापरता येतात.
- खऱ्या अर्थाने राज्याचे मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्री यांच्याकडे कार्यकारी अधिकार असतात त्यामुळे राज्याचे प्रमुख हे मुख्यमंत्रीच असतात.
- अनेक राज्यात एक गृह सभागृह असते, परंतु काही राज्यात द्विगृही सभागृह आहे. विधानसभा व राज्यसभा ही दोन सभागृह आहेत. ज्या राज्यात एकच सभागृह असते तेथे फक्त विधानसभा असते. विधानसभेमध्ये कायदा मंजूर केला जातो. तसेच विधानसभेचे मंत्रीमंडळावर नियंत्रण असते.
- उच्च न्यायालय हे राज्यातील न्यायव्यवस्थेतील उच्च स्थायी असते. त्या न्यायालयात मूळ खटले तसेच राज्याच्या कार्यक्षेत्रातील अपीलाचे खटले दाखल करता येतात. राज्यात काही दुय्यम न्यायालयेही असतात. या न्यायालयात. नागरी, गुन्हेगारी आणि महसूल क्षेत्राशी संबंधित खटले दाखल करता येतात.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. राज्यपालांची नेमणूक कशी होते? राज्यपालांचे अधिकार व कार्यपद्धती लिहा.

२. मंत्रीमंडळ कसे स्थापन केले जाते? मुख्यमंत्र्याचे अधिकार स्पष्ट करा.

३. विधानसभेची रचना, अधिकार व कार्य पद्धतीचे परिक्षण करा.

४. उच्च न्यायालयाचे कार्यक्षेत्र स्पष्ट करा.

५. दुय्यम न्यायालयात कोणत्या प्रकारचे खटले दाखल केले जातात.

## पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे

### १९.१

१. १. ब

२. ड

३. ब

२. १) चूक

२) बरोबर

३) बरोबर

४) चूक

५) बरोबर

३. प्रश्नाचे उत्तर समजून लिहा. (संदर्भ १९.१.२ ड)

**१९.२**

१. १) चूक

२) बरोबर

३) चूक

४) चूक

५) बरोबर

२. लोकशाही मध्ये राज्यपालांचे भारतीय घटनेमधील स्थान स्पष्ट करा. अशा प्रकारची माहिती तुमच्या मित्रांशी किंवा शिक्षकांशी चर्चा करून लिहा.

**१९.३**

१. विहार, जम्मू आणि काश्मीर, कर्नाटक

२. दोन्ही सभागृहामध्ये विधेयक मंजूर झालेले आहे, असे समजले जाते.

३. एक महिना

४. मुख्य प्रश्न आणि पुरक प्रश्न, स्थगिती व सभेची सूचना, अविश्वास ठराव मंजूर होणे इत्यादी विविध पद्धतीमध्ये मंत्रीमंडळास राजीनामा देण्याची वेळ येते.

५. भारताच्या राष्ट्रपतींना, निवडून आलेले सदस्य निवडून देतात. विधानसभा सदस्य, राज्यसभेचे सदस्य निवडून देतात.

**१९.४**

१. अ) सात

ब) भारताचे राष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालयांचे न्यायाधिश

क) मूळ व अपिल दावे.

ड) १) नागरी न्यायालय २) गुन्हेगारी न्यायालय ३) महसूल न्यायालय

२. माहिती जमा करून प्रश्नांची उत्तरे लिहा.

# २०


# केंद्र शासन

आत्तापर्यंत भारताचे राष्ट्रपती पंतप्रधान, केंद्रीयमंत्री, नोकरशाही, राजकारणी इ. बाबत माहिती मिळविली आहे. लोकांमधील चर्चा घराघरात, कार्यालयामध्ये, अगदी चहाची टपरी किंवा उपहारगृह आणि इतरत्र होत असते. अशी चर्चा का होत असेल याचा आपण कधी विचार केलेला आहे काय? याचे कारण म्हणजे शासन व्यवस्था एका बाजूला आणि तुम्ही आम्ही दुसऱ्या बाजूला. शासनाला विकास आणि लोकांचे जीवनमान याला दिशा देण्याची कसरत करावी लागते. म्हणूनच सदरच्या पाठामध्ये आपण त्याबाबतची अधिक माहिती घेवू. देशामध्ये संघराज्यपद्धती असून आपल्याकडे केंद्रसरकार, राज्यसरकार आणि तळामध्ये काम करणारे नागरी व ग्रामीण स्थानिक सरकार अशी व्यवस्था आहे. केंद्र शासन आणि राज्यशासन व्यवस्था ही संसदीय पद्धतीवर आधारित आहे. घटनेप्रमाणे विविध पातळीवरील शासन व्यवस्थाही कार्यकारी, कायदेकारी आणि न्यायव्यवस्था या व्यवस्थेवर आधारीत आहे. राष्ट्रपती, पंतप्रधान आणि केंद्रीय मंत्री यांची केंद्रशासन चालविण्याची जबावदारी असते. लोकसभा ही सर्वात मोठी व्यवस्था असून सर्वोच्च न्यायालय ही सर्वात मोठी न्यायव्यवस्था आहे. सदरच्या पाठामध्ये विविध व्यवस्थेची माहिती पाहू.

## उद्दिष्टे :

सदरच्या पाठ्य अभ्यासानंतर पुढील माहिती मिळेल.

- ❖ भारताच्या राष्ट्रपतींची निवडणूक प्रक्रिया, कार्यकाल, अधिकार व कार्यपद्धती
- ❖ पंतप्रधान नेमणूक, मंत्रीमंडळरचना, अधिकार व कार्यपद्धती
- ❖ पंतप्रधान अधिकार आणि मंत्रीमंडळाशी संबंध
- ❖ संसद रचना अधिकार आणि कार्यपद्धती लोकसभा व राज्यसभा यांची तुलना
- ❖ भारताचे सर्वोच्च न्यायालय, रचना आणि न्याय व्यवस्था, अधिकारांचे परीक्षण आणि जनतेचे हित आणि न्याय व्यवस्थेचा दैनंदिन जीवनावरील परिणाम





## २०.१ राष्ट्रपती :


खालील चित्र प्रजासत्ताक दिनाचे आहे. दरवर्षी आपण २६ जानेवारी हा दिवस प्रजासत्ताकदिन म्हणून साजरा करतो. भारत प्रजासत्ताक राष्ट्र आहे. याचे कारण काय माहिती आहे? याचे कारण म्हणजे राष्ट्राचे प्रमुख किंवा भारताच्या राष्ट्रपतींची निवडून आलेले असतात. ग्रेट ब्रिटनमध्ये देशाचे प्रमुख पद हे राजा किंवा राणी असतात आणि ते वंशपरंपरेने आलेले असतात.



**आकृती २०.१ : प्रजासत्ताक दिनाची परेड**

### २०.१.१ राष्ट्रपतींची निवडणूक प्रक्रिया :

भारताच्या राष्ट्रपतींची निवडणूक ही लोकसभा व राज्य सभेवर निवडून आलेल्या प्रतिनिधिकडून अप्रत्यक्ष निवडणूक होते. म्हणजेच केंद्रशासीत प्रदेशातून आलेल्या प्रदेशातील प्रतिनिधींनाही मताचा अधिकार आहे. दिल्ली किंवा पुदुचेरी येथूनही निवडून आलेले सदस्य राष्ट्रपतींच्या निवडणूक प्रक्रियांमध्ये सहभागी असतात. निवडणूक ही गुप्त मत पत्रिकेनुसार होते. "Proportional representation by means of single transfarable vote" या पद्धतीने निवडणूक होते.




**आकृती २०.२ : राष्ट्रपतींची निवडणूक प्रक्रिया**

### राष्ट्रपतींची पात्रता व निवडणूक प्रक्रिया

राष्ट्रपती पदाच्या निवडणूकीसाठी पात्र असण्यासाठी खालील पात्रता असावी ‘

१. भारतीय नागरीक असावा.

२. वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असावीत.

३. लोकसभेवर निवडून आलेला असावा.

४. केंद्र किंवा राज्य शासन अथवा स्थानिक शासन व्यवस्थेतील पदावर नोकरीत नसावा.

### कार्यकाल :

राष्ट्रपतींची निवडणूक ५ वर्षासाठी होते. त्यानंतर पदावर अन्य व्यक्ती येण्यापर्यंत या पदावर राहता येणे किंवा पुन्हा निवडणूकीस उभे राहण्यास ती व्यक्ती पात्र असते. राष्ट्रपतींची जागा खालील परिस्थितीमध्ये रिक्त होते.

१. मृत्युच्या कारणाने

२. राष्ट्रपतींच्या राजीनाम्यामुळे

३. राष्ट्रपतींनाही पदावरून दूर करता येते. घटनाबाह्य कृती केलेली असल्यास, दोन्ही सभागृहातील विशेष बहुमताने ठराव संमत केला तर राष्ट्रपतींना पदावरून दूर करता येते. (त्याला महाअभियोग म्हणतात.)

घटनेच्या तरतुदीप्रमाणे राष्ट्रपतीच्या कार्यालयात अनेक पदे असतात. राष्ट्रपतींचे पद रिक्त होते तेव्हा उपराष्ट्रपतींकडे राष्ट्रपतींचा पदभार जातो. परंतु हा कार्यकाल सहामहिन्यांपेक्षा अधिक असता कामा नये.

संसदेमध्ये राष्ट्रपतींचे मानधन ठरते. घटनेप्रमाणे दरमहा ₹ १०,०००/ चे मानधन आहे. परंतु १९९८ मध्ये ५०,००० तर सन २००८ मध्ये मानधन ₹ १,५०,००० पर्यंत वाढविण्यात आले ते आहे. याशिवाय इतर सुविधा आणि राष्ट्रपती भवनातील निवास व्यवस्था असते.



**आकृती २०.३ : राष्ट्रपती भवन**

### ? तुम्हास हे माहित आहे का ?

१. डॉ. राजेंद्रप्रसाद हे भारताचे निवडून आलेले पहिले राष्ट्रपती आणि त्यांनी सलग दोन कार्य काल पदभार सांभाळला.

२. बाराव्या राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील या भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून निवडून आल्या.

३. राष्ट्रपतींच्या कार्यकाळात डॉ. झाकीर हुसेन आणि डॉ. फक्रुधीन अली अहमद यांचा मृत्यू झाला. प्रभारी राष्ट्रपती म्हणून व्ही. व्ही गिरी आणि बी. डी. जत्ती यांचा मृत्यू झाला.

### २०.१.२ राष्ट्रपतींचे अधिकार :

आपण यापूर्वीच पाहिलेले आहे की राष्ट्रपती हे देशाचे प्रमुख असतात. ते देशातील सर्वोच्च पद आहे. देशातील संपूर्ण प्रशासन यांच्या नावाने चालते. राष्ट्रपतींना खालील अधिकार असतात.

अ) **कार्यकारी अधिकार :** देशाचे संपूर्ण कार्यकारी अधिकार राष्ट्रपतींकडे आहेत. पंतप्रधानांची नेमणूक राष्ट्रपतींडून होते. लोकसभेच्या निवडणूकीतून निवडून आलेल्या बहुमत असलेल्या पक्षाच्या नेत्याला निमंत्रित करून पंतप्रधान पद दिले जाते. पंतप्रधानांच्या सल्ल्याने मंत्र्यांच्या नेमणूका केल्या जातात. औपचारिक प्रमुख असले तरी कार्यकारी अधिकार राष्ट्रपतींचेच असतात. राज्यपालांच्या नेमणूका, भारताचे ॲटर्नी जनरल, कंट्रोल आणि ऑडिटर जनरल, ॲम्बेसिडर, हाय कमिशनर, केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासन यांच्या नेमणूका केल्या जातात. लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश, हायकोर्टाचे न्यायाधीशांच्या नेमणूका राष्ट्रपती करतात. आर्मी, नेव्ही, एअरफोर्सच्या मुख्य लष्कर प्रमुखांची नेमणूक राष्ट्र पतींकडून होते.

राष्ट्रपती खालील पदावरील व्यक्तींना काढून टाकू शकतात. (१) मंत्री (२) ॲटर्नी जनरल ऑफ इंडिया (३) राज्याचे राज्यपाल (४) केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य (५) सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे मुख्य आणि इतर न्यायाधिश (६) मुख्य व इतर निवडणूक आयुक्त इत्यादी.

सभागृहामध्ये अभिभाषण करणे ही जबावदारीही राष्ट्रपतीची असते. राजकीय व्युहरचना आणि आंतरराष्ट्रीय करार मदार, बोलणी राष्ट्रपतींच्या वतीने केली जाते.

ब) **विधीविषयक अधिकार :** सभागृहाला असून अनेक कायदेशीर जबावदाऱ्या पार पाडाव्या लागतात. राष्ट्रपतीचे अभिभाषणाने प्रत्येक वर्षीचे पहिले अधिवेशन सुरू होते. सार्वत्रिक निवडणूका झाल्यानंतर पहिले अभिभाषण राष्ट्रपतींचे असते. अधिवेशन समारोप किंवा लोकसभेचे विसर्जन हे मंत्री परिषदेच्या सल्ल्यानुसार होते. कोणताही कायदा किंवा विधेयक राष्ट्रपतीच्या संम्मतीशिवाय कायद्यात रुपांतर होवू शकत नाही. एखादे विधेयक लोकसभेत किंवा राज्यसभेत एकमत होत नसल्यास राष्ट्रपती तो प्रश्न सोडविण्यासाठी एकत्र अधिवेशन बोलावितात. अधिवेशन नसतानाही विनंती करून पंतप्रधान एखादा प्रश्न मांडून त्याचा अद्यादेश राष्ट्रपतींच्याकडून काढला जातो व त्याचे कायद्यात रुपांतर होते.

क) **आर्थिक अधिकार :** राष्ट्रपतींना वरील कार्यकारी किंवा विधीविषयक अधिकाराशिवाय, आर्थिक अधिकार असतात. लोकसभेतील आर्थिक विधेयक राष्ट्रपतींच्या शिफारशीशिवाय मांडले जात नाही. भारताचे अंदाजपत्रक (बजेट) म्हणजेच दरवर्षीचा जमाखर्च लोकसभेत मांडण्याची मान्यता राष्ट्रपतींकडून घेतली जाते.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

❖ **अधिसूचना :** राष्ट्रपती हे लोकसभेच्या सदस्यांना औपचारिक सूचना देवून लोकसभेचे किंवा राज्यसभेचे अधिवेशन कधी सुरू होईल. कधी संपेल या तारखेची सूचना जारी करतात.

❖ **लोकसभेचे राज्यसभेचे कामकाज थांबविणे :** राष्ट्रपती हे सभागृहाचे कामकाज औपचारिक सूचना देवून अधिवेशन विशिष्ठ तारखेला संपेल अशी सूचना देवू शकतात.

- **लोकसभा बरखास्त करणे :** राष्ट्रपती जेव्हा लोकसभा बरखास्त करतात. तेव्हा याचा अर्थ पुन्हा सर्वसाधारण निवडणूका झाल्यानंतरच सभागृहाचे कामकाज सुरू होईल अस असतो.
- **अद्यादेश (Ordinance) :** जेव्हा अधिवेशन नसते परंतु कायद्याची गरज असते तेव्हा पंतप्रधान आणि मंत्रीमंडळाचे सल्ल्याने अद्यादेश काढला जातो. तो कायदाच असतो. जेव्हा अधिवेशन सुरू होईल तेव्हा या अद्यादेशाला लोकसभेची मान्यता मिळते. कोणत्याही परिस्थितीमध्ये लोकसभेने मंजूरी दिली नाही तर अशा प्रकारचा अद्यादेश संपतो.

ड) **न्यायाधिकार :** भारताचे राष्ट्रपती हे देशाचे सर्वोच्च असून पद गुन्हेगाराची शिक्षा माफ करणे अथवा कमी करण्याचे अधिकार असतात. फाशीच्या शिक्षा कमी करणे किंवा कोर्टाने गुन्हा सिद्ध केला तरी किंवा लष्कर न्यायालयनाने गुन्हा सिद्ध केला तरी राष्ट्रपतींना त्या गुन्ह्याबाबत निर्णय घेण्याचा सर्वोच्च अधिकार आहे.

## पाठ्यांशावरील प्रश्न २०.१

१. भारताच्या राष्ट्रपतींची निवडणूक कशी होते.

२. रिकाम्या जागा भरा.

१) भारताचे राष्ट्रपती ........... चे प्रमुख असतात.

२) राष्ट्रपतींच्या निवडणुकीसाठी असलेली पात्रता

(अ) ............ (ब) ...........

(क) ............. (ड) ...........

३. वर्षातून किती वेळा राष्ट्रपती अधिवेशनाची अधिसूचना देतात? अधिवेशनाची नावे कोणती? (सदरची माहिती भारतीय घटनांतून किंवा इंटरनेटमार्फत किंवा शिक्षक किंवा मित्रांकडून मिळवा.)

### २०.१.३ राष्ट्रपती आणि आणिबाणी :

सर्वसाधारण स्थितीमधील राष्ट्रपतींचे अधिकार आपण पाहिलेत. परंतु काही अपवादात्मक परिस्थितीमध्येही अधिकार घटनेने दिलेले आहेत. त्यांना आणिबाणीचे अधिकार असे म्हणतात. हे अधिकार पुढील तीन परिस्थितीमध्ये वापरले जातात. (१) युद्धजन्य स्थिती किंवा बाह्यदेशाचे आक्रमण किंवा सशस्त्रबंड (२) एखाद्या राज्याची घटनात्मक चौकट विघडणे (३) गंभीर आर्थिक संकट

१. **युद्धजन्य स्थिती परकीय आक्रमण किंवा सशस्त्रबंड :** जेव्हा युद्धजन्य स्थिती किंवा परकीय आक्रमण किंवा सशस्त्रबंड होत असल्यास व राज्य किंवा देशाला दहशत बसत असेल तर राष्ट्रपती आणिबाणी जाहीर करतात. यासाठी पंतप्रधान, कॅबिनेट मधील मंत्री यांच्याशी चर्चा केल्यानंतर लेखी स्वरूपात निर्णय जाहीर करतात. सदर अद्यादेश दोन्ही सभागृहामध्ये मांडला जातो. त्यास एक महिन्यात मंजरी न मिळाल्यास आणिबाणी रद्द होते. केंद्रसरकार, राज्य सरकारला आणिबाणीची सूचना देतील. येथे लोकसभेचे राज्यसभेवरील विधिविषयक अधिकार दिसून येतात. राष्ट्रपती मूलभूत हक्क कमी करू शकतात.

## उपक्रम २०.१

सन १९७५ मध्ये इंदिरा गांधी पंतप्रधान असताना अंतर्गत सुरक्षा म्हणून आणिबाणी जाहीर केलेली होती. त्यावेळच्या आणिबाणीबाबत अनेकांच्यामध्ये मतभेद आहेत. अनेक जण त्याला ऐतिहासिक कालावधी असे समजतात. सदरच्या आणिबाणीची कारणे, पुस्तकातून किंवा इंटरनेट अथवा प्रौढांकडून समजावून द्या.

अ) मिळालेल्या माहितीवरून आणिबाणीचे दोन मुद्यांच्या सहाय्याने समर्थन करा.

ब) जे लोक आणिबाणीच्या काळात होते त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर सर्वसाधारण व्यक्तीच्या जीवनावर झालेले दोन परिणाम लिहा.

२. **राज्याची घटनात्मक चौकट विघडणे ही** दुसऱ्या प्रकारचा परिस्थिती ही राज्यपातळीवरील आहे. ज्यावेळी घटनात्मक यंत्रणा कोसळते त्या बाबत राज्यपाल हे राष्ट्रपतींकडे अहवाल सादर करतात. त्या बाबत राष्ट्रपतींना खात्री पटली तर राज्यामध्ये आणिबाणी जाहीर केली जाते. यालाच राष्ट्रपती राजवट म्हणतात. अशी आणिबाणी लोकसभा व राज्यसभेत दोन महिन्यात मंजूर व्हावी लागते. जर सभागृहामद्ये मंजूरी मिळाली नाही तर दोन महिन्यात आणिबाणी संपुष्टात येते. जर सभागृहाने मंजूरी दिली तर सदरची आणिबाणी सहा महिन्यापर्यंतची एकावेळी मंजूरी मिळते. ती तीन वर्षापर्यंत वाढविता येते. परंतु त्याला लोकसभेची मंजूरी लागते. या काळात राज्याची विधानसभा बरखास्तही होत नाही आणि निलंबीतही होत नाही. राज्याचे राज्यपाल राष्ट्रपतींच्या वतीने कार्यकारी अधिकार राबवितात. लोकसभाही कायद्याचा वापर विशिष्ठ राज्यासाठी करीत असते.

## उपक्रम २०.२

आपल्या राज्यामध्ये राष्ट्रपती राजवटीची एकदातरी वेळ आलेली होती का? जर तुमच्या राज्यावर ही वेळ आलेली नसेल तर अन्य राज्यावर अशी वेळ आलेली होती का? आपले शिक्षक यांचेकडून किंवा इंटरनेटवरून माहिती मिळवा.

राष्ट्रपती राजवटीची २/३ कारणे लिहा. निवडणुकानंतर बरखास्त झालेले सरकार पुन्हा सत्तेवर येवू शकते का?

३. **तिसऱ्या प्रकारची आणिबाणी म्हणजे आर्थिक आणिबाणी :** जेव्हा आर्थिक स्थिरता ढासळते तेव्हा आणिबाणी जाहीर केली जाते. वरील दोन्ही आणिबाणीप्रमाणे या आणिबाणीला संसदेकडून दोन महिन्यात मान्यता घ्यावी लागते. आर्थिक आणिबाणीमध्ये राष्ट्रपती हे सर्वोच्च न्यायाधिशापासून, उच्च न्यायाधिश याचेही पगार कमी करू शकतात. परंतु अशी वेळ भारतामध्ये अजूनही आलेली नाही.

**तुम्हास हे माहित आहे का ?**

१. पहिल्या प्रकारची आणिबाणी सन १९६२ मध्ये जाहिर केलेली होती. (चीन-भारत) दुसरी आणिबाणी सन १९६५ मध्ये (भारत-पाकिस्तान युद्ध) तिसरी आणिबाणी सन १९७१ मध्ये (पूर्व पाकिस्तानातून बांगलादेश निर्मिती) चौथी आणिबाणी १९७५ मध्ये इंदिरा गांधी भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी असताना (अंतर्गत अस्थिरता) जाहीर झालेली होती.

२. दुसऱ्या प्रकारची आणिबाणी ही केंद्रसरकारचे विशेष अधिकार बाब आहे. अशी आणिबाणी पंजाबमध्ये १९५१ मध्ये, केरळमध्ये १९५९ मध्ये लागू करण्यात आलेली होती. अशी वेळ वारंवार आली. केंद्र सरकार ज्या पक्षाचे असेल त्यापेक्षा वेगळ्या पक्षाची एखाद्या राज्यात सत्ता असेल तर राज्य सरकार बरखास्त केले जाते असा आरोप केला जातो. कलम क्र. ३५६ अन्वये राज्यामध्ये राष्ट्रपदी राजवट लागू करण्याचा राष्ट्रपतींचा अधिकार आहे. अशा परिस्थितीत निवडून आलेले सरकार निलंबीत केले जाते. व सर्व प्रशासकीय जबाबदारी राज्यपालांकडे येते. कलम ३५६ हे विरोधाभासी असल्याचा आरोप असून राज्यांवर केंद्राची सर्वाधिक सत्ता ही लोकशाहीच्या विरोधात आहे. बोम्मई विरूद्ध केंद्रसरकार (१९९४) या खटल्यामध्ये कलम ३५६ चा गौरवापर होत असून राष्ट्रपती राजवटीतील अधिकार या बाबत सर्वोच्च न्यायालयाने काही मार्गदर्शक सूचना तयार केलेल्या आहेत.

## २०.१.४ राष्ट्रपतीचे स्थान :

केंद्र सरकारचे कामकाजाबाबत वर्तमानपत्रांमध्ये किंवा दूरदर्शनवर पाहिलेले असेल. पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रीमंडळाच्या भूमिकेबद्दलही पाहिलेले असेल की राष्ट्रपती हे सर्वोच्च स्थान आहे. आणिबाणीचेही अधिकार त्यांच्याकडे असतात. म्हणजे राष्ट्रपतींकडे सर्वच सत्ता असते का? नाही. प्रत्यक्षात राष्ट्र पतींच्या नावानेच राज्यकारभार चालतो. परंतु पंतप्रधान आणि मंत्रीमंडळ यांच्या सल्ल्यानेच कारभार चालतो ही घटनेमधील तरतूद आहे. त्यामुळे केवळ सल्ला नसून त्यांना ते बंधनकारक असते. राज्यकारभार पंतप्रधान व मंत्री चालवितात. तेच खरे प्रशासक असतात. सर्व निर्णय पंतप्रधान व मंत्रीमंडळ घेते ते निर्णय फक्त राष्ट्रपतींकडून शिक्कामोर्तब केले जातात. आणिबाणी जाहीर करण्याचीसुद्धा खरी सत्ता राष्ट्रपतींकडे नसते.



ब्रिटिश घटनेमध्ये राजा किंवा राणीला दिलेले अधिकार आणि भारतीय राज्य घटनेमध्ये राष्ट्रपतींना दिलेले स्थान हे सारखेच आहे. राष्ट्रपती हे देशाचे प्रमुख असतात. परंतु त्यांच्याकडे कार्यकारी अधिकार नसतात. ते राष्ट्राचे प्रतिनिधीकडे असतात. राष्ट्रपती राज्यकारभार करीत नाहीत. ते प्रशासनामध्ये नाममात्र प्रमुख असून त्यांच्याच सहीने देशाचे निर्णय घेतले जातात.

(डॉ. बी. आर. आंबेडकर ' घटना समिती)

वरील विधानाकडे लक्ष दिल्यानंतर घटनेच्या अभ्यासक तज्ञांना राष्ट्रपती हे केवळ रबर स्टॅम्प आहे असे वाटते. परंतु हे विधान सत्य नाही. घटनेचे रक्षण करणे, मूल्यांचे जतन करणे ही राष्ट्रपतींची जबाबदारी असते. घटनेचे पावित्र्य जपने ही भूमिका असते. राजकीय अस्थिर परिस्थितीमध्ये सरकार स्थापन करताना राष्ट्रपतींची निर्णायक भूमिका महत्त्वाची असते. सर्वसाधारण स्थितीमध्ये घटनेचे सर्वसाधारण प्रमुख म्हणूनच असतात. आपल्या घटनेमध्येच राष्ट्रपतींना सर्वाधिक मानाचा दर्जा असला तरी वास्तवात अधिकारामध्ये नाही असेच दिसून येते.

## तुम्हास हे माहित आहे का ?

**उपराष्ट्रपतीबद्दल काही माहिती :**

राष्ट्रपतींचा राजीनामा, पदावरून दूर करणे किंवा मृत्यूनंतर रिक्त झालेल्या पदावर उपराष्ट्रपती राष्ट्रपतींचे कामकाज पाहतात. घटनेच्या मार्गदर्शनानुसार उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. उपराष्ट्रपती हे संसदेच्या दोन्ही सभागृहाच्या निर्वाचित सभासदाकडून निवडून दिलेले असतात. राष्ट्रपतींप्रमाणेच उपराष्ट्रपतींना पात्रतेच्या अटी असतात. उपराष्ट्रपती राज्यसभेचे अध्यक्ष तर लोकसभेचे अध्यक्ष सभापती असतात.

## पाठ्यांशावरील प्रश्न २०.२

१. दुसऱ्या प्रकारची आणिबाणी कधी लागू केली जाते? राज्यावर त्याचा काय परिणाम होतो?

२. आणिबाणी जाहीर झाल्यावर सभागृहाचा नेता म्हणून पंतप्रधानांची जबाबदारी कोणती असते?

३. सरकार अल्पमतात येते त्यावेळी राष्ट्रपतींचे पद महत्त्वाचे असते. आपण या विधानाशी सहमत आहात का? कारण द्या.

४. खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.

अ) राष्ट्रपती देशाचे प्रत्यक्ष प्रमुख असतात.

ब) राष्ट्रपती पद म्हणजे रबरी शिक्का

क) राष्ट्रपती हे राज्य चालवू शकत नाहीत व अधिकारही गाजवू शकत नाहीत.

ड) राष्ट्रपती हे घटनेचे रक्षण आणि समर्थन करतात.

## २०.२ पंतप्रधान :

भारताचे पहिले पंतप्रधान कोणते होते हे माहीत आहे? होय चाचा नेहरू म्हणजेच जवाहरलाल नेहरू. त्यांनी पंतप्रधान पद स्विकारले. त्यावेळी महत्त्वाची जबाबदारी होती, त्याबद्दल तुम्हाला काय वाटते? ब्रिटिश सत्तेतून भारताला स्वातंत्र्य मिळालेले होते. कोणती आव्हाने स्वीकारावी लागली? डिस्कव्हरी ऑफ इंडिया या पंडित नेहरूंनी लिहिलेल्या पुस्तकामधील त्यांच्याच शब्दात पहा. "भारत हा गरीब देश नाही. देश समृद्ध असल्यामुळेच येथून अनेक गोष्टींचा पुरवठा होत होता. त्यामुळे लोक गरीब झाले. भारतात संपदा आहे. बुद्धिमत्ता, कौशल्य आणि क्षमतेमुळे वाटचाल करता येईल. ते पुढे म्हणाले' आपण समानतेचे ध्येय ठेवले पाहिजे इतके करून चालणार नाही तर सर्वांना समान संधी दिली पाहिजे. शिक्षण आणि आर्थिक, समिजिक विकासासाठी दुर्बल घटकांना पुढे येण्यासाठी संधी दिली पाहिजे. देशाच्या आश्चर्यजनक प्रगतीसाठी सर्वांना विकासाची दारे खुली करून संधी देणे गरजेचे आहे. सर्व भारतीयांच्या शक्तीने व क्षमतेने देशाची वेगवान प्रगती होईल. आता लक्षात आले असेल की पंतप्रधान पद किती महत्त्वाचे आहे.

सध्या देखील आपण पहात असाल की पंतप्रधान इतरांपेक्षा वारंवार टीव्हीवर येत असतात. पंतप्रधान हे केंद्रीय शासन व्यवस्थेमध्ये महत्त्वाचे पद आहे. घटनेनुसार पाहिले तर राष्ट्रपती हे पद अधिकाराच्या दृष्टीने अतीशय महत्त्वाचे आहे. परंतु घटनेमध्येच अशी व्यवस्था आहे की पंतप्रधान आणि मंत्रीमंडळ यांच्या सल्ल्याने राष्ट्रपती निर्णय घेतात. त्यामुळे केंद्रीय कार्यकारी अधिकार हे पंतप्रधानांच्याकडेच खऱ्या अर्थाने असतात.

राष्ट्रपती हे पंतप्रधानांची नेमणूक करतात. लोकसभेतील बहुमतवाल्या पक्षाच्या नेत्याला निमंत्रित करतात. परंतु युती होत असेल तर एकापेक्षा अधिक पक्षांच्या नेत्यांना निमंत्रित केले जाते. लोकसभेत सर्वाधिक निवडून आलेल्या पक्षाच्या नेत्याला आणि त्याला पाठींबा देणाऱ्या इतर पक्षांच्या सहाय्याने सर्वाधिक प्रतिनिधींची संख्या जमाविणाऱ्या नेत्याला पंतप्रधान पद दिले जाते. जर लोकसभेत तो नेता निवडून आलेला नसेल तर नेमणूकीपासून सहामहिन्यामध्ये लोकसभेचा सदस्य म्हणून निवडून यावे लागते.

### ? तुम्हास हे माहित आहे का ?

एकापेक्षा अधिक पक्षांनी मिळून सरकार तयार झालेले असते त्याला युती सरकार म्हणतात. युती सरकार ही संकल्पना १९६७ पासून आली. अनेक राज्यांमध्ये काँग्रेसशिवाय इतर पक्षांनी एकत्र येवून सरकार स्थापन केलीत केंद्रामध्ये १९७७ सालच्या निवडणुकीत जनता पक्षाचे सरकार आले. खालील यादीमध्ये युती सरकारची वर्षे व पंतप्रधानांची नावे पहा.

| | | |
|---|---|---|
| १. | मोरारजी देसाई | १९७७ - १९७९ |
| २. | चौधरी चरणसिंग | १९७९ - १९८० |
| ३. | व्ही. पी. सिंग | १९८९ - १९९० |
| ४. | चंद्रशेखर | १९९० - १९९१ |
| ५. | ए. वी. वाजपेयी | १९९६ - १९९७ |
| ६. | एच्. डी. देवेगौडा | १९९८ - १९९९ |
| ७. | आय. के. गुजराल | १९९७ - १९९८ |
| ८. | ए. वी. वाजपेयी | १९९८ - १९९९ |
| ९. | ए. वी. वाजपेयी | १९९९ - २००४ |
| १०. | मनमोहनसिंग | २००४ - २००९ |
| ११. | मनमोहनसिंग | २००९ |

NDA ही भारतीय जनता पक्ष व UPA ही काँग्रेसची युती आहे.

## २०.२.१ पंतप्रधानांची कामे

केंद्रसरकारमध्ये पंतप्रधानांना थेट अधिकार दिलेले नसले तरी त्यांच्याकडे प्रमुख सत्ता असते. राष्ट्रपती हे मंत्रीमंडळ आणि पंतप्रधानाचा सल्ला घेतात आणि हा सल्ला वंधनकारक असतो. प्रत्यक्षात पंतप्रधान हे मंत्री मंडळ तयार करतात आणि त्यांची शिफारस हेच मंत्रीमंडळ अणि त्यांचे खातेवाटप असते. पंतप्रधान मंत्रीमंडळाची बैठक घेतात आणि धोरण ठरवितात व हा निर्णय राष्ट्रपतींना कळवितात. पंतप्रधान हे मंत्रीमंडळ व राष्ट्रपती यांच्या मधला दुवा असतो. पंतप्रधानांनीच राजीनामा दिला तर मंत्रीमंडळ आपोआप बरखास्त होते. गरज भासली तर लोकसभेचे विसर्जनाची आणि लोकसभेच्या सर्व साधारण निवडणूकांची शिफारस पंतप्रधान करतात. पंतप्रधान हे केवळ एखाद्या पक्षाचे प्रमुख किंवा लोकसभेचे प्रमुख असे नसून राष्ट्राचे नेते असतात. पंतप्रधानांचे कार्यालय हे सत्तेचे केंद्र आहे तर राष्ट्र पतींचे कार्यालय हे सन्मानाचे स्थान आहे. पंतप्रधान हे नियोजनमंडळाचे अध्यक्ष, राष्ट्रीय विकासमंडळाचे अध्यक्ष असतात. आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये राष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून नेतृत्व करतात.



आकृती २०. ४ : केंद्रीय मंत्रीमंडळाचा शपथ विधी २००९

## २०.२.२ केंद्रीय मंत्रीमंडळ :

भारतीय राज्यघटनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली तयार झालेल्या मंत्रीमंहळाच्या सल्ल्युसार राष्ट्रपती हे कार्यकारी अधिकार वापरतात. एखाद्या निर्णयावर पुन्हा विचार करण्याची संधी देतात व त्या सल्ल्याचा विचार करून राष्ट्रपती निर्णय देतात.

पंतप्रधानांच्या शिफारशीनुसार राष्ट्रपती हे मंत्रीमंहळाची नेमणूक करतात. मंत्रीमंडळाचे तीन स्तर असतात. (१) कॅबिनेट मंत्री (२) राज्यमंत्री (३) उपमंत्री. पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली मंत्रीमंडळ एकत्रित काम करते. संपूर्ण मंत्रीमंडळ लोकसभेला जबाबदार असते. जर लोकसभेमध्ये अविश्वास ठराव मंजूर झाला तर पंतप्रधान आणि मंत्रीमंडळाला राजीनामा द्यावा लागतो याचाच अर्थ मंत्रीमंडळ तरणे किंवा बुडणे हे लोकसभा ठरवित असते.

पंतप्रधानांच्या कामाप्रमाणेच मंत्रीमंडळाची कामे असतात. मंत्री आणि मंत्रीपरिषदेच्या कामकाजात गुप्तता बाळगली जाते. कॅबिनेट मंत्री म्हणजे महत्त्वाच्या खात्याचे मंत्री त्यांची संख्या २० ते २५ असते. राज्यमंत्री स्वतंत्रपणे काम पाहतात किंवा कॅबिनेट मंत्र्यांच्या बरोबर काम करतात. उपमंत्री हे कॅबिनेट मंत्री किवा राज्य मंत्र्यांशी जोडलेले असतात. कॅबिनेटची मिटिंग ही कॅबिनेट मंत्र्यांचीच होते. आवश्यकता वाटलीच तर राज्यमंत्र्यांना अशा मिटिंगला निमंत्रित केले जातात.

## २०.२.३ पंतप्रधानांचे स्थान

आत्तापर्यंतच्या चर्चेत पाहिलेले आहे की पंतप्रधान केंद्रशासनातील प्रमुख सूत्रधार असतात. शासनाचे निर्णाय - धोरण हे पंतप्रधानांचेकडून जाहीर होतात. त्यांचे मंत्रीमंहळ हे कामकाज पाहते. पंतप्रधानांच्या योजना धोरण आणि त्यावरील कार्यवाही याकडे संपूर्ण देशाचे लक्ष असते. आंतरराष्ट्रीय करार मदार, इतर देशांशी चर्चा ही पंतप्रधानांबरोबर होते. त्यांना लोकसभा आणि शासन दोन्हीही सांभाळावे लागते. सहकार्य मिळेल अशाच लोकांना मंत्रीमंडळात निवडले जाते. युती सरकार तयार करताना समविचारी पक्षांकडून सहकार्य मिळेल अशी धारणा असते. गेल्या दर्हाबारा वर्षामध्ये तर फार मोठी कसरत करावी लागलेली आहे. देशाची सुरक्षा आणि संरक्षण या बाबतही निर्णय घ्यावे लागतात.

लोकांच्या जीवनमानाचा विचार करावा लागतो. शेजारील देशाशी शांततेने आणि मैत्रीपूर्ण संबंध कसे राहतील, याचाही विचार करावा लागतो. त्यामुळेच पंतप्रधानपद ही मंत्रीमंडळातील अतिशय महत्त्वाचे पद आहे.

### उपक्रम २०.३

गेल्या काही आठवडयातील वर्तमानपत्रातील, दूरदर्शनवरील भारताची राजकीय, आर्थिक, सामाजिक स्थितीबाबतची चर्चा याबाबतची माहिती जमा करा व त्यावरून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) वर्तमानपत्र आणि दूरदर्शनवरील कोणत्या दोन समस्या चर्चेचा विषय झालेल्या होत्या त्या कोणत्या?

२) पंतप्रधान आणि मंत्री प्रवक्ता यांनी केलेल्या भाष्यावर आपण समाधानी आहात का? कारण लिहा.

३) पंतप्रधानांनी या समस्या कशा सोडवाव्या असे तुम्हाला वाटते ?

### पाठ्यांशावरील प्रश्न २०.३

**१. रिकाम्या जागा भरा.**

अ) पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रीमंडळ हे ............. असते.

ब) राष्ट्रपती हे .......... असलेल्या पक्षाच्या ............ ला पंतप्रधान पदासाठी निमंत्रण देतात.

क) पंतप्रधान हे ............ चे प्रमुख असतात.

ड) राष्ट्रपती .............. च्या शिफारशीने मंत्र्याची नेमणूक करतात.

**२. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ) पंतप्रधान आणि मंत्रीमंडळाचा कार्यकाल संपण्यापूर्वीच पदावरून दूर कसे केले जाते?

ब) मंत्रीमंडळ व राष्ट्रपती या दरम्यानचा दुवा म्हणून कोण काम करते?

क) मंत्रीमंडळाचे तीन स्तर कोणते?

ड) कॅबिनेटच्या मिटींगचे अध्यक्षपदी कोण असते?

## उपक्रम २०.४

पंतप्रधानांकडे विविध प्रकारचे नेतृत्व गुण लागतात. उत्तम नेतृत्त्व गुणाबद्दल आपणास काय वाटते? सध्याच्या पंतप्रधानांच्या अंगी असलेल्या गुणांचे परीक्षण करा. तुमच्या अंगी कोणते नेतृत्वगुण आहेत?

| उत्तम नेतृत्व गुण | पंतप्रधानांच्या अंगी असलेल्या . गुणांसमोर (√) अशी खूण करा | तुमच्या अंगी असलेल्या गुणांसमोर (√) अशी खूण करा. |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

## २०.३ संसद (पार्लमेंट)

केंद्रीय कायदेमंडळाला संसद किंवा पार्लमेंट म्हणतात. याची दोन सभागृहे असतात.

(१) लोकसभा (२) राज्यसभा

भारतात संसदीय राज्य व्यवस्था असून यामधूनच सरकार स्थापन केले जाते. संसदीय राज्यव्यवस्थेचे लोकसभा व राज्यसभा म्हणजेच दोन्ही सभागृहाचे कामकाज पाहू.



आकृती २०.५ : पार्लमेंट

### २०.३.१ लोकसभा :

लोकसभा म्हणजे लोकांचे सभागृह होय. त्याला कनिष्ठ सभागृह म्हणतात. हे सभागृह लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे असते. सभागृहातील संदस्यांची संख्या ५५० पेक्षा अधिक नसते. यापैकी ५३० हे थेट राज्यातील लोकांनी निवडून दिलेले असतात आणि २० सदस्य हे केंद्रशाशीत प्रदेशातून निवडून दिलेले असतात. वय वर्षे १८ पेक्षा अधिक असलेल्या देशातील नागरिकाला मताधिकार असून ते लोकसभेच्या सदस्याला निवडून देत असतात. भारतीय राज्य घटनेप्रमाणे जर ॲंग्लो इंडियन सदस्य नसेल तर राष्ट्रपती त्या समाजातील सदस्याची नेमणूक करतात. लोकसंख्येच्या निकषावर राज्य किंवा केंद्रशासीत प्रदेशाचे मतदार संघ तयार केले जातात. त्याला लोकसभा मतदारसंघ म्हणतात. प्रत्येक मतदारसंघातून लोकसभेचा एक सदस्य निवडून दिलेला असतो.

लोकसभेचा कार्यकाल पाच वर्षाची असतो. परंतु त्यापेक्षा कमी काळातच राष्ट्रपती लोकसभा बरखास्त करू शकतात. आणिवाणीकाळात एक वर्षापर्यंत ही मुदतवाढ मिळू शकते. लोकसभेच्या निवडणूकीसाठी उमेदवारासाठी पुढील पात्रता असावी लागते.

(१) भारतीय नागरिक असावा.

(२) किमान वय २५ वर्षे

(३) केंद्र शासन राजशासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेतील कर्मचारी नसावा.

(४) वेळोवेळी संसदेने मंजूर केलेल्या पात्रतेच्या अटी पूर्ण केलेल्या असाव्यात.

### २०.३.२ राज्यसभा :

संसदेतील राज्यसभा हे वरीष्ठ सभागृह समजले जाते. या सभागृहातील सदस्यांची संख्या २५० असते. यापैकी २३८ सदस्य राज्य व केंद्रशासित प्रदेशातून प्रतिनिधित्व करीत असतात. १२ सदस्यांची निवड राष्ट्रपती करतात. त्यामध्ये साहित्य, कला, शास्त्र, समाजसेवा इत्यादी क्षेत्रातून आलेले असतात. राज्यांतून निवडून आलेले सदस्य राज्यसभेसाठी उमेदवारांना निवडून देतात. प्रत्येक राज्याच्या लोक संख्येच्या प्रमाणात राज्याच्या प्रतिनिधींची संख्या ठरते.

राज्यसभेचे कधीही विसर्जन होत नाही. सदस्यांचा कार्यकाल ६ वर्षांचा असतो. दर दोन वर्षांनी राज्यसभेचे एक तृतीयांश सदस्य निवृत्त होतात. निवृत्त झालेल्या सदस्यालाही पुन्हा निवडून जाता येते. राज्यसभेचे सदस्यत्वासाठी पुढील अटी पूर्ण कराव्या लागतात.

(अ) तो भारतीय नागरिक असावा.

(२) किमान वय ३० वर्षे असावे.

इतर पात्रता लोकसभेच्या उमेदवाराप्रमाणेव असतात. राष्ट्रपती राज्यसभेत अभिभाषण करतात. दोन अधिवेशनामध्ये सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ नसावा. राष्ट्रपती संसदेचे कामकाज स्थगित करू शकतात. किंवा लोकसभा बरखास्त करू शकतात. राष्ट्रपती लोकसभा बरखास्त करू शकतात, परंतु राज्यसभा बरखास्त करू शकत नाहीत. कारण राज्यसभा हे संसदेचे कायम सभागृह असते.

### २०.३.३ सभापती :

लोकसभेचे सभापती हे लोकसभेचे अध्यक्ष असतात. त्यांच्या अनुपस्थितीमध्ये उपसभापती कामकाज पाहतात. सभापती व उपसभापती हे लोकसभेच्या सदस्यांतून निवडून दिलेले असतात. लोकसभेत शिस्तीचे पालन व्हावे याची काळजी घेतात. सभेचे ठराव नोंदी, कागदपत्रे याकडे त्यांचे लक्ष असते. सभागृहामध्ये कोणी आणि किती वेळ बोलावे ते ठरवितात. सर्वसाधारणपणे आपले निर्णायक मत देतात. सभागृहातील निर्णयाबाबत समान मते पडली तरच मतदान करतात. सभागृहातील साधारण विधेयक किंवा आर्थिक विधेयक ते ठरवितात. त्यांचा निर्णय अंतीम असतो. सभासदाच्या हक्कांची जपणूक केली जाते; लोकसभा व राज्यसभा यांच्या एकत्रित सभेच्या वेळी अध्यक्षस्थानी सभापतीच असतात.



**आकृती २०.६ : लोकसभेचे अधिवेशन**

भारताचे उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. अध्यक्ष हे राज्यसभेचे सदस्य नसतात परंतु लोकसभा व राज्यसभेने त्यांना उपराष्ट्रपती म्हणून निवडून दिलेले असते. उपराष्ट्रपतींच्या अनुपस्थितीमध्ये उपसभापती कामे पाहतात. लोकसभा अध्यक्षांप्रमाणेच राज्यसभेचे अध्यक्ष आपले निर्णायक मत देतात.

## २०.३.४ संसदेची कार्यपद्धती :

संसद ही देशातील सर्वात मोठी कायदे करणारी सर्वोच्च शाखा आहे. संसदेचे कार्य खालील प्रमाणे

१. **कायदे करणे :** संसद ही कायदे करते. घटनेप्रमाणे केंद्रीय सूची, सामायिक सूची यावर संसद कायदे करते. जेव्हा केंद्र व राज्य सरकारमध्ये मतभेद असतील तेव्हा केंद्रीय कायद्याचा अवलंब केला जातो. जेव्हा एखाद्या बाबतीत यादीतील विषय नसतो तेव्हा संकीर्ण विषय म्हणून संसदेच्या अखत्यारीमध्ये येतो. साधारण विधेयक लोकसभा किंवा राज्यसभेत मंजूरीसाठी ठेवता येते. जेव्हा लोकसभेत विधेयक मंजूर होते तेव्हा ते राज्यसभेत मंजूरीसाठी पाठविले जाते त्यावर साधक बाधक चर्चा होवून दुरुस्ती सूचविली जाते. जेव्हा दोन्ही सभागृहात एकमत होत नाही तेव्हा दोन्ही सभागृहाची एकत्रित बैठक बोलाविली जाते. लोकसभेच्या सदस्यांची संख्या ५५० तर राज्यसभेची फक्त २५० आहे. राज्यसभेची सदस्य संख्या कमी असल्याने लोकसभेचे राज्यसभेत वर्चस्व दिसून येते. आत्तापर्यंत एकत्रित सभा घेण्याचा ३ वेळा प्रसंग आलेला आहे. दोन्हीही संसदेत मंजूर झालेले विधेयक राष्ट्रपतीच्याकडे पाठविले जाते त्यांची संमती मिळाल्यावर त्याचे कायद्यामध्ये रुपांतर होते.

२. **कार्यकारी अधिकार :** सभागृहाचे मंत्री मंडळावर वर्चस्व असते. संसदीय कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांच्यामध्ये सहसंबंध असतो. मंत्रीमंडळ संसदेला सामुहिकरित्या जबाबदार असते. मंत्रीमंडळार अविश्वास ठराव दाखल करता येतो. सन १९९९ ला वाजपेयी सरकारवर हा प्रसंग आलेला होता. सरकार अल्पमतात आले आणि राजीनामा द्यावा लागला.

संसदेचे मंत्रीमंडळावर नियंत्रण असते ते खालील उदाहरणावरून दिसून येईल.

अ) **प्रश्न व उपप्रश्न विचारणे :** सभागृहामध्ये पहिला तास प्रश्नोत्तराचा असतो त्यामध्ये मंत्र्यांना सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर द्यावे लागते.

ब) **लक्षवेधी सूचना :** सभागृहामध्ये लक्षवेधी सूचना मांडली जाते. सभेचे कामकाज थांबविण्याचा ठराव सभासद मांडू शकतो. सरकारी धोरणाबाबात टीका करणारा. असा कोणताही ठराव सभासद मांडू शकतो.

क) **तहकूब ठराव :** आर्थिक अथवा सर्वसामान्य विधेयक सुद्धा फेटाळण्याचा अधिकार लोकसभेला असतो.

३. **आर्थिक अधिकार :** संसदेला आर्थिक अधिकार असतात. राष्ट्रीय संपदेचे ते ट्रस्टी असतात. केंद्रसरकारवर संसदेचे नियंत्रण असते. प्रशासन यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी वेळोवेळी आर्थिक बाबींना मंजूरी द्यावी लागते. सरकारतर्फे मागणी केलेल्या अनुदानास मान्यता देणे, कमी करणे किंवा नाकारणे हे सभागृह ठरविते. सभागृहाच्या मान्यतेशिवाय कर संकलन किंवा खर्च करता येत नाहीत. राज्यसभा ही चर्चा करू शकते परंतु कायदा करताना राज्यसभाही प्रक्रिया थांबवू शकत नाही.

अ) आर्थिक विधेयक राज्यसभेत सादर करता येत नाही. राज्यसभेला आर्थिक विधेयक नाकारण्याचा अधिकार नाही. काही शिफारशी मात्र राज्यसभा करू शकते जर १४

दिवसात राज्यसभेतून हे विधेयक परत लोकसभेत गेले नाही तर दोन्ही सभागृहामध्ये मंजूर आहे असे गृहीत धरले जाते.

ब) वार्षिक अंदाजपत्रक लोकसभेत सादर केले जाते. राज्यसभेस फक्त चर्चेत सहभागी होता येते. कायद्यात रुपांतर होताना राज्यसभा ते थांबवू शकत नाही.

४. **न्याय विषयक कामकाज :** संसदेला सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश संख्या ठरविण्याचा अधिकार असतो. एका राज्यासाठी एक किंवा दोन राज्यांसाठी सामाजिक उच्च न्यायालये किंवा केंद्रशासीत प्रदेशाचे उच्च न्यायालये ठरविणेचा अधिकार संसदेला आहे. न्यायाधीश तसेच सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश हटविण्यासाठी दोन्ही सभागृहातून मान्यता घेतली तर राष्ट्रपती हे न्यायाधिशांना पदावरून दूर करू शकतात.

५. **संकीर्ण कार्य :** संसद ही राष्ट्रपती व उपराष्ट्रपतीनाही पदावरून दूर करू शकते. त्यासाठी विशेष बहुमत आवश्यक असते. संसदेला घटना दुरुस्तीचेही अधिकार असतात. साधे बहुमत काही बाबतीत पुरेसे असते तर काही घटनेतील बाबींच्या दुरुस्तीसाठी दोन तृतीयांश बहुमत लागते. घटनेतील दुरुस्तीसाठी संसद आणि निम्म्या राज्यांच्या विधानसभेची मान्यता लागते.

## २०.३.५ दोन सभागृहातील तुलना :

संसदेचे कनिष्ठ सभागृह हे अधिक महत्त्वाचे म्हणजेच लोकसभा ही अधिक महत्त्वाची आहे. दोन्ही सभागृहाची तुलना पुढील प्रमाणे करता येईल.

१. लोकसभेचे सदस्य लोकांकडून थेट निवडून आलेले असतात. मात्र राज्यसभेचे सदस्य अप्रत्यक्ष निवडून आलेले असतात.

लोकसभेचा कालावधी हा ठरलेला असतो. राज्यसभा ही कायम स्वरूपी सभागृह आहे. लोकसभेचा कालावधी ५ वर्षाचा असतो. हा कालावधी वाढूही शकतो. तसेच लोकसभा मुदतपूर्व विसर्जितही होऊ शकते.

२. सर्वसाधारण विधेयकासाठी दोन्ही सभागृहांना समान अधिकार असतात. परंतु एकत्र अधिवेशन बोलाविले तर लोकसभेतील सदस्यांची संख्या राज्य सभेच्या सदस्यांच्या दुप्पटीपेक्षा अधिक असल्याने लोकसभेचे वर्चस्व राज्यसभेवर दिसून येते.

३. मंत्रीमंडळावर लोकसभेचे नियंत्रण असते. राज्यसभेत चर्चा, धोरणात्मक, वाद विवाद किंवा शासनावर टीका होते. परंतु लोकसभेत अविश्वास ठराव मंजूर झाल्यास मंत्रीमंडळाला राजीनामा देण्यापर्यंत कार्यवाही होवू शकते.

४. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांच्या निवडणूकीमध्ये दोन्हीही सभागृहांना समान अधिकार असतात. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती किंवा मुख्य न्यायाधीश (उच्च व सर्वोच्च न्यायालय) यांना काढून टाकण्याचा समान अधिकार दोन्ही सभागृहांना असतो.

५. अर्थविधेयकाबाबतीत लोकसभेला अधिक अधिकार असतात. भारतीय सेवेच्या निर्मितीबाबत किंवा राष्ट्रीय हितासाठी राज्यपातळीवरील निर्णय राज्यसभा घेवू शकते.

वरील बाबी पाहता राज्यसभेपेक्षा लोकसभेचे अधिकार अधिक आहेत राज्यसभा हे दुसरे सभागृह नसून ते दुय्यम सभागृह आहे. राज्यसभेलाच काही स्वातंत्र्य अधिकार आहेत हेही आपण पाहिलेले आहे.

### २०.३.६ केंद्र सरकार व नागरिकांचे दैनंदिन जीवन :

केंद्र सरकार, राष्ट्रीय पातळीवर अनेक कार्यक्रम व योजना राबवित असते. याचा आपल्या दैनंदिन जीवनावर परिणाम होतो. मुलांचे शिक्षण मुलांचे संगोपन, बाल विकास योजना, अंगणवाड्या, मुलांचा आहार, सर्व शिक्षा अभियान, सार्वजनिक प्राथमिक शिक्षण, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियान, माध्यमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, केंद्र शासनाच्या ग्रामीण आरोग्य योजना, सार्वजनिक आरोग्य, महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना (MNREGA) इंदिरा आवास योजना इत्यादी.

### पाठ्यांशावरील प्रश्न २०.४

**१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) लोकसंभेतील सदस्यांची संख्या किती असते?

२) राज्यसभेचा कार्यकाल किती असतो?

३) कोणते सभागृह कायम स्वरूपी असते?

४) राज्यसभेचे अध्यक्ष कोण असतात.

५) लोकसभेच्या अध्यक्षांचे (स्पिकर) चे काम काय असते?

६) लोकसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवारासाठी कोणती पात्रता आवश्यक असते.

**२. रिकाम्या जागा भरा.**

१) सर्वसाधारण विधेयक .......... मध्ये मांडता येते.

२) दोन्ही सभागृहामध्ये तफावत आढळली तर राष्ट्रपती ........... सभा बोलवीतात.

३) अर्थ विधेयक फक्त ......... मांडले जाते.

४) मंत्री परिषदेवरील नियंत्रणासाठी .......... आणि ........... ठराव लागतो.

**३. चूक की बरोबर लिहा.**

१) साधारण विधेयक राज्यसभेत मांडता येत नाही.

२) अर्थ विषयक विधेयक फक्त लोकसभेत मांडले जाते.

३) कोणत्याही विधेयकावर राष्ट्रपतीची सही झाल्याशिवाय तो कायदा होत नाही.

४) लोकसभा व राज्यसभा यांची संयुक्त सभा होते तेव्हा लोकसभेचे राज्यसभेवर वर्चस्व असते.

४. संसदेमध्ये सदस्य किंवा मंत्री म्हणून सहभागी होताना सदस्याकडे कोणकोणते गुण आवश्यक असतात.

### उपक्रम २०.५

ताज्या वर्तमानपत्रातून किंवा मासिकातून तसेच लोकसभा / राज्यसभेच्या बातम्यांच्या आधारावर पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. तुम्हास लोकसभेतील एखाद्या सदस्याचा सहभाग उत्तम का वाटला याची कोणतीही दोन कारणे लिहा.

२. लोकसभा सदस्याचे सभागृहास न शोभणारे वर्तन वाटले का? अशी कोणतीही दोन उदाहरणे द्या. संसदेच्या कामकाजावर कसा परिणाम होतो?

## २०.४ सर्वोच्च न्यायालय

या पाठात प्रारंभीच सर्वोच्च न्यायालय हे केंद्रपातळीवरील हे महत्त्वाचे असते हे पाहिलेले आहे. न्याय शाखा ही कायदेमंडळ, कार्यकारी शाखा यांच्यापेक्षा भिन्न असते. न्यायालयीन व्यवस्था म्हणजे काय हे आपणास माहीत आहे काय? जिल्हा पातळीवर कनिष्ठ न्यायालय असते. नंतर उच्च आणि त्यानंतर सर्वोच्च न्यायालय असते. असे असण्याचे कारण म्हणजे त्यांच्यामध्ये श्रेष्ठता क्रम आहे. सर्वोच्च न्यायालय त्यानंतर राज्यामध्ये उच्च न्यायालय, त्यानंतर जिल्हा न्यायालय व दुय्यम न्यायालय अशी रचना असते.



**आकृती २०.७ : भारताचे सर्वोच्च न्यायालय**

भारतीय राज्य घटनेनुसार सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि इतर न्यायाधीश यांची संख्या संसद ठरविते. सन १९५0 मध्ये मुख्य न्यायाधीश आणि इतर ७ न्यायाधीश होते. इतर न्यायाधीशांची संख्या आत्ता ३0 पर्यंतच आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीशांच्या नेमणूका राष्ट्रपती करतात.

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी नेमणूक करताना जेष्ठतेचा विचार केला जातो. इतर न्यायाधीशांच्या नेमणूका करताना सर्वोच्च न्यायाधिशांचा सल्ला घेतला जातो. मुख्य न्यायाधीश अन्य जेष्ठ सहकारी न्यायाधिशांची चर्चा करतात व त्यामधून न्यायाधिशांच्या नेमणूका होतात.

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांची पात्रता

१. भारतीय नागरीक असावा.

२. उच्च न्यायालयात किमान ५ वर्षे न्यायाधीश म्हणून दोन पेक्षा अधिक वेगवेगळ्या कोर्टामध्ये म्हणजेच १0 वर्षे काम केलेले असावे.

३. उच्च न्यायालयात किमान १0 वर्षे वकीली केलेली असावी.

४. राष्ट्रपतींच्या मते तो कायदेतज्ञ असावा.

सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशाला ६५ वर्षापर्यंत पदावर राहता येते. परंतु राष्ट्रपतींच्या आदेशाने त्यांना पदावरून दूर करता येते. त्यासाठी दोन्ही सभागृहामध्ये विशेष ठराव मंजूर व्हावा लागतो. सर्वोच्च न्यायाधीशांची गैरवर्तणुक किंवा अकार्यक्षम ही कारणे असल्यास राष्ट्रपतींना कार्यवाही करता येते. सर्वोच्च न्यायाधिशांना निवृत्तीनंतर भारताच्या कोणत्याही न्यायालयात वकीली करता येत नाही.


## २0.४.१ सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र :

सर्वोच्च न्यायालयाचे तीन अधिकार क्षेत्रे असतात.

१. **प्राथमिक अधिकार क्षेत्र :** काही प्राथमिक खटले फक्त थेट सर्वोच्च न्यायालयातच दाखल करता येतात. ते असे

- ❖ केंद्र सरकार आणि एखादे किंवा अनेक राज्यसरकारमधील वाद
- ❖ दोन किंवा अधिक राज्यांतील खटले.
- ❖ केंद्र सरकार आणि एक किंवा एकापेक्षा जास्त राज्ये एका बाजूला तर एक किंवा एकापेक्षा जास्त राज्ये दुसऱ्या बाजूला.

२. **अपिल किंवा पुनर्निर्णयाचे अधिकार क्षेत्र :** उच्च न्यायालयाचे किंवा खालच्या कोर्टाने दिलेला निर्णय ऐकून घेणे, त्यावर न्याय मिळविण्यासाठी केलेला अपिल सर्वोच्च न्यायालयात दाखल करून घेता येतो. घटनात्मक अर्थ लावणे, किंवा याच कोर्टामध्ये लागलेल्या निकालाविरुद्ध पुन:अवलोकनार्थ यासाठी खटला दाखल करता येतो.





उच्च न्यायालयातील गुन्ह्यासंदर्भात दिलेल्या निर्णयाबद्दल सर्वोच्च न्यायालयात अपिल करता येते. निवडणूका, कामगार आणि औद्योगिक न्यायालयातील निकाल संदर्भातील अपिल स्विकारले जाते.

३. **सल्लागार म्हणून कार्यक्षेत्र :** राष्ट्रपतींच्याकडे जे अपिल पाठविले जाते त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे सल्लागार म्हणून भूमिका पार पाडण्याचे काम असते. कायदा आणि वस्तुस्थिती यांचा प्रश्न निर्माण होतो. जनहिताच्या दृष्टीने महत्त्व किंवा तातडीचा निर्णय घ्यावयाचा असतो तेव्हा राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाकडे प्रकरण पाठवितात व त्यावर राष्ट्रपतींना न्यायालयाचे मत मागितले जाते. न्यायालयाचे मत राष्ट्रपतींनी स्वीकारावे असे बंधनकारक नसते. तसेच न्यायालयाने आपले मत व्यक्त करावे अशी सक्तीही नसते. सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय असते. घटनेचा अर्थ लावणे. दिलेला निर्णय व सुनावणी याचा अहवाल सर्वोच्च न्यायालयात जपून ठेवलेला असतो. याचाच संदर्भ म्हणून खालच्या थरातील न्यायालये अवलंब करतात.

या शिवाय सर्वोच्च न्यायालय पुढील भूमिका पार पाडते.

१. **घटनेचे रक्षण :** घटनेचा अर्थ लावणे. संविधानाचे रक्षण करण्याची जबाबदार सर्वोच्च न्यायालयाची असते. घटनेच्या चौकटीशिवाय कायद्याला अर्थ लागत असेल तर घटनाबाह्य कृती ठरविली जाते. सर्वोच्च न्यायालय हे मूलभूत हक्कांचे रक्षण करते. जर एखाद्या व्यक्तीला मूलभूत हक्कांवर गदा आली असे वाटत असेल तर सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते. संविधानाचे रक्षण करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयास अधिकार मिळलेले आहेत.

२. **कायद्याची वैद्यता :** सर्वोच्च न्यायालयास कायद्याची वैधता तपासण्याचे अधिकार दिलेले आहे. घटनेचा अर्थ लावण्याचे अधिकार सर्वोच्च न्यायालयास दिलेले असल्याने त्यांना न्यायालयीन पुनर्विलोकनाचाही अधिकार असतो.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे घटनेचा अर्थ लावणे. घटनेचा अर्थ लावताना कायद्याची वैधता तपासली जाते.

## २०.४.२ कायदेशीर कार्यवाही

घटनेचा अर्थ लावण्याचे काम सर्वोच्च न्यायालय करते. यामध्ये कायदेमंदळ श्रेष्ठ की न्यायमंडळ श्रेष्ठ असा वाद निर्माण होतो. भारतात न्यायालयीन प्रक्रिया असल्याने कायदेमंडळा पेक्षाही न्यायमंडळ श्रेष्ठ आहे. Public Interest Litigation जनहित याचिका दाखल करून सामाजिक प्रश्न मांडता येतो. कोर्टाच्या दृष्टीपेक्षा जनतेच्या दृष्टीने वंछित घटकाला न्याय मिळण्यासाठी, प्रदुषण विषयक, नागरी कायदा अनधिकृत बांधकामे, बालमजूर इत्यादी बाबतीत कोर्टामध्ये याचिका दाखल करता येते.

## पाठ्यांशावरील प्रश्न २०.५

**१. रिकाम्या जागा भरा.**

१) भारतात .............. न्यायव्यस्था आहे.

२) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश आणि न्यायाधिशांची नेमणूक ............. करतात.

३) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदावरून दूर केले जाते. त्या प्रक्रियेला ........... म्हणतात.

४) भारतीय राज्यघटनेचा अर्थ लावण्याचा अंतीम अधिकार ....... असतो.

२. पुढील विधाने चूक की बरोबर लिहा.

१. भारताचे सरन्यायाधीश सर्वोच्च न्यायाधिशांची नेमणूक करतात.

२. सर्वोच्च न्यायालयात मुख्य न्यायाधिश व अन्य ३० न्यायाधीश असतात.

३. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश वयाच्या ६५ वर्षापर्यंत सेवेत असतात.

४. संविधानिक उपाय करण्याच्या हक्काने सर्वोच्च न्यायलयात संविधानाचे रक्षणासाठी विशेष अधिकार दिलेले आहेत.

५. सर्वोच्च न्यायालयाकडून राष्ट्रपतींनी सल्ल्यासाठी पाठविलेल्या प्रकरणातील सल्ला राष्ट्रपतींन स्वीकारावाच लागतो.

## आपण काय शिकलो?

- केंद्र सरकार हे संसदीय सरकार असते. राष्ट्रपती आणि पंतप्रधान व मंत्रीमंडळ, लोकसभा, राज्यसभा हे कायदेमंडळ आहे तर सर्वोच्च न्यायालय हे न्याय व्यवस्थेतील सर्वोच्च कार्यालय आहे.
- राष्ट्रपती देशाचे घटनात्मक प्रमुख असतात. त्याची अप्रत्यक्ष निवडणूक होते. लोकसभा व राज्यसभेचे सदस्य त्यांना निवडून देतात. राष्ट्रपतींचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो. परंतु त्यांना गैरवर्तणुकीच्या कारणावरून दूर करता येते. त्यांच्याकडे कार्यकारी, न्यायालयीन, आर्थिक, विधी, आणिबाणीचे अधिकार असतात.
- पंतप्रधान हे देशाचे खरे प्रमुख असतात. त्यांची नेमणूक राष्ट्रपती करतात. तसेच पंतप्रधानांच्या सल्ल्याने मंत्रीमंडळाची नेमणूक करतात. परंतु पंतप्रधान व मंत्रीमंडळाच्या सल्ल्याने अधिकाराचा वापर करता येतो. मंत्रीमंडळ हे लोकसभेला जबाबदार असते. मंत्रीमंडळाची सामुहिक

जबाबदारी असते. सभागृहामध्ये बहुमत सिद्ध न झाल्यास पंतप्रधानांना राजीनामा द्यावा लागतो. पंतप्रधानांना राजीनामा दिला म्हणजेच मंत्रीमंडळ बरखास्त होते.

❖ संसद म्हणजे लोकसभा व राज्यसभा हे कायदेमंडळ असते. लोकसभेतील सदस्य जनतेकडून निवडून दिलेले असतात. राज्यसभेचे सदस्य अप्रत्यक्षरित्या निवडून दिलेले असतात. लोकसभेचा कार्यकाल हा पाच वर्षांचा असतो. राज्यसभा ही कायम स्वरूपी संसद असून ती कधीही बरखास्त होत नाही. संसदेचे सरकारच्या दैनंदिन कामकाजावर नियंत्रण असते. संसदेतूनच राष्ट्रपती व उपराष्ट्रपतींची निवडणूक होते.

❖ सर्वोच्च न्यायालय हे भारताचे शिखर न्यायालय असते. राष्ट्रपती मुख्य आणि इतर न्यायाधिशांची नेमणूक करतात. मूळ दावे, अपिल, सल्लागार म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे काम असते. सर्व अभिलेखाचे येथे जतन केले जाते. जनहितासाठी याचिका येथे दाखल करता येते.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. राष्ट्रपतींची निवडणूक कशी होते? त्यांना पदावरून दूर कसे करता येते?

२. भारताच्या राष्ट्रपतींचे अधिकार कोणते? अनेक अधिकार देवूनही ते राज्य का करू शकत नाहीत. किंवा फक्त देशाचे प्रतिनिधीत्व करतात असे का?

३. पंतप्रधानांच्या कार्याचे परीक्षण करा.

४. राज्यसभा हे दुसरे सभागृह नसून दुय्यम सभागृह आहे असे म्हणता येईल का? स्पष्ट करा.

५. सर्वोच्च न्यायालय कसे बनते? त्यांचे अधिकार क्षेत्र कोणते?

६. कायदेशीर प्रक्रिया ही भारतीय लोकशाहीला तारक की मारक आहे? तीन कारणे लिहा.

## पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे

### २०.१

१. राष्ट्रपतींची निवडणूक ही अप्रत्यक्ष पद्धतीने होते. दोन्ही सभागृहामध्ये निवडून आलेले सदस्य लोकसभा व राज्यसभा सदस्य निवडून देतात. याशिवाय केंद्रशासित प्रदेश, दिल्ली, पुदुचेरी येथून निवडून आलेल्या प्रतिनिधींनांही मतदानाचा अधिकार असतो. गुप्त मतदानाने निवडणूक होते. मताचे मूल्य हे प्रतिनिधिक स्वरूपात असते. (Proportional representation by means of sigle transferable vote)

२. १) देशाचे

२) अ) देशाचा नागरिक ब) ३५ वर्षांपेक्षा अधिक वय

क) लोकसभेचा सदस्य ड) कोणतेही लाभाचे पद नसावे.

३) उपराष्ट्रपती

४) अ) कार्यकारी अधिकार ब) न्यायालयीन अधिकार

क) आर्थिक अधिकार ड) विधी अधिकार

३. भारतीय राज्यघटना, इंटरनेट किंवा शिक्षक आणि मित्रांकडून माहिती मिळवा.

## २०.२

१. दुसऱ्या प्रकारची आणिवाणी ही राज्यातील व्यवस्था जेव्हा ढासळते त्यावेळी राज्यपालाकडून आलेल्या अहवालानुसार, राज्याकडून घटनेच्या तरतुदींचे पालन होत नाही तेव्हा आणीवाणी जाहीर केली जाते. राज्य विधानसभा ही विसर्जीत केली जाते किंवा निलंबित केली जाते. राष्ट्रपतींच्या वतीने राज्याचा कारभार राज्यपाल पाहतात.

२. कॅबिनेट मंत्रीमंडळाचे पंतप्रधान हे प्रमुख असतात. आणिवाणीमध्ये त्यांची भूमिका महत्त्वाची असते. पंतप्रधानांकडून जेव्हा लेखी अहवाल राष्ट्रपतींकडे येतो तेव्हा राष्ट्रपती आणिवाणीचा निर्णय घेतात.

३. उत्तर समजावून घेवून लिहा.

४. अ) चूक ब) बरोबर क) बरोबर ड) बरोबर

## २०.३

१. अ) प्रत्यक्ष कार्यकारी

ब) बहुमत नेत्या

क) प्रत्यक्ष, शासन

ड) पंतप्रधान

२. अ) मंत्रीमंडळावरील अविश्वासाचा ठराव लोकसभेत मंजूर होणे.


ब) पंतप्रधान

क) कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री

ड) पंतप्रधान

## २०.४

१. १) ५५०





२) ६ वर्षे

३) राज्यसभा

४) भारताचे उपपंतप्रधान

५) संसदेचा अध्यक्ष, शांतता राखणे, सदस्यांना मत मांडण्याची परवानगी देणे. आर्थिक विधेयकाबाबत निर्णय घेणे. दोन्ही सभागृहाची एकत्रित सभा घेणे.

६) १) भारताचा नागरिक २) किमान २५ वर्षे वय ३) कोठेही नोकरीमध्ये नसावा.

२. अ) कोणत्याही सभागृहा

ब) एकत्रित

क) लोकसभेत

ड) १) प्रश्न विचारणे, पुरक प्रश्न विचारणे

२) सभा तहकूब, लक्षवेधी सूचना

३. अ) चूक ब) बरोबर क) बरोबर ड) बरोबर

४. या गुणांबाबत समजून घेवून उत्तर लिहा.

## २०.५

१. १) एकसंघ

२) भारताचे राष्ट्रपती

३) पदावरून दूर करणे.

४) सर्वोच्च न्यायालय

२. १) चूक

२) बरोबर

३) बरोबर

४) बरोबर

५) बरोबर

# २१

# राजकीय पक्ष आणि दबाव गट

लोकांचे लोकांकडून लोकांसाठी चालविले सरकार म्हणजे लोकशाही होय. आधुनिक लोकशाहीमध्ये लोकांच्या प्रतिनिधींकडून चालविलेले सरकार. देशाची प्रचंड लोकसंख्या आणि विस्तृत भूप्रदेश त्यामुळे लोकशाही सरकार म्हणजेच प्रतिनिधींचे सरकार असते. मग लोक प्रतिनिधीमध्ये जनता कशी असते? लोक निवडणूकात भाग घेतात. राजकीय पक्ष उमेदवार निश्चित करतात. काही उमेदवार स्वतंत्र उमेदवार म्हणून निवडणूक लढवितात. आपण पाहिलेले असेल हे अनेक पक्ष आपले उमेदवार निवडणूकीस उभे करतात. परंतु लोकांचा सहभाग फक्त निवडणूकीपुरताच मर्यादित नसतो. जेव्हा सरकार बनविण्याची वेळ येते तेव्हा काही गट तयार होतात व ते दबाव गट म्हणून किंवा इच्छुक गट म्हणून ओळखले जातात. सदर प्रकरणात भारतातील राजकीय पक्ष, दबाव गट यावावत माहिती देणार आहोत.

## उद्दिष्टे :

सदर पाठ्य अभ्यासानंतर पुढील माहिती मिळू शकेल.

- राजकीय पक्ष अर्थ आणि भूमिका
- राजकीय पक्षाची प्रमुख वैशिष्ट्ये
- भारतीय राजकीय पक्षाचे प्रकार
- राजकीय पक्षांची लोकशाही सरकारमधील भूमिका
- भारतातील राष्ट्रीय व प्रादेशिक प्रक्षातील फरक
- भारतातील प्रमुख राजकीय पक्षाची धोरणे
- राजकीय पक्ष आणि दबाव गट यातील फरक
- दबाव गटाचे महत्त्व
- राजकीय पक्षाचा दैनंदिन जीवनावरील परीणाम

## २१.१ राजकीय पक्ष, संकल्पना आणि वैशिष्ट्ये

### २१.१.१ राजकीय पक्षाची आपणास गरज वाटते का?

सध्याच्या काळात शासन (मंत्रीमंडळ) बनविण्यासाठी आणि चालविण्यासाठी राजकीय पक्ष हा महत्त्वाचा घटक मानण्यात येतो. लिबिया, ओमान, कातार, युनायटेड, अरब एमिरेटस येथे पक्षरहित शासन आहे; परंतु तेथे लोकशाही राज्यपद्धती नाही आणि या देशात राजकीय पक्षांना बंदी आहे. राजकीय पक्ष कोठे आहेत? जेथे लोकशाही राज्यपद्धती आहे, तेथेच पक्ष दिसून येतील. लोकशाही पद्धतीमध्ये राजकीय पक्षांचा सरकार स्थापनेत मोठा सहभाग असतो. निवडणूकीतून लोकांचा सरकारमधील सहभाग वाढतो. राजकीय पक्ष निवडणुकीत आणि प्रशासनात सहभाग घेतात. ते लोकांमध्ये वैचारिक जागृती करतात आणि योग्य धोरणात्मक निर्णय घेण्यात मार्गदर्शक ठरतात. जर शासन चालविण्यासाठी राजकीय पक्ष आवश्यक असतात. तर राजकीय पक्ष म्हणजे काय? राजकीय पक्षाची वैशिष्ट्ये कोणती? लोकशाही शासनप्रणालीत त्यांची भूमिका काय? हे आपण पाहू.

### २१.१.२ राजकीय पक्ष संकल्पना :

समान तत्वे आणि समान उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एकत्र आलेल्या लोकांची संघटना म्हणजे राजकीय पक्ष होय. घटनात्मक मार्गाने आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राजकीय पक्ष प्रयत्नशील असतात. लोकहिताच्या बाबतीत समान मते असणारी मंडळी पक्षात असतात. गिलख्रिस्टने राजकीय पक्षाची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे. राजकीय पक्ष म्हणजे लोकहिताच्या बाबतीत एकसारखी धारणा असणाऱ्या  नागरिकांचा गट होय. हा नागरिकांचा गट राजकीय गट म्हणून काम करतो व शासनावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतो.

मेटेलने अशाच प्रकारे राजकीय पक्षाची व्याख्या केली आहे. राजकीय पक्ष म्हणजे कमी अधिक प्रमाणात बद्ध असलेला नागरिकांचा गट होय. हा गट राजकीय पक्ष म्हणून काम करतो. आपल्या मतदान क्षमतेच्या जोरावर पक्ष शासन ताब्यात घेण्याचा प्रयत्न करून आपली ध्येय धोरणे राबविण्याचा प्रयत्न करतो.

या व्याख्यांवरून राजकीय पक्ष म्हणजे संघटना असून या संघटना राजकीय सत्ता मिळविणे आणि ती टिकविणे याबाबतीत प्रयत्नशील असतात, हे लक्षात येईल.

### २१.१.३ वैशिष्ट्ये :

वरील राजकीय पक्षाच्या व्याख्येवरून त्याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

❖ राजकीय पक्ष म्हणजे लोकांचा संघटित असा मोठा गट होय.

❖ राजकीय पक्षाची तत्त्वे असतात. त्याची सर्वसाधारण ध्येये समान असतात.

❖ संघटित प्रयत्नाने राजकीय सत्ता हस्तगत करणे या एकाच उद्दिष्टाभोवती त्यांची ध्येयधोरणे फिरत असतात.

❖ घटनात्मक आणि शांततापूर्ण मार्गाने निवडणूकीच्या माध्यमातून राजकीय पक्ष सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करतात.

❖ सत्तेत असताना पक्षाने जाहीर केलेली धोरणे अमलात आणण्याचा प्रयत्न करतात.

## पाठ्यांशावरील प्रश्न २१.१

**१. खालील विधानांना दिलेल्या चार पर्यायांपैकी अचूक पर्याय निवडा.**

अ) राजकीय पक्षाची वैशिष्ट्ये कोणती?

१) एखाद्या प्रदेशाच्या विकासासाठी जमलेल्या लोकांचा गट

२) समान धार्मिक संकल्पना असलेल्या लोकांचा गट

३) समान तत्त्वाने सार्वजनिक प्रश्नाबाबत एकाच पद्धतीने विचार करणारा गट

४) निवडणूकप्रचार सभेस उपस्थित असणाऱ्या लोकांचा गट

ब) लोकशाहीमध्ये पक्षांची का गरज असते?

१) कायदा निर्माण करण्यासाठी

२) देशाच्या प्रशासनासाठी

३) न्यायसंस्थेला निर्णय देण्यात मदत करण्यासाठी

४) शासन चालविण्यासाठी लोकांनी आपल्या पसंतीचे प्रतिनिधी पाठविण्यासाठी

क) कोणत्या देशात लोकशाही आहे?

१) लिबिया २) कतार ३) भारत ४) सौदी अरेबिया

## २१.२ राजकीय पक्ष ' कार्य आणि भूमिका

प्रतिनिधिक लोकशाही राबविण्यासाठी राजकीय पक्ष आवश्यक आहेत, हे आपणास माहिती आहेच. शासनपद्धतीत पक्ष अतिशय महत्त्वाची कामे पार पाडतात. निवडणूकीला उमेदवार कोण उभे करतो? प्रचार कोण करतो? मंत्रिमंडळ कसे तयार होते? मुख्यमंत्री अथवा पंतप्रधान कोणाला केले जाते? हे सर्व प्रश्न राजकीय पक्ष आणि त्यांचा लोकशाही प्रशासनातील सहभाग यांच्याशी संबंधित आहेत.

राजकीय पक्षांनी पार पाडावयाच्या कार्यांची आपल्या देशाच्या संदर्भात माहिती घेऊ या.

- ❖ उमेदवाराची निवडणूकीसाठी निवड करणे.
- ❖ उमेदवारासाठी प्रचार करणे.
- ❖ राजकीय पक्षाचा उमेदवार निवडून येण्यासाठी मतदारांसमोर पक्षाचे कार्यक्रम व धोरण ठेवणे.
- ❖ बहुमत मिळविलेल्या पक्षाने सरकार तयार करणे व धोरणे राबविणे.
- ❖ सरकारची धोरणे नीटपणे राबविण्यासाठी सत्तेवर नसल्याने विरोधी गट करून सरकारवर दबाव आणणे.
- ❖ लोकांना राजकीय शिक्षण देणे व जनमत तयार करणे.
- ❖ लोकांच्या मागण्या मंजूरीसाठी शासनाकडे मांडणे.
- ❖ जनता व सरकार यात समन्वय साधणे.

भारतीय राजकीय पक्षांनी वर दिलेले कार्य स्वातंत्र्यापासून परिणामकारकरित्या पार पाडले आहे.

गेल्या सहा दशकात राजकीय पक्षांनी मंत्रिमंडळे तयार केली आहेत. राजकीय पक्ष जनता आणि शासन तसेच मतदार आणि त्यांचे प्रतिनिधी यांच्यामध्ये समन्वयाचे कार्य पार पाडीत आहेत. राजकीय पक्ष लोककल्याणाच्या मागण्या शासनाकडे मांडत आहेत. राजकीय पक्षांशिवाय निवडणुकांची कल्पना करणेसुद्धा अशक्य आहे. लोकशाही राबविण्यासाठी सशक्त प्रबळ आणि टिकाऊ राजकीय पक्षांची आवश्यकता आहे. अशा प्रकारचे पक्षच लोकहिताची धोरणे सक्षम लोकप्रतिनिधीमार्फत राबवू शकतील.

गेल्या सहा दशकामधील भारतीय लोकशाहीचा अनुभव अतिशय परिणामकारक आहे. राजकीय पक्ष लोकमत तयार करणे, जनजागृती करणे, राजकीय प्रशिक्षण देणे यात यशस्वी झाले आहेत. राज्यात आणि केंद्रात बहुमत मिळाल्यानंतर राजकीय पक्षांनी मंत्रिमंडळे तयार केली आहेत. पक्षाची ध्येय धोरणे यशस्वीपणे राबविली आहेत. प्रशासनयंत्रणा आणि संस्था लोकशाही मार्गाने राबविली जाण्यात राजकीय पक्षांचा फारच मोठा वाटा आहे. भारतातील लोकशाही अनेक राजकीय पक्ष आणि त्यांच्यामधील स्पर्धा यामुळे भक्कम झाली आहे, असे म्हणण्यास हरकत नाही.

## उपक्रम २२.१

**खालील गोष्टींची माहिती घ्या ः**

१. आपल्या राज्यातील सध्याचे मंत्रिमंडळ कोणत्या पक्षाने बनविले आहे?

२. सध्या विधानसभेत विरोधी पक्ष नेता कोण आहे?

३. आपल्या राज्यात गेल्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवार उभे केलेल्या कोणत्याही पाच पक्षांची नावे सांगा.



टिपा



## २१.३ भारतातील राजकीय पक्ष-उदय आणि वाढ :

इ. स. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. ही भारतातील राजकीय पक्षांची सुरवात होय. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ही संघटना सर्व स्तरातील भारतीय लोकांचे हित पाहणारी आणि राष्ट्रव्यापी चळवळ करणारी संघटना होती. सुरवातीच्या काळात काँग्रेसमध्ये दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, गोपाळ कृष्ण गोखले हे मवाळ आणि लाल-बाल-पाल हे जहाल पुढारी होते. त्यापैकी लाल म्हणजे लाला लजपतराय, बाल म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व पाल म्हणजे बिपीनचंद्रपाल. सुरवातीला काँग्रेसवर मवाळांचेच वर्चस्व होते. पहिल्या महायुद्धानंतर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यलढा सुरू केला. या कालावधीत, मुस्लिम लीग, हिंदुमहासभा, कम्युनिष्ट पक्ष यासारख्या काही पक्षाचा उदय झाला.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर निवडणूका लढविण्यासाठी आणि सरकार बनविण्यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे रुपांतर राजकीय पक्षात करण्यात आले. १९६७ पर्यंत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हा प्रमुख राजकीय पक्ष होता. कारण या पक्षाने जवळजवळ सर्व राज्यात आणि केंद्रामध्ये १९५२, १९५७, १९६२ आणि १९६७ च्या निवडणूका जिंकून मंत्रिमंडळे बनविली होती. राज्यकारभार चालविला होता. या काळात सर्व निवडणूकांमध्ये काँग्रेसचा विजय होता. आणि अनेक पक्षांना फक्त काही जागावर समाधान मानावे लागत होते. म्हणून या कालावधीमधील राजकीय पद्धतीस एक पक्षीय वर्चस्व पद्धती असे म्हणतात.

१९६७ पासून मात्र भारतातील राजकीय परिस्थिती सतत बदलती राहिली आहे. १९६७ मध्ये झालेल्या निवडणूकांमध्ये काँग्रेसचा लोकसभेत बहुमत मिळाले परंतु बऱ्याच राज्यांमध्ये इतर पक्ष एकत्र येऊन त्यांनी संयुक्त मंत्रिमंडळे बनविली. १९७७ च्या निवडणूकीनंतर भारताच्या लोकशाहीने द्विपक्षीय पद्धतीचा स्वीकार केला. अशी परिस्थिती होती. हे दोन पक्ष म्हणजे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व जनता दल हे होत. परंतु ही परिस्थिती अत्यंत थोडा काळ टिकली. कारण जनता दल हा पक्ष काँग्रेस ओ, भारतीय जनसंघ, समाजवादी पक्ष, भारतीय लोकदल, लोकशाही काँग्रेस या पक्षांचे एकत्रीकरण करून बनविण्यात आला होता. त्यामुळे जनता दलाची लवकरच शकले झाली. जनता दलाच्या फुटीचा फायदा राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला मिळाला आणि परत १९८० मध्ये काँग्रेसला सत्ता मिळाली ती काँग्रेसने १९८९ पर्यंत टिकविली. परंतु १९८९ सालानंतर मात्र काँग्रेसला प्रभावशाली सत्ता मिळविण्यात यश आले नाही. १९८० नंतर भारतात संयुक्त मंत्रिमंडळे अस्तित्वात आली आहेत. १९९९ पासून भारतात दोन आघाड्या अस्तित्वात आहेत. त्यापैकी एक आघाडी राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA) आणि दुसरी संयुक्त प्रगतीशील आघाडी (UPA) आहेत.

यापैकी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (NDA) चे नेतृत्व भारतीय जनता पक्षाकडे तर संयुक्त प्रगतीशील आघाडीचे (UPA) चे नेतृत्व भारतीय राष्ट्रीय काँग्रेसकडे आहे. सध्यातरी भारतात राजकीय क्षेत्रात कार्य करू इच्छिणाऱ्या पक्षांची संख्या प्रचंड आहे. त्यामुळे भारतात बहुपक्षीय पद्धती अस्तित्वात आहे.

## पाठ्यांशावरील प्रश्न २१.२

**१. खालील विधानासाठी चार पर्यायांपैकी अचूक पर्याय निवडा.**

अ) खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे?

१) भारतात एक पक्षीय पद्धती अस्तित्वात आहे.

२) स्वातंत्र्यापूर्वीच भारतात राजकीय पक्षांचा उदय झाला होता.

३) भारतात राजकीय पक्ष स्वातंत्र्यानंतरच उदयास आले.

४) १९८९ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळू शकले नाही.

ब) लोकशाही पद्धतीमध्ये खालीलपैकी कोणती भूमिका ही राजकीय पक्षाशी संबंधित नाही.

१) राजकीय पक्ष छुप्या पद्धतीने प्रशासन पद्धती बदलण्याचा प्रयत्न करतात.

२) राजकीय पक्ष जनजागृती करतात.

३) राजकीय पक्ष सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न करतात.

४) राजकीय पक्ष बहुमत न मिळाल्यास विरोधी पक्ष म्हणून काम करतात.

क) राष्ट्रीय स्तरावर युतीसरकार कधी पासून अस्तित्वास आले?

१) १९५२ २) १९६७ ३) १९७७ ४) १९९९

## २१.४ भारतीय राजकीय पक्ष : स्वरूप प्रकार आणि धोरणा :

यापूर्वी तुम्ही वाचले आहे की स्वातंत्र्यचळवळीच्या सुरवातीच्या काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हा एकच प्रभावशाली पक्ष होता. परंतु आता तशी परिस्थिती राहिली नाही. काही काळापूरती राज्यात आणि केंद्रातसुद्धा विगर काँग्रेस सरकारे अस्तित्वात होती. यावरून भारतात प्रभावशाली एकपक्षीय, समतोल द्विपक्षीय किंवा अनेक पक्षीय पद्धती अस्तित्वात नाही, असे लक्षात येते. वरील पद्धतींमध्ये असणारी वैशिष्ट्ये भारतातील पक्ष पद्धतीत आढळून येतात. १९६७ सालापर्यंत भारतातील प्रभावशाली एकपक्षीय पद्धती अस्तित्वात होती. परंतु त्यानंतर मात्र परिस्थितीत बदल झाला. १९७७ ते १९८० च्या दरम्यान भारतात द्विपक्षीय पद्धती अस्तित्वात होती. आता मात्र अनेक पक्षीय पद्धतीच अस्तित्वात आहे. कारण केंद्रात आणि राज्यातसुद्धा सत्तेवर राहण्यासाठी राष्ट्रीय पक्षाला स्थानिक पक्षांचा (प्रांतिक पक्षांचा) आधार घ्यावा लागतो. राष्ट्रीय पक्षाला स्पष्ट बहुमत मिळणे शक्य होत नसल्याने वेगवेगळ्या पक्षांची आघाडी तयार करून आघाडी सरकारे तयार होत आहेत.

## २१.४.१ भारतीय राजकीय पक्षांची प्रमुख वैशिष्ट्ये :

- भारतात अनेक पक्षीय पद्धती अस्तित्वात आहे. हे पक्ष राज्यात आणि केंद्रात सत्ता हस्तगत करण्यासाठी परस्परांशी स्पर्धा करतात.
- सध्यातरी भारतात केंद्रात आणि राज्यातदेखील द्विपक्षीय युती पक्ष पद्धती आहे. द्विपक्षीय युतीमधील प्रमुख पक्ष असणाऱ्या दोन पक्षांच्या विचारधारा पूर्णपणे भिन्न आहेत. यापैकी एक युती संयुक्त प्रगतीशील आघाडी (UPA) काँग्रेसच्या नेतृत्वाखाली आणि दुसरी युती राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NPA) भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहे.
- येथे कोणत्याही राजकीय पक्षाचे वर्चस्व नाही. परंतु त्या पक्षांमध्ये स्पर्धा मात्र आहे. एखाद्या प्रादेशिक पक्ष एखाद्या राजकीय पक्षाशी युती करतो आणि सार्वजनिक निवडणुकीच्या काही दिवस अगोदर दुसऱ्याच राजकीय पक्षावरोबर समझोता करून निवडणूका लढवितो.
- केंद्रात मंत्रिमंडळ बनविताना प्रादेशिक राजकीय पक्षांना अतिशय महत्त्व येते. प्रादेशिक पक्ष एखाद्या राष्ट्रीय पक्षाला पाठिंबा देतात व त्याच्या बदलात अनेक सवलती मिळवितात. प्रादेशिक पक्ष केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळवितात. त्याचप्रमाणे स्वत:च्या प्रांतासाठी भरघोस विशेष अनुदानदेखील मिळवितात.
- सध्या तरी निवडणूका पक्ष लढवत नाहीत तर निवडणुका या युतींमध्येच लढविल्या जातात. परंतु प्रांतापरत्वे युतीमधील घटक पक्ष, युतीचे स्वरूप, युतीमधील अटी आणि व्यक्ती बदलत असतात.
- आपल्या देशातील पक्ष पद्धतीमधील युतीचे राजकारण हे एक नवीन वैशिष्ट्य आहे. सध्या तरी भारतात एखाद्याच राज्यात पक्षाचे सरकार आहे तर इतर सर्वत्र युतीची सरकारे आहेत. सध्या भारतात एखादा स्थायी शासन पक्ष किंवा स्थायी विरोधी पक्ष अशी स्थिती नाही.
- युतीच्या शासनामुळे पक्षांची धोरणे बाजूला पडतात. आणि सर्व पक्षांमध्ये समझोता होऊन ठरलेल्या सामाईक कार्यक्रमावर प्रशासन चालविले जाते. उपयुक्ततावाद हाच या काळाचा मंत्र आहे. १९९९ मध्ये भारतीय जनता पक्षाच्या आघाडी सरकारला तेलुगु देशम पक्षाने बाहेरून पाठिंबा दिला होता. तर २००४ मध्ये काँग्रेस पक्षाच्या आघाडी सरकारला मार्क्स वादी कम्युनिष्ट पक्षाने बाहेरून पाठिंबा दिला होता.
- एक गठ्ठा मते मिळविण्यासाठी पक्ष एखाद्याच भावनिक मुद्द्यावर लक्ष केंद्रित करतात. उदा. १९७० च्या दशकात गरिबी हटावो चा नारा दिला गेला. तर १९८० मध्ये इंदिरा म्हणजेच भारत हा घोष होता. १९८५ मध्ये राजीव गांधींनी भारत एकविसाव्या शतकाकडे अशी घोषणा दिली. १९९९ मध्ये भारतीय जनता पक्षाने चमकता भारत २००४ मध्ये काँग्रेसने सुखी जनता आणि त्याच काँग्रेसने २००९ मध्ये आम आदमी वर लक्ष केंद्रीत केले.
- सध्याच्या काळात राजकीय पक्ष कायम टिकणारा सामाजिक सलोखा किंवा युती पाहण्याऐवजी तात्पुरता मिळणारा राजकीय कायदा पाहतात.

### उपक्रम २२.२

वर्तमानपत्रामधून चर्चा करून किंवा इतर मार्गांनी पुढील माहिती मिळवा.

१) आपल्या राज्यातील कोणत्या प्रादेशिक पक्षाने केंद्रात मंत्रिमंडळ तयार करण्याचा दृष्टीने महत्त्वाची कामगिरी पार पाडली? केव्हा आणि कधी?

२) कोणता राष्ट्रीय पक्ष किंवा युती केंद्रात सत्तेवर होती? कालावधी सांगा.

३) आपल्या प्रांतातील प्रमुख प्रादेशिक पक्ष कोणते? आपल्या राज्यात कधी सत्तेवर होते?

## २१.५ भारतीय राजकीय पक्ष : प्रकार

भारतीय निवडणूक आयोगाने पक्षाना चिन्हे देण्यासाठी पक्षांचे वर्गीकरण केले आहे. निवडणूक आयोगाने पक्ष तीन प्रकारात विभागले आहेत. (१) राष्ट्रीय पक्ष (२) प्रादेशिक पक्ष (३) नोंदणीकृत परंतु मान्यता नसलेले पक्ष

निवडणूक आयोग खालील तीन मुद्यांचा विचार करून एखाद्या पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता द्यावी की नाही, हे ठरवितो.

१) त्या राजकीय पक्षाला चार किंवा अधिक राज्यात राजकीय पक्ष म्हणून मान्यता असावी.

२) त्या राजकीय पक्षाने लोकसभेतील कमीत कमी चार टक्के, विधानसभेच्या ३.३३ टक्के जागा जिंकलेल्या असल्या पाहिजेत.

३) त्या राजकीय पक्षाने उभ्या केलेल्या सर्व उमेंदवारांना मिळून राज्यात ते एकूण झालेल्या वैध मतदानापैकी सहा टक्के मते मिळालेली असली पाहिजे.

### अ) राष्ट्रीय राजकीय पक्ष :

राष्ट्रीय राजकीय पक्षाचे कार्यक्षेत्र सर्व देश असते. २००९ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये खालील राजकीय पक्षांना राष्ट्रीय राजकीय पक्ष म्हणून मान्यता होती.

१) भारतीय काँग्रेस पक्ष (INC)

२) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (NCP)

३) भारतीय जनता पक्ष (BJP)

४) भारतीय कम्युनिस्ट पक्ष (CPI)

५) भारतीय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (CPI-M)

६) बहुजन समाज पक्ष (BSP)

आणि ७) राष्ट्रीय जनता दल (RJD)

**ब) प्रादेशिक राजकीय पक्ष :**

जे पक्ष राज्यात विशिष्ट टक्के मते किंवा जागा मिळवितात, अशा पक्षांना निवडणूक आयोग प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता व निवडणूक चिन्हे देते. आपल्या देशात प्रादेशिक पक्षांची संख्या पुष्कळच आहे. भारतातील काही प्रमुख प्रादेशिक पक्षांची यादी खाली दिली आहे. प्रादेशिक पक्षाचे नाव व कंसात प्रांताचे नाव दिले आहे.

तृणमूल काँग्रेस (पश्चिम बंगाल) आसामगण परिषद (आसाम), द्रविड मुन्नेत्र कळघम (तामिळनाडू, पाँडेचेरी) नॅशनल कॉन्फरन्स (जम्मू कश्मिर) समाजवादी पक्ष (उत्तर प्रदेश, उत्तराखंड), शिरोमणी अकालीदल (पंजाब), शिवसेना (महाराष्ट्र) तेलगू देशम (आंध्र प्रदेश)

आपल्या प्रांतातील प्रादेशिक पक्ष सांगता येईल का?

**उपक्रम २२.३**

२००८ मध्ये कोणत्या पक्षांनी खालील प्रांतात मंत्रिमंडळे तयार केली?

१) दिल्ली


२) मध्य प्रदेश

३) राजस्थान


४) छत्तीसगढ

## २१.५ भारतीय राजकीय पक्ष व त्यांची धोरणे


भारतात राष्ट्रीय पातळीवर आणि प्रांत पातळीवरसुद्धा अनेक राजकीय पक्ष आहेत, हे आपणास माहिती आहेच. प्रत्येक पक्षाची देशातील / प्रांतातील नागरिकांची पक्षाशी बांधिलकी आहे. हे गृहीत धरून आपली ध्येय धोरणे व कार्यक्रम जाहीर करतात. हा मजकूर ज्या पुस्तिकेत असतो, त्या पुस्तिकेस त्या पक्षाचा जाहीरनामा असे म्हणतात. सर्वसाधारणपणे जाहीरनामा निवडणुकांच्या कालावधित प्रसिद्ध केला जातो.



भारतीय जनता पक्ष




भारतीय राष्ट्रीय काँग्रेस




बहुजन समाज पक्ष



कम्युनिस्ट पार्टी



भारतीय कम्युनिस्ट पक्ष



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

आपण काही निवडक पक्षांची ध्येय धोरणे पाहू.

## १) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस :

इ. स. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना मुंबई येथे झाली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (म्हणजेच सध्याचा काँग्रेस पक्ष) पक्षाने भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. स्वातंत्र्यानंतर याच काँग्रेस पक्षाने १९६७ सालापर्यंत केंद्रात आणि जवळजवळ सर्वच प्रांतात सत्ता राबविली. भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दोन दशकांच्या राजकीय इतिहासामध्ये काँग्रेस पक्षाचेच वर्चस्व होते. म्हणून या कालावधीस काँग्रेस शासनपद्धती काल असे म्हणतात. परंतु काँग्रेसचे वर्चस्व हळूहळू कमी होत गेले. आता केंद्रात सत्तेवर येण्यासाठी काँग्रेसला इतर पक्षांची मदत घ्यावी लागते. काँग्रेस पक्षाची निष्ठा लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद यावर आहे. काँग्रेस हा समतोल साधणारा राजकीय पक्ष आहे. एकीकडे हा पक्ष मुक्त अर्थव्यवस्था (Liberalization) खाजगीकरण (Privatization) आणि जागतिकीकरण (Globalization) याला पाठिंबा देतो. (या धोरणास शब्दांची इंग्रजी अद्याक्षरे घेऊन LPG हा शब्द तयार होतो म्हणून या धोरणाला LPG धोरण असे म्हणतात.) तर दुसऱ्या बाजूने हा पक्ष समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी प्रयत्न करतो. या पक्षाला कृषि उद्योगावर आधारित अर्थव्यवस्था मान्य आहे. तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांमध्ये विशेषत: संयुक्त राष्ट्रसंघटनेमध्ये (युनो) आपण महत्त्वाची कामगिरी बजावावी, असे देखील काँग्रेसला वाटते.

## २) भारतीय जनता पक्ष :

१९८० मध्ये जनता पक्ष फुटून भारतीय जनता पक्ष स्थापन केला गेला. भारतीय जनता पक्ष म्हणजे पूर्वाश्रमीच्या भारतीय जनसंघ पक्षाचीच आवृत्ती आहे. राष्ट्रीय पातळीवर आणि

काही प्रांतामध्ये भारतीय जनता पक्ष हा प्रमुख पक्ष आहे. या पक्षाची खालील धोरणांशी बांधिलकी आहे.

१) राष्ट्रीयता आणि राष्ट्रीय अखंडता

२) लोकशाही

३) विधायक निधर्मी धोरण

४) गांधी विचारांवर आधारित समाजवाद आणि

५) मूल्याधारित राजकारण

सुरवातीला हा पक्ष उजव्या विचारसरणीकडे झुकला असला तरी आता हा पक्ष काँग्रेसइतकाच समतोल साधणारा पक्ष झाला आहे. बिहार, मध्यप्रदेश, छत्तीसगड, गुजराथ, कर्नाटक, उत्तराखंड या प्रांतात हा पक्ष सत्तेवर आला होता. अजूनसुद्धा यापैकी काही राज्यात या पक्षाची सत्ता आहे. दक्षिण भारतात आणि पूर्वोत्तर भारतात पक्षविस्तार करण्याचे धोरण पक्षाने आखले आहे.

### ३) कम्युनिस्ट पार्टी :

भारतात अनेक कम्युनिस्ट पक्ष अस्तित्वात आहेत. इ. स. १९२५ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. (CPI) १९६४ मध्ये कम्युनिस्ट पक्ष फुटून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष स्थापन झाला. (CPI-M) कालांतराने कम्युनिस्ट पक्षापेक्षा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा प्रभाव वाढला. पश्चिम बंगाल, केरळ आणि त्रिपुरामध्ये कम्युनिस्ट पक्ष आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांची सत्ता होती. दोन्ही कम्युनिस्ट पक्ष कामगारांचे आणि शेतकऱ्यांचे पक्ष आहेत. मार्क्स आणि लेनिन यांच्या विचारांवर या पक्षांची श्रद्धा आहे. समाजवाद, जनतेची मालकी असणारे कारखाने व उद्योगविश्‍व, शेतीसुधारणा, ग्रामीण जनतेचा उद्धार आणि आर्थि क स्वावलंबन यासाठी दोन्ही पक्ष कटीबद्ध आहेत. दोन्ही पक्षांचा भांडवलशाही, साम्राज्यवाद आणि जागतिकीकरण यांना विरोध आहे.

### ४) बहुजन समाज पक्ष :

सन १९८४ मध्ये काशिराम यांनी बहुजन समाज पक्षाची स्थापना केली. भारतात गरीब, भूमिहीन, बेरोजगार आणि दलीत यांचे प्रमाण पुष्कळ आहे. बहुजन समाज पक्ष या जनतेचे प्रतिनिधित्व करतो असे पक्षाचे म्हणणे आहे. छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, रामस्वामी नाईकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही या पक्षाची स्फूर्तिस्थाने आहेत. सध्या या पक्षाचे नेतृत्व श्रीमती मायावती यांच्याकडे आहे. या पक्षाचे ब्रीदवाक्य 'सर्वजन हिताय सर्वजन सुखाय' हे आहे. हा पक्ष उत्तर प्रदेशात दोन वेळा सत्तेवर आला. त्यापैकी एकदा हा पक्ष भारतीय जनता पक्षाशी युति करून सत्तेवर आला तर दुसऱ्यांदा निर्विवाद बहुमत मिळवून सत्तेवर आला.

### ५) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष :

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमधून फुटून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला गेला. १९९९ मध्ये शरद पवार, पी. ए. संगमा आणि तारिक अन्वर हे त्रिकूट बाहेर पडून त्यांनी या पक्षाची स्थापना केली. या पक्षाची ध्येयधोरणे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षासारखीच आहेत. महाराष्ट्रात या पक्षाचा प्रभाव सर्वाधिक आहे. २००४ पासून केंद्रामध्ये असलेल्या काँग्रेसपणित युतीमध्ये हा पक्ष एक घटक पक्ष आहे.

### ६) राष्ट्रीय जनता दल :

१९९८ मध्ये जनता दलात फूट पडून निर्माण झालेल्या पक्षांपैकी राष्ट्रीय जनता दल हा पक्ष होय. या पक्षाची स्थापना लालूप्रसाद यादव यांनी केली. समाजवादी कार्यक्रम अंमलबजावणी आणि मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांक यांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी पक्ष कटीबद्ध आहे. जवळजवळ एक दशकभर हा पक्ष बिहारमध्ये सत्तेवर होता. २००४ पासून केंद्रामध्ये असलेल्या काँग्रेसप्रणित युतीमध्ये हा पक्ष एक घटकपक्ष आहे.

### २) प्रादेशिक राजकीय पक्ष :

स्थानिक जनतेच्या प्रश्नांना प्राधान्यक्रम देऊन ते सोडविण्यासाठी प्रादेशिक राजकीय पक्षांचा उदय झाला. त्या त्या प्रदेशांमध्ये प्रादेशिक पक्षांचा चांगलाच प्रभाव आहे आणि काही ठिकाणी या पक्षांनी सत्ताही हस्तगत केली आहे. प्रादेशिक प्रभावामुळेच या पक्षांना केंद्रात युति सरकार बनविताना महत्त्व प्राप्त झाले. प्रादेशिक पक्षांमध्येच आपल्या देशातील पक्ष पद्धतीचे संयुक्त पक्ष पद्धतीत रुपांतर झाले आहे. केंद्र शासन आपले प्रश्न आणि आपल्या योजना या प्रादेशिक पक्षांना डोळ्यापुढे ठेवून राबवत आहे. आपल्या पक्षपद्धतीमध्ये होणारा हा बदल आपल्या संयुक्त शासन संस्थेतील सहकाराची भावना बळकट करण्यास मदतच करत आहे.

### ३) नोंदणीकृत परंतु मान्यता नसलेले राजकीय पक्ष :

भारतात स्थापन झालेल्या असंख्य राजकीय पक्षांची नोंद निवडणूक आयोगाकडे झाली आहे. परंतु या पक्षांना अजून प्रांतीय किंवा राष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळालेली नाही. इ. स. २००९ मध्ये तब्बल ३६३ राजकीय पक्षांनी निवडणूका लढविल्या. काही जणांनी स्वतंत्रपणे निवडणूका लढविल्या. निवडणूका लढविलेल्यांपैकी बहुसंख्य राजकीय पक्षांना निवडणूक आयोगाची मान्यता नव्हती. २००९ मध्ये भारतातील राजकीय पक्षांची प्रतवारी खालील प्रमाणे होती.

- राष्ट्रीय पक्ष संख्या ७ १) काँग्रेस २) भारतीय जनता पक्ष ३) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष ४) कम्युनिस्ट पक्ष ५) बहुजन समाज पक्ष ६) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ७) राष्ट्रीय जनता दल
- प्रादेशिक राजकीय पक्ष संख्या ३४
- नोंदणीकृत परंतु मान्यता नसलेले राजकीय पक्ष संख्या ३२२

## पाठ्यांशावरील प्रश्न २१.३

१) भारतीय राजकीय पक्षांची दोन वैशिष्ट्ये लिहा.

२) कोणत्याही दोन राजकीय पक्षांची दोन प्रमुख तत्त्वे लिहा.

१) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

२) भारतीय जनता पक्ष

३) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

४) बहुजन समाज पार्टी

३) जम्मू काश्मीरमधील प्रादेशिक पक्ष कोणता?

१) भारतीय राष्ट्रीय लोकदल　　२) नॅशनल कॉन्फरन्स

३) फॉरवर्ड ब्लॉक　　४) राष्ट्रीय जनता दल

४) शिवसेना हा राजकीय पक्ष ......... या प्रांतात आहे.

१) महाराष्ट्र　　२) तामिळनाडू　　३) बिहार　　४) उत्तरांचल

## उपक्रम २२.३

तुमच्या राज्यातील किंवा केंद्रशासित प्रदेशातील महत्त्वाच्या राजकीय पक्षांचा शोध घ्या. त्यांची प्रमुख धोरणे कोणती? लोक या पक्षांना मतदान करण्यास का प्रवृत्त होतात?

| राजकीयपक्ष | प्रमुख धोरण | मतदानासाठी प्रवृत्त करणारी कारणे |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

## २१.६ राजकीय पक्ष आणि दबाव गट / हितसंबंधी गट

कामगार, शेतकरी, विद्यार्थी यांची निदर्शने, घटना आंदोलने आपण पाहिली असतीलच. निदर्शने, आंदोलने हे कार्यक्रम काही वेळा कामगार संघटना, शेतकरी संघटना, विद्यार्थी संघटना, व्यवसाय संघटना यांच्यामार्फत राबविले जातात. सर्वसाधारणपणे या संघटना त्यांना उपयुक्त असणारी धोरणे राबवावीत किंवा त्यांच्या उपयुक्ततेनुसार कायद्याची अंमलबजावणी करावी, यासाठी शासनावर दबाव टाकत असतात. परंतु या संघटना निवडणूकीत भाग घेत नाहीत. यावरून या संघटना राजकीय संघटना नाहीत, हे आपल्या लक्षात येईल.

मग या संघटना काय आहेत? कोणत्याही देशात, विशेषत: लोकशाही प्रशासन व्यवस्था असणाऱ्या देशात प्रशासनाच्या येथे धोरणांवर आणि अंमलबजावणीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबाव टाकण्यासाठी असंख्य गट कार्यरत असतात. या गटाचे सदस्य काही विशिष्ट कारणासाठी एकत्र आलेले असतात. उदा. एखाद्या कारखान्यातील कामगार स्वत:चे हितसंबंध राखण्यासाठी कामगार संघटना काढतात. या सारख्याच समविचारी लोकांच्या अनेक संघटना तयार होतात. या संघटनांना दबाव गट किंवा हितसंबंधी गट असे म्हणतात. दबावगट आणि हितसंबंधी गट म्हणजे काय? हे परस्परांपासून कसे भिन्न असतात? देशाया राजकीय यंत्रणेत त्यांचा कोणता सहभाग असतो? यासंबंधी आपण चर्चा करू या.

### २१.६.१ दबाव आणि गट हितसंबंधी गट :




**छायाचित्र २१.१: भारतीय राष्ट्रीय कामगार संघटनेचा मोर्चा**

छायाचित्र २१.१ हे भारतीय राष्ट्रीय कामगार संघटना (INTUC) या संघटनेने काढलेल्या मोर्चाचे छायाचित्र आहे. ही संघटना दबाव गट आणि हितसंबंधी गट असे दोन्ही प्रकारे कार्य करते. सर्व साधारणपणे दबाव गट आणि हितसंबंधी गट यामध्ये फारसा फरक नाही.

हितसंबंधी गट म्हणजे स्वत:चे हित साधण्यासाठी एकत्र असलेल्या लोकांचा गट होय. हितसंबंधी गटाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) या गटामध्ये औपचारिक संघटन असते.

२) या गटामध्ये समाईक हितसंबंध असतात.

३) हे हितसंबंध विशिष्ट गोष्टींशी संबंधित असतात.

४) या गटाचे सदस्य आपले हितसंबंध जपणे, टिकविणे, वाढविणे याबावतीत प्रयत्नशील असतात.

याउलट दबाव गट म्हणजे अशा प्रकारचा हितसंबंधी गट की जी शासनावर आणि प्रशासनयंत्रणेवर आपल्या हितसंबंधांची पूर्तता करण्यासाठी दबाव टाकतो.

हितसंबंधी गट आणि दबाव गट यामधील सूक्ष्म फरक लक्षात घेणे आवश्यक आहे.

हितसंबंधी गट स्वत:च्या हितसंबंधाची पूर्तता करण्यासाठी शासनावर दबाव टाकत नाहीत.

जे हितसंबंधी गट स्वत:च्या हितसंबंधाची पूर्तता करण्यासाठी शासनावर दबाव टाकतात. त्यांना दबाव गट असे म्हणतात.

सर्व दबाव गट हे हितसंबंधी गट असतात परंतु सर्व हितसंबंधी गट हे दबाव गट असतातच असे नाही.
हितसंबंधी गट दबाव गट यामधील फरक

| हितसंबंधी गट | दबावगट |
|---|---|
| १ औपचारिक संघटन | उत्कृष्ट संघटन |
| २ हितसंबंध जपणे हा उद्देश | दबाव टाकणे हा उद्देश |
| ३ शासकीय धोरणांवर प्रभाव पडतोच असे नाही. | शासकीय धोरणांवर प्रभाव टाकलाच जातो. |
| ४ सौम्य दृष्टिकोन | संघर्षमय दृष्टिकोन |
| ५ बचावात्मक धोरण | आग्रही धोरण |

### २१.६.२ राजकीय दबाव गट तंत्र आणि भूमिका :

लोकशाही शासनप्रणालीत दबाव गट अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडतात. हे गट कोणत्याही सार्व जनिक हिताच्या गोष्टीवर जनमत जागृत करू शकतात. त्यावर चर्चा घडवून आणू शकतात. चर्चेला विधायक वळण देऊ शकतात. या प्रक्रियेत ते जनजागृती तर करतातच त्याबरोबरच लोकांचा दृष्टिकोन

विशाल करतात. प्रक्रियेतील लोकांचा सहभाग वाढवितात चर्चेमध्ये उद्भवलेल्या मुद्यांचा योग्य तो परामर्श घेतात. दबाव गट जनमतात विधायक बदल घडवून आणू शकतात.

दबाव गट आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धती आणि तंत्रे वापरतात. यामध्ये जनतेला आवाहन करणे जनहित याचिका दाखल करणे, निदर्शने करणे, मिरवणुका काढणे. घेराव घालणे, राज्यकर्त्यांना भेटून आपला मुद्दा पटविणे या गोष्टींचा समावेश होतो. वर्तमानपत्रात लिखाण करणे, जनतेमध्ये माहितीपत्रके वाटणे, चर्चासत्रे आणि परिसंवाद यांचे आयोजन करणे, भित्तीपत्रके लावणे, घोषणा देणे याही पद्धती वापरल्या जातात. सत्याग्रहासारख्या अहिंसक शस्त्राचाही वापर केला जातो.

कधीकधी कामकाजावर बहिष्कार घातला जातो. वकीलांनी न्यायालयावर आणि शिक्षकांनी शाळेवर बहिष्कार घातल्याच्या बातम्या आपल्या कानावर आल्याच असतील.

शासकीय धोरणावर प्रभाव पाडण्यासाठी दबाव गट अशा प्रकारच्या पद्धती नेहमीच वापरत असतात.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

**लॉबिंग म्हणजे काय?**

प्रशासनातील अधिकारी किंवा आमदार (लोकप्रतिनिधी) आपल्या हितासाठी शासन धोरण राबवणुकीसाठी जे प्रयत्न करतात, त्यास लॉबिंग असे म्हणतात.

### २१.६.३ राजकीय पक्ष आणि दबाव गट :

राजकीय पक्ष आणि दबाव गट हे भिन्न आहेत, हे आपल्या लक्षात आलेले आहेच. परंतु लोकशाही मध्ये राजकीय पक्ष आणि दबाव गट या दोन्हीची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या दोघांचे संबंध अतिशय जवळचे आणि परस्परपूरक असतात. उदा कामगार संघटना निवडणूकीचे वेळी आपल्या पक्षाला कार्य कर्ते पुरवितात. तर राजकीय पक्ष कामगारांच्या हिताचे ठराव आणि कायदे विधीमंडळात संमत करून घेण्यास मदत करतात.

अखिल भारतीय विद्यार्थी संघटना National Students Union of India (NSUI) या तरुणांच्या / विद्यार्थ्यांच्या संघटनेमधून काँग्रेस पक्षाला त्यांचे भावी पुढारी व कार्यकर्ते मिळतात. तर अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) या तरुणांच्या / विद्यार्थ्यांच्या संघटनेमधून भारतीय जनता पक्षाला त्यांचे भावी पुढारी व कार्यकर्ते मिळतात. काही दबाव गटांची एखाद्या विशिष्ट पक्षाशी बांधिलकी असते. परंतु बरेचसे दबाव गट कोणत्याही पक्षाशी संबंधित नसतात. दबाव गट हे राजकीय पक्षापासून भिन्न आहेत, हे लक्षात ठेवा.

या दोघांमधील फरक पुढे स्पष्ट केला आहे.

- ❖ दबाव गट हे मूलत: राजकीय स्वरूपाचे नसतात उदा. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जरी भारतीय जनता पक्षाला पाठिंबा असला तरी ती मूलत: सांस्कृतिक संघटना आहे.

  पक्ष मात्र मुलत: आणि आंर्तबाह्य राजकीय असतो.

- ❖ दबाव गट प्रत्यक्ष सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करीत नाहीत. परंतु सत्ताधारी लोकांना आपल्याला अनुकूल निर्णय घेण्यात दबाव गट भाग पाडतात.

  पक्ष मात्र सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करतो. प्रशासन चालविण्यासाठी मंत्रिमंडळ बनविण्याचा प्रयत्न करतो.

- ❖ दबाव गट निवडणुका लढवित नाहीत. ते आपल्याला अनुकूल असलेल्या पक्षाला मदत मात्र करतात.

  राजकीय पक्ष निवडणूक प्रक्रियेत भाग घेतात. उमेदवार उभे करतात. प्रचार करतात, उमेदवार निवडून आणण्यासाठी मोहीम राबवितात.

- ❖ दबाव गटाला कोणतीही राजकीय प्रणाली / राजकीय ध्येय धोरणे नसतात.

  परंतु राजकीय पक्षांना निश्चित स्वरूपाची राजकीय प्रणाली असते. त्यांची राजकीय ध्येय धोरणे असतात.

  उदा. काँग्रेसची समाजवाद, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही या ध्येयांवर निष्ठा आहे. तर कम्युनिस्ट पक्षाची निष्ठा समाजवाद, शेतकरी, कामगार आणि समाजातील दुर्बल घटकांचे कल्याण यावर आहे.

- ❖ दबाव गटांना त्याच्या स्वहितांच्या गोष्टींतच स्वारस्य असते. तर राजकीय पक्षांना ध्येय धोरणे असतात. त्या पक्षाची राजकीय तसेच आंतरराष्ट्रीय प्रश्नांबाबत विशिष्ट मते आणि तत्वप्रणाली असते.

### २१.६.४ भारतातील दबावगट :

इतर लोकशाही देशाप्रमाणेच भारतातदेखील असंख्य हितसंबंधी गट किंवा दबाव गट आहेत. या दबाव गटांचे अनेक प्रकार आहेत. हे गट परंपरागत सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीनुसार तयार होतात. उदा. आर्य प्रतिनिधी सभा, सनातन धर्म सभा, पारशी अंजुमन, ॲग्लो इंडियन, ख्रिश्चन असोशिएशन जातीवरून गट तयार होतात. उदा. ब्राह्मण सभा, नायर संघ, भाषेवरून तयार होणारे गट तामिळ संघ, अंजुमन एतरक्की उर्दू, मराठी परिषद याखेरीज भारतातील कारखानदारांचा गट Federation of Indian Chambers of Commerce and Industry (FICCI) हा देखील एक मोठा गट आहे. All India Trade Union Congress (AITUC), भारतीय मजदूर सभा, किसान सभा हे कामगारांचे आणि शेतकऱ्यांचे गट आहेत. त्याचप्रमाणे सरकारी सेवकांचे राजपत्रित अधिकारी संघटना, अराजपत्रित सेवक संघटना असेदेखील गट आहेत. हे सर्व गट स्वहितांच्या गोष्टीत स्वारस्य दर्शवतात ऑल आसाम स्टुडंटस् युनियन यासारखी संघटना ग्रामीण भागात महाविद्यालये काढण्याच्या बाबतीत आग्रही असते.

## २१.६.५ सामाजिक संस्था–भारतीय दबाव गटाचा नवा आविष्कार

स्वहित साधण्यासाठी आपल्या देशातील लोकांनी असंख्य सामाजिक संस्था शासनावर दबाव निर्माण करतात. या संस्था एखाद्या ध्येयाला (म्हणजेच स्वहिताला) वाहून घेतलेल्या सर्वसामान्य लोकांकडून चालविल्या जातात. अनेक सर्वसामान्य लोक स्वहितासाठी औपचारिक किंवा अनौपचारिकरित्या एकत्र येतात आणि स्वहित आणि सामाजिक अन्याय यावर आपली मते व्यक्त करतात.

सर्वसामान्य जनता आणि शासन यामधील दुवा म्हणून या सामाजिक संस्था कार्यरत असतात. सामाकि संस्था सर्वसामान्य लोकांना आपल्या उपक्रमात प्रत्यक्षात समाविष्ट करून घेतात. या संस्था संघटना, सभा, सेवाभावी संस्था, अशा अनेक नावांनी कार्यरत असतात. भाववाढ, भ्रष्टाचार निर्मूलन, पर्यावरण संरक्षण यासारख्या सामाजिक प्रश्नांवर या संस्था वेळोवेळी आवाज उठवत असतात. एकविसाव्या शतकात सामाजिक अन्यायाला वाचा फोडण्यासाठी या संस्थांनी वेळोवेळी निदर्शनांसारखा मार्ग अवलंविला आहे. स्त्री पुरुष असमानता, बालमजूर, रस्त्यावर भटकणारी मुले यासारख्या विषयांवर वैयक्तिक किंवा सांघिक मते व्यक्त केली जातात. याच्या विरोधात वैयक्तिक किंवा सांघिक पातळीवर कार्य केले जाते. हे कार्य सर्व प्रश्न समाजाशी निगडीत असल्याने संस्थांनी केलेल्या कार्याचा प्रभाव जनमतावर पडतो. यापैकी काही प्रभावी संघटना पुढीलप्रमाणे आहेत.

मजदूर किसान शक्ती संघटना (MKSS - राजस्थान)

People's Union For Civil Liberties (PUCL)

National Alliance of People's Movements (NAPM)

National Alliance of Women's Organisation (NAWO)

Medical Friends Circle (MFC) आणि इतरही अनेक

या संघटना शासनावर दबाव आणून स्वहिताच्या दृष्टीने शासनाची धोरण बदलण्यास भाग पाडतात. मूलभूत हक्क, जगण्याचा हक्क, भ्रष्टाचार, पर्यावरण संरक्षण, स्त्री शक्ती सबलीकरण, शैक्षणिक आणि आरोग्य समस्या यासारख्या विषयावर दबावगट शासनावर दबाव आणतात.

सामाजिक संस्था समाजामधील तळागाळातल्या लोकांपर्यंत पोहोचतात. लोकांच्या समस्या आणि गाऱ्हाणी वेशीवर टांगण्यासाठी सामाजिक संस्थांचा फार उपयोग होतो. समस्यांचा सकारात्मक दृष्टीने विचार करून तोडगा सुचविण्याचे कामही सामाजिक संस्थाच करतात. समाजाला दिलेली आश्वासने शासनाकडून पाळली न गेल्यास ही गोष्ट सामाजिक संस्थाच शासनाच्या लक्षात आणून देतात. सकारात्मक काम करणाऱ्या सामाजिक संस्थांकडे समाजातील हुशार आणि आदर्शवादी युवक वर्ग ओढला जातो. सामाजिक संस्था आदर्श नागरिक बनण्याच्या दृष्टीने युवकांना तयार करतात. आदर्श नागरिक हा जागरुक आणि तत्पर असतो. अशा आदर्श तरुणांकडून सामाजिक संस्थांची स्थापना केली जाते.

अशा तऱ्हेने तयार झालेल्या सामाजिक संस्था व कार्यकर्ते लोकांची गाऱ्हाणी शासनापर्यंत पोहोचविण्याचे काम करतात. हे करत असताना कार्यकर्त्याला आपला वेळ, आपली ऊर्जा आणि सुख याचा त्याग करावा लागतो.

सामाजिक संस्थांद्वारे पुढे आलेल्या कार्यकर्त्यांची व संस्थांची यादी पहा.

अरुणारॉय (मझदूर किसान शक्ती संघटना)

इला भट्ट (स्वावलंबी नारी संस्था)

मेघा पाटकर (नर्मदा बचावो आंदोलन)

अण्णा हजारे (भ्रष्टाचार विरोधी लढा)

या सर्व संघटनांमधील कार्यकर्त्यांची संख्या लक्षणीय असते. ते लढा देतात आणि समाजहितकारक बदल घडवून आणतात. यापैकी बहुसंख्य संस्थांचा अहिंसात्मक मार्गावर विश्वास आहे. त्यामुळे या संस्था गाऱ्हाणी मांडण्यासाठी अहिंसक मार्गाचाच वापर करतात.


### २१.६.६ दबाव गट तंत्र

दबावगटांचा उद्देश शासनावर दबाव निर्माण करणे हा असतो. त्यासाठी सामाजिक संस्था दबाव टाकणाऱ्या निरनिराळ्या मार्गांचा आणि तंत्रांचा वापर करतात. ही सर्व तंत्रे कायदेशीर आणि शांततावादी असतात. सत्याग्रह हे अशा संस्थांचे सर्वात मोठे हत्यार असते. महात्मा गांधींनी सर्वात प्रथम सत्याग्रहाची संकल्पना मांडली आणि यशस्वीपणे अंमलातदेखील आणली. गांधीजींनी परकीय राजवटी विरुद्ध सत्याग्रहाचे हत्यार वापरले. आजच्या युगात सुद्धा हे अत्यंत उपयुक्त हत्यार आहे. व त्याचा वापर यशस्वीरित्या होत आहे. उदा. Self Employed Women's Association (SEWA) या सामाजिक संस्थेच्या प्रयत्नामुळेच शासनाच्या स्त्री कामगार विषयक सुधारणांना गति मिळाली.



**छायाचित्र क्र. : २१.२**

**मईरा पाईबीज (स्त्री संघटना) मणिपूरमधील निषेध मोर्चा**




**छायाचित्र क्र. : २१.३ प्रमुख कार्यकर्ती आयरोम शर्मिला यांना**



**छायाचित्र क्र. : २१.४ मणिपूरमध्ये शांतता नांदावी म्हणून मीरा पाईबीज संघटना आणि आयरोम शर्मिला यांना**

**पाठिंबा देण्यासाठी केरळ मधील महिला राष्ट्रपति व पंतप्रधानांना पत्रे पाठविताना**

मजदूर किसान शक्ती संघटना या संघटनेने जन आंदोलन उभारून जनतेला माहितीचा अधिकार (Right To Information) मिळवून दिला. उत्तर पूर्व भारतातील मणिपूरसारख्या छोट्या राज्यातसुद्धा Just Peace अपुनबा लुप (विद्यार्थी संघटना) मईरा पाईबीज (महिला संघटना) यासारख्या सामाजिक संस्था लोकांची गाऱ्हाणी शासनाच्या कानावर घालण्याच्या बाबतीत प्रयत्नशील आहेत. वरील सर्व संघटना तरुण कार्यकर्ती आयरोम शर्मिला हिच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहेत. आयरोम शर्मिला

हिला मणिपूरची पोलादी तरुणी असे म्हणतात. आयरोम शर्मिला नोव्हेंबर २००० पासून भूक सत्याग्रह करीत आहे. शासनाने सशस्त्र सेनेला दिलेले सर्व (विशेष अधिकार काढून घ्यावेत) Forces Special Power Act (FSPA) कारण यामुळेच राज्यामध्ये अशांतता व हिंसाचार आहे, असे तिचे म्हणणे आहे. शासनाने लोकांना त्यांचे लोकशाही अधिकार परत द्यावेत. याबाबत ती आग्रही आहे. संपूर्ण देशातील लोक तिच्या सत्याग्रहाला पाठिंबा देत आहेत. (तिने गेल्या अकरा वर्षात अन्नग्रहण केलेले नाही. नाकामध्ये घातलेल्या नळीतून तिला बळजबरीने द्रवरूप अन्न देण्यात येत आहे.)

## पाठ्यांशावरील प्रश्न २१.४

१) दबावगट म्हणजे काय? ते हितसंबंधी गटापासून कोणत्या बाबतीत वेगळे आहेत?

२) दबाव गट आणि राजकीय पक्ष यामधील फरकाचे दोन मुद्दे सांगा.

३) दबावगट शासनावर दबाव आणण्यासाठी ज्या मार्गांचा अवलंब करतो, असे कोणतेही तीन मार्ग सांगा. योग्य ती उदाहरणे देऊन याबाबतीत स्पष्टीकरण द्या.

## उपक्रम २२.४

हितसंबंधी गट, दबाव गट आणि राजकीय पक्ष यांची वैशिष्ट्ये एकत्रितपणे खाली दिली आहेत. प्रत्यक्ष वैशिष्ट्य बारकाईने वाचा आणि ते वैशिष्ट्य कोणाचे आहे हे ओळखून ते वैशिष्ट्य योग्य त्या रकान्यात लिहा.

- मर्यादित आकार
- निवडणूक लढविणे
- सौम्य दृष्टिकोण
- प्रतिकार करणे
- संरक्षण करणे, संधी देणे
- सत्ता हस्तगत करणे
- कायदा करण्यास मदत करणे
- स्वहित साधक
- राजकीय स्वरूप
- सहेतुक संघटन
- सत्ताबदल प्रक्रिया सुरळीत करणे.

- ❖ दबाव केंद्रित गट
- ❖ उग्र स्वरूप सडेतोड स्वभाव
- ❖ शासन निर्धायावर परिणाम होणे किंवा न होणे
- ❖ शासनाच्या धोरणावर दबाव टाकणे

| हितसंबंधी गट | दबाव गट | राजकीय पक्ष |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

## आपण काय शिकलो?

- ❖ राजकीय पक्षांचा लोकशाहीमध्ये नक्की सहभाग असतो. राजकीय पक्षामुळे लोकशाही शक्य आहे, निवडणुका घेणे शक्य झाले आहे. त्यातून सत्तावदलास मदत होते. लोकांना लोकशाहीचे शिक्षण मिळते आणि आपले प्रतिसादात्मक सरकार बनते.
- ❖ भारतात दोन प्रकारचे राजकीय पक्ष आहेत. राष्ट्रीय पक्षाचे कार्य देशभर असते तर प्रादेशिक पक्षाचे क्षेत्र विशिष्ट राज्यातच असते.
- ❖ राष्ट्रीय पक्षामध्ये काँग्रेस, जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, कम्युनिस्ट पार्टी, बहुजन समाज पक्ष आहे. अकाली दल, डीएमके, अण्णा डीएमके (तमिळनाडू) तेलगूदेशम (आंध्र प्रदेश) नॅशनल कॉन्फरन्स (जम्मू काश्मीर) हे प्रादेशिक पक्ष आहेत.
- ❖ १९८९ पासून प्रादेशिक पक्ष युतीचे मंत्रीमंडळ बनविण्यामध्ये महत्त्वाची कामगिरी पार पाडत आहेत.
- ❖ युती सरकार हे नवीन धोरण देशात सुरू झालेले आहे.
- ❖ दबाव गट हे राजकीय पक्षापासून वेगळे असतात. स्वहितासाठी ते प्रशासनावर दबाव आणतात. आधुनिक लोकशाहीमध्ये दबाव गटांची भूमिका महत्त्वाची असते.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१) राजकीय पक्षांची गरज का असते?

२) राजकीय पक्ष म्हणजे काय?

३) कोणत्याही राजकीय पक्षाची चार वैशिष्ट्ये लिहा.

४) राजकीय पक्षाच्या चार कार्यांचे वर्णन करा.

५) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे धोरण स्पष्ट करा.

६) भारतीय राजकीय पक्षांची तीन वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

७) दबाव गट म्हणजे काय?

८) राजकीय पक्ष आणि दबावगट यातील दोन फरक लिहा.

९) भारतातील दबाव गटाची माहिती लिहा.

१०) सामाजिक संस्था म्हणजे काय? भारतातील सध्याच्या काळातील कोणत्याही दोन संस्थांची नावे द्या.

## पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे

### २१.१

१. अ) ३

ब) ४

क) ३

### २१.२

१. अ) २

ब) १

क) २

ड) ४

### २१.३.

१. परस्परांशी स्पर्धा करतात. युती करतात.

२. १) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस अ) लोकशाही ब) निधर्मवाद

२. भारतीय जनता पक्ष

अ) राष्ट्रीयता आणि राष्ट्रीय एकात्मता

ब) गांधीजींच्या विचारसरणीचा समाजवाद

३. मार्क्सादी कम्युनिस्ट पक्ष

अ) समाजवाद

ब) ग्रामीण जनतेचा उद्धार

४. वहुजत समाजपक्ष

अ) बहुजन हिताय बहुजन सुखाय

ब) दलितोद्धार

३. २

४. १

**२१.४**

१. दबाव गट हा हितसंबंधी गट असतो, शासनावर किंवा निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर स्वहितासाठी दबाव आणीत असतो. दबावगट हा हितसंबंधी गटापेक्षा भिन्न असतो. हितसंबंधी गट शासन किंवा निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्यावर दबाव टाकील असे नसते परंतु वेळ आलीच तर दबाव टाकला जातो. तरीही त्याला दबावगट म्हणता येत नाही.

२. अ) दबाव गटाचा मूळ हेतू राजकीय नसतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा भारतीय जनता पक्षाला पाठिंबा असतो, प्रत्यक्षात स्वयंसेवक संघ ही सांस्कृतिक संघटना आहे. राजकीय पक्ष हे राजकीयच असतात.

ब) दबावगट निवडणूका लढवित नाहीत. आपापल्या इच्छेप्रमाणे राजकीय पक्षांना मदत करतात. राजकीय पक्ष उमेदवाराची निवडणूकीसाठी शिफारस करतात आणि निवडणूक प्रचार करतात.

३. दबावगट लोकशाहीमधील महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामध्ये चर्चा होते, वादविवाद होतात. महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांना वाचा फुटते. दबाव गट प्रारंभी विनंती, दया, प्रशिक्षण माध्यमातून जातात. उदा. महिला स्वयं रोजगार संघटनेचा, प्रभाव होवूनच शासनाने महिला कामगार हक्क हे धोरण ठरविले. मजूर किसान शक्ती संघटनेमुळे जनआंदोलनातूनच माहितीचा अधिकार याचे कायद्यात रुपांतराचा निर्णय सरकारला घ्यावा लागला.

# २२

# लोकशाही प्रक्रीयेतील जनतेचा सहभाग


वर्तमानपत्रातील संपादकीय कॉलम वाचताना विजया आश्चर्यचकीत झाली, मी भारतासारख्या लोकशाही प्रधान देशात आहे. याचा रविला काही आनंद झाला. तिचे वडील रामपाल म्हणाले, “मी फारसा शिकलेलो नाही पण मी इकडे हिंडताना पाहतो, यशस्वी लोकशाहीच्या देशात अनेक उपाशीपोटी लोक रस्त्यावर भीक मागताना पाहतो.” विजया म्हणते, “अहो पप्पा किमान आपल्याला मतदान करून दुसरे सरकार तरी आणता येईल.” जगातील अनेक देशांमध्ये लोकशाही मार्गाने सरकार आणण्याची धडपड करावी लागतेय. लोकशाही ही भारतात रुजलेली आहे.

गेल्या सहा दशकापासून भारतीय लोक नियमीतपणे निवडणुकांमध्ये भाग घेत आहेत. लोक राष्ट्रीय पातळीवरील किंवा राज्यातील तसेच स्थानिक शासन व्यवस्थेच्या निवडणूकात भाग घेतात हा लोकांच्या लोकशाही सरकारमधील सहभाग आहे. जनतेचा सहभाग असल्याशिवाय, जनमताला किंमत उरत नाही. अनेकांचा शासनाकडे पाहण्याचा वेगवेगळा दृष्टीकोन असतो. काहींचा शासकीय धोरणाला विरोध असतो. वादविवाद चर्चा ही सुदृढ लोकशाहीचे लक्षण आहे. जनमताचा आवाज हा लोकशाहीमध्ये अभिप्रेत आहे. लोकशाही कधी बळकट होते. जेव्हा लोक विधायक मत शासनाच्या धोरणासाठी उपयुक्त ठरते. लोकशाही सरकार म्हणजे जे सरकार जनमताचा विचार करते. निवडणूकांच्या माध्यमातून जनमत समजते. सदरच्या पाठामध्ये निवडणूका, निवडणूक पद्धती, प्रौढमतदार या शिवाय लोकशाहीमध्ये जनतेचा सहभाग यांची माहिती आपणास मिळेल.

## उद्दिष्टे :

पाठ अभ्यासानंतर खालील बांबींची माहिती मिळेल.

- लोकशाही प्रक्रियेतील जनतेचा सहभाग
- जनमत म्हणजे काय? आणि त्याचे महत्त्व
- जनमत आजमवणारी विविध माध्यमे
- भारतातील निवडणूक प्रक्रिया



टिपा

## लोकशाही प्रक्रीयेतील जनतेचा सहभाग

- ❖ निवडणूका अर्थ आणि निवडणूका प्रकार
- ❖ निवडणूका गैरप्रकार आणि यावर आळा घालणे
- ❖ निवडणूका सुधारणा
- ❖ प्रौढ मतदार आणि त्याचे महत्त्व

## २२.१ जनतेचा सहभाग

निवडणूका आपण पाहिलेल्या असतील. आपण कधी मतदान केलेले आहे? ज्यांना आपण निवडूण देतो ते सरकार चालवितात. हे प्रतिनिधी शासनाची धोरणे ठरवितात. जनतेचा सहभाग म्हणजे आपण ज्यांना निवडणून देतो ते म्हणजे लोकशाहीतील प्रतिनिधी आणि प्रतिनिधीमार्फत आपला सहभाग असतो. केवळ आपण मतदान केले म्हणजे काम संपले असे नव्हे. लोकांचा लोकशाहीतील सहभाग म्हणजे  लोकांशी चर्चा, वर्तमानपत्रातील बातम्या, निदर्शने, प्रदर्शन, शासकीय योजनेतील सहभाग होय. निवडणूक प्रक्रियेतील सहभाग म्हणजे, उमेदवाराचा प्रचार, राजकीय चर्चा, पक्षासाठी काम करणे. उमेदवार उभा करणे इ. होय.



**छायाचित्र २२.१ : लोकांचा सहभाग निवडणूक प्रचार फेरी**

निवडणूक सहभाग म्हणजे लोकांचे थेट पक्षाशी असलेले नाते होय. ही संकल्पना पुरेशी व्याप्त असून व्यक्तीचा राजकीय सहभाग हा निवडणूका असोत किंवा नसोत राजकीय पक्षाशी निघडीत असतो, त्यांचा सहभाग, पाठिंवा असो किंवा शासनाच्या धोरणावर टीका असो. या जनतेच्या पाठींव्याने निवडणूक उमेदवाराला खात्री वाटते. तसेच विश्वासही वाढतो.

टिपा

**उपक्रम २२.१**

१८ वर्षापेक्षा अधिक वयाच्या तीन व्यक्तींना प्रश्न विचारून खालील तक्ता पूर्ण करा.

| | प्रथम व्यक्ती | दुसरी व्यक्ती | तिसरी व्यक्ती |
|---|---|---|---|
| गेल्या निवडणूकीत मतदान केले होते का? नसल्यास व का नाही? | | | |
| उमेदवाराच्या किंवा पक्षाच्या निवडणूक प्रचारात सहभागी होता का? | | | |
| जर निवडून आलेल्या व्यक्तीने आश्वासने पूर्ण न केल्यास जनतेच्या सहभागातून किंवा वर्तमानपत्रात लिहाल काय? किंवा त्याबाबत मोर्चा काढरल का? | | | |

## २२.२ जनमत: अर्थ, महत्त्व आणि त्यांची माध्यमे :

लोकशाही प्रक्रीयेत जनतेचा सहभाग कसा असतो हे पुरेसे लक्षात आलेले असेल. जनमत हे अत्यंत प्रभावी असते. लोक राजकीय पक्षांवर किंवा उमेदवारांबाबत सहज भाष्य करीत असतात. प्रवासात असोत किंवा सार्वजनिक ठिकाणी असोत हे शासकीय धोरणांबाबत चर्चा करतात किंवा वर्तमान पत्रात वाचकांची पत्रे या सदरात लिहितात. पदयात्रा, प्रचार फेरीवर आपली मते व्यक्त करतात. रेडिओ टि. व्ही. वरही चर्चा पाहतात. इत्यादी ठिकाणचे सर्व जनमत ही लोकशाही प्रक्रिया आहे. यामध्ये मतदान, सरकार बनविणे तसेच प्रशासन हे सर्वकाही त्यामध्ये येते.

### २२.२.१ जनमत : अर्थ

लोकांचा आवाज किंवा जनमत या दोन्हीचा अर्थ तोच आहे का? बारकाईने विचार केला तर दोन्हीही संज्ञा सारख्या नाहीत. जनमत म्हणाल तर त्याची व्याख्या आपला गोंधळ उडवून जाईल. जनमताचा सरळ अर्थ पाहू. जनमत म्हणजे सर्वांचेच मत असते असे नाही तसेच ते जास्तीत जास्त लोकांचेही मत असत नाही. समाजातील काही मोजक्या घटकांचेच ते मत असते. जनमत म्हणजे विविध लोकांचे मिश्रण असून त्यातील मतांची गोळा बेरीज म्हणजे जनमत. त्या जनमतातील प्रमुख वैशिष्ट्यांच्या बाबी पुढीलप्रमाणे

अ) ते सर्व साधारण मत असते.

ब) तो कारणपरत्वे दृष्टीकोन असतो.

क) संपूर्ण समाजाचे कल्याण असा दृष्टीकोन असतो.

ड) जनमताचा परिणाम शासकीय निर्णयावर होतो, पक्षांच्या प्रशासनामध्ये कार्यवाही करण्यासाठीही होतो.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

आठराव्या शतकापासून जनमत घेण्याची प्रथा आहे. ते नागरी भागात किंवा अन्य राजकीय, सामाजिक क्षेत्रातून घेतले जाते. ब्रिटिश तत्त्ववेत्ता बेनथम याने पहिल्यांदा जनमताचा प्रारंभ केला. त्याला खात्री होती की जनमतामुळे जास्तीत जास्त लोकांना खुश करण्यासाठी शासनाकडून किंवा सत्ताधिकाऱ्यांकडून जास्तीत जास्त प्रयत्न केले जावेत.

## २२.२.२ जनमत : लोकशाहीतील महत्त्व

जनमत अपवादातच दुर्लक्षित केले जाते. लोकशाही सरकार हे लोकांच्या सहभागातूनच आलेले असते आणि कायद्याने राज्य चालविण्याची संमती मिळालेली असते. लोकांच्या पाठिंब्याशिवाय सरकार होवू शकत नाही. जनमत हा प्रक्रियेतून लोकांच्या विचारांना चालना मिळते, जागृती निर्माण करणे. सार्व जनिक क्षेत्राशी संबंधित असणारी विचारसरणी असते. लोकशाही सरकार कसे बनते तसेच त्या सरकारला थोपविण्याचे कामही जनमत करते. खालील बाबीतील जनमत महत्त्वाचे असते.

१. सत्तेत असणाऱ्यांवर एक प्रकारे जनमत हा अकुश असतो.

२. सरकारकडून इतर घटकांवर झालेले अतिक्रमण थोपविणे.

३. लोकांच्या गरजा, उर्मी देण्याची प्रक्रिया आहे.

४. जनतेच्या हिताचे कायदे शासनाने करावेत.

५. यामुळे लोकशाहीला बळकटी येते व त्याचे महत्त्व वाढते.

६. हक्क, स्वातंत्र्य यांचे रक्षण होते.

स्वातंत्र्य म्हणजेच लोकशाही वाचविण्यासाठी प्रत्येक नागरीकास आत्मपरिक्षण करणे आवश्यक आहे.

## २२.२.३ जनमत: मिळविण्याची माध्यमे :

जनमत म्हणजे व्यक्तीगत किंवा एखाद्या गटाचा अतिरेकीपणा नसतो. प्रत्यक्षात जनमत ही विचारसरणी असून ते तयार करण्यासाठी विविध माध्यमाची मदत होते. ही माध्यमे पुढीलप्रमाणे



छायाचित्र २२.२ जनमत साधने

१) **छापील मजकूर :** वर्तमानपत्रे, नियतकालिके, मासिके, इतर माध्यमातून अनेक वर्षापासून जनमत मांडण्याचा प्रयत्न केला जात आहे. बातम्या किंवा नवीन घटना, संपादकीय सदर यामधून अद्ययावत माहिती प्रसिद्ध केली जाते. त्यातून एकत्रिकरण करून त्यातून सर्वसामान्य मत व्यक्त केले जाते. माध्यमांच्या मार्फत संपर्क साधून जनमत प्रसिद्ध केले जाते.

२) **इलेक्ट्रानिक माध्यमे :** सिनेमा, रेडिओ, टी. व्ही. मोबाईल या माध्यमातून जनमत तयार करण्याचा प्रयत्न केला जातो. दृक् श्राव्य माध्यमे दूरपर्यंत पोहचलेली आहेत. त्यामधून जनमत घेणे सुलभ झालेले आहे.

३) **राजकीय पक्ष :** राजकीय पक्षांचे मत हे निवडणुकातील महत्त्वाचे माध्यम असते. निवडणूका काळात आपण पाहिलेले असेल की पक्षाचे नेते लोकांशी संपर्क साधून सद्यस्थिती आणि कल्पना लोकांसमोर मांडतात. राजकीय नेते पदयात्रा, रथयात्रा काढतात. पक्षाचे कार्यकर्ते लोकांपर्यंत पोहचण्यासाठी धोरणे व कार्यक्रम राबवितात. यातून लोकांचे मत बनते.

४) **कायेदमंडळ :** कायदेमंडळ, संसद आणि राज्य विधानसभा जनमत आजमविण्याचा प्रयत्न करतात. सभागृहातील कामकाज कार्यक्रम दाखवून परिणामकारकता वाढविता येते. जनतेच्या धोरणाची आणि कल्याणासाठी होत असलेला मुद्यांचा वापर जनमतासाठी केला जातो. असे कार्यक्रम लोक पाहतात ऐकतात. कायदेमंडळातील कामकाज लोक पाहून सत्यता पडताळतात.

५) **शिक्षण संस्था :** शिक्षण संस्था या देखील जनमत तयार करायला मदत करतात. आपल्या शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ किंवा व्यावसायिक संस्था अशा शिक्षणसंस्थांचा राजकीय शिक्षण आणि त्याचा उपयोग सार्वत्रिक मत तयार होण्यास मदत होते.

## उपक्रम २२.२

आपण रंग दे बसंती हा सिनेमा पाहिलेला असेल. कथानकात ५ मित्र असतात. एका मित्राचा फायटर विमान अपघातात मृत्यू होतो. शासकीय कामकाजातील भ्रष्टाचार हे अपघाताचे मूळ असते. व्यक्तीगत भितीमुळे घडलेली घटनेचा सूड घेण्याचे ठरविले जाते.

दुसरा सिनेमा लगे रहो मुन्नाभाई. महात्मागांधीची प्रेरणा घेणारा मुंबई अंडरवल्ड डॉनची मुन्नाभाईची गांधीगिरी त्यामाध्यमातून लोकांच्या समस्या सोडविल्या जातात. दोन्ही विषयामध्ये चित्रपटातील नायक वेगवेगळे मार्ग निवडतात.

आपणास कोणती पद्धती योग्य वाटते? कारण लिहा.

(विद्यार्थ्यांना हा प्रश्न सोडविताना प्रत्यक्ष सिनेमा न पहाताही उत्तर देता येईल.)

## पाठ्यांशावरील प्रश्न२२.१

१) जनतेच्या लोकशाहीमध्ये सहभाग याचा अर्थ काय?

२) जनमत आणि लोकांचा आवाज हे दोन्ही एकच आहेत का? तुम्ही निवडलेली कारणे द्या.

३) लोकशाहीतील जनमताचे महत्त्व स्पष्ट करा.

४) जनमतासाठी कोणत्या माध्यमांचा वापर केला जातो? सर्वाधिक महत्त्वाची पद्धती कोणती?

## २२.३ भारतातील निवडणूका

आपण मतदानासाठी मतदाराच्या रांगांचे चित्र पाहिलेले असेल. लोकसभा, विधानसभा, ग्रामपंचायत किंवा नगरपालिकेची निवडणूक पाहिलेली असेल. कदाचित निवडणूकीमध्ये सहभागीही झालेले असाल. निवडणूक म्हणजे काय? लोकसभेच्या प्रतिनिधीत्वासाठी जे इच्छुक असतील. त्यांच्यामधून निवडणूक घेतली जाते. सार्वजनिक प्रतिनिधीत्वासाठी निवडणूक असते. विशिष्ट काळानंतर लोकसभा तसेच स्थानिक सरकारसाठी निवडणूका घेतल्या जातात. संपूर्ण देश किंवा राज्य किंवा स्थानिक भागाचे मतदार संघामध्ये विभाजन केले जाते. त्या मतदार संघातील उमेदवारातून एक उमेदवार निवडून द्यायचा असतो. त्या मतदार संघातील ज्या उमेदवाराला सर्वाधिक मते पडलेली असतील त्याला विजयी म्हणून घोषित केले जाते.




छायाचित्र २२.३ मतदानासाठी मतकेंद्रातील मतदारांच्या रांगा

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

**मतदार संघ :** लोकसभेसाठी त्या प्रदेशातील क्षेत्र निश्चित केले जाते, राजा विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीला ही त्या पद्धतीने विभाग केलेले असतात. त्या प्रत्येक मतदार संघातून एक प्रतिनिधी निवडून दिला जातो.

**उमेदवार :** निवडणूकांच्या माध्यमातून स्वत:चे भविष्य अजमाविण्यासाठी व्यक्ती कदाचित पुन्हा निवडणूकीला उमेदवार म्हणून उभी असणारी किंवा नव्याने प्रेरणा घेवून निवडणुका लढविणारी व्यक्ती म्हणजे उमेदवार होय.

**जाहिरनामा :** राजकीय पक्षाचे धोरण

### २२.३.१ निवडणूकांचे महत्त्व :

लोकशाही शासन प्रक्रियेमध्ये लोकांना निवडणूक ही एक मोठी संधी असते. जनमत व्यक्त करण्याची एक मोठी संधी असते. प्रत्यक्षात सार्वजनिक क्षेत्रातील विषयाशी जनसाक्षरता होवून राजकीय जागृती करता येते. निवडणूकातून एका पक्षाकडून किंवा गटाकडून सत्ता बदलण्यासाठी शांततेच्या मार्गाने दुसऱ्या पक्षाकडे विश्वास संपदन करण्याची संधी असते.

**उपक्रम २२.३**

मुकुंद दास हे (MLA) म्हणून प्रतापपूर मधून दोनदा निवडून आलेले आहेत. उत्तर प्रदेशातील प्रादेशिक पक्षाशी संबंधित आहेत. सभागृहामध्ये त्यांची उपस्थिती शंभर टक्के असते. परंतु सभागृहामध्ये त्यांनी

एकही प्रश्न उपस्थित केला नाही किंवा चर्चेमध्ये सहभागी झाले नाहीत. मतदारसंघाच्या ६ कोटी रु. विकास निधी पैकी फक्त काहीच रक्कम रस्त्यासाठी खर्च करू शकले.

देविदास सेन, दुर्गापूर, पश्चिम बंगाल मतदार संघाच्या (MLA) या स्वतंत्र पक्षाच्या त्यांच्या कुटुंबाच्या त्या भागात कापड गिरण्या, सभागृहात त्यांची उपस्थिती १०० टक्के असते. महिलांच्या हक्कांबाबत सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित केला. मतदारसंघासाठी (MLA) म्हणून विकासनिधी रु. ६ कोटी मिळाले होते. त्यापैकी त्यांना ४ कोटी रु. शाळा सुधारणेसाठी खर्च केले व उरलेले २ कोटी रुपये कापडगिरणी जवळचे रस्ते, सार्वजनिक वास्तू यावर खर्च केले.

वरील माहितीच्या आधारे खालील टेबल पूर्ण करा. तुम्ही कोणाला मतदान कराल. त्यांचे कारण कोणते. उमेदवारांनी आपली पद्धती बदलण्याचे दोन उपाय सूचवा.

| उमेदवार | माझे मत आणि कारण | सुधारण्याचे मार्ग |
|---|---|---|
| मुकुंद दास | | १)<br>२) |
| देविदास सेन | | १)<br>२) |
| अन्य | | १)<br>२) |

### २२.३.२ निवडणूक प्रकार :

निवडणूका आपल्या देशात नेहमीच होतात हे आपण पाहिलेले असेल. परंतु सर्वच निवडणूका सारख्याच प्रकारच्या नसतात. दोन प्रकारच्या निवडणूका असतात. काही निवडणूका प्रत्यक्ष तर काही अप्रत्यक्ष असतात. मतदार लोकसभा उमेदवाराला मतपत्रिकेमार्फत थेट मतदान करतो. तसेच स्थानिक सरकारच्या उमेदवारांनाही आपण थेट मतदान करतो. निवडणूकीची दुसरी पद्धत म्हणजे आपण ज्या उमेदवाराला निवडून देतो तोच प्रतिनिधी काही जागांसाठी मतदान करतो. देशाचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती या पद्धतीने अप्रत्यक्षरित्या निवडून दिलेले असतात. राज्यसभेचे सदस्यही याच अप्रत्यक्ष पद्धतीने निवडून दिलेले असतात. तसेच राज्यसभेचे सदस्य हे देखील निवडून आलेल्या सदस्यातून निवडून दिले जातात. ही सुद्धा अप्रत्यक्ष निवडणूक असते.

निरीक्षण केल्यास लक्षात येईल निवडणूका तीन प्रकारच्या असतात. (अ) सर्वसाधारण निवडणूका (ब) मध्यावधी निवडणूका (क) पोटनिवडणूका. सर्वसाधारण निवडणूक म्हणजे लोकसभेची देशभरात होणारी निवडणूक किंवा विधान सभेची होणारी निवडणूक ही नियमितपणे कार्यकाल पूर्ण केल्यानंतर निवडणूक होते. सन २००९ च्या झालेल्या लोकसभेच्या निवडणूका या सर्वसाधारण निवडणूका होत्या. संसदेचा कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वीच लोकसभा बरखास्त झाली तर निवडणूका घ्याव्या लागतात.



टिपा



या निवडणूका मध्यावधी निवडणूका समजल्या जातात. पोटनिवडणूका या विशिष्ट परिस्थितीमध्ये तेवढ्याच मतदार संघात घेतल्या जातात. प्रतिनिधीचा राजीनामा, मृत्यू किंवा कायदेशीर प्रक्रियेमुळे उमेदवाराला बाजूला ठेवलेले असेल तर पोट निवडणूका घ्याव्या लागतात. असा प्रतिनिधी हा उर्वरीत काळासाठी प्रतिनिधीत्व करतो. पी. व्ही. नरसिंह राव अशाच प्रकारच्या पोट निवडणूकीतून आंध्रप्रदेशातून नोव्हेंबर १९९१ मध्ये निवडून आलेले होते.

### ? तुम्हास हे माहित आहे का ?

१. भारताची पहिली सार्वत्रिक निवडणूक सन १९५२ मध्ये झाली. त्यानंतर १५ सार्वत्रिक निवडणूका (लोकसभा) सन २००९ पर्यंत झाल्या.

२. सन १९८०, १९९१, १९९८, १९९९ च्या लोकसभेचा कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी मध्यावधी निवडणूका झाल्या.

३. भारतीय निवडणूकीच्या इतिहासात सन १९७७ लोकसभेच्या निवडणूकीत फक्त २ वर्षांचा कालावधी होता कारण यावेळी राष्ट्रीय आणिबाणी जाहीर केलेली होती.

### पाठ्यांशावरील प्रश्न २२.२

१. भारतातील निवडणूकीचे महत्त्व लिहा.

२. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष निवडणूका म्हणजे काय?

**३. रिकाम्या जागा भरा.**

१) संसदेचा पूर्ण कार्यकाल संपल्यानंतर होणाऱ्या निवडणूकांना . . . . . . . . . . . . . म्हणतात.

२) सर्वसाधारण कार्यकाल पूर्ण करण्यापूर्वी संसद बरखास्त होवून होणाऱ्या निवडणूकीला . . . . . . . . . . . . . . म्हणतात.

३) निवडून आलेल्या उमेदवाराने राजीनामा दिला किंवा त्याचा मृत्यू झाला किंवा उमेदवार कायदेशीर कारणाने उमेदवारास बाजूला केले तर तेथील निवडणूकीला . . . . . . . . . . . . . . . म्हणतात.

## २२.४ भारतातील निवडणूक प्रक्रिया :

आत्तापर्यंत भारताने अनेक निवडणूकांत काम यशस्वीरित्या पार पाडलेल्या आहे. हे कसे घडते? प्रचंड देशात या निवडणूका कशा घेतल्या जात असतील असा प्रश्न पडत असेल? यावर कोण लक्ष देते?

मतदारसंघ कोण ठरविते? निवडणूकांचे अर्ज भरणे पासून ते निकाल जाहीर होईपर्यंतचे वेळापत्रक कोण जाहीर करते? निवडणूक निर्णय अधिकारी, मतदानकेंद्र प्रमुख, मतदान अधिकारी हे अधिकारी कोण असतात? निवडणूक ही एक मोठी प्रक्रिया आहे. या संदर्भात काही माहिती मिळवू.

## २२.४.१ भारतीय निवडणूक आयोग :

मुक्त, निर्भयपणे आणि नि:पक्षपातीपणे घेणे ही स्वतंत्रपणे राबविण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला दिलेला आहे. निवडणूक आयोग हा घटनात्मक आहे. भारतीय निवडणूक आयोग हा घटनेमध्ये प्रस्तुत केलेला आहे. निवडणूक आयोगामध्ये मुख्य निवडणूक आयुक्त आणि अन्य निवडणूक आयुक्तांची संख्या ही राष्ट्रपती कायद्याप्रमाणे ठरवितात. सध्या भारतीय निवडणूक आयोगात मुख्य निवडणूक आयुक्त व त्यांच्या मदतीला दोन निवडणूक उपायुक्त आहेत.



छायाचित्र २२.४ : भारतीय निवडणूक आयोग

मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक उपायुक्त यांच्या नेमणूका भारताचे राष्ट्रपती कतात. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाप्रमाणे त्यांना दर्जा असतो. सर्वोच्च न्यायाधिशाला पदावरून दूर करण्यासाठी जी पद्धती आहे त्याचप्रमाणे मुख्य निवडणूक आयुक्तांनाही लागू आहे. निवडणूक आयुक्तांना पदावरून दूर करताना मुख्य निवडणूक आयुक्तांनी राष्ट्रपतींकडे शिफारस करावी लागते.

### भारतीय निवडणूक आयोगाची कामे :

१) देशातील निवडणूका मुक्तपणे व निर्भयपणे घेणे.

२) संपूर्ण निवडणूक यंत्रणा राबवणे, मतदार याद्या तयार करणे.

३) राजकीय पक्षांना मान्यता देणे, राष्ट्रीय पक्ष किंवा प्रादेशिक पक्ष अशी मान्यता देणे.

४) निवडणूकीसाठी पक्षांना तसेच स्वतंत्र उमेदवारांना चिन्हांचे वाटप करणे.

५) निवडणूक उमेदवारांना, राजकीय पक्षांना निवडणूक आचारसंहितेच्या मार्गदर्शक सूचना देणे.

६) मतदारांच्या, उमेदवारांच्या किंवा पक्षांच्या तक्रारींची दखल घेणे.

७) निवडणूकीच्या अधिकाऱ्यांच्या नेमणूका करणे.

८) निवडणूकीच्या संदर्भात राष्ट्रपतींना मार्गदर्शन करणे.

निवडणूक आयोग हे विविध अधिकाऱ्यांच्या सहकार्याने निवडणूकीची पुढीलप्रमाणे जबाबदारी पार पाडीत असते.

### १. निवडणूक अधिकारी :

निवडणूक आयोगाचे विविध अधिकारी निवडणूक प्रक्रियेमध्ये काम करतात. राज्याच्या पातळीवर मुख्य निवडणूक अधिकारी संपूर्णपणे निवडणूक निरीक्षण, कार्यपद्धतीला दिशा देणे आणि नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी पार पाडतो. राज्य सरकारमधील सर्वात जेष्ठ मूलकी अधिकाऱ्याची नेमणूक आयोग करीत असते. त्याच्यावर पूर्णपणे जबाबदारी असून त्यांच्या मदतीला कर्मचारी वर्ग दिलेला असतो. सदरच्या कामासाठी निवडणूक आयोग राज्यसरकारच्या कर्मचारी वर्ग वापरीत असतो. उदा. जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक नोंदणी अधिकारी, जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी इ. पदे असतात. दैनंदिन नियमीत कामकाजाशिवाय या पदांची जबाबदारी दिलेली असते. निवडणूक काळात पूर्णपणे त्यांच्यावर जबाबदारी असते. मुक्तपणे, निर्भयपणे निवडणूका घेण्याची जबाबदारी तीन अधिकाऱ्यांवर प्रामुख्याने असते. निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक अधिकारी आणि मतदान अधिकारी हे प्रमुख अधिकारी होय.

**निवडणूक निर्णय अधिकारी :** राज्यसरकारच्या सल्ल्याने प्रत्येक मतदार संघासाठी निवडणूक निर्ण य अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते. (१) उमेदवाराचे अर्ज तपासणे, त्याची छाननी करणे. (२) निवडणूक आयोगाच्या वतीने चिन्हांचे वाटप करणे. (३) मतदार संघात निवडणूका सुरळीतपणे पार पाडणे. (४) मतमोजणी काटेकोरपणे करणे. (५) निवडणूकीचा निकाल जाहीर करणे.

**निवडणूक अधिकार :** एकाच मतदार संघात अनेक मतदान केंद्रे असतात. प्रत्येक मतदान केंद्रावर ८00 ते १000 मतदार असतात. यांची जबाबदारी निवडणूक अधिकाऱ्यावर सोपविलेली असते. मतदान केंद्रावर मुक्त, न्याय्य व शांततेच्या मार्गाने मतदान करण्याची मतदाराला संधी मिळाली पाहिजे. दुसऱ्याच्या नावावर मतदान होता कामा नये याचे निरिक्षण केले जाते. मतदानानंतर मतपत्रिका निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांपर्यंत पोहचविण्याची जबाबदारी असते.

**मतदान केंद्र प्रमुख :** प्रत्येक निवडणूक अधिकाऱ्याच्या मदतीला तीन चार अधिकारी असतात. मतदान केंद्राची जबाबदारी केंद्रप्रमुखावर असते. मतदारांची नावे यादीमध्ये तपासणे, मतदाराच्या बोटाला न पुसणारी शाई लावणे, मतपत्रिका देणे, मतपत्रिका मतदानानंतर ती मतपेटीत टाकली का याची खात्री करणे इ. कामे असतात.

**तुम्हास हे माहित आहे का ?**

दुसऱ्याच्या नावावर मतदान करणे : याला बोगस मतदान म्हणतात. प्रत्यक्ष मतदाराऐवजी दुसऱ्याच्या नावावर मतदान करणे हे बेकायदेशीर असून ओळखपत्राच्या आधाराने तपासूनच मतदान करण्यास संधी दिल्यास हा प्रकार थांबू शकेल.

न पूसणारी शाई : ही शाई सहजरित्या पुसली जात नाही. उजव्या तर्जनीच्या बोटाला शाई लावण्याने दुसऱ्याच्या नावावर मतदान होण्याची शक्यता कमी होते.

### भारतातील निवडणूक प्रक्रिया :

निवडणूक प्रक्रिया ही मोठी असून त्याचे टप्पे पुढीलप्रमाणे :

राष्ट्रपती आणि राज्यपालांच्या वतीने निवडणूक आयोगाचे काम चालते.

१) मतदार संघाची आखणी करणे.

२) मतदारांच्या याद्या करणे त्यात दुरुस्त्या करणे.

३) निवडणूका तारखा जाहीर करणे. अर्ज दाखल करून घेणे, उमेदवारांच्या अर्जाची छाननी करणे, मतदान केंद्र ठरविणे, मतदान घेणे, मतमोजणी, निवडणूक निकाल जाहीर करणे इ. चे वेळापत्रक जाहीर करणे.

४) पक्षांना व उमेदवारांना चिन्हांचे वाटप करणे.

५) निवडणूक प्रचारासाठी उमेदवार व पक्षांना प्रचाराची मुदत निवडणूक आयोगाच्या वतीने देणे.

६) पुर्नमतदानाची गरज भासल्यास त्या मतदार संघात किंवा मतदार संघाच्या काही भागात निवडणूक आयोगाकडून परवानगी देणे.

७) **निवडणूक स्थगिती :** जर एखाद्या पक्षाचा उमेदवार निवडणूक अर्ज मागे घेण्याच्या दिवशी किंवा प्रत्यक्ष निवडणूकीच्या दिवशी मृत्यूमुखी पडला तर निवडणूक आयोग निवडणूक रद्द झाल्याची घोषणा करतो.

८) जर उमेदवाराची कागदपत्रे आयोगरित्या नाकारली असतील किंवा निवडणूक काळात गैर प्रकार झाले असतील तर निवडणूक भ्रष्टाचार झाला असल्यास मतदारांना लाच दिली असल्यास कायद्याने प्रक्रिया थांबविता येते. उच्च न्यायालयात किंवा त्यांच्या मार्फत सर्वोच्च न्यायालयात जाता येते.

### २२.४.२ मतदान केंद्र प्रमुख :

मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर अनेक कामे असतात. मतदार आपापल्या मतदान केंद्रात जातात, रांगेत प्रतिक्षा करतात. मतदान केंद्रात गेल्यावर पहिल्या अधिकाऱ्याकडे आपली ओळख पटवितात.

त्यानंतर दुसऱ्या अधिकाऱ्याकडून डाव्या हाताच्या तर्जनीला न पुसणारी शाई लावली जाते. पुरुषांचे डावे तर महिलांचे उजव्या बोटाला शाई लावतात. बोगस मतदान, खोटे मतदान रोखण्यासाठी हा उपाय असतो. दुसऱ्याच्या नावावर मतदान करणे हा गुन्हा आहे. मतदारांना मतदपत्रिका दिली जाते किंवा मतदान यंत्रावर उमेदवारांची नावे व चिन्ह असलेले मशीन वापरले जाते.



**२२.५ : मतदान केंद्र**



**२२.६ : इलेक्ट्रानिक्स मतदानयंत्र**

मतदान ठिकाणी रबर स्टॅम्पच्या सहाय्याने निवडी प्रमाणे मतदान करतो. मतदार मतपत्रिकेची घडी घालतो व मतदान अधिकाऱ्याच्या तसेच पोलिस एजंटच्या समोरील पेटीत मतपत्रिका टाकतो.

जर इलेक्ट्रॉनिक्स मशीनचा वापर होत असेल तर मशीनच्या स्क्रिनवर उमेदवारांची नावे व चिन्ह दिसतात. मतदान कोणी कोणाला केले हे ओळखता येता कामा नये. सर्व मतपेट्या सीलबंद करून मतमोजणी केंद्राकडे पाठविल्या जातात. मतमोजणी करून सर्वाधिक मतदान झालेल्या उमेदवाराचे नाव जाहीर केले जाते. मतदार संघात झालेल्या मतापैकी एक षष्टांशपेक्षा कमी मते पडलेली असतील तर उमेदवाराची अनामत रक्कम जप्त होते. जर एखाद्या उमेदवाराने जर दुसऱ्या उमेदवाराबाबत गैर प्रकाराची तक्रार करावयाची असल्यास त्याला उच्च न्यायालयात केस दाखल करावी लागते. जर भ्रष्टाचाराची कोर्टाला खात्री पटली तर निवडणूक थांबवली जाते. जर उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय अयोग्य वाटला तर त्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात विनंती अर्ज करता येतो.

## तुम्हास हे माहित आहे का ?

**मतपत्रिका :** सर्व उमेदवार व त्यांचे निवडणूक चिन्ह असलेला कागद असतो. मतदार आपले मत नोंदवतो.

**गोपनीय मतपत्रिका :** मतदाराला मतदान करण्याचे स्वातंत्र्य असते ते गुप्त रहावे याची काळजी घेतली जाते.

**इलेक्ट्रॉनिक मतदान पेटी :** इलेक्ट्रॉनिक्स पद्धतीची मशीन मतपत्रिका असून मतपेटीपेक्षा ती भिन्न स्वरूपाची असते. सन १९८२ मध्ये पोटनिवडणूकीत केरळमधील पारूर मतदान संघासाठी ही पद्धती प्रथम वापरली. त्यामध्ये फक्त ५० मतदानकेंद्र होती. सन २००४ च्या सर्वसाधारण निवडणूकीसाठी १०७५ इलेक्ट्रानिक्स मतदान मशीन वापरल्या गेल्या.

## पाठ्यांशावरील प्रश्न २२.३

१. निवडणूक आयोगाची रचना कशी असते?

२. निवडणूक आयोगाचे कामकाज किचकट असते ते तुमच्या शब्दात लिहा.

३. राज्याचे निवडणूक अधिकारी पासून प्रत्यक्ष मतदान केंद्रापर्यंत कोण अधिकारी असतात?

४. जर निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तुमच्यावर जवाबदारी टाकली तर तुम्हाला निर्भयपणे, शांततेत मतदान प्रक्रिया कशी पार पाडता येईल?

५. भारतातील निवडणूक प्रक्रियेतील पाच प्रमुख टप्पे कोणते?

## २२.५ जनतेचा निवडणुकीतील सहभाग आणि पुनर्रचना :

लोकशाही निवडणूक प्रक्रियेतील जनतेचा सहभाग याविषयी माहिती पाहिली. अनेक वर्षांच्या अनुभवानंतर लक्षात येते की भारतीय निवडणूक पद्धतीमध्ये काही सुधारणांची गरज आहे. जनतेच्या सहभागाविषयी काही माहिती पाहू. सोबतच्या माहितीमध्ये भारतीय निवडणूक आणि निवडणूका सुधारणांबावात सूचनांवर दृष्टीक्षेप टाकू.

### २२.५ प्रौढ मतदार (Universal Adult Franchise)

स्वातंत्र्यानंतर लगेचच प्रौढ मतदाराचे तत्त्व स्वीकारण्यामुळे निवडणूकीचे मोठे काम होते. लोकशाहीची ३०० वर्षाची परंपरा असलेल्या ग्रेट ब्रिटनने सन १९२८ ला प्रौढमतदाराचे धोरण स्वीकारलेले होते. स्विझर्लंड हा तर लोकशाहीचे मूळ असलेल्या देशात तर १९७२ ला प्रौढ मतदाराचे धोरण स्वीकारले. प्रौढ मतदाराचा स्वीकार भारताने केला तेव्हा लोकशाहीचा प्रारंभ स्वातंत्र्यानंतर लगेचच केला.



### प्रौढ मतदार म्हणजे काय?

आपण प्रौढमतदार म्हणजे काय याचा अर्थ समजावून घेवू. (Universal) याचा अर्थ सर्व लोकांना लागू असलेली. त्यामध्ये अजिबात भेदभाव नसलेली आणि (Adult) म्हणजे जो सज्ञान आहे. अज्ञान नाही असा. तर (Franchise) याचा अर्थ मतदान देण्याचा व्यक्तिगत अधिकार. म्हणजेच कोणत्याही सज्ञानी व्यक्तीला निवडणूकीत मतदान करण्याचा अधिकार असा अर्थ बोध होतो. परंतु ज्या ज्या प्रौढांवर कायद्याने बंदी घातलेली आहे त्यांचा त्या प्रौढांमध्ये समावेश नसतो.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

१. सन १८९३ मध्ये प्रौढ मतदारांना मान्यता देणाऱ्या न्यूझिलंड हा जगातील पहिला देश.

२. जर्मनीत सन १९१९ मध्ये तर स्विडनमध्ये १९२० मध्ये तर फ्रान्सने १९४५ ला प्रौढ मतदार निवडणुकीस प्रारंभ केला.

प्रौढ मतदार ही संकल्पना राजकीय समानता तत्त्वावर आधारलेली आहे. एक व्यक्ती एक मत या मधून स्वातंत्र्याची हमी आणि हक्काचे रक्षणातून जनतेच्या सहभागाचे शिक्षण याची संधी मिळते.

मतदानाच्या अधिकाराचा संबंध हा व्यक्तीच्या वयाशी जोडलेला आहे. जगातील विविध देशांमध्ये मतदाराच्या वयाबावत भिन्नता आहे. चीन, यु.एस.ए. ग्रेट ब्रिटन, रशिया प्रमाणे भारतामध्ये ही वयाची अट १८ वर्षांची आहे. इराणमध्ये वय १५ वर्षे, ब्राझिल, निकारगुवा, क्युबा येथे १६ वर्षे, इंडोनेशिया, उत्तर कोरीया, सुदानमध्ये वय १७ वर्षांची अट आहे. जपान आणि ट्यूनिशियात २० वर्षे व कोरीयात १९ वर्ष वयाची अट आहे. कुवेत, लेबनॉन, मलेशिया, मालदीप, सिंगापूर मध्ये २१ वर्षे तर उझबेकिस्तानमध्ये वयाची अट २५ वर्षांची आहे.

### २२.५.२ निवडणूक सुधारणा :

प्रौढ मतदारांना निवडणूक पद्धतीमध्ये फक्त उमेदवार निवडीचा हक्क आहे असे नसून सध्याचे सरकार निवडणूकीच्या माध्यमातून बदलण्याचाही हक्क आहे. आपण पाहिलेलेच आहे की निवडणूका या शांततेने आणि निर्भयपणे होतात. लोक उत्साहाने निवडणूकीत भाग घेतात. लोकशाही प्रधान राष्ट्र मध्ये तर निवडणूक हा महत्त्वाचा भाग ठरतो. त्या संबंध निवडणूकीच्या प्रक्रियेत काही समस्या उद्भवतात'

लोकांनी या समस्येबावत सरकारचे लक्ष वेधले आहे. यासाठी शासन, निवडणूक आयोग, पत्रकार आणि अनेक जनांचे प्रयत्न सुरू आहेत. काही उपाय योजलेलेही आहेत. तसेच कायद्यात दुरुस्ती सूचविलेल्या आहेत. अनेक वर्षांच्या अनुभवावरून काही तातडीने दुरुस्त्या केलेल्या आहेत. (अ) निवडणूकीवर ताबा मिळविणे बोगस मतदान दुसऱ्याच्या नावावर मतदान करणे. (ब) निवडणूका काळात शांततेचा भंग (क) पैसा आणि शक्ती प्रदर्शने (ड) दुर्बल घटकांचा वापर करणे. (इ)

शासकीय यंत्रणेचा गैरवापर (फ) मतदान केंद्र ताब्यात घेणे. यासारख्या बाबींकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे.




**छायाचित्र २२.७**

वरील मुद्यांचा विचार करता निडणूक प्रक्रियेत सुधारण्याची गरज आहे. निवडणूकांमध्ये अनेक सुधारणा राबविलेल्याही आहेत. तरीही अचूक पद्धती अमलात आलेली नाही. त्यामध्ये अनेक पळवाटा आणि मर्यादाही आहेत. खरे तर निवडणूक यंत्रणा खरोखरच मुक्त, निर्भय आणि नि:पक्षपातीपणे होण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. अनेक विचारवंतांकडून, राजकीय पक्षांकडून, शासकीय समिती तसेच खाजगी क्षेत्रातून सुद्धा अनेक सूचना आलेल्या आहेत.

**मतदारांबाबत सूचना पुढील प्रमाणे :**

१) लोकशाही पद्धतीने निवडणूका होण्यासाठी वेळोवेळी आलेल्या सूचना स्वीकाराव्यात त्या सूचनांची अंमलबजावणी करण्यास पुरेसा अवधी मिळेल.

२) बहुमतदान पद्धती, प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धती आणल्यास उमेदवारांची संख्या कमी होईल.

३) राजकीय पक्षांचे कार्य पारदर्शक आणि लोकशाही पद्धतीचे असते. निवडणूक खर्चाचे ऑडिट करून घेणे बंधनकारक करावे.

४) निवडणूक कायदा प्रभावी करावा व त्यानुसार कठोर शिक्षेची तरतूद करावी.

५) निवडणूक खर्चाची तरतूद करावी. त्यातून निवडणूक खर्च कमी होईल.

६) लोकसभा व राज्यसभेत किमान एकतृतीयांश महिलांना प्रतिनिधित्व मिळावे ही विशेष तरतूद करावी.

७) निवडणूक काळात पैशाचा आणि शक्ती याचा कमी वापर करावा.

८) राजकीय गुन्हेगार निवडणूकीतून रोखले जावेत.

९) गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीतील उमेदवारांना निवडणूक लढविण्यास बंदी आणावी.

१०) निवडणूका प्रचारामध्ये जातीचे व धर्माचे राजकारण आणू नये.

## तुम्हास हे माहित आहे का ?

**बहुमतदान पद्धती :** ज्या उमेदवाराला सर्वाधिक मते पडतात तो उमेदवार निवडून येतो.

**प्रमाणबद्ध प्रतिनिधित्व :** मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना त्याच्या मताची किंमत ही मतदानाच्या क्षमतेच्या प्रमाणात असते. राजकीय पक्ष किंवा हितसंबंधी गट अशी मते मिळवितात.

निवडणूक आयोग अलिकडच्या काळात विविध बाबतीमध्ये नव्याने सुधारणा करीत आहे. यापैकी काही योजना खालीलप्रमाणे :

१) इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर

२) निवडणूक अंदाजाचा परिणाम मतदारांवर होवू नये यासाठी बंधने

३) राजकीय गुन्हेगारीवरील नियंत्रण

४) मतदार यादीचे संगणकीकरण

५) मतदारांना ओळख पत्राचे वाटप

६) उमेदवारास हिशोब सादर करण्याची सोपी पद्धती.

७) निवडणूक आचार संहिता

आपल्या देशातील मतदान पद्धतीत अनेक सुधारणा होत आहेत त्या उत्तम होतील. लोकाच्या आपेक्षांची पूर्तता शासनाकडून होईल अशी आशा बाळगू.

## उपक्रम २२.४

खाली दिलेल्या मुद्यानुसार तुमच्या घरातील किंवा आजुबाजूच्या पौढाची मुलाखत घेवून माहिती भरा.

१) नाव : वय :

२) तुम्ही पहिल्यांदा मतदान कधी केले?

३) तुम्ही ज्या उमेदवाराला मतदान केले ते कसे ठरविले?

४) राजकीय पक्षाचे धोरण पाहिले काय? त्याचा उपयोग तुमच्या निर्णयासाठी झाला का?

## पाठ्यांशावरील प्रश्न २२.४

१) प्रौढ मतदारामुळे प्रत्येक भारतीय नागरीकाला समान हक्क प्राप्त झालेला आहे. वर्ग, जात, लिंगभेद धर्म यांच्यातील भेदभाव यामुळे कमी झालेला आहे असे वाटते का? आपले विचार स्पष्ट करा.

२) आपल्या मतदान पद्धतीतील तीन समस्या लिहा.

३) निवडणूक पद्धतीत सुधारणा होण्यासाठी कोणत्याही दोन बाबी लिहा.

## आपण काय शिकलो?

आपल्या सारख्या प्रचंड देशात प्रतिनिधिक लोकशाही आवश्यक आहे. प्रतिनिधिक सरकार प्रतिनिधिंच्या मार्फत चालविले जाते आणि प्रतिनिधि निवडणूकीतून पाठविले जातात. हा लोकशाहीचा पाया आहे.

❖ निवडणूकीसाठी मतदार लागतात व त्यासाठी मतदार यादी लागते. मतदार म्हणजे मताचा ज्यांना अधिकार आहे असा नागरिक. सार्वत्रिक प्रौढ मतदार म्हणजे कोणताही भेदभाव न करता मतदानाचा असलेला हक्क.

❖ एकाच सदस्याचा मतदारसंघ ही सर्वसाधारण बाब आहे. मतदान गुप्त मतदान पद्धतीने मतपत्रिकेवर नोंदविले जाते.

❖ विधीमंडळाच्या निवडणूकामध्ये मतदार थेट उमेदवाराला मतदान करतात. अप्रत्यक्ष मतदान पद्धती ही राष्ट्रपती, उपराष्ट्रपतीच्या निवडणूकीसाठी वापरली जाते.

❖ निवडणूक प्रक्रियेमध्ये अनेक बाबी येतात. उमेदवारी अर्ज, त्याची छानणी, उमेदवारी मागे घेणे, निवडणूक प्रचार, निकाल इ. अनेक गोष्टींचा त्यात समावेश असतो.

❖ भारतात निवडणूक आयोग निवडणूक प्रक्रिया राबविते.

❖ निवडणूक प्रक्रियेमध्ये अनेक त्रुटी असून त्यात सुधारणांची गरज आहे.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. लोकशाही प्रक्रियेत जनतेचा सहभाग म्हणजे काय? फक्त मतदान केले म्हणजे काम संपले हा जनतेचा लोकशाहीतील सहभाग असे वाटते का? कारण लिहा.

२. जनमत म्हणजे काय? त्याचे लोकशाहीतील महत्त्व स्पष्ट करा.

३. जनमत तयार करणारी कोणतीही चार माध्यमे लिहा. जनमतावर परिणाम करणारे प्रभावी माध्यम कोणते?

४. भारतीय लोकशाहीतील निवडणूकांचे परीक्षण करा. देशामध्ये कोणकोणत्या प्रकारच्या निवडणूका घेतल्या जातात. चर्चा करा.

५. भारतीय निवडणूक आयोगाची कामे कोणती? निवडणूक प्रक्रियेतील प्रमुख टप्पे कोणते?

६. प्रौढ मतदान म्हणजे काय? त्याचे परिणाम स्पष्ट करा.

७. वर्ग, जाती, लिंगभेद, धर्म यामध्ये भारतात असमानता कोठे आढळते? प्रौढमतदार ही संकल्पना कशी यशस्वी झालेली आहे?

८. निवडणूक प्रक्रियेतील समस्या लिहा.

९. भारतातील निवडणूक प्रक्रियेमध्ये तातडीने सुधारणा करण्याची गरज वाटते का? या सुधारण्यासाठी कोणत्या बाबी सूचवाल?

१०. निवडणूक प्रचारासाठी निवडणूक आयोगाचा कृती आराखडा तयार करा.

या आराखड्यामुळे सर्वसाधारण मतदार, राजकीय पक्ष, उमेदवार यांना सुयोग्य संदेश पोहचला जावा.

## पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे

### २२.१

१. जनतेचा लोकशाही प्रक्रियेतील सहभाग विविध बाबतीत आढळतो. मतदानात भाग घेणे, लोकांची होणारी चर्चा, वर्तमानपत्रे, शासकीय कार्यक्रम इत्यादी. प्रत्यक्ष निवडणूक प्रचार, राजकीय चर्चा, एखाद्या राजकीय पक्षाचे काम करणे, उमेदवार उभा करणे हा लोकशाहीतील जनतेचा सहभाग आहे.

२. जनतेचा आवाज आणि लोकमत हे दोन्हीही एक नाही. जनतेचे म्हणणे किंवा जनतेचा आवाज म्हणजे सर्वांचे मत नसते. ज्यांच्याशी संबंधित आहे त्यांचेच मत असते. जनतेचा आवाज किंवा प्रतिक्रिया ही मिश्र असू शकते त्यांचे सारासर मत म्हणजे जनतेचा आवाज होय.

३. जनमत हा लोकशाहीतील महत्त्वाचा भाग आहे. लोकशाही सरकार हे जनमतावर निवडून आलेले असते. त्यासाठी लोकांची अनुमती असते. जनतेच्या पाठींब्याशिवाय सरकार पदावर राहू शकत नाही. जनमत प्रक्रिया ही विचार मंथनातून, जनजागृतीतून होते. लोकांचा सार्व जनिक दृष्टीकोन महत्त्वाचा असतो. जनतेच्या मताचा विचार केला जातो. कायदा करताना शासनाला जनहिताचा विचार करावा लागतो.

४. जनमतासाठी छापील व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमाचा उपयोग होतो.

दुसऱ्या भागाचे उत्तर तुमच्या अनुभवानुसार लिहा.

टिपा

## २२.२

१. लोकशाही प्रक्रियामध्ये निवडणूकातून आपले सरकार स्थापण्याची लोकांना संधी मिळते. आपल्याला काय वाटते हे निवडणूकातून स्पष्ट होते. सर्वाजनिक प्रश्न सोडविण्यासाठी राजकीय जनजागृती करून लोकांना एक प्रकारचे शिक्षण मिळते. शांततेच्या मार्गाने एका राजकीय पक्षाकडून दुसऱ्या राजकीय पक्षाकडे शासकीय सत्ता देता येते.

२. थेट म्हणजे प्रत्यक्ष मतपत्रिकेतून उमेदवाराला (लोकसभा आणि विधानसभा) किंवा स्थानिक सरकारमध्ये पाठविता येते. अप्रत्यक्ष निवडणूक म्हणजे विशिष्ट पदावरील व्यक्तीच्या निवडीसाठी आपण निवडून दिलेल्या आपल्या प्रतिनिधिने मतदान करणे. भारताचे राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती याची निवडूक अप्रत्यक्ष मतदान पद्धतीने होते. राज्यसभेचे सदस्यही अप्रत्यक्ष निवडणूक पद्धतीने निवडून दिले जातात.

३. अ) सार्वजनिक निवडणूका ब) मध्यावधी निवडणूका क) पोट निवडणूक

## २२.३

१. निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त आणि राष्ट्रपतींनी कायद्याप्रमाणे नियुक्त केलेले निवडणूक आयुक्त असतात. सध्या भारताचे मुख्य निवडूक आयुक्त व दोन निवडणूक आयुक्त आहेत.

२. निवडणूक आयोगाची दोन महत्त्वाची कामे

१) देशात मुक्त व निर्भयपणे निवडणूका घेणे.

२) निवडणूक यंत्रणेवर पर्यवेक्षण करणे. दिशा देणे व नियंत्रण ठेवणे.

३. निवडणूका घेण्यासाठी निवडणूक आयोगाला मदत करणारे अनेक अधिकारी असतात. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी, मतदार नोंदणी अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्र प्रमुख

४. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची प्रमुख कामे :

अ) उमेदवाराचा अर्ज स्विकृती, छानणी

ब) निवडणूक आयोगाच्या वतीने निवडणूक चिन्ह वाटप करणे.

क) मतदार संघात शांततेने मतदान प्रक्रिया राबविणे.

ड) मतमोजणी काटेकोरपणे करणे.

इ) निवडणूकीचा निकार जाहीर करणे.

५. निवडणूक प्रक्रियेचे पाच टप्पे :

१) मतदार संघ ठरविणे.

२) मतदार याद्या दुरुस्ती करून घेणे वारंवार त्यांचे पर्यवेक्षण करणे.

३) राष्ट्रपती आणि राज्यपालांचे निवडणूकीच्या संदर्भात अद्यादेश काढणे.

४) निवडणूकीचे वेळापत्रक तयार करणे, त्याची छानणी अर्ज मागे घेणे, प्रत्यक्ष मतदान मतमोजणी निकाल यांच्या तारखा जाहीर करणे.

## २२.४

१. प्रौढ मतदार म्हणजे स्त्रीपुरुषांचा भेदभाव न करता प्रौढांना मतदानाचा अधिकार प्रदान करणे. निवडणूकीच्या माध्यमातून वर्ग, जात, लिंगभेद, धर्मभेद न करता लोकशाही प्रक्रियेमध्ये सर्वांना समान संधी देणे. सध्या सर्वानाच संधी प्राप्त होत आहे. तरीही सर्वांनाच संधी मिळते असे आपण म्हणू शकत नाही. समाजाच्या पातळीवर सर्वांना आणून नागरीकांचा दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे.

२. निवडणूक प्रक्रियेतील अडथळे

अ) मतदान प्रकियेत अडथळे आणणे, खोटे व बोगस मतदार उभे करणे, दुसऱ्याच्या नावावर मतदान करणे.

ब) निवडणूकामध्ये गोंधळ घालणे.

क) पैसा आणि शक्तीचा वापर करणे.

३. राजकीय पक्षांनी पारदर्शी आणि लोकशाही पद्धती राबविणे.

निवडणूकीसाठी केलेल्या खर्चाचे ऑडिट करणे.

निवडणूक कायदा आधिक प्रभावी करून कठोर शिक्षेची तरतूद करणे.

२३

# भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने

भारतातील लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे, याचा आपल्याला अभिमान आहे. गेली ६५ वर्षे आपण यशस्वीपणे निवडणूक प्रक्रिया पार पाडत आहोत. शांततेच्या मार्गाने राज्यात आणि केंद्रात सुद्धा सत्ताबदल घडून येत आहे. लोकांना संभाषण स्वातंत्र्य, स्थलांतर स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य आहे. भारतात मोठ्या प्रमाणावर सामाजिक आणि आर्थिक बदल होत आहेत. त्यावरोबरच सामाजिक विषमता, अन्याय आणि जनतेचा अपेक्षाभंग या तक्रारीमध्येसुद्धा वाढ होत आहे. लोकशाही प्रक्रियेत आपला सहभाग आहे, असे लोकांनाच वाटत नाही. लोकांना असे का वाटते. याबद्दल आपण कधी विचार केला आहे का? लोकशाही शासनव्यवस्था म्हणजे लोकांचे लोकांनी लोकांसाठी चालविलेले शासन होय. हे या अगोदरच्या पाठात आपण वाचले आहेच. लोकशाही म्हणजे फक्त निवडणूक प्रक्रिया नव्हे, तर जनतेच्या सामाजिक आणि आर्थिक आशाआकांक्षाची पूर्तता करणे म्हणजे लोकशाही होय. आपण सतत लोकशाहिच्या वेगवेगळ्या पैलूचा आणि आव्हानांविषयी चर्चा करत असतो. या पाठात आपण या सर्वांविषीच्या संकल्पना जास्त चांगल्या रितीने समजावून घेणार आहोत.

## उद्दिष्टे :

या पाठाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास पुढील गोष्टीं समजतील.

❖ लोकशाही व त्याच वेगवेगळे पैलू यांच्या संकल्पना स्पष्ट होतील.

❖ भारतीय लोकशाहीची स्थापना व वाटचाल समजेल.

❖ भारतीय लोकशाहीसमोर असलेली आव्हाने आणि समस्या समजतील.

❖ भारतीय लोकशाही तत्पर आणि यशस्वी करण्यासाठी नागरिकांचा सहभाग लक्षात येईल.

## २३.१ लोकशाहीची जाण :

आपण लोकशाहीचा अर्थ आणि लोकशाही यशस्वी राबविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांनी माहिती घेऊ.




**चित्र क्र. २३.१ : लोकशाही म्हणजे नक्की काय?**

अमेरिकेचे अध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी लोकशाहीची व्याख्या अशी केली होती.लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले प्रशासन होय.

लोकशाही म्हणजे democracy हा शब्द ग्रीक भाषेतील शब्दापासून तयार झाला आहे. ग्रीक भाषेत demos म्हणजे लोक kratos म्हणजे सत्ता म्हणून demokratia या शब्दाचा अर्थ लोकांची सत्ता असा होतो. ग्रीक नगर राज्यांमध्ये (उदा. अथेन्स) त्याकाळी प्रचलित असणाऱ्या प्रशासनव्यवस्थेवरून demokratia या शब्दाला लोकांची सत्ता हा अर्थ प्राप्त झाला आहे. आजच्या काळातसुद्धा लोकशाही म्हणजे ज्या ठिकाणी सर्व सत्ता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे लोकांकडेच असते, अशी प्रशासन व्यवस्था होय. या व्यवस्थेत लोक प्रतिनिधी निवडण्यासाठी नियमितपणे निवडणूका घेण्यात येतात. लोकशाहीच्या सर्व व्याख्या लक्षात घेतल्या असता. लोकशाही म्हणजे निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीमार्फत चालविण्यात येणारी प्रशासन व्यवस्था होय.

## उपक्रम २३.१

लोकशाहीची व्याख्या अनेक प्रकारांनी करण्यात आली आहे. ब्राईस या तज्ञाने लोकशाही म्हणजे लोकांकडून चालविली जाणारी प्रशासनव्यवस्था होय. या व्यवस्थेत लोक आपले मत मतदानाने व्यक्त करतात अशी केली आहे.

**मॅकक्लोव्हर यांची व्याख्या** लोकशाही म्हणजे बहुमताने किंवा इतर मार्गांनी प्रशासन चालविणे असे नसून मूलभूतरित्या प्रशासन कोण चालविणार आहे आणि त्याची व्याप्ती किती असणार आहे, या गोष्टी विचारात घेणे ही आहे.

## भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने

या व्याख्यांमध्ये लोकशाहीचे कोणते पैलू दिसून येतात? राजकीय, सामाजिक की वैयक्तिक?

सध्याच्या काळातील लोकशाही ही फक्त राजकीय लोकशाही निगडीत आहे असे नाही. लोकशाही या शब्दामध्ये प्रशासनव्यवस्थेपेक्षाही जास्त अर्थ सामावलेला आहे. लोकशाहीच्या व्यापक अर्थानुसार लोकशाही म्हणजे,

१) शासनव्यवस्था प्रकार

२) राज्याचा प्रकार

३) समाज रचनेचा प्रकार

४) आर्थिक व्यवस्थेचा आराखडा

५) जीवनशैली आणि सांस्कृतिक बैठक

म्हणून आपण ज्या वेळेस भारतात लोकशाही आहे, असे म्हणतो त्यावेळी फक्त राजकीय निवडणुका आणि प्रशासन व्यवस्था एवढाच अर्थ अभिप्रेत नसतो. तर भारतीय समाज आणि सामाजातील प्रत्येक घटक हा लोकशाहीवादी असून लोकशाहीची मूलभूत मूल्ये समानता, स्वतंत्रता, बंधूभाव, निधर्मीपणा आणि सामाजिक न्याय यांची जाण वैयक्तिक वागणूक आणि सामाजिक पर्यावरणातही ठेवणारा आहे, असा होतो.

### उपक्रम २३.२

एम. ए. करणारा अनिल एकत्र कुटुंबात राहतो. त्याच्या आजोबांनी त्याच्या १३ वर्षे वयाच्या बहिणीचे लग्न ठरवले आहे. नवरामुलगा बारावीत शिकतो आणि १८ वर्षाचा आहे. अनिल तसेच राज्यशासनात अधिकारी असणाऱ्या त्याच्या पालकांना हा निर्णय अमान्य आहे. पण कोणीही आपले मत ठामपणे मांडू शकत नाही, त्याचे आजोबा यांच्याशी विचारविमर्श करत नाहीत. अनिलच्या कुटुंबात लोकशाही आहे? खालीलपैकी कोणती विधाने संबंध आणि कोणती असंबंध आहेत? का?

१. १३ व्या वर्षी त्याच्या बहिणीचे लग्न करण्याचा निर्णय अनिष्ट, बेकायदेशीर आणि अनैतिक आहे.

२. कुटुंबाचे इतर सदस्य आणि ज्या मुलीच्या आयुष्यावर याचा परिणाम होणार आहे त्यांच्याशी चर्चा न करता कुटुंबप्रमुखांनी हा निर्णय घेतला आहे. अनेक युगांपासून परंपरागत चालत आल्याप्रमाणे हा निर्णय आहे. यावरून कळते की सामाजिक परिस्थिती लोकशाहीविरोधी आहे.

३. कुटुंबातील इतरांचे वैयक्तिक वर्तन लोकशाही विरोधी आहे, कारण त्या निर्णयाविरुद्ध असूनही त्यांनी त्यांचे मत मांडले नाही.

### २३.१.२ लोकशाहीसाठी आवश्यक अटी :

वरील गोष्टींचा विचार करता, एखाद्या व्यवस्थेला तेव्हा खरी व व्यापक लोकशाही म्हणता येईल जेव्हा ती काही विशिष्ट अटी पूर्ण करते. त्या कोणत्या? त्या दोन अटी असू शकतात. (अ) राजकीय अटी (ब) सामाजिक व आर्थिक अटी.

पहिल्या अटीच्या पूर्ततेमुळे राजकीय लोकशाही तर दुसऱ्या अटीच्या पूर्ततेमुळे सामाजिक लोकशाही अस्तित्वात येते.

अर्थातच प्रथमत: राजकीय अटी येतात. एखादी व्यवस्था लोकशाही होण्यासाठी लोकांकडे सर्वोच्च सत्ता सोपवणारी घटना स्विकारायला हवी, त्या घटनेने समता, विचार, अभिव्यक्ती, विचारसरणी, प्रचलन, संप्रेषण आणि संघटनाचे मूलभूत व मानवी हक्कांचे संरक्षण करायला हवे. शासनाच्या विविध पातळ्यांवर प्रौढ मताधिकाराने प्रतिनिधी निवडले गेले पाहिजेत. निवडणुकांप्रमाणेच इतर पैलू व प्रक्रियांमध्ये लोकांच्या राजकीय सहभागासाठी संधी उपलब्ध करून दिल्या गेल्या पाहिजेत. एक जबाबदार शासनव्यवस्था असली पाहिजे की जी कार्यकारी कायदेमंडळाला व कायदेमंडळ लोकांना उत्तरदायी असेल आणि न्यायसंस्था स्वतंत्र असेल. राजकीय पक्ष व दबावगटांसारख्या (संघटना, विविध बिगर सरकारी संस्था) राजकीय संस्था लोकांच्या गरजा, मागण्या व अडचणी व्यक्त करण्यासाठी कार्यरत असाव्यात. प्रसारमाध्यमे व इतर साधनांद्वारे जनमत व्यक्त होत असल्यास लोकशाही बळकट होते. मागील पाठांच्या आधारे लोकशाहीकरिता आणखीन काही आवश्यकतांचा तुम्ही विचार करू शकता?

तुम्हाला सामाजिक व आर्थिक अटीसुद्धा जाणून घ्यायच्या असतील. सामाजिक विकास व समान सामाजिक दर्जा, विकासाच्या समान संधी, सामाजिक सुरक्षा व कल्याण यांचा मेळ बसतो आहे ना याचीही खबरदारी लोकशाही व्यवस्थेला घ्यावी लागते. नागरिकांनी सार्वजनिक व अत्यावश्यक शिक्षणाच्या संधींचा लाभ घ्यायला हवा. त्यांना आर्थिक विकाससाधनांचा लाभ घेता यावा. आर्थिक विकासाचे फळ सर्वांना आणि विशेषत: गरीब व वंचितांना मिळायला हवे.

#### उपक्रम २३.३

भारतातील परिस्थितीचा विचार करा आणि भारतात उपलब्ध असलेल्या व उपलब्ध नसलेल्या किमान दोन राजकीय व सामाजिक आर्थिक बाबी शोधा आणि त्या खालील तक्त्यात भरा. एक उदाहरण दिलेले आहे.

| बाब | गट | उपलब्ध / उपलब्ध नाही |
|---|---|---|
| समान काम समान वेतन | सामाजिक-आर्थिक | उपलब्ध नाही |
| | | |
| | | |
| | | |

## पाठ्यांशावरील प्रश्न २३.१

१. राजकीय लोकशाहीचा अर्थ काय?

२. सामाजिक आणि वयैक्तिक संदर्भ लक्षात न घेता लोकशाहीची केलेली व्याख्या अपुरी आहे, असे तुम्हाला वाटते का? आपल्या समर्थनार्थ कारणे द्या.

३. राजकीय आणि सामाजिक लोकशाहीसाठी आवश्यक असणाऱ्या किमान दोन गोष्टी सांगा.

## २३.२ भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत देश एकजवाबदार लोकशाहीराष्ट्र म्हणून कार्यरत आहे. परदेशी राष्ट्रांनीसुद्दा याबाबतीत आपले कौतुक केले आहे. भारतीय लोकशाही हिने अनेक आव्हानांचा मुकाबला यशस्वीरीतीने केला आहे. ग्रामपंचायत सदस्यांपासून देशाच्या राष्ट्रपतीपदार्यंत आपल्याकडे खुल्या वातावरणात आणि नि:पक्षपाती निवडणूका होत आहेत. तसेच निवडणूकीनंतर होणारा सत्तावदलदेखील राज्य आणि केंद्रपातळीवर सुद्धा शांततामय मार्गाने होत आहे. भारताच्या शेजारी असलेल्या पाकिस्तान, म्यानमार आणि बांगला देशात लष्करी कटामुळे सत्तावद्दल घडून आला आहे.

कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायसंस्था यांचे कार्य व्यवस्थितरित्या चालू आहे. लोकसभा आणि विधानसभा यांचा मंत्रिमंडळावर वचक आहे दोन्ही सभागृहातील प्रश्नोत्तराच्या तासाला याची प्रचीति येते. अतिशय महत्त्वाचे म्हणजे २००५ सालचा माहिती अधिकाराचा कायदा, २००९ सालचा शिक्षणाधिकाराचा कायदा आणि यासारखे अनेक लोकाभिमुख कार्यक्रम यांनी शासनाला लोकांप्रती आणि उत्तरदायी करण्यास साहाय्य केले आहे. वर्तमानपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमे यांना पूर्ण स्वातंत्र्य आहे. आणि लोकमत तयार करण्याच्या दृष्टीने त्याचा चांगला उपयोग होत आहे. राष्ट्राची जवळजवळ सर्वच क्षेत्रात प्रगती झाली आहे आणि देश सामाजिक व आर्थिक उन्नत्तीच्या मार्गावरून जात आहे.

भारतात भाषा, संस्कृती, धर्म याबाबतीत कमालीची विविधता आहे. स्वातंत्र्य प्राप्तीचे वेळी भारत आर्थिक दृष्ट्या मागासलेला, प्रांतिक असमतोल मोठ्या प्रमाणात असलेला होता. असंख्य लोक दारिद्र्य रेषेखाली होते. निरक्षरता, बेकारी आणि लोकोपयोगी सुविधांचा अभाव होता. परंतु त्यात आज जमिनअस्मानाचा वदल झाला आहे. तरीसुद्धा समाजातील काही घटकांची अपेक्षापूर्ति झालेली नाही. भारतासमोर देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे अनेक आव्हाने उभी आहेत. त्यामुळे लोकशाहीचा मार्ग खडतर झाला आहे. यापैकी काही आव्हानांबावत पुढे चर्चा केली आहे.

### २३.२.१ निरक्षरता

स्वातंत्र्याच्या वेळी लोकांमधील निरक्षरता हा लोकशाही कारभाराच्या दृष्टिने काळजीचा विषय होता आणि अजूनही एक मोठे आव्हान आहे. यशस्वी लोकशाही कारभार आणि देशाच्या सामाजिकआर्थिक विकासासाठी लोकांची शैक्षणिक पातळी महत्त्वपूर्ण ठरते. आणि त्याहीपेक्षा मानवी प्रतिष्ठेसाठी ती

महत्त्वपूर्ण अट आहे. पण स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी औपचारिक साक्षरतेची अवस्था दयनीय होती. १९५१ साली साक्षरता दर १८.३३% होता तर महिलांमधील साक्षरता नगण्य होती. (८.९%) त्यामुळे अशी भीती होती की अनेक व्यक्ती आपली भूमिका परिणामकारकरित्या बजावू शकणार नाहीत आणि जनशक्तीचे प्रतीक असणारा मताधिकार वापरू शकणार नाहीत.

पण तुम्ही जाणता की ही शंका भारतीय मतदारांनी खोटी ठरवली. त्यातले अनेक लोक निरक्षर असूनही त्यांनी मताधिकारात समजूतदारपणा दाखवल्याने अनेकदा सत्तांतर सहजरित्या शक्य झाले. श्रीमती इंदिरा गांधींच्या नेतृत्वातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हा पक्ष १९७० च्या सुरुवातीस अत्यंत लोकप्रिय होता. पण १९७७ च्या सार्वत्रिक निवडणूकांत, आणीबाणीत (१९७५-७७) केलेल्या सत्तेच्या गैरवापरामुळे जनतेने त्यांना नाकारले व जनता पक्षाला सत्तास्थापनेची संधी दिली. प्रचंड बहुमताने निवडलेल्या १९८४ च्या राजीव गांधी सरकारला जनतेने १९८९ मध्ये बाहेरचा रस्ता दाखवला. हे राज्यातही होत आले आहे.



**चित्र २३.२ : मुलांचे शिक्षण**

साक्षरता ही केवळ लोकांना निवडणूकांत भाग घेण्यासाठी किंवा मताधिकार वापरण्यास समर्थ बनवण्यासाठी गरजेची नसते. त्याचे इतरही ध्वन्यर्थ आहेत. साक्षरता लोकांना देशातील विविध मुद्दे, प्रश्न, मागण्या आणि हितसंबंध समजून घेण्यास तसेच स्वातंत्र्य व समतेप्रती जागृत होऊन निर्वाचित प्रतिनिधी सर्वांच्या हितसंबंधांचे प्रतिनिधीत्व करतात का यासंबंधी जागरूक करते. यशस्वी लोकशाही कारभारासाठी सार्वत्रिक साक्षरता आवश्यक असते. २०११ च्या जनगणनेनुसार जरी साक्षरता दर ७४.०४% झाला असला तरी महिलांमधील प्रमाण ६५.४६% इतके आहे. याचा अर्थ देशातील एक चतुर्थांश तर महिलांमध्ये तीनपैकी एक व्यक्ती अशिक्षित आहे.

देशातील प्रत्येक लहान मुलाला शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिल्यास हा प्रश्न सुटण्यास मदत होईल. नुकताच अमलात आलेला शिक्षणाधिकाराचा कायदा हा मूलभूत हक्क म्हणून मान्य करण्यात आला आहे. यामुळे देशातील सर्व मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था होईल. अशी आपण आशा करू या.

### २३.२.२ दारिद्र्य :

भुकेल्याला मतदानाचा हक्क देण्यात अर्थ नाही. असे म्हणतात कारण त्याची प्राथमिक गरज अन्न असते. त्यामुळे दारिद्र्य हे लोकशाहीचे सर्वात मोठे दूषण आहे, हे स्पष्ट आहे. सर्व प्रकारच्या विषमता आणि वंचनांचे ते मूळ कारण आहे हे तुम्हाला पटेल. ते लोकांना आरोग्यदायी व एक परिपूर्ण आयुष्य जगण्याची संधी नाकारण्यासारखे आहे. अर्थात भारतातील दारिद्र्य जुलमी ब्रिटिश वासाहतिक राज्यापासून चालत आले पण आजही ती एक गंभीर समस्या आहे. आजही भारतातील मोठी लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली जगते. दारिद्र्य रेषा म्हणजे ज्या उत्पन्नाच्या पातळीखाली लोकांना आपल्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याच्या प्राथमिक गरजा भागवणे अशक्य असते ती उत्पन्नाची पातळी होय.

१९६० मध्ये दारिद्र्य रेषेची व्याख्या करताना शासनाने एका व्यक्तीला आवश्यक असणाऱ्या उष्मांकाचे अन्नपदार्थ खरेदी करण्यासाठी किती रक्कम लागेल याचा विचार केला होता. त्यानुसार ग्रामीण भागातील एका व्यक्तीला रोज २४०० उष्मांक देणाऱ्या व शहरी भागातील एक व्यक्तीला रोज २१०० उष्मांक देणाऱ्या अन्न पदार्थांची गरज असते. हे अन्नपदार्थ खरेदी करण्याची क्षमता असलेली व्यक्ती दारिद्र्य रेषेच्या वर आहे; असे समजण्यात येते.

१९९० मध्ये कपडे, नोकरी, निवास, शिक्षण इ. अन्नपदार्थेतर गोष्टींचा समावेश दारिद्र्यरेषेची व्याख्या ठरविताना करण्यात आला.



**चित्र २३.३ : उंच इमारती शेजारील झोपडपट्टी ऐश्वर्य आणि दारिद्र्य यांचे सहचर्य**

मानवी दारिद्र्य आणि मानवी हक्कांचा अभाव यामध्ये घनिष्ठ संबंध आहे. प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ मकबूल हक आणि अमर्त्य सेन यांनी मानवी प्रगती निर्देशांक (Human Development Index – HDI) तयार केला आहे. या निर्देशांकाच्या दृष्टिकोनातून दारिद्र्याची व्याख्या करताना त्यांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि मानवी मूलभूत हक्क यांचादेखील समावेश केला आहे.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

इ. स. २००४-२००५ या साली नियोजन आयोगाने भारतातील दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या लोकांची टक्केवारी काढली होती. त्यांच्या सर्वेक्षणानुसार भारतातील ग्रामीण भागात २८.३% शहरी भागात २५.७% इतर संपूर्ण भारतात २७.५% लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत. इ. स. २००९ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेने संपूर्ण जगाचा मानवी प्रगती निर्देशांक काढण्यासाठी एक समिती नेमली होती. समितीने १८२ देशांचा मानवी प्रगती निर्देशांक काढला त्यात भारताचा क्रमांक १३४ वा क्रमांक लागला.

समाजातील दारिद्र्यासाठी अनेक घटक कारणीभूत असतात. त्यापैकी महत्त्वाचा घटक म्हणजे मोठ्या प्रमाणावर असणारी बेरोजगारी आणि अत्यंत कमी वेतनावर काम करणारी बहुसंख्या कष्टकरी जनता ग्रामीण भागातील जनतेला नियमित आणि पुरेसे काम नसते. शहरी भागातसुद्धा सुशिक्षित बेकारांची संख्या प्रचंड आहे. वाढती लोकसंख्या ही देशाची सर्वात मोठी शक्ती असली तरी दारिद्र्यवाढीचे ते एक मुख्य कारण आहे. देशाची आर्थिक प्रगती झाली असली तरी सामाजिक अन्याय दूर होऊ शकला नाही आणि श्रीमंत आणि गरीब यांच्यामधील दरी कमी होऊ शकली नाही. त्यामुळे दारिद्र्य हे भारतीय लोकशाहीपुढील सर्वात कठीण आव्हान ठरले आहे.

### २३.२.३ लिंगभेदभाव :

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपण मुली व स्त्रीयांबाबत भेदभाव केला जातो.. आपल्या राज्यात व समाजात लिंगसमानतेचा अभाव तुम्हाला जाणवला असेल. पण लिंगसमानता ही लोकशाहीच्या आवश्यकतापैकी एक आहे हे आपण जाणतो. संविधानाने स्त्रीपुरुष समान वागणुकीची जवाबदारी राज्यावर टाकली आहे. स्त्रियांना हीन दर्जाची वागणूक दिली जाऊ नये. मूलभूत हक्क व कर्तव्ये तसेच मार्गदर्शक तत्वे ही उद्दिष्टेसुस्पष्ट करतात.



**चित्र २३.४ : मुलगी घरातली कामे करते तर मुलगा शाळेत जातो.**

पण तरी स्त्रीयांविरुद्ध भेदभाव एक वास्तव आहे. हे लिंग गुणोत्तर, बाललिंग गुणोत्तर, प्रसूति मृत्यू गुणोत्तरातून दिसते. पुरुषांच्या प्रमाणात स्त्रियांचे प्रमाण १९०१ पासून घसरतेच आहे. १९०१ मध्ये लिंग गुणोत्तर १००० पुरुषांमध्ये ९७२ स्त्रीया, असे होते. ते १९९१ मध्ये १००० : ९२७ इतके घसरले. २०११ मध्ये ते १००० : ९४० इतके आहे. २०११ च्या जनगणनेत काही राज्यांमध्ये ते अत्यल्प आढळले जसे हरियाणात १००० : ८७७ सर्वात कमी लिंग गुणोत्तर दिव-दमण १००० : ६१८ आणि दिल्ली NCT ८६६ आहे.

बाल लिंग गुणोत्तर हा अधिक गंभीर काळजीचा विषय आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात १००० मुलांमागे फक्त ९१४ मुली जन्माला येतात. हे २००१ सालच्या १००० : ९२७ पेक्षा कमी आहे. यामागे अनेक कारणे आहेत जसे, मुलाला प्राधान्य, मुलींबाबत भेदभाव, वाढते स्त्री अर्भकहत्या व भ्रूणहत्येचे प्रमाण तंत्रज्ञानाचा वापर करून महिलांना स्त्री-गर्भपात करण्यास भाग पाडले जाते. मुलींमधील अर्भक मृत्यू प्रमाण मुलांपेक्षा जास्त आहे. सन २००४-०६ च्या नमुना नोंदणी व्यवस्थेनुसार (Sample Registration system) प्रसूति मृत्यू प्रमाण एक लाख जिवंत जन्मामागे २५४ इतके मोठे आहे.

## उपक्रम २३.४

आसामची सोना खातून ही हरियाणात लग्न होऊन जाणाऱ्या वधूपैकी एक आहे. मुलाला प्राधान्य असलेल्या हरियाणात लिंग गुणोत्तर महिलांना प्रतिकूल आहे. स्त्री अर्भकहत्या व भ्रूणहत्येविरुद्ध काम करणाऱ्या Red Cross Society of India च्या अहवालानुसार हरियाणा भिवानी जिल्ह्यात किमान १०० वधू आणल्या गेल्या आहेत.

(४ मार्च २०१० च्या The Economist च्या (आंतरराष्ट्रीय) आवृत्तीतून)

वरील प्रकरण वाचून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१. आसामच्या सोना खातूनचे हरियाणात का लग्न झाले?

२. अल्प लिंग गुणोत्तर असणारी किमान तीन राज्ये शोधा.

या लोकसंख्या दर्शकांव्यतिरिक्त, सामाजिक आर्थिक प्रगतीच्या परिप्रेक्षातही हा भेदभाव स्पष्ट दिसतो. २०११ साली महिला साक्षरता दर ६५.४६% तर पुरुष साक्षरता दर ८२.१४% आहे. महिलांशी रोजगार आणि सामाजिक जीवनातील प्रतिनिधीत्वात भेदभाव होतो. पंचायत राज संस्था, नगरपालिका व परिषदांमध्ये स्त्रियांना ३३% आरक्षण देणाऱ्या ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीने स्त्रीयांच्या राजकीय सबलीकरणात मोठा वाटा उचलला. तरीही परंपरागतरित्या महिलांना समाजात दुय्यम स्थान मिळते. याने त्यांच्या सर्वच क्षेत्रातील सहभागावर बंधने येतात. हे सर्वच वर्ग व समुदायातील महिलांबाबत खरे आहे. महिला आरक्षण विधेयक (संसदेत महिलांसाठी ३३% आरक्षण) संसदेच्या दोन्ही सभागृहात महिलांचे प्रमाण कमी असतानाही परित झालेले नाही. या विधेयकाने महिलांना संसदेत अधिक प्रमाणात प्रतिनिधित्व मिळू शकेल. सर्वच पक्षांचे अश्या विधेयकाच्या आवश्यकतेबाबत एकमत असले तरी कोणीही त्याला प्राधान्य दिलेले नाही.

**तुम्हास हे माहित आहे का ?**

विहार पंचायत दुरुस्ती विधेयक २००६ ने महिलांना त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेत ५०% आरक्षण दिले आहे. पंचायत निवडणुकांमध्ये ५४% जागा महिलांनी जिंकल्या. आता राज्यात २ लाख महिला पंचायत सदस्य आहेत. हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, ओडिसा, पश्चिम बंगाल या राज्यांनीदेखीलपंचायतीमध्ये ५०% महिला आरक्षण ठेवले आहे.

## २३.२.४ जातीयवाद, सांप्रदायिकता, सांप्रदाय व धार्मिक मूलतत्त्ववाद

जातीयवाद, सांप्रदायिकता आणि धार्मिक मूलतत्ववाद या भारतीय लोकशाही प्रशासनाचे कार्य आणि स्थैर्य यावर वाईट परिणाम होतो.

अ) **जातियता :** भारतीय संस्कृतीच्या प्रारंभ काळात उदयास आलेली जात पद्धती श्रमविभागणीवर आधारित होती. परंतु कालौघात ही विभागणी विस्मृतीत जाऊन माणसाची जात जन्मावरून ठरू लागली, समाजात वावरताना तुम्हाला कधी या जात व्यवस्थेचा अनुभव आला आहे का?

जातव्यवस्थेचे अमानुष आणि पाशवी रूप म्हणजे अस्पृश्यता होय. जरी कायद्याने अस्पृश्यता नष्ट करण्यात आली असली तरी व्यवहारात मात्र अजूनही ती पाळली जाते. अस्पृश्य असणाऱ्या लोकांना म्हणजे दलितांना शिक्षण आणि सर्व सामाजिक लाभदायी योजनांपासून वंचित व्हावे लागत आहे. दलित समाज अत्यंत कष्टाचे काम करीत आहे. अस्पृश्यता लोकशाही राष्ट्रीय प्रक्रियेत नकारात्मक भूमिका पार पाडत आहे. काही क्षणिक आणि क्षुल्लक फायद्यासाठी पक्षाकडून अस्पृश्यतेचा मुद्दा ताणून घेण्यात येत आहे. लोकशाहीतील मूलभूत हक्क, भाषणस्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य निवडणुकीतील सहभाग, प्रसारमाध्यमे, वर्तमानपत्रे यामधून जाणिवपूर्वक जातीयता अस्तित्वात ठेवण्यासंबंधी प्रयत्न होत आहेत. जातियतेचा सामाजिक विषमता कायम राखण्यास हातभार लागत आहे. सामाजिक विषमता हा आपल्या देशात पूर्वापार चालत आलेला शाप आहे. अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गी य यांना पूर्वापार सामाजिक आणि आर्थिक लाभापासून वंचित राहावे लागत आहे. आपल्या समाजात असणारी प्रचंड विषमता भारतीय लोकशाहीपुढील मोठेच आव्हान आहे.

यापुढील धोक्याची घटना म्हणजे जात आणि राजकारण यांचे एकत्रीकरण म्हणजेच जातीचे राजकारण किंवा राजकारणातील जातीयता होय. सध्याच्या काळात भारतीय लोकशाहीला हे फार धोक्याचे ठरू शकते. सध्या उदारमतवादी धोरणाचे किंवा जागतिकीकरणाचे युग असले तरीसुद्धा समाजात असणारा जातींचा प्रभाव कमी झाला नाही आणि जात हा घटक राजकारणात मतदान बँक म्हणून वापरला जात आहे.

ब) **सांप्रदायिकता :** सांप्रदायिकता आणि धार्मिक मूलतत्त्ववाद या दोन्ही समस्यांनी भारतात धोकादायक स्वरूप व प्रभाव धारण केले आहे. त्यांनी आपल्या बहुधार्मिक समाजातील सहजीवनात व्यत्यय आणला आहे. तो भारताच्या राष्ट्रीय अस्मिता आणि उद्योन्मुख धर्म निरपेक्ष संस्कृतीस हानिकारक आहे. तो लोकशाही स्थैर्याला आणि मानवतावाद आणि संयुक्त

संस्कृतीच्या वैभवशाली ठेव्याला मारक आहे. बऱ्याचदा सांप्रदायिकता हा शब्द धर्म किंवा सनातनवादाला प्रतिशब्द म्हणून वापरतात हे अयोग्य आहे. धर्मपालन किंवा धार्मिक संप्रदायाशी संबंधित असणे म्हणजे सांप्रदायिकता नाही.



**आकृती २३.५ : माझा धर्म सर्वात श्रेष्ठ आहे.**

सनातनवाद सामाजिक मागासलेपण दाखवत असला तर तो म्हणजे सांप्रदायिकता नाही. वास्तविक पाहता, सांप्रदायिकता ही अशी विचारसरणी आहे. ज्यात एखाद्या धार्मिक संप्रदायाप्रती प्राथमिक गट व पाया म्हणून राजकीय निष्ठा असते. तो धर्मनिरपेक्षतावाद आणि मानवतावादाविरुद्ध आहे. धार्मिक मूलतत्ववादीमुळेच जातीय दंगली घडून येतात. धार्मिक मूलतत्त्ववाद सांप्रदायिकतावाद्यांना धर्म आणि राजकारणाचा वापर करून घेण्यास उत्तेजित करतो. नजीकच्या भूतकाळातच सांप्रदायिकता आपल्या सामाजिक व राजकीय जीवनाला धोका पोचवताना दिसली. तुम्हाला असे कोणते प्रसंग आठवतात?

क) **धार्मिक मूलतत्ववाद :** धार्मिक मूलतत्ववादामुळे जातियवादी शक्तींना राजकारण आणि धर्म यांचा स्वत:चा स्वार्थासाठी उपयोग करून घेता येतो. मूलतत्ववादी विचारसरणी धर्माच्या मूळ तत्वासमोर आणि रुढीनुसार वागण्यासंबंधी आग्रही असते. धार्मिक मूलतत्ववादी धार्मिक सुधारणांना कडाडून विरोध करतात. कारण या सुधारणा झाल्यास त्यांचा त्या जातीवर धर्मावर असलेला वचक नष्ट होईल अशी त्यांना भीति असते.

## २३.२.५ प्रांतवाद :

भारतीय लोकशाहीसुद्धा प्रांतवादाशी झगडत आली आहे. प्रांतवाद हा प्रांतिक असमानता आणि असमतोल विकासाचे फलित आहे. भारत हा धर्म, भाषा, संप्रदाय, जमाती आणि संस्कृतींची विविधता असणारा बहुल देश आहे. हे आपण जाणतो. काही विशिष्ट्य प्रादेशिक पट्ट्यात अनेक सांस्कृतिक भाषिक गट इथे केंद्रीत झाले आहेत. जरी विकास प्रक्रिया सर्व प्रांतांची प्रगती व विकासाचे उद्दिष्ट ठेवत असली तरी दरडोई उत्पन्न, लोकसंख्या, साक्षरता दर, शिक्षण व आरोग्य व्यवस्था व सेवा आणि औद्योगिक व शेती विकासाची पातळी यातील प्रादेशिक असमता अजूनही टिकून आहे. राज्या-राज्यांमध्ये

वा राज्याच्या एखाद्या भागात विषमतांचे अस्तित्त्व असणे व ते पुढे चालू राहणे या गोष्टी दुर्लक्ष, वंचना आणि भेदभावाची भावना निर्माण करतात. या परिस्थितीने प्रांतवादाला तसेच स्वतंत्र राज्याच्या, स्वायत्तता किंवा अधिक अधिकारांच्या किंवा देशापासून अलग होण्याच्या मागण्यांना जन्म दिला आहे.

भारतासारख्या विस्तीर्ण आणि बहुभाषिक देशात प्रांतवाद आणि उपप्रांतवाद स्वाभाविक आहेत. प्रादेशिक व उपप्रादेशिक हितसंबंध जपण्याला पाठिंबा देणे नेहमीच विघातक आणि अराष्ट्रीय आहे असे मानणे अयोग्य आहे. ह्या हितसंबंधांचे जेव्हा राजकीयीकरण होते किंवा अंत:स्थ राजकीय उद्दिष्टांसाठी प्रांतिक चळवळींचा वापर होतो तेव्हा खरी समस्या निर्माण होते. असा प्रांत / उपप्रांतवाद अहितकारक खंडात्मक आणि अनिष्ट आहे. सततच्या प्रांतिक असमतोलाने भारताच्या काही भागात बंडखोर चळवळींना जन्म दिला आहे. जम्मू-काश्मिर किंवा आसाममधील ULFA किंवा ईशान्येतल्या विविध गटांच्या विभक्ततेच्या मागण्या भारतीय राज्यव्यवस्थेसाठी चिंतेचा विषय आहेत.

## २३.२.६ भ्रष्टाचार :

सार्वजनिक जीवनातला भ्रष्टाचार ही भारतातील मोठी समस्या आहे, २०११ सालच्या Transparency International च्या Corruption Percction Index मध्ये भारत १८३ देशांमध्ये ९५ व्या स्थानी होता. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात; जमीर्नजुमला, आरोग्य, शिक्षण, व्यापार, उदिम, शेती, दळणवळण, पोलिस, सशस्त्र दले, धार्मिक संस्था किंवा तथाकथित अध्यात्मिक शोधाच्या ठिकाणीही तीव्र भ्रष्टाचार आहे. भ्रष्टाचार हा छुप्या मार्गाने किंवा उघडउघड तीनही स्तरावर चालू आहे. राजकीय क्षेत्र, प्रशासकीय क्षेत्र आणि खाजगी व्यापार, व्यवसाय क्षेत्र यामधील भ्रष्टाचार प्रचंड आहे. राजकारणी, प्रशासक आणि उद्योजक यामध्ये असणाऱ्या स्वार्थी संबंधामुळे भ्रष्टाचाराला वाव मिळतो. भ्रष्टाचाराच्या भस्मासुराचा शिरकाव शासनाच्या प्रत्येक खात्यात झाला आहे. न्यायसंस्थासुद्धा याला अपवाद नाही.




चित्र २३.६ :

निवडणूकीत मतदारांना प्रलोभने दाखविणे, पैसे वाटणे या गोष्टी आता जगजाहीर आहेत. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत या गोष्टी तुम्ही पाहिल्या आणि अनुभविल्या असतीलच. सध्याच्या काळात वेगवेगळ्या क्षेत्रात घडणारे घोटाळे उघडकीस येत आहेत. भ्रष्टाचार हा राजकीय अस्थैर्य आणि प्रशासनाचा ऱ्हास करणारा महत्वाचा घटक आहे. प्रशासनाचे अस्तित्व आणि स्वामित्व यांना आव्हान देणारा भ्रष्टाचार हा प्रमुख शत्रू आहे. आपण सर्व नागरिकांनी कोणत्याही स्तरावर चालणारा भ्रष्टाचार खपवून घेणार नाही. भ्रष्टाचार करणार नाही, करू देणार नाही अशी शपथ घेतली पाहिजे.

## २३.२.७ राजकारणाचे गुन्हेगारीकरण :

सध्याच्या काळात आपल्या देशातील राजकारणाचे गुन्हेगारीकरण हा अत्यंत चिंतेचा विषय झाला आहे. राजकारणातील काही व्यक्तींचा लोकशाही मूल्ये आणि लोकशाही प्रक्रिया यावर विश्वास नसावा, त्यामुळे या व्यक्ती अवैध, अनैतिक आणि हिंसाचाराचा मार्ग वापरून निवडणूका जिंकण्याचा प्रयत्न करतात. राजकारणामधील ही अत्यंत घातक प्रवृत्ती असून या प्रवृत्तीला ताबडतोब आळा घातलाच पाहिजे.

राजकारणाचे गुन्हेगारीकरण हा लोकशाही मूल्यांना फार मोठा धोका आहे. आणि त्याला लोकशाहीमध्ये अजिबात वाटा मिळता कामा नये. गुन्हेगारी प्रवृत्ती रोखून आणि लोकशाही मूल्ये अमलात आणूनच लोकशाहीला बळकटी येईल.

नुकतीच न्याय संस्थांनीही राजकारणातील गुन्हेगारी प्रवृत्तींची दखल घेतली आहे. आणि ही प्रवृत्ती रोखण्यासाठी प्रवृत्तींची दखल गेतली आहे. आणि ही प्रवृत्ती रोखण्यासाठी कडक, उपाययोजनांची शिफारस केली आहे. केंद्र शासन आणि राज्य शासनांनीही याबाबतीत लक्ष घातले आहे. ही खरोखरच सुदृढ लोकशाहीच्या दृष्टीने सुदैवाची बाब आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाहीप्रधान देश आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना निवडणूक लढविण्यापासून परावृत्त करण्याचे काम आपण करणे आवश्यक आहे.

## २३.२.८ राजकिय हिंसाचार

हिंसेशी आपला परिचय आहेच, पण राजकीय साध्यासाठी हिंसेचा वापर शासन व्यवस्थेच्या अस्तित्वाला घातक आहे. भारतात आपण अनेक स्वरूपाचा हिंसाचार पाहतो. सांप्रदायिक, जातीय व राजकीय हिंसाचाराने गंभीर प्रमाण धारण केले आहे. राजकीय, धार्मिक व आर्थिक कारणांसाठी गुंतलेल्या हितसंबंधातून सांप्रदायिक दंगली घडवून आणल्या जातात. विविध प्रकारचा जातीय हिंसांचार वाढतो आहे. शेतकी विकास, जमिनदारी व्यवस्थेचा बीमोड, आणि हरित व धवलक्रांती होऊनही समाजात शक्तिशाली सरंजामी घटक कार्यरत आहेत. उच्च आणि मध्यम जातीत मोठी स्पर्धा वाढते आहे. ज्यातून अनेकदा हिंसाचारात रुपांतरीत होणारी तीव्र राजकीय सत्तास्पर्धा निर्माण झाली आहे.

जातीय हिंसेचा आणखी एक पैलू म्हणजे दलित आणि कनिष्ठ जातीत विशेषत: अनुसूचित व मागास जातीत निर्माण होणारी जाणीव आणि अधिकारांचे प्रतिपादनाविरुद्ध उच्च जातींची तीव्र प्रतिक्रिया. निवडणूकांच्यावेळी हिंसेचा वापर मतदार जमवण्यासाठी किंवा त्यांनी मतदान करू नये यासाठी होतो. स्वतंत्र राज्याच्या पुनर्रचनेच्या किंवा सीमेच्या पुनर्जुळणीच्या मागणीशी हिंसा जोडली जाते. औद्योगिक संप, शेतकरी चळवळी आणि विद्यार्थी आंदोलनांतही हिंसाचार वापरला जातो आहे.



**आकृती २३.७ : हिंसक होणारा निषेध**

## पाठ्यांशावरील प्रश्न २३.२

१. निरक्षरता, विषमता आणि दारिद्र्य भारतीय लोकशाहीच्या कार्यावर विपरीत परिणाम कसा करतात?

२. लोकप्रिय मनोरंजन वाहिन्या किंवा चित्रपटांनी स्त्रियांचे केलेले चित्रण तुम्हाला लिंग भेदभावात्मक वाटते का? उदाहरणासह पटवून द्या.

३. जातीवाद आणि सांप्रदायिकता आपल्या दैनंदिन जीवनावर आणि भारतीय लोकशाहीवर कसा प्रभाव टाकतात याची दोन उदाहरणे द्या.

४. जर प्रांतवाद आणि उपप्रांतवाद भारतीय लोकशाहीचा अविभाज्य घटक असतील तर त्यांना आव्हान का मानले आहे?

५. भारतात राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाची कारणे कोणती?

६. राजकीय हिंसाचारात भारतात वाढ होण्याची कारणे कोणती?

## २३.३ सुधारणेचे उपाय :

वरील चर्चेवरून हे स्पष्ट होते की भारतीय लोकशाहीसमोरील या आव्हानांवर काही उपाय करण्याची आवश्यकता आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी आपण या आव्हानांबाबत पूर्णत: अनभिज्ञ होतो असे नाही. खरे तर स्वातंत्र्यलढ्याचे नेते आणि घटनाकार यांना या सर्वाची काळजी होतीच. त्यांनी या

समस्यांची काळजी घेण्यासाठी अनेक घटनात्मक तरतुदी केल्या आहेत. अनेक शासनकर्त्यांनीही यांचा सामना करण्यासाठी अनेक उपाय केले पण अजूनही बरेच काही करण्याची आवश्यकता आहे. सरकार, राजकीय पक्ष आणि इतर सामाजिकराजकीय संघटना आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नागरिकांनी या सर्व आव्हानाविरुद्धच्या लढ्यात आपली भूमिका बजवायला हवी. काही लक्षणीय उपाय पुढीलप्रमाणे

## २३.३.१ सार्वत्रिक साक्षरता (सर्वांसाठी शिक्षण)

लोकशाहीच्या यशासाठी शिक्षणाचे महत्त्व आणि गरज दोन्हीची दखल घटनाकारांनी घेतली होती. त्यामुळेच १४ वर्षापर्यंतच्या सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण ही भारतात घटनात्मक जबाबदारी आहे हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्रसरकार व सर्व राज्य सरकारेसुद्धा प्रयत्नशील आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ चा पाठपुरावा म्हणून निरक्षरता घालवण्यासाठीच्या कार्यक्रमांची आणखी व अंमलबजावणी करण्यासाठी १९८८ साली राष्ट्रीय साक्षरता अभियान स्थापन (सर्व शिक्षा अभियान) केले गेले. पण सार्वजनिक साक्षरतेचे उद्दिष्ट अजून साद्य व्हायचे आहे. सध्या 'साक्षर भारत' नावाचा एक देशव्यापी कार्यक्रम राबवला जातो आहे. १५ वर्षापुढील वयोगटातील अशिक्षित लोकांना अक्षरओळख आणि अंकओळख करून देणे आणि सामान्य साक्षरतेपलीकडे जाऊन औपचारिक शैक्षणिक व्यवस्थेला समान असे मूल्य मिळवून देणे हे त्याचे उद्देश आहेत. सर्व शिक्षा अभियान हा अग्रेसर कार्यक्रम ६ ते १४ वयोगटातील मुलांमधे प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी आहे. त्याव्यतिरिक्त सन २००९ मध्ये संसदेने शिक्षणाचा अधिकार कायदा पारित केला ज्यामुळे ६ ते १४ वयातल्या मुलांसाठी प्राथमिक शिक्षण हा मूलभूत अधिकार झाला आहे.




## २३.३.२ दारिद्र्य निर्मूलन

१९७० पासून दारिद्र्य निर्मूलनासाठी अनेक कार्यक्रम राबवले गेले. ते दोन गटात विभागले जातात.

१. काही कार्यक्रम त्यांच्या लाभार्थ्यांना उत्पादक संसाधने किंवा कौशल्ये प्रदान करते जेणेकरून ते स्वत:साठी रोजगार मिळवून अधिक उत्पन्न घेतील आणि दारिद्र्य रेषेच्या वरती येतील.

२. गरीब व भूमिहीनांना तात्पुरता रोजगार मिळवून देणारे कार्यक्रम

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

१९९९ साली सुवर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना ही (SGSY) ग्रामीण भागात Micro Enterprise Development साठीचा सर्वकष कार्यक्रम म्हणून बनविली गेली. तिचा भर विशेषत्वाने ग्रामीण गरिबांना स्व-सहाय्य गटात संघटित करणे, क्षमता-बांधणी, उपक्रम गटांचे नियोजन, पायाभूत सुविधा पुरवणे, तंत्रज्ञान, कर्ज व बाजार साखळ्या तयार करणे इ. वर होता. या कार्यक्रमाचा अनेक गरिबांवर चांगला परिणाम झाला. उदाहरणार्थ तामिळनाडूतील धर्मपुरी जिल्ह्यातील माथुर या गावात एका बिगर राजकीय संस्थेने १00 महिलांना फळ-प्रक्रियेचे प्रशिक्षण दिले. (SGSY) ने दिलेल्या मदतीतून त्यांनी सत्यमूर्ती महालिर मन्दरम् नावाचे एक फळ प्रक्रिया केंद्र मे २000 मधे सुरू केले. या केंद्रातून फळांचा गर, जाम, तयार पेये आणि लोणची बनतात. त्या गावच्या सदस्यांचा आर्थिक दर्जा वाढविला. त्यांना अधिक जागरुक केले तसेच त्या सरकारी योजना, शिबीरे आणि उपक्रमांमध्ये सहभागी होतात. त्या गावच्या मूलभूत सुविधा आणि त्या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी सदस्य कार्यरत असतात.

जवाहर ग्राम समृद्धी योजना (JSGY) ही ग्रामीण भागात आर्थिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर जास्त भर देते, रोजगार निर्मिती हा योजनेचा दुय्यम उद्देश असतो. हा कार्यक्रम ग्रामपंचायततींद्वारा राववला जातो, या योजनेने आत्तापर्यंत २७ कोटी मनुष्य दिवसांइतका रोजगार निर्माण केला. रोजगार हमी योजना (EAS) १,७७८ दुष्काळप्रवण, वाळवंटी, दुर्गम प्रदेशांना सामावते. शेतीचे काम कमी असताना रोजगार पुरवठ्यासाठी रोजगार हमी योजना (EAS) तयार करण्यात आली. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायदा (MNREGA) ग्रामीण भागातल्या लोकांची ज्यांच्या घरातील प्रौढ सदस्य बिगरकौशल्याचे शारीरिक काम करण्यास तयार असतील अशांना एक आर्थिक वर्षात १00 दिवसांचा रोजगार पुरवते.

### २३.३.३ लिंगभेद संपवणे :

जर स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, राजकीय विकासाच्या प्रक्रियांमध्ये सर्वतोपरी सामावून घेतले नाही तर लोकशाहीचे लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी हे उद्दिष्ट साध्य होऊ शकणार नाही. म्हणूनच संविधानिक तरतुदीव्यतिरिक्त अनेक कायदे लागू केले, धोरणे निर्माण झाली व राववली गेली, तसेच संस्थात्मक सुधारणा केल्या गेल्या. १९९३ मध्ये महिलांच्या सबलीकरणासाठी ७३ वी आणि ७४ वी घटनादुरुस्ती मैलाचा राजकीय दगड ठरल्या या घटनादुरुस्तींनी पंचायत राज संस्थांमध्ये नगरपालीका व परिषदांमध्ये महिलांसाठी एक तृतीयांश जागा राखीव ठेवल्या. २00१ मध्ये स्विकृत केलेल्या राष्ट्रीय महिला सबलीकरण धोरणाचे व्यापक ध्येय महिलांमध्ये प्रगती उन्नती आणि सबलीकरण घडवून आणणे असे आहे. ते साध्य करण्यासाठी अजून खूप काही करावे लागणार आहे.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

राष्ट्रीय महिला सबलीकरण धोरण २००१ ची ध्येय व उद्दिष्टे

या धोरणाचे ध्येय महिलांमध्ये प्रगती, उन्नती आणि सबलीकरण घडवून आणणे असे आहे. त्याची निश्चित उद्दिष्टे पुढीलप्रमाणे,

१. सकारात्मक आर्थिक व सामाजिक धोरणांतून महिलांना त्यांची कौशल्ये ओळखून पूर्ण विकास करता येईल असे वातावरण निर्माण करणे.

२. राष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभागाची समान संधी.

३. स्वास्थ्य सुविधा, सर्व पातळीवर दर्जेदार शिक्षण, करिअर आणि औद्योगिक मार्गदर्शन, रोजगार, समान परतावा, रोजगारातील सुरक्षा आणि स्वास्थ सामाजिक सुरक्षा आणि सार्व जनिक पदांचा समान वापर करण्याची संधी

४. महिलांविरुद्धच्या सर्व प्रकारचे भेदभाव नष्ट करण्यासाठी कायदे व्यवस्था सबल करणे.

५. महिला व मुलींविरुद्धच्या सर्व भेदभाव आणि हिंसाचाराचा नायनाट.

### २३.३.४ प्रादेशिक असमतोल दूर करणे :

प्रादेशिक असमतोलावर उपाय करणे हे भारताच्या नियोजन प्रक्रियेचे महत्त्वपूर्ण अंग राहिले आहे. तो दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तसेच राज्यांतर्गत प्रादेशिक असमानता दूर करण्यासाठी राज्यनिहाय तसेच अशा प्रदेशांच्या मागासपणाचे विशिष्ट पैलूंवर भर देणारे अनेक केंद्रपुरस्कृत कार्यक्रम गेल्या दोनतीन दशकांपासून सुरू आहेत. तुमच्या भागात सुरू असलेले असे कोणते कार्यक्रम तुम्हाला माहीत आहेत? काही मोठे कार्यक्रम असे; (१) जमात विकास कार्यक्रम (२) डोंगरी प्रदेश विकास कार्यक्रम (३) सीमावर्ती प्रदेश विकास कार्यक्रम (४) पश्चिम घाट विकास कार्यक्रम (५) दुष्काळप्रवण प्रदेश विकास कार्यक्रम (६) वाळवंट विकास कार्यक्रम

ईशान्येतील राज्यांच्या विकासासाठी प्रत्येक कार्यक्रम / योजनेतील काही निधी वेगळा राखीव ठेवला जातो.

मागास प्रदेशांच्या विकासाची जबाबदारी राष्ट्रीय असली तरी विकास हा स्थानिक नेतृत्वावर अवलंबून असतो. स्थानिक राजकीय, प्रशासकीय आणि बुद्धीजीवी नेतृत्त्व जोवर जनसामान्यांबरोबर समान वाटपाचा आग्रह धरून प्रगतीचा विचार करत नाही तोपर्यंत फलित मिळणे अवघड आहे. साधनांची / सामग्रीची कमतरता हा महत्वाचा मुद्दा नाही तर त्याचा समाजाला उपयुक्त वापर कसा करता येईल, हा महत्वाचा मुद्दा आहे.

### २३.३.५ प्रशासकीय आणि न्यायव्यवस्थेतील सुधारणा

वरील सर्व उपाययोजनांचे यश प्रशासनाच्या परिणामकारक कारभारावर आणि न्यायालयाच्या स्वातंत्र्य व सचोटीवर मुख्यत्वे अवलंबून आहे. परंतु या बाबतीत अजून पुष्कळ काम बाकी आहे. भारतीय

लोकप्रशासनाचे वर्तन गेल्या काही वर्षात लोकांच्या डोळ्यावर आले आहे. तीव्र भ्रष्टाचार, अकार्यक्षता, वाया जाण्याचे प्रमाण, आणि नागरिकांच्या मागण्यांप्रती बेजबाबदारपणा हे प्रशासनाचे काही प्रमुख दोष आहेत. भारतीय न्यायसंस्थेने आपले स्वातंत्र्य अनेकदा दर्शवून दिले आहे. पण काही गंभीर समस्या तरीही राहतात. जसे (१) संथ निर्णयप्रक्रिया आणि अनिर्णित खटल्यांच्या संख्येत वाढ (२) फौजदारी खटल्यांतील शिक्षेची अल्प टक्केवारी

स्वातंत्र्यापासून प्रशासकीय सुधारणा हा महत्त्वाचा कार्यक्रम राहिला आहे. त्यासाठी अनेक समित्या व आयोग नेमले गेले. पण बदलण्याविषयी नोकरशाहीची उदासीनता संपूर्ण सुधारणेला बाधक ठरते. विविध आयोग व समितींच्या शिफारसी पुढील गोष्टींवर भर देतात. (१) प्रशासन अधिक उत्तरदायी व नागरिकाभिमुख बनवणे. (२) दर्जेदार प्रशासनासाठी क्षमता बांधणी (३) लोकसहभाग, विकेंद्रीकरण आणि सत्ता इतरांना सुपूर्द करणे याचा पुरस्कार करण्यास प्रशासनाला उद्युक्त करणे. (४) प्रशासकीय निर्णयप्रक्रिया पारदर्शक करणे (५) सार्वजनिक सेवांचा दर्जा आणि दृढता वाढवणे. (६) प्रशासनात मूल्ये रुजवणे. (७) ई प्रशासनासाठी मानसिकता तयार करणे.

न्यायाच्या बाबतीतील सुधारणादेखील दीर्घ काळापासून कळीचा मुद्दा ठरल्या आहेत. त्यासाठी अनेकदा अनेक शिफारसी सुचवल्या गेल्या. त्यामधील मुख्य मुद्दे असे (अ) नियम व प्रक्रिया सुलभ करणे. (ब) कालबाह्य कायदे रद्द करणे. (क) न्यायाधीश : लोकसंख्या गुणोत्तर वाढवणे (ड) रिक्त पदांची समयबद्ध भरती (इ) न्यायाधीशांची नियुक्ती, बढती, बदली यात पारदर्शकता (फ) न्यायिक उत्तरदायित्त्व (ग) न्यायालयीन कामकाजात पारदर्शकता आणणे.

### २३.२.६ शाश्वत विकास (आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय)

शाश्वत विकास करत असताना भारतीय लोकशाही सर्व आव्हानांचा सामना करू शकते. वर्तमान आणि भविष्यात लाखो लोकांच्या प्राथमिक गरजा लक्षात घेतल्याखेरीज तयार केलेला विकास आराखडा लोकशाहीसाठी पोषक असू शकत नाही. विकास हा मानवकेंद्री आणि बहुतांच्या जीवनमानात गुणात्मक वाढ करणारा असला पाहिजे त्याचा भर हा दारिद्र्य, दुर्लक्ष, भेदभाव, रोगराई आणि बेरोजगारी निर्मूलनावर असायला हवा. विकास प्रक्रियेने शाश्वत आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय प्रगतीवर लक्ष केंदित करायला हवे.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

शाश्वत विकास हा संसाधन वापराचा असा नमुना आहे ज्यात भावी पिढ्यांनासुद्धा त्यांच्या मानवी गरजा सहज भागवता येतील अशा पद्धतीने पर्यावरणाचे रक्षण करत वर्तमानात संसाधने वापरली जातात. शाश्वत विकास ही संज्ञा १९८७ साली बर्टलँड आयोगाने तयार केली आणि ही सतत उद्धृत केली जाणारी व्याख्या म्हणजे भावी पिढ्यांच्या गरजपूर्तीच्या क्षमतांशी तडजोड न करता वर्तमानात गरजा भागवणे म्हणजे शाश्वत विकास होय.

## पाठ्यांशावरील प्रश्न २३.३

१. सार्वजनिक साक्षरता, दारिद्र्य निर्मूलन आणि लिंगभेद निवारणासाठी भारतात कोणते उपाय अवलंबले जात आहेत?

२. भारतातील प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न सोडवण्यातले टप्पे कोणते? चर्चा करा.

३. प्रशासकीय आणि न्यायिक सुधारणा करण्यासाठी कोणते उपाय योजावे लागतील?

४. शाश्वत विकास म्हणजे काय? तो भारतीय लोकशाही कशी सबल करेल?

## २३.४ लोकशाहीत नागरिकांची भूमिका

भारताचे नागरिक म्हणून आपण लोकशाहीतील नागरिकांच्या भूमिकेची कदर करतो का? असे मानतात की सरकार त्या लोकांवर राज्य करते जे त्याचा आदर करतात व आज्ञा पाळतात. ते लोक राज्य करवून घेण्यासाठीच असतात. पण लोकशाहीत असे नसते, नाही का? भारतासारख्या लोकशाही व्यवस्थेत लोक तटस्थ राहू शकत नाहीत आणि त्यांनी तसे राहता कामा नये. लोकशाही तेव्हाच यशस्वी आणि गतिमान होऊ शकत जेव्हा लोक स्वातंत्र्य, समता, धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय, उत्तरदायित्व आणि सर्वांसाठी समान आदर अशी मूल्ये आपल्या विचार आणि वर्तनात आणू शकतील. त्यांच्या अभिप्रेत भूमिकेच्या संधींची त्यांनी कदर केली पाहिजे आणि लोकशाहीचे ध्येय साध्य करण्यासाठी झटले पाहिजे.

### २३.४.१ नागरिकांच्या भूमिकेचे मूल्यमापन

लोकशाही नागरिक म्हणून भूमिका बजावण्याच्या संधी सर्वच लोकशाहीत उपलब्ध असतात. पण वेगळ्यावेगळ्या लोकशाही व्यवस्थेत त्यात थोडेफार बदल होतात. प्रदीर्घ वसाहतिक राज्यानंतर भारतात आधुनिक लोकशाही खऱ्या अर्थाने सुरू झाली. १९४७ मध्ये स्वातंत्र्यानंतर लगेच जरी भारतीय लोकशाही व्यवस्था सुरू झाली असली तरी त्याचे सामाजिक सांस्कृतिक वातावरण लोकशाही संस्कृतीशी मिळतेजुळते नाही. भारत हा खरोखर एक बहुलताप्रधान देश आहे. त्यात अजूनही पारंपरिक गुणधर्म दिसून येतात. दुसरीकडे तो आधुनिक लोकशाहीची मूल्ये आत्मसात करण्याचा प्रयत्न करत आहे. अजूनही अनेकांना असे वाटते की शासनाने राज्यकारभार व आपल्यासाठी इतर सर्व काही करावे आणि जर अपेक्षित पद्धतीने गोष्टी घडत नसतील तर सरकारच दोषी आहे. पण तुम्ही जाणता की भारतात सरकार लोकनिर्वाचित प्रतिनिधी चालवतात. त्याअर्थी स्थानिक, प्रादेशिक व राष्ट्रीय पातळीवर शासन कसे चालते याची जबाबदारी आपली सर्वांची आहे. म्हणजेच प्रत्येक नागरिकाने यात निर्णायक भूमिका बजावली पाहिजे आणि त्यासाठीच्या प्रत्येक संधीचा लाभ घेतला पाहिजे. आपण तसे करतो का? खालील संधीचा आढावा घेऊया.

#### अ) सहभाग :

लोकशाहीत नागरिकांची प्रमुख भूमिका ही सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची असते. यासाठीची सर्वात चांगली संधी म्हणजे निवडणूकांदरम्यान मताधिकाराचा वापर करणे. मतदान करण्यापूर्वी प्रत्येक

पक्ष व उमेदवाराचे म्हणणे ऐकून त्यावर विचारपूर्वक निर्णय घेतला पाहिजे. आपल्याकडील मतदानाची टक्केवारी बरीच कमी असते. निवडणूक आयोग लोकांना निवडणूकीतील सहभागाचे महत्व पटवून देण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करत आहे.

लोकशाही राज्यात सहभाग हा निवडणुकांपुरता सीमित नसतो. सहभागाचा एक महत्त्वाचा प्रकार म्हणजे राजकीय पक्ष किंवा नागरी समाज संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बिगर राजकीय संस्थांचे सदस्यत्त्व. पत्करणे या संघटना विविध गटांचे विविध हितसंबंधांचे प्रतिनिधीत्व करतात. जसे; स्त्रिया, विद्यार्थी, शेतकरी, कामगार, डॉक्टर, शिक्षक, व्यावसायिक, धार्मिक लोक, मानवाधिकार कार्य कर्ते इ. अशा संघटना लोकांमध्ये विविध मुद्यासंबंधात जागृती करतात.

### ब) व्यवस्था उत्तरदायी बनवणे :

नागरिकांच्या दृष्टीने फक्त राजकीय प्रक्रियेत सहभाग पुरेसा नाही. नागरिकांनी लोकशाही अधिक जबाबदार आणि उत्तरदायी बनवली पाहिजे. भारतीय घटनेनुसार कार्यकारी मंडळ विधीमंडळाला जबाबदार असते परंतु संसद, राज्य विधीमंडळ, नागरी शासनसंस्था आणि पंचायत व्यवस्थेतील प्रतिनिधींच्या उत्तरदायित्वाची जबाबदारी नागरिकांनी घ्यायची असते. आपली भूमिका परिणामकारकरित्या निभावण्यासाठी माहिती अधिकाराचा कायदा २००५ ने पुरवलेली साधने उपयुक्त ठरतात. सार्वजनिक मुद्यांबद्दल माहिती असणे, राजकीय नेतृत्व आणि प्रतिनिधी अधिकारांचा वापर कसा करतात यावर लक्ष ठेवण्याचे लोकांवर बंधन आहे, तसेच त्यांनी मतप्रदर्शन केले पाहिजे. सरकार वचनपालन करत नाही असे आढळल्यास नागरिक ते प्रसारमाध्यमातून सांगू शकतात. तसेच सरकारला शिफारशी व मागण्या करू शकतात. तरीही शासनाला अपयश आल्यास नागरिक निषेध नोंदवू शकतात. शांततामय सत्याग्रह, कायदेभंग, चळवळ किंवा असहकार करून सरकारला उत्तरदायी बनवू शकतात.

### क) कर्तव्यांची पूर्तता :

नागरिकत्व म्हणजे मतदान करणे आणि यंत्रणेला उत्तरदायी बनवण्यापेक्षा अधिक काहीतरी आहे हे आपल्याला समजले पाहिजे. बऱ्याच लोकांना लोकशाही म्हणजे जिथे काहीही करण्याची मुभा आहे असे वाटते. प्रत्येकाला स्वत:च्या इच्छेप्रमाणे कृती करण्याचे स्वातंत्र्य आहे. यातून बऱ्याचदा गोंधळ निर्माण होऊन समाजाची स्थिती सुधारण्योवजी ती ढासळते. त्यामुळे ती लोकशाही उद्दिष्टांच्या विरुद्ध दिशेने जाते. नागरिकाने हे स्विकारले पाहिजे की अनिर्बंध स्वातंत्र्य मिळू शकत नाही. तुम्हाला काहीही करण्याचे स्वातंत्र्य असले तर ही जबाबदारीसुद्धा आहे की तुमची कृती इतरांच्या हक्कावर गदा आणत नाही ना हे पाहणे अत्यावश्यक आहे.

## २३.५ सुधारणा उपाय अमलात आणण्यासाठी कृतीशील भूमिका

लोकशाही चालवायची असेल तर नागरिकांचा सहभाग असणे अत्यावश्यक आहे. ते कृतीशील भूमिका बजावतील तेव्हाच आधी चर्चा केलेले सुधारणा उपाय अंमलात येतील. त्यांनी कायद्याचा आदर आणि हिंसेचा धिक्कार केला पाहिजे. प्रत्येक नागरिकाने त्याच्या / तिच्यासह नागरिकांच्या अधिकारांचा आणि मानवी प्रतिष्ठेचा आदर केला पाहिजे. राजकीय विरोधकांची मते वेगळी असली तरी त्यांना अनिष्ट मानता कामा नये. सरकारी निर्णयांबाबत प्रश्न विचारावे पण त्याचा अधिकारपण नाकारू

नये. प्रत्येक गटाला स्वत:ची संस्कृती आचरणाचा तसेच त्याच्या कार्यक्रमांवर काही प्रमाणात नियंत्रणाचा अधिकार आहे परंतु त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की ते एक बहुल समाजाचे आणि लोकशाही देशाचे घटक आहेत.

स्वत:चे मत मांडताना इतरांचे ज्यांच्याशी विरोधी विचारही ऐकले पाहिजेत. लोकशाहीत प्रत्येकाला हवी ती प्रत्येक गोष्ट मिळवणे अशक्य असते हे लक्षात ठेवा. लोकशाहीत परस्पर सहकार्य गरजेचे असते. विविध हितसंबंधी गटांनी चर्चा आणि वाटाघाटींची तयारी दाखवायला हवी. एखाद्या गटाला कायम न ऐकता दूर ठेवले गेले तर तो संताप आणि असंतोषाने लोकशाही विरोधी बनू शकतो. शांततामय मार्गाने सहभाग आणि इतरांच्या मताचा आदर करू इच्छिणाऱ्या प्रत्येकाला राजकारभारात मत मांडता आले पाहिजे.

नागरिकांनी आपले मत ठामपणे मांडणेसुद्धा गरजेचे असते. कारण तसे न करणे म्हणजे आपण जो निर्णय अयोग्य मानतो त्याच्याशी सहमत होण्यासारखे आहे.उपक्रम २३.२ मध्ये सुनीलच्या घरच्यांनी कुटुंबप्रमुखाच्या निर्णयाविरुद्ध आपले मत ठामपणे मांडले नाही हे तुम्ही पाहिलेच.

## उपक्रम २३.५

लोकशाहीमध्ये नागरिकाच्या काय भूमिका असतात ते पाहिल्यावर आता तुम्ही स्वत: किती लोकशाहीवादी आहात हे जाणून घेणे रोचक ठरेल.

खाली काही विधाने दिली आहेत ती योग्य की अयोग्य ते सांगा.

| अ. क्र. | विधान | योग्य /अयोग्य |
|---|---|---|
| १ | सरकारला उत्तरदायी बनविण्यासाठी २००५ चा माहिती अधिकार कायदा परिणामकारक साधत आहे. | |
| २ | एखादी व्यक्ती कोणत्याही सामाजिक आर्थिक स्तरातील असली तरी आपल्या समाजात तिला समान वागणूक दिली जाते. | |
| ३ | तुमच्या कुटुंबात स्त्रिया व मुलींना, पुरुष व मुलांच्या समान मानले जात नाही. | |
| ४ | तुम्ही इतरांच्या अधिकारांवर अतिक्रमण होईल असे वागू नये असे मानता. | |
| ५ | स्त्रिया, अनुसूचित जाती व जमातीच्या सदस्यांसाठी आरक्षणाची व्यवस्था भारतीय लोकशाही व्यवस्थेसाठी चांगली नाही. | |

## पाठ्यांशावरील प्रश्न २३.४

१. नागरिकांचा लोकशाही प्रक्रियेतील सहभाग म्हणजे काय?

२. सामान्य नागरिकांना सरकारला उत्तरदायी बनवण्यासाठी उपलब्ध असलेली विविध साधने / मंच कोणते?

**३. रिकाम्या जागा भरा.**

अ) तुम्हाला काहीही गोष्टी करण्याचा अधिकार असेल तर, इतरांच्या ......... वर गदा येत नाही याची ........ घ्यावी.

ब) नागरिकांनी .......... चा आदर आणि .......... चा धिक्कार केला पाहिजे.

क) प्रत्येक गटाला आपली ............... आचरणात आणण्याचा अधिकार आहे.

ड) जेव्हा एखादा नागरिक आपले ........... मांडतो, तेव्हा त्याने इतरांचे ............. ऐकले पाहिजे.

## आपण काय शिकलो?

- लोकशाही ही एक शासनपद्धती आहे ज्यात सर्वोच्च सत्ता लोकांकडे असते आणि नियमित निवडणुकांचा अंतर्भाव असलेल्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रतिनिधीत्वाच्या पद्धतीतून ते तिचा वापर करतात. लोकशाहीची व्याख्या केवळ राजकीय दृष्टिकोनातून नव्हे तर, सामाजिक किंवा व्यक्तीच्या संदर्भातही केली जाते.
- एखादी व्यवस्था जेव्हा काही विशिष्ट राजकीय, सामाजिक, आर्थिक अटींची पूर्तता करते. तेव्हाच तिला खरी आणि व्यापक तसेच एक यशस्वी कार्यरत लोकशाही म्हणता येते.
- भारतीय लोकशाहीने गेल्या काळात या अनेक अटी पूर्ण केल्या आहेत. पण तिच्यासमोर अनेक आव्हाने आहेत समाजात काही विकृती रुजल्या आहेत ज्या तिच्या भविष्याला धोका उत्पन्न करतील.
- दारिद्र्य, लिंगभेद, जातीवाद, सांप्रदायिकता, धार्मिक मूलतत्त्ववाद, प्रादेशिकवाद, भ्रष्टाचार, गुन्हेगारीकरण, राजकीय हिंसाचार आणि बंडखोरी ही काही प्रमुख आव्हाने हाताळली गेली पाहिजेत.
- भारतीय लोकशाहीपुढील आव्हानांचा सामना करण्यासाठी आवश्यक सुधारणा उपायांचा पुढील मुद्यांवर अधिक भर आहे, सार्वत्रिक साक्षरता, म्हणजेच सर्वांसाठी शिक्षण, दारिद्र्य,

निर्मूलन, लिंगभेद नाहीसा करणे, प्रादेशिक असमतोलांचे निराकरण, प्रशासकीय व न्यायिक सुधारणा आणि सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय शाश्वत विकास.

❖ मात्र, भारतीय लोकशाही तेव्हाच यशस्वी आणि गतिशील होऊ शकेल जेव्हा तिच्या नागरिकात विचार व वर्तनात समता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, उत्तरदायित्व आणि सर्वांप्रती आदर ही मूल्ये दिसून येतील. त्यांच्या मानसिकता, विचार आणि वर्तन लोकशाहीसाठीच्या आवश्यक अटींशी मिळतेजुळते असणे आवश्यक आहे. त्यांच्या अभिप्रेत भूमिकांसाठी उपलब्ध संधींची त्यांनी कदर कदर केली पाहिजे, जसे; सहभाग, व्यवस्था अधिक उत्तरदायी बनवणे, लोकशाहीची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कर्तव्यपूर्ती आणि कृतीशील भूमिका बजावणे

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. लोकशाहीचा अर्थ स्पष्ट करा. लोकशाहीची व्याख्या केवळ राजकीय संदर्भात केल्यास ती व्यापक होऊ शकत नाही असे तुम्हाला का वाटते?

२. एखाद्या व्यवस्थेला खऱ्या अर्थाने लोकशाहीवादी बनवणाऱ्या आवश्यक अटी कोणत्या?

३. भारतीय लोकशाहीपुढील महत्त्वाची आव्हाने कोणती? ही आव्हाने एक परिणामकारक लोकशाही व्यवस्था उभारण्यासाठी संधी का आहे ते स्पष्ट करा.

४. भारतातील निषेधाच्या आणि हिंसाचाराच्या प्रवृत्तीचे समीक्षण करा. निषेधाचे हिंसक चळवळीत रुपांतर का होते?

५. भारतीय लोकशाहीपुढील आव्हानांचा सामना करण्यासाठी महत्त्वाच्या सुधारणा उपाययोजना कोणत्या?

६. भारीतय लोकशाहीत नागरिकांच्या अभिप्रेत भूमिकांची चर्चा करा.

७. खऱ्या अर्थाने भारतीय नागरिक होण्यासाठी एक व्यक्तीत कोणते गुण असले पाहिजेत?

८. चांगल्या नागरिकांचे काही गुण सांगा.

## पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे

### २३.१

१. लोकशाही एक अशी शासनपद्धती आहे ज्यात सर्वोच्च सत्ता लोकांकडे असते आणि नियमित निवडणूकांचा अंतर्भाव असलेल्या प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष प्रतिनिधीत्वाच्या पद्दतीतून हे त्याचा वापर करतात. म्हणजेच लोकशाही ही निर्वाचित लोकप्रतिनिधींकडून चालवली जाणारी शासन पद्धती आहे.

२. लोकशाहीची व्याख्या करताना सामाजिक आणि वैयक्तिक दृष्टिकोनातून पाहणे अत्यावश्यक आहे. सध्याच्या युगात तिचा अर्थ केवळ एका शासनपद्धतीपेक्षा अधिक आहे. व्यापक स्वरूपात लोकशाही म्हणजे (१) शासनप्रकार (२) राज्याचा एक प्रकार (३) समाजव्यवस्थेचा

एक प्रकार (४) आर्थिक व्यवस्थेचा आराखडा (५) जीवन आणि संस्कृतीची पद्धत. भारत लोकशाही आहे असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा त्याच्या राजकीय संस्था व प्रक्रियाच नव्हे तर हा समाज व समाजातील प्रत्येक नागरिक लोकशाहीवादी आहे हे लक्षा ठेवणे आवश्यक आहे. आणि तो त्याच्या सामाजिक वातावरण व व्यक्तीगत वर्तनात समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, धर्म निरपेक्षता आणि न्याय हा पायाभूत लोकशाही मूल्यांचा अंगिकार करतो असे आपण म्हणतो.

३. एखाद्या व्यवस्थेला खरीखुरी लोकशाही तेव्हा म्हणता येईल जेव्हा ती पुढीलप्रमाणे अटींची पूर्तता करते.

अ) राजकीय : (१)लोकांकडे सर्वोच्च सत्ता सोपवणारी आणि समता, विचार, अभिव्यक्ती, हालचाल, संभाषण, धर्म आणि संघटनाचे स्वातंत्र्य, (२) प्रौढ मताधिकाराने प्रतिनिधी निवडणे (३) कार्यकारीमंडळ कायदेमंडळाला,कायदेमंडळ लोकांना जबाबदार असणारी शासनपद्धती.

ब) सामाजिक-आर्थिक अटी : (१) समान समिजिक प्रतिष्ठा / दर्जा, सामाजिक सुरक्षा आणि समाजिक विकास साधणारी व्यवस्था. (३) विकासाच सहभागदर

## २३.२

१. निरक्षरता, विषमता आणि दारिद्र्य भारतीय लोकशाहीच्या कारभारावर विपरित परिणाम करतात. (१) निरक्षर नागरिकांना जनशक्तीची अभिव्यक्ती असणारा मताधिकार परिणामकारकपणे वापरता येत नाही. साक्षरता व्यक्तीला देशातील विविध मुद्दे, प्रश्न, मागण्या आणि हितसंबंध समजून घेण्यास तसेच स्वातंत्र्य व समतेप्रती जागृत होऊन निर्वाचित प्रतिनिधी सर्वांच्या हिताचे प्रतिनिधीत्व करतात का यासंबंधी जागरूक करते. (२) दारिद्र्य हे लोकशाहीचे सर्वात मोठे दूषण आहे. सर्व प्रकारचा विषमता आणि वचनांचे ते मूळ कारण आहे. दारिद्र्यामुळे एक आरोग्यदायी व परिपूर्ण आयुष्य जगण्याची संधी नाकारली जाते.

२. होय लोकप्रिय मनोरंजन वाहिन्या आणि चित्रपटातून लिंगभेदी चित्रण केले जाते. वस्तुत: दूरचित्रवाणी मालिकांमध्ये स्त्रियांनी माता, भगिनी, पत्नी, मुलगी, सासू आणि सुनांची पारंपारिक भूमिका बजावण्याचा कौटुंबिक कल वाढला आहे. त्यातील काही या पारंपारिक भूमिकेवर प्रश्नचिन्ह उमटवतात (नापसंती व्यक्त करतात) हे खरे. त्यातसुद्धा लिंगभेद डोकावतो.

३. जातीव्यवस्था : सध्याच्या जाती व्यवस्थेचा सर्वात घातक आणि अमानवी पैलू म्हणजे संविधानाने बंदी घालूनही चालत असलेली अस्पृश्यता. दलितांना अजूनही त्याची झळ सोसावी लागते. यातूनच कनिष्ठ जाती समाजापासून विलग झाल्या आणि सामाजिक शैक्षणिक लाभांपासून वंचित राहिल्या. दुसरे उदाहरण म्हणजे जातीव्यवस्थेचे राजकियीकरण. संकुचित राजकीय लाभासाठी जातीय अस्मिता जागी करणे ही एक रणनीती झाली आहे. जातीव्यवस्था लोकशाहीच्या मूळाविरुद्ध काम करते.

सांप्रदायिकता : बहुधार्मिक समाजातल्या सहजीवनात यामुळे व्यत्यय येतो. स्वातंत्र्यापासून देशात होणाऱ्या सांप्रदायिक दंगली शांतता आणि व्यवस्थेला हानिकारक आहेत. निवडणूका आणि इतर प्रसंगी मूलतत्त्ववाद्यांकडून केला जाणारा धर्माचा गैरवापर अनुपयुक्त आहे.





४. विकास प्रक्रियेने कायम सर्व प्रांतांच्या विकासाचे उद्दिष्ट ठेवले असले तरी, प्रादेशिक असमानता आणि असमतोल अजूनही सुरूच आहेत, राज्र्याराज्यांमध्ये किंवा एकाच राज्यात विविध भागांमध्ये दरडोई उत्पन्न, लोकसंख्या, सीारता दर, शिक्षण व आरोग्य व्यवस्था व सेवा, औद्योगिक व कृषी विकासाची पातळी यातील असमतोलातून वंचना, दुर्लक्ष व भेदभावाची भावना वाढीस लागते.

५. भारतीय राजकारणातला बाहुबलाचा प्रभाव हे एक दीर्घकालीन वास्तव आहे. १९६० च्या सुमारास गुन्हेगार राजकारण्यांना छुपी मदत करून त्यांच्याकडून संरक्षण मिळविण्यात समाधानी होते. पण आता भूमिका उलट झाल्या आहेत. आता राजकारणी गुन्हेगारांकडून संरक्षण घेतात.

६. राजकीय हिसाचारात मोठी वाढ होण्याच्या प्रमुख कारणांपैकी एक म्हणजे उच्च आणि मध्यम जातीत हितसंबंधांचा संघर्ष निर्माण झाला आहे. शेतकी विकास, जमिनदारी व्यवस्थेचा बीमोड, हरित व धवलक्रांती इ. स्वरूपाची कारणे त्यामागे आहेत. त्यातून या जातीगटात अनेकदा हिंसाचारात रुपांतरीत होणारी तीव्र राजकीय सत्तास्पर्धा उद्भवली. कनिष्ठ जाती विशेषत: अनुसूचित व मागास जातीतील वाढती जागरुकता आणि त्यांचे अधिकारांचे प्रतिपादनविरुद्ध उच्च जातींची तीव्र प्रतिक्रिया हे आणखी एक कारण आहे. स्वतंत्र राज्य, राज्य पुनर्रचना किंवा सीमांची पुनर्जुळणी याच्याशी हिंसाचार जोडला जात आहे. आपण पाहिले की आंध्रप्रदेशातील तेलंगाणाची चळवळ अनेकदा हिंसक होते. औद्योगिक संप, शेतकरी चळवळी आणि विद्यार्थी आंदोलनातही हिंसाचाराचा वापर होतो.

## २३.३

१. सार्वत्रिक साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी साक्षर भारत हा देशव्यापी कार्यक्रम राववला जात आहे. ६-१४ वयोगटांत प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी सर्व शिक्षा अभियान हा अग्रेसर कार्यक्रम सुरू आहे.

दारिद्र्य निर्मूलनासाठी दोन प्रकारचे कार्यक्रम सुरू आहेत.

१) लाभार्थ्यांना उत्पादक संसाधने / कौशल्ये प्रदान करून रोजगार मिळवून देणे आणि दारिद्र्य रेषेच्यावर आणणे.

२) गरीब व भूमीहीतांना तात्पुरता रोजगार मिळवून देणे सार्वजनिक वितरण व्यवस्था लोकांच्या प्राथमिक अन्न गरजा भागवते, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबांना उत्पादक साधने खरेदी करण्यासाठी कर्ज देतो, जवाहर रोजगार योजना ७० कोटी लोकांना प्रतीवर्षी रोजगार दिवस पुरवते. तेसच, TRYSEM ही योजना ग्मीण युवकांना रोजगार मिळवण्यासाठी तांत्रिक कौशल्ये पुरवऱ्यासाठी सुरू केली होती. लिंगभेद संपविण्यासाठी महिलांच्या सबलीकरणासाठी दोन घटना दुरूस्त्या केल्या.

२. राज्यांतील असमानता दूर करण्यासाठी राज्यनिहाय तसेच अश्या प्रदेशांच्या मागण्यांवर विशेष भर देणारे अनेक केंदपुरस्कृत कार्यक्रम आहेत. त्यातील काही पुढीलप्रमाणे (१) Tribal

विकास कार्यक्रम (२) डोंगरी प्रदेश विकास कार्यक्रम (३) सीमावर्ती प्रदेश विकास कार्यक्रम (४) पश्चिम घाट विकास कार्यक्रम (५) दुष्काळप्रवण प्रदेश विकास कार्यक्रम (६) वाळवंट विकास कार्यक्रम

३. प्रशासकीय सुधारणांसाठी पुढील शिफारसींवर भर द्यायला हवा; (१) प्रशासन अधिक उत्तरदायी व नागरिकाभिमुख बनवणे. (२) दर्जेदार प्रशासनासाठी क्षमता बांधणी (३) लोकसहभाग, विकेंद्रीकरण आणि सत्ता इतरांकडे सुपूर्द करणे (४) प्रशासकीय निर्णयप्रक्रिया अधिक पारदर्शक करणे. (५) सार्वजनिक सेवांचा दर्जा आणि दृढता वाढवणे. (६) प्रशासनात मूल्ये रुजवणे. (७) ईप्रशासनासाठी मानसिकता तयार करणे.

न्यायिक सुधारणांसाठी पुढील पावले उचलली पाहिजेत;

(अ) नियम व प्रक्रिया सुलभ करणे. (ब) कालबाह्य कायदे रद्द करणे. (क) न्यायाधीश लोकसंख्या गुणोत्तर सुधारणे. (ड) रिक्त पदांची समयबद्ध भरती (इ) न्यायाधीशांची भरती बदली, बढती यात पारदर्शकता आणणे. (फ) न्यायिक उत्तरदायित्व (ग) न्यायालयीन कामकाजात पादर्शकता.

४. शाश्वत विकास हा संसाधन वापराचा असा नमुना आहे ज्यात भावी पिढ्यांनासुद्धा त्यांच्या मानवी गरजा सहज भागवता येतील अशा पद्धतीने पर्यावरणाचे रक्षण करत वर्तमानात संसाधने वापरली जातात. विकास जेव्हा मानवकेंद्रीत आणि बहुतांच्या जीवनमानात सुधारणा करणारा असतो तेव्हा त्याचा भर दारिद्र्य, दुर्लक्ष, भेदभाव, रोगराई आणि बेरोजगारी निर्मूलनावर असायला हवा. यातून भारतीय लोकाही सबळ होईल.

## २३.४

१. लोकशाही राज्यात लोकांचा सहभाग हा निवडणुकांपुरता सीमित नसतो. सहभागाचा एक महत्त्वाचा प्रकार म्हणजे राजकीय पक्ष किंवा नागरी समाज संघटना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बिगर शासकीय संघटनांचे सदस्यत्व. या संघटना विविध गटांच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करतात. जसे स्त्रिया, विद्यार्थी, शेतकरी, कामगार, डॉक्टर, विद्यार्थी, शिक्षक, व्यावसायिक, धार्मिक लोक, मानवाधिकार कार्यकर्ते इ.

२. नागरिकांनी लोकशाही व्यवस्थेला अधिक प्रतिक्रियात्मक आणि जबाबदार बनवले पाहिजे. संसद सदस्य, राज्य विधीमंडळ सदस्य, पंचायती आहेत. याबाबत त्यांनी दक्षता बाळगायची असते. माहिती अधिका कायदा २००५ ने आपली भूमिका परिणामकारकरित्या पार पाडण्यासाठी साधने पुरवली आहेत. राजकीय नेतृत्व आणि प्रतिनिधी आपले अधिकार कसे वापरतात यावर नागरिकांनी लक्ष ठेवले पाहिजे, तसेच आपली मते आणि हितसंबंध व्यक्त केले पाहिजे.

३. रिकाम्या जागा भरा.

अ) हक्के, खबरदारी    ब) लोकमताचा, हिंसेचा

क) संस्कृती    ड) मत म्हणणेसुध्दा

# २४

# राष्ट्रीय एकात्मता आणि धर्मनिरपेक्षतावाद

'जन-गण-मन' हे आपले राष्ट्रगीत तुम्ही पाठ केले असेल तसेच नेहमी म्हणत असाल. स्वातंत्र्य दिवस किंवा प्रजासत्ताक दिनासारखे राष्ट्रीय उत्सव साजरे करताना इतरांबरोबर ते उत्साहाने म्हटले असेल. तुम्हाला क्वचित अशी उत्सुकता वाटली असेलच की आपले राष्ट्रगीत कोणत्या प्रमुख कल्पना सांगते? तसेच त्यात देशातल्या इतक्या प्रदेशांची, पर्वतांची, नद्यांची नावे का आहेत आणि समुद्रांचा उल्लेख का आहे? आपण राष्ट्रगीत गाताना आपल्या देशावरील प्रेम आदर व्यक्त करतो. आणि त्याचा विजय चिंततो. तसेच विविध प्रदेश, पर्वत, नद्यांचा उल्लेख करताना आपल्या देशातील विविधतेतील एकतेची आपण आदरपूर्वक नोंद घेतो. आपल्या देशाची एकता व एकात्मता जपण्यासंदर्भातल्या चर्चा तुम्ही वृत्तपत्रांमधील स्तंभातून किंवा टी. व्ही वर पाहिल्या असतील. खरेतर राष्ट्रीय एकता आणि एकात्मता म्हणजेच राष्ट्रीय एकात्मीकरण आपल्या देशाच्या प्रमुख प्राधान्यक्रमात येते. देशाच्या एकता व एकात्मतेशी संबंधित मुद्यांची चर्चा करताना धर्म निरपेक्षतावादाचा प्रामुख्याने उल्लेख होतो. असे म्हणतात. की राष्ट्रीय एकात्मिकरणासाठी धर्मनिरपेक्षतावाद अत्यावश्यक आहे. आपल्या देशाच्या मुलभूत वैशिष्ट्यांमध्ये धर्मनिरपेक्षतावादाची गणना होते. या पाठात तुम्ही राष्ट्रीय एकात्मिकरण आणि धर्मनिरपेक्षतावादाचे विविध पैलू अभ्यासाल.

## उपक्रम १५.१

हा पाठ पूर्ण केल्यानंतर तुम्ही पुढील गोष्टी करू शकाल.

- राष्ट्रीय एकात्मिकरणाचा अर्थ व महत्त्व समजून घेणे.
- ब्रिटिश सत्तेविरोधी राष्ट्रीय चळवळीचे राष्ट्रीय एकात्मिकरणातील महत्त्व समजून घेणे.
- भारतीय संविधानातील तरतूदी राष्ट्रीय एकात्मिकरणाचा पुरस्कार कसा करतात याचे विश्लेषण करणे.
- राष्ट्रीय एकात्मिकरणाला आपल्या देशात असणारी आव्हाने.
- धर्मनिरपेक्षतावादातील ध्वन्यर्थ समजून घेणे.
- विद्यार्थ्याच्या भारताचा नागरिक आणि राष्ट्रीय एकात्मिकरण व धर्मनिरपेक्षतावादाच्या पुरस्कारातील बदलाचा वाहक म्हणून असल्या भूमिकेचा विचार करणे.

## २४.१ राष्ट्रीय एकात्मता :

### १४.१.१ राष्ट्रीय एकात्मता : अर्थ आणि महत्व

राष्ट्रीय एकात्मतेबद्दल चर्चा सुरू करण्याआधी त्याचा अर्थ समजून घेणे अगत्याचे ठरेल. त्यात दोन शब्द आहेत. राष्ट्र आणि एकात्मिकरण. राष्ट्र म्हणजे एकसंघ सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संरचना असणारा देश. ही संकल्पना अश्या व्यक्तीसमूहाकडे निर्देश करते, ज्यात समान इतिहास, समाज, संस्कृती आणि मूल्यांच्या आधारावर एकतेची भावना निर्माण झाली आहे. ही एकतेची भावना लोकांना एका राष्ट्रात बांधते. सर्वसाधारणत: ही भावना राष्ट्रीय एकात्मता म्हणून ओळखली जाते. एका राष्ट्राच्या नागरिकांमध्ये असलेली समान अस्मितेची जाण म्हणजे राष्ट्रीय एकात्मता म्हणजेच व्यक्ती जरी विभिन्न समुदाय, जाती, धर्म, संस्कृती आणि प्रदेशांमधील असली आणि वेगवेगळ्या भाषा जरी बोलत असली तरी त्यांना त्यांच्या एकीची जाणीव असते. एका सशक्त आणि वैभवशाली राष्ट्राच्या उभारणीसाठी अश्या एकात्मतेची आवश्यकता आहे.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

राष्ट्रीय एकात्मता म्हणजे "एक अशी विचारसरणी तयार करणे जी प्रत्येक माणसाला समुहनिष्ठेपुढे राष्ट्रनिष्ठेला आणि संकुचित सामुहिक हितसंबंधांपुढे राष्ट्रीय कल्याणाला प्राधान्य देण्यास प्रेरित करेल."

**डोरोथी सिम्पसन**

आपण सर्वच जाणतो की भारत हा प्रचंड विविधता असणारा देश आहे. या देशाचे रहिवासी विविध वंशाचे समुदायांचे आणि जातींचे आहेत. ते विविध भौगोलिक प्रदेशात राहतात आणि विविध भाषा बोलतात, त्यांचा विविध धर्मांवर विश्वास आहे व त्याप्रमाणे ते आचरण करतात, त्यांच्या जीवनशैली भिन्न आहेत. पण या सर्व विविधतेशिवायही ते भारतीय आहेत आणि ते तसे मानतात. त्यांची धार्मिक ओळख वेगवेगळी असेल जसे; हिंदु, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन किंवा पारशी. तसेच ते पंजाबी, तामिळ, मल्याळी, बंगाली, मणिपुरी किंवा दक्षिण उत्तर किंवा उत्तर भारतीय म्हणून ओळखले जात असतील पण त्यांची राष्ट्रीय अस्मिता सर्वोच्च आहे.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

पंडित नेहरू एकदा म्हणाले होते. "राजकीय एकात्मिकरण तर झाले पण मला दुसऱ्या एका गोष्टीची प्रतिक्षा आहे. अधिक सखोल असे भावनिक एकात्मिकरण' भारतीय लोकांचे जेणेकरून आपल्या अप्रतिम विविधता सांभाळून राष्ट्रीय एकतेचा एक मजबूत बंध तयार करता येईल."

सामाजिक-सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक, आणि भौगोलिक विविधता असणाऱ्या कोणत्याही राष्ट्रासाठी राष्ट्रीय एकात्मिकरण आश्यक आहे. आपल्यासारख्या देशासाठी तर ते अश्विकच गरजेचे आहे. आपण जाणतो. भारत खूप विशाल देश आहे. जगातील दुसरी सर्वाधिक लोकसंख्या आपली आहे.

## राष्ट्रीय एकात्मता आणि धर्मनिरपेक्षतावाद

आपल्या देशाचे एक अनोखे वैशिष्ट्य म्हणजे जगातले सर्व प्रमुख धर्म इथे आचरणात आणले जातात. जसे, हिंदु, ईस्लाम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, जैन, पारशी इ. खालील आकृतीतील चिन्हांवरून तुम्ही धर्म ओळखू शकता? भारतीय लोक एक हजारपेक्षा अधिक भाषा बोलतात. पोशाख, खाण्यापिण्याच्या सवयी, सामाजिक रुढी यातही बरीच विविधता आढळते. भौगोलिकदृष्ट्या आपला भूप्रदेश वैविध्यपूर्ण आहे आणि वातावरणातही विविधता आहे. या सर्व फरकांशिवायही भारत हा एक राजकीय एकक आहे. आपण एकमेकांसह शांततेने राहिले पाहिजे, एकमेकांच्या संस्कृती आणि धर्माचा आदर केला पाहिजे. राष्ट्रीय एकात्मिकरण खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात आणले जाईल तेव्हाच हे शक्य आहे. राष्ट्राच्या सुरक्षा आणि विकासासाठीही एकात्मिकरण आवश्यक आहे.



**आकृती २४.१ : धर्मांची प्रतिके**

### उपक्रम २४.१

असे म्हणतात, की क्रिकेट हा भारतात धर्मासारखाच आहे. क्रिकेटचा सामना सुरू असताना जवळपास सबंध देश टी. व्ही ला खिळलेला दिसून येतो. आपले क्रिकेट खेळाडू देशाच्या विविध भागातून, विविध सामाजिक-सांस्कृतिक-आर्थिक पार्श्वभूमीतून येतात पण ते एक संघ म्हणून खेळतात. सर्व प्रदेशातले लोक त्यात पूर्णत: गुंतून जातात. भारतीय संघाचा प्रत्येक विजय ते साजरा करतात आणि पराभवामुळे नाराज होतात. राष्ट्रीय एकात्मतेचे यापेक्षा चांगले उदाहरण असेल का या अनुभवावरून तुमचे मित्र, वर्गमित्र यांसारख्या ५ तरुण व्यक्तींची खालील प्रश्नांवर मते घ्या.

१. वर म्हटल्याप्रमाणे भारतीयांचे वर्तन का असते?

२. प्रत्येक श्रेष्ठ क्रिकेटपटूची, मग तो स्वत:च्या प्रदेश, राज्य, समुदाय, जात किंवा धर्माचा नसला तरी भारतीय लोक जवळपास भक्ती का करतात?

३. असे कोणते इतर प्रसंग असतात जेव्हा भारतीय लोक बिहारी, महाराष्ट्रीय किंवा तेलुगु किंवा ब्राह्मण किंवा दलित म्हणून नाही तर भारतीय म्हणून वागतात.

प्रतिक्रीयांचे विश्लेषण करा आणि राष्ट्रीय एकात्मिकरणाचे महत्त्व द्या.

## पाठ्यांशावरील प्रश्न २४.१

१. **गाळलेल्या जागा भरा.**

अ) राष्ट्र म्हणजे ........... असणारा देश.

ब) एका राष्ट्राच्या नागरीकांमध्ये एका ........... ची जाण असणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता

क) एका ............. च्या उभारणीसाठी अश्या प्रकारच्या एकात्मिकरणाची आवश्यकता असते.

ड) भारतात जगातले बहुतेक प्रमुख धर्म आचरणात आणले जातात जसे ............

२. राष्ट्रीय एकात्मिकरणाची गरज काय?

### २४.१.२ राष्ट्रीय चळवळ आणि राष्ट्रीय एकात्मता :

तुम्हाला असे सांगितले गेल्याचे किंवा वाचल्याचे आठवत असेल की भारत हा प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. आपण आज पाहत असलेला भारत प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. पण तेव्हा तो केवळ एक भौगोलिक एकक होता कारण तो अनेक संस्थांनामध्ये विभागलेला होता. त्यांच्यात सांस्कृतिक समानता होती पण आजच्यासारखा तो एक एकात्म आणि एकत्रित देश नव्हता. ब्रिटीशांच्या काळात भारत पहिल्यांदा प्रशासकीयदृष्ट्या एक झाला. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी अनेक संस्थाने जोडून घेतली आणि इतरांवर अप्रत्यक्ष सत्ता स्थापन केली. भारत एकत्रित भौगोलिक एकक तर बनला पण राष्ट्रीयतेची भावना रुजली नाही. ब्रिटीशांची प्रमुख रणनीती 'फोडा आणि राज्य करा' अशी होती. त्यांना विशेषत: हिंदू आणि मुस्लिमांमध्ये सांप्रदायिक तेढ निर्माण केली. लोकांच्या आर्थिक विकासाकडील दुर्लक्षामुळे देशात अनेक विभाजने झाली.

राष्ट्रीय चळवळीदरम्यान ही राष्ट्रीयतेची भावना उदयाला आली आणि एकात्मिकरणाच्या गरजेची जाणीव झाली. या चळवळीदरम्यान विविध प्रदेश, धर्म, संस्कृती, संप्रदाय, जातीचे लोक ब्रिटिशांना भारतीय भूमीवरून हाकलून लावण्यासाठी एकत्र आले. विशेषत: १८८५ साली स्थापन झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या फलकाखाली सर्व प्रकारचे लोक एकत्र आले आणि ब्रिटिशांना भारत सोडण्यास त्यांनी भाग पाडले. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी 'फोडा व राज्य करा' ची नीती वापरल्याने राष्ट्रीय चळवळीने लोकांमध्ये एकी घडवून आणण्यावर भर दिला. चळवळीच्या नेतृत्वाने समता, स्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता, सामाजिक आर्थिक विकास यावर भर दिला. भारत स्वातंत्र्य झाल्यावर ही सर्व या नव्या राष्ट्राची प्रमुख उद्दिष्टे बनली.

**उपक्रम २४.२**

तुम्हाला माहीत असेलच की स्वातंत्र्य चळवळीत भारताच्या प्रत्येक भागातील लोकांनी सहभाग घेतला, अनेकांनी प्राणही दिले. त्यातले अनेक स्वातंत्र्ययोद्धे तुमच्या राज्यातीलच असू शकतील. तुमच्या राज्यातील स्वातंत्र्यसैनिकांची यादी बनवा. तुम्ही तुमचे वडिलधारे, शेजारी, शिक्षक इ. ची मदत घेऊ शकता.

## २४.१.३ राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय संविधान :

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळताना देशापुढे अनेक समस्या होत्या. राष्ट्रीय एकात्मतेपुढे अनेक आव्हाने होती. तुम्ही जाणता की फाळणीने भारत-पाकिस्तान ही दोन राष्ट्रे निर्माण केली. फाळणीने सर्वात भीषण अश्या सांप्रदायिक सिाचाराला जन्म दिला. पिढ्यान्‌पिढ्या एका भागात राहणाऱ्या लोकांना निर्वासित म्हणून दुसरीकडे जावे लागले. तुम्ही काही चित्रपट, माहितीपट किंवा टी. व्ही. मालिकांमधून अशी दृश्ये पाहिली असतील. याखेरीज भारतीय नेतृत्वापुढे संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न होता. देशाच्या एकतेपुढे समस्या निर्माण करू शकणारे इतर घटक परिस्थित अधिक कठीण करत होते.

**तुम्हास हे माहित आहे का ?**

स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला भारत दोन प्रादेशिक संचात विभाजित होता, ब्रिटिश राज्यकर्त्यांचे प्रत्यक्ष नियंत्रण असारा ब्रिटिश भारत आणि ५६२ स्वतंत्र संस्थाने असणारा संस्थानिक भारत. ज्यावर ब्रिटिशांचे अप्रत्यक्ष नियंत्रण होते. स्वातंत्र्य घोषित करताना संस्थानांना भारत किंवा पाकिस्तानपैकी एका देशात सामिल होण्याचा पर्याय देण्यात आला. काही संस्थाने पाकिस्तानात सामिल झाली पण बहुतांश भारतात विलीन झाली पण हैद्राबाद, जम्मू-काश्मिर आणि जुनागढ हे अपवाद स्वातंत्र्य राहू इच्छित होते. मणिपूर आणि त्रिपुराच्या राज्यांचाही प्रश्न होता.

वर सांगितलेल्या पार्श्वभूमीवर, भारतीय संविधान राष्ट्रीय एकात्मतेवर भर देते. सरनाम्यात राष्ट्रीय एकता व एकात्मता प्रमुख उद्दिष्ट मानले आहे. तो असेही सांगतो की प्रत्येक भारतीय नागरिकाचे राष्ट्रीय एकता, एकात्मता आणि सार्वभौमत्व जपणे हे मूलभूत कर्तव्य आहे. संविधानातून विविधतेप्रती आदर दिसतो पण एकता आणि एकात्मता राखण्याचा प्रयत्न केलेलाही दिसतो, त्यामुळेच केंद्रित संघराज्याची आणि प्रबळ केंद्रसरकारची योजना करण्यात आली आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारवरील पाठ शिकताना तुमच्या हे लक्षात आले असेल.

**तुम्हास हे माहित आहे का ?**

मुलभूत कर्तव्यांमधील अनेक तरतुदी राष्ट्रीय एकात्मतेवर भर देतात त्यातील काही महत्त्वपूर्ण तरतुदी पुढीलप्रमाणे :

**प्रत्येक भारतीय नागरिकाची पुढील कर्तव्य आहेत.**

- घटनेशी बांधिलकी आणि घटनेतील तत्त्वे, संस्था, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीताबाबत आदर.
- राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या संग्रामाला प्रेरणादायी ठरलेले भव्य आदर्शांचे मनापासून पालन करणे.
- देशाचे संरक्षण व गरज असेल तेव्हा राष्ट्रीय सेवेसाठी तत्पर असणे.
- भारतातील सर्व लोकांमध्ये बंधुभाव आणि ऐक्य प्रस्थापनेसाठी प्रयत्न करणे तसेच धार्मिक, भाषिक, प्रादेशिक आणि गटांमधील विविधतेबद्दल आदर बाळगणे.
- स्त्रियांची प्रतिष्ठा जपणे.
- आपल्या देशाची संस्कृती व सांस्कृतिक वारसा जपणे.
- सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे आणि हिंसेला विरोध करणे.

## पाठ्यांशावरील प्रश्न २४.२

**१. रिकाम्या जागा भरा.**

अ) ब्रिटिश राज्यात भारत भौगोलिकदृष्ट्या एक झाला, पण तो एक .......... आणि ........ राष्ट्र नव्हता.

ब) स्वातंत्र्य चळवळीदरम्यान .......... च्या भावनेचा उदय झाला.

क) स्वातंत्र्य चळवळीदरम्यान विविध .......... चे लोक ब्रिटिशांना भारतीय भूमीवरून हाकलून लावण्यासाठी एकत्र आले.

ड) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ................ साली स्थापन झाली.

२. भारतीय संविधान राष्ट्रीय एकात्मिकरणावर भर देते असे तुम्हाला वाटते का? कसे?

## २४.१.४ राष्ट्रीय एकात्मिकरणापुढील आव्हाने

आपण वरील परिच्छेदांमध्ये म्हणल्याप्रमाणे भारताच्या राष्ट्रीय एकात्मिकरणापुढे अनेक आव्हाने आहेत. ह्या समस्या सोडवण्यासाठी अनेक प्रयत्न झाले पण तरी काही आव्हाने आहेतच. सर्वात महत्त्वाची आव्हाने पुढीलप्रमाणे.

### अ) सांप्रदायिकता :

भारतापुढील आव्हानांपैकी सांप्रदायिकता हे सगळ्यात किचकट आव्हान आहे. जेव्हा एका धर्माचे लोक आपल्या धर्माप्रती अतिरिक्त प्रेम आणि दुसऱ्या धर्माबद्दल तिरस्कार ठेवतात तेव्हा सांप्रदायिकता

उपजते. याप्रकारची भावना धार्मिक मूलतत्त्ववाद आणि कट्टरतेला उत्तेजन देते जे राष्ट्रीय ऐक्य एकात्मतेला घातक ठरते. भारतासारख्या देशात, जिथे लोक बहुतेक सर्व प्रमुख धर्मांचे आचरण करतात तेथेही शक्यता अधिक असते. पण भारताला सांप्रदायिकतेचा सामना स्वातंत्र्यापासून करावा लागला आहे. आपण स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला अत्यंत वाईट अश्या सांप्रदायिक दंगली अनुभवल्या, तसेच त्यानंतरही, देशाच्या अनेक भागात मोठ्या सांप्रदायिक दंगली झाल्या ज्यातून लोकांना खूप काही सोसावे लागले.

### उपक्रम २४.३

स्वातंत्र्यानंतरच्या भारतातील शेवटच्या तीन मोठ्या सांप्रदायिक दंगली ओळखा आणि पुस्तके, मासिके, इंटरनेटवरून त्यांची माहिती शोधा.

भारतातील सांप्रदायिक दंगलींवर आधारलेला एखाद्या चित्रपट तुम्ही पाहिला आहे का? किंवा तश्या एखाद्या चित्रपटाचे नाव माहीत आहे? नसल्यास तुमच्या वडिलधाऱ्यांनी / मित्रांनी असा चित्रपट पाहिला असेल. ज्यांनी पाहिला असेल त्यांच्याकडून त्यासंबंधी माहिती मिळवा. इंटरनेटवरूनही माहिती मिळू शकेल.

वरील दोन्ही गोष्टींवर एक लेख लिहा. त्यात सांप्रदायिक दंगलींबद्दल तुम्हाला काय वाटते ते सांगा.

### ब) प्रादेशिकता :

राष्ट्रीय एकात्मिकरणातील आणखी एक अडथळा म्हणजे प्रादेशिकता. ती अनेकदा लोकांना राष्ट्रीय प्राधान्यापुढे प्रादेशिक हितसंबंधांना महत्त्व देण्यास प्रवृत्त करते. एखाद्याला असे वाटू शकेल की निर्ण यकर्त्यांचे लक्ष वेधून घेऊन त्यांना न्याय प्रादेशिक मागण्या पूर्ण करण्यास भाग पाडण्यासाठी त्या विशिष्ट प्रदेशाच्या समस्या मांडणे गरजेचे आहे. हा विचार योग्य आहे कारण अश्या मागण्या राज्यांच्या / प्रदेशांच्या खऱ्या समस्यांवर आधारलेल्या असू शकतात. विकासाच्या संरचनेत त्यांना विविध प्रकल्प आणि उद्योगांमधील न्याय वाटा नाकारला गेलेला असू शकतो. एखाद्या प्रदेशाकडे सतत होणाऱ्या दुर्ल क्षाशीही त्याचा संबंध असू शकतो.

सहा दशकांपेक्षाही अधिक नियोजित विकास योजना राबवुनही देशातील सर्व प्रदेश अपेक्षित पद्धतीने विकसित झाले नाहीत. इतर घटकांबरोबर अपेक्षित सामाजिकआर्थिक निकालाचा अभाव नवीन राज्यनिर्मितीच्या मागणीत रुपांतरीत होतो. प्रादेशिक आकांक्षांच्या आधारावर भारतात राज्यांची किती वेळ पुनर्रचना झाली आहे तुम्हाला माहीत आहे? पण प्रादेशिकता जेव्हा राष्ट्रहिताकडे दुर्लक्ष करून इतर प्रदेशांच्या हितसंबंधांप्रती नाकारात्मक भावना प्रवृत्त करते तेव्हा ती घातक ठरते. अनेकदा प्रादेशिक निषेध-निदर्शने राजकीय हेतूंनी प्रेरित असतात. आक्रमक प्रादेशिकता अधिक धोकादायक असते, आसाम आणि जम्मू काश्मिरच्या काही भागात याचा अनुभव येत आहे.




छायाचित्र २४.२ : दार्जीलिंग चळवळ

**उपक्रम २४.४**

प्रादेशिक चळवळींतून अस्तित्वात असलेल्या राज्यांचे विभाजन होऊन नवीन राज्ये निर्माण झाली. एक मोठी पुनर्रचना राज्य पुनर्रचना कायदा १९५६ द्वारे झाली. तेव्हापासून अनेक नवीन राज्ये निर्माण झाली. त्यातील अलीकडची राज्ये म्हणजे छत्तीसगढ, उत्तराखंड आणि झारखंड ही आहेत. सध्या आंध्र प्रदेशाचे विभाजन करून नव्या राज्याच्या निर्मितीसाठी आंदोलन सुरू आहे.

या माहितीआधारे पुढील गोष्टी करा.

❖ छत्तीसगढ, झारखंड आणि उत्तराखंड ची निर्मिती कोणत्या राज्यांचे विभाजन करून झाली ते ओळखा.

❖ आंध्रप्रदेशातून जे प्रस्तावित राज्य निर्माण करण्यासाठी आंदोलन सुरू आहे त्याचे नाव सांगा.

### क) भाषावाद :

भारत बहुभाषिक देश आहे हे आपण जाणतो. भारतीय लोक जवळपास २०० भाषा आणि बोली बोलतात. या बहुलतेचा बऱ्याचदा, विशेषत: स्वातंत्र्यानंतर लगेचच्या दशकांत दुरुपयोग झाला. प्रत्येक देशाला एक अधिकृत भाषा असावी लागते पण भारतात हे काम सोपे नव्हते. संविधान सभेला जेव्हा हिंदी ला अधिकृत भाषा करण्याचा प्रस्ताव सादर झाला तेव्हा बहुतेक सर्व बिगर हिंदी भाषक प्रदेशांच्या प्रतिनिधींनी त्याला विरोध केला. इथे एक तडजोड करावी लागली. संविधान सभेने हिंदीची अधिकृत भाषा म्हणून घोषणा करतानाच पुढील १५ वर्षांसाठी संघसरकारच्या सर्व कार्यालयीन कामासाठी इंग्रजीचा वापर सुरू ठेवण्याचे ठरवले.

## राष्ट्रीय एकात्मता आणि धर्मनिरपेक्षतावाद

अधिकृत भाषा आयोगाने १९५५ मध्ये अधिकृत भाषा म्हणून इंग्रजीऐवजी हिंदी स्विकारण्याचा प्रस्ताव मांडला तेव्हा सर्व बिगर हिंदी भाषिक प्रांतांमध्ये निषेध झाला. १९६३ मध्ये अधिकृत भाषा विधेयक जेव्हा लोकसभेत मांडले गेले तेव्हा असाच निषेध पहायला मिळाला. तडजोड म्हणून १९६३ च्या कायद्याने कोणत्याही कालमर्यादेशिवाय इंग्रजीचा वापर सुरू ठेवण्यास परवानगी दिली.


### ? तुम्हास हे माहित आहे का ?

त्या संघर्षपूर्ण वर्षामध्ये विविध भाषित गटांना शांत करण्यासाठी आणि राष्ट्रीय एकात्मिकरणाचा पुरस्कार करण्यासाठी एक त्रैभाषिक सुत्र तयार केले गेले. हिंदी भाषिक प्रदेशात हिंदी व इंग्रजीच्या जोडीने एक आधुनिक भारतीय भाषेचा प्राधान्याने दक्षिणात्य भाषेचा अभ्यास तर बिगर हिंदी भाषिक प्रदेशांत इंग्रजी व प्रादेशिक भाषेबरोबर हिंदी च्या अभ्यासाचा या सूत्रात समावेश आहे. शालेय अभ्यासक्रमात याचा पूर्ण समावेश करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, पण अजून पूर्ण यश आलेले नाही.

१९५६ च्या पुनर्रचनेवेळी भाषावार राज्यनिर्मितीची मागणी बऱ्याच अंशी पूर्ण झाली होती पण अजूनही तशी आंदोलने सुरूच आहेत. अशा चळवळी राष्ट्रीय एकात्मिकरण पुढे अनेक आव्हाने उभी करतात.

### ड) कट्टरतावाद :

देशाच्या विविध भागात सुरू असलेल्या कट्टरतावाद्यांच्या चळवळींचे राष्ट्रीय एकात्मिकरणापुढे आव्हान आहे. तुम्ही नक्षलवादी किंवा माओवादी चळवळीबद्दल ऐकले असेलच. या चळवळी बऱ्याचदा हिंसाचाराचा वापर करून सार्वजनिक जीवनात भीती निर्माण करतात, सरकारी कर्मचारी तसेच लोकांची जीवीत हानी तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करतात. अश्या चळवळीत बहुधा युवक सामील होतात. सततची सामाजिक-आर्थिक वंचना युवकांना हातात शस्त्र घेण्यास भाग पाडते. त्याउपर, रोजचा अपमान, न्याय नाकारला जाणे, मानवी हक्कांची पायमल्ली, विविध प्रकारचे शोषण आणि राजकारणातून बाजूला सारले जाणे हे सगळे त्यांना नक्षलवादी चळवळीत जाण्यासाठी प्रवृत्त करते. पण या कट्टर कारवाया कायदासुव्यवस्थेला तसेच त्या प्रदेशांत राहणाऱ्या लोकांच्या शांततामय रहिवासाला धोकादायक आहेत.



छायाचित्र २४.३ : जंगलातील नक्षलवादी

## २४.१.५ राष्ट्रीय एकात्मिकरणास पूरक घटक :

वर नमूद केलेली आव्हाने जरी असली तरी असे काही महत्त्वपूर्ण घटक आहेत जे राष्ट्रीय एकात्मिकरणासाठी मजबूत पाया पुरवतात. हे म्हणजे;

### अ) घटनात्मक तरतुदी :

आपण पाहिल्याप्रमाणे, भारतीय संविधानाने राष्ट्रीय एकात्मिकरण टिकवण्यासाठी व वाढवण्यासाठी तरतुदी केल्या आहेत. त्याने समाजवाद, धर्मनिरपेक्षतावाद, लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय या सर्वांचा भारतीय राजकीय व्यवस्थेची उद्दिष्टे म्हणून स्विकार केला आहे. नागरिकांना मुलभूत हक्क देऊन सबल केले गेले आहे तसेच मुलूभत कर्तव्य सुद्धा सुचवली आहेत, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे ज्याला समतोल आर्थिक विकास, सामाजिक भेदभावाचे निर्मूलन, आणि आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षेच्या पुरस्काराचे निर्देश देतात. सर्वात महत्त्वाचे, विविध संस्था आणि प्रक्रियांसंबंधीच्या तरतुदी राष्ट्रीय एकात्मिकरणासाठी सज्ज आहेत.

### ब) सरकारी पुढाकार :

राष्ट्रीय एकात्मिकरण वाढवऱ्यासाठी सरकारेही प्रयत्न करत आली आहेत. राष्ट्रीय एकात्मिकरणासंबंधातील विविध मुद्दे हाताळण्यासाठी आणि त्यासाठीच्या योजना सुचवण्यासाठी राष्ट्रीय एकात्मता परिषद उभारण्यात आली आहे. एकच नियोजन आयोग संपूर्ण देशाच्या आर्थिक विकासाच्या योजना बनवतो आणि एकच निवडणूक आयोग निवडणूका घेतो.

### क) राष्ट्रीय उत्सव आणि प्रतिके :

राष्ट्रीय उत्सव सुद्धा एकीचा कारक म्हणून काम करतात. स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताकदिन आणि गांधी जयंती हे तीन उत्सव देशाच्या सर्व भागात सर्व भारतीयांकडून भाषा, धर्म किंवा संस्कृतीचा विचार न करता साजरे केले जातात. दरवर्षी १९ नोव्हेंबर ला आपण राष्ट्रीय एकात्मता दिवस प्रतिज्ञा घेऊन साजरा करतो. हा दिवस "कौमी एकता दिवस" म्हणूनही ओळखला जातो. त्याउपर, आपली राष्ट्रीय प्रतिके जसे राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत आणि राजमुद्रा आपल्या एका ओळखीची आपल्याला जाणीव करून देतात. यामुळेच आपण त्या प्रतिकांचा आदर राखण्यावर भर देतो. उत्सव तसेच कठीण प्रसंगात ती एकताकारक म्हणून काम करतात. आपल्या समान राष्ट्रीयतेची आठवण करून देतात.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

राष्ट्रीय एकात्मता शपथेचा मसुदा "राष्ट्राचे स्वातंत्र्य आणि एकात्मता जपण्यासाठी आणि सबल करण्यासाठी मी निष्ठापूर्वक काम करण्याची शपथ घेतो. मी असेही मान्य करतो की मी कधीही हिंसाचाराचा आधार घेणार नाही आणि धर्म, भाषा, प्रदेश यासंबंधीचे मतभेद आणि वाद तसेच आर्थिक प्रश्नांचा तोडगा शांततामय आणि घटनात्मक मार्गाने काढेन."

### ड) अखिल भारतीय सेवा आणि इतर घटक :

अखिल भारतीय सेवा (IAs, AFS, आ PS आणि इतर) एकसंघ न्यायसंस्था, टपाल  तार खाते, आकाशवाणी आणि दूरचित्रवाणी तसेच इंटरनेट राष्ट्रीय एकता ' एकात्मतेचा पुरस्कार करतात. तुम्हाला माहीत असेल की अखिल भारतीय सेवांचे सदस्य केंद्रीय पातळीवर भरती होतात पण ते राज्यात काम करतात. राज्य पातळीवर प्रदीर्घ अनुभव मिळवल्यानंतर ते केंद्रीय सरकारमध्ये काम करून संपूर्ण देशासाठी धोरण निर्णय प्रक्रियेत सहभागी होतात. टपाल व संदेश खाते देशाला जोडते. तुम्ही आकाशवाणीवरून राष्ट्रीय कार्यक्रम प्रक्षेपित होताना ऐकले असतील किंवा दूरचित्रवाणीवर पाहिले असतील. देशाच्या सर्वच भागांतील लोक असे करतात, नाही का?

### उपक्रम २४.५

कल्पना चावलाने इतर अंतरिक्ष शास्त्रज्ञांसह अवकाशात जाणे किंवा भारतीय संघाने विश्वचषक जिंकणे यासारखे प्रसंग देशाला बांधून ठेवतात. काही क्रीडापटू राष्ट्रीय नायक हातोत. तसेच काही व्यक्तीमत्त्वांचा भारतभर आदर केला जातो. तुमचे मित्र, वर्गमित्र, कुटुंबीय, शिक्षक किंव इतर अश्या ५ लोकांची पुढील गोष्टींवर मते घ्या.

१. संपूर्ण भारतात सर्वाधिक ज्याचा आदर केला जातो असे भारतीय व्यक्तीमत्व कोण?

२. बहुशांत तरुण लोकं कोणत्या क्रिडापटूला आपला आदर्श मानतात?

३. असे कोणते राष्ट्रीय सोहळे आहेत ज्याबाबत लोक रेडिओवर ऐकतात किंवा जे टी. व्ही. वर पाहिले जातात?

४. दोन खाद्यपदार्थ जे संपूर्ण भारतात सगळीकडे लोकांना आवडतात.

गोळा केलेल्या माहितीचे आणि भारतीयांमध्ये एकीची भावना कशी वाढवता येईल याचे विश्लेषण करा.

### पाठ्यांशावरील प्रश्न २४.३

१. सांप्रदायिकता म्हणजे काय?

२. प्रादेशिकतेचे समर्थन करता येईल? कारणे द्या.

३. बिगर हिंदी भाषक राज्यांचा हिंदीला अधिकृत भाषा म्हणून विरोध का?

४. कट्टरतावाद राष्ट्रीय एकात्मिकरणाला धोका का आहे?

## २४.२ धर्मनिरपेक्षतावाद

सांप्रदायिकता ही एक मोठीच समस्या राहिली आहे. तिचा राष्ट्रीय एकात्मिकरणाला कायम धोका राहिला आहे. हे खरे आहे की पारंपारिकरित्या भारतीय समाज विगर सांप्रदायिक आहे शतकानुशतके त्याने अनेक धर्मांना-संस्कृतींना सामावून - मिसळून घेतले आहे. पण ब्रिटिश राज्यात सांप्रदायिकतेचा भारतीयांना विभागण्यासाठी साधन म्हणून उपयोग झाला. वसाहतिक राज्यकर्त्यांनी भारतीयांना हे पटवण्याचा प्रयत्न केला की ते विभिन्न धार्मिक संप्रदायांचे सदस्य आहेत आणि म्हणून त्यांनी वेगवेगळ्या पद्धतीने विचार व कृती केली पाहिजे. घटनाकारांनी सांप्रदायिकतेमधील नकारात्मक क्षमता ओळखली होती. म्हणूनच घटनेने भारताला धर्मनिरपेक्ष राज्य घोषित केले. मूळ घटनेत धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार करणाऱ्या अनेक तरतुदी होत्या परंतु सांप्रदायिकतेचा सातत्याने होणारे आगमन सुस्पष्टीकरणाची गरज भासवत होते. म्हणूनच त्याला भारतीय लोकशाहीचा पायाभूत स्तंभ बनवण्यासाठी ४२ व्या घटनादुरुस्तीने १९७८ साली सरनाम्यात धर्मनिरपेक्ष हा शब्द घातला.

### २४.२.१ धर्मनिरपेक्षतावादाचा अर्थ

धर्मनिरपेक्षतावाद म्हणजे काय? तुम्ही अशा लोकांना भेटला असाल जे म्हणतात, "मी धर्मनिरपेक्ष आहे, कारण माझा कोणत्याच धर्मावर विश्वास नाही." तुम्ही असे राजकारणीही पाहिजे असतील जे राज्यघटनेतील तरतुदींना "ढोंगी धर्मनिरपेक्षतावाद" म्हणतात. ढोंगी धर्मनिरपेक्षतावाद म्हणजे चुकीचा धर्मनिरपेक्षतावाद. हे समजणे महत्त्वाचे आहे की धर्मनिरपेक्षतावाद म्हणजे निधर्मी किंवा धर्मविरोधी असणे असे नव्हे. ढोंगी धर्मनिरपेक्षतावाद ही संज्ञा केवळ राजकीय हेतूने वापरली जाते. खरे तर धर्मनिरपेक्षता सर्व धर्मांची समानता आणि धार्मिक सहनशीलता मानते. तिचा दोन परिप्रेक्षात विचार करायला हवा. राज्याचा आणि व्यक्तीचा राज्याच्या परिप्रेक्षात त्याचा साधा अर्थ असा होतो की भारताचा अधिकृत राजधर्म नाही. शासनाने कोणत्याही धर्माला अनुकूल किंवा भेदभावाची वागणूक देता कामा नये. सर्व



छायाचित्र २४.४ : धर्म निवडीचे स्वातंत्र्य

धर्मांना समान आदराने वागवले पाहिजे. सर्व नागरिक, त्यांच्या धर्माचा विचार न करता, कायद्याच्या नजरेत समान आहेत. शासकीय किंवा शासन अनुदानित शाळांमध्ये धार्मिक शिक्षण दिले जाता कामा नये. जगातल्या सर्व धर्मांबद्दलची साधारण माहिती दिली जाऊ शकते पण कोणत्याही एखाद्या-दुसऱ्या धर्मात महत्त्व दिले जाता कामा नये. व्यक्तीगत परिप्रेक्षात त्याचा अर्थ सर्व धर्म समभाव असा होतो. सर्व धर्मांप्रती समान आदर प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या निवडीच्या धर्माचे पालन, पठण आणि प्रसाराचा अदिकार आहे. प्रत्येक नागरिकाने इतर धर्मांचा आपल्या धर्माइतकाच मान राखला पाहिजे. कोणताच धर्म व्यक्तीला इतरांकडे दुर्लक्ष करण्यास, त्यांचा तिरस्कार करण्यास परवानगी देत नाही.

## २४.२.२ संविधानातील धर्मनिरपेक्षतावाद :

आपण वर पाहिल्याप्रमाणे घटनेच्या विविध तरतुदी भारताला धर्मनिरपेक्ष राज्य बनण्याचे निश्चित करतात. भारतीय संविधानाने त्याच्या सरनामा आणि मुलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वांवरील प्रकरणातून समता आणि भेदभावशून्यतेच्या तत्वावर आधारित धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण केले आहे. सामाजिक आर्थिक लोकशाहीच्या तत्त्वांबरोबरच, धर्मनिरपेक्षता हे भारतीय घटनेच्या मूलभूत संरचनेचा भाग मानले गेले आहे. आपल्या घटनेत त्याचा आपल्या बहुल समाजाला पाठबळ देणारे मूल्य या अर्थी उल्लेख होतो. भारतात राहणाऱ्या विविध समूदायांमध्ये एकरूपता असण्याचा धर्मनिरपेक्षतावाद पुरस्कार करतो.

## २४.२.३ धर्मनिरपेक्षतावाद : त्याचे महत्व :

घटनात्मक तरतुदी आणि सुरक्षा उपाय असूनही अजूनही सगळे भारतीय खऱ्या अर्ताने धर्मनिरपेक्ष व्हायचे आहेत हे दुर्दैव. नियमित कालांतराने आपल्याला सांप्रदायिक दंगली पहाव्या लागतात. अगदी निरर्थक कारणही सांप्रदायिक तणाव आणि हिंसाचार घडवू शकते. पण धर्म निरपेक्षतेची गरज केवळ सांप्रदायिक शांतता व सलोखा टिकवण्यासाठीच नाही तर आपल्या राष्ट्राच्या अस्तित्वासाठीही आहे. तुमच्या आजूबाजूला पाहिलेत तर लक्षात येईल की तुमचे मित्र, वर्गमित्र, शेजारी किंवा जवळचे रहिवासी तुमच्यापेक्षा वेगळ्या धर्माचे आहेत. ते विभिन्न जातींचे आहेत. तुम्ही त्यांच्या आणि ते तुमच्या धर्माचा आदर करत नसतील तर तुम्ही एक चांगले मित्र, वर्गमित्र, किंवा शेजारी कसे होऊ शकाल. आपण जाणतो की भारत हा एक बहुल देश आहे. त्यामुळे हे आवश्यक आहे की लोकांनी परस्परांबद्दल आदर बाळगावा आणि शांततामय सहजीवन जगावे.

### ? तुम्हास हे माहित आहे का ?

भारतात हा प्रचंड विविधता आणि अमर्याद विभिन्नतेचा देश आहे. हा १८ प्रमुख भाषा आणि इतर ४00 महत्त्वाच्या वोली असणारा देश आहे. जगातल्या ४ महत्त्वाच्या धर्मांचा या भूमीत उगम झाला. जगातली दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च मुस्लिम लोकसंख्या इथे आहे. युरोपात प्रसार होण्याआधीच ख्रिश्चन धर्माचे इथे स्वागत झाले. धार्मिक छळाच्या भीतीने पळून येणाऱ्या लोकांना भारताने नेहमीच आश्रय दिला आहे. ह्या समाजात ४,000 हून अधिक वांशिक समुदाय किंवा जाती किंवा अंतर्विवाह करणारे समूह राहतात. त्यामुळे भारत हा एक बहुभाषिक, बहुधर्मीय, बहुवांशिक आणि बहुप्रादेशिक सभ्यता / संस्कृती आहे ज्याची तुलना होऊ शकत नाही. त्यामुळे प्रत्येक धर्म आणि समुदायाला आवश्यक अवकाश आणि इतरांना मान देत जगण्यासाठी धर्मनिरपेक्षतावाद हा एकच पर्याय आहे.

## पाठ्यांशावरील प्रश्न २४.४

१. धर्मनिरपेक्षतावादाचा अर्थ काय?

२. धर्मनिरपेक्षतावादावर भर देणाऱ्या घटनात्मक तरतुदी कोणत्या?

३. भारताला धर्मनिरपेक्ष राज्य म्हणून सबल करण्यात नागरिकांची काय भूमिका आहे?

## आपण काय शिकलो?

❖ राष्ट्र म्हणजे एकसंघ सामाजिक-आर्थिक आणि राजकीय संरचना असणारा देश. ही संकल्पना अश्या व्यक्ती समूहाकडे निर्देश करते ज्यात समान इतिहास, समाज, संस्कृती आणि मूल्यांच्या आधारावर एकतेची भावना निर्माण झाली आहे. हीच भावना लोकांना एका राष्ट्रात बांधते.

❖ भारत हा प्रचंड विविधता असणारा देश आहे. या देशाचे रहिवासी विविध वंश, समुदाय आणि जातींचे आहेत. ते विविध भौगोलिक प्रदेशात राहतात आणि विविध भाषा बोलतात. विविध धर्मांवर विश्वास ठेवतात व त्याप्रमाणे आचरण करतात, त्यांच्या जीवनशैली भिन्न आहेत. पण या सर्व विविधतेशिवायही ते भारतीय आहेत. आणि तसे मानतात.

❖ एका राष्ट्राच्या नागरिकांमध्ये असलेली समान अस्मितेची जाण म्हणजे राष्ट्रीय एकात्मता. म्हणजेच व्यक्ती जरी विभिन्न समुदाय, जाती, धर्म संस्कृती आणि प्रदेशांमधली असली आणि विविध भाषा बोलत असली तरी त्यांना त्यांच्या एकीची जाणीव असते. एका सशक्त आणि वैभवाली राष्ट्राच्या उभारणीसाठी अशा एकात्मिकरणाची आवश्यकता असते.

❖ राष्ट्रीय चळवळीदरम्यान ही राष्ट्रीयतेची भावना उदयास आली आणि एकात्मिकरणाच्या गरजेची जाणीव झाली. या चळवळीदरम्यान विविध प्रदेश, धर्म, संस्कृती, संप्रदाय, जातीचे लोक ब्रिटिशांना भारतीय भूमीवरून हाकलून लावण्यासाठी एकत्र आले. स्वतंत्र भारताची प्रमुख उद्दिष्टे बनलेल्या स्वातंत्र्य, समता, धर्मनिरपेक्षता, सामाजिक-आर्थिक विकास यासारख्या मूल्यांवरही त्यांनी तेव्हाच भर दिला.

❖ भारतीय संविधान राष्ट्रीय एकता व एकात्मिकरणावर भर देते. सरनाम्यात राष्ट्रीय एकता व एकात्मता प्रमुख उद्दिष्ट मानले आहे. तो असेही सांगतो की राष्ट्रीय एकता, एकात्मता आणि सार्वभौमत्व जपणे हे प्रत्येक भारतीयाचे मूलभूत कर्तव्य आहे.

❖ राष्ट्रीय एकात्मिकरण जपण्यात व बळकट करण्यात भारताने अनेक आव्हानांचा सामना केला आहे. त्यातील सर्वात किचकट म्हणजे; सांप्रदायिकता, प्रादेशिकता, भाषावाद आणि कट्टरतावाद.

❖ राष्ट्रीय एकात्मिकरणाचा पुरस्कार करणारेही अनेक घटक आहेत. राष्ट्रीय एकात्मिकरण सुनिश्चित करण्यासाठी संधिानाने तरतुदी केल्या आहेत. सरकारनेदेखील अनेक प्रयत्न केलेले दिसतात. राष्ट्रीय एकात्मिकरणासंदर्भातील गोष्टींमधे लक्ष घालून त्यावर उपाय सुचवण्यासाठी

राष्ट्री एकात्मिकरण परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. संपूर्ण देशाच्या आर्थिक विकासाची योजना एक नियोजन आयोग बनवतो आणि एकच निवडणूक आयोग निवडणूका घेतो. राष्ट्रीय उत्सव सुद्धा एकताकारक ठरतात. राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यासारखी राष्ट्रीय प्रतिके आणि राजमुद्रा आपल्याला आपण एक आहोत याची आठवण करून देतात.

- ❖ धर्मनिरपेक्षतावादात सर्व धर्मांची समानता अपेक्षित आहे तसेच धार्मिक सहनशीलता सुद्धा. त्याचा अर्थ भारताचा राजधर्म नाही. प्रत्येक व्यक्तीला आपल्या निवडीच्या धर्माचे पठण, पालन व प्रसार करण्याचा अधिकार आहे. सरकारने कोणत्याही धर्माबाबत अनुकूलता / भेदभाव दाखवता कामा नये. सर्व धर्मांना समान आदराने वागवले पाहिजे. प्रत्येक नागरिकाने सर्व धर्म समभावाचे तत्व आचरणात आणले पाहिजे.
- ❖ भारतीय संविधानाने त्याचा सरनामा आणि मुलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वांवरील प्रकरणांतून समता आणि भेदभावशून्यतेच्या तत्त्वावर आधारलेले धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण केले आहे.
- ❖ केवळ सांप्रदायिक सलोखा व शांततेसाठीच नव्हे तर राष्ट्राच्या अस्तित्वासाठीही धर्मनिरपेक्षतावाद आवश्यक आहे.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. राष्ट्रीय एकात्मिकरणाची व्यख्या करा आणि राष्ट्रीय चळवळीचे राष्ट्रीय एकात्मिकरणाच्या उदयातील योगदान स्पष्ट करा.

२. भारतीय संविधानातून राष्ट्रीय एकात्मिकरणाचा आविष्कार आणि पुरस्कार कसा होतो?

३. राष्ट्रीय एकात्मिकरणाला भारतात असलेली प्रमुख आव्हाने कोणती?

४. राष्ट्रीय एकात्मिकरणाचा पुरस्कार करणारे व त्याला मजबुती देणारे घटक कोणते?

५. धर्मनिरपेक्षतावादाची व्याख्या करून त्याचे भारतीय राजकीय व्यवस्थेसाठीचे महत्त्व स्पष्ट करा.

६. खाली नामांकित स्वातंत्र्ययोद्ध्यांची दोन विधाने दिली आहेत त्यांचा विचार करून राष्ट्रीय एकात्मिकरण आणि धर्मनिरपेक्षतावादाला बळकटी देण्यात भारतीय नागरिकांची भूमिका स्पष्ट करा.

म. गांधी एकदा म्हणाले होते : "मी एक हिंदू आहे आणि मी माझ्या धर्माची शपथ घेऊन सांगतो की मी त्याच्यासाठी प्राणही देईन. पण तो माझा व्यक्तीगत प्रश्न आहे. राज्याला त्याच्याशी काहीही कर्तव्य नाही. राज्य तुमचे लौकिक कल्याण, संप्रेषण, परराष्ट्र संबंध, मुद्रांक इ. ची काळजी घेईल. तुमच्या किंवा माझ्या धर्माची नाही. तो प्रत्येकाचा खाजगी मामला आहे.

म. गांधींच्या निकटवर्ती सहकाऱ्यांपैकी एक असलेल्या मौल्याना आझाद यांनी म्हटले होते "मी एक मुस्लिम आहे आणि ईस्लामच्या गेल्या तेराशे वर्षांच्या वैभवशाली परंपरांचा मी

वारसदार आहे याची मला जाणीव आहे. मी त्याचा तसूभरही ऱ्हास होऊ देणार नाही. मला या गोष्टीचाही तिकाच अभिमान आहे की मी एक भारतीय आहे, भारतीय राष्ट्रीयत्वाचा एक अविभाज्य घटक, त्याच्या बांधणीतला एक महत्त्वपूर्ण घटक ज्याच्याशिवाय त्याचा पवित्र मनोरा अपूर्ण राहिल."

## पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे

### २४.१

१. अ) एकसंग सामाजिक आर्थिक आणि राजकीय रचना

ब) समान अस्मितेची

क) बलशाही आणि वैभवशाली राष्ट्राच्या

ड) हिंदू, ईस्लाम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, जैन आणि पारशी

२. सामाजिक सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक आणि भौगोलिक विविधता असणाऱ्या कोणत्याही देशासाठी राष्ट्रीय एकात्मिकरण आवश्यक असते. भारतासारख्या देशासाठी ते अधिकच महत्त्वपूर्ण असते. भारत हा एक विशाल देश आहे. आपल्या देशाचे एक अनोखे वैशिष्ट्य म्हणजे जातील सर्व मोठे धर्म येथे आचरले जातात. एक हजाराहून अधिक भाषा येथे आहेत. हे सर्व भेद असूनही भारत एक राजकीय घटक आहे. आपल्याला परस्परांबरोबर शांततेने रहावे लागते. हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा राष्ट्रीय एकात्मिकरण खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात आणले जाईल.

### २४.२

१. अ) एकात्म´ एकत्रित

ब) राष्ट्रीयता

क) प्रदेश, धर्म, संस्कृती, समुदाय

ड) १८८५

२. भारतीय संविधान राष्ट्रीय एकात्मिकरणावर खूप भर देते. त्याच्या सरनाम्यास राष्ट्रीय एकता आणि एकात्मता ही प्रमुख उद्दिष्टे आहेत. तो सांगतो की प्रत्येक नागरिकाने राष्ट्रीय एकता एकात्मतेचे रक्षण करणे हे त्यांचे मुलभूत कर्तव्य आहे. केंद्रीत संघराज्य आणि सबल केंद्रसरकारच्या तरतुदी संविधानाने केल्या आहेत.

### २४.३

१. जेव्हा एका धर्माचे लोक आपल्या धर्माप्रती अतिरिक्त प्रेम आणि दुसऱ्या धर्माप्रती तिरस्कार बाळगतात तेव्हा सांप्रदायिकता उपजते. या प्रकारची भावना धार्मिक मूलभूततत्त्ववाद आणि कट्टरतेला उत्तेजन देते जे राष्ट्रीय एकता एकात्मतेला धोकादायक ठरते.

२. प्रादेशिकता समर्थनीय असू शकते जर त्या मागण्या राज्यांच्या / प्रदेशांच्या खऱ्या समस्यांवर आधारलेल्या असतील. विकासाच्या संरचनेत त्यांना विविध प्रकल्पउद्योगांतील न्याय्य वाटा नाकारला गेलेला असू शकतो. एखाद्या प्रदेशाकडे सातत्याने होणाऱ्या दुर्लक्षाशीही त्याचा संबंध असू शकतो. सहा दशकापेक्षाही अधिक नियोजित विकास राबवूनही देशातील सर्व प्रदेश अपेक्षित पद्धतीने विकसित झालेले नाहीत.

३. कारण बहुतांश लोकांना हिंदी येत नाही. तरीही विगर हिंदी भाषिक राज्यांमध्ये हिंदीचा पुरस्कार केला जात आहे. हिंदी भाषिक राज्यांनीही तामिळ, तेलुगु, मल्याळी, कानडी, ओरिया, बंगाली किंवा आसामी सारख्या भाषांचा पुरस्कार करणे आवश्यक आहे.

४. कारण त्या चळवळी हिंसाचाराचा वापर करतात तसेच, सार्वजनिक जीवनात भीती पसरवतात, सरकारी कर्मचारी आणि लोकांची जीवितहानी करतात, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करतात. बहुधा युवक त्यात सहभागी होतात. सततची सामाजिक आर्थिक वंचना तसेच अपमान युवकांना हातात शस्त्र घेण्यास भाग पाडते. त्याऊपर या कारवाया कायदा सुव्यवस्थेला धोका आहेत, तसेच त्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांच्या शांततामय रहिवासाला देखील.

## २४.४

१. धर्मनिरपेक्षतावाद सर्व धर्मांची समानता आणि धार्मिक सहनशीलता मानतो. राज्याच्या परिप्रेक्षात त्याचा अर्थ असा होतो की भारताचा अधिकृत राजधर्म नाही. सरकारने कोणत्याही धर्मास अनुकूल किंवा भेदभावाची वागणूक देता कामा नये. सर्व धर्मांना समान आदराने वागवले पाहिजे. व्यक्तीगत परिप्रेक्षात त्याचा अर्थ 'सर्व धर्म समभाव' असा होतो, सर्व धर्मांसाठी समान आदर. प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या निवडीच्या धर्माचे पठण, आचरण व प्रसाराचा अधिकार आहे.

२. भारतीय संविधानाने त्याचा सरनामा तसेच मुलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वांवरील प्रकरणांतून समता आणि भेदभावशून्यतेच्या तत्त्वावर आधारित धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण केले आहे.

३. प्रत्येक नागरिकाने इतर धर्मांचा आपल्या धर्माइतकाच आदर राखला पाहिजे. कोणताच धर्म व्यक्तीला इतरांकडे दुर्लक्ष करण्यास, त्यांचा तिरस्कार करण्यास परवानगी देत नाही. नागरिकांनी आपल्या सभोवती पाहिल्यास त्यांच्या लक्षात येईल की त्यांचे मित्र, वर्गमित्र, शेजारी किंवा जवळचे रहिवासी त्यांच्यापेक्षा वेगळ्या धर्माचे आहेत. विभिन्न जातींचे आहेत. ते जर इतरांच्या आणि इतरांनी त्यांच्या धर्माचा आदर केला नाहीत तर ते चांगले मित्र, वर्गमित्र किंवा शेजारी कसे होऊ शकतील? त्यामुळेच लोकांनी परस्परांबद्दल आदर बाळगत शांततामय सहजीवन जगणे आवश्यक आहे.

# २५

# सामाजिक-आर्थिक विकास आणि दुर्बल गटांचे सबलीकरण

आपण अनेकदा वृत्तपत्र, मासिके आणि इतर नियकालिकांमधून विविध प्रकारच्या सामाजिक-आर्थिक विकास विषयांबद्दल जसे, दारिद्र्य, बेरोजगारी, रस्ते व पूलबांधणी तसेच दवाखाने व शैक्षणिक संस्थांच्या उभारणीबद्दल वाचतो. विशेषत: निवडणूकांच्यावेळी राजकीय नेते, पक्ष, प्रसारमाध्यमे व मतदार याची चर्चा करतात. जेव्हा केव्हा विकासाची आणि विशेषत: सामाजिक-आर्थिक विकासाची चर्चा होते तेव्हा आपल्या समाजातील दुर्बल गटांच्या सबलीकरणाचा मुद्दा अलिखित होतो. तुम्ही तुमच्या अभ्यासात हा उल्लेख आला असेल. या संकल्पनांचा अर्थ काय? आपण सामाजिक-आर्थिक विकास आणि दुर्बल गटांच्या सबलीकरणातील संबंध का व कसा समजून घ्यायचा? प्रस्तुत पाठात या मुद्यांची चर्चा करण्याचा प्रयत्न केला आहे.

## उद्दिष्टे :

हा पाठ पूर्ण केल्यानंतर तुम्ही पुढील गोष्टी करू शकाल.

- ❖ सामाजिक-आर्थिक विकास, मानवी विकास, प्रादेशिक विकास आणि शाश्वत विकास या संकल्पनांचे विश्लेषण.
- ❖ भारतातील प्रादेीक असमतोल आणि सामाजिक-आर्थिक विषमतांसाठी कारणीभूत विविध घटकांचे स्पष्टीकरण.
- ❖ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि स्त्रिया यांसारख्या दुर्बल घटकांच्या सबलीकरणाशी संबंधित विविध मुद्दे प्रकाशात आणणे.
- ❖ अनुसूचित जातींजमाती, स्त्रिया आणि बालके यांसारख्या गटांशी संबंधित विविध धोरणे व कार्यक्रमांचे मूल्यमापन.

## सामाजिक-आर्थिक विकास आणि दुर्बल गटांचे सबलीकरण

❖ शिक्षण स्वास्थ्य आणि पोषणासारख्या क्षेत्रांशी संबंधित विविध धोरणे व कार्यक्रमांचे अर्थ ग्रहण

## २५.१ सामाजिर्कआर्थिक विकासाचा अर्थ

सामाजिर्कआर्थिक विकास म्हणजे काय? ही संकल्पना समजण्यासाठी विकासाच्या व्याख्येपासून सुरुवात करूया. साधारपणे ज्या स्थितीत गोष्टींमध्ये सुधारणा घडत असतो तिला विकास म्हणतात पण विविध परिप्रेक्षात तिची विविध प्रकारे व्याख्या केली जाते जसे, सामाजिक, राजकीय, जीवशास्त्रीय, विज्ञार्नतंत्रज्ञान, भाषा व साहित्य इ. सामाजिर्कआर्थिक परिप्रेक्षात विकासाचा अर्थ लोकांच्या जीवनशैलीत सुधारित शिक्षण, आवक, कौशल्यविकास आणि रोजगाराच्या माध्यमातून सुधारणा. सांस्कृतिक आणि पर्यावरणीय घटकांवर आधारित अशी ती एक आर्थिर्कसामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे.

### उपक्रम २५.१

तुम्ही काही ठिकाणी वाचले असेल किंवा प्रसारमाध्यमांतून आर्थिक विकास, सामाजिक विकास, मानवी शरीरातील विकास आणि विज्ञान ´ तंत्रज्ञानातील विकास या संकल्पनांबद्दल ऐकले असेल.

विकास या शब्दाचा वापर झालेल्या आणखी काही संज्ञांची एक यादी तुम्ही करू शकता का? किमान आठ संज्ञा लिहा.



**आकृती २५.१ : सामाजिक विकास घटक**

सामाजिक-आर्थिक विकासाची ही प्रक्रिया विविध निदर्शकांच्या माध्यमातून मोजली जाते. जसे सकल घरेलू उत्पादन, आयुर्मर्यादा, साक्षरता आणि रोजगार पातळी. सामाजिर्कआर्थिक विकास आर्थिक स्पष्टपणे समजण्यासाठी सामाजिक व आर्थिक विकासाचा अर्थ वेगवेगळा समजून घेऊ.

सामाजिक विकास ही अशी प्रक्रिया आहे जीची परिणिती सामाजिक आकांक्षापूर्तीची क्षमता वाढवण्यास सक्षम अश्या स्वरूपात सामाजिक संस्थांचे परिवर्तन करू शकते. समाजाच्या जडणघडणीत आणि त्याच्या उपक्रमांमध्ये एक गुणात्मक बदल अभिप्रेत असतो जसे; लोकांची अधिक प्रगतीशील मानसिकता व वर्तन, अधिक परिणामकारक प्रक्रिया आणि प्रगत तंत्रमानाचा स्विकार. तुम्ही पुढे पहालच की पर्या वरण जीवनपद्धती आणि तंत्रज्ञानाचा निकटचा संबंध असतो.

आर्थिक विकास म्हणजे राष्ट्राच्या किंवा प्रदेशाच्या आर्थिक संपत्तीचा त्याच्या रहिवाश्यांच्या कल्याणासाठी विकास. आर्थिक वाढ आर्थिक विकासाची पातळी दर्शवते असे म्हणतात. ‘आर्थिक वाढ’ ही संज्ञा वास्तविक राष्ट्रीय उत्पन्न. (GDP)

दरडोई उत्पन्न यासारख्या परिमाणामधील वाढीकडे निर्देश करते. आर्थिक विकास या संज्ञेत आणखीही बरेच काही अभिप्रेत आहे ती अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे राष्ट्र आपल्या जनतेच्या आर्थिक, राजकीय, आणि सामाजिक हितात वृद्धी घडवून आणते.

**तुम्हास हे माहित आहे का ?**

**सकल घरेलू उत्पादन (जीडीपी) :** सकल घरेलू उत्पादन किंवा सकल घरेलू उत्पन्न हे कोणत्याही अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पादन उत्पन्न मोजण्याचे एक साधन आहे. त्यामध्ये त्या देशाच्या सीमेअंतर्गत असणाऱ्या अर्थव्यवस्थेत तयार झालेल्या सर्व वस्तू व सेवांचे ते एकत्रित मूल्य असते.

**राष्ट्रीय उत्पन्न :** श्रम आणि भांडवल गुंतवणूक धरून एका राष्ट्राच्या लोकांनी कमवलेले उत्पन्न / मिळकत म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न दिलेल्या काळात (साधारणत: एक वर्ष) राष्ट्रातील सर्व उत्पन्न (रोजगार व नफा, व्याज, भाडे व सेवानिवृत्ती वेतन)

**दरडोई उत्पन्न :** एकूण राष्ट्रीय उत्पन्न भागिले राष्ट्राची एकूण जनता. वार्षिक राष्ट्रीय उत्पन्न सर्वांमध्ये समान पद्धतीने वाटल्यास हा प्रत्येकाचा हिस्सा ठरेल.

म्हणून आर्थिक विकास ही विविध पद्धतीची सुधारणा प्रक्रिया आहे. एका देशातील मानवी जीवनाच्या सर्व पैलूंवर तिचा प्रभाव पडला पाहिजे. पण सामाजिक आर्थिक विकासाची प्रक्रिया विकासाच्या सर्व पैलूंची काळजी घेते असे तुम्हाला वाटते का? त्याचा प्रमुख दर्शक (जीडीपी) हा अशा आर्थिक कल्पनांचा परिणाम आहे. ज्यात मोकळा वेळ, पर्यावरणीय गुणवत्ता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, लिंगभाव समता यासारख्या महत्त्वाच्या पैलूंचा विचार केला जात नाही. दरडोई उत्पन्नाचा दर्शक लोकांमधील उत्पन्नाची समानता दाखवत नाही. विकासाचे लाभ समानतेने वाटले गेले आहेत किंवा विशेषत: ते दुर्बल घटकांपर्यंत पोहचत आहेत का याची हे दर्शक खबरदारी घेत नाहीत. म्हणूनच मानवी विकास ही नवी संकल्पना वापरात आली आहे. दिलेल्या देशातील लोकांच्या आयुष्याची गुणवत्ता, संधी आणि स्वातंत्र्यावर तिचा भर आहे.

## २५.२ मानवी विकास

आपण पाहिल्याप्रमाणे आपण आर्थिक विकासाबाबत बोलतो तेव्हा बहुधा उत्पन्नावर भर असतो. बराच काळापर्यंत विकासाची कल्पना ही संपत्ती किंवा आर्थिक ठेवी गोळा करणे अशी होती. पण मानवी विकासाचा भर लोकांच्या निवडी विस्तारणे तसेच कल्याणाची पातळी वाढवणे असा आहे. मानवी आयुष्याचे आणि लोकांच्या निवडीचे सर्व पैलू आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, शारीरिक, जैविक, मासिक व भावनिक त्याखाली येतात. मानवी विकास माणसाला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवतो आणि केवळ उत्पन्न नव्हे तर माणसाच्या निवडी वाढवण्यावर भर देतो. त्यात आर्थिक वाढ आवश्यक मानली जाते पण त्याची गुणवत्ता व वितरणाकडे लक्ष देण्यावरही आग्रह असतो.





### तुम्हास हे माहित आहे का ?

मानवी विकासाची संकल्पना पाकिस्तानी अर्थतज्ञ डॉ. महबूब-उल-हक यांनी विकास जो लोकांच्या निवडीचे पर्याय वाढवतो व जीवन सुधारतो अशी मांडली. भारतीय नोबेलविजेते प्राध्यापक अमर्त्य सेन यांनी या संकल्पनेच्या उगमात महत्त्वाचे योगदान दिले आणि स्वातंत्र्य वाढवणारा विकास अशी त्याची व्याख्या केली.

मानवी विकास निर्देशांक (HDI) १९९० मध्ये डॉ. हक आणि अमर्त्य सेन यांचा समावेश असणाऱ्या एका अर्थशास्त्रज्ञांच गटाने विकसित केला. तेव्हापासून संयुक्त राष्ट्र विकास कार्य क्रमाने आपल्या वार्षिक मानवी विकास अहवालात त्याचा वापर केला आहे.

तुमच्या आता लक्षात येईल की मानवी विकास आराखड्याला अनुसरून जर एखाद्या राष्ट्राची सामाजिक आर्थिक विकास होणार असेल तर तो विकासाचे व लोकांच्या जीवनावरील त्याच्या परिणामाचे अधिक चांगले आकलन होण्यास मदत करतो. आपण HDI चा जेव्हा मानवी विकासाचे परिणाम म्हणून वापर करतो तेव्हा हे अधिक चांगल्या रितीने समजते. HDI चा प्राथमिक उपयोग एखाद्या देशाची प्रगती मोजण्यासाठीच होतो.

तक्ता २५.१ मध्ये दाखविल्याप्रमाणे मानवी विकास निर्देशांक तीन प्राथमिक दर्शक आणि त्यांचे आयाम एकत्र करतो.


**तक्ता २५.१ मानवी विकास निर्देशांक : निर्देशांक आणि आयाम**

| अनु. क्र. | निर्देशांक | आयाम |
|---|---|---|
| १ | प्रदीर्घ व आरोग्य आयुष्य | जन्मावेळी आयुर्मर्यादा ' लोकसंख्येच्या स्वास्थ्य व दीर्घायुष्याचा निर्देशांक |
| २ | ज्ञान व शिक्षण | प्रौढ साक्षरता दर<br>प्राथमिक, द्वितीयक व तृतीयक असे एकत्रित ढोवळ भरती गुणोत्तर |
| ३ | चांगले जीवनमान | क्रयशक्ती (US डॉलर मध्ये) शी संलग्न |

### तुम्हास हे माहित आहे का ?

वर उल्लेखिलेल्या निर्देशांकांशी संबंधित माहितीच्या आधारावरील विकासाचा समावेश करून १९९० मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमे (UNDP) मानवी विकास अहवाल सादर केला. तेव्हापासून दर वर्षी हा अहवाल प्रकाशित होतो आणि प्रत्येक निर्देशांकातील प्रगतीच्या आधारावर देशांना गुणोनुक्रम दिला जातो.

मानवी विकास अहवालाचे विश्लेषण असे दाखवते की भारत बहुधा नेहमीच मध्यम पातळी वर्गात तळाशी राहिला आहे सन २००७-०८ मध्ये अहवालातील १७७ देशांमध्ये भारत १२८ वा होता. भारत सरकारने राज्यवार मानवी विकास निर्देशांक तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. आकृती २५.२ मध्ये तुम्ही राज्यनिहाय बदल पाहू शकता.




आकृती २५.२ : भारत : राज्यनिहाय मानवी विकास निर्देशांक २००१

## उपक्रम २५.२

वर दिलेल्या भारताच्या मानवी विकास निर्देशांक नकाशाचा अभ्यास करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.


१. HDI संदर्भात तुमच्या राज्याची स्थिती काय आहे? त्यामागची दोन कारणे लिहा.

२. अत्यंत जास्त आणि अत्यल्प HDI असणारी भारतातील दोन राज्ये शोधा.

३. उच्च आणि अल्प HDI ला कारणीभूत तीन घटक सांगा.

## २५.३ शाश्वत विकास

आपण सर्वांनी हे पाहिले व अनुभवले आहे की आपण आपल्या गरजा भागविण्यासाठी बेदरकारपणे नैसर्गिक साधनसंपत्ती वापरत आहोत, आत्ताच्या दराने जर वापर होत राहिला तर पेट्रोल, कोळसा यासारखी अनेक खनिजे येत्या काही दशकात संपतील असे म्हणतात. पुढच्या पिढ्यांना ही खनिजे वापरण्याची सुविधा नसेल. आपल्या पिढीने भावी पिढ्यांची या संसाधनांपासून वंचना करणे योग्य आहे का? या परिप्रेक्षात शाश्वत विकासाच्या संकल्पनेचा उदय झाला. तिची व्याख्या पुढील पिढ्यांच्या गरजपूर्तीच्या क्षमतेशी तडजोड न करता वर्तमानाच्या गरजा भागवणारा विकास म्हणजे शाश्वत विकास




आकृती २५.३ : शाश्वत विकास

बऱ्याच लोकांना असे वाटते की ती फक्त पर्यावरणीय परिप्रेक्षात सुसंगत आहे पण तसे नाही, ती फक्त पर्यावरणीय मुद्यांवर भर देत नाही. आकृतीत दाखविल्याप्रमाणे तिच्यात सामाजिक, आर्थिक, व्यक्तीगत आणि पर्यावरणीय विकासाचा अंतर्भाव होतो. तो सामाजिक आर्थिक परिवर्तनाच्या असा आराखडा आहे जो वर्तमानातील सामाजिक आर्थिक लाभांमध्ये भविष्यात तसे लाभ मिळण्याच्या शक्यतांवर विपरित परिणाम न करता वृद्धी घडवून आणतो. अनेक मानवी पिढ्यांपर्यंत सुरू ठेवता येईल अशा प्रकारची सामाजिक आर्थिक हिताची यथार्थ आणि समतोल वितरणाची पातळी साध्य करणे हा तिचा प्राथमिक उद्देश आहे. समाजातील दुर्बल घटकांसह सर्व गटांच्या हितांचे ती रक्षण करते.

## २५.४ भारतातील सामाजिक-आर्थिक विकास

विकास, सामाजिक-आर्थिक विकास, मानवी विकास व शाश्वत विकास या चार संकल्पनांशी निगडीत महत्त्वाच्या गोष्टींच्या विविध पैलूंचा आपण आत्तापर्यंत विचार करत होतो. त्याच्या आपण केलेल्या अर्थग्रहणावरून आता भारतात होत असलेला सामाजिक-आर्थिक विकास समजून घेऊया. अगदी स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच या देशाच्या प्रगतीसाठी विविध प्रयत्न होत राहिले असले तरी १९९० पासून विकसनशील देशांमधील दुसरी झपाट्याने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताचा उदय झाला. बाजार दराच्या दृष्टीने भारत जगातली बारावी तर क्रयशक्ती  वर मोजलेल्या GDP च्या दृष्टीने भारत जगातली चौथी अर्थव्यवस्था आहे असे म्हणतात.

यावरोबरच आयुर्मर्यादा तसेच साक्षरता दर यांच्यात वाढ आणि अन्न सुरक्षाप्राप्ती साधली गेली. दारिद्र्यातही बरीच घट आहे. मात्र सरकारी आकडेवारी असे सांगते की २७.५% (सन २०१४-०५) भारतीय US $ 1 (PPP), (साधारण १० रुपये) दर दिवशी या राष्ट्रीय दारिद्र्य रेषेखाली राहतात. असेही म्हटले जाते की भारताच्या अलीकडच्या आर्थिक वाढीने देशभरात आर्थिक असमानता वाढवली आहे. सातत्यपूर्ण उच्च आर्थिक वाढीचा दर असूनही सुमारे ८०% लोक  US $ 2 (PPP), प्रति दिवशी या रेषेखाली राहतात. जरी हरित क्रांतीने देशातील दुष्काळ संपवून सर्व जनतेसाठी अन्नोत्पादन केले असले तरी, ३ वर्षे वयाखालील ४०% बालके कमवजनी आहेत आणि एक तृतीयांश स्त्रीपुरुषांना तीव्र ऊर्जा कमतरता भासते.

### ? तुम्हास हे माहित आहे का ?

**क्रयशक्ती (PPP) :** विविध देशांची सापेक्ष क्रयशक्ती मोजण्याचे एक परिमाण आहे. PPP चा उपयोग देशांच्या राहणीमानाच्या दर्जातील फरक शोधण्यासाठी झाला आहे. तत्पूर्वी ही तुलना दरडोई उत्पन्नाआधारे होत असे पण अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांनी ती पद्धत सोडली कारण त्यातून एक दिशाभूल करणारे चित्र निर्माण होत असे. अनेक देशांच्या क्रयशक्तीत प्रचंड फरक आहे. एका अमेरीकन डॉलरमध्ये अमेरीकेत जितक्या वस्तु खरेदी करता येत नाहीत त्यापेक्षा खूप जास्त वस्तु त्याला सममूल्य असणाऱ्या ५० रुपयांत भारतात खरेदी करता येतात. म्हणजे $ 1000 ला सममूल्य असे भारतीय चलन गुंतवून माणूस भारतात जितका सुखाने राहू शकतो तितका तो अमेरीकेत तेवढ्याच गुंतवणूकीत राहू शकत नाही.

## पाठ्यांशावरील प्रश्न २५.१

१. GDP आणि दरडोई उत्पन्न लोकांच्या जीवनाच्या गुणवत्तेचे परिणामकारक मापन का करू शकत नाहीत?

________________________________________

________________________________________

२. सामाजिक-आर्थिक विकासाच्या पारंपरिक संकल्पनेपेक्षा मानवी विकासाची संकल्पना वेगळी कशी आहे?

________________________________________

________________________________________

३. शाश्वत विकासाची व्याख्या करा.

________________________________________

________________________________________

४. विकास आणि कमतर विकास भारतात एकाच वेळी कसे आहेत? त्याची प्रमुख कारणे ओळखा.

________________________________________


________________________________________

## २५.५ प्रादेशिक विकास : भारतातील असमतोल आणि सामाजिक-आर्थिक विषमता

आपण वर म्हटले की सामाजिक-आर्थिक विकासाचे भारतातील सर्व प्रयत्न हे देशाच्या सर्व प्रदेशांच्या सर्वकष विकासावर केंद्रित होते. स्वातंत्र्यानंतर लगेच सुरू करण्यात आलेल्या विकास नियोजनाचे प्रमुख उद्दिष्ट सर्व प्रदेशांचा विकास करून प्रादेशिक विषमता घटवणे असे होते. नियोजन व अंमलबजावणी प्रक्रियांनी प्रादेशिक विकासाच्या दृष्टीकोनावर लक्ष दिले. पण भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील काही किचकट प्रश्नांपैकी एक म्हणजे तीव्र आणि सतत वाढणारी विविध राज्य व केंद्रशासित प्रदेशांमधील दरी.

काही फरक हे निसर्गनिर्मित असतात. तुम्ही आकृती २५.४ मध्ये ते पाहू शकता. काही प्रदेशांची नैसर्गिक रचना सपाट असते. सुपीक गाळाची मृदा आणि मुबलक पाणी असते जसे गंगासिंधु पठार; तर काही भाग हे डोंगराळ दाट वनांचे आणि कमी सुपीक मृदेचे असतात जसे ईशान्य भारत हे निसर्ग निर्मित फरक प्रादेशिक विविधता म्हणून ओळखले जातात पण काही फरक हे मानव निर्मित असतात.

त्यांचा संबंध दरडोई उत्पन्न, शेतकी वाढ, औद्योगिक वाढ, वाहतूक दळणवळण सुविधांचा विकास, साक्षरता, आरोग्य पातळी इ. शी असतो. प्रदेशांमधील मानवनिर्मित फरक किंवा तफावती विषमता म्हणून ओळखल्या जातात. आकृती २५.५ पाहून तुम्हाला विषमता अधिक चांगल्या प्रकारे समजेल. ह्या विषमता चिंतेचा विषय आहेत. पुढील गोष्टीसंबंधाने आपण त्यांचे विश्लेषण व आकलन करण्याचा प्रयत्न करूया.



**आकृती २५.४ : विविधता**



**आकृती २५.५ : विषमता**

## अ) भारतातील विषमता :

१. **दरडोई उत्पन्न :** दरडोई उत्पन्न हे त्या विशिष्ट प्रदेशातील आर्थिक उपक्रमांच्या पातळीचे सार असते. यात प्रचंड प्रादेशिक विषमता आहे. सन. २००५०६ मध्ये दरडोई उत्पन्नाची राष्ट्र ीय सरासरी रु. २५,७१६ होती. केवळ अकरा राज्यांमध्ये राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक दरडोई उत्पन्न होते. राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी दरडोई उत्पन्न असणारी तळाची सात गरीब राज्ये म्हणजे बिहार, उ. प्रदेश, म. प्रदेश, ओरिसा, राजस्थान, झारखंड आणि छत्तीसगढ. या सात राज्यांत मिळून भारताची निम्म्यापेक्षा अधिक लोकसंख्या राहते.

२. **दारिद्र्य :** काळानुसार राज्यानिहाय दारिद्र्य गुणोत्तरात घट झाली आहे. बृहत् पातळीवर दारिद्र्य घटले असले तरी ग्रामीण शहरी व आंतरराज्य विषमता आहेतच. ओरिसा, उ. प्रदेश, छत्तीसगढ, बिहार, उ. प्रदेश, झारखंड या राज्यांचे दारिद्र्य गुणोत्तर अजूनही बरेच आहे. ग्रामीण ओरिसा (४३%) आणि ग्रामीण बिहार (४०%) चे दारिद्र्य गुणोत्तर जगातील सर्वात वाईट गुणोत्तरांपैकी आहे. दुसरीकडे ग्रामीण हरियाणा (५.७%) आणि ग्रामीण पंजाब (२.४%) यांची जगातल्या मध्यम उत्पन्न देशांशी चांगली तुलना होते.

३. **औद्योगिक वाढ :** भारतातील उद्योगव्यवसायांचे सुरुवातीचे वाटप ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या हिताप्रमाणे चालणाऱ्या ऐतिहासिक विकास प्रक्रियेने ठरवले. त्यामुळे बहुतांश उद्योग निवडक केंद्रात केंद्रीत झाले. विविध प्रदेशांच्या औद्योगिकीकरणाची प्रक्रिया राबवूनही तो कल स्वातंत्र्यानंतरही सुरूच राहिला आहे.

४. **शेतकी वाढ :** शेतकी वाढीतील प्रादेशिक विषमता काळानुरूप वाढतच गेली आहे त्यात पंजाब, हरियाणा आणि उ. प्रदेशासारखी राज्ये पुढे गेली. दरडोई सरासरी धान्य उत्पादन पंजाबात अधिकतम आणि केरळात न्यूनतम झाले. सिंचित प्रदेशाबाबतीत मिझोरम आणि महाराष्ट्र सर्वात खाली आहेत. व्यापक सिंचन सुविधा आणि खतांचा प्रकर्षाने वापर यामुळे पंजाब व हरियाणासारख्या राज्यांना शेतकी वाढीचा उच्च दर साधता आला. बहुतांश राज्यांमध्ये अजूनही शेतकी विकासाने अपेक्षित वेग आणि क्षमता गाठायची आहे.

५. **साक्षरता :** हा सामाजिक आर्थिक विकासच एक महत्त्वाचा निदर्शक असतो पण त्यात प्रचंड प्रादेशिक विषमता आढळते. २००१ च्या जनगणनेनुसार केरळात सर्वाधिक तर बिहारमध्ये सर्वात कमी साक्षरता आहे. संपूर्ण भारताचा सरासरी साक्षरता दर ६५.३८% होता, तर केरळचा ९०.९२% आणि बिहारचा केवळ ३७.५३ इतर राज्यामध्येही बराच फरक आहे.

६. **वाहतूक व दळणवळण :** भारतात विविध प्रकारची वाहतुक व दळणवळण व्यवस्था आहे. वाहतुकीचे सामान्य प्रकार म्हणजे रेल्वे, रस्ते, हवाईमार्ग व जलमार्ग त्यातील कुठल्याही एकाची माहिती पाहता त्यासंदर्भातील विषमतांचे अर्थग्रहण करता येईल. रस्ते लांबीच्या बाबतीत काही राज्यांमध्ये त्याची परिस्थिती विकट आहे तर काही राज्ये पुढारलेली आहेत. दर १०० किमी मागील रस्तेलांबीसंबंधाने केवळ सर्वात वर तर जम्मू-काश्मिर सर्वात खालच्या स्थानी आहे.

### ब) प्रादेशिक विषमतांची कारणे :

विविध प्रदेशांमधील प्रादेशिक विषमतांची कारणे शोधण्याचा जेव्हा आपण प्रयत्न करत असतो तेव्हा एखाद्या विशिष्ट प्रदेशाच्या कमी विकासामागे लोकसंख्यावाढ, निरक्षरता आणि पायाभूत साधन सुविधांचा अभाव असावा असे आपण बहुधा मानत असतो. पण आपण जर या कारणांचे आणखी विश्लेषण केले तर असे लक्षात येईल की ही मागास राज्यांच्या अल्प विकासाची केवळ कारणे नव्हे तर परिणामही आहेत. उदाहरणार्थ अनेक कर्मीविकसित राज्यांमद्ये अनिर्बंध लोकसंख्या वाढ, निरक्षरता आणि प्राथमिक साधन सुविधांचा अभाव आहे कारण पुढारलेल्या राज्यांसारखी सामाजिक आर्थिक विकास या राज्यात झाला नाही. त्यामुळे खालील मुख्य कारणांचा आढावा घेणे रोचक ठरेल.

१. **ऐतिहासिक दृष्टीकोन :** स्वातंत्र्यपूर्व काळात वसाहतवादी राज्यात व्यावसायिक किंवा राजकीयदृष्ट्या विनमहत्त्वाच्या ठिकाणांना कमी महत्त्व दिले गेले. अजूनही त्या प्रदेशांकडे उद्योजक दुर्लक्ष करतात. मध्य व ईशान्य भारतातले डोंगराळ प्रदेश त्यातील प्रमुख होते.

२. **भौगोलिक घटक :** एखाद्या प्रदेशाची नैसर्गिक रचना त्याच्या प्रगतीवर बंधने आणू शकते. राजस्थानचे वाळवंट किंवा ईशान्येकडील कठीण टेकड्यांचा प्रदेश त्याची उदाहरणे आहेत.

३. **नैसर्गिक साधनसंपत्तीचे असमान वितरण आणि वाटपातील वैविध्य :** तुम्हाला माहीत असेलच की कोळसा, लोहखनिज, तेल, नैसर्गिक वायु आणि इतर नैसर्गिक साधनसंपदा सर्व राज्यांत उपलब्ध नाही. पण त्या राज्यांचा विकास केवळ या उपलब्धतेने निर्धारित झाला नाही. काही राज्यांनी या विशेष उपलब्धीचा चांगला उपयोग घेतला पण विहार, ओरिसा आणि झारखंडसारख्या काही राज्यांना ते शक्य झाले नाही.

४. **राष्ट्रीय बाजारापासून दुर्गम क्षेत्र :** प्रदेशांचे राष्ट्रीय बाजारपेठेपासूनचे अंतरही त्यांच्या अर्थव्यस्थेच्या विकासावर परिणाम करते. विशेषत: ईशान्य प्रदेशांबाबात त्यांच्या आर्थिक विकास प्रक्रियांमध्ये बदल घडवणे शक्य झाले नाही.

५. **पायाभूत साधन सुविधांचा अभाव :** ज्या राज्यांनी रस्ते, वीज आणि वाहतुकीसारख्या साधन सुविधा विकसित केल्या त्यांनी सामाजिक आर्थिक विकासात झपाट्याने वेग घेतला. हे करू न शकलेल्या राज्यांना मिळालेल्या गुंतवणूकीचा यथायोग्य विनीयोग तसेच खासगी गुंतवणुकदारांना आकर्षित करणे कठीण जात आहे.

६. **निम्न प्रशासन :** सामाजिक आर्थि विकासावर प्रभाव पाडणारा महत्त्वाचा घटक म्हणजे प्रासनाची गुणवत्ता. प्रगत राज्यांमध्ये सुशासनाचा मोठा कळ होता हे तुम्ही पाहिले असेल. दुसरीकडे मागास राज्यांना पायाभूत साधन सुविधा विकसित करता आल्या नाहीत, कायदा सुव्यवस्थेच्या प्रश्नांची ते लढत आहेत, तसेच नियोजन आयोगाने दिलेल्या राष्ट्रीय संसाधनांच्या यथायोग्य उपयोग करता आलेला नाही. प्रशासनाचा निम्न दर्जा खासगी गुंतवणुकदारांना गुंतवणूक किंवा इतर उत्पादक उपक्रम हाती घेण्यापासून परावृत्त करतो.

## पाठ्यांशावरील प्रश्न २५.२

१. विविधता आणि विषमता यातील फरक सोदाहरण स्पष्ट करा.

________________________________________

________________________________________

२. भारतात प्रादेशिक विषमता निर्माण करण्यात वसाहतवाद एक महत्त्वाचा घटक कसा?

________________________________________

________________________________________

३. खालीलपैकी कोणते एक राज्य आर्थिकदृष्ट्या विकसित मानता येईल?

अ) विहार     ब) अरुणाचल प्रदेश

क) ओरिसा     ड) हरियाणा

४. भारतातले डोंगरी प्रदेश इतर प्रदेशांच्या तुलनेत मागास का आहेत? खालीलपैकी योग्य विधान निवडून लिहा.

अ) त्या प्रदेशात नैसर्गिक साधनसंपत्ती फारशी नाही.

ब) त्या प्रदेशात मोठे उद्योगधंदे नाहीत.

क) स्थानिक लोकांसाठीची आर्थिक तसेच मानवी विकास फारच अल्प आहे.

ड) वरीलपैकी कोणतेही नाही.

## २५.६ समाजातील दुर्बल घटक :

आपण या पाठात सातत्याने भर देत आलो आहोत त्याप्रमाणे सामाजिकआर्थिक विकासाचे अंतिम ध्येय समाजाच्या प्रत्येक घटकाला त्याच्या विकास प्रक्रियेत समाविष्ट करून घेणे असा आहे. सर्वांना विकासाच्या प्रदानांचा लाभ घेण्यास समान अवकाश, तसेच उर्ध्वगामी सामाजिकआर्थिक चलनाची समान संधी मिळायला हवी. अनेक सामाजिक गटांसोबत सामाजिक व आर्थिकरित्या भेदभाव होतो त्यामुळे ते विकासप्रक्रियेत पूर्णपणे आणि मोकळेपणी सहभागी होऊ शकत नाहीत तसेच तिचा लाभ घेऊ शकत नाही. त्यांना दुर्बल घटक म्हणून ओळखले जाते. त्यातील काही गट म्हणजे अनुसूचित जाती (SC) अनुसूचित जमाती (ST), आणि मागास वर्ग (OBC), महिला आणि अल्पसंख्या २00१ च्या भारताच्या जनगणनेनुसार, SC ँ १६.२३% तर ST हे ८.२% आहेत. अल्पसंख्य व मागासवर्गी यांचाही वाटा मोठा आहे. महिला एकूण लोकसंख्येच्या साधारण निम्म्या आहेत. आपण SC, ST व महिलांच्या सबलीकरणासाठीच्या प्रयत्नांची चर्चा करूया.

## २५.७ अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींची सबलीकरण :

अनुसूचित जाती व जमातींच्या सबलीकरणाची आवश्यकतेची जाणीव स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी व ह्या समूहांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी भासली होती. या समूहांच्या विकासासाठी आपले संविधान विविध तरतूदींखाली अनेक वचने देते. त्या वचनांच्या पूर्ततेसाठी भारत सरकारने एक त्रिभुज नीती अवलंबली आहे. (१) सामाजिक सबलीकरण (२) आर्थिक सबलीकरण विषमता नष्ट करणे, शोषण व दमन नाहिसे करणे, आणि दुर्बल घटकांना संरक्षण देणे यासाठी (३) सामाजिक न्याय.

### अ) सामाजिक सबलीकरण :

दुर्बल घटकांच्या सामाजिक आर्थिक सबलीकरणाचे सर्वात महत्वपूर्ण साधन शिक्षण असल्याने या गटांच्या शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी शिक्षणाला उच्च प्राधान्य सातत्याने दिले जात आहे. पुढील पावले महत्वाची आहेत;

- प्राथमिक शिक्षणासंदर्भात शिकवणी शुल्क माफी, मोफत पुस्तके, माध्यान्ह भोजन आणि शिष्यवृत्त्यांच्या रुपाने प्रोत्साहन सुरू आहे. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, नवोदय विद्यालय व राष्ट्रीय प्रज्ञा शोध योजनेतील ST विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष आहे.

- काही महत्त्वाचे शिष्यवृत्ती कार्यक्रम आहेत. माध्यमिकोत्तर शिष्यवृत्ती माध्यमिक शिक्षणापुढे जाण्यासाठी दिली जाते. सफाई कामगार व इतर हलकी कामे करणाऱ्या लोकांच्या मुलांना शिक्षण घेण्यास प्रवृत्त करण्यासाठी पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती दिली जाते. गुणवत्तासुधार योजना उपचारात्मक व विशेष शिकवणी पुरवते. राजीव गांधी राष्ट्रीय SC विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण व संशोधनास प्रोत्सान देते.

- स्पर्धा परिक्षांसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष शिकवणी दिली जाते.

- उर्ध्वप्राथमिक पातळीपासून पुढे शिक्षण घेण्यासाठी मुले व मुलींना वसतीगृहे पुरवली जातात.

### ब) आर्थिक सबलीकरण :

सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या सबलीकरणासाठी रोजगार व उत्पन्न निर्मिती कार्यक्रम राबवण्यात येतात. पुढील शिखर वित्तीय संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत.

- राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (NSKFDC) लाभार्थ्यांना वित्तीय व इतर सहाय्य उत्पन्न निर्मितीचे उपक्रम हाती घेण्यासाठी पुरवते.

- राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ (NSKFDC) सफाई कर्मचाऱ्यांना उत्पन्न निर्मितीचे उपक्रम हाती घेण्यासाठी वित्तीय व इतर साहाय्य पुरतवे.

- राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ (NSTFDC) विविध उत्पन्न व रोजगार निर्मिती योजनांना कर्ज, प्रसिद्धी सहाय्य, प्रशिक्षण इ. तून सहाय्य करते.

- ❖ अनुसूचित जाती विकास महामंडळे, (STDCs) रोजगाराभिमुख योजनांना ज्यात शेती व इतर संलग्न कार्ये येतात तसेच अल्प सिंचन, लघुउद्योग, वाहतूक व व्यापार व सेवा क्षेत्र इ. ना वित्तसहाय्य करतात.
- ❖ अनुसूचित जमाती विकास महामंडळे, (STDCs) लाभार्थ्यांना वित्त व इतर सहाय्य पुरवतात. Tribal Cooperative Marketing Development Federation of India Ltd. (TRIFED) अनुसूचित जमातींना किरकोळ वनोत्पादन व अतिरिक्त शेती उत्पादन गोळा करण्यास बाजारी करणाचे सहाय्य करते.

### क) सामाजिक न्याय :

भारताचे संविधान शोषण व सर्व प्रकारच्या अन्यायापासून स्वातंत्र्य देते. काही संरक्षक कायदेसुद्धा करण्यात आले आहेत. नागरी हक्क संरीण कायदा १९५५, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (Atrocities प्रतिबंध) कायदा १९८९, अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वनवासी (जंगल हक्क Recognition) कायदा २00७ हे महत्त्वाचे आहेत.

## २५.८ महिला सबलीकरण :

भारतीय संविधानाच्या सरनाम्यात लिंगभाव समानतेचे तत्त्व अधिष्ठीत आहे, त्याचप्रमारे मुलभूत हक्क, मुलभूत कर्तव्य आणि मार्गदर्शक तत्त्वांतही संविधान केवळ महिलांना समता देत नाही तर त्यांच्या बाजूने सकारात्मक भेद करण्यासाठी राज्याला पावले उचलण्यास सक्षम करते. तरीसुद्धा स्वीकृत ध्येयसंबंधित यंत्रणा एका बाजूला आणि स्त्रियांचा प्रत्यक्षातील दर्जा दुसऱ्या बाजूला बरीच तफावत राहते. शिक्षण, आरोग्य व उत्पादन साधनांचा महिलांच व विशेषत: दुर्बल घटकांतील महिलांचा वापर फार कमी आहे. त्या बऱ्याचदा डावळलेल्या गरीब आणि सामाजिकदृष्ट्या वगळत्या गेलेल्या राहतात. पण विविध कार्यक्रम आणि अनेक प्रयत्न आकृती २५.६ मध्ये दाखविल्याप्रमाणे महिला सबलीकरणासाठी सुरू आहेत. महिला सबलीकरणासाठी पुढील पावले उचलण्यात आली आहेत.



चित्र २५.६ : महिला सबलीकरण

### अ) आर्थिक सबलीकरण :

- दारिद्र्यरेषेखालील बहुसंख्य लोकसंख्या स्त्रियांची असल्याने दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम त्याच्या गरजा व समस्यांवर विशेष लक्ष पुरवतात.
- शेती व संलग्न क्षेत्रातील उत्पादक म्हणून त्यांची भूमिका लक्षात घेता प्रशिक्षण, आणि विविध कार्यक्रमांचे लाभ त्यांच्या संख्येच्या प्रमाणात त्यांच्यापर्यंत पोहोचावेत यासाठी संयुक्त प्रयत्न सुरू आहेत.
- श्रम विधेयके, सामाजिक सुरक्षा व इतर सहाय्य सेवांसंदर्भात सर्वकष प्रयत्न करून महिलांना विविध औद्योगिक क्षेत्र, विशेषत: इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, अन्न प्रक्रिया, कृषी उद्योग आणि वस्त्रोद्योग इ. मध्ये सहभागी करण्यास सक्षम करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.
- बालक देखभाल सुविधा, पाळणाघरे व शैक्षणिक संस्था, वृद्धाश्रम व शारीरिक हतबल्द्धांसाठी देखभालगृहे इ. ची सोय करून एक सकारात्मक वातावरण पुरवून त्यांचे राजकीय, आर्थिक व सामाजिक जीवनात पूर्ण सहकार्य मिळवण्याचे प्रयत्न केला जात आहे.

### ब) सामाजिक सबलीकरण :

- महिला व मुलींना शिक्षणाचा समान लाभ घेता यावा, भेदभाव नाहीसा व्हावा, शिक्षणाचे सार्व त्रीकरण व्हावे, निरक्षरता निर्मूलन, लिंगभाव जागरूक शिक्षण व्यवस्था मुलींचा शिक्षणात दाखल होण्याचा दर वाढवणे व राखणे, आयुष्यभर शिक्षण घेण्यासाठी शिक्षणाचा दर्जा वाढवणे त्याचप्रमाणे, महिलांची नोकरी / व्यवसायिक / तांत्रिक कौशल्यांची वाढ करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.
- पोषण व स्वस्थ्य सुविधांचा समावेश असलेला स्त्रीयांच्या आरोग्यासंबंधीचा एक सर्वकष दृष्टीकोन अवलंबला जात आहे. तसेच जीवनचक्रातील प्रत्येक टप्प्यावर स्त्रीया व मुलींच्या गरजांकडे विशेष लक्ष दिले जात आहे.
- कुपोषण व वाढत्या आचारांना डोळ्यापुढे ठेऊन, जीवनचक्राच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्रियांच्या पोषण गरजांकडे विशेष लक्ष दिले जात आहे.
- स्त्रियांविरुद्धचा सर्व प्रकारच्या हिंसेचा शारीरिक व मानसिक, घरगुती किंवा सामाजिक पातळीवरचा, रुढीपरंपरा व स्वीकृत चालीरितींमधून उद्भवणाऱ्या अश्या सर्व प्रकारच्या हिंसेचा नायनाट करण्याला सर्वोच्च प्राधान्य मिळत आहे.

### क) राजकीय सबलीकरण :

स्वातंत्र्यापासूनच स्त्रियांना मतदानाचा व निवडणूका लढवण्याचा अधिकार आहेच. प्रशासनाच्या सर्व पातळ्यांवर निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याचाही त्यांना अधिकार आहे. ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३.३% आरक्षण देऊन राजकीय संरचनेत महिलांना समान लाभ घेण्याची संधी व वृद्धींगत सहभाग साधण्यात ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्त्यांनी (१९९३) फार मोठा वाटा उचलला. सार्वजनिक जीवनात महिलांची भूमिका वाढवण्यात याचे योगदान आहे. लोकसभा व राज्यसभेत जागा आरक्षित करणारे विधेयक संसदेच्या विचाराधीन आहे.

## उपक्रम २५.३

स्त्रियांविरुद्द भेदभावाच्या विविध स्थिती खाली दिल्या आहेत.

| अ. क्र. | स्थिती | कारणे |
|---|---|---|
| १ | बहुतांश कुटुंबात मुलींना मुलांप्रमाणे शिक्षणाच्या समान संधी व सुविधा मिळत नाहीत का? | |
| २ | पुरुषांच्या आजारासारख्या गांभीर्याने स्त्रियांचे जसे आई, बहीण, वहिनी यांचे आजार घेतले जात नाहीत का? | |
| ३ | बहुतांश घरकामे स्त्रिया करतात. पुरुष वाटून घेत नाहीत का? | |
| ४ | मुलाप्रमाणे मुलीचा जन्म घरात साजरा केला जात नाही का? | |

वरील स्तितींची अभ्यास करून पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.

१. आपल्या समाजात ही असमानता का आहे? तीन कारणे द्या.

२. असमानता घालवण्यासाठी तीन उपाययोजना सांगा.

## पाठ्यांशावरील प्रश्न २५.३

१. काही महत्त्वाचे सामाजिक दुर्वल घटक कोणते?

________________________________________

________________________________________

२. अनुसूचित जाती व जमातींना सामाजिक आर्थिक विकासाचा लाभ घेण्यास सवल करण्याचे प्रयत्न यशस्वी झाले आहेत का? तीन कारणे द्या.

________________________________________

________________________________________

३. आजपर्यंतचे प्रयत्न आपल्या समाजातील महिलांना सवल का करू शकले नाहीत?

________________________________________

४. किमन पाच कुटुंबाचे सर्वेक्षण करून पुढील गोष्टींसंदर्भात माहिती काढा अधिक कुटुंबांचे केल्यास उत्तम.

४. १) प्रौढ स्त्रीपुरुष सदस्यांची संख्या, २) स्त्रीपुरुष बालकांची संख्या, ३) गेल्या दोन वर्षात जन्मलेल्या स्त्रीपुरुष बालकांची संख्या ४) गेल्या दोन वर्षात मरण पावलेल्या स्त्रीपुरुष बालकांची संख्या ५) शाळा, महाविद्यालय, विद्यापीठात जाणाऱ्या ५ वर्षावरील स्त्रीपुरुष मुलांची संख्या ६) घराबाहेर कार्यालये किंवा एखाद्या व्यवसायात काम करणाऱ्या महिलांची संख्या.

जमा केलेल्या महितीआधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

अ) स्त्री व पुरुष मुलांची संख्या काय? त्यातील किती शाळा / महाविद्यालयात जातात? मुर्लेमुली एकाच शाळेत जातात का? नसल्यास त्याची कारण कारणे काय?

ब) महिला घराबाहेर काम करतात का? असल्यास कुठे? नसल्यास का?

क) कुटुंवात लिंगभेदाचे वातावरण आढळते का? असल्यास का? नसल्यास का?

## २५.९ समिजिर्कआर्थिक विकासावरील मोठी धोरणे व कार्यक्रम :

आपण आत्तापर्यंत सामाजिर्कआर्थिक विकास आणि दुर्बल गटांच्या सबलीकरणाबद्दलचे अनेक मुद्दे समजून घेतले. त्यावर केंद्रीत धोरणे व कार्यक्रम समजून घेण्यास तुम्हालाही आवडेल. त्या सगळ्यांची चर्चा अतिरिक्त होईल. आपण म्हणूनच केवळ शिक्षण व आरोग्याशी संबंधित काही महत्त्वाच्या धोरण व कार्यक्रमांची चर्चा करू या.

### २५.९.१ सर्वांसाठी शिक्षण :

केवळ भारतालाच नव्हे तर जागतिक समुदायाला सर्वांना शिक्षण पुरवण्याचे महत्त्व कळते. युनेस्कोच्या नेतृत्वाखाली १९९0 मध्ये अनेक देश जोमेतीन (थायलंड) येथे २000 सालापर्यंत सर्वांना शिक्षण पुरवण्यासाठी जमले. १९९२ साली नऊ लोकसंख्या बहुल देश चीन, भारत, इंडोनेशिया, पाकिस्तान, नायजेरिया, मेक्सिको, बांग्लादेश, ब्राझील आणि इजिप्त दिल्ली येथे सर्वांसाठी शिक्षणाची आपली वचनबद्धता पुनरुद्धृत करण्यास जमले. गेल्या दोन दशकांत भारताने आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत सर्वा साठी शिक्षणाचे आपले ध्येय गाठण्यासाठी अनेक प्रयत्न केलेत. त्यातील पुढील सर्वात महत्त्वाचे

### अ) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण :

१९८६ चे राष्ट्रीय शिक्षण धोरण १४ वर्षापर्यंतच्या सर्व मुर्लांमुलींना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याचे ठरते. ८६ व्या घटनादुरुस्ती कायद्याने, २00२, ६ ते १४ वयोगटातील मुलांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण हा मुलभूत अधिकार बनवला. नुकताच संसदेने मोफत व सक्तीचे शिक्षण कायदा २00९ पारित केला. केंद्र व राज्य सरकारांच्या प्रयत्नांतून देशातील जवळपास ९५% ग्रामीण लोकसंख्येला एक किमी. च्या आता प्राथमिक तर ८५% ना तीन किमीच्या आता उच्च प्राथमिक शाळा उपलब्ध आहेत. याचा परिणाम असा झाला.

१. ६१४ वर्षांच्या मुलांचा प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये भरती होण्याचा दर सातत्याने वाढतो आहे.

२. मुली, अनुसूचित जाती व जमातींच्या विद्यार्थ्यांचे लक्षणीय भरती.

३. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांच्या संख्येत लक्षणीय वाढ.

केंद्र व राज्य सरकारांनी कालपरत्वे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व प्रगतीची पातळी वाढविण्यासाठी विविध प्रकारे आखणी केली. या दिशेने उचललेली पावले अशी.

- पालक जागरुकता आणि सामाजिक संघटन वाढवणे.
- सामुदायिक व पंचायती संस्थांचा सहभाग वाढवणे.
- मोफत शिक्षण, पुस्तके व गणवेशांसारखे प्रोत्साहन
- शालेय प्रक्रियांमधे व आशयात सुधारणा करणे.
- राष्ट्रीय प्राथमिक शिक्षणाला पोषण पुरवठा कार्यक्रम (माध्यान्ह भोजन)

पुढील कार्यक्रम शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर लक्षीत आहेत

### क) सर्व शिक्षा अभियान : (SSA)

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी २००१ साली सर्व शिक्षा अभियान हा महत्त्वकांक्षी प्रकल्प सुरू झाला. त्याची उद्दिष्टे अशी;

१. ६-१४ वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांची शाळा / शिक्षण हमी योजना (EGS) केंद्र / ब्रिज कोर्स मध्ये २००५ च्या आत भरती.

२. लिंग व सामाजिक जातींमधील शैक्षणिक दरी प्राथमिक पातळीवर २००७ पर्यंत व प्रारंभिक पातळीवर २०१० पर्यंत मिटवणे.

३. २०१० पर्यंत सार्वत्रिक राखण (भरतीची)

४. समाधानकारक दर्जाच्या प्रारंभिक शिक्षणावर, जीवनशिक्षणावर नजर ठेवून भर.

### ख) राष्ट्रीय प्राथमिक शिक्षणाला पोषण पुरवठा कार्यक्रम : (माध्यान्ह भोजन योजना)

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट साधण्यासाठी हा कार्यक्रम सुरू करण्यात आला व अजूनही चालत आहे.

### माध्यान्ह भोजन योजनेची उद्दिष्टे :

१. सरकारी, स्थानिक संस्था तसेच सरकार अनुदानित शाळा व EGS आणि AIS केंद्रातील पहिली ते पाचवी इयत्तांमधील मुलांची पोषण पातळी सुधारणे.

२. दुर्बल घटकांना अधिक नियमितपणे शाळेत येण्यास व शालेय उपक्रमांवर लक्ष देण्यात सहाय्य करून गरीब विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे.

३. दुष्काळप्रवण क्षेत्रातील विद्यार्थ्यांना उन्हाळ्यात पोषण पुरवठा करणे.

### २५.९.२ राष्ट्रीय साक्षरता अभियान :

राष्ट्रीय साक्षरता अभियान (NLM) १९८८ मध्ये सुरू झाले. १५ ते ३५ वयोगटातील प्रौढ निरक्षरांना व्यावहारिक साक्षरता देण्याचे त्याचे ध्येय आहे. त्याचे महत्त्वाचे कार्यक्रम म्हणजे प्रौढ निरक्षरांना प्राथमिक साक्षरता देणारा संपूर्ण साक्षरता कार्यक्रम, त्यापाठोपाठ नवसाक्षरांची साक्षरता कौशल्ये बळकट करण्यासाठीचा साक्षरता कार्यक्रम आणि त्यानंतर नवासाक्षर व इतरांना ग्रामीण ग्रंथालये व वाचनकक्ष पुरवणारा अखंड शिक्षण कार्यक्रम त्यासह व्यावसायिक शिक्षण जन शिक्षण संस्थांमार्फत नवसाक्षर व इतर दुर्बल घटकांना पुरवण्यात आले.

**NLM चे महत्त्वाचे परिणाम पुढीलप्रमाणे :**

❖ विविध साक्षरता कार्यक्रमांतून देशातील ५९७ जिल्हे व १२४ दशलक्ष लोकांना साक्षर करण्यात आले.

❖ भारताचा साक्षरता दर १९९१ मधील ५२.२१% पासून २००१ मध्ये ६५.३७ इतका वाढला. ही सर्वात मोठी दशकीय वाढसुद्धा आहे.

❖ तरीसुद्धा १५ वर्षांवरील वयोगटातले जगातले ३४% निरक्षर भारतात आहेत. सामाजिक व प्रादेशिक विषमता अद्याप आहेतच.

वरील गोष्टी लक्षात घेऊन भारत सरकारने साक्षरतेप्रती एक एकात्म दृष्टीकोन स्वीकारला. संपूर्ण साक्षरता कार्यक्रम आणि साक्षरता पश्चात कार्यक्रम आता एका साक्षरता प्रकल्पांतर्गत चालतील. प्रचंड मोठ्या निरक्षरता समस्येला सर्वंकष पद्धतीने हाताळणे शक्य होईल. व्यावसायिक साक्षरतेला विलग न मानता संलग्न लाभ मानल्याने निरक्षरांसाठीची आदाने अधिक ध्येयलक्ष्यी होतील. प्रचंड निरक्षरता असणाऱ्या प्रदेशांत साक्षरता अभियान सुरू राहील. तसेच प्राथमिक पातळी पार केलेल्यांसाठी सक्षमीकरण, व्यवसाय कौशल्ये, जीवनकौशल्यांसह एकात्मकीकरण व इतर पैलूंना प्राधान्य दिले जाईल.

### २५.९.३ सर्वांसाठी आरोग्य :

१९५१ साली सर्वकष कुटुंबानियोजन कार्यक्रम लागू करणारा भारत पहिला देश होता. व्यक्तीचे आरोग्य व हित सुधारण्यावर त्याचे लक्ष्य होते. दुर्गम ग्रामीण भागात राहणाऱ्या गरीब लोकांसाठी तेव्हा अल्प आरोग्य सुविधा होत्या. गेल्या पाच दशकात भारतभरात आरोग्य केंद्रे विकसित करण्यात प्रचंड गुंतवणूक केली गेली. जरी आपण उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व सामुदायिक आरोग्य केंद्राचे पुरेसे जाळे उभे करू शकलो नसलो तरी भारत सरकार सर्व नागरिकांना आरोग्य सेवा पुरवण्याचा प्रयत्न करत आहे.

भारताने आरोग्याच्या विविध क्षेत्रांमध्ये बरीच प्रगती केली असली तरी अजून सर्वांसाठी आरोग्याच्या ध्येयात बराच पल्ला गाठायचा आहे. सन २००० पर्यंत सर्वांसाठी आरोग्य ध्येये WHO / UNICEF च्या

१९७८ च्या आल्मा आटा परिषदेत प्रथम घोषित झाली. स्वाक्षरीकर्ता म्हणून भारताने आपल्या धोरणांचे पुन:आखणी करून प्राथमिक स्वास्थ, लसीकरण, कुटुंबनियोजन, आणि पोषण सहाय्य कार्य क्रमावर भर दिला. हे महत्त्वाकांक्षी ध्येय २000 पर्यंत गाठण्यासाठी भारतासह जागतिक नेते कटिबद्ध झाले.

१९५१ ते २00१ काळात भारताची लोकसंख्या तिपटीने वाढली (३६.१0 कोटी वरून १0२.७ कोटी) मागणी व पुरवठ्याच्या पेचात आरोग्य सेवा सापडल्या. वैद्यकीय सुविधांकडे पाहिले असता त्यांचे असमान वितरण आणि मोठ्या शहरांजवळचे केंद्रीकरण दिसून येते. ही असमानता दूर करण्यासाठी सरकारने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM) सुरू केले. याशिवाय स्त्रीया व मुलांच्या आरोग्याशी संबंधित अनेक कार्यक्रम भारत सरकारने सुरू केले जसे जनानी सुरक्षा योजना (JSY), बालिका समृद्धी योजना (BSY), किशोरी शक्ती योजना (KSY) इ. NRHM च्या यशानंतर भारत सरकार राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) हा कार्यक्रम सुरू करू पाहत आहे. खालील रकान्यात अंमलबजावणीत असलेल्या काही मोठ्या राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची नावे आहेत.

**राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम**

१. राष्ट्रीय Vector borne disease control programme

२. राष्ट्रीय डास नियंत्रण कार्यक्रम (NFCP)

३. राष्ट्रीय महारोग निवारण कार्यक्रम

४. सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम

५. राष्ट्रीय आरोग्य कमतरता विकलता नियंत्रण कार्यक्रम

६. राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम

७. राष्ट्रीय एड्स आरोग्य कार्यक्रम

८. राष्ट्रीय कर्करोग आरोग्य कार्यक्रम

९. सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम

१0. राष्ट्रीय कर्णबाधीर्य प्रतिबंध व निवार कार्यक्रम

११. मधुमेह, CVD आणि ह्रदयविकार नियंत्रणाचा पथदर्शक प्रसार कार्यक्रम

१२. राष्ट्रीय तंबाखू नियंज्ञत्रण कार्यक्रम

१३. राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रम

## पाठ्यांशावरील प्रश्न २५.४

१. सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय अभियानाचे लक्षगट कोणते?

______________________________

२. गेल्या ५० वर्षांतील आरोग्य क्षेत्राच्या कोणत्याही दोन उपलब्धी सांगा.

______________________________

______________________________

३. राष्ट्रीय साक्षरता अभियानातील अलीकडचा दृष्टीकोन कोणता?

______________________________

______________________________

४. भारत सरकारने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान का सुरू केले?

______________________________

______________________________

## आपण काय शिकलो?

❖ ज्या स्थितीत गोष्टींमध्ये सुधार होत असतो तिला विकास म्हणतात. पण विविध परिपेक्षात त्याची व्याख्या विविध प्रकारे करतात. सामाजिक, राजकीय, जीवशास्त्रीय, विज्ञान तंत्रज्ञानात्मक, भाषा व साहित्यविषयक इ. सामाजिक आर्थिक परिप्रेक्षात विकासाचा अर्थ लोकांच्या जीवनशैलीत सुधारित शिक्षण, आवक, कौशल्या विकास आणि रोजगाराच्या माध्यमातून सुधारणा असा होतो. सांस्कृतिक व पर्यावरणीय घटकांवर आधारित ती एक आर्थिकसामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे.

❖ काही फरक निसर्गनिर्मित असतात. निसर्गनिर्मित फरक विविधता म्हणून ओळखले जातात. पण काही फरक मानवनिर्मित असतात. मानवनिर्मित असमानता विषमता म्हणून ओळखल्या जातात. भारतात काही प्रदेशात उत्कृष्ट सुविधा आहेत तर काही प्रदेशात सामाजिक-आर्थिक सुविधांबावत तितके पुढारलेले नाहीत. हे मानवनिर्मित प्रादेशिक पुरक प्रादेशिक विषमता म्हणून ओळखले जातात.

❖ मानवी विकासाचा भर लोकांच्या निवडी विस्तारणे व कल्याणाची पातळी वाढवणे यावर असतो. मानवी आयुष्याचे व लोकांच्या निवडीचे सर्व पैलू जसे आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, शारीरिक, जैविक, मानसिक व भावनिक त्यात येतात. मानवी विकास

निर्देशांक (HDI) तीन घटकांचा मिळून बनतो; (१) प्रदीर्घ व आरोग्यदायी जीवन (२) ज्ञान व शिक्षण (३) चांगले जीवनमान

❖ २००७-०८ च्या मानवी विकास अहवालानुसार १७७ देशांमध्ये भारताचा क्रमांक १२८ वा होता. मध्यम दर्जाच्या देशांच्या गटात भारत तळाशी होता.

❖ भारतात काही मोठ्या जनसंख्या आहेत ज्यांची दुर्लक्षित घटक म्हणून वर्गवारी करता येईल. या गटांबरोबर अजूनही सामाजिक आर्थिक भेदभाव होतो व ते विकास प्रक्रियेत पूर्ण मोकळेपणाने सहभागी होऊ शकत नाही. त्यातले काही म्हणजे, अनुसूचित जाती (SC) अनुसूचित जमाती (ST) आणि महिला.

❖ वचनपूर्तीसाठी भारत सरकारने एक त्रिभुज नीती अवलंबिली आहे.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. सामाजिक-आर्थिक विकासाची प्रक्रिया, विकासाच्या सर्व पैलूंची काळजी का घेत नाही? कोणतेही दोन कारणे सांगा.

२. भारतात सामाजिक-आर्थिक विकासाच्या बाबतीत प्रादेशिक विषमता का आहे? त्याला कारणीभूत सहा घटकांचे विश्लेषण करा.

३. भारत सरकारने दुर्बल घटकांच्या सबलीकरणासाठी घेतलेल्या सहा उपायांची चर्चा करा.

४. गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व शिक्षणातील प्रगतीच्या पातळीच्या वाढीसाठी सरकारने उचललेल्या पावलांची चर्चा करा.

५. साक्षरता अभियान काय आहे? कार्यक्रमाच्या यशासाठी स्विकारलेल्या विविध नीतींचे विवरण करा.

## पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे

### २५.१

१. GDP हा आर्थिक कल्याणाचा असा निदर्शक आहे. ज्यात मोकळा वेळ, पर्यावरणीय गुणवत्ता स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, लिंगभाव समता, यासारख्या महत्त्वाच्या पैलूंचा विचार केला जात नाही. दरडोई उत्पन्नसुद्धा लोकांमधील उत्पन्नाची समानता दर्शवत नाही.

२. ती मानवी आयुष्याच्या सर्व पैलूंचा समावेश करते. ती माणसाला विकास प्रक्रियेच्या केंद्रस्थानी ठेवते आणि मानवी निवडींच्या वाढीला उत्पन्नापेक्षा जास्त महत्त्व देते.

३. 'पुढील पिढ्यांच्या गरजापूर्ती क्षमतांशी तडजोड न करता वर्तमानाच्या गरजा भागवणारा विकास म्हणजे शाश्वत विकास.'

४. असे म्हणतात कारण;

१) बाजार दराच्या दृष्टीने १२ वी तर GDP च्या दृष्यीने भारत जगातली चौथी मोठी अर्थ व्यवस्था आहे.

२) HDI मध्ये १७७ देशांमध्ये २००८-०८ ला भारत १२८ वा होता.

३) २७.५% भारतीय दारिद्र्य रेषखाली राहतात.

४) जवळपास ८०% लोकसंख्या दिवसाला $ 2 (PPP) पेक्षा कमी खर्चात जगते.

## २५.२

१. काही फरक निसर्गनिर्मितच असतात. ज्यांना विविधता म्हणतात. पण काही फरक मानवनिर्मित असतात त्यांना विषमता म्हणतात.

२. स्वातंत्र्यपूर्व काळात, व्यावसायिक औद्योगिक दृष्ट्या महत्त्वाच्या नसणाऱ्या प्रदेशांना कमी लक्ष मिळाले व ते स्वातंत्र्यानंतरही सुरूच राहिले.

३. D

४. C

## २५.३

१. सर्वात मोठे दुर्बल गट म्हणजे अनुसूचित जाती (SC), जमाती (ST) अल्पसंख्य, इतर मागास वर्ग (OBC) आणि महिला.

२. आत्तापर्यंत उचललेली पावले SC व ST चे सबलीकरण करत आहेत. त्याची कारणे अशी.

१) माध्यान्हभोजन, पुस्तक पुरवठा असे कार्यक्रम सुरू केले गेले.

२) SC व ST साठी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, नवोदय विद्यालयात विशेष वागणूक तसेच राष्ट्रीय प्रज्ञा शोध, शिष्यवृत्तक्ष इ. पुरवठ्यात येते.

३) NSFDC, NSKFDC, NSTFDC, SCDC, STDC वित्त व इतर सहाय्यासाठी उभारले गेले.

४) अनुसूचित जमातींना बाजारीकरण सहाय्यासाठी TRIFED उभारण्यात आले.

३. आत्तापर्यंत प्रयत्न महिलांना आपल्या समाजात सबल करू शकले नाहीत कारण,

१) महिला व विशेषत: दुर्बल घटकांतील महिलांना शिक्षण, आरोग्य व उत्पादन साधनांचा लाभ घेण्याच्या संधी अपुऱ्या आहेत.

२) त्या बहुधा दुर्लक्षित, गरीब व सामाजिकदृष्ट्या वगळलेल्या राहतात.

४. विद्यार्थ्यांनी स्वत:च सर्वेक्षण करायचे आहे.

**मूल्यमापन सूची**

| | |
|---|---|
| शिकण्याचे उद्दिष्ट | सामाजिर्कआर्थिक विकासाचा लिंगभाषी दृष्टीकोन समजून घेणे. |
| मूल्यमापन साधन | छोटे सर्वेक्षण करणे. |
| गुणांनक सूची | पातळी १ ( (गुण 0 ते ३३% ( अपुरा प्रतिसाद)शिकणाऱ्याला तीन पैकी एकच उत्तर आले.<br><br>पातळी २ ( (गुण ३४ ते ५५% ( प्रगतीची गरज)शिकणाऱ्याला किमान दोन उत्तरे जमली.<br><br>पातळी ३ ( (गुण ५६ ते ७५% पास समाधानकारक)शिकणाऱ्याला सर्व तिन्ही उत्तरे जमली.<br><br>पातळी ४ ( (गुण ७६ ते १00% उत्तम)शिकणाऱ्याला तिन्हींची सर्व आयामांचा विचार करून (लिंगभावी दृष्टीकोनाच्या) उत्तरे जमली. |

## २२.४

१. १) शाळेत जाण्याच्या वयाची पण शाळेत न जाणारी मुले

२) प्रौढ निरक्षर

२. १) मृत्यू दर स्वातंत्र्यासमयीच्या दरहजारी २७.४ वरून २00१ मध्ये ८.५ वर खाली आली. २) अर्भक मृत्यू दर हजार जीवंत जन्मामागे १३४ वरून ७१ इतका २00१ मधे झाला. ३) आयुर्मर्यादा १९४७ मधील ३४ वर्षावरून २00१ मध्ये ६५ झाले. ४) महारोग, पोलिओ, अर्भक धनुर्रोग आणि आयोडीन कमतरता विकलतांचे उच्चाटन करण्याकडे स्थिर वाटचाल झाली आहे. (कोणतेही दोन)

३. भारत सरकारने साक्षरतेप्रती एकात्मित दृष्टीकोन स्वीकारण्याचे ठरवले आहे. याचा अर्थ संपूर्ण साक्षरता अभियान आणि साक्षरता पाश्चात कार्यक्रम एकाच कार्यक्रमांतर्गत चालतील प्रचंड मोठ्या निरक्षरता समस्येला सर्वकष पद्धतीने हाताळणे आता शक्य होईल.

४. आरोग्य सुविधांचे वितरण अत्यंत विषम असून ते बहुधा मोठ्या शहरांच्या बाजूने केंद्रित आहे. हा असमानता दूर करण्यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM) hm ‘hîdmH$m§jr àH$ën gwê$ Ho$bm Amho.

# २६

# पर्यावरणाचा ऱ्हास आणि आपत्ती व्यवस्थापन

खेडेगावांमध्ये शेतीसाठी, घरे बांधण्यासाठी वृक्षतोड झालेली आपण पाहिली असेल. पूर्वी अस्तित्वात असणारे लहान जलाशय आता आपल्याला दिसत नाहीत. शहरांमध्येही घरे बांधण्यासाठी, रस्ते बांधण्यासाठी वृक्षतोड होताना आपण पाहतो. गाड्यांच्या धुरामुळे आणि कारखान्यांमधून येणाऱ्या विषारी वायूमुळे मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वायू प्रदूषाचा परिणाम आपण सगळेच अनुभवतो जल प्रदूषणाची, खालावत चाललेल्या पाण्याच्या पातळीची आणि भूजलाच्या प्रदूषणाची माहिती आपल्याला विविध प्रसारमाध्यमांमधून मिळते. डोंगराळ प्रदेशांमध्येही माणसाच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी वृक्षतोड होत आहे या सगळ्यांचा पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम होत आहे. यामुळे अनेक मानवनिर्मित आणि नैसर्गिक आपत्ती येत आहेत. भोपाळ दुर्घटना, सुनामी दरड कोसळणे या सारख्या आपत्ती व त्यानंतर होणारे आपत्ती व्यवस्थापन या बद्दल थोडी माहिती आपल्याला असेल. या पाठात आपण पर्यावरणाचा ऱ्हास आणि त्याचा नैसर्गिक आपत्ती व आपत्ती व्यवस्थापनाशी असणारा संबंध याबद्दल शिकणार आहोत.

## उद्दिष्टे :

हा पाठ पूर्ण केल्यावर आपण पुढील गोष्टी करू शकू :

- ❖ पर्यावरण व पर्यावरणाचा ऱ्हास यांच्या व्याख्या
- ❖ पर्यावरणाच्या भौतिक व जैविक घटकांची ओळख
- ❖ पर्यावरणाच्या ऱ्हासाची कारणे व माणसानी पर्यावरणात केलेला हस्तक्षेप यांचे विश्लेषण
- ❖ प्रदूषणाचे परिणाम समजून घेणे.
- ❖ पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणे.
- ❖ पर्यावरणाचा ऱ्हास व नैसर्गिक आपत्ती याच्यातील संबंध समजून घेणे.
- ❖ दुर्घटनांचा व नैसर्गिक आपत्तींचा विकासावर होणारा परिणाम स्पष्ट करणे.

## पर्यावरणाचा ऱ्हास आणि आपत्ती व्यवस्थापन

- ❖ माणसाची आणि समाजाची पर्यावरणाच्या संरक्षणातील भूमिका समजून घेणे.
- ❖ आपत्ती व्यवस्थापनासाठी काही योजना सुचविणे.
- ❖ स्थानिक पातळीवर आपत्ती व्यवस्थापनाच्या पद्धती तयार करणे.

### २६.१ पर्यावरणाचा अर्थ :

पर्यावरणाचा ऱ्हास म्हणजे काय हे समजून घेण्याआधी आपण पर्यावरण म्हणजे काय हे समजून घेऊ. सामान्यत: आपण ज्या वातावरणात राहतो त्याला पर्यावरण असे म्हणतात. तुम्ही सामाजिक वातावरण, राजकीय वातावरण, शालेय वातावरण असे शब्द ऐकले असतील. पण पर्यावरणाचा अर्थ वेगळा आहे.

#### उपक्रम २६.१

वरीलप्रमाणे वातावरण या शब्दाचा अजून ४ प्रकार प्रयोग करा.

पर्यावरण म्हणजे आपल्या आजूबाजूचे सर्व घटक, प्रक्रिया, परिस्थिती व त्यांचा परस्परांशी संबंध पर्या वरणाची व्याख्या पुढील प्रमाणे करता येईल. एखाद्या जीवाच्या भोवती असणारे, त्याच्या जीवनावर परिणाम करणारे सर्व घटक व प्रक्रिया व परिस्थिती.

आकृती क्र. २६.१ पाहा. त्यात तुम्हाला झाडे, फुले, रोपे, गवत, फुलपाखरे आणि एक कुटुंब असलेली बाग दिसत आहे.



चित्रातील लहान मुलांसाठी, ती बाग, झाडे, रोपे, फुले, खेळणी. हवा व पाणी हे वातावरण आहे. पण पाण्यातल्या माशांसाठी वातावरणाचा अर्थ वेगळा आहे. तलावातील गोष्टी हे माशांचे वातावरण आहे. याचाच अर्थ, प्रत्येक सजीव व्यक्ती, वनस्पती किंवा प्राण्यासाठी त्याच्या सभोवतालच्या सजीवनिर्जी व गोष्टी म्हणजे पर्यावरण.

पर्यावरणात २ घटक असतात. सजीव व निर्जीव. सजीव घटकांना जैविक घटक असे म्हणतात. उदा. माणसे, वनस्पती, प्राणी, त्यांचे खाद्य व त्याचा परस्परांशी असणारा संबंध निर्जीव घटकांना अजैविक घटक असे म्हणतात. उदा. सूर्य प्रकाश, माती, हवा, पाणी, जमीन, हवामान इ.

### उपक्रम २६.२

सजीव व निर्जीव घटकांच्या दोन याद्या तया करा.

## २६.२ पर्यावरणाचे वर्गीकरण

वेगवेगळ्या घटकांवर आधारित पर्यावरणाचे अनेक प्रकारे वर्गीकरण करता येते. पण आपण पर्या वरणाचा विचार करताना त्यामध्ये जीवनाची निर्मिती व उत्क्रांती यांचा विचार केला आहे. यावर आधारित पर्यावरणाचे दोन घटक असतात. नैसर्गिक व मानवनिर्मित

नैसर्गिक घटक : यात पुढील गोष्टींचा समावेश होतो. पृथ्वीवरील नैसर्गिकरित्या अस्तित्वात असणाऱ्या सजीव व निर्जीव गोष्टी, रासायनिक व भौतिक घटक, हवामान, जीव-जंतू इ. नैसर्गिक घटकांमध्ये जैविक व अजैविक घटकांचा समावेश होतो कारण त्यांची निर्मिती नैसर्गिक प्रक्रियेतून होते.


या सगळ्या घटकांची निर्मिती नैसर्गिकरित्या होते. माणसाच्या जीवनावर या जैविक व अजैविक घटकांचा परिणाम होत असला तरी त्यांच्या निर्मितीमध्ये माणसाची कोणतीच भूमिका नाही.

मानवनिर्मित घटक : यांमध्ये माणसानी स्वत:च्या उपयोगासाठी निर्माण केल्या वस्तूंचा समावेश होतो. माणसाच्या दैनंदिन आयुष्यात उपयोगी ठरतील अशा गोष्टींची निर्मिती माणूस करतो. यात मोठ्या व सामाजिक स्तरावरील गोष्टींपासून, लहान वैयक्तीक पातळीवरील गोष्टींचा समावेश आहे. उदा. घरे, रस्ते, शाळा, रुग्णालये, पूल, बागा, लोकमार्ग इ.




**आकृती २६.२ : पर्यावरणाचे वर्गीकरण**

याचबरोबर सामाजिक परिस्थितीचाही माणसाच्या आयुष्यात महत्त्वाची भूमिका असते. यात आपली संस्कृती, सामाजिक मूल्ये, सामाजिक, राजकीय, आर्थिक धार्मिक व्यवस्था व त्याचा परस्परांशी संबंध यांचा समावेश होतो.




**आकृती २६.३ : पर्यावरणाचे घटक**

आत्तापर्यंत आपण हे समजू शकलो अहोत की पर्यावरणात दोन प्रकारचे घटक असतात. नैसर्गिक व मानवनिर्मित. उदा. एकाद्या गावातील किंवा शहरातील माणसे, पशू-पक्षी, वनस्पती, जमीन, हवा, पाणी हे नैसर्गिक घटक आहेत. या उलट, इमारती, रस्ते, शाळा, रुग्णालये, वीज व पाणी पुरवठ्यासाठी तयार कलेली उपकरणे हे मानवनिर्मित घटक आहेत. माणूस नैसर्गिक घटकांचा उपयोग विविध गोष्टी तयार करण्यासाठी करतो.

## २६.३ पर्यावरणातील वैविध्य व गतिमानता :

पर्यावरण कधीच अचल न बदलणारे नसते. पर्यावरणाचा सगळ्यात महत्त्वाचा गुणधर्म म्हणजे त्यातील गतिमानता. पर्यावरणाचे स्वरूप सतत बदलत असते. पर्यावरणातील जैविक व अजैविक घटक हे दोन्ही गतिमान असतात. आता आपण गतिमानता म्हणजे काय व पर्यावरण कसे गतिमान आहे हे समजून घेऊ. पर्यावरण वेळेवेळी आणि जागोजागी वदलत असते. उदा. हिमालयातील पर्यावरणापेक्षा विशाल भारतीय वाळवंटातले पर्यावरण निराळे आहे. तिथेही कालांतरांनी पर्यावरणात बदल होत आहे ऋतूनुसार पर्यावरणात बदल होतो. काही वदल हे नैसर्गिकरित्या होतात तर काही माणसाच्या कृतीमुळे.

पर्यावरणातील मानवनिर्मित घटकांमध्येही कालांतरानी बदल होत आहेत. उदा. माणसाच्या घरांच्या रचनांमध्ये अनेक बदल झाले आहेत. आता आपल्याला दिसणाऱ्या टोलेजंग इमारती २०३० वर्षी पूर्वी नव्हत्या. अनेक लहान खेड्यांचे शहरांमध्ये रुपांतर झालेले आहे. शहरांचे आणखी मोठ्या शहरांमध्ये रुपांतर झाले आहे. दळणवळणाच्या साधनांमध्ये लक्षणीय बदल घडलेला आहे. यावरून

पर्यावरणाची गतिमानता लक्षात येते. निरीक्षण करा, विचार करा आणि गेल्या काही वर्षांत झालेल्या या बदलांना समजून घेण्याचा प्रयत्न करा. हे बदल लक्षणीय आहेत ना?

> पर्यावरण हे गतिमान असते व ते सतत बदलत असते.

## पाठ्यांशावरील प्रश्न २६.१

१. **पुढील घटकांची विभागणी जैविक व अजैविक घटकांत करा.**

(वनस्पती, पाणी, माती, प्राणी, आग, अतिसूक्ष्म जीव भौगोलिक वैशिष्ट्ये, अतिसूक्ष्म जंतू (Bacteria))

२. **रिक्त जागा भरा.**

अ) पर्यावरणाचे वर्गीकरण ........... व ........... यात करता येते.

ब) पर्यावरणाचे वर्गीकरण त्यातील .............. वर आधारितसुद्धा करता येते.

क) रस्ते, इमारती, शाळा हे ............. पर्यावरणाचे घटक आहेत.

ड) पर्यावरण गतिमान आहे, कारण .........

३. **कृती :** तुमच्या भोवतीच्या गोष्टींची यादी तयार करा. त्यांची २ वर्गात विभागणी करा. पहिल्या भागात जीवनावश्यक वस्तूंची नावे लिहा. व दुसऱ्या भागात आपण ज्या गोष्टींशिवाय सुद्धा जगू शकतो अशा गोष्टींची नावे लिहा.

## २६.४ पर्यावरणाचे महत्त्व :

पर्यावरण आपल्या जगण्यासाठी व भल्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. "पण हे असे का?" याचा कधी आपण विचार केला आहे का?

पर्यावरण ही जीवनावश्यक व्यवस्था आहे. याचा आपल्या व इतर सजीवांच्या वाढीवर, प्रगतीवर व अस्तित्वावर परिणाम होतो. आपल्या सगळ्या गरजा पर्यावरणातून पूर्ण होतात. अनेक जीवनावश्यक गोष्टींचा पुरवठा व अनेक जीवांच्या अस्तित्वाला आधार पर्यावरणामुळेच मिळतो. अन्न, निवारा, पाणी, वायू, माती, ऊर्जा, औषधे. कच्चा माल इ. गोष्टींसाठी आपण पर्यावरणावरच अवलंबून असतो. पर्यावरणामुळे वातावरणातील समतोल राखला जातो व सूर्याच्या हानीकारक किरणांपासून पृथ्वीवरील सजीवांचे रक्षण होते. पण पर्यावरणाचा सातत्यानी ऱ्हास होत आहे व पर्यावरणाची पातळी घटत चालली आहे. संसाधनांच्या अविचारी वापरामुळे आणि वाढत्या प्रदूषणामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणावर हानी होत आहे.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

संयुक्त राष्ट्र संघाच्या 'High level threat panel' नी सूचित केलेल्या १० धोक्यांपैकी पर्यावरणाचा ऱ्हास एक आहे. WRI, UNER, UNDP आणि जागतिक बँकेनी १ मे १९९८ रोजी आरोग्य व पर्यावरण या विषयांवर महत्त्वाचा अहवाल सादर केला होता.

## २६.५ पर्यावरणाचा ऱ्हास :

पर्यावरणाचा ऱ्हास म्हणजे काय हे आपण समजून घेऊ. पर्यावरणाचा ऱ्हास ही एक प्रक्रिया आहे. ज्यामुळे आपले पर्यावरण म्हणजेच हवा, पाणी, जमीन हे प्रदूषित होतात, त्यांचे शोषण होते व त्यांचा नाश होतो. जेव्हा पर्यावरणाचा समतोल ढासळते व त्याला हानी पोहचते तेव्हा पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे असे म्हणता येते. अधिक स्पष्टपणे सांगायचे तर पर्यावरणाचा ऱ्हास म्हणजे वायू, पाणी, वने यांच्या खालावत जाणाऱ्या पातळीमुळे होणारी हानी, परिसंस्थाचा नाश व लुप्त होणारे वन्यजीवन आपण आपल्या दैनंदिन जीवनाचा विचार करुया. आपण, भविष्याचा विचार न करता अविचाराने पाणी, माती, झाडे, कोळसा, पेट्रोल यांचा अनिर्बंध वापर करतो. आपण निश्काळजीपणे परिसंस्थामध्ये हस्तक्षेप करत आहोत व मुद्दाम वन्यप्राण्यांची हत्त्या करीत आहोत. पर्यावरणाच्या ऱ्हासाचे अनेक प्रकार आहेत. जेव्हा जेव्हा अधिवासाचा नाश होतो तेव्हा तेव्हा जैवविविधता नष्ट होते व पर्यावरणाला धक्का पोहोचतो.

## २६.६ पर्यावरणाच्या ऱ्हासाची कारणे :

आत्तापर्यंत आपल्याला हे समजले असेल की पर्यावरण हे मानवाच्या व इतर सजीवांच्या अस्तित्वासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. पण पर्यावरणाचा ऱ्हास सातत्याने होत आहे. आपल्याला वेळोवेळी पर्यावरणाच्या ऱ्हासाची आणि त्याच्या भयानक परिणामांची सूचना मिळत असते. जागतिक तापमान वाढ, हवामानातील बदल, पाण्याचा तुटवडा, शेतजमिनीचा खालावत जाणारा कस. वाढत्या आरोग्यविषयक तक्रारी इ. हे पर्यावरणाच्या हानीचे परिणाम आहेत. ही हानी आटोक्यात आणण्यासाठी व संपविण्यासाठी तातडीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्या आधी पर्यावरणाच्या ऱ्हासाची कारणे जाणून घेणे गरजेचे आहे. काही महत्त्वाची कारणे पुढीलप्रमाणे :

### सामाजिक घटक :

**वाढती लोकसंख्या :** कोणत्याही देशाची लोकसंख्या ही त्या देशाची खरी ताकद असते व हा विकासातला एक महत्त्वाचा घटक असतो. तरीही, वाढती लोकसंख्या हे पर्यावरणाच्या हानीचे एक कारण आहे. वेगानी वाढणाऱ्या लोकसंख्येचा परिणाम म्हणजे संसाधनाचा अतिरिक्त वापर व त्यामुळे त्यांच्यावर पडणारा ताण. याच बरोबर मोठ्या लोकसंख्येमुळे मोठ्या प्रमाणात कचरा व टाकाऊ गोष्टींची निर्मिती होते. परिणामी, जैवविविधता नष्ट होते, वायू



प्रदूषण, जल प्रदूषण, मृदा प्रदूषण होते व शेतमिनीवर अतिरिक्त ताण पडतो. परिणामी, पर्यावरणाची हानी होते. भारत देशात जगातील २.४% जमीन आहे व त्यावर जगातील १७% लोक राहतात.



**गरिबी :** गरिबी हे पर्यावरणाच्या हानीचे कारणही आहे व परिणामही असे म्हणतात. आपण पाहिले असेल की गरीब माणसे नैसर्गिक संसाधनांचा वापर श्रीमंत लोकांपेक्षा अधिक करतात. यात झोपड्या बांधण्यासाठी, अन्न शिजवण्यासाठी व इतर गरजा भागवण्यासाठी संसाधनांचा वापर होतो. यामुळे नैसर्गिक संसाधन लवकर नष्ट होतात कारण गरीब माणसांना प्रगत संसाधने वापरण्याची संधी मिळत नाही. नैसर्गिक संसाधनांचा जितका जास्त वापर होईल तितका जास्त विपरित परिणाम पर्यावरणावर होत असतो. आणि पर्यावरणाला जितकी जास्त हानी पोहचेल तितकीच अधिक गरिबी वाढेल..



**शहरीकरण :** लहान गावातील माणसे त्यांच्या उदरनिर्वाहासाठी शहरात येतात. यामुळे शहरांचा अनियोजित व झपाट्यानी विस्तर होतो व याचा ताण तिथल्या साधनांवर व सुविधांवर पडतो. पाणीपुरवठा, वीज पुरवठा, घरे, सांडपाण्याची व्यवस्था या सगळ्यावर शहरांमधे ताण पडत आहे. यामुळे झोपडपट्ट्यांची संख्या वाढते. शहरी झोपडपट्ट्या या प्रदूषणाचे मोठे कारण आहे आणि त्यात निरोगी स्थितीचा आभाव आहे. झपाट्यानी होणाऱ्या शहरी करणामुळे वने मोठ्या प्रमाणात नष्ट होत आहेत व संसाधनांचा अविचारी वापर होतो आहे.



**बदलती जीवनशैली :** माणसांच्या जीवनशैलीत लक्षणीय बदल होत आहे. हा बदल केवळ शहरी माणसांच्या आयुष्यातच नाही तर ग्रामीण माणसांच्या आयुष्यातही झाला आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे माणसांचे उपभोगाचे प्रमाण वाढले आहे. यामुळे पर्यावरणाला हानीकारक ठरतील अशा उद्योगांचे प्रमाणही वाढत आहे. यामुळेच वायू प्रदुषण जल प्रदूषण, ध्वनी प्रदूषण यातही भर पडली आहे. फ्रीज, वातानुकलित यंत्रे यासारख्या आधुनिक उपकरणाच्या साधनांच्या वाढत्या उपयोगामुळे वातावरणात हानीकारक वायूंचे उत्सर्जन होते. याने जागतिक तापमानात वाढ होत आहे. ज्याचे परिणाम भयानक आहेत. कार्बन मोनाक्साईड कार्बन डाय ओक्साईडसारखे विषारी वायू वातावरणात उत्सर्जित केले जात आहेत. यामुळे तापमाणात लक्षणीय वाढ होत आहे.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

क्लोरोफ्लुओरो कार्बन (CFC) हा तसे पाहता हानीकारक वायू नाही पण जेव्हा हा बाकीच्या वायूंशी संपर्कात येतो तेव्हा तो हानीकारक होतो. ओझोन स्तराला हानी पोहचविणारा वायू हाच आहे.



**आर्थिक घटक :**

**कृषी क्षेत्राचा विकास :** भारतासारख्या देशासाठी शेतीची प्रगती अतिशय महत्त्वाची आहे. पण याच क्षेत्राच्या प्रगतीमुळे पर्यावरणावर काही वाईट परिणाम होत आहेत. उत्पादकता वाढविण्यासाठी जे उपाय केले जातात. त्यामुळे पर्यावरणाला हानी पोहचत आहे. यामुळे जमिनीची धूप, जमिनीचे क्षारीकरण होते. अल्कलीचे प्रमाण वाढते आणि पोषक तत्त्वांचा नाश होत आहे. भारतातील हरित क्रांतीमुळे जमिनीचा व पाण्याचा गरजेपेक्षा जास्त वापर होत असलेला दिसतो. मोठ्या प्रमाणावर खतांच्या व कीटनाशकांच्या वापरामुळे जल प्रदुषण व मृदा प्रदूषण होत आहे.




**औद्योगिकरण :** औद्योगिकरण हे पर्यावरणीय ऱ्हासाचे सगळ्यात मोठे कारण आहे. वेगवेगळ्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीमधून असे कळते की मोठे कारखाने अशा तंत्रज्ञानाचा उपयोग करतात ज्यामुळे पर्यावरणावर फार ताण पडत आहे. ही तंत्रे ऊर्जेचा व संसाधनांचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात. औद्योगिकरणाचा सध्याचा वेग हा अनेक नैसर्गिक संसाधनांसाठी हानीकारक आहे. खनिजे, लाकूड, मृत वनस्पती व मृत प्राणी इंध यांच्यावर अतिरिक्त ताण पडत आहे. त्याचबरोबर जल प्रदूषण, वायू प्रदूषण व मृदा प्रदूषण होत आहे. या सगळ्याचा परिसंस्थांवर व आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे.



**आर्थिक विकास :** ज्या रीतीने आर्थिक विकास होत आहे ती पर्यावरणाला घातक आहे. आर्थिक विकासाचा वेग हा संसाधनांवर अतिरिक्त भार पडत आहे. अर्थव्यवस्थेत उपभोगवृत्ती वाढते आहे ज्यामुळे संसाधनांची अधिकाधिक मागणी होत आहे. यामुळे उच्च जीवनशैली जोपासली जात असली तरी संसाधनांची नासाडी होते. संसाधनांचा अविचारी उपयोग व नासाडी यामुळे पर्यावरणाला हानी पोहचत आहे.





**उपक्रम २६.३**

आपण यापूर्वी पर्यावरणाच्या ऱ्हासी काही कारणे समजून घेतली. याहीपेक्षा वेगळी काही कारणे आहेत. जसे की, जंगल तोड, खनिज उद्योग, वाहनांचे प्रदूषण, अैद्योगिक वायू, वनस्पती, कचरा, हानीकारक क्ष किरण विसर्जक कचरा (रेडिओ ॲक्टिव्ह कचरा) पाण्यावरील तेलाचा तवंग धरणे व जलाशय याविषयी पुस्तकांमधून, मासिकांमधून माहिती मिळवा व या घटकांमुळे पर्यावरणाला हानी कशी पोहचते याचे टिपण तयार करा.

## २६.७ पर्यावरणाच्या ऱ्हासाचा ध्वन्यर्थ :

पर्यावरणाचा ऱ्हास ही अतिशय गंभीर बाब आहे. याची मूळ कारणे संसाधनांचा अविचारी, अनियोजित उपयोग व शास्त्रीय रीतीनी केलेल्या व्यवस्थापनाचा अभाव ही आहेत. हे संपूर्ण जगापुढचे आव्हानच आहे. हानीकारक वायूच्या उत्सर्जनामुळे, क्ष किरण विसर्जक कचरामुळे औद्योगिक वायू रसायने सोडल्यामुळे वाढलेल्या खतांच्या व कीटनाशकांच्या वापरामुळे होणाऱ्या वायू प्रदूषणाचा, जलप्रदूषणाचा, मृदाप्रदूषणाचा आपल्या अस्तित्वावर व जीवनावर विपरित परिणाम होत आहे. पुढील चौकोनात दिलेल्या माहितीचा विचार केला तर या समस्येचे गांभिर्य लक्षात येईल.

**विचार करा :**

- ❖ भारतातील ५0% भूभाग हा वृक्षतोड, अतिचराई, शेतीचे अविचारी व्यवस्थापन लागवडीतील बदल, जमिनीची धूप, मृदा क्षारीकरण व आम्ल पर्जन्य यांच्यामुळे ऱ्हासाच्या वेगवेगळ्या स्तरावर आहे.
- ❖ दरवर्षी जमिनीची धूप घडल्याने ५.३ महापद्म टन मातीचा नाश होतो. प्रतिवर्षी सरासरी प्रति हेक्टर १६ टन मातीचा नाश होतो. असा अंदाज आहे. या उलट मातीचा १ मि. मि. थर तयार व्हायला एक वर्ष लागते तसेच १ से. मि. थर तयार व्हायला एक दशक लागते. जमिनीपासून १ से. मी. माती तयार करायला निसर्गाला अनेक वर्षे लागतात.
- ❖ जागतिक तापमानात वाढ झाल्यामुळे धान्याच्या उत्पादनात लक्षणीय घट होणार आहे. जगातल्या वाढत्या तापमानामुळे माणसाच्या आरोग्यावर होणाऱ्या विपरित परिणामांची धोक्याची सूचना जगभरातील वैज्ञानिकांना त्रस्त करणारी आहे. वाढत्या तापमानामुळे वेगवेगळ्या रोगांचा संसर्ग अधिक वेगानी होतो.
- ❖ वाढणाऱ्या तापमानामुळे काही पिकांच्या हंगामाचा काळ लांबत आहे.
- ❖ हिमालयातील हिमनद्या वितळत आहेत. हिमालयात उगम पावणाऱ्या नद्या आटून जाण्याची शक्यता आहे.

पर्यावरणाच्या हानीचे एक मोठे कारण हे धन कचऱ्याची निर्मिती हे आहे. तुम्हाला माहिती आहे का की जगभरात दर वर्षी लोक १000 अब्ज टन घन कचरा टाकतात.? जर आपण या सगळ्याचा समुद्रात एक कि. मी. चा पाया असणारा १ कोनाकृती मनोरा तयार केला तर त्याचे शिखर एव्हरेस्ट पर्वतापेक्षा उंच असेल. आपण दरवर्षी कचऱ्याचा एक एव्हरेस्ट इतका मोठा पर्वत तयार करत आहोत. आपण आपल्या पर्यावरणाला ३ प्रकारे वाचवू शकतो.

| विघटन करून पुन्हा वापरात आणा Recycle | | पुन्हा वापरा Recycle | | कमी उपयोग करा Recycle | |
|---|---|---|---|---|---|
| **कशाचे?** | **परिणाम** | **काय?** | **कसे?** | **कशाचा?** | **कसा?** |
| जैविक कचरा उदा. केळ्याच्या साली, अंड्याची टरफले, शिळा भाजीपाला | मातीचे पोषण वाढेल | कॅन / डबे | पेन्सिल होलडर म्हणून वापर करा. | प्लास्टिक | बाजारहाट करताना कापडी पिशवी वापरा |
| कागद | झाडे वृक्षतोडी पासून वाचतील | कागद | लहान वह्या तयार करा. | वीज | खोलीतून बाहेर जाताना दिवे, पंखे बंद करा. |
| मातीची भांडी | बॉक्साईटची गरज कमी होईल. | कापड | गालिचा किंवा पायपुसणी तयार करा | पाणी | गरजेपुरतेच पाणी वापरा. वापर संपला की नळ बंद करा. |



**आकृती २६.४ : पर्यावरणाचे रक्षण**

### तुम्ही काय करू शकता?

- पर्यावरणाला पूरक व विघटनशील वस्तूंचा वापर व प्रचार
- घरातील कचऱ्याचे ओला व कोरडा असे विभाजन करून पुन्हा वापरण्याच्या प्रक्रियेला चालना देणे.
- प्लास्टिकला विरोध व विघटनशील किंवा पुन्हा वापरता येतील अशा वस्तूंचा वापर
- CFC न वापरणाऱ्या व पर्यावरणाला घातक नसलेल्या उपकरणांचा वापर.

## २६.८ शाश्वत विकास :

पर्यावरणाच्या ऱ्हासाच्या परिणामांमुळे हा चिंतेचा विषय झाला आहे. बऱ्याचदा याचा संबंध विकासाशी जोडला जातो. माणसांनी अवलंबिलेला विकासाचा मार्ग हाच पर्यावरणाच्या ऱ्हासाचे कारण आहे असे सांगणारा एक मतप्रवाह आहे. शाश्वत विकासाची संकल्पना ही या मार्गाला एक पर्याय म्हणून अस्तित्वात आली. ज्यामुळे पर्यावरणाची हानी थांबू शकेल. शाश्वत विकासाची संकल्पना ही बहूअर्थी असली तरी पर्यावरण आणि विकास यांच्या संबंधातल्या संदर्भात या संकल्पनेला विशेष अर्थ आहे.

शाश्वत विकासाची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल.

शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो भविष्यातील आपल्या गरजा पूर्ण करण्याची क्षमता कमी होऊ न देता वर्तमानकाळातल्या गरजा पूर्ण करेल.

यासाठी संसाधनांचा अविचारी वापर थांबविणे आवश्यक आहे. शाश्वत विकासासाठी गरजांचे अशा प्रकारे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. ज्यामुळे अर्थव्यवस्था व समाज एकत्र राहू शकतील व ते ही पर्यावरणाचा तोल ढळू न देता वैज्ञानिक दृष्टीकोन ठेऊन जर संसाधनांचा उपयोग केला तर शाश्वत विकास साध्य करणे शक्य होईल.

## २६.९ आपत्ती व्यवस्थापन :

पर्यावरणाच्या ऱ्हासाचे आणखी काही गंभीर परिणाम आहेत. तुम्हाला माहिती आहे का की जगभरात आपत्तींमुळे होणारी हानी ही खरे तर पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे व संसाधने नीट व वापरल्यामुळे होत असते? आपत्ती हे आपल्या पुढील मोठे आव्हान आहे. पण त्यांचा सामना आपण करू शकतो व त्यांच्यावर नियंत्रणही ठेवू शकतो.

आपत्ती व्यवस्तापनाची संकल्पना समजून घेण्याआधी, आपत्ती म्हणजे काय हे जाणून घेऊ. आपत्ती म्हणजे समाजाला व पर्यावरणाला हानी पोहचविणारी दुर्घटना होय. एखाद्या धोक्याचा प्रकार, त्याची पातळी समजून न घेता त्याचे व्यवस्थापन केल्यावर मिळणाऱ्या किंवा होणाऱ्या परिणामांच्या स्वरूपात आपण आपत्ती ही संकल्पना समजून घेऊ शकतो. आपत्तीच्या उत्पत्ती स्थानावर आधारित. आपत्तींचे २ भागात विभाजन होऊ शकते. नैसर्गिक आपत्ती व मानवनिर्मित आपत्ती. नैसर्गिक कारणांमुळे उद्भवते ती नैसर्गिक आपत्ती जसे की पूर, भूकंप इ. माणसाच्या निश्काळजीपणामुळे, चुकांमुळे किंवा एखादी व्यवस्था कोलमडल्यामुळे उद्भवते ती मानवनिर्मित आपत्ती. उदा. भोपाळ दुर्घटना, दरड कोसळणे, धरण फुटून पूर येणे इ. माणसाच्या हस्तक्षेपामुळे सुरू झालेले जागतिक तापमान वाढीचे सत्र ही एक मोठी आपत्ती असणार आहे.

आपत्तीचे परिणाम जरी मोठे असले तरी त्यांचा प्रभाव मात्र कमी करता येऊ शकतो. कुशल व्यवस्था अवलंबून आपत्तींच्या परिणामांचा प्रभाव किमान पातळीवर रोखण्याच्या प्रक्रियेला आपत्ती व्यवस्थापन असे म्हणतात.

या प्रक्रियेचे ४ टप्पे आहेत. उपशमन, तयारी, प्रतिक्रिया व पुनर्लाभ

❖ **उपशमन :** तुम्हाला उपशमन ही एक अवघड संकल्पना वाटत असेल. उपशमन म्हणजे धोक्याचे रुपांतर आपत्तीत होण्यापासून रोखणे किंवा जिथे आपत्ती उद्भवते तिथे तिच्या

परिणामांचा प्रभाव किमान पातळीवर ठेवणे. धोक्याचे प्रमाण कमी करण्यासाठी किंवा धोका संपविण्यासाठी दूरगामी उपार्ययोजना करणे हे या टप्प्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे आणि म्हणूनच हा टप्पा इतर तिघांपैकी वेगळा आहे. याच्याआधी धोका ओळखण्याचा टप्पा असू शकतो. आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रयत्न करण्यापूर्वी धोका काय आहे हे ओळखणे व समजून घेणे गरजेचे असते.

**उदा. :** पावसाळ्यात पुराची शक्यता नाकारता येत नाही. हा धोका आपण आधीच ओळखला तर तो टाळण्यासाठी किंवा त्यमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी आपण प्रयत्न करू शकतो.

❖ **तयारी :** यामध्ये आपत्ती व्यस्थापनासाठी नियोजित आराखडा तयार केला जातो. ज्याचा उपयोग आपत्ती उद्‌भवल्यावर करण्यात येतो.

यात पुढील गोष्टींचा समावेश असतो.

१. सहज समजतील अशा संज्ञा असणारा संवाद आराखडा.

२. आपत्कालीन सेवांचे प्रशिक्षण व त्यांचा निर्वाह

३. आपत्कालीन निवाऱ्यांची निर्मिती व स्थलांतराचा आराखडा.

४. आपत्कालीन साधन सामग्रीची व्यवस्था व पुरवण्याची तयारी करणे.

५. स्वयंसेवकांची पथके तयार करणे.

❖ **प्रतिक्रिया :** आपत्ती उद्‌भवल्यावर प्रत्यक्ष कृती या टप्प्यात केली जाते. यात आपत्कालीन सेवांचा तात्काळ पुरवठा, माणसांचे स्थलांतर, अग्निशामक दलाची, पोलीस व रुग्णवाहिकांची मदत या गोष्टी येतात. कुशल व्यवस्थापन आराखडा हा योग्य समन्वयासाठी उपयुक्त ठरतो.

❖ **पुनर्लाभ :** आपत्ती उद्‌भवलेल्या जागेला पुर्ववत करणे हे या टप्प्याचे उद्दिष्ट आहे. यात इमारती पुन्हा वांधणे, दळणवळण पूर्ववत करणे अशी कामे असतात.

## उपक्रम २६.४

भूकंप, सुनामी, पूर, दगड कोसळणे, वादळे या जीवित हानी करणाऱ्या मोठ्या आपत्ती आहेत. आधी दिलेल्या आपत्ती व्यवस्थापनाच्या ४ टप्प्यावर आधारित या प्रत्येक आपत्तीसाठी एर्कएक आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करा.

## पाठ्यांशावरील प्रश्न २६.२

१. **रिकाम्या जागा भरा.**

अ) अधिवासाचा नाश झाल्यास .............. चा ही नाश होतो.

ब) आधुनिक उपकरणे ............ उत्सर्जित करतात ज्यामुळे ................ होते.

क) खतांचा व कीटनाशकांचा अतिरिक्त वापर हे ................ व ............... चे प्रमुख कारण आहे.

ड) ........... ची निर्मिती हे पर्यावरणाच्या ऱ्हासाचे प्रमुख कारण आहे.

२. आपत्ती म्हणजे काय? एक उदाहरण द्या.

३. कृती : कचऱ्याची पाहणी

तुमच्या घरात / गृहरचनेत / परिसरात कोणत्या प्रकारचा कचरा टाकला जातो याची पाहणी करा व Recycle, Reuse, Reduce करता येणाऱ्या कचऱ्याची पुढील पद्धतीने विभागणी करा.

| वार | पुनर्निर्मिती Recycle | पुनर्वापर Recycle | उपभोग कमी होणे Recycle |
|---|---|---|---|
| सोमवार | | | |
| मंगळवार | | | |
| बुधवार | | | |
| गुरुवार | | | |
| शुक्रवार | | | |
| शनिवार | | | |
| रविवार | | | |

वरील तक्त्यात तुमच्या घरात प्रतिदिवशी कोणत्या प्रकारचा कचरा तयार होतो ते लिहा. एका आठवड्यानंतर कोणत्या प्रकारचा कचरा अधिक आहे. ते पहा. कचऱ्यातून निर्मिती किंवा त्या वस्तूचा कमी वापर करण्याचा प्रयत्न करा. हीच कृती दुसऱ्या आठवड्यातही करा व दोन आठवड्याचे परिणाम तुलनात्मक दृष्टीने पहा. उपभोग कमी होणे या रकान्यातला कचरा कमी झाल्याचे कदाचित लक्षात येईल.

## पर्यावरणाचा ऱ्हास आणि आपत्ती व्यवस्थापन

१. आपल्या कोणत्या कृतींमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो याची यादी तयार करा.

## आपण काय शिकलो?

- पर्यावरण म्हणजे आपल्या आजूबाजूचे सर्व घटक, प्रक्रिया, परिस्थिती, व त्यांचा परस्परांशी संबंध पर्यावरणाची व्याख्या पुढील प्रमाणे करता येईल. एखाद्या जीवाच्या भोवती असणारे, त्याच्या जीवनावर परिणाम करणारे सर्व घटक व प्रक्रिया व परिस्थिती. पर्यावरणाचे दोन घटक असतात. जैविक व अजैविक जीवनाची निर्मिती व उत्क्रांती यावर आधारित पर्यावरणाचे 'नैसर्गिक' व 'मानव निर्मित' असे विभाजन करता येते. पर्यावरण कधीच अचल राहत नाही. काळानुसार व जागेनुसार त्यात बदल होतात. नैसर्गिक व मानवनिर्मित पर्यावरण गतिमान आहे. पर्यावरण आपल्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. अन्न, निवारा, पाणी, वायू, माती, ऊर्जा, औषधे इ. गोष्टींसाठी आपण पर्यावरणावर अवलंबून असतो. पण पर्यावरणाचा सातत्यानी ऱ्हास होत आहे. गरिबी, शहरीकरण, बदलणारी जीवनशैली, कृषी क्षेत्राची प्रगती, आर्थिक विकास, औद्योगिकरण या सारखे सामाजिक व आर्थिक घटक पर्यावरणाचा ऱ्हास करतात. आपण काही सामान्य नियम पाळून पर्यावरणाचे रक्षण केले पाहिजे.
- पूर व दुष्काळ यांसारख्या आपत्ती पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे व संसाधनांच्या चुकीच्या व्यवस्थापनामुळे उद्‌भवतात. आपत्ती २ प्रकारच्या असतात. नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती व्यवस्थापन ही ४ टप्प्यांची प्रक्रिया आहे. यात उपशमन, तयारी, प्रतिक्रिया व पुनर्लाभ असे टप्पे आहेत. नैसर्गिक आपत्ती संपवता येणे शक्य नसले तरी त्यांच्या परिणामांचा प्रभाव कमी करणे शक्य आहे.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. पर्यावरण म्हणजे काय? उदाहरणासहित स्पष्ट करा.

२. उत्क्रांतीच्या आधारावर पर्यावरणाचे वर्गिकरण करा. उदाहरणे देऊन स्पष्ट करा.

३. पर्यावरण गतिमान आहे. उदाहरणासहित स्पष्ट करा.

४. पर्यावरणाचे महत्त्व स्पष्ट करा.

५. पर्यावरणाचा ऱ्हास म्हणजे काय? व्याख्या देऊन पर्यावरणाच्या हानीची कारणे द्या.

६. आपले पर्यावरण वाचविण्यासाठी ३ उपाय सुचवा.

७. पर्यावरणाची हानी करणाऱ्या माणसाच्या १० कृती लिहा.

८. उत्पत्तीच्या आधारावर आपत्तींचे वर्गिकरण करा.

९. आपत्ती व्यवस्थापन म्हणजे काय? आपत्तीच्या परिणामांचा प्रभाव आपण कशाप्रकारे कमी करू शकतो?

## पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे

**२६.१**

१. जैविक : रोपे, प्राणी, जंतू, अतिसूक्ष्म जीव

अजैविक : पाणी, माती, आग, भौगोलिक वैशिष्ट्ये

२. अ) नैसर्गिक, मानवनिर्मित

ब) निर्मिती किंवा उत्क्रांती

क) मानवीनिर्मित

ड) त्यात काळानुसार व जागेनुसार बदल होतात.

३. विद्यार्थ्यांनी, त्याच्या परिसरातल्या जैविक व अजैविक घटकांची नावे लिहावीत.

उदा. पाणी ज्याशिवाय जगणे अशक्य आहे.

**२६.२**

१. अ) जैवविविधता

ब) हानीकारक वायू, जागतिक तापमान वाढ

क) जलाशयांचे प्रदूषण, मृदा प्रदूषण

ड) घन कचरा

२. आपत्ती म्हणजे समाजावर व पर्यावरणावर वाईट परिणाम करणारी दुर्घटना. उदा. भोपाळ दुर्घटना, सुनामी इ.

३. विद्यार्थ्यांनी स्वत: पाहणी करणे अपेक्षित आहे.

४. विद्यार्थ्यांनी स्वत: कृती लिहिणे अपेक्षित आहे.

**उपक्रमासाठी सूचना २६.१**

| उद्दिष्ट | परीक्षणाचे साधन / निकष | गुणांची विभागणी |
|---|---|---|
| पर्यावरणाचे विविध घटक ओळखणे. | अनुभवातून शिक्षण | स्तर १ : (गुण 0.३३% अपुरी प्रतिक्रिया) विद्यार्थी एखादाच घटक ओळखू शकेल. शब्दप्रयोग करू शकेल. |
| | | स्तर २ : ३४.५५% गुण (सुधारणा आवश्यक)विद्यार्थी दोन घटक ओळखू शकेल. शब्दप्रयोग करू शकेल. |
| | | स्तर ३ : ५६७६% गुण (समाधानकारक) विद्यार्थी तीन घटक ओळखू शकेल. शब्दप्रयोग करू शकेल. |
| | | स्तर ४ : ७६१00% गुण (उत्तम) विद्यार्थी पर्यावरण / वातावरण या शब्दांचा ४ ही प्रकारे शब्दप्रयोग करू शकेल. |

# २७

# शांतता आणि सुरक्षा

तुम्ही "शांतता आणि सुरक्षा" ही संज्ञा ऐकली आहे का? जेव्हा एखाद्या शहरात किंवा राज्याच्या एखाद्या प्रदेशात हिंसक कृती घडते तेव्हा आपल्याला असे सांगितले जाते की शांतता आणि सुरक्षेला धोका आहे. एखाद्या देशात उठाव किंवा उद्रेक झाल्यास राष्ट्रीय शांतता व सुरक्षेला धोका आहे असे म्हणतात. विशेषत: जर पोलिस दल किंवा लष्कराला पाचारण केले गेले तर ते शांतता व सुरक्षा जपण्यासाठी केले जाते. जर राष्ट्राराष्ट्रांमध्ये युद्ध झाले किंवा एखाद्या देशात दहशतवादी कारवाई झाली तर तो आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षेला धोका असतो. आपल्याला असेही सांगितले जाते की संयुक्त राष्ट्रसंघासारख्या आंतरराष्ट्रीय संघटना शांतता व सुरक्षा जपण्यासाठी असतात. शांतता व सुरक्षा हे दोन शब्द स्वतंत्रपणेसुद्धा वापरले जातात. सगळे धर्म शांततेबद्दल बोलतात. एक व्यक्ती म्हणून आपणसुद्धा मनाच्या, कुटुंबांच्या किंवा समाजाच्या शांततेबद्दल विचार करत असतो. मुली आणि महिला बाहेर पडतात तेव्हा कुटुंबांना वाटणाऱ्या काळजीबद्दलही आपण वाचतो. या संज्ञांचा विविध वेळी विविध संदर्भात केला जाणाऱ्या वापराने आपण गोंधळात पडतो. आता आपण व्यक्तीगत, सामाजिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षेचे विविध पैलू पाहूया.

## उद्दिष्टे :

हा पाठ अभ्यसल्यानंतर तुम्ही पुढील गोष्टी करू शकाल.

- शांतता व सुरक्षेच्या विविध संदर्भातील अर्थाचे स्पष्टीकरण.
- शांतता व सुरक्षेच्या पारंपरिक आणि आधुनिक अर्थांना समजून घेणे.
- लोकशाही आणि विकासासाठी शांतता व सुरक्षा या आवश्यकता म्हणून अधोरेखित करणे.
- भारतीय राज्याने शांतता व सुरक्षेच्या धोक्यांचे निराकरण करण्यासाठी योजलेल्या उपाययोजनांचा विचार करणे.
- आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेप्रतीचे भारताचे योगदान आणि संयुक्त राष्ट्रात भारताचा सहभाग समजून घेणे.

## २७.१ शांतता आणि सुरक्षा

### २७.१.१ अर्थ :

आपण शांतता आणि सुरक्षेचा अर्थ समजून घेण्यापासून सुरुवात करूया. पुढील गोष्ट तुम्हाला मदत करेल.

### १. शांतता :

एकदा एका राजाने शांततेवर सर्वोत्तम चित्र काढणाऱ्या चित्रकारासाठी बक्षीस जाहीर केले. अनेक कलाकारांनी प्रयत्न केला. राजाने सर्व चित्रे पाहिली आणि दोन निवडली ज्यातून त्याला सर्वोत्तम चित्र निवडायचे होते. एका चित्रात सभोवतालच्या पर्वतांचा आरसा असावे असे शांत तळे दाखवले होते. वरती पांढऱ्या ढगांसह निळे आकाश तळ्यात प्रतिबिंबित होत होते. सगळ्यांना ते परिपूर्ण चित्र वाटत होते. दुसऱ्या चित्रातही डोंगर होते, ढगांनी वेढलेले, कोसळणाऱ्या पावसासह विजा चमकणारे आभाळ होते. डोंगरांच्या बाजूने खळाळणारा धबधबा होता. त्या धबधब्याच्या मागे झुडुपांमध्ये एका पक्ष्याने घरटे बांधले होते आणि तो शांततेने आपल्या पिलांना भरवत होता. कोणत्या चित्राला बक्षीस मिळाले असेल? राजाने दुसरे चित्र निवडले. का बरे? राजाने कारण सांगितले ते असे, "शांततेचा अर्थ आवाज, त्रास आणि गोंधळाचा अभाव असा होत नाही. शांततेचा अर्थ या सगळ्याच्या मधे असूनही मनात शांतता असणे असा होतो."

राजाने निवडलेले चित्र खऱ्या अर्थाने शांतता दाखवते असे तुम्हाला वाटते का? शांतता म्हणजे गोंधळ आणि संघर्षाचा अभाव असणारी मनस्थिती किंवा परिस्थिती नाही खरे तर, मानवी जगात गोंधळ आणि संघर्षाचा अभाव अशक्य आहे. आपण शांततेचा अर्थ सामाजिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिप्रेक्षात समजून घेण्याचा प्रयत्न करतो. मानवरहित परिप्रेक्षात नाही. आपण त्याची पुढीलप्रमाणे व्याख्या करू शकतो. शांतता ही व्यक्ती, समाज आणि राष्ट्राचा विकास सुनिश्चित करणारी सामाजिक व राजकीय परिस्थिती असते. ती सामाजिर्कआर्थिक कल्याण व समतेशी निगडीत परिस्थिती असते. सुदृढ नातेसंबंधी असणारे ते सौहार्द असते. सर्वांच्या हितसंबंधांचे रक्षण करणाऱ्या राजकीय व्यवस्थेशीही त्याचा संबंध असतो. देशांतर्गत किंवा आंतरराष्ट्रीय संदर्भात त्याचा अर्थ युद्धाचा अभाव इतकाच नाही तर सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक समजूतदारपणा आणि एकता असणे असा होतो.

### २. सुरक्षा :

सुरक्षा हा शब्द आपल्या रोजच्या संभाषणातही येतो; तसेच वृत्तपत्रे किंवा कार्यालयीन चर्चातही येतो. सुरक्षेचा संदर्भबिंदु वैयक्तिक, संस्थात्मक, प्रादेशिक, राष्ट्रीय पातळीपासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत असू शकतो. आपले घर आणि परिसर सुरक्षित ठेवण्यासाठी आपण प्रयत्न करतो. आपण जाणतो की मंत्री आणि अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना वैयक्तिक सुरक्षा पुरवली जाते. महत्त्वपूर्ण शासकीय व इतर तसेच धोकाप्रणव क्षेत्रांना सुरक्षा तरतूदी केल्या जातात. आपण राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सुरक्षेबद्दलही एकतो. सुरक्षा या शब्दाचा बहुविध उपयोग त्याचे अनेक अर्थ आहेत हे दर्शवतो. साधारणपणे तो सुरक्षित किंवा भयमुक्त परिस्थिती असा होतो. तसेच एका व्यक्तीची, संस्थेची प्रदेशाची किंवा देशाची सुरक्षा असाही होतो. अगदी मुलभूत पातळीवर सुरक्षेचा अर्थ भयानक धोक्यांपासून मुक्तता असा होतो.

## ३. शांतता आणि सुरक्षा :

शांतता आणि सुरक्षेचे विविध अर्थ स्विकारताना हे जाणवते की ते एकमेकांपासून वेगळे केले जाऊ शकत नाहीत. दोन्ही एकत्र केले असता एक अशी परिस्थिती तयार होते ज्यात व्यक्ती, संस्था, प्रदेश आणि राष्ट्र कोणत्याही धोक्याशिवाय पुढे वाटचाल करू शकतात. या परिस्थितीत प्रदेश आणि राष्ट्रे अंतर्गतदृष्ट्या अधिक स्थिर असतात, तसेच लोकशाही राज्यकारभार होण्याची आणि मानवी हक्कांप्रती आदर असण्याची शक्यता अधिक असते. संघर्षाने केवळ धोके आणि भीती उत्पन्न होते असे नाही तर आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रगतीवरही विपरित परिणाम होतात.

### उपक्रम २७.१

खाली दिलेल्या दोन परिस्थितींचा विचार करा, त्यापैकी कोणती परिस्थिती सुरक्षा व शांततेसाठी योग्य आहे? तुमच्या उत्तरासाठी कारणे द्या.

१. लष्करी हुकुमाहीत असणाऱ्या एका देशात सर्व सुव्यवस्थित आहे. सगळीकडे शांतता असल्याचे भासते. शासक गटाला सर्व विशेषाधिकार असतात. चांगल्या आयुष्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्राथमिक सुविधा सुद्धा लोकांना उपलब्ध नसतात. पण ते शासकांच्या आदेशांचे मूकपणे पालन करतात. कोणत्याही प्रकारचा निषेध किंवा शासनाला धोका नसतो. बाह्य धोक्यांसाठी तिथे सुरक्षा योजना केलेल्या असतात.

२. सामाजिर्कआर्थिक प्रगती करणारा एक लोकशाही देश आहे. लोक सर्व मूलभूत अधिकारांचा, स्वातंत्र्य, समता आणि न्यायाचा उपभोग घेतात. ते आपल्या चिंता शासनापर्यंत मुक्तपणे पोहोचवतात. कधीकधी, शासनाच्या सकारात्मक प्रतिसादाने शांततामय निषेध हाताळले जातात. लोकांना दैनंदिन जीवनात समस्या उद्‌भवतात पण ते त्या स्वत:च सोडवण्याचा प्रयत्न करतात. लोकांच्या व राष्ट्राच्या सुरक्षेला सततचा धोका नसतो.

### २७.१.२ शांतता आणि सुरक्षेबद्दलच्या पारंपरिक आणि नवीन समजुती / अर्थ

आपण जेव्हा शांतता व सुरक्षेबद्दल बोलतो तेव्हा बऱ्याचदा आपण त्याचा संबंध लष्करी किंवा सशस्त्र धोक्यांशी जोडतो. हा धोका बऱ्याचदा दुसऱ्या राष्ट्राविरुद्ध लष्करी पावले उचलणाऱ्या किंवा उचलण्याची शक्यता असणाऱ्या राष्ट्रामुळे उद्‌भवतो. यातून सार्वभौमत्व, राष्ट्राची प्रादेशिक एकता आणि स्वातंत्र्य, तसेच लोकांच्या आयुष्याला धोका निर्माण होतो. शांतता व सुरक्षा राखण्यासाठी लष्करी कारवाईच्या कारणावर तोडगा काढण्यासाठी द्विपक्षीय करार, किंवा परस्पर अनाक्रमणाचा दीर्घ मुदतीचा करार करण्यात येतो. काही देश सत्तासंतुलनाच्या एकावरही लष्करी हल्ला झाल्यास सर्वांनी संयुक्त कृती करण्याच्या कराराचा अवलंब करतात. संयुक्त राष्ट्रासंघासारख्या आंतरराष्ट्रीय संघटना मानवजातीला युद्ध आणि लष्करी हल्ल्यांच्या धोक्यापासून वाचवण्यासाठीच निर्माण केल्या आहेत.

पण शांतता सुरक्षेचा नवीन किंवा अपारंपरिक अर्थ अधिक व्यापक आणि लष्करी धोक्याच्या पलीकडे जाऊन मानवी अस्तित्वाला घातक अश्या इतरही धोक्याचा समावेश करतो. या संकल्पनेत केवळ प्रदेश व देशांचा नव्हे तर व्यक्ती, समुदाय आणि समस्त मानवजातीचा समावेश होतो. शांततासुरक्षेची ही

नवी जाणीव मुख्यत्वे व्यक्तीवर लक्ष देते. हे खरे आहे की परकीय आक्रमणापासून लोकांचे रक्षण करणे. शांतता व सुरक्षेसाठी आवश्यक आहे पण तो शेवट नाही. वस्तुत: शांतता व सुरक्षेकडे सामाजिक आर्थिक विकासाची पूर्वअट म्हणून पहायला हवे. या नव्या जाणीवेत, व्यक्तीला भूक, वासना, आजार व साथीचे रोग, पर्यावरणीय ऱ्हास, शोषण आणि अमानवी वागणूक यापासून मुक्तीचा समावेश होतो. या पार्श्वभूमीवर शांतता व सुरक्षेची नवी संकल्पना लष्करी हल्ल्यापलीकडे जाऊन आंतकवाद, विप्लववाद, मानवी संहार, मानवी हक्क नाकारले जाणे, साथीचे रोग, अंमली पदार्थांचा व्यापार आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा असमंजस वापर इ. चा समावेश करून घेते.

## पाठ्यांशावरील प्रश्न २७.१

**१. रिकाम्या जागा भरा.**

अ) शांतता म्हणजे .......... चा अभाव असणारी मनस्थिती किंवा परिस्थिती नाही.

ब) शांतता म्हणजे .......... असणारे सौहार्द

क) ........... चा व्यत्यय न येणारी सुरक्षित परिस्थिती व भावना म्हणजे सुरक्षा. तसेच तीचा अर्थ ........... ची सुरक्षितता असाही होतो.

२. शांतता व सुरक्षेला इतके महत्त्वपूर्ण का मानतात?

३. शांतता व सुरक्षेच्या पारंपरिक व नवीन / अपारंपरिक संकल्पनेतील तीन प्रमुख फरक कोणते?

## २७.२ लोकशाही आणि विकासासाठी शांतता व सुरक्षा :

लोकशाही आणि विकास तसेच शांतता व सुरक्षा यांच्यात एक परस्परसंबंध आहे. शांतता व सुरक्षा नसल्यान लोकशाही चालू शकत नाही आणि विकास घडून येत नाही. निवडणुका घेण्यासाठी शांतता गरजेची आहे. शांततेशिवाय लोकशाही संस्था चालू शकत नाहीत. शांतता असेल तरच नागरिकांना निर्णय प्रक्रियेच्या विविध पातळ्यांवर सहभागी होता येते. विविध भागांच्या विकासासाठी शांतता गरजेची असते. व्यत्यय, हिंसा आणि युद्ध घडत असल्यास विकास होत नाही.

दुसऱ्या वाजूला लोकशाही आणि विकासाशिवाय शांतता टिकून राहू शकत नाही. असे निदर्शनास आले आहे की सहसा लोकशाही देश युद्ध पुकारत नाहीत. एखाद्या प्रदेशात सर्व राष्ट्रे लोकशाही असल्यास प्रादेशिक शांतता टिकून राहते. जनतेत असमाधान निर्माण होणे. टाळण्यासाठीही लोकशाही अधिक उपयुक्त ठरते. याचे कारण, लोकशाही सर्व नागरिकांना राज्यकारभार आणि निर्णय प्रक्रियेत सहभागाची संधी देते. विकास नेहमी शांततेचा पुरस्कार करतो. विकासाच्या माध्यमातूनच राष्ट्रे त्यांच्या जनतेसाठी सामाजिकआर्थिक प्रगती तसेच राहणीमानाच्या दर्जात सुधारणा घडवून आणतात. ज्यातून निषेध आणि हिंसक कृतीची प्रेरणा मिळते अशी वंचनेची भावना निर्माण होऊ दिली जात नाही. जेव्हा एका प्रयत्न करतो. ज्यायोगे विकासाला बाधा येत नाही.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

सुंयक्त राष्ट्रसंघाच्या १८९ सदस्य राष्ट्रांनी ८ सप्टेंबर २००० रोजी स्विकारलेल्या सहस्रक विकास उद्दिष्टांमध्ये शांतता व सुरक्षेला यशस्वी विकासासाठी महत्त्वाचे मानले आहे.

सन २००५ च्या सहस्रक विकास उद्दिष्टांवरील जागतिक शिखर परिषदेने असे मानले की "विकास, शांतता व सुरक्षा आणि मानवी हक्क हे परस्परांशी जोडलेले असून परस्परपूरक आहेत."

## २७.३ शांतता व सुरक्षा :

भारतात स्विकारलला दृष्टीकोन इतर कोणत्याही देशाप्रमाणे शांतता व सुरक्षा हा भारत देशास महत्त्वाचा विषय राहिला आहे. शांतता व सुरक्षेला असणाऱ्या अंतर्गत व बाह्य धोक्यासंबंधीची माहिती तुम्हाला वृत्तपत्रे, रेडिओ तसेच टी. व्ही. वरून मिळत असेलच. भारताचे भौगोलिक स्थान आणि त्याचा जागतिक सत्ता म्हणून उदय यातून बाह्य धोके उद्‌भवतात. भारताने चीन व पाकिस्तानसारख्या देशांबरोबर युद्धाचा तर आंतरराष्ट्रीय दहशतवादाचाही सामना केला आहे. अगदी स्वातंत्र्यप्राप्तीपासून विप्लव आणि विभक्ततावादी चळवळींचा अंतर्गत धोका राहिला आहे. स्वातंत्र्यानंतर अवघ्या दोन दशकांत भारतात उभ्या राहिलेल्या नक्षलवादी कृत्यांनी आज गंभीर रूप धारण केले आहे. या परिप्रेक्षात, खरे तर स्वातंत्र्य चळवळीपासूनच शांतता व सुरक्षा सुनिश्चित करणाऱ्या दृष्टीकोनाचा विकास झाला. हा दृष्टीकोन घटनेतूनही दिसतो. मात्र हा दृष्टीकोन काळाबरोबर गरजेप्रमाणे बदलत गेला.

### २७.३.१ शांतता व सुरक्षेच्या दृष्टीकोनाचा स्वातंत्र्य चळवळीदरम्यान उगम :

शांतता व सुरक्षा सुनिश्चित करण्याच्या दृष्टीकोनासंबंधी विविध कल्पना आणि मतांचा स्वातंत्र्य चळवळीतच उदय झाला. नेतृत्वाच्या हे लक्षात आले होते की शांतता व सुरक्षा अबाधित राखली तरच स्वातंत्र्योत्तर लोकशाही व्यवस्थेला कारभार करता येईल. शांतता टिकल्याशिवाय विकास प्रक्रियेचा वेग वाढवता येत नाही. म्हणूनच त्यावेळेच्या नेतृत्वाने असे व्यक्त केले की भारत आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा टिकण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करेल. त्यांनी सर्व वसाहतवादविरोधी व वंशवादविरोधी चळवळींना पाठिंबा देत लोकशाहीचा पुरस्कार केला. सामाजिकआर्थिक विकासासंदर्भात सामाजिक न्याय आणि धर्मनिरपेक्षतेवर भर देणाऱ्या समाजवादी दृष्टीकोनावर एकमत होण्यामागे शांततेला असणाऱ्या अंतर्गत धोक्याविरुद्ध सुरक्षा पुरवण्याचाच विचार होता.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

जवाहरलाल नेहरू म्हणाले होते; "मला हे स्पष्ट करावेसे वाटते की भारताने स्विकारलेले धोरण हे नकारात्मक किंवा उदासीन नाही आमच्या स्वातंत्र्यलढ्यातून आणि महात्मा गांधीच्या शिकवणुकीतून उभे राहिलेले तो एक सकारात्मक धोरण आहे. प्रगती आणि विकास करण्यासाठी केवळ आम्हा भारतीयांसाठी शांतता ही एक आवश्यकता नाही. ती संपूर्ण जगासाठी अतिशय महत्त्वाची आहे.

(पं. नेहरूंच्या कोलंबिया विद्यापीठातील भाषणातून १९४९ उद्‌धृत केले.)

## २७.३.२ राज्यघटनेतील शांतता व सुरक्षा

स्वातंत्र्य चळवळीत उगम पावलेल्या कल्पनांचा घटनानिर्मितीवर प्रभाव होता. त्यामुळेच राज्यघटनेने मार्गदर्शक तत्त्वांवरील प्रकरणात शांतता व सुरक्षेचा उल्लेख केला आहे. संघराज्य पद्धती आणि स्थानिक शासनसंस्थांना निर्मितीतून सत्तेच्या केंद्रीकरणाला आळा घातला आहे कारण तसे झाल्यास प्रादेशिक व स्थानिक असंतोष निर्माण होऊ शकतो. जो शांततेस धोकादायक असतो. संघराज्य पद्धतीत सामाजिक आर्थिक प्रगतीसंदर्भातले निर्णय राज्य सरकारे घेतात. ते त्या राज्यातील लोकांच्या आर्शाआकाक्षांशी मिळर्तेजुळते असतात. स्थानिक शासन निर्णय प्रक्रियेत जनसहभाग महत्वाचा मानते. तसेच सर्वांचा विकास व मागण्या पूर्ण करण्यास प्राधान्य दिले जाते .

### तुम्हास हे माहित आहे का ?

घटनेचे ५१ वे कलम सांगते अ) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा राखण्याचा ब) राष्ट्राराष्ट्रात न्याय व सलोखा संबंध प्रस्थापित करण्याचा क) आंतरराष्ट्रीय कायद्याप्रती आदर व तहातील तरतुदींचे संबंधित राष्ट्रातील लोकांकडून पालन करण्याचा ड) न्यायालयीन मध्यस्थीद्वारा आंतरराष्ट्रीय संघर्ष सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल.

म्हणून भारताने शांतता व सुरक्षा जपण्यासाठी बहुविध आयाम असणारा दृष्टीकोन आणि पद्धत स्विकारली. आंतरराष्ट्रीय पातळीवर जागतिक शांतता व सुरक्षेचा पुरस्कार करणाऱ्या धोरणाचा अवलंब केला. प्रादेशिक किंवा जागतिक शांततेचा पुरस्कार, समतोल आर्थिक विकास, मानवी हक्कांचा पुरस्कार आणि दहशतवादाचे निर्मूलन या प्रयत्नास भारताने पाठिंबा दिला. राष्ट्रीय पातळीवर भारत एकता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता, समतोल आर्थिक विकास आणि असमानता दूर करण्यास कटिबद्ध आहे. तो आपल्या सर्व नागरिकांना केवळ निवडणुक प्रक्रियेतच नव्हे तर विविध पातळ्यांवर निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी समान संधी पुरवतो. समाजाच्या कोणत्याच घटकाला आपण डावलले जातो आहोत किंवा आपल्या हितसंबंधांकडे दुर्लक्ष केले जाते आहे असे वाटू नये असा त्यामागे उद्देश आहे. कारण याच भावनेतून असंतोष उद्भवतो आणि त्यातून निदर्शने, राजकीय हिंसाचार आणि ते शांतता व सुरक्षेला मोठा धोका असतात.

### पाठ्यांशावरील प्रश्न २७.२

१. भारताला आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय शांतता व सुरक्षेसाठी विशिष्ट दृष्टीकोन का तयार करावे लागले?

२. शांतता व सुरक्षेसंबंधीचा दृष्टीकोन उदयाला येण्यात स्वातंत्र्य चळवळीचे योगदान काय होते?

३. भारतीय राज्यघटनेत नमूद केलेला शांतता व सुरक्षेबाबतचा दृष्टीकोन कोणता?

४. अंतर्गत व आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठीची सर्वोत्तम पद्धत तुमच्या मते कोणती?

## २७.४ शांतता व सुरक्षेला असणारे आंतरराष्ट्रीय धोके :

तुम्ही पाहिले असेल की आक्रमक निदर्शने, निषेध किंवा हिंसक कृती ज्यातून जीवित व वित्तहानी होते ती शांतता व सुरक्षेला घातक ठरतात. पण अशा अनेक घटना या कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न असतात आणि पोलिसांकडून हाताळल्या जातात. आपल्यासारख्या लोकशाहीत असे बंद, मोर्चे, निदर्शने सरकार किंवा संबंधित अधिकाऱ्यांचे विशिष्ट मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी घडतच असतात. पण भारताला दहशतवाद, नक्षलवाद किंवा विप्लवाच्या बुरख्यामागील अनेक हिंसक कारवायांचा सामना करावा लगत आहे. कारण हे शांतता व सुरक्षेला मोठा धोका असतो.

### २७.४.१ दहशतवाद :

दहशतवाद हा आपल्या देशात शांतता व सुरक्षेला सर्वात मोठा धोका आहे. २६/११ म्हणून सर्व साधारपणे ओळखला जाणारा २६ नोव्हेंबर २००८ चा मुंबईवरचा दहशतवादी हल्ला अश्याच वाईट हल्ल्यांचे प्रतीक आहे. अलीकडे नियमतपणे मोठ्या शहरांतून होत असणाऱ्या या दहशतवादी कृत्यांनी तुम्हाला धक्का बसला नाही का? खरेतर स्वातंत्र्यपासून अशी कृत्ये देशाच्या विविध भागात अधून मधून घडत आहेत. या हिंसक कारवाया करणारे दहशतवादी परकीय नागरिक असतात किंवा बुद्धीभेद केलेले आणि शेजारी राष्ट्रांत प्रशिक्षण आणि सहाय्य मिळालेले भारतीय तरुण असतात. कधीकधी आपण दहशतवादी कृतीची व्याख्या करताना गोंधळून जातो. दहशतवादाच्या व्याख्येवर एकमत नाही. साधारणपणे भारतीय संदर्भात आपण दहशतवादाची व्याख्या राजकीय किंवा विचारप्रणाली संबंधित उद्दिष्टांसाठी भीतीचे वातावरण तयार करण्यासाठी नागरिकांवर नाट्यमय आणि प्राणघातक कृत्य करण्यासाठी केलेली गुन्हेगारी कारवाई अशी करू शकतो. दहशतवाद हे गुन्हेगारी कृत्य आहे पण ते गुन्हेगारीपेक्षा अधिक हानिकारक आहे. तो कोणत्याही परिस्थितीत असमर्थनीय आहे, कोणत्याही राजकीय, सात्विक, विरप्रणाली अधिष्ठीत वांशिक, धार्मिक किंवा इतर प्रकारच्या समर्थनांचा आधार घेतला तरी सुद्धा.



आकृती २७.१ : मुंबईवरील दहशतवादी हल्ला

**तुम्हास हे माहित आहे का ?**

२००४ साली संयुक्त राष्ट्र सुरक्षा समितीच्या १५६६ व्या ठरावाने दहशतवादी कृत्यांची निंदा केली.

नागरिकांविरूद्ध, मृत्यू किंवा शारीरिक इजा पोहोचवण्याच्या, किंवा ओलिस ठेवून घेण्याच्या उद्देशाने केलेल्या, सर्वसामान्य जनतेत किंवा विशिष्ट व्यक्तीसमुहात दहशत निर्माण करण्यासाठी, जनसमूहास चिथवण्यासाठी, सरकार किंवा आंतरराष्ट्रीय संघटनेला एखादी गोष्ट करण्यासाठी वा त्यापासून परावृत्त करण्यासाठी केलेल्या गुन्हेगारी कारवाया ज्यांना दहशतवादाशी संबंधित आंतरराष्ट्रीय protocol आणि conventions च्या कक्षेत अपराध मानले आहे. त्या कोणत्याही राजकीय, तत्त्वज्ञानाधारित, विचारप्रणाली अधिष्ठित, वांशिक, मूल्याधिष्ठित, धार्मिक किंवा इतर परिस्थिचा विचार करून, कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाहीत.

आपण अनुभवल्याप्रमाणे दहशतवादी बॉम्बहल्ले किंवा गर्दीच्या ठिकाणी अंदाधुंद गोळीबार करून शेकडो निरपराध माणसांना मारतात किंवा जखमी करतात. ते विमानांचे अपहरण करून सरकारला आधी पकडलेल्या व तुरुगांत असणाऱ्या दहशतवाद्यांना सोडायला भाग पाडतात. या कारवाया सार्व जनिक आणि खाजगी मालमत्तेची नासधूस करतात. नागरिक व सरकारला चिथवण्यासांठी दहशतीचे वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने ते ही निघृण कृत्ये करतात.

**उपक्रम २७.२**

भारतात १९९२ पासून विविध शहरांत झालेल्या दहशतवादी हल्ल्यांची माहिती काढून पुढील तक्ता भरा.

| अ. क्र. | दहशतवादी हल्याची तारीख | शहराचे नाव | हल्ल्याची पद्धत (स्फोट, गोळीबार किंवा दोन्ही) | मृत व जखमींची संख्या |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

### २७.४.२ विप्लव :

विप्लव हा प्रस्थापित अधिसत्ता शासनसंस्थेविरुद्धचा सशस्त्र उठाव असतो. स्वातंत्र्य प्राप्तीपासून भारताने विप्लववादी चळवळीसंबंधीत हिंसेचा अनुभव घेतला आहे. ढोबळमानाने त्यांची राजकीय

उद्दिष्टांसाठीच्या चळवळी आणि सामाजिक आर्थिक न्यायासाठीच्या चळवळी अशी विभागणी करता येईल. सर्वात ठळक बंडखोर गट म्हणजे जर्म्मूकाश्मिर आणि आसाममध्ये काम करणारे अतिरेकी, विभक्तवादी गट आणि भारताच्या ईशान्येकडच्या राज्यात म्हणजे मणिपूर, मिझोरम, अरुणाचल प्रदेश, नागालँड आणि त्रिपुरा मधील बंडखोर गट या सर्व गटांचे सदस्य भारतीय असले तरी त्यांना शेजारी राष्ट्रांचे पाठबळ आहे. या बंडखोर चळवळी चालू राहण्याचं कारण हे गट सद्यस्थितीबाबत असंतुष्ट आहेत हे असले तरी काही गटांचे विशेषत: जम्मू-काश्मिर आणि आसाम मधील ं राजकीय हेतू आहेत. ते देशापासून विभक्त होण्यासाठी लढत आहेत. या गटांना शेजारी राष्ट्रांचा तसेच आंतरराष्ट्रीय दहशतवादी गटांचा सक्रिय पाठिंबा आहे.

२७.४.३

अनेक प्रकारच्या गुंतागुंतीमुळे नक्षलवादी चळवळ एक काळजीचा विषय राहिली आहे. तिची सुरुवात पं. बंगालच्या एका खेड्यात झाली पण ती आता भारताच्या १२ राज्यातील १२५ जिल्ह्यात पसरून लाखो लोकांच्या जगण्यावर विपरीत परिणाम करते आहे. नक्षलवादी बहुतेक वेळा सार्वजनिक मालमत्ता, सरकारी अधिकारी, पोलिस आणि निमलष्करी दले आणि ते ज्यांना शत्रू मानतात अशा लोकांवर हल्ले करतात. जंगली प्रदेशात कोणताही विकास होण्याच्या ते विरोधात आहेत. सरकारला खेडोपाडी पक्के रस्ते बांधायचे आहेत पण नक्षलवादी त्या प्रदेशात कोणत्याही विकासाला विरोध करीत आहेत. ते हे जाणून आहेत की विकास सुरू झाला की लोकांचा पाठिंबा ते गमावतील. म्हणून ते सरकारला तुमची खनिजसंपत्ती आणि वने हिरावून घ्यायची आहेत असे सांगून सामान्य लोकांची दिशाभूल करत आहेत.



**आकृती २७.२ : नक्षलवादी**

दुर्दैवाने या चळवळीच्या उगम व प्रसाराचे एक कारण समाजाच्या काही घटकांमध्ये असणारा असंतोष होता. या हिंसक कारवायात गुंतलेले तरुण ज्यांना दीर्घकाळापासून सामाजिक भेदाभेद आणि आर्थिक विवंचनेची झळ सोसावी लागलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि दलित घटकांतून येतात. तुम्ही या घटकांना समाजात मिळणाऱ्या भेदभावाच्या वागणुकीबद्दल जाणत असाल किंवा तिचा काही अनुभव घेतला असेल. भारतात झालेल्या विकासाची फळे पूर्णपणे या घटकांपर्यंत पोहोचायची आहेत. कारणे काहीही असोत पण विकासाला त्यांच्या इच्छा-आकांक्षांची पूर्ती करता आलेली नाही.

**तुम्हास हे माहित आहे का ?**

भारतात नक्षलवादी विप्लव मार्च १९६७ ला सुरु झाला. एक tribal तरुणावर ज्याच्याकडे जमीन कसण्यासाठी न्यायालयीन आदेश होते. स्थानिक सरंजामदाराच्या गुंडांनी हल्ला केला तेव्हा चारु मुजुमदार आणि कनु संन्यालच्या नेतृत्वाखाली नक्षलवादी खेड्यात शेतकरी उठाव झाला. Tribals नी प्रतिहल्ला केला आणि जमीनदाराला त्याचा हिस्सा न देता सर्व उत्पन्न स्वत: नेले. हा वणवा राज्यभर पसरला. राज्यसरकारने बळ आणि समांतर जमीनसुधारणा करून हे आटोक्यात आणले. हा नक्षल चळवळीचा पहिला टप्पा होता. नंतर दुसरा टप्पा ९ राज्यात पसरला. बिहार, झारखंड, पं. बंगाल, ओरिसा, छत्तीसगढ, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश. याने भारतीय राष्ट्रापुढे आव्हान उभे केले. प्रामुख्याने दुर्गम भागात नक्षलवादी कांगारु न्यायालये चालवतात, कंत्राटदार, खाणमालक, व्यावसायिक तसेच सरकारी अधिकाऱ्यांवर जबरदस्तीने कर लागू करतात. या चळवळीने नेते, कार्यकर्त्यांची फौज, आणि सहानुभूतीदार निर्माण केले. ज्यांना गुरिल्ला रणतंत्र भारताला मुक्त करण्याचा मार्ग वाटते.

### २७.४.४ सरकारची रणनीती :

भारत सरकार दहशतवाद, नक्षलवाद आणि विप्लवाचा मुकावला करण्यासाठी रणनीती अंमलात आणत आले आहे. भारताने सर्व राष्ट्रांच्या दहशतवादीविरोधी प्रयत्नांना पाठिंबा दिला आहे तसेच त्याच्यावर तसा हल्ला झाल्यास त्यांचा पाठिंबा मागितला आहे. राजकीयरीत्या भारत, पाकिस्तान आणि इतर शेजारी देशांवर दहशतवादी गटांना त्यांच्याकडून पाठवळ मिळू नये यासाठी सक्रीय सहकार्य करण्यावावत दबाव टाकतो आहे. राजकीय हेतुप्रेरित विप्लवाचा सामना भारत सरकार संयमाने, चर्चेने करते आहे. भारताने म्यानमार आणि बांग्लादेशावरोबर विप्लववादी कारवायांना त्यांच्याकडून मिळणाऱ्या पाठवळाला आळा घालण्यासाठी नुकतेच करार केले आहेत. पाकिस्तानवरही तसेच करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दबाव आणला जातो आहे. नक्षलवादी चळवळीला सुरुवातीला कायदा सुव्यवस्थेची समस्या म्हणून राज्यांनी हाताळले. परंतु नंतर लक्षात आले की ही अधिक सखोल सामाजिक आर्थिक आयाम असणारी समस्या आहे. त्या प्रदेशात प्रगतीचा वेग वाढवून तरुणांना मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

**उपक्रम २७.३**

खालील विधानाांवर तुमचे मित्र, वर्गमित्र, शिक्षक किंवा इतर जे कोणी सहज उपलब्ध असतील त्यांची मते विचारा. त्यांची संख्या किमान पाच असावी. ते त्या विधानांशी सहमत / असहमत का आहेत याची कारणे त्यांनी द्यावी.

१. सरकारने नक्षलादी चळवळ चिरडून टाकावी, नक्षलवाद्यांना पकडावे किंवा मारून टाकावे जेणेकरून शांतता व सुरक्षेला कोणताच धोका राहणार नाही.

२. सरकारने नक्षलवाद्यांना शांतता व सुरक्षेला बाधा आणण्यापासून रोखण्यासाठी नक्षलवादी चळवळीबाबत राष्ट्रीय धोरण निर्माण करावे. त्या प्रदेशात विकासाचा वेग वाढवावा म्हणजे तरुणांमध्ये असंतोष राहणार नाही. तसेच नक्षलवाद्यांना हिंसा थांबवून मुख्य प्रवाहात सामील होण्यास आवाहन करावे.

प्रतिक्रियेमागची कारणे पुढील रकान्यात लिहा. त्या आधारे तुम्हाला नक्षल चळवळीची समस्या कशी सोडवायला आवडेल त्याबाबत लिहा.

| विधान क्र. | कारणे |
|---|---|
| विधान १ | १)<br>२)<br>३)<br>४)<br>५) |
| विधान २ | १)<br>३)<br>५)<br>२)<br>४) |

## पाठ्यांशावरील प्रश्न २७.३

**१. रिकाम्या जागा भरा.**

अ) भारताला १) ...................... २) ............... ३) ................ च्या बुरख्यामागील अनेक हिंसक कारवायांचा सामना करावा लागला आहे.

ब) नागरिकांवर ............... करण्यासाठी आणि साधारणत: राजकीय व विचारप्रालीच्या उद्दिष्टांसाठी .............. केलेली गुन्हेगारी कृती म्हणजे दहशतवाद.

क) भारतातील विप्लव दोन प्रकारचे आहे. १) ................ च्या चळवळी आणि २) .............. साठीच्या चळवळी

२. विप्लवाचा सामना करण्यासाठी सरकारच्या प्रमुख रणनीती कोणत्या?

३. विप्लवाची समस्या सोडवण्यासाठी सरकारने कोणती पावले उचलली पाहिजेत?

## २७.५ भारत आणि आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा :

भारताला आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षेबाबतही तितकीच काळजी आहे. त्याच्या प्रगतीसाठी ती आवश्यक आहे. इतर कोणत्याही देशाप्रमाणे भारतीय परराष्ट्र धोरणसुद्धा त्याच्या राष्ट्रहितात रुजलेले आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणात आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षेबरोबरच शेजार आणि प्रादेशिक शांतता व सुरक्षा ही एक प्रमुख जाणीव आहे. स्वातंत्र्यापासूनच भारतीय परराष्ट्र धोरणाची प्राथमिक उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत. (१) धोरणनिर्मितीचे स्वातंत्र्य (२) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षेचा सुरस्कार (३) इतर राष्ट्रांबरोबर आणि विशेषत: शेजारी राष्ट्रांबरोबर चांगले संबंध (४) संयुक्त राष्ट्रांना पाठिंबा (५) नि:शस्त्रीकरणाला पाठिंबा, वसाहतवाद, साम्राज्यवाद आणि वर्णवादाला विरोध (६) विकसनशील देशांमध्ये परस्पर सहकार्य ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी भारताने राबवलेल्या धोरणाला अलिप्ततावादाचे धोरण म्हणतात, अर्थात काळानुसार सुसंगती राखण्यासाठी त्यात बदल झाले आहेत.

### २७.५.१ अलिप्ततवादाचे धोरण :

अलिप्ततावाद हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले गेले आहे. जग जेव्हा दोन गटांमध्ये विभागले गेले होते. अमेरिकेच्या नेतृत्वातील पाश्चिमात्य राष्ट्रे आणि सोव्हिएत संघाच्या नेतृत्वाखालील साम्यवादी राष्ट्रे तेव्हा भारताने अलिप्ततावादाच्या उदयाच्या प्रक्रियेचे नेतृत्व केले. या दोन गटांतल्या शीतयुद्धाचा काळ म्हणून तो काळ ओळखला जात असे. आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेत सहकारी मिळवण्यासाठी प्रत्यक्ष युद्ध न करतासुद्धा अमेरिका आणि सोव्हिएत संघातील तीव्र शत्रुत्वाचा तो काळ होता. शीतयुद्ध दुसऱ्या महायुद्धानंतर लगेच सुरू झाले आणि पंचेचाळीस वर्षे चालले, हे दोन्ही मोठे देश पूर्व आणि पश्चिम म्हणून ओळखले जाणारे दोन ध्रुव बनले आणि त्यांच्याभोवती जागतिक राजकारण फिरत होते. जग हे द्विध्रुवी व्यवस्था बनले होते.

सोव्हिएत संघ आणि अमेरिकेने बनवलेल्या लष्करी आघाडीत सामील न होता. परराष्ट्रीय संदर्भात राष्ट्रीय स्वातंत्र्य राखण्याकडे अलिप्ततावादाचे लक्ष होते. अलिप्ततावाद म्हणजे तटस्थता, सहभागी न होणे किंवा विलग राहणे असे नव्हते. ती एक परिवर्तनशील संकल्पना होती ज्यात कोणत्याही लष्करी आघाडीत सामील न होता प्रत्येक आंतरराष्ट्रीय मुद्यावर त्याच्या गुणावगुणांनुसार निर्णय केला जाई. अत्यंत तणावपूर्ण अश्या शीतयुद्ध काळात आपले सार्वभौमत्व जपत, कृतीस्वातंत्र्य देणाऱ्या अलिप्ततवादाला विकसनशील देशात अनेक पाठीराखे मिळाले. अलिप्ततावादी चळवळीचा प्रमुख शिल्पकार आणि अग्रेसर सदस्य म्हणून भारताने तिच्या वाढीत मोलाची कामगिरी बजावली. ही चळवळ तिच्या सर्व सदस्यांना त्यांच्या आकारमान आणि महत्त्वाची पर्वा न करता जागतिक राजकारक आणि निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी देते.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

अलिप्त राष्ट्रांमध्ये, नेहरूंनी युगोस्लाव्हियाचे राष्ट्रपती टीटो आणि इजिप्तचे राष्ट्रपती नासर यांच्याबरोबर चांगले संबंध जोडले. यातिघांना अलिप्तराष्ट्र चळवळीचे संस्थापक मानतात. वसाहतवादी शक्तीचे आदेश धुडकावून आपल्या नैतिक मूल्यानुसार आंतरराष्ट्रीय विषयांवर निर्णय घेऊ इच्छिणाऱ्या राष्ट्रांचा गट म्हणजे अलिप्त राष्ट्र चळवळ, या चळवळीचा दृष्टिकोन साम्राज्यवादविरोधी राहिला आहे.



**आकृती २७.३ : नेकरुमाह, नासर व टिटो (डावीकडून उजवीकडे) अलिप्त राष्ट्र चळवळीचे नेते**

अलिप्त राष्ट्र चळवळ (अ. रा. च.) शीतयुद्धाचे फलित असल्याने अनेक विद्वानांनी शीतयुद्धाची समाप्ती व सोव्हिएत संघाच्या पतनानंतर तिच्या सुसंगततेवर प्रश्नचिन्ह उमटवले. पण तरीही सद्यस्थितीत अ. रा. च. ला महत्त्वाची भूमिका बजावायची आहे. पहिली, सोव्हिएत संघाच्या पतनानंतर एकध्रुवी जगाचा धोका आहे. अ. रा. च. अमेरिकी दमनाविरुद्ध काम करू शकते. दुसरी, प्रगत उत्तर आणि प्रगतीशील दक्षिण या अनेक आर्थिक मुद्यांवर विभागल्या गेल्या आहेत. प्रगतीशील देशांना प्रगत देशांबरोबर उपयुक्त चर्चा करण्यासाठी अ. रा. च. हा एक सुसंबद्ध मंच आहे. तसेच दक्षिण-दक्षिण सहकार्यासाठी अ. रा. च. महत्त्वाचे साधन ठरेल. विकसनशील देशांना जर विकसित देशांच्या तुलनेत आपली शक्ती वाढवायची असल्यास असे होणे आवश्यक आहे. सरतेशेवटी अ. रा. च. च्या ध्वजाखाली एकत्र आलेल्या विकसनशील राष्ट्रांना संयुक्त राष्ट्रात सुधारणा करून त्यांना २१ व्या शतकाच्या आवश्यकतेप्रमाणे बदलण्यासाठी लढावे लागेल.

## २७.५.२ संयुक्त राष्ट्रांना पाठिंबा

भारताने संयुक्त राष्ट्रांकडे नेहमीच आंतरराष्ट्रीय राजकारणात शांततामय बदल घडवून आणण्याचे आणि शांतता व सुरक्षेचे वाहन म्हणून पाहिले आहे. संयुक्त राष्ट्रांच्या ५१ मूळ किंवा संस्थापक सदस्यांपैकी एक असणाऱ्या भारताने संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षा आणि नि:शस्त्रीकरणाच्या सर्व प्रयत्नांना सर्वकष पाठिंबा दिला आहे. संयुक्त राष्ट्रांनी विविध देशांना परस्पर मतभेद सोडवण्यासाठी चर्चेत गुंतवावे अशी भारताची अपेक्षा आहे. संयुक्त राष्ट्रांनी अश्या विकसनशील देशांच्या विकासासाठी कार्य करण्याची भारताची मागणी आहे. अशा देशांची संयुक्त राष्ट्रांतच एक फळी असावी असे भारत मानतो. आपल्या प्रचंड संख्याबळामुळे महाशक्तींना स्वहितासाठी आपला वापर करण्यापासून रोखून हे देश संयुक्त राष्ट्रात उपयुक्त आणि अर्थपूर्ण कामगिरी करू शकतात. असा भारताचा विकास आहे. सुरक्षा परिषद आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षेत महत्त्वाचे काम करते म्हणूनच तिच्यात सुधारणांची

प्रक्रिया सुरू झाली आहे आणि स्थायी सदस्यत्व विस्तारण्याची शक्यता आहे. भारताला स्थायी सदस्य होण्याची चांगली संधी आहे.



**आकृती २७.४ संयुक्त राष्ट्र इमारत, न्यूयॉर्क**

## उपक्रम २७.४

सुरक्षा परिषदेच्या एकूण सदस्यसंख्येची माहिती काढा. त्यात स्थायी सदस्य किती? तुम्ही पुस्तकातून किंवा शिक्षकांना विचारू शकता. त्या माहितीच्या आधारे; पुढील गोष्टींवर लिहा.

१. केवळ ह्याच देशांना स्थायी सदस्य का केले गेले?

२. भारताला स्थायी सदस्यत्व का केले जावे?

## पाठ्यांशावरील प्रश्न २७.४

१. भारताच्या परराष्ट्र धोरणाची प्राथमिक उद्दिष्टे कोणती?

२. भारताने अलिप्ततावादाचा स्विकार का केला?

**३. रिकाम्या जागा भरा.**

१) भारत अलिप्त राष्ट्र चळवळीचा ................ होता.

२) भारताने संयुक्त राष्ट्रांकडे जागतिक राजकारणात ............ चे वाहक म्हणून पाहिले आहे.

३) भारताने संयुक्त राष्ट्रांना ................ तसेच ............. सारख्या इतर प्रयत्नांत पाठिंबा दिला आहे.

४) भारताला सुरक्षा परिषदेत ................. होण्याची चांगली संधी आहे

## आपण काय शिकलो?

❖ व्यक्ती, समाज, राष्ट्र आणि जगासाठी शांतता व सुरक्षा महत्त्वपूर्ण आहेत. ती अशी परिस्थिती आहे जेथे व्यक्ती, संस्था, प्रदेश आणि राष्ट्रे कोणत्याही धोक्याशिवाय पुढे जाऊ शकतात.

❖ शांतता ही सामाजिक राजकीय परिस्थिती आहे जी व्यक्ती, समाज आणि राष्ट्राचा विकास सुनिश्चित करते. सामाजिक व आर्थिक कल्याणाबाबत व्यक्ती, गट, प्रदेश, राज्य आणि राष्ट्र यांच्यात सुदृढ परस्परसंबंध असणारे आणि समता प्रस्थापित करणारे ते सौहार्द असते. सर्वांच्या हितसंबंधाचे रक्षण करणाऱ्या राजकीय व्यवस्थेशीही तिचा संबंध असतो. राष्ट्रांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय संबंधांच्या संदर्भात तिचा अर्थ केवळ युद्ध व संघर्षाचा अभाव असा नव्हे तर सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक समजूतदारपणा आणि एकता असा होतो. खरी शांतता असण्यासाठी सबुरीची गरज असते.

❖ साधारणपत: सुरक्षेचा अर्थ धोका व भयमुक्त अशी सुरक्षित परिस्थिती असा होतो. तसेच व्यक्ती, प्रदेश किंवा देशाची सुरक्षितता असाही होतो. मात्र अगदी प्राथमिक दृष्टीने सुरक्षा म्हणजे अत्यंत भयंकर धोक्यापासून मुक्ती मानवी हक्कांसारख्या मुलभूत मानवी मुल्यांना असलेल्या धोक्यांशीही तिचा संबंध आहे.

❖ पारंपरिक संदर्भात शांतता व सुरक्षेचा संबंध लष्करी किंवा सशस्त्र धोक्याशी जोडला जातो. पण आता तिचा भर मानवी शांतता व सुरक्षा आणि जागतिक शांतता´ सुरक्षेवर आहे. आता ती व्यक्तींवर भर देते आणि त्यांच्या सामाजिक´ आर्थिक विकासावर तसेच मानवी दर्जा राखण्यासाठी पोषक पूर्वअट ठरते.

❖ शांतता व सुरक्षा लोकशाहीसाठी विकासासाठी पूर्वअट आहेत. लोकशाही व विकास आणि शांतता´ सुरक्षेत एक परस्पसंबंध आहे. शांतता-सुरक्षा नसल्यास लोकशाही काम करू शकत नाही. परिणामी विकास होऊ शकत नाही. दुसरीकडे, लोकशाही व विकासाशिवाय शांतता प्रस्थापित करता येत नाही.

❖ शांतर्तासुरक्षेसंदर्भातील दृष्टीकोन व पद्धती भारतात फार आधीच, म्हणजे स्वातंत्र्य चळवळीतच उदयाला आल्या. तो दृष्टीकोन घटनेतही दिसतो. बदलत्या काळाच्या गरजांनुसार तो दृष्टीकोन बदलत आला आहे.

❖ भारताने दहशतवाद, नक्षलवाद आणि विप्लवाच्या बुरख्यामागील हिंसाचाराचा अनुभव घेतला आहे. हे अंतर्गत शांतता व सुरक्षेला गंभीर धोके आहेत. यांना हाताळण्यासाठी भारत सरकार विविध पद्धती आणि रणनीती अंमलात आणत आले आहे.

❖ भारताला आंतरराष्ट्रीय शांतता सुरक्षेची काळजी नेहमीच राहिली आहे. स्वातंत्र्य चळवळीच्या नेतृत्वाने असे जाहीर केले की भारत आंतरराष्ट्रीय शांतर्तासुरक्षेचा पुरस्कार केला कारण ते त्याच्या विकासाला आवश्यक आहे. त्यामुळेच इतर कुठल्याही देशाप्रमाणे भारताचे परराष्ट्र धोरण त्याच्या राष्ट्रहितात आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील त्याच्या स्थानाशी जोडले आहे.

- अलिप्ततावादाला भारतीय परराष्ट्र धोरणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले गेले आहे. जग जेव्हा दोन तटात विभागले होते तेव्हा भारताने अलिप्ततावादाच्या उदयाच्या प्रक्रियेचे नेतृत्व केले अलिप्त राष्ट्र चळवळ तिच्या सदस्यांना त्यांचा आकारमान व महत्त्वाचा विचार न करता जागतिक राजकारण व निर्णय प्रक्रियेत सहभागी घेण्याची संधी देते.

- भारत संयुक्त राष्ट्रांना त्यांच्या शांतता प्रस्थापन कारवायांत आणि नि:शस्त्रीकरणासारख्या उपक्रमात सर्वंकष पाठिंबा देत आला आहे. विकसनशील देशांच्या विकास प्रक्रियेत संयुक्त राष्ट्रांची महत्त्वाची भूमिका भारताला अपेक्षित आहे. भारत दुसऱ्या क्रमांकाची झपाट्याने वाढणारी अर्थव्यवस्था आहे, अनेक आंतरराष्ट्रीय मंचाना त्याने नेतृत्व दिले, शांतता प्रस्थापनेत त्याचे योगदान, विकसनशील जगाचा आवाज पोचवण्यात त्याचे योगदान, विकसनशील जगाचा आवाज पोचवण्यात त्याचे योगदान या सर्वांमुळे सुरक्षा परिषदेचा स्थायी सदस्य होण्याची भारताला चांगली संधी आहे.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. शांतता व सुरक्षा या संज्ञेचा अर्थ सांगा. या संज्ञेच्या पारंपरिक आणि नवीन / अपारंपारिक अर्थात काय फरक आहे?

२. तुम्हाला हे मान्य आहे का की शांतता व सुरक्षा तसेच लोकशाही व विकासामध्ये परस्परसंबंध आहे का? उत्तरांचे समर्थन करा.

३. शांतता व सुरक्षेला असणाऱ्या धोक्यांचा सामना करण्यासाठीच्या दृष्टीकोन व पद्धतींच्या उगमात राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीचे काय योगदान होते?

३. भारतात शांतता व सुरक्षेला असणारे मोठे धोके कोणते? भारताने वापरलेल्या महत्त्वाच्या पद्धती आणि रणनीतो कोणत्या?

४. शांततासुरक्षेच्या परिप्रेक्षात भारतीय परराष्ट्र धोरणाचे परिक्षण करा.

५. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या बदललेल्या स्वरूपात अलिप्ततावादाच्या धोरणाची सुसंगतता स्पष्ट करा.

६. भारत संयुक्त राष्ट्रांना पाठिंबा कशाप्रकारे देत आला आहे? भारताला सुरक्षा परिषदेचा स्थायी सदस्य का करावे?

## पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे

### २७.१

१. अ) व्यत्यय किंवा संघर्ष

ब) सामाजिक आणि आर्थिक कल्याणाबाबत व्यक्ती, गट, प्रदेश, राज्य आणि राष्ट्र यांच्यात परस्परसंबंध असणारे आणि समता तसेच

सर्वांच्या हितसंबंधाचे रक्षण करणारी राजकीय व्यवस्था प्रस्थापित करणारे.

क) धोका किंवा भीती, व्यक्ती, संस्था, प्रदेश, राष्ट्र आणि जग.

२. कारण ती अशी परिस्थिती असते ज्यात व्यक्ती, प्रदेश, राष्ट्र आणि जग कोणत्याही धोक्याशिवाय पुढे जाऊ शकतात. या परिस्थितीत राष्ट्रे अंतर्गतदृष्ट्या अधिक स्थिर असतात, लोकशाही कारभारची आणि मानवी हक्कांप्रती आदर असण्याची शक्यता अधिक असते. संघर्षाने केवळ धोके आणि भीतीच उत्पन्न होते. असे नव्हे तर आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रगतीवरही परिणाम होतो.

३. (१) शांतता व सुरक्षेची नवी / अपारंपरिक समजूत लष्करी धोक्यांच्या पलीकडे जाऊन मानवी अस्तित्वाला घातक इतर धोक्याचाही समावेश करते. (२) तिच्यात केवळ प्रदेश आणि राष्ट्रे नव्हे तर व्यक्ती, समुदाय आणि मानवजातीचाही सामवेश होतो. (३) नव्या समजुतीप्रमाणे शांतता व सुरक्षेकडे सामाजिर्कआर्थिक विकासाची तसेच मानवी प्रतिष्ठा राखण्यासाठीची पूर्वअट मानले जाते. (४) नव्या समजुतीत व्यक्तींना भूक, वासना, आजार व साथीच रोग, पर्यावरणीय ऱ्हास, शोषण आणि अमानवी वागणूक यांपासून मुक्तता असण्याचा समावेश होतो.

## २७.२

१. लोकशाही व विकास तसेच शांतता व सुरक्षा यांच्यात एक परस्परसंबंध आहे. शांतता व सुरक्षा नसल्यास लोकशाही चालू शकत नाही आणि विकास घडत नाही. शांतता असेल तरच नागरिकांना निर्णयप्रक्रियेच्या विविध पातळ्यांवर सहभागी होता येते. विविध भागांच्या विकासासाठी शांतता आवश्यक असते. दुसऱ्या बाजूला लोकशाही आणि विकासाशिवाय शांतता टिकून राहू शकत नाही. जनतेत असंतोष निर्माण करणारी परिस्थिती टाळण्यासाठीही लोकशाही अधिक उपयुक्त आहे. विकास शांततेचा पुरस्कार करतो. विकासाच्या माध्यमातूनच राष्ट्रे त्यांच्या जनतेसाठी सामाजिक-आर्थिक प्रगती तसेच राहणीमानाच्या दर्जात सुधारणा घडवून आणतात.

२. शांतता व सुरक्षा सुनिश्चित करणाऱ्या दृष्टीकोनासंबंधी विविध कल्पना आणि मतांचा स्वातंत्र्य चळवळीतच उदय झाला. नेतृत्वाच्या हे लक्षात आले होते की शांतता व सुरक्षा अबाधित राखली तरच स्वातंत्र्योत्तर लोकशाही व्यवस्थेला कारभार करता येईल. सामाजिक आर्थिक विकाससंदर्भात सामाजिक न्याय आणि धर्मनिरपेक्षतेवर भर देणाऱ्या समाजवादी दृष्टीकोनावर एकमत होण्यामागे शांततेला असणाऱ्या अंतर्गत धोक्याविरुद्ध सुरक्षा पुरवण्याचाच विचार होता.

३. राज्यघटनेने मार्गदर्शक तत्त्वांवरील प्रकरणात शांतता व सुरक्षेचा उल्लेख केला आहे. संघराज्य पद्धती आणि स्थानिक शासनसंस्थांच्या निर्मितीतून अंतर्गत धोक्यांना चाप लावला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर, संविधानाने आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षेचा पुरस्कार करणारे धोरण

स्विकारले. प्रादेशिक व जागतिक पातळीवर शांतता, समतोल आर्थिक विकास, मानवी हक्कांचा पुरस्कार आणि दहशतवाद निर्मूलनासाठीच्या सर्व प्रयत्नांना पाठिंबा देण्याची त्यात तरतूद आहे.

४. लोकशाही संस्था आणि प्रक्रियांना प्रोत्साहन आणि बळ दिले पाहिजे. देशाच्या सर्व भागात सामाजिक आर्थिक विकासाचा वेग वाढवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. लोकांना लोकशाही प्रक्रिया आणि विकास उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत केले पाहिजे. शांतता व सुरक्षा जपण्यासाठीच्या सर्व आंतरराष्ट्रीय प्रयत्नांना भारताने पाठिंबा द्यायला हवा.

**२७.३**

१. अ) दहशतवाद, विप्लव, नक्षलवादी चळवळ

ब) नाट्यमय आणि प्राणघात घात, भीतीचे वातावरण निर्माण करण्यासाठी.

क) राजकीय उद्दिष्टे, सामाजिर्कआर्थिक न्याय

२. भारताने सर्व राष्ट्रांच्या दहशतवादविरोधी प्रयत्नांना पाठिंबा दिला आहे तसेच त्याच्यावर हल्ला झाल्यास इतरांचा पाठिंबा मागितला आहे. राजकीय उद्दिष्टांनी प्रेरित विप्लववादी कारवायांचा सामना भारत सरकार राजनयाने करत आहे. भारताने म्यानमार आरि अलीकडेच बांग्लादेशाबरोबर विप्लववादी कारवायांना त्यांच्याकडून मिळणाऱ्या पाठबळाला आळा घालण्यासाठी करार केले आहेत. पाकिस्ताननेही असेच करावे यासाठी भारत आंतरराष्ट्रीय दबाव आणत आहे. नक्षलवादी चळवळीबाबत असे लक्षात आले की अधिक सखोल सामाजिक-आर्थिक आयाम असणारी ती एक गंभीर बाब आहे. त्या क्षेत्रांमध्ये विकासाचा वेग वाढवण्याचे आणि तरुणांना मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

३. सरकारने देशाच्या सर्व प्रदेशांच्या सर्वकष विकासासाठी सर्व प्रयत्न करावे. सर्वांना शिक्षण व रोजगाराची समान संधी मिळावी. सहभागाच्या समान संधी पुरवण्यासाठी लोकशाही संस्था व प्रक्रियांना बळ देण्यात यावे. आंतरराष्ट्रीय पातळीवर आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा जपण्यासाठीच्या प्रयत्नांना पाठिंबा देणे गरजेचे आहे.

**२७.४**

१. (१) धोरण निर्मितीचे स्वातंत्र्य (२) आंतरराष्ट्रीय शांतता - सुरक्षेचा पुरस्कार (२) इतर राष्ट्रांबरोबर, विशेषत: शेजारी राष्ट्रांबरोबर चांगले संबंध (४) संयुक्त राष्ट्रांना पाठिंबा (५) नि:शस्त्रीकरणाला पाठिंबा, वसाहतवाद, साम्राज्यवाद आणि वर्णवादाला विरोध (६) विकसनशील देशांमध्ये सहकाय

२. सोव्हिएत संघ आणि अमेरिकेने बनवलेल्या लष्करी आघाड्यांत सामील न होता, परराष्ट्रीय गोष्टीसंदर्भात राष्ट्रीय स्वातंत्र्य राखण्याचे अलिप्ततावादाचे उद्दिष्ट होते. अलिप्ततावाद म्हणजे तटस्थता, सहभागी न होणे किंवा विलग राहणे नव्हे अत्यंत तणावपूर्ण अशा शीतयुद्ध काळात आपले सार्वभौमत्व जपत कृतीस्वातंत्र्य जपण्याची संधी अलिप्ततावादाने विकसनशील राष्ट्रांना दिली. अलिप्त राष्ट्र चळवळ सर्व सभासद राष्ट्रांना त्याचे आकारमान व महत्त्वाचा

विचार न करता जागतिक राजकारण आणि निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी देते आहे.

३. अ) प्रमुख शिल्पकार

ब) शांततासुरक्षा आणि शांततामय बदलासाठी

क) शांतताप्रस्थापन कारवाया, नि:शस्त्रीकरण

ड) स्थायी सदस्य

# प्रश्नपत्रिका स्वरुप

विषय – सामाजिकशास्त्र एकूण गुण १००

## १. उद्दिष्टानुसार गुणविभागणी

| उद्दिष्ट | गुण | टक्केवारी |
|---|---|---|
| ज्ञान | ३० | ३० |
| आकलन | ४८ | ४८ |
| उपयोजन | १४ | १४ |
| कौशल्य | ०८ | ०८ |
| एकूण गुण | १०० | १०० |

## २. प्रश्नप्रकारानुसार गुणविभागणी

| प्रश्नप्रकार | प्रश्नसंख्या | प्रत्येक प्रश्नाचे गुण | एकूण |
|---|---|---|---|
| दीर्घोत्तरी प्रश्न | ०४ | ०५ | २० |
| लघुत्तरी प्रश्न | १५ | ०४ | ६० |
| अतिलघुत्तरी प्रश्न | ०४ | ०२ | ०८ |
| बहुपर्यायी प्रश्न | ०४ | ०१ | ०४ |
| कौशल्य (नकाशाप्रश्न) | ०२ | ०४ | ०८ |

## ३. घटकानुसार गुणविभागणी

| अ.क्र. | घटक | गुण |
|---|---|---|
| १. | भारत आणि जग | ३२ |
| २. | भारत ः नैसर्गिक पर्यावरण, साधनसंपत्ती प्रगती | २७ |
| ३. | लोकशाही | २८ |
| ४. | सद्यकालीन भारत – समस्या आणि आव्हाने | १३ |
| | | १०० |

## सामाजिकशास्त्र (२१३)

वेळ – ३ तास एकूण गुण १00

**१. भारताच्या नकाशात खालील गोष्टी भरा.** ४ x १ = ४


i) हिमालयातील सर्वात जास्त उंचीचे शिखर.

ii) भारतातील सर्वात मोठे खारया पाण्याचे सरोवर

iii) अंदमान निकोबार बेटातील राखीव जंगले.

iv) दक्षिण भारतातील चहाचे मळे असणारा प्रदेश.

२. नकाशात १,२, ३ आणि ४ या क्रमांकाने दाखविलेल्या बंदरांची नावे उत्तरपत्रिकेत लिहा. ४ x १ = ४




३. १८५७ चा उठाव यशस्वी झाला नाही. कारण १

अ) तो एक वर्षाच्या आत दडपला गेला

ब) तो उत्तर आणि मध्य भारतापुरताच मर्यादित होता.

क) बंडखोरांच्या पुढारयांना ब्रिटिशांविरुद्ध एकजुटीने लढा द्यावा, असे वाटत नव्हते.

ड) शिस्तबद्ध आणि प्रबळ शत्रुविरुद्ध जयाची शक्यता अगदी कमी होती.

४. इतिहास म्हणजे ---- १

अ) भूतकाळातील गोष्टींचा अभ्यास होय.

ब) समाज आणि संस्कृती या संदर्भातील भूतकाळाचा अभ्यास होय.

क) राजकारण आणि शासनसंस्थेचा अभ्यास होय.

ड) समाज आणि सामाजिकगटांचा अभ्यास होय.

५) ७३ वी घटना दुरुस्ती ----- याच्याशी संबंधित होती. १

अ) स्थानिक नागरी शासनसंस्था

ब) निवडणूक प्रक्रिया

क) स्थानिक ग्रामीण शासनसंस्था

ड) भूमि कायदा

६) इ.स. २००२ ची ८६ वी घटनादुरुस्ती ----- याच्याशी संबंधित होती. १

अ) मोफत महाविद्यालयीन शिक्षण

ब) वय वर्षे १४ पर्यंत मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण.

क) सर्वांना मोफत आरोग्यसेवा

ड) (सर्वांना) सक्तीची नोकरी

७) प्रबोधनकाळात मानवतावादी दृष्टिकोन महत्त्वाचा का होती? २

८) भारतातील पक्ष पद्धतीची कोणतीही दोन वैशिष्ट्ये सांगा. २

९) दळणवळणाचे नवीन मार्गांचा शोध, लागल्यामुळे ज्ञान आणि संस्कृती यांचा प्रसार होण्यास कितपत मदत झाली?

१०) एका गावाला कार्यरत असणारया लोकांची संख्या १८,००० व अवलंबितांची संख्या १२,००० आहे. तर गावाचा अवलंबित गुणक (dependency ratio) काढा.

११) देशातील रस्त्यांमुळे होणारे कोणतेही चार फायदे सांगा. ४ x १ = ४

१२) 'भारतय देश विविधतेत एकता असलेले संघराज्य आहे' या विधानाला पुष्टी देणारी भारतीय संघटराज्याची कोणतीही चार वैशिष्ट्ये सांगा. ४ x १ = ४

१३) 'समानतेच्या हक्का'मधील कोणत्याही चार तरतुदी सांगा. ४ x १ = ४

१४) पर्यावरणाच्या -हासासाठी कारणीभूत असणारे कोणतेही दोन सामाजिक आणि दोन आर्थिक घटक सांगा. २ + २ = ४

१५) आजच्या काळातील समाजाच्या सामाजिक व आर्थिक बाबींवर औद्योगिक क्रांतीचा काय परिणाम झाला आहे, ते स्पष्ट करा. ४

१६) भारताच्या वसाहतीकरणाचे टप्पे सांगा. ४

१७) भारतीय जातिव्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी भारतीय समाज सुधारकांनी केलेले प्रयत्न सांगा. ४

१८) इ. स. १८५७ पूर्वी इंग्रजांविरुद्ध झालेल्या कोणत्याही चार बंडांची कारणे लिहा.

४ x १ = ४

१९) वृक्षसंवर्धनाची का गरज आहे? कोणतीही चार कारणे सांगा. ४ x १ = ४

२०) कल्याणकारी राज्य म्हणजे काय? सामाजिक आणि आर्थिक समानता यावी म्हणून राज्याच्या मार्गदर्शक धोरणात केलेल्या कोणत्याही तीन तरतुदी सांगा. १ + ३ = ४

२१) निवडणूक आयोगाची चार प्रमुख कार्ये सांगा. ४ x १ = ४

२२) अलिप्तता म्हणजे काय? तिची कोणतीही दोन उद्दिष्टे विशद करा. २+२=४

२३) दिलेल्या तक्त्यातील माहितीवरून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.

स्थान A तापमान $0^0$ मध्ये पाऊस सेमी मध्ये

| महिना | जाने. | फेब्रु. | मार्च | एप्रि. | मे | जून | जुलै | ऑग. | सप्टें. | ऑक्टो. | नोव्हे. | डिसें. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तापमान | २२ | २७ | २३ | २९ | २९ | २७ | २६ | २६ | २७ | २७ | २७ | २७ |
| पाऊस | २३ | २१ | ३९ | १०६ | २०८ | ३५६ | २२३ | १४६ | १३८ | २७३ | २०६ | ७५ |

i) स्थान A चे वार्षिक सरासरी तापमान व वार्षिक सरासरी पाऊस काढा.

ii) या स्थानावर २०० सेमी. पेक्षा जास्त पाऊस किती महिने पडतो?

iii) या स्थानाचे हवामान कोणत्या प्रकारचे आहे ते सांगा. २+१+१ = ४

२४) राज्यपालांचे अधिकार आणि कार्ये सांगा. ४

२५) भारतीय लोकशाहीसमोरील कोणतीही चार आव्हाने स्पष्ट करा. ४x१=४

२६) पुराश्मयुग ते लोहयुग या कालखंडातील प्रगतीचे टप्पे स्पष्ट करा. ५


२७) भारताच्या सर्वोच्च न्यायालयाची कार्यकक्षा सांगा. ५

२८) भारतीय स्वातंत्र्यलढयातील महात्मा गांधी यांचे योगदान विशद करा. ५

२९) भारतातील ऊस शेतीसाठी आवश्यक असणाऱया कोणत्याही पाच भौगोलिक परिस्थितीच्या मुद्दांची माहिती द्या. ५x१=५

# गुणदान योजना

१) खाली दिलेला नकाशा पहा. ४x१=४




२) i) कांडला ४x१=४

ii) तुलीकोरीन

iii) विशाखापट्टणम

iv) मंगलोर

३) D

४) A

५) C

६) B

७) मानवतावादी दृष्टिकोनाचा मानवाच्या सकारात्मक कार्यशक्तीवर विश्वास होता आणि मानवाला सुख आणि समाधान मिळविण्याचा हक्क त्यांनी मान्य केला होता.

८) भारतातील पक्ष पद्धतीची वैशिष्टये

i) अनेक पक्ष पद्धती

ii) केंद्रात सरकार बनविण्यास प्रादेशिक पक्षांची महत्त्वाची भूमिका.

iii ) कोणत्याही पक्षाचे संपूर्ण देशभर वर्चस्व नाही. सर्व पक्ष एकमेकांचे प्रतिस्पर्धी आहेत.

v) पक्षांची युतीपद्धती (कोणतीही दोन कारणे)

९) i) त्यामुळे ज्ञानप्रसारास मदत झाली.

ii) प्रवासासाठी नवीन मार्ग शोधण्यात आले.

iii) औद्योगिक क्रांतिचा प्रसार होण्यास आणि मालाची देवाणघेवाण होण्यास मदत झाली.

iv) युरोपियन लोकांना खगोलशास्त्र, गणित आणि ग्रीक तत्त्वज्ञानाची माहिती झाली.

१०) $$\text{अवलंबित गुणक} = \frac{\text{अवलंबित लोक}}{\text{कार्यरत लोक}} \times १००$$

$$= \frac{१२,०००}{१८,०००} \times १००$$

$$= ६६.६६\%$$

$$= ६७\%$$

११) देशातील रस्त्यांचे फायदे

अ) सायकल, रिक्षा, बस, स्कूटर, मोटार किंवा ट्रक यांचे मार्फत थेट ग्राहकांच्या घरापर्यंत सेवा देता येते.

ब) रस्ता बांधणी, दुरुस्ती, देखभाल यांचा खर्च इतर वाहतूक माध्यमांपेक्षा अगदी कमी असतो.

क) अगदी कमी माल अगदी कमी अंतरावर पोहोचविण्यासाठी सुद्धा रस्ता हा स्वस्त आणि अतिशय सोयीस्कर मार्ग आहे.

ड) रस्त्यावरूनच आपण बस स्टँण्ड, रेल्वे स्टेशन, विमानतळ किंवा बंदरापर्यंत जातो.

इ) शेतीतला नाशवंत माल अतिशय जलदगतीने शहरात किंवा विक्रीच्या ठिकाणी आणला जातो.

ई) रस्ते सर्व प्रकारच्या भू-भागात उदा. डोंगर, वाळवंट, पठार बांधता येतात. रस्ते सर्व मानवीवस्ती जोडतात. (कोणतेही ४ ४क्ष१ङ४)

१२) 'भारत देश विविधतेत एकता असलेले संघराज्य आहे.' या विधानाला पुष्टी देणारी संघराज्याची वैशिष्ट्ये –

अ) संघराज्याच्या केंद्राला अनुकूल अशी सत्ताविभागणी

ब) संपूर्ण देशासाठी एकात्म न्यायसंस्था

क) आणिबाणीच्या काळासाठी तरतूद

ड) राज्याच्या राज्यपालाची नेमणूक राष्ट्रपती करतात.

इ) आर्थिक बाबतीत राज्ये केंद्रावर अवलंबून असतात.

ई) अखिल भारतीय लष्करी, सनदी सेवा पद्धती. (कोणतेही ४ ४x१=४)

१३) तरतुदी

अ) न्यायदेवतेसमोर सर्व समान

ब) वंश, जात, धर्म, लिंग अथवा जन्म ठिकाण यावरून कोणताही भेदभाव नाही.

क) सरकारी सेवांमध्ये सर्वांना समान संधी

ड) अस्पृश्यता निर्मूलन

इ) पदव्या रद्द (कोणतेही ४ ४ x १ = ४)

१४) **सामाजिक घटक**

अ) वाढती लोकसंख्या ब) गरीबी क) वाढते नागरिकीकरण ड) बदलती जीवनशैली

**आर्थिक घटक**

अ) शेतीविकास ब) औद्योगिकीकरण क) आर्थिक विकास ड) जास्त उत्पादनक्षमता

१५) अ) उत्पादनात प्रचंड वाढ - उत्पादनप्रक्रिया जलद आणि सोपी

ब) माणूसप्राणी आणि उत्पादिते (तयार माल) यांची सहज सुलभ वाहतूक

क) शहरे प्रचंड उलाढालीची केंद्रे बनली. त्यामुळे अनेक लोकांना रोजगार मिळाला.

ड) उत्तम आरोग्यसेवा उपलब्ध

इ) जीवन गतिमान आणि सहजसुलभ झाले. (कोणतेही ४ ४x१=४)

१६)

अ) भारतात ब्रिटिशांचा धर्मोपदेशक म्हणून प्रवेश.

ब) त्यांनी व्यापार सुरू केला. त्यांनी स्थानिक सत्ताधिशांकडून योग्य मार्गाने किंवा अयोग्य मार्गाने देखील भूभाग बळकाविला.

क) भूभागाच्या सारा वसुलीसाठी धोरण आखले.

ड) भारतीय लोकांचा स्वाभिमान आणि आत्मविश्वास नष्ट केला.

इ) ब्रिटिशांनी भारतात 'फोडा आणि राज्य करा' हे धोरण अवलंबिले.

(कोणतेही ४ ४x१ = ४)

१७) अ) त्यांनी जातीभेद आणि कर्मठपणाच्या विरोध केला.

ब) जातिव्यवस्था ही अन्यायकारक आणि अशास्त्रीय आहे.

क) जातिव्यवस्था ही मानवता विरोधी आहे.

ड) जातिजातितील वैमनस्य कमी करण्याचा प्रयत्न केला. (४x १ = ४)

१८) अ) स्थानिक राजे, संस्थानिक, जमीनदार, गावप्रमुख यांचेकडून लोकांचे शोषण.

ब) शेतीचे व्यापारीकरण

क) सक्तीची सारा आणि करवसुली

ड) लोकांच्या धार्मिक आणि सामाजिक बाबीत ढवळाढवळ

१९) वृक्षसंवर्धनाची गरज

अ) सूक्ष्मजीव आणि प्राणी वनस्पतींवरच जगतात. वनस्पती नसल्यास त्यांना अन्न, निवारा, ऑक्सिजन मिळणार नाही.

ब) वनस्पतींची मुळे माती घट्ट धरून ठेवतात. त्यामुळे माती वारयावर उडत नाही. पाण्याबरोबर वाहून जात नाही.

क) वनस्पती जलचक्रात महत्त्वाची भूमिका बजावतात.

ड) वनस्पती पाणी वाहण्याच्या बाबतीत बांध म्हणून काम करतात. त्या प्रवाहाचा जोर कमी करतात.

इ) प्रकाश संश्लेषण प्रक्रियेत दवनस्पती कार्बन डाय ऑक्साईड वायू घेतात ऑक्सिजन वातावरणात सोडतात.

ई) हरितगृह परिणाम या प्रक्रियेवर वनस्पती परिणामकारक उपाय आहेत.

उ) सजीवांना अन्न, वस्त्रा, निवारा मिळतो. (कोणतेही ४ मुद्दे ४क्ष१ङ४)

२०) समाजातील प्रत्येकाला सामाजिक आणि आर्थिक सुविधा देऊन त्यांचे भले करणे म्हणजे कल्याणकारी राज्य होय. त्यासाठी केलेल्या तरतुदी –

अ) सर्वांच्या गरजा भागविण्यासाठी वस्तूंचे समान वाटप.

ब) सर्वांना संपत्तीचे समान वाटप.

क) समान कामासाठी समान वेतन.

ड) ६ ते १४ वयोगटातील सर्वांना सक्तीचे, मोफत प्राथमिक शिक्षण.

इ) समाजातील बेकार, वृद्ध, आजारी आणि अपंगांना मदत.

२१) निवडणूक आयोगाची कार्ये

अ) संपूर्ण निवडणूक यंत्रणा आणि प्रक्रिया हाताळणे, देखरेख करणे, नियमन करणे.

ब) मतदार याद्या तयार करणे.

क) राजकीय पक्षांना मान्यता देणे. चिन्हे देणे, स्वतंत्र उमेदवारांना चिन्हे देणे.

ड) निवडणूक अधिकारी, उमेदवार, पक्ष यांना निवडणूक प्रक्रिया आणि नियम समजावून सांगणे.

इ) निवडणूक प्रक्रियेतील तक्रारींची दखल घेणे. (कोणतेही ४ ४)

२२) शीतयुद्धकालीन परिस्थितीत कोणत्याही गटात सामील न होणे म्हणजे अलिप्तता होय.

**उद्दिष्टे**

अ) परदेशी संबंधात अलिप्तता राखणे

ब) स्वातंत्र्य आणि स्वायत्ता यांचे रक्षण करणे.

क) जागतिक शांतता

ड) जलद गतीने आर्थिक सुधारणा (कोणतेही दोन)

२३) अ) वार्षिक सरासरी तापमान = ३२७/१२ = २७.३ १

ब) वार्षिक सरासरी पाऊस = १८१४/१२ = १५१.१६ = १५१.२ सेमी

क) पाच १

ड) आर्द्र आणि उष्ण १

२४) राज्यपाल अधिकार

अ) प्रशासकीय – मुख्यमंत्री मंत्री व इतर महत्त्वाच्या नेमणुका

ब) संसदीय – अधिकवेशन भरवणे, स्थगित करणे, विधानसभा बरखास्त करणे.

क) आर्थिक – राज्यपालांच्या संमतीने अर्थमंत्री अंदाजपत्रक तयार करतात व त्यांच्याच संमतीने सभागृहात मांडतात.

ड) विशेष अधिकार – सर्वसाधारणपणे राज्यपाल मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने वागतात. परंतु काही वेळा ते स्वतःच्या मताने वागतात. याचा विशेष अधिकार असे म्हणतात. उदा. राज्याची घडी विघडली आहे असा अहवाल राष्ट्रपतींकडे पाठविणे (किंवा या सारखाच महत्त्वाचा मुद्दा)

२५) भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने

अ) गरीबी ब) निरक्षरता क) लिंग असमानता ड) जातियता इ) धर्म ई) प्रांतवाद, भाषावाद उ) भ्रष्टाचार ऊ) हिंसाचार (कोणतेही ४)

२६) पुराश्मयुग

हत्यारे

अ) कुरहाड, भाला, धनुष्यबाण यासारखी हत्यारे

ब) चाकाचा शोध

क) संमिश्र शेती, सामाजिक जीवन पद्धती

ड) सामाजिक जीवन आणि व्यापार

इ) शहर वसविण्याची सुरवात - ग्रीस संस्कृती, चित्रकला, सुशोभीकरण यांची सुरवात, राजकीय जीवनाची सुरवात. साम्राज्य स्थापण्याच्या दृष्टीने हालचाल.

२७) सर्वोच्च न्यायालयाची कार्यकक्षा -

अ) मूळ कार्यकक्षा - या बाबी फक्त सर्वोच्च न्यायालयाच्या कक्षेतच येतात. उदा.

१) केंद्रसरकार व राज्य सरकार / सरकारे यामधील वाद

२) दोन राज्यातील वाद

३) केंद्रसरकार व काही राज्ये आणि २ ते ३ राज्ये यामधील वाद.

ब) अपिल कार्यकक्षा - खालच्या कोर्टातील निकालावर अपिल दाखल करून घ्यायचा अधिकार.

क) सल्ला कार्यकक्षा - राष्ट्रपतींनी पाठविलेल्या प्रकरणांबाबत विचार करणे. प्रकरणे सल्ला देण्यायोग्य वाटल्यास राष्ट्रपतींना सल्ला देणे. असा सल्ला देणे सर्वोच्च न्यायालयावर बंधनकारक नाही व हा सल्ला पाळणे हे राष्ट्रपतींवर बंधनकारक नाही. याखेरीज सर्वोच्च न्यायालयाचे आणखी काही अधिकार

अ) घटनेचा रक्षणकर्ता

ब) निर्णयप्रक्रियेचा आढावा

क) मूलभूत हक्कांचा रक्षणकर्ता

२८)

अ) गांधजींनी राष्ट्रीय चळवळ बहुजन समाजापर्यंत नेली.

ब) असहकार चळवळ सुरू केली.

क) स्वदेशी चळवळ, परदेशी मालावर बहिष्कार

ड) खिलापत चळवळीला पाठिंबा दिला.

इ) ब्रिटीश सरकारचा निषेध म्हणून दांडीयात्रा काढली.

ई) स्वराज्याची मागणी केली.

उ) छोडो भारत चळवळ (५x१ = ५)

२९) उसाच्या शेतीसाठी अवश्यक असणारी भौगोलिक परिस्थिती

अ) तापमान – उष्ण आणि दमट हवामान सरासरी तापमान २१0 से. ते २७0 से.

ब) पाऊस – ७५ ते १५0 सेमी. यापेक्षा कमी पाऊस पडत असल्यास जलसिंचन योजना असावी.

क) माती –

१) उसाला कोणत्याही प्रकारची माती चालते. फक्त ती माती पाणी धरून ठेवणारी असावी.

२) मातीमध्ये नायट्रोजन, कॅल्शिअम आणि फॉस्फरसचे प्रमाण जास्त असावे. माती आम्लधर्मी किंवा आम्लारीधर्मी असू नये.

ड) कामगार – उस पिकविण्यासाठी अनेक कामगारांची आवश्यकता असते. ते स्वस्त असणे आवश्यक आहे.

इ) वाटप – भारतातील उसाच्या पिकाचे तीन प्रमुख विभाग आहेत.

अ) सतलज आणि गंगा या दोन नद्यांमधील पंजाबपासून बिहारपर्यंतचा पट्टा.

ब) महाराष्ट्रापासून तामिळनाडूपर्यंत असणाऱ्या काळया मातीमध्ये आणि पश्चिम घाटाच्या पूर्व बाजूच्या उतारावर.

क) आंध्र प्रदेशाचा किनारा आणि कृष्णा नदीचे खोरे (५ x १ = ५)

# *Awards Won by NIOS*




**Web Ratna Awards 2012 Platinum Icon under Outstanding Web Content** for Acknowledging exemplary initiatives/practices in the realm of e-Governance for dissemination of information & services instituted by Department of Information Technology, Ministry of Communications & IT (MC&IT) and National Informatic Centre (NIC), Government of India. The award has been conferred by Hon'ble Minister of Communications and Information Technology Shri Kapil Sibal on 10th December 2012 at Dr. D.S Kothari Auditorium, DRDO Bhawan, Dalhousie Road, New Delhi.

## TOI Social Impact Award 2012




NIOS has been selected as winner of the Social Impact Award 2012 instituted by Times of India in partnership with J P Morgan The Award is given in the recognition of magnificent work done by an individual or groups or institutions making an impact in the society in various segment including Education. NIOS feels honoured to accept the award.

The award was conferred on 28th January 2013 at a function in presence of President of India and high level dignitaries.

## National Awards for the Empowerment of Persons with Disabilities, 2012



The NIOS received the National Award for the Empowerment of persons with disabilities, 2012 Instituted by Ministry Social Justice and Empowerment, Govt. of India. The NIOS got this award under the category of best accessible Website for making its website www.nios.ac.in completely accessible for person with disabilities. The website is bilingual in Hindi and English. It also has provisions of Screen Reader, increasing text size, colour contrast scheme etc. for disabled learners. This award was conferred by the Hon'ble President of India at Vigyan Bhawan, New Delhi on 6th February, 2013. Dr. S.S. Jena Chairman, NIOS received the award.

पहिली घडी

**प्रतिसाद पाठ क्र. १५ ते २७**

| पा. क्र. | पाठाचे नाव | पाठ्यांश | | | | भाषा | | चित्रे आकृत्या | | आत्मसात केलेले ज्ञान | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सोपा | अवघड | मनोरंजक | संदिग्ध | सोपी | अवघड | उपयोगी | निरुपयोगी | अतिशय उपयोगी | थोडे फार उपयोगी | निरुपयोगी |
| १५ | | | | | | | | | | | | |
| १६ | | | | | | | | | | | | |
| १७ | | | | | | | | | | | | |
| १८ | | | | | | | | | | | | |
| १९ | | | | | | | | | | | | |
| २० | | | | | | | | | | | | |
| २१ | | | | | | | | | | | | |
| २२ | | | | | | | | | | | | |
| २३ | | | | | | | | | | | | |
| २४ | | | | | | | | | | | | |
| २५ | | | | | | | | | | | | |
| २६ | | | | | | | | | | | | |
| २७ | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

शेवटची घडी व चिटकविणे

चौथी घडी

तिसरी घडी

विद्यार्थी मित्रांनो,

आपण या पुस्तकाचा अभ्यासपूर्ण केला आहे. आपला अभ्यासक्रम जीवनाशी निगडीत व मनाला समाधान देणारा असावा असा आमचा नेहमीच प्रयत्न असतो. पाठयपुस्तके तयार करणे ही द्विमार्गी प्रक्रिया आहे. पाठयपुस्तकांबाबतचा आपला प्रतिसाद अभ्यासविघटक सामग्रीत सुधारणा करताना उपयोगी पडणार आहे. आपल्या अभ्यासातील काही वेळ खर्च करून सोबतचा प्रतिसाद कृपया पूर्ण करा. त्याचा उपयोग उत्तम प्रकारचे अभ्यास साहित्य तयार करताना होईल.

कळावे,<br>
अभ्यासक्रम समन्वयक<br>
सामाजिक विज्ञान

**प्रश्नांवरील प्रतिसाद**

| पा. क्र. | पाठाचे नाव | पाठ्यांशावरील प्रश्न | | सहामाही प्रश्न | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | उपयोगी | निरुपयोगी | सोपे | अवघडउ | अतिअवघड |
| १५ | | | | | | |
| १६ | | | | | | |
| १७ | | | | | | |
| १८ | | | | | | |
| १९ | | | | | | |
| २० | | | | | | |
| २१ | | | | | | |
| २२ | | | | | | |
| २३ | | | | | | |
| २४ | | | | | | |
| २५ | | | | | | |
| २६ | | | | | | |
| २७ | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

दुसरी घडी

**Complete and Post the feedback form today**

आपल्या सूचना

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

आपण या विषयासाठी इतर पुस्तके वापरील का? होय / नाही

जर उत्तर होय असेल तर त्याची कारणे सांगा.

_______________________________________________

_______________________________________________

नावनोंदणी क्रमांक _______________________

पत्ता _______________________

_______________________

विषय _______________________

पुस्तक क्र. _______________________

**Course Coordinator,**
**Social Science**
**National Institute of Open Schooling**
**A-24-25, Institutional Area**
**Sector-62, NOIDA (U.P.), Pin-201309**

Postage
Stamp

No Enclosures allowed